SJIF Impact Factor: 8.33

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

वर्ष-४० / अंक-२७ / डिसेंबर, २०२२

संपादक
डॉ. राहुल भगत

कार्यकारी संपादक
डॉ. प्रियदर्शन भवरे

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

**समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबी विषयीचे निवेदन**
**(नियतकालिकांच्या नोंदणी संबंधी नियम ८ प्रमाणे)**

---

प्रकाशन स्थळ:
मराठी समाजशास्त्र परिषद
द्वारा, समाजशास्त्र विभाग, सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा - ४४१९१२

---

नियतकाल : वार्षिक (ISSN 2230-7745)

मुद्रकाचे नाव : **डॉ. प्रियदर्शन भवरे**, कार्यकारी संपादक
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना - ४३१ २१३

मुद्रण स्थळ : आस्था प्रिंट, नागपूर.

प्रकाशकाचे नाव : **डॉ. राहुल जनार्धन भगत**, संपादक.
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : द्वारा, समाजशास्त्र विभाग, सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा - ४४१९१२

संपादकाचे नाव : **डॉ. राहुल जनार्धन भगत**, संपादक.
पत्ता: वरीलप्रमाणे
राष्ट्रीयत्व: भारतीय

मालकाचे नाव: **मराठी समाजशास्त्र परिषद**.
पत्ता: वरीलप्रमाणे.

मी डॉ. राहुल जनार्धन भगत असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**डॉ. राहुल जनार्धन भगत**
प्रकाशक.

---

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ४० - अंक २७ - डिसेंबर, २०२२

मुख्य संपादक:
**डॉ. राहुल भगत**

कार्यकारी संपादक:
**डॉ. प्रियदर्शन भवरे**

**संपादक समिती सदस्य:**
डॉ. संपत काळे, डॉ. अर्चना जगतकर, डॉ. ज्योती पोटे,
डॉ. दया पांडे, डॉ. ज्योती गगनग्रास, डॉ. सुधीर येवले.
डॉ. अशोक बोरकर, डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ. अनिल जायभाये,
डॉ. राजकुमार भगत, डॉ. मधुकर देसले, डॉ. श्रीनिवास पिलगुलवार,

**संपादकीय सल्लागार मंडळ:**
डॉ. उत्तम भोईटे, डॉ. शंकर एल. गायकवाड,
डॉ. पी. जी. जोगदंड, डॉ.प्रदीप आगलावे,
डॉ. स्मिता अवचार, डॉ. सुरेश वाघमारे.

**संपर्क पत्ता:**
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा: एस. एन. मोर महाविध्यालय,
तुमसर जि. भंडारा - ४४१९१२
Website :www.mspmonline.com E-mail : marathisocio@gmail.com

टंकण व मांडणी: श्री.पवन गजलवार, नागपूर.
मुद्रित शोधक: संशोधन समितीचे सर्व समन्वयक.

**मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना अंक विनामूल्य.**

सूचना: या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या-त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ४० - अंक २७ - डिसेंबर, २०२२

**समकक्ष समीक्षा समिती** (Peer Review Committee)

**डॉ. संपत काळे**, टाटा समाजविज्ञान संस्था, तुळजापूर जि. उस्मानाबाद.

**डॉ. संदीप चौधरी**, स. भु. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद.

**डॉ. प्रदीप मेश्राम**, जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा.

**डॉ. नलिनी बोरकर**, कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोल पंप, जवाहरनगर, भंडारा.

**डॉ. श्रीनिवास पिलगुलवार**, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर.

**डॉ. दया पांडे**, भारतीय महाविद्यालय, अमरावती.

**डॉ. दीपक धारवाडकर**, तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव जि. हिंगोली.

**डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण**, शारदा महाविद्यालय, परभणी.

**डॉ. गंगाधर मोरे**, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड.

**डॉ. बी. एच. किर्दक**, संत गजानन महाराज महाविद्यालय, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

**डॉ. अर्चना जगतकर**, न्यू कॉलेज, गांधी मैदान, कोल्हापूर.

**डॉ. अनिल जायभाये**, सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा. तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**डॉ. कालिदास भांगे**, आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रंगारी, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

**डॉ. मधुकर देसले**, महिला महाविद्यालय, नंदुरबार.

**डॉ. राजकुमार भगत**, राजीव गांधी महाविद्यालय, सडक-अर्जुनी जि. गोंदिया.

**डॉ. शोभा इंगळे**, महिला महाविद्यालय, नांदेड.

**डॉ. आर. एस. मांजरे**, शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १. | १९७० नंतरच्या महाराष्ट्रातील सामाजिक-राजकीय वास्तव... | संजयकुमार कांबळे | .. १ |
| २. | महात्मा ज्योतीराव फुले यांची सामाजिक परिवर्तनाची चळवळ | सोमा गोंडाणे | .. ९ |
| ३. | मुंबईतील महिला पोलीस: भूमिका आणि ताण-तणाव | ज्योती पोटे | .. ११ |
| ४. | महिला सक्षमीकरण: एक समाजशास्त्रीय अभ्यास | व्ही. एन. कांबळे | .. १६ |
| ५. | गोंधळी जमातीची उत्पत्ती | मधुकर धुतुरे | .. २० |
| ६. | भटक्या जमातींचे प्रश्न आणि समस्या | प्रभाकर गायकवाड | .. २४ |
| ७. | संविधानात्मक तरतुदी आणि आदिवासी महिलांच्या..... | रिटा मालचे | .. २८ |
| ८. | आदिवासी अस्मितेच्या संदर्भात स्वंयसेवी संस्थांची भूमिका | संजय चव्हाण | .. ३४ |
| ९. | शिक्षणाच्या खाजगीकरणाचा दुर्बल घटकावर पडलेला प्रभाव | दीपक पवार | .. ४० |
| १०. | कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण: एक सामाजिक | हिरालाल भोसले | .. ४४ |
| ११. | नागरिकांचे मुलभूत अधिकार आणि कर्तव्ये | जयमाला लाडे | .. ४८ |
| १२. | अपंग आणि कुष्ठ बाधितांच्या सक्षमिकरणात आनंदवनचे योगदान | प्रवीण मुधोळकर | .. ५३ |
| १३. | तुकडोजी महाराजांचे अंधश्रद्धा निर्मुलन विषयक विचारांचे.... | शुभांगी मोहोड | .. ५८ |
| १४. | जागतिकीकरण आणि कोरोना काळातील महिला..... | निर्मला वाघ | .. ६० |
| १५. | जागतिकीकरणाच्या विकासाचा तुलनात्मक अभ्यास | नंदलाल बर्डे | .. ६२ |
| १६. | मोबाईलचा समाजावर झालेला परिणाम | नवनाथ खेत्री | .. ६४ |
| १७. | गडहिंग्लज येथील हिरण्यकेशी पर्यावरण मंडळाची..... | सतीश धनवडे | .. ६९ |
| १८. | लिंगभाव आणि कायदे | प्रज्ञा बेलेकर | .. ७२ |
| १९. | समाज माध्यमाच्या विळख्यातील समाज | भगवान मनाळ | .. ७५ |
| २०. | ग्रामीण महिलांच्या जमीन हक्क मागणी नंतरचे सामाजिक परिणाम | दीपक शिंदे | .. ८१ |
| २१. | लॉकडॉऊन आणि कौटुंबिक हिंसाचार | पूनम गायकवाड | .. ८५ |
| २२. | महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता | साहेबराव हिवाळे | .. ८९ |
| २३. | बळीराजा चेतना अभियानाचे शेतकऱ्यांच्या जीवनावर व | संपत काळे | .. ९४ |
| २४. | महिला उद्योजकता चळवळ आणि महिला सक्षमीकरण | सम्राट कसबे | .. ९८ |
| २५. | भारतीय तरुणाई पाश्चिमात्य जीवनशैली आणि जबाबदार..... | नीलिमा सरप | .. १०४ |
| २६. | समाज माध्यमाच्या विळख्यात मानवी जीवन | बिरादार प्रतिभा | .. १०८ |
| २७. | भारतातील वृद्धांच्या समस्या | रामदास वैद्य | .. ११२ |
| २८. | भारतातील स्त्रीयाप्रतींचा कौटुंबिक हिंसाचार | सुरेंद्र रोटे | .. ११४ |
| २९. | कोविड १९: भारतीय स्त्रियांच्या संदर्भातील कौटुंबिक हिंसाचार | अर्चना कांबळे | .. ११७ |
| ३०. | पेसा कायद्याची अंमलबजावणी : एक समाजशास्त्रीय अध्ययन | श्रीनिवास पिलगुलवार<br>शुभांगी भेंडे | .. १२० |
| ३१. | भारतीय समाजव्यवस्थेत समतेचे महत्व | राजकुमार भगत | .. १२६ |
| ३२. | खुल्या कारागृहातील कैद्यांचा सुधारात्मक अभ्यास | विनोद खेडकर | .. १२९ |
| ३३. | आदिवासींच्या सामाजिक चळवळीत बिरसा मुंडा यांचे योगदान | रवींद्र विखार | .. १३४ |
| ३४. | प्रसार माध्यमे आणि समाज | अनिल गावंडे | .. १३८ |
| ३५. | भारतातील शेतकरी चळवळ: एक आढावा | रामेश्वर मोरे | .. १४० |
| ३६. | बौद्धांच्या सामाजिक जाणिवा-डॉ. नलिनी बोरकर(पुस्तक परिचय) | प्रियदर्शन भवरे | .. १४३ |
| ३७. | मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३१ व्या अधिवेशनाचा अहवाल | नारायण कांबळे | .. १४६ |

# संपादकीय

मराठी समाजशास्त्र परिषदेचा डिसेंबरचा अंक आपल्यासारख्या सुज्ञ वाचकांच्या हाती देतांना आम्हाला निश्चितच आनंद होत आहे. कोविड काळातील आम्ही संपादित केलेल्या अंकाचे आपण सर्वांनी स्वागत केले होते. ही पार्श्वभूमी लक्षात घेता पुन्हा एकदा ही जबाबदारी आमच्यावर मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीने टाकली आहे. ती आम्ही आनंदाने स्वीकारली. त्याचेच फलित म्हणून हा अंक आपल्यासमोर सादर करत आहे.

संपादन करणं हे अतिशय जोखमीचे काम आहे असे आम्हाला वाटते. विषय जरी भिन्नभिन्न असले तरी हे सारे विविधांगी लेख एका सूत्रात गुंफणे हा एक आनंददायी अनुभव आहे. एखादा अनावश्यक भाग वगळणे, त्यात फेरबदल करून मूळ आशयाला धक्का न लावणे ही मोठी कसरत करावी लागते. त्यात शोधनिबंधकर्त्याचा हिरमोड तर होणार नाही याची काळजी घेणे. कधी कधी तर मुख्य टायटल बदलणे अशीही कामे करावी लागतात. ज्यांचा शोध निबंध प्रसिध्द झाला आहे त्यांनी तो पुन्हा एकदा वाचून बघितल्यावर कळते की नेमका काय बदल झाला आहे. बऱ्याचदा आपल्या चुका आपणाला कळत नाही त्या इतर कोणीतरी सांगणं आवश्यक असते व ते मान्य करणे हे आपल्या प्रगल्भतेसाठी अतिशय आवश्यक आहे. सतत शिकण्याची प्रक्रिया आपल्यात सुरू असली पाहिजे तरच आपणाला पुढे जाता येईल. आपली संकुचित मनोवृत्ती आपल्याच प्रगतीला खीळ बसवते. म्हणून ज्ञान व्यवहारात पारदर्शकता असली पाहिजे. प्रस्तुत अंकातील अनेक शोधनिबंध प्रश्नाच्या मुळाशी जातात मात्र काही शोध निबंध हे वर वरची बाजू मांडण्याचा प्रयत्न करतात. ते प्रश्नाची सोडवणूक करत नाही. वर्षातून एकदाच का होईना पण सखोल अभ्यास व त्याला चिंतनाची जोड देऊन एखाद्या आवडीच्या विषयावर लेखन केले तर निश्चितच आपले योगदान संबंधित विषयाला होईल..

भाषेच्या शुद्धलेखनाची ही काळजी घेणे हे गरजेचे आहे, अगदीच बाळबोधपणासारखे लिहणे हे आपल्या प्रकृतीला न शोभणारे आहे म्हणून याची काळजी घेणे अतिशय गरजेचे आहे. शुद्धलेखन हा आपल्या भाषेचा अलंकार आहे. आपण कितीही चांगला शोधनिबंध लिहिला मात्र त्याचे व्यवस्थित प्रुफ रीडिंग केले नाही तर तो वाचकापर्यंत पोहोचणार नाही. याचीही आपण नोंद घेणं गरजेचे आहे असे आम्हाला वाटते. शोधनिबंध सादर करण्याची विशिष्ठ शैली असते ती प्रयत्नाने साध्य करता येऊ शकते हे या निमित्ताने सांगता येईल.

आवाहन केल्याप्रमाणे ठराविक फॉन्टमध्ये संशोधन लेख मागविले होते मात्र अनेक संशोधनकर्त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. ज्यामुळे फॉन्ट कन्व्हर्टसाठी व संपादनासाठी वेळ लागला. अंकाचे संपादन करणे ही कठीण गोष्ट आहे त्यासाठी खूप वेळ द्यावा लागतो. लेखाची मांडणी, त्याची रचना, त्याची जागा हे सारे काही व्यवस्थित बसवावे लागते. थोड्याही चुकीने पूर्ण अंकाची मांडणी बिघडून जाते. त्यामुळे काळजीपूर्वकच हे काम करावे लागते.. खूपच पेशंस असावा लागतो. त्यामुळे लेख पाठवताना संशोधकांनी खूप काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर समन्वयकांनीही ते वाचून बघणे आवश्यक आहे. त्यावर थोडेफार संस्कारही करणे गरजेचे आहे मात्र हे झाले नाही. यापुढे आपण काळजी घ्याल अशी अपेक्षा आहे.

या अंकाचेही आपण सर्व स्वागत कराल ही अपेक्षा आहे. काही कमतरता असल्यास निश्चित कळवाव्यात त्याचा सन्मान केला जाईल....

पुनश्च एकदा आभार व शुभेच्छा.

मुख्य संपादक : **डॉ. राहुल भगत**

कार्यकारी संपादक : **डॉ. प्रियदर्शन भवरे**

# १९७० नंतरच्या महाराष्ट्रातील सामाजिक - राजकीय वास्तवाचा समाजशास्त्रीय अभ्यास

***प्रा.कांबळे संजयकुमार,*** *स्त्री आणि लिंगभाव अभ्यास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*

***सारांश:*** *महाराष्ट्रातील शेकडो लोक मनाने अध्याप इतिहासकालातच वावरत असले तरी महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास अद्याप लिहिला गेलेला नाही महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास हा येतील समाज जीवनातील धार्मिक सामाजिक आर्थिक व राजकीय घडामोडी त्यांची परस्पर संबंध या घटनांचे एकमेकांवर झालेले परिणाम यांचे विश्लेषण करणारा असला पाहिजे. असा इतिहास लिहिणे ही अत्यंत अवघड काम आहे. त्यातल्या त्यात शिवशाहीच्या उदयापासून पेशवाईच्या आतापर्यंतच्या राजकीय इतिहासाची दखल घेणारे ग्रंथ काही प्रमाणात तरी सापडतात मात्र आधुनिक काळातील इतिहास लिहिण्यासाठी भरपूर साधने उपलब्ध असूनही कोणी इतिहासकार पुढे सरसावलेले नाहीत. असा इतिहास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून लिहिला गेला पाहिजे. प्रस्तुत लेखात १९७० नंतरच्या महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय परिवर्तनाचा धावता पट मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.*

***प्रस्तावना:*** इतिहास हे आधुनिक काळात एक सामाजिक शास्त्र म्हणून विकास पावले आहे. केवळ घटनांचा तपशील गोळा करून त्यांची काळानुक्रमे मांडणी केली म्हणजे इतिहास होत नाही. घटिते स्वतःच आपल्या वतीने बोलतात असे म्हणणे ही खरे नाही. घटीताना बोलते करून त्यांच्यापासून काही निष्कर्ष काढण्याचे काम इतिहासकाराला करावे लागते. ज्या घटना समाजाच्या पृष्ठभागावर दिसतात त्यांच्या तळाशी वेगळा असा कार्यकारभाव कधी कधी दडलेला असतो. निरनिराळ्या गटांचे हितसंबंध या घटितांमधून व्यक्त होत असतात. घटनांचे अर्थ समजण्यासाठी त्यांना प्रश्न विचारावे लागतात. त्यांचे स्पष्टीकरण करावे लागते ( पंडित नलिनी १९९०पृ,११३) प्रा. सदानंद मोरे महाराष्ट्राचा गेली पन्नास वर्षे अभ्यास करत आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील लोकसंस्कृती लोक व्यवहार महाराष्ट्रातील वैचारिक परंपरा यांचा त्यांनी अभ्यास केलेला आहे. त्यांनी गर्जा महाराष्ट्र, थोरांचे अज्ञात पैलू, महाराष्ट्राची लोकयात्रा, तुकाराम दर्शन इत्यादी विषयावर ते सातत्याने लिहीत आहेत. प्राध्यापक राजेंद्र होरा यांनी आधुनिकता आणि परंपरा या विषयाचा वेध घेत असताना १९ व्या शतकातील महाराष्ट्र याचा त्यांनी अभ्यास केला त्याविषयी त्यांनी यदि फडके गौरव ग्रंथ संपादित केला. तर किशोर बेडकीहाळ यांनी आंबेडकर अकादमीच्या माध्यमातून बदलत्या महाराष्ट्राचा वेध घेतला. य. दि. फडके, गेल ऑम्वेट, उमेश बगाडे इत्यादी अभ्यासकांनी महाराष्ट्राचा सविस्तर अभ्यास केलेला आहे. या सगळ्या अभ्यासातून महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय सांस्कृतिक परिवर्तनाचा त्यातील स्थित्यंतरांचा सखोलपणे आढावा घेता येऊ शकतो. महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा आपणाला यामधून समजू शकते. सुधीर बेडेकर यांनी त्यांच्या हजार हातांचा ऑक्टोपस या पुस्तकात १९६० आणि १९७० या दोन दशकात काय घडत होते याची मांडणी केली आहे. १९७० नंतरच्या काळात महाराष्ट्रात नवशिक्षित दलित आणि कामगार व्यक्त होत होती त्यांनी जात वर्ण आणि धर्मावर प्रश्न उपस्थित केले. दलित साहित्याने प्रस्थापित उच्च जात वर्गीय साहित्य विश्वाला हादरवून टाकले या काळात मागोवा, तात्पर्य हे नियतकालिके महत्वाची व्यासपीठ होते. १९७५ नंतर स्त्रीमुक्ती चळवळीला जोम आला त्यांनी अनेक प्रश्न उभे केले. १९७५ मध्येच व्हिएतनाम युद्ध थांबले. १९८० च्या दशकात गोरबाकचेव्ह यांनी रशियातल्या कम्युनिस्ट पक्षात अधिक मोकळेपणा आणि बदल घडविण्याचा प्रयत्न केला. या सगळ्या पार्श्वभूमीवर १९७० नंतरच्या महाराष्ट्रात काय घडत होते. महाराष्ट्राची सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी काय होती याचा समाजशास्त्रीय वेध घेणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्राची सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी:** प्रा. राजेंद्र व्होरा यांनी '१९ व्या शतकातील महाराष्ट्राचा विचार' करताना 'आधुनिकता आणि परंपरा' या संदर्भात आढावा घेतला आहे. सध्याकालीन समाजकारण व राजकारणाची पूर्वपिठीका म्हणून ही एकविसाव्या शतकाकडे पाहिले जाते. वसाहतवादामुळे महाराष्ट्रात मूलभूत बदल घडून आले. त्यावेळी पुनरुजीवन, धर्म सुधारणा आणि प्रबोधन या प्रक्रियांचा अनुभव युरोपच्या गाठीशी होता. औद्योगीकरणाला सुरुवात झाल्यापासून उत्पादनाची नवी पद्धत उतरली होती. या सर्वांचा विचार वरील संपादित ग्रंथात करण्यात आला आहे. वसाहतीक आधुनिकतेमुळे बाह्य विश्वाकडे पाहण्याची आणि स्वतःच्या आत्मस्थितीकडे पाहण्याची महाराष्ट्रीय समाजाची नजर बदललेली होती. इतिहासाचे काही अभ्यासक त्याला 'ज्ञानशास्त्रीय खंड' म्हणतात. महाराष्ट्राच्या विचारविश्वामध्ये त्यामुळे मोठी घुसळन होऊन प्रबोधन पर्वाला सुरुवात झाली. (बगाडे उमेश, लोकसत्ता, पुणे, ८ जानेवारी २०२०) डॉ. उमेश बगाडे यांनी त्यांच्या 'आधुनिक महाराष्ट्राची समाजभूमी' या लेखात महाराष्ट्राला मध्यमवर्गाला घडविणाऱ्या समाजप्रक्रियेचे विश्लेषण केले. ते म्हणतात जात-वर्गाची संमिश्रता वासाहतिक काळातील मध्यम वर्गाच्या

घडणीचे मुख्य वैशिष्ट्य राहिले. जाती व वर्गाची वैशिष्ट्ये, संघटन तत्त्वे, दर्जा पद्धती, सामाजिक अभिसरणाच्या पद्धती आणि त्यांचा पूरकतेचा व विरोधाचा संबंध एकत्रितपणे मध्यमवर्गाच्या व्यवहारात प्रगट होत राहिला. एका बाजूला जातिसमाजातील इच्छा व प्रेरणांनी वर्गव्यवहाराला प्रभावित केले तर दुसऱ्या बाजूला, वर्गसमाजातील इच्छा व प्रेरणांनी जातीच्या व्यवहाराला प्रभावित केले. त्यातून जात-वर्गाच्या एकवट रूपात नव्या मध्यमवर्गाचे स्वरूप विकसित होत राहिले. सुधीर बेडेकर यांनी त्यांच्या पुस्तकात त्यातही १९६५ ते १९७५ या कालखंडातील ज्या घडामोडी घडत होते. त्या विरुद्ध त्या काळातील तरुण पिढी असंतोष प्रकट करत होती. याच काळात अमेरिकेने व्हिएतनाम विरुद्धच्या जे युद्ध पुकारले होते. त्याला विरोध केला होता याच काळात' लिब्रेशन थिओलॉजी'चा विचार ख्रिश्चन धर्मोपदेशकांत वाहत होता. व्हॅटिकन विरुद्ध बंड करून तिथल्या डाव्या विचारांच्या चळवळी समोर हुकूमशाही व अमेरिका दर्जेने सत्ताधारी राजवटीविरुद्ध संघर्ष करत. १९६८ मध्ये फ्रान्समधल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने गंभीर परिस्थिती निर्माण केली होते. या काळात जो रसेल यासारखे विचारवंत त्याकाळी युद्धाच्या विरोधात विचार व्यक्त करत असत. यामुळे तरुणांना बळ मिळत होते. पाश्चात्य जगात नव डावा नावाचा प्रवाह याच काळात सुरू झाला. भारतात याच काळात १९६८ मध्ये पश्चिम बंगालमध्ये नक्षलवादी चळवळ सुरू झाली होती. तरुणातील असंतोष हिंसक रूपाने पुढे येत होता. १९७० च्या काळात जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली नवनिर्माण आंदोलन सुरू झाली होती. गरिबी, महागाई आणि भ्रष्टाचार हे मुद्दे घेऊन त्यांनी जनतेच्या मनात संतोष पेटविला होता. १९७५ मध्ये इंदिरा गांधी विरुद्ध अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेला निकालाची पार्श्वभूमी असली तरी जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाला झुकविण्याची भूमिका त्यामागे होती. याच काळात देश पातळीवर नाट्य आणि सिनेमा या क्षेत्रात नवीन लाट आली रंगभूमी दिवाणखान्यातून मोकळ्या प्रांगणातच नव्हे तर रस्त्यावर आली पथनाट्य होऊ लागली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळी उद्याच्या महाराष्ट्राबद्दल बरेच लिखाण प्रसिध्द झाले होते. उद्याचा महाराष्ट्र कसा असेल? कसा असावा? या दृष्टीतून काही ग्रंथही प्रसिध्द झाले होते. प्रा. गं. भा. सरदार यांच्या संपादकत्वाखाली 'महाराष्ट्र परंपरा, प्रगती आणि समस्या' असे दोन खंड १९६० साली प्रसिध्द झाले. त्यात रेखाटलेली तत्कालीन महाराष्ट्राची विविध क्षेत्रांतली स्थिती आणि मराठी भाषिकांचे राज्य निर्माण होऊन इतकी वर्षे झाल्यानंतर आज विविध क्षेत्रात महाराष्ट्र कसा आणि कोठे दिसतो अशी तुलना करायची झाली तर साठोत्तर बदलांचाच विचार प्रामुख्याने करावा लागतो. त्या दृष्टीने साठोत्तर काळात घडलेल्या घडामोडीच आधारभूत ठरतात. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण आधुनिक भारताच्या, आधुनिक जगाच्या संदर्भात आज प्रस्तुत असल्याने जे जगात घडले त्याचीच प्रतिक्रिया, परिणाम भारतावर होणार व त्याच न्यायाने महाराष्ट्रावरही होणार किंवा झाले हे उघड असताना मग केवळ महाराष्ट्राचा विचार करताना असे वेगळे काय घडले किंवा घडणार? असाही प्रश्न पडू शकतो. संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील जातिधर्म निरपेक्ष पातळीवर जनतेच्या एकजुटीतून लढवला गेलेला पहिला व शेवटचा मोठा लढा म्हणावा लागेल.

**कनिष्ठ जाती आणि महाराष्ट्राचे राजकारण**: स्वातंत्र्योत्तर काळातील शेतीविकासाच्या योजना, तुटपुंज्या का होईना जमीन सुधारणा, यांच्यामुळे देशाच्या वेगवेगळया भागांत काही शेतकरी जातींची भौतिक परिस्थिती सुधारली त्यामुळे राजकीय क्षेत्रातही त्यांनी सत्तेत वाटा मागणे अपरिहार्य होते. विशेषतः उत्तर भारतात कनिष्ठ जातींनी १९७० नंतर लढाऊ पवित्रा घेऊन सत्ता प्राप्त करण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. मध्यम व कनिष्ठ शेतकरी जातींच्या राजकीय महत्वकांक्षा हा त्यामुळे एक महत्वाचा घटक ठरला याच जातींनी १९७७ मध्ये उत्तर भारतात सत्ता बदल घडवून आणण्यात विशेष भूमिका बजावली. तेव्हांपासून कनिष्ठ जातींचे राजकारण आकार घेऊ लागले असे म्हणता येईल. त्यामुळेच राखीव जागांचा प्रश्न हा एका बाजूला सामाजिक न्याय आणि जाति निर्मूलनाशी संलग्न असला तरी दुसऱ्या बाजूला राजकीय डावपेचांशीही तो निगडीत आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. महाराष्ट्राच्या राजकारणावर उच्च जातींचा दीर्घकाळ ठसा आहे. ब्राम्हणेत्तर चळवळींपूर्वी तर ब्राम्हणांचेच राजकारणावर वर्चस्व होते. ब्राम्हणेत्तर चळवळीनंतर या वर्चस्वात उच्चकुलीन मराठयांनी भागिदारी मिळविण्यास सुरुवात केली. ब्राम्हणेत्तर चळवळीच्या काळातच राजकीय आंदोलने ग्रामीण भागापर्यंत पोचू लागल्याने आणि निवडणुकांचे राजकारण सुरु झाल्यामुळेही हे स्थित्यंतर घडून येण्यास हातभार लागला. त्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण मराठा वर्चस्वासाठी ओळखले जाऊ लागले. मात्र या मराठा वर्चस्वातून कनिष्ठ जातींना राजकीय सत्तेत सहभाग मिळण्याची प्रक्रिया घडून आली नाही त्यांचे राजकीय स्थान दुय्यमच राहिले. (पळशीकर सुहास, १९९१, पृ.३०-३१)

या मराठा वर्चस्वाला कॉंग्रेसच्या अंतर्गतच शह देण्याचे प्रयत्न १९७२ नंतर केंद्राच्या आशीर्वादाने सुरु झाले. त्यामुळे महाराष्ट्रातील कॉंग्रेस आमदार, मंत्री यांच्यातील पाटील-देशमुखांचेच प्रमाण कमी होऊन कनिष्ठ जातींच्या प्रतिनिधींची संख्या वाढली. (लेले जयंत, १९९० पृ. २०५) हा बदल बव्हंशी प्रतिकात्मक, वरवरचा आणि अस्थायी स्वरुपाचा होता. पण त्यातून इथल्या राजकारणात कनिष्ठ जातींचे पदार्पण झाले. कनिष्ठ जातींच्या चाळवल्या गेलेल्या महत्वाकांक्षा आणि मराठा वर्चस्वाचे सातत्य यातून पुढच्या राजकारणाला वळण

मिळण्याची प्रक्रिया घडून आली. काँग्रेसच्या अंतर्गत कनिष्ठ जातींना थोडा वाव मिळत असतानाच बहुजन युवा, हिंदू एकता यासारख्या संघटना उभ्या राहिल्या. कनिष्ठ जातींमधील तरुणांचा सहभाग हे या संघटनांचे ठळक वैशिष्ट होते. (विरमल नितीन, १९८९, पृ. ५१, ११९)

मंडल आयोगाच्या निमित्ताने कनिष्ठ जातींच्या ऐक्याच्या प्रक्रियेला गती देण्याचे प्रयत्नही सुरु झाले. त्यातूनच 'ओबीसी महासंघाच्या कामाला गती मिळाली. काँग्रेसमधील मराठा वर्चस्वाला मिळालेला शह 'ओबीसी' अस्मितेचा शोध घण्यास झालेली सुरुवात आणि भाजप, शेतकरी संघटना आणि शेवटी शिवसेना यांचा ग्रामीण राजकारणातला आणि कनिष्ठ जातींच्या राजकारणातील प्रवेश या घटनाक्रमाने अवघ्या एका दशकभराच्या काळात कनिष्ठ जाती हा महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रमुख घटक बनला. मंडल आयोगाचा अहवाल (१९८०) आणि त्याच्या अंमलबजावणीची घोषणा (१९९०) यामुळे कनिष्ठ जातींचे राज्याच्या राजकारणातील स्थान दृढतर झाले आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांत पसरलेल्या कनिष्ठ जातींची मतदानाच्या संदर्भातील शक्ती जर लक्षात घेतली तर महाराष्ट्राच्या राजकारणात त्या निर्णायक भूमिका बजावू शकतात हे स्पष्ट होते. दुसऱ्या बाजूला बहुजन समाजाची वैचारिक चैकट आहे. यात मराठा नेतृत्व आणि काँग्रेस पक्ष यांनी यशवंतराव चव्हाणांच्या काळापासून मराठयांच्या गौरवशाली इतिहासाचा आधार घेऊन कनिष्ठ जातींशी संधान बांधलेले दिसते. नवब्राम्हणेत्तरवादाची वैचारिक चैकट समजून घेणे देखील आवश्यक आहे. कनिष्ठ जातींना मराठयांपासून भिण्यासारखे काही नाही; मराठे हेच त्यांचे खरे संरक्षक उध्दारकर्ते आहेत; म्हणून मराठे आणि कनिष्ठ जाती यांची युती हीच नैसर्गिक युती आहे असे प्रतिपादन केले जाते. कोणत्याही भ्रामक विचारव्यूहात विसंगती आणि सत्यालाप असतातच. त्याला 'बहुजनसमाज' हा विचारव्यूहही अपवाद नाही. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील ब्राम्हणेत्तरवादात दोन प्रमुख घटक आढळतात. एक म्हणजे मराठा वर्चस्वाचे उघड प्रतिपादन आणि दुसरा म्हणजे ब्राम्हणविरोध. १९६० च्या दशकातील नाममात्र कल्याणकारी बहुजन समाजविचार आता दर्पोक्तीपूर्ण आणि नकारात्मक होऊ लागला आहे. या विसंगतीवर मात करुन पुन्हा एकदा बहुजन समाज विचाराच्या चैकटीत मराठयांचे वर्चस्व टिकवून धरणे, हे मराठा नेतृत्वापुढील आव्हान आहे. मराठा नेतृत्वाच्या यशापयशावरच 'बहुजनसमाज' या विचारव्यूहाचे भविष्यातील स्वरुप अवलंबून आहे.

**कनिष्ठ जाती आणि परिवर्तनाची लढाई**: हिंदुत्व आणि बहुजन हे दोन्ही विचारव्यूह एकीकडे कनिष्ठ जातीसमूहांची ताकद आपल्याकडे वळविण्यासाठी प्रयत्नशील असले तरी दोघांचाही खरा उद्देश कनिष्ठ जातींचे बंड मोडून काढणे हाच आहे. कनिष्ठ जातींची जागृत होत असलेली अस्मिता दोघांनाही धोकादायक वाटते. तिची वाढ थांबवावी किंवा ती आपल्याला अनुकूल पध्दतीने आपल्या पंखाखाली व्हावी असे मानणाऱ्या शक्तींचे हे दोन्ही विचारव्यूह आहेत. या दोन्ही विचारव्यूहांच्या पाठीमागे येथील प्रस्थापित उच्चजातींची शक्ती उभी आहे. कनिष्ठ जातींची अस्मिता परिवर्तनवादाकडे आणि उच्च जातींचे वर्चस्व मोडण्याकडे झुकू नये यासाठी अशा भ्रामक विचारव्यूहांचा उपयोग होतो. त्यामुळे हे विचारव्यूह राजकारणात परस्परांशी स्पर्धा करीत आहेत असे चित्र दिसले तरी दोहोंची निष्पत्ती सारखीच असणार: दोहोंमुळे कनिष्ठ जातींमधील परिवर्तनवादी संभाव्यता बोथट होण्याचा धोका आहे. म्हणूनच ज्या प्रमाणात हे विचारव्यूह परिणामकारक ठरतील त्या प्रमाणात कनिष्ठ जाती आणि परिवर्तनाची लढाई यांच्यातील सांधा दुर्बल राहण्यास हातभार लागेल.

कनिष्ठ जातींना प्रस्थापिताच्या दावणीला बांधणारे विचारव्यूह मांडले जात असतानाच दलित जाती आणि इतर कनिष्ठ जाती यांच्या ऐक्याची कल्पनाही मांडली जाताना दिसते. महाराष्ट्रात अनेक परिवर्तनवादी संघटनांना / चळवळींना अशा मांडणीची आवश्यकता कमी-अधिक प्रमाणात वाटू लागली आहे. किमानपक्षी रणनीतीचा एक भाग म्हणून अशा ऐक्याचा पुरस्कार केला जाऊ लागला आहे. असे प्रयत्न करणाऱ्यामध्ये प्रकाश आंबेडकरांसारखे आंबेडकरवादी आहेत. तसेच कॉ. शरद पाटील यांच्यासारखे मार्क्सवादी, फुले-आंबेडकरवादीही होते. कनिष्ठ जातींची चळवळ या दिशेने पुढे नेण्यात काही 'ओबीसी' संघटनाही प्रयत्नशील होत्या. मात्र प्रत्यक्ष राजकीय व्यवहारात ही रणनीती अद्याप तरी यशस्वी होताना किंवा आकार घेतानाही दिसत नाही. "राखीव जागांमुळे दलित ओबीसींच्या डोक्यावर बसले" यासारख्या प्रचारातून एक कनिष्ठ जातींशी पुरेशी मुक्तता होण्यास बराच काळ लागेल. तसेच नामांतर आंदोलनाच्यावेळी आणि तेव्हापासून कनिष्ठ जातींनी घेतलेल्या आक्रमक दलित विरोधी भूमिकेचा अडसर या संभाव्य युतीमध्ये आहे. (ऑम्व्हेट गेल (संपा.) लॅन्ड, कास्ट अँड पॉलीटिक्स इन इंडियन स्टेटस', दिल्ली, (१९८२), पृ. २५-२६)

शिवाय कनिष्ठ जातींमधील जातिनिहाय संघटनामुळे सर्व कनिष्ठ जातींची परिवर्तनवादी संघटना होणे दुष्कर आहे. त्यातच राजकारण आणि निवडणुका यांच्या गणितामुळे आपापल्या जातीला तिकीटे, मंत्रिपदे महामंडळे वगैरे मिळविण्याच्या आकर्षणामुळे परिवर्तनाचा मुद्दा दुर्लक्षित राहण्याचीच शक्यता आहे. तसेच राखीव जागा, मंडल आयोग आणि राज्यघटनेतील कलमे यांच्या जंजाळात कनिष्ठ जातींची चळवळ अडकण्याचा धोका संभवतो.

गोपाळ गुरु यांनी 'जात आणि वर्गाच्या चर्चाविश्वातील बदलते कोटीक्रम' या नावाचा एक लेख प्रकाशित केला. या लेखाची सुरुवात त्यांनी तीन अभ्युपगम मांडून केली. - एक, जागतिकीकरणाच्या काळामध्ये जात आणि वर्ग या कोटीक्रमांत मूलभूत

परिवर्तन होते आहे. आणि हे परिवर्तन त्याच्या गाभ्यात तसेच त्यांच्या अस्तित्वरुपात देखील होते आहे; दोन, या लेखात मांडल्याप्रमाणे पध्दतीशास्त्राच्या पातळीवर या दोन्ही कोटिक्रमांनी आपली संकल्पनात्मक सुसंगतता हरवलेली आहे. कारण, आता त्यांच्यात अधिक विरुपित अर्थ येऊन मिसळले आहेत. उदाहरणार्थ, कामगार वर्गाला आता 'कामगार समुह' असे संबोधले जाते आणि श्रमिकांला 'आकस्मिक कामगार' (रोजंदारी कामगार) किंवा 'गरीब कष्टकरी' असे संबोधले जाते. (ब्रेमन १९९६) याचप्रमाणे जातीची संकल्पना देखील एक तर बदलेली आहे किंवा 'वांशिकता' या व्यापक कोटिक्रमात अंतर्भूत केली जात आहे. (बेली, २००२). आज आपल्याला जातीचा नवा अवतार महत्वाच्या बनत असलेल्या वांशिक राजकारणात, विशेषतः महानगरी संदर्भात तर हमखास पाहायला मिळतो. (गुरु गोपाळ, १ ते १५ जाने २०१७ पृ. ५)

गोपाळ गुरु म्हणतात, पध्दतीशास्त्राच्या पातळीवर, जात आणि वर्गाशी संबंधित सुसंगत अन्वयार्थामागील संरचनात्मक तर्कच जागतिकीकरणाने उध्वस्त करुन टाकलेला आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे, जर वर्गाच्या एकात्म अभिव्यक्तीतून भांडवल संचयनासमोर पेच निर्माण करायचा असेल तर त्यासाठी जातविषयक एक सुस्थिर जाणीव असणे ही पुर्वअट असते. साहजिकच कामगारवर्गीय एकजुट भंग पावण्याचे राजकीय कार्य घडू देणे हा जात ओळख टिकवण्याचा महत्वाचा आधार असतो. हीच गोष्ट मुंबईतील कापडगिरण्यांमध्ये १९३० च्या दशकात घडली. (गुरु, २००७) भारिपने गायरान जमीनी, एनरॉन अशा प्रश्नांवर योग्य भूमिका घेऊन संघर्ष केला आहे आणि आता तर, जागतिकीकरणाच्या वादळामुळे भारिप बहुजन महासंघापासून बसपापर्यंत सर्वच जन या दृष्टीने विचारमंथन करत आहेत. सांगायचा मुद्दा हा की, केवळ जातीय निकष वापरले म्हणजे चालू काळात निर्माण झालेले प्रश्न आंबेकडकरी चळवळीला समजणार नाहीत (ते काँग्रेसजनांनाच समजतील) असे नव्हे, आंबेडकरी चळवळ ही मूळातच सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, अशा सर्वांगीण शोषणाविरुध्द बंड पुकारणारी चळवळ आहे.

९ जुलै १९७२ रोजी मुंबईत 'दलित पँथर' चा जन्म झाला. १९७२ हे वर्ष अनेक अर्थाने महाराष्ट्रात वादळी ठरलेले वर्ष आहे. डावे राजकीय पक्ष आपले इतिहासदत्त कर्तव्य विसरुन संसदीय राजकारणात गुरफटले होते. समाजवाद्यांचा आणि कम्युनिस्टांचा वैचारिक गोंधळ दलित चळवळीच्या फरफटीला कारणीभूत ठरत होता. यशवंतराव चव्हाण या 'बेरजेचे राजकारण' करणाऱ्या नेत्याच्या जाळयात डाव्या पुरोगामी पक्षांचे नेते अडकत होते. रिपब्लिकन गटबाजीला वैतागुन अनेक दलित नेते काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवाहात म्हणजे सत्ताधारी वर्गात सामिल झाले होते. सहकारी बँका पतपेढया सोसायटया, साखर कारखाने यात सत्तास्थानी असलेला मराठा शेतकरी जातीमधील सधन वर्ग दलितांवर अत्याचार करण्यात पुढे सरसावला होता. नुकताच पडलेला दुष्काळ त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात दारिद्रयाचा डॅगन खवळून उठला होता. वाढती महागाई, बेकारी, टंचाई यांचे परिणाम मुंबई सारख्या महानगरात गिरणी कामगार व संघटीत कामगार (विशेषतः कोकणातला) शिवसेनेच्या आठायाला गेला. बेरोजगार तरुणांना छत्रपती शिवाजीच्या नावाने मराठी माणसाचे न्याय हक्कासाठी अशी हाक देवून शिवसेना संघटीत करीत होती. ट्रेड युनियन क्षेत्रात डाव्या साम्यवाद्यांचा दबदबा होता आणि त्यांना वेसन, घालण्यासाठी मुंबईच्या शैलीशहांचे सहकार्य घेऊन बाळासाहेब ठाकरे डरकाळया फोडीत होते. या साऱ्या ज्वालामुखीच्या तोंडावर दलित अत्याचारांचा मुकाबला करण्यासाठी 'दलित पँथर' पुढे आली.

**महाराष्ट्रातील मार्क्सवादी विचारप्रवाह:** मराठी विचारविश्व १९ व्या शतकात आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय सुधारणा या वादाने ग्रासले होते. नंतर ते वर्ग लढा की वर्ण लढा की एकाच वेळी दोन्ही या प्रकारच्या चर्चांनी ग्रासले होते. तर आता ते ब्राम्हणी-अब्रामहणीवादाने ग्रासले आहे. जो तो आपापले जातीय बुरुज आणि वर्गीय तटबंदया बळकट करताना आढळून येत आहेत. ही बाब मराठी विचारविश्वाच्यादृष्टीने चिंतेचीच म्हणावी लागेल. ब्राम्हणेत्तर व सत्यशोधक चळवळीचा वारसा सांगून मार्क्सवादाचा विकास करण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात झाला देशात इतरत्र असा प्रयोग झाला नाही. जवळकर, माधवराव बागल, नवजीवन संघटना, दाभाडी प्रबंध, गेल ऑम्व्हेट, रावसाहेब कसबे व शरद पाटील यांनी फुले-आंबेडकरवादातील क्रांतीकारक प्रेरणांची नोंद घेतली. त्यातील समन्वयाचा प्रयोग शरद पाटील यांनी मार्क्स-फुले आंबेडकरवाद नावाचा विचार मांडून केला. वासाहतिक समाजात साम्राज्यशक्ती विरुध्दचा संघर्ष करीत असताना जातिबध्द सरंजमाशाहीशी असणारा शत्रूभावी विरोध कसा हाताळायचा हा मुद्दा महत्वाचा होता. कारण तो अंतिमतः त्या देशाच्या लोकशाहीकरणाशी व शोषणमुक्तीशी संबंधित होता. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात मार्क्सवादाचे बीजारोपन महाराष्ट्राच्या भूमीत झाले. कम्युनिस्टांची ही चळवळ ब्रिटीश साम्राज्यशाहीविरोधी असल्यामुळे तिच्या कार्यकर्त्यांना कानपूर आणि मीरत खटल्यांना तोंड द्यावे लागले, हे आपण जाणतोच. परंतु तात्विक भुमिकेवरुन साम्यवाद ही वर्गवादी चळवळ असून राष्ट्रवादाच्या विरुध्द असल्याने काँग्रेसप्रणीत स्वातंत्र्य चळवळीशी ती समरस होऊ शकली नाही. उलट काँग्रेस आणि गांधी भांडवलदारांचे हस्तक आहेत, असाच समज तिने करुन घेतला. प्रारंभीच्या कम्युनिस्ट चळवळीत दाखल झालेले तरुण सुशिक्षित आणि वरच्या वर्णजातींचे होते. कम्युनिस्टांची चळवळ परिस्थितीचे आर्थिक व भौतिक आकलन करुन तिचा अर्थ लावीत डावपेच ठरवते;

त्यामुळे इतिहासाचा व वर्तमानाचा अभ्यास या चळवळीतील तरुण मार्क्सवादी पध्दतीने करीत असत. विनायकराव भुस्कुटांसारख्यांनी तुरुंगात व तुरुंगाबाहेरही मार्क्सवादी विचारांचा फैलाव केला. डांग्यांनी तर खुद्द तात्यासाहेब केळकरांची बौध्दीके घेतली. (मोरे सदानंद, (डिसें. २००३ दु.आ.पृ. २१९) या काळात आंबेडकरवाद, रॉयवाद इत्यादी भूमिकांतून लेखन झालेले दिसते. धर्म-धार्मिकता, धर्मशास्त्र, त्यांचा इतिहास, सुधारणावादी चळवळी, नव्या सामाजिक चळवळी, परिवर्तनवादी चळवळी इत्यादींबद्दलचे लेखनही साठोत्तर काळात आवर्जून दिसते. स्वांतत्र्यपूर्व काळाप्रमाणेच भाष्यकार आणि मुलगामी चिंतन मांडणारे अशी विभागणी आजही दिसतेच, किंबहुना मुलगामी चिंतनपर लेखन जवळपास अदृश्य होताना दिसते आहे." (भोळे/बेडकीहाळ २००३ पृ. १३) याला कॉ. शरद पाटील, प्रा. डॉ. गेल ऑम्व्हेट, आणि डॉ. रावसाहेब कसबे अपवाद आहेत.

साठोत्तर काळात गं. बा. सरदार, श्री. अ. डांगे, ना. ग. गोरे, मधू लिमये, मधू दंडवते, नरहर कुरुंदकर, पन्नालाल सुराणा, वसंत पळशीकर, य. दि. फडके, अ. भि. शाह, बाबा आढाव, सुधीर बेडेकर, व्ही. डी. देशपांडे, श्री. ग. माजगावकर, बगाराम तुळपुळे, शांताराम गरुड, श्री. ग. सरदेसाई, शरद पाटील, गो. पु. देशपांडे, दिवाकर मोहनी, ठाकूरदास बंग, यदुनाथ थत्ते, ना. य. डोळे, गोविंद पानसरे, रावसाहेब कसबे, गेल ऑम्व्हेट, माधव लिमये, मे. पु. रेगे, देवदत्त, दाभोळकर, राम बापट, प्रभाकर पाध्ये. रुपाने मार्क्सवाद, समाजवाद आंबेडकरवाद आदीबाबत विशेषत्वाने लेखन केले.

तात्पर्य, पन्नास-साठच्या दशकात सेवाप्रधान, राजकारणनिरपेक्ष वा सत्तानिरपेक्ष असलेल्या महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना साठच्या दशकाअखेरीस व सत्तरच्या दशकात राजकीय धार प्राप्त झाली. त्या बिगरसंसदीय, बिगर पक्षीय होत्या. पण बिगर राजकीय नव्हत्या. व्यवस्थेचे स्थैर्य, विकास, गुणविकास व स्वास्थ्य याला प्राधान्य देण्याऐवजी या चळवळींनी व्यवस्था परिवर्तनावर भर दिला. त्यासाठी आवश्यक असलेली संघर्षशीलता स्वीकारली. सुसंवाद आणि समन्वयापेक्षा विद्रोह आणि वर्गविद्रोह अधोरेखित केला. या सामाजिक चळवळींनी एका बाजूला जात आणि वर्ग या संस्थांकडे अपारंपरिक पध्दतीने पाहण्यास सुरुवात केली आणि समाज परिवर्तनाच्या संदर्भात जात आणि वर्ग यांचा परस्पर संबंध काय आहे आणि असावा याबाबतचे नवे विचारमंथन केले. परिणामतः या चळवळी निव्वळ जातलक्ष्यी वा वर्गलक्ष्यी न राहता त्या वर्ग - जातलक्ष्यी होत्या हेही ध्यानात घेतले पाहिजे. याचबरोबर या चळवळींनी गांधी-मार्क्स, गांधी-माओ, आंबेडकर-मार्क्स, फुले-मार्क्स अशा परिवर्तनवादी विचारवंतांना नव्याने धांडोळा घेतला व त्यांच्यातील तात्विक अंतर काटेकोरपणे स्पष्ट करीत असतानाच त्यांच्यातील परस्परपुरकता आणि मित्रभावही अधोरेखित केला. याचा उत्तम नमुना म्हणून सुधीर बेडेकरांचा म.गांधी आणि माओवरील 'मागोवा'तील लेख पाहता येईल. (बेडकर, सुधीर, 'महात्माजी आणि माओ', मागोवा, फेबुरवारी १९७३) एकूणच सामाजिक चळवळीची विविधता, आशय घनता, परिवर्तनवादी निष्ठा, संघर्षशीलता, सैध्दांतिक सकसता, चैतन्यशीलता, नवनिर्माणाची आस व राजकीय धार या संदर्भात सत्तरच्या दशकातील या चळवळी लक्षणीय होत्या. याच कालावधीत उदयास आलेल्या तीन महत्वाच्या चळवळी म्हणजे स्त्रियांची चळवळ आणि मुस्लिम सत्यशोधक चळवळ आणि हिंदुत्व परिघातील सामाजिक चळवळी होत.

**१९८० नंतरचा महाराष्ट्र** : १९८० च्या दशकामध्ये महाराष्ट्रात नव्या सामाजिक चळवळींचे पर्व खऱ्या अर्थाने सुरु झाले असे म्हणता येईल. यातील काही चळवळींचा उदय हा सत्तरीच्या दशकातच्या मध्यापासून सुरु झाला असे दिसत असले तरी १९८० च्या पुढेच या चळवळी अधिक गोचर होताना दिसतात. स्त्रियांच्या चळवळी, दलित-बहुजनांच्या चळवळी, शेतकरी चळवळ, पर्यावरणवादी चळवळ, बिगर शासकीय संघटनांच्या (एन.जी.ओ.) चळवही, वंश-सांस्कृतिक अस्मितांच्या चळवळी, (एथनिक-मूव्हमेंटस) हिंदुत्व परिघातील रचनात्मक आणि लढाऊ सामाजिक चळवळी एक प्रश्नलक्ष्यी चळवळी, प्रकल्पगस्तांच्या चळवळी, मानवी हक्कांची चळवळ, आदिवासींच्या चळवळी, अशा कितीतरी चळवळींचा निर्देश या ठिकाणी करता येईल. या चळवळींमध्ये साठोत्तर युरोपमधील नव्या सामाजिक चळवळींची अनेक वैशिष्टये दिसतात. या वैशिष्टयांची दखल घेतच महाराष्ट्रातील अलीकडील काळातील सामाजिक चळवळींचे आकलन होऊ शकते.

नव्या सामाजिक चळवळींचा हा पसारा, वैविध्य आणि गुंतागुंत लक्षात घेता त्यांचे आकलन 'डाव्या' किंवा 'उजव्या', 'स्थितीवादी' वा 'परिवर्तनवादी', 'पुरोगामी' वा 'प्रतिगामी'. अशा रुढ चैकटीत होऊ शकत नाही. या नव्या चळवळींचा प्रमुख उद्गाता व वाहक हा मुख्यत्वे 'नवा मध्यमवर्ग' आहे. १९८० च्या दशकातील महत्वाच्या चळवळी म्हणून स्त्रियांच्या चळवळी, शेतकरी चळवळी, दलित-बहुजनांच्या चळवळी, एकप्रश्नलक्ष्यी चळवळी, हिंदुत्व चळवळ, मुस्लीम समाजातील चळवळी, आदिवासी चळवळी. या काही महत्वाच्या चळवळींचा निर्देश करावा लागेल.

**दलित चळवळ एक प्रभावी सामाजिक शक्ती** : १९७८ साली मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासाठी दलित व पुरोगामी शक्तींनी मोठी चळवळ सुरु केली. दलित पँथर नंतरची दलितांनी आपला आत्मसन्मान व समतेच्या तत्वासाठी केलेली ही मोठी लढाऊ चळवळ होती. वास्तविक, ही चळवळ प्राय: प्रतिकात्मक मागणीसाठी होती. ती तत्काळ पूर्ण होणे तर दूरच राहो पण दलितांकडून नामांतराची मागणी होताच दलित वस्त्यांवर सवर्ग, मध्यम जातींकडून हमले झाले व फार

मोठया सवर्ण-दलित दंगली पेटल्या. दशकभर चाललेला हा संघर्ष शेवटी मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामकरण झाल्यानंतर संपला. पण त्यासाठी फार मोठी वित्त आणि मनुष्यहानी सोसावी लागली. सवर्ण-दलितांतील सामाजिक दुरावा तर शत्रुभावीच बनला. १९८० नंतरची दलित बहुजन चळवळ ही जाति निर्मूलनापेक्षा जाति सक्षमीकरणाकडे झुकली आहे. आर्थिक प्रश्नांपेक्षा सांस्कृतिक प्रश्नांच्या अनुरोधाने संघटित होत आहे. १९७० च्या दशकामध्ये हिंदू-मुस्लिम तणाव दंगलीच्या रुपाने पुन्हा एकवार भारतात प्रकट होऊ लागले. संख्येने कमी असलेल्या, शैक्षणिक व आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महाराष्ट्रातील मुसलमान समाजात असुरक्षिततेची भावना व भवितव्याची चिंता निर्माण होणे स्वाभाविकच होते. स्वातंत्र्योत्तर भारतात बऱ्याचदा मुसलमानांकडे 'फाळणीचे गुन्हेगार' म्हणूनच पाहिले गेले.

मुसलमानांच्या धार्मिक अंधश्रध्देवर 'मुस्लिम सत्यशोधक समाजा' ने परखड टीका केली. बहुपत्नीत्वाची चाल, जबानी तलाक, परित्यक्त्यांचा प्रश्न, पडदा पध्दत, स्त्रीदास्य, जमातवादी दृष्टी या प्रश्नांना हात घातला. धर्मनिरपेक्षता, समता व व्यक्तीस्वातंत्र्यांचा पुरस्कार केला. गुंतानुगतिकतेमध्ये अडकलेल्या, शिक्षणाचा अभाव असलेल्या, मुल्लामौलवींच्या प्रभावाखाली असलेल्या सर्वसामान्य मुसलमानांना सुधारणावादाचा हा डोस जरा जास्तच होता. प्रबोधनकालीन युरोपीय बुध्दीवादाच्या परिप्रेक्ष्यातून होणारी इस्लामची समीक्षा सर्वसामान्य मुसलमानांच्या सहजी पचनी पडणारी नव्हती.

महाराष्ट्रातल्या स्वातंत्र्यपूर्वकाळातील विविध प्रगतीशील विचार व कृतीमंधून पर्यायी विकासाचा विचार व नवे प्रयोग उत्क्रांत होत गेले. त्याचप्रमाणे राज्यातील भौतिक वस्तूनिष्ठ स्थितीही विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर पोचल्यावर त्यातून अनेक प्रश्न निर्माण झाले व त्यांची उत्तरे शोधण्याची निकड निर्माण झाली. त्यादृष्टीने १९७० चे दशक महाराष्ट्रातल्या पर्यायी विकासाच्या दृष्टीने निर्णायक ठरत आहे. १९७२ च्या दुष्काळामुळे विकासाच्या प्रचलित धोरणासंबंधी प्रश्न तीव्र झाले. ऊस साखर कारखाने व केंद्रित धरण पध्दती यामुळे गावोगावच्या पाण्याचा व सामान्यांचा पाण्याच्या हक्काचा प्रश्न तीव्र झाला होता. विकेंद्रीत पाणी संधारण, समान पाणी वाटप व ऊसपिकाला पाणी देणे अशा नव्या संकल्पना, योजना व त्यांचे चर्चा व्यवहारा विश्व पाणी पंचायतीच्या प्रयोगातून सुरु झाले. पाणी वाटप, वापर व पाणी साठवण याची पर्यायी मांडणी व एकंदरच विकास शेती, जीवन पध्दती अशा अनेक स्तरांतून पाणी पंचायतीने विकासाच्या प्रचलित प्रतिमानांना आव्हान दिले होते. दुसरीकडे हरितक्रांती पध्दतीची चिकित्सा अपरिहार्य होती. अतिसिंचनामुळे महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हयांतील तारणांवर हेक्टर जमीन क्षारपाड झाली. हायब्रीड बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशक तंत्रज्ञानावर अनेक संघटनांनी प्रश्न उपस्थित केले. अशा नव्या शेतीपध्दती हळूहळू वाटचाल सुरु झाली.

१९८० च्या दशकात महाराष्ट्रात लोकविज्ञान यात्रा व त्यानिमित्त आजवरच्या विकासप्रक्रियेची वैज्ञानिक समीक्षा सुरु झाली. पाणी पंचायतीचा पुढचा टप्पा म्हणून 'बळीराजा' हे लोकांनी बांधलेले धरण हे प्रतीक बनले. मात्र बळीराजाचा प्रयोग अर्धवटच राहिला. तरी समान पाणी वाटपाचा मुद्दा नंतर सशक्त बनला. 'श्रमिक मुक्ती दल' व इतर संघटनांनी त्यात पुढाकार घेतला. १९८० च्या उत्तरार्धात 'पश्चिम घाट बचाओ' मोहिमेचा प्रभावही इथल्या संघटना व व्यक्तींवर पडला. १९८७-८८ पासून 'नर्मदा बचाओ' आंदोलनाच्या अनुभवांचा व भूमिकांची सत्यता महाराष्ट्रात व अन्यत्र प्रत्ययाला येत होती. विस्थापन व अन्यत्र प्रत्ययाला येत होती. विस्थापन व पुनर्वसनाचा सवाल वेगळया रीतीने मांडायला हवा याची निकड अनेक जेष्ठ कार्यकर्त्यांनाही वाटत होती. प्रकल्पग्रस्थांनी आपले विस्थापन गृहीत व दृष्ट मानून फक्त पुनर्वसनाची मागणी करण्याने पुनर्वसनही हाती पडत नाही. त्याऐवजी त्यांनी आपल्या विस्थापनावर व प्रकल्पावर सवाल उठवण्याचा प्रकल्पग्रस्तांचा अधिकार आहे हे तथ्य स्थापित झाले. अनेक संघटना त्याप्रकारे सवाल उठवीत आहेत. त्याचबरोबर शेतीविकास, चिरंजीवी शेतीचे अनेक प्रयोग आजरा-कोल्हापूर-सांगली पासून नाशिक वध्यापर्यंतचे शेतकरी करीत आले आहेत. श्रमिक मुक्ती दलाशी जोडलेल्या संघटना तज्ञांनी जैवभार पाण्याच्या सहवापरातून पाण्याच्या कसा वापर करावा त्याबद्दल काही मांडणी केली.

थोडक्यात, १९७० नंतरच्या महाराष्ट्रात कृषी उद्योगांच्या विस्ताराला पाठबळ देण्यात आले आणि औपचारिक राजकीय सत्तेत प्रबळ शेतकरी जातींना भरपूर वाव देऊन सामान्य शेतकरी आणि श्रीमंत शेतकरी यांच्यातील हितविरोधाकडे दुर्लक्ष करण्यात आले. आर्थिक हितसंबंधांच्या या चैकटीमुळे महाराष्ट्रातील मराठा वर्चस्वाला आपोआपच मर्यादा पडल्या. यशवंतराव चव्हाणांनंतर मुख्यमंत्रिपदी दीर्घकाळ राहिलेल्या वसंतराव नाईक यांच्या सरकारने ऊस, कापूस इ.नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्याचे हित सांभाळले. पण त्याचबरोबर उद्योगक्षेत्राचे हित जपण्यासाठी सर्व कसरती केल्या. परिणामी शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्व कमी होत गेले आणि शेतीतील विसंगती तीव्र झाल्या. सत्तरीच्या दशकातील अवर्षण आणि दुष्काळ यांचा मुकाबला महाराष्ट्राची अर्थव्यवस्था करु शकली नाही. या मर्यादा सत्तरीनंतर उघडया पडत गेल्या. तरी साठच्या दशकात उभे राहिलेले आर्थि हितसंबंध आणि राजकीय वर्चस्वाची चैकट मात्र लगेच कोसळली नाही. किंबहुना आर्थिक हितसंबंधाचा आधार कमकुवत झाला तरीही राजकीय चैकटीत सामाजिक वैशिष्टये चिवटपणे सत्तरीच्या दशकातही शिल्लक राहिली, याचे श्रेय संस्थात्मक आधारांनाही द्यावे लागेल.

सत्तरनंतरच्या महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्वकाळातील सामाजिक चळवळींची परंपरा अधिक संघर्षशील होताना दिसते, हे इतर प्रांतापासूनचे महाराष्ट्राचे वेगळेपण आहे. सत्तरनंतरच्या कालखंडात सामाजिक चळवळींचे विविध आकार पहायला मिळतात. पूर्वास्पृश्यांचे प्रश्न या काळात सामाजिक चळवळीत अग्रभागी दिसतात. दलित पँथरसारखी लढाऊ व सर्वांगीण परिवर्तन मागणारी चळवळ, 'एक गाव एक पाणवठा -म्हसनवटा' यांसारखी डॉ. बाबा आढावांनी सुरु केलेली चळवळ, मराठवाडा विद्यापीठाची नामांतर चळवळ, दलितांचे जमीनीसाठीचे सत्याग्रह, मंदिर प्रवेश, अंधश्रध्दा निर्मूलन, देवदासीप्रथा. निर्मूलनाची चळवळ, स्त्रीमुक्तीची चळवळ, अशा समतेच्या विचारांवर आधारित अनेक नव्या चळवळी सत्तरनंतरच्या कालखंडाचे वैशिष्टय म्हणावे लागेल.या चळवळी चालवणाऱ्या अनेक युवक-युवती 'डी-क्लास' होण्याच्या मनोभूमिकेतून या चळवळींमध्ये उतरलेल्या दिसतात. स्वतःची नोकरी, शिक्षण, करियर यांवर पाणी सोडून चळवळींना वाहून घेणारे मध्यमवर्गातून पुढे आलेले तरुण या चळवळींचा कणा होते. . सत्तरनंतरच्या काळात सामाजिक चळवळींचा वरचष्मा राहिलेला दिसतो. 'पुरोगामी' या शब्दाला या काळात प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. विषमता निर्मूलन समितीसारखे एकत्रित येऊन समान कार्यक्रमांचा शोध घेण्याचाही उपक्रम या चळवळींमध्ये झाला. १९७५ नंतरच्या काळात राजकीय संदर्भ बदलले व या चळवळींची धार कमी झाली. ही पोकळी स्वयंसेवी संस्थांनी भरुन काढली. १९७७ पूर्वी विविध संघटना/पक्ष यांच्या अंतर्गत होणाऱ्या बौध्दीक चर्चा अभ्यास शिबीरे १९७७ नंतर थंडावली.

१९९० च्या दशकात जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाच्या भारतीय राज्यकर्त्यांच्या धोरणाने आजवरच्या विनाशकारी विकासाचे प्रश्न अधिकच गंभीर झाले. पाणी, जंगल, जमीन, समुद्रकिनारे, तलाव, वीज, सार्वजनिक वाहतूक, आरोग्य, शिक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये देशी-परदेशी भांडवली शक्तींची मालकी निर्माण करुन सार्वजनिक हिताची आणखीच गळचेपी करण्याचे धोरण खुद्द सरकारच अंमलात आणत आहे. प्रस्थापित राजकीय पक्ष याच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बाजूने आहेत. अशावेळी आधीच चालू असलेले भांडवल प्रधान, साधनसंपदेचा व लोकशाही अधिकार व प्र्क्रियांची अवहेलना करणारे अर्थराजकारण अधिकच बळकट होत आहे. १९८० च्या दशकापर्यंत चिरस्थायी विकासाच्या कल्पनेचा व लोकशाही अधिकारांचा थोडाफार तरी स्वीकार शासन पातहीवर झाला होता, त्यावर आता शासनकर्त्या व भांडवली शक्तींकडून जोरदार विरोध सुरु झाला. समानता, न्याय, शोषितांचे अधिकार ही मुल्ये रद्दबातल ठरविली जाऊ लागली. अनेक इंग्रजी व देशी भाषक माध्यमेही त्यात एकतर्फी प्रचारकांचे काम करु लागली. अनेक कायदे, नियम या भांडवली खाजगीकरणासाठी व कामगार, शेतकरी, आदिवासी, कष्टकरी, असंघटीत व संघटीत कामगार, लघुउदयोग, दलित व मागसवर्गीय यांच्या अधिकारांचा संकोच करण्यासाठी बदलले जाऊ लागले.

थोडक्यात, सुमार अर्थव्यवस्था, देशभरातील मध्यमवर्गाची वाढती सत्ता, जमातवादी वातावरण आणि जागतिकीकरणाच्या जादूत रमलेला राज्यकर्तावर्ग यांच्या पाश्वभुमीवर नव्वदीतील राजकारण अधिकाधिक तात्कालिक, नाटकी, जनहितविरोधी आणि उथळ झाल्याचे महाराष्ट्रात दिसून येते. १९९९ साली जून महिन्यात काँग्रेसमध्ये फुट पडली आणि आॅक्टोंबरमध्ये दोन्ही काँग्रेसप्रणीत आघाडी सरकार अस्तित्वात आले. तेंव्हापासूनच दोन्ही काँग्रेसच्या विभक्तीकरणाचे प्रयोजन काय असा प्रश्न निर्माण झाला. त्याचबरोबर काँग्रेस महाराष्ट्रात पुन्हा जम बसवू शकेल का? आणि जमातवादाचा प्रतिकार करु शकेल का? हे प्रश्नही उभे आहेत. जागतिकीकरण व भांडवलशाही यांवर वैचारिक हल्ला नव्वदीच्या दशकात अनेक बाजूंनी झाला. पण या प्रक्रियांमधून जे नवे समाजगट निर्माण होत आले त्यांच्याकडे पुरोगामी पक्षांनी पुरेसे लक्ष दिले नाही. ग्रामीण भागात सतत संकटात सापडणाऱ्या छोटया शेतकऱ्या ला सर्वांनी वाऱ्या वर सोडले. तसेच शहरांमध्ये श्रमिक वर्गाची रचना बदलते आहे. याकडे दुर्लक्ष झाले. नवभांडवलशाही अर्थव्यवस्थेत अनौपचारिक श्रमिकांची संख्या वाढत असलेली दिसते. त्यात स्वयंरोजगार करणारे व फुटकळ व्यवसाय करणारे यांचा वाटा फार मोठा आहे. त्यांची आर्थिक स्थिती तर बिकट आहेच. पण सांस्कृतिक विश्वही दारिद्रयाने ग्रासले आहे. अशा समुहांना ताकद व वैचारिक आधार मिळवून देण्याचे आव्हान नव्वदीच्या दशकात उभे राहिले. त्यांच्या संघटीत राजकारणासाठी वेगळया प्रकारच्या चळवळी उभारुन नवे सामाजिक संघर्ष आखावे लागणार होते. ते न झाल्यामुळे संदिग्ध सामाजिक लागेबांधे असणारे हे विस्कळीत स्तर म्हणजे उसन्या राष्ट्रवादाच्या हिंसक राजकारणाचे वाहक ठरले. लोकशाहीची राजकीय प्रक्रिया ही केवळ लोकप्रिय नेतृत्वाच्या आधारे चालू शकत नाही. तसेच ती निव्वळ भौतिक हितसंबंधांची बटीक नसते. पक्षोपक्ष, गट, त्यांचे विभिन्न सामाजिक आधार यांच्या गुंत्यातून राजकारण घडते. महाराष्ट्र याला अपवाद नाही.

१९७० च्या दशकाच्या आरंभापासूनच वसंतराव नाईक यांनी औद्योगिक हितसंबंधांना मोकळा वाव दिला होता. त्यामुळे नवश्रीमंत मराठा वर्गाचे हितसंबंध आणि औद्योगिक हितसंबंध यातील अंतर वाढत होते. यातून कधी शिवसेनेला फुस दिली गेली, कधी प्रादेशिक अस्मितेची ढाल पुढे करुन दलितांना लक्ष्य केले गेले. (मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रकरण) तर कधी शेतकरी संघटनेच्या झेंडयाखाली तरुण मराठा शेतकरी संघटनेच्या झेंडयाखाली तरुण मराठा कार्यकर्ते गोळा झाले. अशाप्रकारे इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचे आव्हान आणि अंतर्गत विसंगती यातून मराठा नेतृत्वात

विस्कळीतपणा येत गेला. मात्र हा प्रश्न केवळ मराठा नेतृत्वाचा नाही. सत्तरीच्या दशकात राजकीय स्पर्धेची चैकटच बदलण्यास सुरुवात झाली.

१९८० च्या दशकात वसंतदादा पाटील मुख्यमंत्र असताना महाराष्ट्रात उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाचा आरंभ झाला होता. त्याच दरम्यान शेतकरी संघटनेने शेतकऱ्याना भाव मिळवून देतानाच सरकारी हस्तक्षेपाला मात्र विरोध केला होता. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचा वाढता कर्जबाजारीपणा, घसरणारी अर्थव्यवस्था यांपासून बोध घेण्याऐवजी सरकार, नोकरशाही व तज्ञ हे तीनही घटक खाजगीकरणावर भर देताना दिसतात.

**समकालीन भारतीय राजकारणाचे विश्लेषण**: स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणात काँग्रेस पक्ष हा मध्यवर्ती होता. बिगर काँग्रेसवाद हे काँग्रेसविरोधाचे मुख्य वैचारिक केंद्र होते. यातूनच १९६७ पासून थेट १९८९ पर्यंतचे राजकारण घडले. आपण जेंव्हा काँगेसच्या ऱ्हासाबद्दल बोलतो तेव्हा काँग्रेस वर्चस्व आणि काँगे्रसविरोधी आघाडया ही दोन वैशिष्टये क्षीण होत आहेत. असे आपल्याला म्हणायचे असते. केवळ सगळे काँगे्रसविरोधक एकत्र आल्याने काँग्रेसचा ऱ्हास झाला नाही तर काँग्रेसचा सामाजिक चेहरा बदलून काँग्रेस पक्ष इथल्या सरासरी जनभावनांचे प्रतिनिधित्व करेनासा झाल्यामुळे काँग्रेसची पडझाड होत गेली. ही एका पक्षाची पडझड नव्हती. काँग्रेसप्रणीत राजकारणाची पडझड होती. नव्वदीच्या दशकातच उदयाला आलेली जागतिकीकरणांची प्रक्रियाही देखील राजकारणात संकोच करण्यास हातभार लावते. नवीन आर्थिक धोरणे कोणतीही सार्वजनिक चर्चा न करता पुढे रेटली गेली. एकीकडे राजकीय अनिश्चितता, दुसरीकडे राजकारण केवळ वैयक्तिक सत्तेसाठी (पंतप्रधान पदासाठी) असते असा समज आणि तिसरीकडे गाभ्याच्या आर्थिक मुद्यांची राजकारणातून हकालपट्टी, या सर्वांमुळे राजकारण हा सार्वत्रिक टवाळीचा, कुचेष्टेचा आणि नाईलाजाने सहन करण्याचा विषय बनला. राजकारणाच्या या क्षुल्लकीकरणातून लोकशाही व्यवस्था पोकळ बनत जाते. जनसमुहांच्या संघर्षाची शक्यता कमी होते किंवा त्यांची अधिमान्यता कमी होते. या अर्थाने राजकारणाचे क्षुल्लकीकरण दूरगामी परिणाम करणारे बनते. खुद्द राजकारणी मंडळींवर त्याचा परिणाम असा होतो की, तात्कालीक आणि हातचलाखीचे राजकारण करण्यावर भर दिला जातो. आपल्या राजकारणामागील सामाजिक आधारांकडे दुर्लक्ष करुन राजकीय कृती केल्या जातात. विचारप्रणाली आणि व्यापक हितसंबंध यांना सोडचिठ्ठी देऊन गणिती पध्दतीचे हिशेब, पाताळयंत्री कारस्थाने आणि दरबारी लाचारी एवढयावरच राजकारण थांबते. (पळशीकर सुहास, २००४ पृ.७-९)

एका बाजूला प्रबळ भौतिक हितसंबंधांचा निर्विवाद वरचष्मा निर्माण होत असतानाच विविध दुय्यम/कनिष्ठ समूहांच्या दडपणातून आणि उपस्थितीमधून राजकीय प्रक्रियेला त्या समुहांच्या आकांक्षाची दखल घ्यावी लागेल. भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या व्यवहारात या समुहांची दखल घ्यावी लागेल, तशीच लोकशाहीतही घ्यावी लागेल. याचाच अर्थ अर्थकारण आणि राजकारण यांना प्रबळ हितसंबंध व दुय्यम समुहांच्या अपेक्षा यांची सांगड घालण्याची कसरत करावी लागेल. दुय्यम समुहाच्या भौतिक हितसंबंधांना प्रस्थापित व्यवस्थेत सहजासहजी वाटा मिळणे अवघड आहे. मग त्यांच्या आकांक्षांचे समाधान ही व्यवस्था कशी करेल?दुय्यम समुहांना एक वेगळी, बहुशः भ्रामक आणि अतिव्याप्त अस्मिता देऊ करुन त्यांच्या निकराच्या भौतिक अपेक्षा काहीशा सौम्य होऊ शकतात. नेमकी हीच गोष्ट भारतात 1985 पासून घडून येत आहे. हिंदू जमातवादाच्या झंझावातात अनेक दुय्यम समुहांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष होऊन धार्मिक-सांस्कृतिक अस्मितांनी या समुहांना लपेटून टाकलेले दिसते.

***संदर्भसूची***


१. *पंडित नलिनी, 'महाराष्ट्राचा राजकीय इतिहास; य.दि.फडके यांच्या 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' च्या निमित्ताने', समाजप्रबोधन पत्रिका-ऑक्टो-डिसें.१९९० वर्ष- २७ अंक ११३, संपा.राजेंद्र व्होरा आणि इतर.*

२. *पळशीकर सुहास, 'समकालीन भारतीय राजकारण; काँग्रेसवर्चस्व ते हिंदू जमातवाद; प्रतिमा प्रकाशन, पुणे. २००४, पृ.७-९.*

३. *पळशीकर सुहास, बहुजन समाज, विचार ते नवब्राम्हणेत्तरवाद, समाज प्रबोधन पत्रिका, जाने-मार्च १९९१, पृ. ३०-३१.*

४. *लेले जयंत, कास्ट, क्लास अँड डाॅमिनन्स: पाॅलिटिकल मोबीलायझेशन इन महाराष्ट्र, फ्रँकेल फ्रॅन्सिन आणि एम.एस.ए.राव (संपा.) डॉ. मिनन्स अँड स्टेट पोवर इन मॉडर्न इंडिया, खंड दुसरा, ऑक्सफर्ड, १९९०, पृ. २०५.*

५. *बेडकर, सुधीर, (फेब्रुवारी १९७३) 'महात्माजी आणि माओ', मागोवा,*

६. *मोरे सदानंद, महाराष्ट्राचे विचारविश्व,' बदलता महाराष्ट्र संपा.भा.ल.भोळे, किशोर बेडकीहाळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी सातारा. (डिसें. २००३, दु.आ.पृ. २११)*

७. *गुरु गोपाळ, 'जात आणि वर्गाच्या चर्चा विश्वातील बदलते कोटिक्रम', परिवर्तनाचा वाटसरु, १ ते १५ जाने २०१७ पृ. ५*

# महात्मा ज्योतिराव फुले यांची सामाजिक परिवर्तनाची चळवळ

**डॉ. सोमा पी. गोंडाणे,** राजीव गांधी कला महाविद्यालय, पाटण ता. जिवती, जिल्हा चंद्रपूर मो. ७७४४९९९९३६

***सारांश :*** *एकोणिसावे शतक हा भारताच्या इतिहासातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक क्रांती आणि नवजागरणाचा काळ मानला जातो. या शतकात अनेक महापुरुष अवतरले, ज्यांनी हिंदू समाजात नवचैतन्य प्रसारित करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला. यापैकी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सामाजिक विषमता आणि भेदभावाविरुद्ध समता आणि समरसतेची मोहीम निश्चितच ऐतिहासिक महत्त्वाची आहे. एका प्रकाशपुरुषाच्या रूपाने त्यांनी अंधारात भरकटणाऱ्या समाजाला सत्याच्या मार्गाकडे नेले. जोतिबा हे सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते. त्यांचा संघर्ष केवळ दलितांसाठीच नव्हता; उलट तो दलितवाद दूर करण्यासाठी होता. सर्वजन हिताय - सर्वजन सुखाय ही त्यांची सामाजिक क्रांती होती. महात्मा फुले हे क्रांतिकारी सुधारणावादी होते. त्यांच्या सामाजिक चळवळीचा परिणाम राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर झाला. ते पहिले सुधारक होते ज्यांनी समाजातील खालच्या वर्गात सर्जनशील सक्रिय चेतना रुजवली. महात्मा फुलेंच्या काळात उच्चवर्णीय-शूद्र, अस्पृश्य-अस्पृश्य, ब्राह्मण-ब्राह्मण वगैरे भेदभाव समाजाची मुळे पोकळ करत होता. या सर्व वाईट गोष्टी सामाजिक विषमतेला जन्म देत होत्या. महात्मा फुले यांनी केवळ हिंदू समाजातील जडत्व आणि रूढीवादी विचारांवरच हल्ला केला नाही, तर त्यांनी उच्चवर्गीय लोकांमध्ये प्रेमाने शहाणपण आणि न्याय चेतना जागृत केली आणि त्यांच्यात मानवी समता आणि प्रेमाची पवित्र प्रेरणा दिली. समाजातील सर्व दलित, कामगार, शेतकरी, स्त्रिया इत्यादींवरील उच्चवर्णीय लोकांकडून होत असलेल्या निर्दयी शोषण आणि अत्याचारामुळे ते अत्यंत चिंतित आणि व्यथित होते. महात्मा फुलेंच्या क्रांतिकारी सुधारणांना महाराष्ट्रातही विरोध झाला, पण सत्यशोधक ज्योतिबा फुले अविचल साधकाप्रमाणे त्यांचा मार्ग अवलंबत राहिले. ते उभे राहिले, हलले नाहीत आणि नतमस्तक झाले नाहीत. म्हणूनच सामाजिक धोरण, राजकारण, अर्थशास्त्र, धर्म, शिक्षण, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय इत्यादी क्षेत्रात आपले विचार आणि नवीन मूल्ये प्रस्थापित करणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले यांनी सामाजिक सुधारणांसाठी केलेल्या कार्याचे विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे.*

***मुख्य शब्द –*** *उच्चभ्रू, कट्टरपंथी, शिक्षण, जातिव्यवस्था, पुनर्विवाह, विधवा, बालहत्यागृहा, पाण्याची हौद.*

**प्रस्तावना:** महात्मा ज्योतिबा फुले हे आधुनिक भारतातील दलित आणि महिलांच्या शिक्षण व्यवस्थेसाठी, कामगार, शेतकरी आणि समाजातील दुर्बल घटकांच्या प्रगतीसाठी चालवल्या जाणाऱ्या चळवळीसाठी आजच्या जनमानसातील मानवतावादाची प्रेरणा आहेत. शतकानुशतके भारतीय समाज जातीच्या बंधनाने जखडला गेला आहे, ही अत्यंत निंदनीय बाब आहे. या जातीभेदाच्या भिंती तोडण्याचे काम करणाऱ्या या महापुरुषाचा जन्म १८२७ मध्ये महाराष्ट्राच्या पुण्यातील आई चिमणाबाई आणि वडील गोविंदरावजी यांच्या घरी झाला. जोतिबा फुले फक्त एक वर्षाचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. ज्योतिबा फुले हे लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धीचे धनी होते, ज्याच्या प्रभावाने वडील गोविंदरावांनी ज्योतिबा फुले या मुलाला शाळेत दाखल करून घेण्याचा विचार सुरू केला. केवळ उच्चभ्रू कुटुंबासाठी शिक्षणाची दारे त्याकाळी खुली होती. अशा अंधकारमय युगात गोविंदराव फुले यांनी आपल्या मुलाला शिक्षण देण्याचे धाडस दाखवले होते. गोविंदरावांनी त्यांचा मुलगा ज्योतिबा फुले यांना वयाच्या सातव्या वर्षी प्राथमिक शिक्षणासाठी मराठी शाळेत दाखल करून घेतले. तो नुकताच लिहायला शिकत असताना, मुंबईचे कट्टरपंथी नेते धाकजी दादाजी प्रभू, जे मुंबईचे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सर्वे सर्वा नेते होते, यांच्या सांगण्यावरून त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. या घटनेने त्या मुलाचे मन हेलावून टाकले. नंतर वडिलांसोबत फुलाच्या व्यवसायात गुंतले. जोतिबा फुले यांचा विवाह १८४० मध्ये जो तेरा वर्षाचा होता. सातारा जिल्ह्यात खंडाळा तालुक्यातील नायगाव येथील खंडोजी नेवासे पाटल यांची कन्या सावित्रीबाईशी झाला, जिचे वय ९ वर्षे होते. विवाहानंतरही जोतिबा फुले यांनी अभ्यास सोडला नाही. घरातच शिक्षण सुरळीत चालू ठेवले. त्यांच्या अभ्यासाच्या विशेष आवडीमुळे प्रभावित होऊन जोतिबाचे दोन शेजारी, एक गफ्फार बेग मुन्सी, जो उर्दू आणि पर्शियनचे शिक्षक होते आणि दुसरा ख्रिश्चन, जो सरकारी अधिकारी आणि मिशनरी होता, या दोघांनी जोतिबा फुले चे वडील गोविंदरावांना पुन्हा शाळेत दाखल करण्यासाठी विनंती केली . ज्योतिबाच्या उज्वल भविष्यासाठी जोतिबा फुलेनकडे काहीतरी मिळवण्याची क्षमता होती याची खात्री त्यांना पटली, परिणामी १४ वर्षांच्या ज्योतिबांना १८४१ मध्ये मिशन स्कूलमध्ये दाखल करण्यात आले. जिथे सदाशिव आणि लाल गोडे, सखाराम यशवंत परांजपे, मोरो विठ्ठल वाळवेकर यांच्याशी त्यांची मैत्री होती. जोतिबा फुलेने स्कॉटिश मिशन स्कूलमध्ये जॉर्ज वॉशिंग्टन यांचे चरित्र थॉमस पेन यांनी लिहिलेल्या राईट्स ऑफ मॅन या महान पुस्तकाचा अभ्यास केला. १८४७ मध्ये ज्योतिबांनी आपले इंग्रजी शालेय शिक्षण पूर्ण केले, त्या दरम्यान अमेरिकन स्वातंत्र्य लढ्याने ज्योतिबा फुले यांच्या मनात

मानवतेची समानता, मानवी हक्क आणि मानवाचे स्वातंत्र्य या कल्पनांना जन्म दिला. भारतातही त्यांनी राष्ट्रीय जागृती करण्यास सुरुवात केली. १८४८ च्या सुरुवातीला जेव्हा मित्रांच्या मिरवणुकीत जातीय धर्मांधकाडून त्यांचा अपमान झाला तेव्हा त्यांनी मूलतत्त्ववादी समाजव्यवस्था नष्ट करण्यावर भर दिला आणि स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायावर आधारित व्यवस्था निर्माण करण्यावर भर दिला, ज्यातून ते पुढे एक महान क्रांतिकारी समाज सुधारक बनले.

**महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सामाजिक चळवळी :** १९ व्या शतकाचा पूर्वार्ध हा भारतीय समाजासाठी नवजागरणाचा काळ मानला जाऊ शकतो. कारण साहित्यात अनेक नवीन रूपे आणि नवीन विषय समाविष्ट केले गेले. पत्रकारितेचे नवे आयाम सापडले, त्यामुळे जनमानसात समाजसुधारणेच्या चळवळी झाल्या, पण समाजव्यवस्थेत क्रांतिकारी बदल न होता अनेक बदल झाले. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले यांनी भारतीय इतिहासात एका शक्तिशाली आणि प्रभावशाली सामाजिक चळवळीचे अग्रदूत म्हणून प्रवेश केला आणि जातिव्यवस्था अवैध घोषित केली. केवळ उच्चभ्रू लोकांच्या अखत्यारीत असलेले शिक्षण बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी-सावित्रीबाईंवर सोपविली. आणि यानंतर जोतीबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. त्यांनी २४ सप्टेंबर इ.स. १८७३ रोजी महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाज सोसायटीचे ते पहिले अध्यक्ष आणि खजिनदार होते. वेदांना झुगारून त्यांनी हे कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरुवात केली.

सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक' हा फुले यांचा शेवटच ग्रंथ. तत्त्वज्ञ म्हणून त्यांचे थोरपण या ग्रंथातून लक्षात येते. 'सत्यमेव जयते' हे बीजसूत्र घेऊन साकारलेला हा ग्रंथ सत्यावर आधारलेल्या नव्या सर्वसमावेशक धर्माच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करणारा ग्रंथ आहे. प्रस्थापित हिंदू धर्मातील सनातनी ब्राम्हण्यावादी तत्त्वज्ञाने निर्माण केलेल्या शोषण व्यवस्थेने बहुजन समाज समूह पूर्णतः नागवला गेला होता. त्याला नवा जीवनमार्ग दाखवण्यासाठीच सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि या सत्यशोधक समाजासाठी आचारधर्म सांगण्याच्या आवश्यकतेतून सार्वजनिक 'सत्य धर्म पुस्तका'ची निर्मिती झाली आहे. डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात, "सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक म्हणजे सत्याशोधाकांचा आचारधर्मच होय. परंतु हा आचारधर्म कर्मकांडाच्या पातळीवरील नाही तर एकूण माणसाला सुखाकडे नेहरा, विचारशक्तीला प्राधान्य देणारा, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केद्रवर्ती स्थान देणारा असा आहे. पारलौकिक विश्व फुले यांना मान्यच नाही. तेव्हा याच लौकिक जीवनाच्या सुखाचा शोध घेणारा असा हा सत्य धर्म आहे." त्यामुळेच माणसाच्या सुखाचे चिंतन प्रकट करणारा हा ग्रंथ मौलिक आहे

महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून जाहीर सभा घेतल्या, पत्रिकांच्या माध्यमातून, छोट्या-छोट्या पुस्तिकांचे वाटप करून, मुलींच्या शिक्षणाला विरोध करणाऱ्या वाईट प्रथा, अन्यायकारक समजुती, देवाच्या नावावर होणारी लूट, दलितांच्या शोषणाला विरोध केला. सत्य-दीपिका, सुबोध-पत्रिका, प्रमोद सिंधू आणि इदू प्रकाश नावाची वृत्तपत्रे ज्योतिबा फुलेंच्या विचारांची, कार्याची आणि उद्देशाची प्रशंसा करीत होते. जे त्यांना पुढच्या क्रांतीची प्रेरणा मिळत होती. जोतिबा फुले यांच्या विचार आणि हेतूने प्रभावित होऊन, मुंबईचे प्रसिद्ध कंत्राटदार व्यंकू कलेवर आणि जया कराडी लिंगू यांनी ब्राह्मण मेजवानीवर खर्च होणारा पैसा गरीबांच्या उन्नतीसाठी आणि शिक्षणाच्या प्रगतीसाठी सत्यशोधक समाजाला देण्याचे वचन दिले. प्रबोधन नियतकालिकाने लिहिल्याप्रमाणे अनेक उच्चभ्रू, श्रीमंत, दयाळू दानशूर पैसे, इतर गोष्टी देण्यासाठी पुढे येत होते. जे हिंदू समाजात किती बदल झाले आहे याचे द्योतक होते. महात्मा ज्योतिबा फुले यांनीही भारतीय समाजात प्रचलित असलेल्या वाईट गोष्टींविरुद्ध वेगाने उठाव केला. ज्योतिबा फुले दुष्कृत्यांचे,वाईट प्रथेचे निर्मूलन करण्यात नेहमी आघाडीवर होते . आपल्या भाषणातून आणि पत्रक, फोल्डर, पॅम्प्लेट वाटून त्यांनी जनमानसात चैतन्य जागृत करण्याचे वातावरण निर्माण केले, त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम विधवाविवाहाला प्रोत्साहन दिले आणि ८ मार्च १८६० रोजी पुना येथील गोखले बागेत नर्मदा नावाच्या एका ब्राह्मण विधवा मुलीचा विधुर रघुनाथ जनार्दन यांच्याशी पुनर्विवाह केला. लग्नाच्या वेळी विधवा १८ वर्षांची होती. महात्मा ज्योतिबा फुले यांचे विधान होते की जेव्हा ब्राह्मण समाजातील विधुर दुसरा विवाह करू शकतो, तर त्याची विधवा मुलगी किंवा स्त्री पुन्हा लग्न का करू शकत नाही. हा महिलांबाबत भेदभाव का?

महात्मा ज्योतिबा फुले यांनी महिलांच्या भल्यासाठी बालविवाहाला विरोध केला आणि मलबारीच्या ब्रिटिश सरकारला प्रार्थना केली की, १९ वर्षांपेक्षा कमी वयाचा मुलगा आणि ११ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीच्या लग्नाला परवानगी देऊ नये. यासाठी त्यांचे तत्कालीन समाजसुधारक ईश्वरचंद्र विद्यासागर आणि दादाभाई नारौजी यांनीही पाठिंबा दिला होता.

महात्मा ज्योतिबा फुले यांनीही समाजात प्रचलित असलेल्या घृणास्पद सती प्रथेवर हल्ला चढवला आणि तिला अत्याचाराचा कळस मानून त्याचा निषेध केला. चारित्र्यहीन पुरुष निष्पाप विधवा महिलांना फूस लावून त्यांना अनैतिकतेत गुंतवून ठेवत असल्यामुळे तरुण विधवांसोबत अनैतिक वर्तनाच्या घटना समाजात सामान्य झाल्यामुळे बालहत्या रोखण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी एक बालहत्यागृह स्थापन केले. त्यांच्या अनैतिक वर्तनामुळे मुले जन्माला आली की ते समाजाच्या भीतीने कचऱ्याच्या ढिगाऱ्यात किंवा नदीच्या नाल्यात फेकत असत. विधवांची ही असहायता समजून घेऊन महात्मा फुले यांनी १८६३ मध्ये अशा विधवा आणि मुलांसाठी आपल्या घरात बालहत्या रोखण्यासाठी बालहत्यागृहाचा वापर केला. लोकहितवादी गोपाळराव देशमुख, विनायकराव भांडारकर, प्रार्थना समाजाचे न्यायमूर्ती, स्मॉल कॉज कोर्टाचे न्यायमूर्ती मदन श्री कृष्ण, मामा परमानंद, वासुदेवराव बाबाजी नवरंग, तुकाराम तात्या पडवळ आदींनी फुले यांच्या बालहत्या निषेधाच्या कार्याचे कौतुकच केले नाही तर बालहत्यागृहाला मदत केली. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रेरणेने, रानडे आणि त्यांचे मित्र लालशंकर उमाशंकर त्रिवेदी यांनी १८७५ मध्ये पंढरपूरमध्ये अनाथाश्रम उघडले, जे फुले यांच्या समाजसुधारक मोहिमेच्या प्रेरणेमुळे घडले. ज्योतिबा फुले यांनी नेहमीच समानतेवर भर दिला आणि तो समाजात राबवण्यासाठी आणि उच्च-नीच हा भेद दूर केला. ज्योतिबांनी ब्राह्मण पुरोहिताविना विवाह सोहळा सुरू केला आणि त्याला मुंबई उच्च न्यायालयाची मान्यताही मिळाली. अस्पृश्यता दूर करण्यासाठी ज्योतिबांनी त्यांच्या अस्पृश्य मुलांना आपल्या घरी वाढवले आणि त्यांच्यासाठी घरातील पाण्याची हौद सुरु केला . परिणामी त्याला जातीतून बहिष्कृत करण्यात आले. त्यांची समाजसेवेची वाढती कीर्ती पाहून प्रतिगामींनी त्यांच्या हत्येचा कटही रचला. पण ज्योतिबाची समाजसेवा पाहून मारेकरी त्यांचे शिष्य बनले. अस्पृश्यांसोबत जेवायला सुरुवात करून समाजाला अर्थपूर्ण दिशा देण्याचा प्रयत्न केला. मूल न झाल्याने त्यांनी काशीबाई नावाच्या विधवा महिलेचे मूल दत्तक घेऊन समाजाला नवा संदेश दिला. २७ नोव्हेंबर १८९० रोजी पहाटे २:२० वाजता त्यांच्या हृदयाचे ठोके बंद झाले, समाजाला असा धक्का बसला की यशवंत सोबतच समाजही अनाथ झाला.

**निष्कर्ष:** वरील अभ्यासावरून हे स्पष्ट होते की महात्मा ज्योतिबा फुले ज्यांना प्रेमाने महात्मा फुले किंवा महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात त्यांचा जन्म महाराष्ट्रात झाला. ज्यांनी आपल्या प्रयत्नातून समाज, राजकारण, अर्थशास्त्र, धर्म, शिक्षण, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय इत्यादी क्षेत्रात नवीन आदर्श आणि मूल्ये प्रस्थापित केली. या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य केवळ ऐतिहासिक आणि क्रांतिकारकच नाही तर समाजनिर्मितीलाही ते नवे आयाम देत होते. त्यामुळे आधुनिक भारतातील महात्मा ज्योतिबा फुले हे पहिले भारतीय होते ज्यांनी समाजात सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीचा पाया घातला. जातिव्यवस्था, शेतकरी, शेतमजूर, शूद्र-अति-शूद्र आणि महिलांच्या हितासाठी सदैव लढणाऱ्या आणि १९ व्या शतकात एका सशक्त चळवळीचे नेतृत्व करत, दलित आणि महिलांसाठी नेहमीच बंद असलेली शिक्षणाची दारे खुली केली कारण त्यांना माहित होते. समाजात तो बदल शिक्षणाच्या माध्यमातूनच घडवून आणता येईल, जेणेकरून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगता येईल. म्हणूनच त्यांनी शिक्षणाचा प्रसार आणि समाजात प्रचलित असलेल्या बालविवाह, बालहत्या, यांसारख्या वाईट गोष्टींना विरोध केला. सतीप्रथा, विधवा स्त्रियांची दयनीय अवस्था, अस्पृश्यता इत्यादी सामाजिक दुष्कृत्यांवर जोरदार आघात झाला. जोतीराव फुले यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लोकांनी त्याना मुंबईतील सेभेत १८८८ मध्ये 'महात्मा' ही उपाधी दिली. त्यामुळे जोतीराव फुले हे "महात्मा फुले" या नावाने ओळखले जाऊ लागले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी भारतीय समाजात क्रांतिकारी चळवळी करून समाजसुधारक आणि विचारवंत म्हणून महत्त्वाचे योगदान दिले, जे आजच्या समाजात अतुलनीय आहे.

***संदर्भ सूची-***


१. *योगमाया, महात्मा ज्योतिराव फुले दर्शन एवं चिंतन, हिंदी ग्रंथ अकादमी जयपूर*
२. *धनंजय कीर, दी फादर ऑफ इंडियन सोशल रिवोल्युशन, पापुलर प्रकाशन बॉम्बे*
३. *एल. जी. मेश्राम, महात्मा ज्योतिबा फुले रचनावली भाग २, विमल कीर्ति, राधाकृष्ण प्रकाशन नई दिल्ली*
४. *आश्रू जाधव, महापुरुषांचे वैचारिक अधिष्ठान, साहित्य केंद्र, नागपूर*
५. *इंदिरा उके, सावित्रीबाई फुले जीवन कार्य - सुगत प्रकाशन नागपूर*
६. *चंद्रकांत वानखेडे, आश्रू जाधव, मातंग समाजाचा वैचारिक वारसा क्रांती विचारदायिनी, अस्मिता प्रकाशन नागपूर.*

# मुंबईतील महिला पोलीस : भूमिका आणि ताणतणाव (एक समाजशास्त्रीय अभ्यास)

***डॉ. ज्योती अरविंद पोटे,*** *समाजशास्त्र विभाग, पी.डी.कारखानीस कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अंबरनाथ*

***गोषवारा:*** *समाजाचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी समाजामध्ये नियंत्रणात्मक व्यवस्था कार्यरत असते. समाज जोपर्यंत साधा, सरळ व एकजिनसी असतो तोपर्यंत समाजावर अनौपचारिकरीत्या नियंत्रण राखले जाते. परंतु समाज जसा गुंतागुंतीचा होत जातो तेव्हा औपचारीक नियंत्रणाची गरज निर्माण होते. या औपचारीक नियंत्रणाचा एक भाग म्हणजे पोलिस यंत्रणा होय. या यंत्रणेमार्फत समाजात कायदा व सुव्यवस्था टिकवून ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो. त्यामध्ये महिला पोलिसांचाही बरोबरीने समावेश होतो. भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पिढ्यानपिढ्या दडपल्या गेलेल्या स्त्रियांच्या प्रश्नांना समजून घेण्याचे कार्य, महिलांच्या प्रश्नांबाबत असलेली संवेदनशीलता या गोष्टी लक्षात घेता पोलीस सेवेतील महिला पोलिसांची भूमिका महत्त्वाची ठरते. आपल्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना कौटुंबिक आणि व्यावसायिक अशा दुहेरी समस्यांना तोंड द्यावे लागते .याला महिला पोलीस देखील अपवाद ठरू शकत नाहीत. त्यामुळे पोलीस सेवेतील महिलांच्या भूमिकेचा वेगवेगळया दृष्टिकोनातून अध्ययन करण्याचा प्रयत्न सदर संशोधनाअंतर्गत करण्यात आला आहे.*

*सदर अध्ययनात पोलीस यंत्रणेतील महिला पोलिसांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आहे. यासाठी मुंबईसारख्या बहुरंगी-बहुढंगी आणि विविध समस्यांनी ग्रासलेल्या शहराची निवड केली आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या शहरात महिला पोलिसांच्या समस्यांची तीव्रता अधिक जाणवत असल्याने त्यांच्यावर येणाऱ्या एकूण ताण-तणावांचा अभ्यास या संशोधना अंतर्गत करण्यात आला आहे.*

**प्रस्तावना** : प्रत्येक समाजात अनौपचारीक व औपचारिक नियंत्रण हे समाजाच्या, कल्याणासाठी, सुरक्षिततेसाठी, विकासासाठी, अस्तित्वासाठी आवश्यक असते. अनौपचारीक नियंत्रणाची साधने समाजविकासाच्या प्रक्रियेत स्वाभाविकपणे अस्तित्वात येतात. तर औपचारिक नियंत्रणाच्या साधनांची निर्मिती हेतुतः केली जाते. समाजाच्या विकासाबरोबर औपचारिक नियंत्रणाच्या साधनांची गुंतागुंत वाढत जाते. समाजातील एकसंधपणा विस्कळीत होण्याच्या शक्यतेमुळे बहुतांश समाज औपचारीक नियंत्रण स्वीकारतो. कोणत्याही संसदीय लोकशाही व्यवस्थेमध्ये संसद, न्यायव्यवस्था व कार्यकारी मंडळ हे तीन प्रमुख आधारस्तंभ असतात. संसदेमध्ये कायदा पास केला जातो, कायद्याची घटनात्मक बाजू न्यायव्यवस्था पाहते आणि कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी कार्यकारी मंडळावर असते. कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी, समाजात कायदा व सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाच्या गृहखात्याकडे असते. त्याचाच एक भाग म्हणजे पोलिस खाते होय. जगातील प्रत्येक देशात समाजाच्या सुरक्षिततेसाठी पोलीस यंत्रणा अस्तित्वात असते. पोलीस यंत्रणा ही समाजाचा एक अविभाज्य भाग आहे. देशपरत्वे या यंत्रणेचे स्वरूप वेगवेगळे असले तरी यंत्रणेचा मुख्य उद्देश समाजात कायदा व सुव्यवस्था राखणे हाच आहे. असे जरी असले तरी समाजामध्ये सातत्याने घडून येणाऱ्या परिवर्तनामुळे पोलीस सेवा ही बहुआयामी झाली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये महिला पोलिसांची गरज सामाजिक स्थित्यंतरामुळे भासू लागली. स्त्रियांवर होणारे अत्याचार, स्त्री गुन्हेगारी, बालगुन्हेगारी यामध्ये सातत्याने होत असलेली वाढ ही पोलीस सेवेला आव्हानात्मक ठरू लागली. याबरोबरच घटनेने दिलेल्या समानतेच्या तत्वाची अंमलबजावणीची मागणी स्त्रियांकडून होऊ लागली. याचा एकत्रित परिणाम म्हणून महिलांसाठी पोलीस सेवेची दारे इतर क्षेत्राप्रमाणे खुली झाली आहेत. भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीपुरुषांच्या भूमिका अनाद-ीकाळापासून अधोरेखित केलेल्या आहेत. आधुनिक काळात ही भूमिका, साचेबंद चौकट हळूहळू वाढत चालली आहे. स्त्रीपुरुष समानता - हे मूल्य आधुनिक काळात भारतीय समाजाने अपरिहार्यपणे स्वीकारले आहे. परंतु पारंपरिक मूल्यांचा समाजमनावरील पगडा अजूनही पूर्णपणे नष्ट झालेला नसल्याने भूमिका संघर्षाची निर्मिती झाली आहे. परिणामी मोठ्या प्रमाणात ताणतणावांचा सामना करावा लागतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :** १) महिलांनी पोलिस सेवेत भरती होण्यामागची कारणे जाणून घेणे. २) पोलीस सेवेतील महिलांच्या कामाचे स्वरूप जाणून घेणे. ३) पोलीस सेवेतील महिलांचे कौटुंबिक प्रश्न आणि कौटुंबिक समायोजनाची समस्या जाणून घेणे. ४) बढती व बदलीचा महिला पोलिसांच्या कौटुंबिक आणि वैवाहिक जीवनावर

होणारा परिणाम जाणून घेणे. ५) पोलीस सेवेतील महिलांच्या ताणतणावांचे आकलन करणे.

**गृहीतकृत्ये :** १) महिलांचे पोलिस सेवेत स्वेच्छेने येण्याचे प्रमाण कमी आहे. २) पुरुष पोलिसांपेक्षा महिला पोलिसांवर जोखमीच्या कामाची जबाबदारी कमी प्रमाणामध्ये सोपवली जाते. ३) महिला पोलीस म्हणून महिलांना समाजात कुटुंबात अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ४) पतीपत्नी दोघेही पोलीस सेवेत - असले तरी परस्परांना समजावून घेऊ शकतातच असे नाही.

**संशोधनाचे कार्यक्षेत्र :** मुंबई पोलीस परिक्षेत्र अंतर्गत दक्षिण प्रादेशिक विभाग, मध्य प्रादेशिक विभाग, पूर्व प्रादेशिक विभाग, पश्चिम प्रादेशिक विभाग आणि उत्तर प्रादेशिक विभाग असे एकूण पाच प्रादेशिक विभाग आहेत. या विभांगातर्गत एकूण बारा परिमंडळे आणि बारा परिमंडळांतर्गत ९१ पोलीस ठाणे आहेत. या प्रत्येक प्रादेशिक विभागातून आणि त्या अंतर्गत येणाऱ्या परिमंडळातील साधारणपणे प्रत्येकी तीन ते चार पोलिस ठाण्यांमध्ये जाऊन महिला पोलिसांची भेट घेऊन माहिती गोळा करण्यात आली आहे. तसेच 'ल' विभागातूनही माहिती गोळा करण्यात आली आहे. 'ल' विभाग म्हणजे सशस्त्र पोलीस दल होय. प्रशिक्षणानंतर सर्वप्रथम 'ल' विभागात पोलिसांच्या नेमणुका होतात. त्यामुळे या विभागातील एक, दोन आणि चार (मरोळ - अंधेरी, नायगाव आणि ताडदेव) या विभागातून ही महिला पोलिसांची माहिती गोळा करण्यात आली आहे.

**नमुना निवड :** एकूण २०० महिला पोलिसांची निवड नमुन्यासाठी करण्यात आली आहे. यामध्ये यादृच्छिक नमुना निवड आणि अपघाती नमुना निवड तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच ३५ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांकडून स्वतंत्र मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली आहे.

**तथ्य संकलन :** तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे प्राथमिक स्त्रोतांमध्ये महिला पोलिस व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्यासाठी मुलाखत अनुसूची आणि सहभागी निरीक्षण तंत्राचा अवलंब करण्यात आलेला आहे. पोलीस क्षेत्र हे सामाजिक सुरक्षेची जबाबदारी सांभाळणारे क्षेत्र असल्याने सामाजिक कार्य करण्याची आवड असलेल्या व्यक्ती या क्षेत्राकडे सहजपणे येऊ शकतात. महिला पोलिसांकडून सेवेत येण्याची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता ४४ टक्के महिला पोलिसांनी आपण आवड म्हणून या सेवेत आलो असे उत्तर दिले तर ४३.५ टक्के महिला पोलिसांनी गरज म्हणून या सेवेत आलो असे सांगितले तर काहींनी आकर्षण, अपरिहार्यता यासारखी कारणे सांगितली. यावरून या सेवेत स्वेच्छेने येणाऱ्या महिलांचे प्रमाण कमी आहे हे स्पष्ट होते.

स्वेच्छेने या सेवेत महिलांचे येण्याचे प्रमाण कमी असण्याची अनेक कारणे आहेत त्यापैकी एक महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या इच्छेने व आवडीने या व्यवसायात आलेल्या महिलांना पोलीस सेवेमध्ये एकरूप होण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात नाहीत हे पुढील आकडेवारीवरून निदर्शनास येते ४४ टक्के महिला पोलीस ' आवड ' म्हणून या क्षेत्रात आल्या असल्या तरी त्यापैकी अनेक जणींना नोकरीचा पुनर्विचार करावासा वाटतो तर काहींना महिलांसाठी हे क्षेत्र योग्य वाटत नाही असे वाटते. ही बाब गांभीर्याने विचार करायला लावणारी आहे

महिला पोलिसांना फारशी जोखमीची कामे दिली जात नाहीत हे या अभ्यासाअंती निदर्शनास आले. गुन्हेगारांबरोबर पोलिसांचा सतत संबंध येत असतो. अट्टल गुन्हेगारांना कोर्टात नेणे - आणणे हे आत्ताच्या एकूण परिस्थितीत जोखीम ठरते. कारण अलीकडच्या काळात गंभीर गुन्ह्यांच्या प्रकरणात अटक झालेले गुन्हेगार फरार झाल्याच्या अनेक घटना वाचावयास मिळतात. थोडक्यात अशा प्रकारच्या कामाची जबाबदारी महिला पोलिसांवर स्वतंत्ररित्या टाकली जात नाही. महिला गुन्हेगार म्हणून तर कधी कैदीपार्टी न्यायची असली तरी महिला पोलीस स्वतंत्रपणे न जाता पुरुष पोलिसांच्या समवेत जाऊन कामगिरी पार पाडतात.

महिला पोलिसांकडे वृद्ध, महिला, लहान मुले यांच्याशी संबंधित असलेली कामे दिली जातात. २०० पैकी ५८.५ टक्के उत्तरदात्यांनी त्यांना बंदोबस्त, टपाल ड्युटी, कैदीपार्टी इत्यादी कामे दिली जातात असे सांगितले. याचा पडताळा ३५ पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्याकडून घेतलेल्या माहितीवरून देखील स्पष्ट होतो. पोलीस अधिकाऱ्यांच्या मते महिला पोलिसांकडे स्त्रियांशी निगडित असणारी कामे देण्याकडे त्यांचा अधिक भर असतो. याची काही सामाजिक कारणे देखील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट करून सांगितली आहेत. पुरुष पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखणे, बीट मार्शल, पेट्रोलिंग, नाईट राउंड यासारखी कामे दिली जातात. मात्र महिला पोलिसांकडे बंदोबस्त सोडला तर बहुतांशपणे स्वागत कक्ष, कोर्ट ड्युटी, महिलांसंबंधीचे गुन्हे, महिला फिर्यादी, महिला आरोपी यांची विचारपूस, अंगझडती यासारखी कमी जोखमीची कामे दिली जातात. थोडक्यात महिला पोलीस आणि पुरुष पोलीस यांच्यातील कामकाजाच्या वाटपात भेदभाव केला जातो.

महिला पोलीस म्हणून महिलांना समाजात आणि कुटुंबात अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

सर्वसाधारणपणे भारतातील बहुसंख्य स्त्रियांना अनेक प्रकारच्या सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. महिला पोलीसही याला अपवाद नाहीत. महिला पोलिसांच्या संदर्भात सामाजिक समस्यांचा विचार करता असे दिसून येते की, समाजातील पुरुष व महिला या दोघांचाही महिला पोलिसांकडे पाहण्याचा दृष्टिकोण पूर्वग्रहदूषित आहे. अलीकडच्या काळात एकूणच संपूर्ण पोलिस दलाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन हा फारसा चांगला नाही त्यामुळे महिला पोलीस देखील यातून सुटू शकत नाही ३२.५ टक्के महिला पोलिसांनी समाजाकडून कधीकधी सहकार्य मिळते असे सांगितले आहे. तर २० टक्के उत्तरदात्यांना समाजाकडून मदत मिळत नाही असे आढळले. १९.५ टक्के महिला पोलिसांच्या मते समाजाचा पोलिसांकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रतिकूल असतो असे दिसून आले. वरील आकडेवारीवरून असे लक्षात येते की महिला पोलिसांना इतर सर्वसाधारण महिलांपेक्षा आपल्या इतरही अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

महिला पोलिसांच्या कौटुंबिक समस्यांची तीव्रता ही इतर स्त्रियांपेक्षा अधिक आहे. महिला पोलिसांच्या संदर्भात येणारी पहिली बाब म्हणजे २४ तासांची ड्युटी नियमानुसार पोलिस हे चोवीस तासाच्या ड्युटीला बांधील असतात. अर्थात अशा प्रकारची ड्युटी पूर्वीच्या काळात जरी कधी कधी करावी लागत असली तरी आज याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे २४ तासाची ड्युटी आणि दुसऱ्या बाजूने आजची स्फोटक परिस्थिती यामुळे महिला पोलिसांना कौटुंबिक समायोजनाच्या प्रश्नाला सामोरे जावे लागते आहे. याचे उदाहरण म्हणजे 'पाळणाघर' महिला पोलिसांच्या मुलांना पाळणाघरांमध्ये ठेवून घेण्यास स्पष्टपणे नकार दिला जातो. याचे कारण समाजाची गरज म्हणून निर्माण झालेली पाळणाघरे व्यावसायिक तत्वावर चालवली जातात. यामुळे आठ तासांची बांधिलकी ते स्वीकारतात. महिला पोलिसांच्या मुलांच्या बाबतीमध्ये पाळणाघर पोलिसांच्या चोवीस तासाच्या ड्युटीमुळे धोका पत्करण्यास तयार होत नाहीत.

महिला पोलिसांना येणाऱ्या कौटुंबिक समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता २१ टक्के महिला पोलिसांनी कौटुंबिक जबाबदाऱ्यांची समाधानपूर्वक पूर्तता करता येते, कुटुंबासाठी वेळ देता येतो असे सांगितले. यावरून बहुसंख्य महिला पोलिसांच्या बाबतीत कौटुंबिक जबाबदारीची पूर्तता होत नाही ती हे स्पष्ट होते. ३२ टक्के महिला पोलिसांनी आपल्या नोकरीमुळे मुलांच्या वाढीवर आणि विकासावर परिणाम होतो असे सांगितले. आणि ३२% इतर महिला पोलिसांनी नोकरीमुळे वैवाहिक संबंधात तणाव निर्माण होतात असेही सांगितले.

वरील विश्लेषणातून असे दिसून येते की, महिला पोलिसांना महिला म्हणून अनेक प्रकारच्या सामाजिक व कौटुंबिक समस्यांना सामोरे जावे लागते. प्रत्येक व्यक्तीला आपले कौटुंबिक आयुष्य सुखासमाधानात जगावेसे वाटणे स्वाभाविक असते. एकाच क्षेत्रात काम करणाऱ्या पती-पत्नींना आपल्या क्षेत्रात असणारे अडथळे, अडचणी, कामाचे स्वरूप यांची जाणीव असते. त्यामुळे एकाच क्षेत्रात काम करणारे पतीपत्नी एकमेकांना समजून घेऊन - आपली कौटुंबिक वाटचाल सुखासमाधानाने करत असतील असा आपला सर्वसाधारण समज असतो.

सदर अध्ययनात पतीपत्नी एकाच क्षेत्रात- असताना एकमेकांना समजून घेतात का हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता २०० पैकी ३३ महिला पोलिसांचे पती पोलिस सेवेत आहेत या ३३ महिला पोलिसांपैकी १७ महिला पोलीस आपल्या वैवाहिक संबंधात ताणतणावाचा सामना करावा लागतो असे स्पष्टपणे नमूद करतात. यावरून पोलीस सेवेसारख्या वैशिष्ट्यपूर्ण सेवेत नोकरी करणारे पती-पत्नी एकमेकांना समजून घेतातच असे नाही हे स्पष्ट होते. तसेच महिला पोलिसांच्या संदर्भात 'ल' विभागात काम करणाऱ्या महिला पोलिसांना एका विशिष्ट प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. महिला पोलिसांना प्रशिक्षणानंतर सर्वसाधारणपणे 'ल' विभागात रुजू करून घेतले जाते. हा विभाग हत्यारी विभाग आहे. पोलिसांना दिली जाणारी हत्यारे या विभागात असतात या विभागात काम करत असताना बुलेटचा पट्टा बंदूक जवळ बाळगणे आवश्यक असते महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विभागात प्रशिक्षण घेऊन रुजू झालेल्या महिला या २० ते २५ या वयोगटातील असतात सर्वसाधारणपणे याच काळात त्यांचा विवाह झालेला असतो अध्ययन करताना असे लक्षात आले की, या विभागात काम करत असलेल्या पाच ते सात महिला पोलिसांचा गर्भपात झालेला आहे विभागात काम करणाऱ्या महिला पोलिसांना सेवा बजावत असताना निर्माण होणाऱ्या समस्येचा गंभीरपणे विचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

'ल' विभागात काम करत असताना महिला पोलिसांना कोर्टड्युटी, जेल ड्युटी, हॉस्पिटल ड्युटी अशी कामे करावी लागतात. अशी कामे करत असताना त्यांना बंदूक व बुलेटचा पट्टा जवळ बाळगावा लागतो. अशावेळी कोर्टाचे व जेलचे उंच जिने यांची चढ-उतार करावी

लागते. अशा परिस्थितीत गरोदर महिला पोलिसांना त्रास होतो आणि त्याचा परिणाम वर नमूद केल्याप्रमाणे आढळतो. शासनाने गरोदर स्थितीतील 'ल' विभागामधील महिला पोलिसांकडे सहानुभूतीने पाहिले तर हा गंभीर प्रश्न सोडवता येऊ शकतो.

भारतीय घटनेने स्त्रीपुरुषांना समानतेचे हक्क प्रदान केले आहेत. हे जरी खरे असले तरी हे समानतेचे तत्व काटेकोरपणे अंमलात आणणे शक्य नाही. भारतीय समाजाचा विचार केला तर ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते. भारतीय स्त्रीला सक्षम करणे, सबळ बनवणे हे जरी शासनाचे कर्तव्य असले तरीही समानतेच्या तत्त्वाचा तारतम्याने व भारतीय समाजव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे आहे. भारतीय समाजातील पुरुषप्रधान संस्कृती अजूनही समाजात या मानसिकतेला तयार झालेली नाही ही वस्तुस्थिती दुर्लक्षता येत नाही. आजही भारतीय स्त्री कौटुंबिक जबाबदाऱ्यांनाच महत्त्व देत आहे. शेकडो वर्षांच्या परंपरा आजही चालवाव्या लागतात. त्यातून तिची सुटका करण्यास भारतीय पुरुष देखील तयार होत नाही. अशा समाजव्यवस्थेत पोलीस खात्यात समानतेचे काटेकोर पालन करणे अशक्य आहे. इतर कोणत्याही शासकीय क्षेत्रात कामाचे तास आठ तासांपेक्षा जास्त असत नाहीत. पोलीस हे एकच खाते असे आहे की ज्यामध्ये कामाचे तास बारा आहेत. यामध्ये जाण्यायेण्याचे दोन ते तीन तास धरले असता पंधरा तास घराच्या बाहेर राहिल्यामुळे कौटुंबिक समस्यांचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागतो. तसेच योग्य विश्रांती न मिळाल्यामुळे त्याचा आरोग्यावरही अयोग्य परिणाम होतो.

महिला पोलिसांचे काम, त्यांचे कार्य, त्यांच्या जबाबदाऱ्या या गोष्टींचा विचार करता बारा तासांची त्यांची ड्युटी याचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. शासनाने महिला पोलिसांची बारा तासाच्या ड्युटीची अट जर काही प्रमाणात शिथील केली तर महिला पोलिसांच्या ९० % अडचणी सुटू शकतात.

**उपाययोजना व शिफारसी :** १) विवाहित महिला पोलिसांना अत्यंत गंभीर अशा प्रश्नांना सामोरे जावे लागते. तो म्हणजे आजच्या विभक्त कुटुंबात मुलांच्या संगोपनाचा भेडसावणारा प्रश्न. शासनाने महिला पोलिसांच्या मुलांसाठी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. कारण शहरातील बहुसंख्य पाळणाघरे ही आठ तासांच्या नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सहज उपलब्ध होतात मात्र चोवीस तासांच्या सेवेला बांधील असलेल्या महिलांसाठी पाळणाघरांची अशी कुठलीही सोय उपलब्ध नाही. त्यामुळे पाळणाघराची सोय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. २) महिला पोलिसांच्या कामाच्या स्वरूपाची जाणीव कुटुंबातील व्यक्तींना व्हावी यासाठी मेळावे घेण्यात यावे. अत्यंत महत्त्वाची शिफारस म्हणजे महिलांचे सबलीकरण करण्यासाठी शासनाकडून ठोस पावले उचलली जाणे आवश्यक आहे. यामध्ये प्रशिक्षण कालावधी, शारीरिक दृष्ट्या सबलीकरण आणि संभाषण कौशल्य, विविध खटले हाताळणे, चौफेर व्यक्तिमत्त्व विकास करणे या बाबी आवश्यक असल्याने शासनाने या गोष्टीवर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. ३) पोलीस क्षेत्रात स्त्री पुरुष समानता बिंबविण्यासाठी कामाचे विभाजन करताना पुरुष पोलीस व महिला पोलीस असा भेदभाव केला जाऊ नये.

***संदर्भसूची:***


१. *साळुंखे सर्जेराव, (२०१०), समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना, प्रोफीशिएंट पब्लिशिंग हाऊस, पुणे.*

२. *देसाई निरा आणि मैत्रेयी कृष्णराज, (१९९८), 'स्त्री अभ्यास' म्हणजे काय?, अनुवाद- उषा मेहता, महाराष्ट्र स्त्री अभ्यास व्यासपीठ, मुंबई.*

३. *टेणी नंदकुमार, (२००४), वर्दीतील मीरा, लाजरी, पान क्रमांक २ ते ११*

४. *ताम्हणे माधुरी, ( 2006 ), एक हृदय संवाद पोलिस सहआयुक्त मीरा बोरवणकरांशी, माहेर दिवाळी विशेषांक, पान क्रमांक १० ते १८.*

५. *Aleem shamim, (1991), women police and social change, Ashish publishing house, New Delhi.*

६. *Aleem shamim, (1991), women in Indian police, sterling publication, New Delhi.*

७. *Mahajan Amarjeet, (1982), Indian police women: A sociological study of new role, Deep and deep publication, New Delhi.*

# महिला सक्षमीकरण : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.व्ही.एन.कांबळे,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ

**प्रस्तावना :** पुरूषप्रधान समाज व्यवस्थेच्या चौकटीत स्त्रियांना आजही दुय्यम स्थान आहे. आज समाजव्यवस्थेत वैज्ञानिक क्रांती झाली आहे. परिणामी, समाजात क्रांतिकारी बदल झालेले पहावयास मिळत आहेत. परंतु भारतीय स्त्रियांवर लादलेले निकृष्ट जीवनाचे चित्र बदललेले दिसत नाही. मुख्य विकासाच्या प्रवाहापासून स्त्रिया काही प्रमाणात दूर आहेत. स्त्रियांच्या प्रश्नांचे स्वरूप देश-काल भिन्न आहेत. परंतु प्रत्येक देषात स्त्रियांच्या समस्या कायम आहेत. दुसऱ्या महायुध्दानंतर स्त्री प्रश्नांना चालना मिळाली. महिलांच्या समस्यांबाबत विचार मंथनासाठी महिला संघटना बरोबरच सामाजिक विचारवंत, स्वंयसेवी संघटना पुढे आल्या. त्यामुळे महिला प्रष्न जागतिक पातळीच्या ऐरणीवर आले. स्त्री चळवळीतून स्त्री हक्कांची संकल्पना पुढे आली. मनुष्य जेंव्हा जन्म घेतो तेव्हा त्याला जीवन जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, याच दृष्टिकोनातून महिला चळवळीचा उगम झाला. स्त्रियांना विकासांच्या संधी व पोशक वातावरण निर्माण केले पाहिजे असा विचार पुढे आला. यातून सबलीकरणाची संकल्पना समोर आलेली आपणांस पहावयास मिळते.[1] जागतिक स्तरावर स्त्री मुक्ती चळवळ कार्य करीत आहे. देशोदेशीच्या स्त्री समस्या भिन्न् आहेत. स्त्री म्हणून पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेतील निम्न स्थान समान स्वरूपाचे आहे. स्त्रियांच्या जननक्षमतेवर, लैंगिकतेवर, श्रमावर, पुरूषांचे वर्चस्व दिसून येते. स्त्रियांना वरील क्षेत्रात निर्णयाधिकार व पुरूषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेमध्ये समान संधी, स्थान, लाभ आणि प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, या विचारास स्त्री सक्षमीकरणाचा विचार मानता येईल. स्त्रियांना 'बाईपणामुळे' अन्याय सहन करावा लागत आहे. हा अन्याय लिंगभेदामुळे वाढत आहे. सामाजिक-सांस्कृतिक, लिंगभेद संपविण्यासाठी कोणती आर्थिक व राजकीय व्यूहरचना असावी याबाबत विद्यापीठातील 'स्त्री अभ्यासकेंद्र', 'स्त्रीसंघटना', 'स्वंयसेवी संस्था', 'राजकीय पक्ष', 'राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय व्यवस्था' आज आपआपले अजेंडे घेवून कार्य करीत आहेत. त्याच कार्याचा एक भाग स्त्रियांच्या संदर्भातील सक्षमीकरणाचा आहे. स्त्री सक्षमीकरणाचा विषय व्यापक पातळीवर हाती घेतलेला आहे.[2] अठराव्या शतकात मानवतावादी चळवळीचा उगम झाला. त्यातील एक महत्त्वाची चळवळ म्हणून समोर आलेली स्त्री मुक्ती चळवळ आहे. सन १९६० ते १९७० च्या दशकात स्त्री चळवळी समोर आल्या आहेत. जागतिक पातळीवर महिला सक्षमीकरणासाठी विविध परिषदांचे आयोजन करण्यात आलेले दिसून येते. 'मेक्सिकोला पहिली परिषद' (१९७५), 'कोपनहेगन' येथे दुसरी (१९८०), 'नैरोबी' येथे तिसरी (१९८५), आणि 'बीजिंग' येथे चवथी (१९९४) साली पार पडली.[3] संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९७९ ला 'महिला हक्क सनदेला' मान्यता दिली. १९८० ला प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. प्रस्तुत महिला हक्क सूचीमध्ये एकूण ३० कलमे समाविष्ट आहेत. या संदर्भानेच १९९० मध्ये 'राष्ट्रीय महिला आयोग कायदा' केला. यातूनच महिला सबलीकरणाला गती अधिक मिळालेले पहावयास दिसते.[4]

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ :** महिला सक्षमीकरण याचा अर्थ महिलांना सर्वार्थाने सक्षम बनविणे होय. किंबहुना त्यांचे सबलीकरण म्हणजे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी तिला संपूर्ण संधी देणे होय. स्त्रियांवर आतापर्यंत झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करणे, त्यांना समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने समान स्थान देणे, आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनविणे, त्यांना त्यांचे सर्व हक्क मिळवून देणे आणि समाजात त्यांना सन्मानाने व प्रतिष्ठेने जीवन जगता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.[5] 'जागतिक बॅंकेची स्त्रोत पुस्तिका' २००७ नुसार 'सक्षमीकरण म्हणजे, गरीबांकडील उपलब्ध साधने आणि क्षमतांचा त्यांना त्यांच्या आयुष्याशी निगडीत संस्थांमध्ये सहभागी होणे, त्यांच्यासाठी वाटाघाटी करणे, त्यांच्यावर प्रभाव टाकणे, नियंत्रण राखणे आणि त्यांना जबाबदार धरण्याच्या दृष्टीने विस्तार करणे होय.' 'बाटलीवाला' यांच्या मते, व्यक्तीचे संसाधनावरील नियंत्रण व स्वविकासाबाबतच्या विचारांचे स्वातंत्र्य असणे म्हणजे सक्षमीकरण होय. 'नैरोबी' येथे स्त्री विचारवंतांनी जागतिक स्त्री परिषदेच्या व्यासपीठावरून सक्षमीकरणाबाबत म्हटले आहे की, या संकल्पनेची नव्याने व्याख्या करण्याची गरज आहे. आज 'स्त्री कल्याण या अर्थाने सक्षमीकरणाचा जो अर्थ घेतला जातो तो अपूरा आहे.' 'मॅक मिर्थर' यांच्या मते, 'सक्षमीकरणाची प्रक्रिया तीन पातळयांवरून घडत असते. १) वैयक्तिक गुणवत्तेचा सुधार, २) आत्मविश्वास संपादन व अंगभूत क्षमतांचा समाधानकारक वापर आणि ३) सक्षमीकरणासाठीची समूहवादी भूमिका'[6]

**साहित्याचा आढावा :** हिंगोले रेखा, (२००६), यांनी 'महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय' हा संशोधनपर ग्रंथात महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सक्षमीकरण संकल्पना, सक्षमीकरण आणि स्त्री चळवळ, सक्षमीकरणाच्या समस्या आणि स्त्री सक्षमीकरणासाठीचे उपाय सविस्तर विशद केलेले आहेत. घाटपांडे अनुप्रिता, (२०१४) यांनी 'महिला सक्षमीकरण आणि अर्थकारण' या शिर्षकाच्या संशोधनपर लेखात त्यांनी स्त्रियांच्या समोरील मुख्य दोन प्रश्न नमूद केले आहेत. ते म्हणजे महिला विषयांच्या अडचणी आणि महिलांचे सामाजिक प्रश्न. स्त्रिया आजही लिंगभेद, निरक्षरता, आर्थिक परावलंबित्व, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि स्त्रीभृण हत्या यांचा सामना करीत आहेत. इत्यादी घटकांमुळे स्त्रियांचा दर्जा उंचावण्याऐवजी कनिष्ठ होत चालला आहे असे अधोरेखित केलेले आहे. लहाने इंदुमती, (२०१४) यांनी 'महिला सक्षमीकरणाच्या दिशेने' हा शोधनिबंध प्रेरक ललकारी स्त्रीमुक्ती संघटना या मासिकात प्रसिध्द केला. त्यांच्या मते स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, सामाजिक समतेसाठी प्रयत्न करणे, स्त्रियांना समान हक्क, स्त्री-पुरूष समानता, स्त्रियांना बंधनातून मुक्त करणे, तसेच स्त्रियांना आर्थिक स्वावलंबी करणे इत्यादी उपाय महिला सक्षमीकरणासंदर्भात स्पष्ट केलेले आहेत. ओक हेमंत, (२००४) यांनी 'देशात महिला धोरण राबविणारे पहिले राज्य' हा संशोधनपर लेख लोकराज्य मासिकात प्रकाशित केला आहे. त्यांच्या मते, महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये 'महिला धोरण' जाहीर केले. परंतु, महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी महिला धोरणात बदल करून २००१ मध्ये 'नवीन महिला धोरण' जाहीर केले. प्रस्तुत धोरणामध्ये प्रामुख्याने महिलांना केंद्रस्थानी मानून महिला घटक योजनेचा अंतर्भाव केला. तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवून त्यांना स्वावलंबी व सक्षम बनविण्यावर भर दिला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :** १) समकालीन समाजातील महिला सक्षमीकरण यांचा अभ्यास करणे. २) महिला सक्षमीकरण संदर्भातील विविध कायद्यांचा अभ्यास करणे. ३) महिला सक्षमीकरणातील विविध योजनांचा अभ्यास करणे. ४) महिला सक्षमीकरणातील विविध घटकांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास व्दितीय तथ्य संकलनाच्या स्त्रोतांवर आधारित आहे. त्यामध्ये शोधप्रबंध, लघुशोधप्रबंध, संदर्भग्रंथ, मासिके, विविध आयोगांचे अहवाल इत्यादींच्या माध्यमातून तथ्य संकलित केलेली आहेत.[7]

**सैध्दांतिक दृष्टीकोन :** प्रस्तुत शोधनिबंधाचे लिखाण करताना 'उदारमतवादी स्त्रीवाद' हा दृष्टिकोन घेतला आहे. उदारमतवादी स्त्रीवादी दृष्टिकोनामध्ये प्रामुख्याने मेरी वालेस्ट्क्राफ्ट, हेरियट टेलर, जॉन स्ट्रॉट मिल आणि बेडी फ्रिडमॅन यांसारख्या अनेक स्त्रीवादी अभ्यासकांनी उदारमतवादी स्त्रीवाद विकसित करण्यामध्ये योगदान दिलेले आहे. एलिसन यागर यांच्या 'Feminist Polities and Human Nature' या पुस्तकात मानवाची नैतिकता, विवेकबुध्दी व अधिकार प्राप्तीची अभिलाशा यातून उदारमतवादाचा जन्म होतो असे म्हटले आहे. जे.एस.मिल यांच्या 'Early Easys on Marriage and Divorce' या ग्रंथात असे म्हटले आहे की, स्त्रियांनी विकासाच्या म्हणून ठरविलेल्या कसोट्या केव्हांच पार पाडल्या आहेत, रूढी-परंपरेमुळे त्या बंदिस्त झाल्या आहेत. त्यांना जर वैज्ञानिक, प्रशासकीय व आर्थिक स्वातंत्र्य मिळाले तर त्या पुरूषा इतक्याच सक्षमपणे सर्वत्र संचार करू शकतील यासाठी त्यांना शिक्षणाची मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल. बेडी फ्रिडान यांनी 'The Feminine Mistake' हा ग्रंथ प्रकाशित केला. प्रस्तुत ग्रंथात त्यांनी स्त्रियांनी बाहेर पडायचे असेल तर 'सुपर वुमन' बनून जीवनातील कर्तबगारीची व आघाडीची क्षेत्रे त्यांनी निवडली पाहिजे.[8] तसेच मेरी वालेस्टनक्रॉफ्ट हीने तिच्या 'A vindication of the Rights of Women' या पुस्तकात परंपरागत पुरूषप्रधानतेच्या अधीन राहून लिखाण आणि मांडणी करणाऱ्या अभ्यासकांच्या लिखाणकार्यावर टीका केली आहे. तसेच जॉन स्ट्रॉट मिल यांनी 'Subjection of Women' या पुस्तकात स्त्रियांच्या दमनाविषयी आणि शोषणाविषयी लिखाण केले आहे.[9]

उदारमतवादी विचारसरणीच्या विचारवंताच्या मते, प्रत्येक स्त्री ही स्वयंपूर्ण आणि स्वायत्त आहे. प्रत्येक स्त्रियांकडे तार्किकता आहे तसेच त्यांच्याकडे अनेक व्यक्तिगुण असलेले दिसतात. विशेषत: कौशल्य, बुध्दिमत्ता, विचार आणि तर्क करण्याची क्षमता स्त्रियांमध्ये आहे. उदारमतवादी स्त्रीवादाने परंपरागत तर्कवादी आणि विज्ञानवादी अभ्यासकांनी स्त्रियांच्या बुध्दिमतेचा आणि तार्कीकतेचा सकारात्मक दृष्टिकोनातून विचार केलेला आहे. उदारमतवादी स्त्रीवादी अभ्यासकांनी कल्याणकारी, सुधारणावादी आणि मवाळवादी धोरणांचा स्वीकार केलेला आहे. त्यांच्या मते, सामाजिक व्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आल्यास स्त्रियांच्या जीवनात समानता निर्माण होऊ शकते अशी धारणा, मत, भूमिका आणि आशावाद उदारमतवादी स्त्रीवादाने स्पष्ट केलेला आहे. तसेच समान शिक्षण,

कायदे, रोजगार आणि राजकीय अधिकार यांच्या माध्यमातून स्त्री समानता येऊ शकते या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**महिला सक्षमीकरणासाठीचे विविध कायदे :** भारतीय समाजातील महिलांच्या स्थितीचा विचार करून महिलांच्या स्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासनाने विविध कायदे केलेले आहेत. सदरील कायदे महिला सक्षमीकरणासाठी सहाय्यक ठरत आहेत. कायद्याच्या माध्यमातून महिला प्रभावी बनत आहेत. कायद्याद्वारे वेळोवेळी मदत व सहाय्य केले जात आहे. भारतीय संविधानातील तरतुदीव्यतिरिक्त अनेक कायदे निर्माण करून महिला अधिकारांना संरक्षण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ते कायदे याप्रमाणे, मानवी हक्क संरक्षण कायदा (१९९३), हिंदु विवाह कायदा (१९५५), विषेश विवाह कायदा (१९५४), विदेश विवाह कायदा (१९६९), भारतीय घटस्फोट कायदा (१८६९), विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा (१९५६), हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१), समान वेतन कायदा (१९७६), आणि कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा (२००५)[10] इत्यादी कायदे महिलांच्या संदर्भात आहेत. या सर्व कायद्यांमुळे महिला सक्षमीकरणास मदत होत आहे, असे अधोरेखित करता.

**राष्ट्रीय व राज्य महिला आयोग आणि महिला सक्षमीकरण :** समकालीन समाजातील महिलांच्या हक्कासंबंधी व अधिकारासंबंधी महिला आयोग कार्य करताना दिसत आहे. तसेच महिला आयोग महिलांच्या अधिकार व हक्काचे संवर्धन करणे, महिलांच्या प्रश्नांवर विचार व संशोधन करत आहे. १९९० च्या राष्ट्रिय महिला आयोग कायद्यान्वये १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली आहे. हा आयोग महिलांच्या कायदेशीर तरतुदींचे अवलोकन, अध्ययन व संशोधन करीत आहे. महिलांचे हक्काचे उल्लंघन झाल्यास अशा घटनांची चैकशी सनदशीर मार्गाने करीत असते. त्याचप्रमाणे गरजू स्त्रियांना मदत करणे आणि महिलांना सन्मानाची वागणुक देण्याबद्दल लोकांमध्ये जाणीव निर्माण करीत असते. 'राष्ट्रिय महिला आयोगाच्या' धर्तीवरच महाराष्ट्रत १९९३ मध्ये 'राज्य महिला आयोगाची' स्थापना केलेली आहे. राज्य महिला आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. महिलांच्या हक्कासंबंधी भारतीय संविधानातील तरतुदी, विविध कायदे, इत्यादी घटक महत्त्वाचे आहेत. दोन्ही आयोगामुळे महिलांच्या कार्यांना व महिला चळवळींना गती प्राप्त झाली आहे. तसेच महिलांचा विकास व प्रगतीला चालना मिळत आहे.[11]

**महिला सक्षमीकरणासंदर्भातील महत्त्वाचे मुद्दे :** महिला सक्षमीकरणाचा संबंध हा त्यांना शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक व राजकारणातील भागीदारीत मिळालेल्या संधीशी अगदी जवळून जोडला आहे. विकास योजना प्रक्रियांमध्ये महिलांना शासन प्राधान्य देत आहे. ते पुढील मुद्यांद्वारे स्पष्ट करता येईल. १) महिला आणि शिक्षण, २) महिला आणि आरोग्य, ३) महिला आणि अर्थव्यवस्था, ४) महिलाभिमुख अंदाजपत्रक, ५) राष्ट्रिय महिला सक्षमीकरण अभियान, ६) महिलांसाठी प्रशिक्षण, ७) महिलांसाठी रोजगार विषयक कार्यक्रम, ८) राष्ट्रिय महिला कोश, ९) उज्वला योजना, १०) स्वाधार गृहयोजना.[12]

**महिला सक्षमीकरणासाठी महिला विकास योजना :** शासन महिलांचे कल्याण व त्यांच्या विकासासाठी वेळोवेळी विकास कार्यक्रम व प्रकल्पांची आखणी व अंमलबजावणी करीत आहे. योजनांची व प्रकल्पांची कार्यवाही ही सरकारद्वारे प्रेरित आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, श्रम मंत्रालय, समाज कल्याण विभाग आणि ग्रामीण विकास मंत्रालयाकडून केली जात आहे. या सर्व योजना व प्रकल्प हे महिलांना आर्थिक आणि सामाजिक स्वरूपात स्वतंत्र बनविणे आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे, षिक्षण, तांत्रिकी आणि व्यवसाय प्रशिक्षणाची दषा व दिशेने प्रभावित झाले आहेत. सरकारद्वारे महिला विकासासंदर्भात सुरू करण्यात आलेल्या काही प्रमुख योजना पुढीलप्रमाणे, १) एकात्मिक बालविकास योजना, २) कस्तुरबा गांधी शिक्षण योजना, ३) स्त्री शक्ती पुरस्कार योजना, ४) महिला स्वाधार योजना, ५) राष्ट्रिय पोशाहार अभियान योजना, ६) जीवन भारतीय महिला सुरक्षा योजना, ७) जननी सुरक्षा योजना, ८) महिला स्वयंसिध्द योजना, ९) वंदे मातरम् योजना, १०) किशोरी सक्षमीकरणासाठी राजीव गांधी योजना, ११) माता आरोग्य कार्यक्रम, १२) जागरूकता निर्माण कार्यक्रम, १३) कुटुंब सल्ला केंद्र.[13]

वरील विविध योजनां महिलांच्या विकासासंदर्भात आहेत. कारण महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी या योजना षासनाने सुरू केलेल्या आहेत. या योजनांमुळे महिलांच्या सक्षमीकरणाला गती प्राप्त झाली आहे. तसेच महिलांमध्ये आत्मविश्वास दृढ झाला आहे.

**महिला सक्षमीकरणाचे घटक:** महिला सबलीकरणाच्या परिणामांचा अभ्यास करताना प्रामुख्याने आर्थिक सक्षमीकरण, शैक्षणिक सक्षमीकरण आणि राजकीय सक्षमीकरण या घटकांना प्राधान्य दिले आहे. ते घटक याप्रमाणे, आर्थिक सक्षमीकरण, महिला सक्षमीकरणाच्या घटकात आर्थिक घटक महत्त्वाचा आहे.

आज स्त्रिया विविध क्षेत्रात कार्य करीत आहेत. तसेच काही स्त्रिया उद्योग व्यवसाय करताना दिसत आहेत. राजकीय क्षेत्रातील महिला राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम सामाजिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या ही समर्थपणे पार पाडत आहेत. सामाजिक विकासाकडे नेणारी ही एक सक्षमीकरणाची प्रक्रिया आहे. स्त्रियांना स्वावलंबी बनविणे हे महिला सबलीकरणाचे महत्त्वाचे उद्दिष्टये आहे. महिला आर्थिकदृष्टया स्वावलंबी होणे ही केवळ त्यांच्या गरजेची बाब आहे, असे नाही तर कुटुंब आणि राष्ट्र यांच्या दृष्टिने आवश्यक आहे. आणि शैक्षणिक सबलीकरण महिलांच्या जीवनात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षणाला एक साधन मानले जाते शिक्षणामुळे स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि बौध्दिक शक्तीचा विकास होतो. शिक्षणामुळे समाजात बदल व विकास घडवून आणला जातो. या संदर्भानेच महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण हा घटक महत्त्वाचा ठरला आहे. तसेच राजकीय सक्षमीकरण, महिला सक्षमीकरणाच्या घटकात राजकीय घटकांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. राज्यघटनेमध्ये स्त्रियांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी विविध कलमांमध्ये तरतूद केली आहे. त्यामुळे स्त्री-पुरूष राजकीय समानता दिसून येते. आज ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा आणि लोकसभा इत्यादी क्षेत्रात स्त्रियांचे प्रतिनिधीत्त्व असलेले दिसत आहे. म्हणजेच महिलांचे राजकीय सक्षमीकरण होताना दिसत आहे.[14]

**महिला सक्षमीकरणाचे उपाय:** महिला सक्षमीकरणाच्या उपायाबद्दल विविध देशात सक्षमीकरणावर काम करणाऱ्या यंत्रणा, गट, यांच्यामध्ये मतभेद आहेत. एकाच देशातील सरकार व स्वंयसेवी संघटना यांच्या सक्षमीकरणाच्या दिशा सारख्या नाहीत. माक्सवादी, उदारमतवादी, ब्राह्मणी, अब्राह्मणी, पर्यावरणवादी महिला संघटनांचे अजेंडे वेगवेगळे आहेत. भारतीय महिला समाजाच्या भिन्नस्तरावर वेगवेगळया मानसिकतेत जगत असतात. त्यांच्या समस्या समान नसतात. या सर्वांचा विचार करून सक्षमीकरणासाठी ढोबळ आणि सूक्ष्म पध्दतीचे उपाय सुचवावे लागतील. ते उपाय याप्रमाणे, प्रबोधनात्मक उपायांमध्ये आत्मभान जागृती, समाज मानस बदलणे, रचनात्मक उपायांमध्ये निर्वाहाची साधने उपलब्ध होणे, मोफत शिक्षण व प्रशिक्षणाची संधी, महिला संगोपण-संरक्षण व सल्ला केंद्राची स्थापना, सहभागाची संधी, क्षमतावृध्दी व कौशल्य विकास, सहभागची संधी, कायदेविशयक माहिती आणि बचत गटाची माहिती इत्यादी, संघर्शात्मक उपायांमध्ये नवभांडवली विकासास विरोध, स्त्री छळवादाचा प्रतिबंध, बालमजूरीचे निर्मुलन, ग्राम विकास संघर्श आणि सत्ता सहभागाचा संघर्ष इत्यादी.[15] वरील सर्व सक्षमीकरणाच्या उपायांची फलश्रुती म्हणावी तेवढी दिसून येत नाही. जोपर्यंत महिला स्वतःच या प्रश्नासाठी संघटितपणे पेटून उठून लढा उभारणार नाहीत, तोपर्यंत सक्षमीकरणाचे परिणाम दिसून येणार नाहीत.

***संदर्भ :***


१. *तडकलकर नंदिनी, (२००८), 'महिला सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान', अल्फा पब्लिकेशन, नांदेड, पृ.क्र.५७.*
२. *हिंगोले रेखा, (२००६), 'महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय', इशा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.१, २.*
३. *म्हेत्रे स्मिता, (२०११), 'भारतीय स्त्री आणि मानवाधिकार', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ५५.*
४. *तडकलकर नंदिनी, (२००८), 'महिला सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान', अल्फा पब्लिकेशन, नांदेड, पृ.क्र.५७.*
५. *पाटील व्ही.बी., (२००८), 'मानवी हक्क', के.सागर प्रकाशन, पुणे, पृ.क्र.१२९.*
६. *हिंगोले रेखा, (२००६), 'महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय', इशा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.४.*
७. *बोधनकर सुधीर, अलोणी विवके, कुळकणी मृणाल, (२०१८), 'सामाजिक संशोधन पध्दती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.१२२.*
८. *हिंगोले रेखा, (२००६), 'महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय', इशा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.२१.*
९. *'समाजशास्त्रीय सिध्दांत खंड १, प्रकाशक - कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड, पृ. क्र. ९६.*
१०. *पवार दीपक, (२०१३), 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण', साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.४९.*
११. *म्हेत्रे स्मिता, (२०११), 'भारतीय स्त्री आणि मानवाधिकार', साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.५५.*
१२. *कित्ता, पृ.क्र.६८.*
१३. *'लोकराज्य', (मार्च २०१०), पृ.क्र.३६.*
१४. *पवार दीपक, (२०१३), 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण', साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. १०४.*
१५. *हिंगोले रेखा, (२००६), 'महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय', इशा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. १०९-१२८.*

# गोंधळी जमातीची उत्पत्ती

**डॉ. मधुकर जी. धुतुरे,** सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, कोल्हापूर

***सारांश :*** *महाराष्ट्रामध्ये लोककलावंतांच्या अनेक संस्था वर्षानुवर्षे आपले अस्तित्व टिकवून आहेत, अशा संस्थांपैकी गोंधळी लोककलावंतांची वैशिष्ट्यपूर्ण संस्था आजही समाजामध्ये आपला प्रभाव टिकवून आहे. कारण महाराष्ट्रामध्ये हिंदू धर्म मानणाऱ्या बहुतांश जातींमध्ये कुलाचार म्हणून देवीचा गोंधळ घालण्याची प्रथा आजही प्रचलित आहे. त्यामुळे अशा वैशिष्ट्यपूर्ण प्रथेची व गोंधळ पार पडणाऱ्या लोकसमूहाची प्राचीनता व उत्पत्ती जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला आहे. प्रस्तुत शोध निबंध प्रामुख्याने दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित असल्यामुळे संशोधकाने अर्थनिर्वचनाच्या माध्यमातून वर्णनात्मक स्वरुपाची मांडणी केली आहे. तसेच या मांडणीच्या आधारावर असा निष्कर्ष मांडला आहे की, गोंधळी जमातीला १२०० ते १३०० वर्षांचा प्रदीर्घ इतिहास लाभला असून गोंधळी जमात मूळची कर्नाटक राज्यातील आहे.*

*मुख्य शब्द: गोंधळी, प्राचीनता, उत्पत्ती*

**प्रस्तावना:** भारतीय समाजाला ५००० ते ६००० वर्षांचा प्रदीर्घ इतिहास लाभलेला आहे. भारतीय समाजव्यवस्थेचा प्रदीर्घ इतिहास जाणून घेतल्यास असे निदर्शनास येते की, आदिवासी व भटक्या जाती किंवा जमाती भारतीय समाजव्यवस्थेचा सर्वात प्राचीन समाजघटक आहेत. तसेच भारतीय समाजव्यवस्था विविध स्थित्यंतरामधून गेलेली दिसून येते, या स्थित्यंतरानुरूप समाजघटकांच्या जीवना मध्ये सुद्धा विविध परिवर्तने झाल्याचे स्पष्ट होते.

Report of National Commission for De-Notified, Nomadic and Semi Nomadic Tribes, Ministry of Social Justice & Empowerment, Government of India, 2017 नुसार महाराष्ट्रामध्ये आज १४ विमुक्त जाती व ३६ भटक्या जमाती आढळून येतात, या जातीजमातींमध्ये कमालीची सांस्कृतिक विविधता आढळून येते. या ३६ भटक्या जमातींपैकी गोंधळी ही जमात महाराष्ट्रात देवभक्त व गोंधळ हा धार्मिक विधी पार पडणारी जमात म्हणून प्रचलित आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राला लोककलेचा समृद्ध असा इतिहास लाभलेला आहे व हा इतिहास जपण्याचे कार्य गोंधळाच्या माध्यमातून गोंधळी जमातीकडून पिढ्यानपिढ्या केले जात आहे. प्रस्तुत संशोधन, अशा सांस्कृतिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आणि लोककलेचा वारसा जपणाऱ्या गोंधळी जमातीशी संबंधित आहे.

**संशोधनाचे उदिष्टे:** गोंधळी जमातीची प्राचीनता व उत्पत्ती जाणून घेणे हे प्रस्तुत संशोधनासाठी एकच उदिष्ट निश्चित करणयात आले आहे.

**संशोधन आराखडा:** प्रस्तुत शोध निबंध प्रामुख्याने दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित असल्यामुळे संशोधकाने अर्थनिर्वचनाच्या माध्यमातून वर्णनात्मक स्वरुपाची मांडणी केली आहे, त्यामुळे प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

**गोंधळ या शब्दाची उत्पत्ती:** गोंधळी जमातीची उत्पत्ती शोधण्यासाठी गोंधळ या देवीच्या उपासना प्रकाराची उत्पत्ती जाणून घेतल्यास गोंधळी जमातीच्या उत्पत्ती संदर्भात अनुमान काढणे व्यावहारिक होईल, त्यामुळे आणि गोंधळ उपासना प्रकारची उत्पत्ती जाणून घेणे महत्वाचे आहे.

महाराष्ट्रात वेळोवेळी देवीसमोर गोंधळ घालण्याची पद्धत फार जुनी आहे. गोंधळ हा देवीची स्तुती करण्याचा एक प्रकार होय. परंतु त्यात नकलाही करण्यात येत असल्यामुळे नाट्याचा पाया रचण्याचे कामही गोंधळाने केले आहे. आज सामान्य अर्थाने गोंधळ हा शब्द गडबड या अर्थी वापरला जातो. परंतु मुळचा अर्थ असा नाही. भारुड शब्दाचा अर्थ जसा बदलत गेला तशीच गोंधळ या शब्दाचीही स्थिती झाली आहे. हा शब्द कसा उत्पन्न झाला असावा याविषयी तर्क मांडण्यापूर्वी गोंधळ या शब्दच्या उत्पत्तीबाबत ज्या पौराणिक कथा प्रचलित आहेत त्या कथा जाणून घेण गरजेचे आहे.

सर्वप्रथम गोंधळ या उपासना प्रकारच्या उत्पत्तीचा संबंध हा देवादिदेव भगवान शिव यांच्याशी जोडण्यात आलेला आढळतो. "शिवपुराणाच्या रुद्रसंहिता, शतरुद्रसंहिता आणि कोटीरुद्रसंहिता या भागांमध्ये शंकराच्या अकरा रुद्रगणांचा उल्लेख दिसून येतो. वेदांमध्ये शंकराची विविध नावे आदळून येतात, परंतु शंकराचे रुद्र हे नाव सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. रुद्र म्हणजे दुःखाचा विनाश करण्यासाठी किंवा जगतकल्याणासाठी शत्रूचा संहार करण्यासाठी शंकराने जी विविध रूपे धारण केली त्या शंकराच्या अवतारांना रुद्र असे म्हणतात.

शिवपुराणानुसार शंकराचे कपाली, पिंगल, भीम विरुपाक्ष, विलोहित, शास्ता, अजपाद, अहिर्बुध्य, शंभू, चंड, आणि भव या अकरा रुद्रगणांचा उल्लेख आढळून येतो. "

"शंकराचे अकरा रुद्रगण प्रसिद्ध आहेत, त्यांनी मानिकार्निका नदीच्या तीरी शंकराची घोर तपशर्या केली. ही तपस्या पाहून भगवान शिव प्रसन्न झाले व त्यांनी रुद्रगणांना वर दिला आणि शंकरांनी त्यांना काही आभूषणे व शस्त्रे दिली. त्रिशूल, डमरू, सर्प, गजचर्म, गंगा, चंद्र, भस्म, रुद्राक्षमला इ. आभूषणांचा समावेश आहे. रुद्रगण मोठे भक्त म्हणून प्रसिद्ध आहेत व गण याचा अर्थ भक्त असा आहे. भक्तगण हा शब्द तर प्रसिद्ध आहे. भक्तांचा किंवा गणाचा समूह म्हणजे दल व या गणदलाने रूढ केलेला जो पूजेचा प्रकार तो गणदल असावा. गण + दल या शब्दाचे अपभ्रष्ट रूप गोंधल (गणदल गंदल - गोंदल गोंधल) हे होय. 'गण' या शब्दाबद्दल सामवेदात पुढील खुलासा आढळतो. मनाला व वाणीला गोचर असणारे जे दृश्य व अदृश्य विश्व ते 'ग' काररुपी आहे. मनोवाणीस जे संयोग वियोगात्मक आहे, ते जीवात्म परमात्म ऐक्यभाव रूप असून तेच 'ण' कार संज्ञेने ओळखले जाते. या दोन्ही तत्वाचा निर्देश गण या शब्दात होतो व त्याचा जो स्वामी किंवा ईश तो गणेश होय. मुद्रल पुराणाच्या गणेशकथामृताच्या अध्यायात शंकराने मनुस जो गणयोग' समजावून दिला, त्यात 'गण' शब्द याच अर्थी वापरला आहे. अर्थात 'गणाची स्तुति स्तोत्रे' म्हणजे संपूर्ण ज्ञात अज्ञात स्तुती होय. यावरून गोंधळाच्या प्रारंभी गण गाण्याची पद्धती आढळते, हे विचारात घेता ही कथा किती प्राचीन आहे हे समजते.

"गणाचा अर्थ वरीलप्रमाणे घेतला तर अशाप्रकारे गणाची भक्ती करणारे जे दल ते गणदल त्यालाच गण + दल गोंधळ अशी संज्ञा प्राप्त झाली असावी. या संदर्भात डॉ. अ. स. आकतेकर 'Rashtrakutas & Their Times' या ग्रंथात म्हणतात, "Their richer establishments used to have a set of musicians who used to play music at the time of worship". या ठिकाणी set of musicians या शब्दांनी वर्णन केलेल्या लोकांचे गणदलाशी साम्य आहे. त्याचप्रमाणे ओरिसातील खचिंग गावी मिळालेल्या भैरव मूर्तीच्या शेजारी जे दोन भक्तगण दाखविले आहेत त्यांचेही गोंधळी लोकांशी साम्य आहे. यावरून गण + दल = गोंधळ या तर्कास पुष्टी मिळते. हा तर्क केवळ शब्दसादृश्यतेमुळे केला नसून आज प्रचलित गोंधळाची जी अनुषंगिक अंगे आहेत. त्यावरून या तर्काला पुष्टी मिळते. अजूनही गोंधळात त्रिशूळ, डमरू, रुद्राक्षमला इ. साधने वापरण्यात येतात. गोंधळी लोक आज शंकराची स्तुती करत नसले तरी देवीची स्तुति करतात व तिला ज्ञात अज्ञात विश्वाची आदिजननी मानतात, यावरून गणाची प्रथा गोंधळात चालत आली असावी असे वाटते.

वरील मांडणीनुसार असे दिसून येते की, प्राचीन गणदल हे शंकराची उपासना करतात. तर गोंधळी लोक गोंधळात देवीची स्तुति करतात. गणदलाकडून पार पडल्या जाणाऱ्या या उपासनेत किंवा स्तुतिगायनात शंकराच्या ऐवजी देवीची उपासना का केली जाऊ लागली? या प्रश्नाचे उत्तर शोधणे गरजेचे आहे. कारण या प्रश्नाचे उत्तर शोधल्यानंतर शंकराच्या उपासनेतून देवीच्या गोंधळाची प्रथा उदयास आली या तर्कास पुष्टी मिळेल. या संदर्भात प्रा. डॉ. धोंडीराम वाडकर असे म्हणतात की, गण शंकराचे उपासक व त्यांचीच प्रथा गोंधळात चालत आली तर गोंधळात देवीची स्तुति का? याचा ऐतिहासिक दृष्टीने विचार करणे जरुरीचे आहे. गोंधळ घालणाऱ्या लोकांचा जेंव्हा एक वर्ग निर्माण झाला व हे लोक पिढ्यानपिढ्या गोंधळावरच आपली उपजीविका करू लागले तेंव्हा आपापल्या यजमानाच्या विशिष्ट मताप्रमाणे त्यांना निरनिराळ्या देवतांची स्तुति करावी लागे.

तसेच "सारे देव एकाच हरीची रूपे' असा भागवत धर्माचा संदेश संत लोकांना देत होते, म्हणून सर्वांनी कुठल्यातरी एकाच दैवताची भक्ती करायची, तर ज्या शक्तीविषयी काही मतभेद नव्हते ती शक्ती किंवा देवी उपासना देवता ठरविण्यात आली असावी. " तसेच भारतात चंडी, चामुंडा, दुर्गा या अनेक रूपाने देवीची किंवा आदिशक्तीच उपासना फार पूर्वीपासून लोकांनी मान्य केलेली आहे. महाभारतात श्रीकृष्णाची बहिण दुर्गा या देवीने महिषासुराचा वध केल्याची हकीकत वर्णिली जाते, तर दुसरीकडे दुर्गा देवीस शिवपत्नी समजून तिची आराधना केली जाते. थोडक्यात गोंधळ घालताना ज्या शक्तीविषयी तत्कालीन समाजात भेद आढळत नव्हते त्या शक्तिला किंवा आदिशक्तिला सर्वानुमते गोंधळाची उपासना शक्ति म्हणून मान्य करण्यात आले असावे, यातुन शंकराच्या ऐवजी आदिशक्तीच्या नावाने गोंधळ घालण्याची प्रथा समाजात रूढ झाली असावी.

वरील मांडणीवरुन या तर्कास पुष्टी मिळते की, गणदल म्हणजे देवाची भक्ती किंवा उपासना करणाऱ्यांचा समूह होय. गणदल या शब्दाच्या अपभ्रंशातून गोंधळ हा शब्द जन्मना आला असावा आणि पुढे पिढ्यानपिढ्या देवीची भक्ती किंवा उपासना करणारा समुदाय म्हणून गोंधळी जमातीला ओळखले जाऊ लागले.

**गोंधळी जमातीची प्राचीनता आणि उत्पत्ती:** कोणतीही जात किंवा जमात किती प्राचीन आहे? आणि त्या जात किंवा जमातीची उत्पत्ती कशी झाली? या प्रश्नांची उत्तरे शोधणे संशोधनाच्या दुष्टीने महत्वाचे असले तरी तितकेच कठीण आहे. कोणत्याही जात किंवा जमातीची प्राचीनता आणि उत्पत्ती सांगणे कठीण असल्यामुळे अशा प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी लिखित आणि मौखिक साहित्याचा आधार घ्यावाच लागतो. गोंधळी जमात किती प्राचीन आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी गोंधळ या उपासनाप्रकारचा किंवा धार्मिक विधीचा संदर्भ घेणे सोईस्कर होईल. कारण गोंधळ या उपसाना प्रकारापासूनच गोंधळी जमातीची उत्पत्ती झाली असावी असे मत बहुतांशी अभ्यासकांनी मांडलेले आढळते. "गोंधळाचा प्रकार दलितांपासून उच्चवर्णीयांपर्यंत सर्व समाजात पूर्वीही रूढ होता, आजही आहे. देवीची उपासना प्राचीन काळापासून आजपर्यंत अव्याहत चालू आहे.

गोंधळाची प्राचीनता सांगताना तुळजापूरचा पोतराज आपल्या गोंधळात म्हणतो, (तुळजापूरच्या गोंधळी लोकांना पोतराज म्हणतात)

*'मंगळवारा दिवशी कर्णा वाजतो सोन्याचा।*
*नौबत झडतो देवीचा राज्य करी अंबिका,*
*शिरी अब तुरा मोत्याचा ||*
*खंडखंडसे भगत येत्यात आंबापायासी ।*
*नवलाखीची वेणी बाईला, नथ अब शाशी,*
*चौरी न अद्रिरी वरती कदंबरायाची ||*
*या देवळामध्ये पूजा होते भोळ्या भगताची /*
*पाव मिळेना पैसा मिळेना बाटन योगाची।।*
*वेगळ्यामध्ये दुन्हेड पेटा हलगड सोन्याची ||*

वरील पोतराजाच्या गोंधळात कदंब घराण्याचा उल्लेख आढळतो. या संदर्भात प्रा. डॉ. धोंडीराम वाडकर यांनी असे मत मांडलेले आहे की, "देवीच्या पूजेला कदंब घराणे स्वतः आले होते. अभ्यासकांच्या मते, कदंब घराण्यात इ. स. ५३८ मध्ये मृगेश व भानू हे राजे होऊन गेले आणि ६ व्या शतकापासून कदंब घराण्याने तुळजाभवानी हे कुलदैवत मानले. कदंब हे कर्नाटकचे राजे होते, त्यांच्या राज्यात पूर्वी तुळजापूरचा समावेश होता. तुळजापूरच्या महोत्सवात ते भाग घेत असत. या सर्व पुराव्यावरून गोंधळ या उपासना प्राचीनता सिद्ध होण्यास मदत मिळते.

गोंधळाची प्राचीनता याबाबत विचार करताना असे आढळते की, "इसवी सणाच्या ११ व १२ व्या शतकात महाराष्ट्रात व कर्नाटकच्या बहुतांश भागावर कल्याणीच्या चालुक्यांचे वर्चस्व होते. त्यात विक्रमादित्य सहावा या पराक्रमी राजाने इ. स. १०७६ ते ११२६ म्हणजे जवळपास ५० वर्ष राज्यकारभार केला, त्यानंतर

भूलोकमल्ल सोमेश्वर तृतीय याने इ. स. ११३८ पर्यंत राज्यकारभार केला".[7] भूलोकमल्ल सोमेश्वर तृतीय याने गोंडली नृत्य करविल्याचा उल्लेख आढळतो. सोमेश्वर तृतीय याच्या कारकीर्दीनंतर जवळपास १०० वर्षांनी जयणाने 'नृत्यरत्नावली' हा ग्रंथ लिहिला. यासंदर्भात गोंधळ या कुलाचाराची प्राचीनता स्पष्ट करताना डॉ. प्रभाकर मांडे यांनी असे मत मांडले आहे की, "गोंधळ आणि गोंधळयाच्या गाण्यांची तसेच नृत्यनाटकांची परंपरा प्राचीन काळापासून महाराष्ट्रात प्रचलित आहे. जयणाने त्याच्या 'नृत्यरत्नावली' या ग्रंथात गोंडली नृत्याचा उल्लेख केला आहे. इ. स. १२४० च्या सुमारास लिहलेल्या या ग्रंथात त्याने असे म्हटले आहे की, 'कल्याणीचा राजा तृतीय सोमेश्वर याने कल्याणीमध्ये भूमातृमहोत्सवाच्या निमित्ताने गोंडली नृत्य करविले होते. महाराष्ट्रात ते गोंडली' या नावाने प्रसिद्ध होते व सोमेश्वाराने त्यात सुधारणा करून त्याला 'चित्रगोंडली' हे नाव दिले. "डॉ. रा. चि. ढेरे यांनी महाराष्ट्रात देवीच्या उपासनेत रूढ असलेल्या गोंधळाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते भूतमातेच्या उत्सवातील गोंडली नृत्यातून गोंधळाची परंपरा उदयास आली असावी. नृत्यरत्नावली नावाचा ग्रंथ प्राचीन ग्रंथ आहे. हा ग्रंथ वरंगळचा राजा गणपती काकतीय यांच्या गजदलप्रमुखाने इ. स. १२४० मध्ये रचला त्याचे नाव जयण अथवा जयसेनापती असे होते. त्यांनी आपल्या ग्रंथात अशी माहिती दिली आहे. की, कल्याणीचा राजा तृतीय सोमेश्वर याने त्याच्या कल्याणी नावाच्या राजधानीत भूतमातृमहोत्सवाच्या निमित्ताने गोंडली नृत्य करविले होते. महाराष्ट्रात गोंडली या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नृत्यात काही सुधारणा करून सोमेश्वाराने त्यास चित्रगोंडली असे नाव दिले. जायनाने उल्लेख केलेले गोंडली नृत्य म्हणजे आजच्या गोंधळाचे प्राचीन रूप होय".

वरील मांडणीवरून असे लक्षात येते की, गोंधळ या देवीच्या उपासना प्रकाराला जवळपास १२०० ते १३०० वर्षांचा प्रदीर्घ इतिहास लाभलेला आहे. त्याचबरोबर गोंधळ या धार्मिक विधीवरूनच गोंधळी लोकांचा समूह समाजात प्रचलित झाला असावा असा तर्क मांडला जातो. या संदर्भात पिपल्स ऑफ महाराष्ट्र, अन्थ्रोपोलोजीकल सर्व्हे ऑफ इंडिया, खंड ३०, भाग एक मध्ये असे नमूद केले आहे की, "गोंधळी हे नाव गोंधळ या शब्दापासून घेण्यात आलेले आहे. या वरून हे सिद्ध होण्यास मदत

मिळते की, गोंधळ या उपासना प्रकारातूनच गोंधळी लोकसमूहाची उत्पत्ती झाली असावी.

गोंधळी जमातीची उत्पत्ती गोंधळ या नृत्य, गायन आणि देवीच्या उपासना प्रकारातून झालेली आहे, असे मत विविध अभ्यासकांनी मांडलेले आहे. परंतु गोंधळ घालण्यासाठी फक्त गोंधळी जमातीत जन्माला येणे पुरेसे नाही तर गोंधळ घालण्यासाठी मान्यता मिळविण्यासाठी एक धार्मिक विधी पूर्ण करावा लागतो या संदर्भात प्रा. डॉ. धोंडीराम वाडकर असे म्हणतात की, गोंधळावरूनच गोंधळी जात निर्माण झाली. पण देवीच्या नावाने गोंधळ घालण्यासाठी केवळ त्या जातीत जन्म घेवून भागात नाही तर गोंधळी होण्याची एक विधीपूर्वक दीक्षा दिली जाते. दिक्षार्थी गोंधळयाच्या गळयात पाच विवाहित पुरुष कवड्यांची माळ घालतात. अशा माळा घालून दीक्षा दिल्यानंतर त्याला यजमानाच्या घरी गोंधळाचा कुलाचार पार पडण्याचा अधिकार मिळतो. यावरून कुला जन्मलेले सर्वच गोंधळी या नावाने ओळखले जात असले तरी ते सर्व देवीचे उपासक नसतात.

**चर्चा:** वरील मांडणीवरुन हे स्पष्ट होण्यास मदत मिळते की, गोंडली' हे प्राचीन नृत्य मुळचे कर्नाटकातील असून, ही नृत्यकला १२०० ते १३०० वर्ष प्राचीन आहे. तसेच गोंडली या नृत्याप्रकारावरूनच गोंधळ या धार्मिक विधीचा जन्म झाला असावा आणि हा धर्मिक विधी महाराष्ट्रात प्रचलित झाला असावा असा तर्क संशोधकास व्यावहारिक वाटतो. त्याचबरोबर गोंडली किंवा गोंधळी या नृत्य आणि उपसानाप्रकारातूनच गोंधळ सादर करणाऱ्या लोकांचा समूह निर्माण झाला असावा व विविध कारणांनी हा समूह स्थलांतर करून विविध ठिकाणी पोहचला व या लोकसमूहाने गोंडली नृत्य आपल्याबरोबर आणले. गोंडली या नृत्याप्रकारात कालानुरूप बदल होवून महाराष्ट्रात गोंधळ घालण्याची प्रथा प्रचलित झाली असावी.

**निष्कर्ष:** लेखी दस्तऐवजांच्या व पुराव्यांच्या आधारे हे स्पष्ट होते की, गोंडली नृत्य हा फार प्राचीन नृत्यप्रकार असून गोंडली नृत्याची सर्वप्रथम नोंद कर्नाटक राज्यात आढळून येते. त्यामुळे हे स्पष्ट होते की, गोंडली नृत्याचा जन्म कर्नाटकात झाला आहे व गोंधळी या जमातीचे मूळ हे कर्नाटकात आहे. कालानुरूप गोंधळी जमातीच्या स्थलांतरणाच्या परिमाणस्वरूप, गोंधळी जमात महाराष्ट्रात पसरत गेली व गोंडली नृत्याचे रुपांतरण गोंधळ या धार्मिक विधीमध्ये झाले.

***संदर्भ :***


१. *m-patrika-com.cdn.ampproject.org*
२. *वाडकर, धौंडीराम: गोधळयांचे लोकसाहित्य, २००८, पृ. क्र. १६ १७*
३. *Gazetteer of India, Maharashtra State, Ahmednagar District, Second Edition १९७६, पृ. क्र. २३८*
४. *वाडकर, धोडीराम: गोधळयाचे लोकसाहित्य, २००८, पृ. क्र. १८*
५. *तत्रैव पृ. क्र. ६८*
६. *वाडकर, धोडीराम: गोपळयाचे लोकसाहित्य, २००८ पृ. क्र. १९*
७. *htpps://baraigad.com/blog/dharmapurichya-itihasavar-navyane-prakash*
८. *मांडे, प्रभाकर, लोकगायकाची परंपरा, पृ. क्र. ९२ " देखणे, रामचंद्रः गोधळ परंपरा आणि अविष्कार, प्रथम आवृत्ती २००५, पृ. क्र. २३*
९. *Peoples of Maharashtra, Anthropological Survey of India, Volume XXX, Part One, २००४ पृ. क्र. ७२२*
१०. *वाडकर, धोडीराम गोंधळयाचे लोकसाहित्य, २००८, पृ. क्र. २८*

# भटक्या जमातीचे प्रश्न आणि समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन.

***डॉ. प्रभाकर गायकवाड**, शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहारा, जि. उस्मानाबाद. मो. ७७०९२७७६५५.*

***सारांश :** देशातील कोटय़वधी भटक्या, विमुक्त जाती-जमातीची कुटुंबे स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपल्या न्याय हक्कापासून वंचित आहेत. घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारानुसार अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार यापासून या जाती-जमाती आजही वंचित आहेत. महाराष्ट्र सरकारने भटक्या विमुक्तांच्या विकासासाठी जे कार्य केले ते देशामध्ये इतर दुस-या कुठल्याही सरकारने केले नाही. भटक्या विमुक्तांसाठी स्व. वसंतराव नाईक, ज्येष्ठ नेते शरद पवार व स्व. गोपीनाथ मुंडे यांनी केलेले काम कोणीही विसरू शकणार नाही. भटक्या विमुक्तांसाठीच्या रेणके आयोगाचा अहवाल जर कायमस्वरूपी लागू झाला असता तर ख-या अर्थाने सामाजिक, राजकीय, आर्थिक स्वातंत्र्य मिळून घटनात्मक संरक्षण या जाती-जमातीला मिळाले असते. ब्रिटिश राजवटीत काही विमुक्त जाती-जमाती या गुन्हेगारी जाती म्हणून ओळखल्या जात होत्या. त्यासाठी १८७१चा गुन्हेगारी जाती कायदा ब्रिटिश काळात काही प्रांतात लागू होता. या कायद्यांतर्गत गुन्हेगारीच्या कारणावरून विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या लोकांना कारागृहात बंदिस्त करण्यात आले होते. ब्रिटिश सरकारने गुन्हेगारी करणा-या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी सन १९२४चा पुनर्वसन कायदा जाहीर केला होता. त्या अनुषंगाने महाराष्ट्रामध्ये पुणे, सोलापूर, अहमदनगर या ठिकाणी पुनर्वसन केंद्रे सुरू करण्यात आली होती. या जाती-जमाती अतिशय मागासलेल्या असून अजूनही त्यांचा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकास होऊ शकलेला नाही. विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या घटकांना केंद्र शासनाच्या सोयीसुविधा, आरक्षणाचा लाभ केंद्राने लागू केलेला नाही. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने १९६१ साली विमुक्त जाती, भटक्या जमातीचा अभ्यास करण्यासाठी 'घाडे समिती' गठीत केली होती. सदर समितीच्या अहवालानुसार राज्यात विमुक्त जातींमधील मूळ १४ आणि भटक्या जमातींमधील मूळ २८ जाती अतिशय भिन्न असून त्यांना सतत पोट भरण्यासाठी भटकावे लागले आहे. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या घटकांकडून सतत शासनाकडे मागणी करण्यात येत आहे. पूर्वाश्रमीचे अस्पृश्य आणि सर्व दृष्टीने मागास असूनही भटक्या विमुक्तांना महाराष्ट्रात केंद्राच्या आस्थापनांमध्ये आरक्षणाच्या सवलती मिळत नाही. यासाठी दोन वेळा आयोग नेमूनही भटक्या विमुक्तांच्या स्थितीत फरक पडला नाही. आजही ५४ टक्के भटके विमुक्त स्वतंत्र तांडे, वाडय़ा, वस्त्या, पालात गावकुसाबाहेर राहतात.*

***महत्वाचे शब्द :** मूलभूत अधिकार, घटनात्मक, गुन्हेगारी, ब्रिटिश सरकार, पुनर्वसन, आयोग, तांडे इत्यादी.*

**प्रस्तावना :** गोसावी, वैदु, घिसाडी, बंजारा, मसान जोगी, अशा या भटक्या वर्गात येणाऱ्या जमाती पालात, रस्त्याच्या बाजूला कधी फुटपाथवर तर कधी कच्चा पक्क्या घरात आपल्या दैनंदिन मुलभुत प्रश्नाबरोबर हेलकावे खात आहेत. या पार्श्वभूमीवर सरकार जेव्हा 'सी.ए.ए' सारखा कायदा अंमलात आणु पाहत आहे. तेव्हा त्यांनी आम्हा भटक्या विमुक्तांना डिटेंशन कॅंपमध्ये जाण्यासाठी ग्राह्यच धरले आहे हे स्पष्ट आहे. जो समुदाय अनेक प्रश्नांमध्ये हळूहळू स्वतःची ताकद हरवत चालला आहे, तो समुदाय स्वतःचे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी कागदपत्र सादर करेल? ही अपेक्षा ठेवणे म्हणजेच एक घाणेरडा विनोद केल्यासारखे आहे. १८७१ मध्ये इंग्रजांविरुद्ध बंड करून आवाज उठवणाऱ्या भटक्या विमुक्तांच्या जमातींची ब्रिटीशांकडून मुस्कटदाबी केली गेली. दबाव तंत्र वापरून स्थलांतर लादण्यात आले, गुन्हेगारीचा ठप्पा लाऊन मनसोक्त पिळवटून काढण्यात आले. ब्रिटीशांसोबतच येथील मनुवादी अजगराने देखील गिळंकृत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या मातिशी घट्ट नाते असणाऱ्या या भटक्या विमुक्त समुदायाकडे हिंदुत्वाचे संक्रमण देखील करण्यात आले. ज्या जमातींचा मुळचा कोणताच धर्म नाही, निसर्ग हाच ज्यांच्या धर्म, मातृसत्ता हीच त्यांची मान्यता, अशा या जमातीमध्ये धर्म आणि कर्मकांडाचे विष पेरण्यात आले. स्वाभिमानी जमातींना देशोधडीला लावण्यात आले. ऐतिहासिक, सांस्कृतिक, आर्थिक सामाजिक या सर्वच अंगाने शोषण झालेल्या या जमातीस बाबासाहेबांनी १९५२ मध्ये गुन्हेगारीचा कलंक मुळापासून उपटुन काढत कायदेशीर तरतुद करत खरे स्वातंत्र्य बहाल केले. मात्र शोकांतिका ही, की यावर अंमल करणारी सत्ताधारी डोकी मात्र भटक्या विमुक्तांसाठी कमकुवत ठरली. १८७१ पासून आज २०२० पर्यन्त म्हणजे साधारण १५० वर्षाच्या कालखंडात खुप असा अमुलाग्र बदल झाला नाही. दिल्लीमध्ये एचआरएलएन (HRLN) आणि गाड़िया लोहार संघर्ष समितीच्या रिपोर्टनुसार ९९ टक्के लोकांकडे जात प्रमाणपत्र नाही. त्यामुळे आरक्षण आणि पर्यायी संधी सुविधा कितपत पोहचते याची प्रचिती येईल. नॅशनल

कमीशन ऑफ़ एन टी / डीएनटी, सेमि एनटी यानी केलेल्या रिपोर्ट नुसार भटक्या विमुक्तांची गणनाच योग्य नाही. त्यांची वर्गवारीच शंकास्पद आहे. त्यामुळे आरोग्य, शिक्षण, सेवा, नोकरी या घटकांपर्यंत तुटपुंज्या प्रमाणात पोहचतात. त्यांनी आपली कागदपत्रे कुठून आणायची?

काही जमातींची गुन्हेगार जमाती म्हणून शासकीय स्तरावर नोंद करण्याची व त्या अनुषंगाने त्यांना वागणूक देण्याच्या प्रथेची सुरूवात ब्रिटिश अमदानीच्या सुरूवातीच्या कालखंडात १७९३ साली निर्माण केलेल्या 'रेग्युरलेशन २६' या अधिनियमाने झाली. याचे पुढे रूपांतर ठगी व डकॉइटी खात्याच्या निर्मितीत झाले. १८६० साली भारतीय दंड संहिता (इंडियन पीनल कोड) अंमलात आली. पुढे १८७१ मध्ये गुन्हेगार जमाती कायदा (क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट) करण्यात आला व या कायद्याचे १९२४ सालच्या गुन्हेगार जमाती केंद्रीय अधिनियम (क्रिमिनल ट्राइब्ज सेंट्रल ॲक्ट) या कायद्यात रूपांतर झाले. हा कायदा १९५२ पर्यत अंमलात होता. तो ३१ ऑगस्ट १९५२ रोजी रद्द करण्यात आला व आतापर्यत गुन्हेगार जमाती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जाति-जमातींना विमुक्त जाति-जमाती या संज्ञेने ओळखण्यात येऊ लागले. गुन्हेगार जमाती म्हणून नोंदणी झालेल्या जाति-जमातींची लोकसंख्या १९२५ साली ४० लाखांच्या आसपास होती. १९४९ साली या वर्गाची लोकसंख्या २२, ६८, ००० एवढी होती व यात एकूण १२७ सामाजिक गटांचा अंतर्भाव झाला होता. अनुसूचित जाती व जमातींखेरीज अन्य जातींची नोंद जनगणनेच्या वेळी न करण्याच्या शासकीय निर्णयामुळे १९५१ नंतर या वर्गाची निराळी लोकसंख्या जनगणना अहवालात उपलब्ध नाही. १९५१ साली या वर्गाची लोकसंख्या २४,६४,००० एवढी होती. महाराष्ट्रात १९८६ च्या शासकीय परिपत्रकानुसार २८ भटक्या जमाती व १४ विमुक्त जाती आहेत. बेरड, बेस्तर, भामटा, रामोशी, वडार, वाघरी व छप्परबंद या १४ विमुक्त जाती होत. भटक्या जमातींच्या गोटात गोसावी, बेलदार, भराडी, भुते, चित्रकथी, गारूडी, घिसाडी, गोंधळी, गोपाळ जोशी, कोल्हाटी, नंदीवाले, पांगुळ, वासुदेव, बहुरूपी या काही प्रमुख जाती आहेत. एखाद्या जमातीची वंशपरंपरेने गुन्हेगार म्हणून नोंद करावयाचा प्रघात शासकीय तसेच सर्वसामान्यांच्या दृष्टीने पडला असला, तरी मुळात गुन्हेगार जमाती कशा निर्माण झाल्या, याबद्दल विविध मतप्रवाह आढळतात. भारताचे आदिवासी म्हणून गणल्या गेलेल्या वन्य जमातींचे ते वंशज आहेत, असे काहींचे म्हणणे दिसते. मानवशास्त्राच्या दृष्टीने गुन्हेगार जमातींमध्ये काही आदिवासी मानववंशांची लक्षणे दिसत असली, तरी त्यांच्यात अनेक मानववंशांचे मिश्रण झाले असावे, असेही म्हटले जाते. आदिवासी जमातींपैकी काही टोळ्या एका ठिकाणी स्थिर होऊन राहत नसत. तर अन्न शोधण्याकरिता रानावनांत भटकत असत. रानातील जनावरांची शिकार करणे अगर वृक्षवल्लींमधून खाद्य शोधणे यांवर त्यांचा उदरनिर्वाह होत असे. इंग्रज राजवटीत अंमलात आलेल्या जंगल –कायद्यामुळे या वनचर आदिवासींच्या मुक्त संचारावर बंधने आली. त्यामुळे अगतिक होऊन लहानमोठ्या चोऱ्या करणे, दरोडा घालणे, वाटमारी करणे यांच्याच आश्रयाने त्यांना जगावे लागले. गावगाड्याच्या चाकोरीत बसेल आणि गावकऱ्यांच्या गरजा भागवून प्रामाणिक जीवन जगता येईल, असा कोणताच व्यवसाय त्यांना लाभला नाही, अगर ते पतकरू शकले नाहीत. त्यांच्या वंशजांनाही हेच जीवन जगावे लागले आणि कालक्रमाने त्यांच्या गुन्हेगार जमाती बनल्या, असेही काहींचे मत आहे.

**संशोधनाचे उद्देश** : १. भटक्या जमातीच्या सामाजिक जीवनाचा ऐतेहासिक आढावा घेणे. २. भटक्या जमातीच्या वर्तमानकाळातील सामाजिक जीवनाचे अध्ययन करणे. ३. भटक्या जमातीच्या प्रश्न आणि समस्या यांचे सामाजिक दृष्टिकोनातून अध्ययन करणे. ४. भटक्या विमुक्त जमातीच्या सामाजिक अडचणींचे व अडथळयांची चर्चा करणे.

**भटक्या जमातीचे प्रश्न आणि आव्हाने** : पूर्वीच्या काही भटक्या अवस्थेतील जमाती आज शेती, मोलमजुरी करून ठिकठिकाणी स्थायिक झालेल्या दिसून येतात. त्यांची गणना अजूनपर्यत गुन्हेगार म्हणून झालेली नाही. अशा जमातींमध्ये उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल येथे राहणारे आणि ब्राह्मणांचे पौरोहित्य स्वाकारून (कनिष्ठ दर्जाचे ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात) हिंदू धर्माच्या छायेत आलेले बहेलिया व सतलज नदीच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये राहणारे महतम किवा बुंदेलखंडाच्या परिसरात राहणारे सहारिया अगर ओरिसाच्या डोंगराळ भागात राहणारे शबर (संस्कृत साहित्यातून पूर्वी यांचा उल्लेख 'शबर' या नावाने केला आहे) वा सावरा हे लोक येतात. वेगवेगळया प्रदेशांतील सावरांच्या देवदेवता व धार्मिक आचारविधी यांत फरक आढळतो. ओरिसातील सावरा धार्मिक विधी ब्राह्मणाला न बोलावता स्वतंत्रपणे पार पाडतात. मात्र बंगालमधील सावरा हे देवदेवतांच्या पूजेसाठी ब्राह्मण पुरोहितांची मदत घेतात. काही सावरांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे. डोंबाऱ्याचे खेळ, जादूचे खेळ, भविष्य कथन, किरकोळ व्यापार, कारागिरी व वैद्यकी व्यवसायही भटके लोक करतात. सतत भटकणाऱ्या समूहांव्यतिरिक्त काही समूह हे 'अर्ध-भटके'

जीवन जगतात. अशा समूहांजवळ स्वतःचे घर किंवा थोडीफार शेतजमीन असते. शेतीचा हंगाम संपल्यानंतर जेथे उदरनिर्वाहाकरिता लागवडीला योग्य अशी जमीन उपलब्ध असेल, तेथे कुटुंबियांसह आणि आवश्यक सामानासह ते स्थलांतर करतात व हंगाम संपल्यानंतर आपल्या मूळ ठिकाणी परत येतात. उत्पादक' स्वरूपाचे काम करणारे भटके गुरे आणि गुरांपासून मिळणारी उत्पादने (लोकर, हाडे, कातडी इ.), तसेच गुरांची विक्री किंवा त्यांची देवाण-घेवाण (अदलाबदल) यांवर आपली गुजराण करतात. गुरांना चरण्यासाठी आवश्यक असलेल्या कुरणांच्या शोधात ते भटकत असतात. एका कुरणातील गवत संपले की दुसऱ्या कुरणाकडे ते वाटचाल करतात. हे भटके हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश या राज्यांतील भरपूर कुरणांच्या प्रदेशात आढळून येतात. 'चांगपास' आणि 'बाकरवाल' ही त्यांची ठळक उदाहरणे देता येतील. त्याचप्रमाणे शिकार, मासेमारी, औषधी वनस्पती आणि कंदमुळे गोळा करणे यांपासून त्यांना उत्पन्न मिळते. सेवाकर्म' करणारे भटके हे धान्य, मीठ आणि इतर वस्तू ज्याठिकाणी स्वस्त उपलब्ध असतील तेथून खरेदी करतात आणि ज्याठिकाणी त्या वस्तू दुर्मिळ असतील तेथे थोडाफार नफा घेऊन विकतात. तसेच दोर/चटया तयार करणे आणि विकणे, औषधे विकणे, लोहारकाम करणे, मोलमजुरी करणे, चाकू, सुरी, कात्री यांना धार लावणे इ. कामेही ते करतात. हे भटके लोक भारतात बंजारा, लमाण, बेलदार, गाडुला, घिसाडी-लोहार, शिकलगार म्हणून परिचित आहेत.

कर्नाकातील बुडुबुडीकी, गोंधळी आणि जोशी घरोघरी जाऊन भविष्यकथन, मदारी सर्पाचा खेळ, डोंबारी तारेवरची कसरत, नंदीवाले बैलांचा खेळ आणि काही जादूचे प्रयोग करतात. या मार्गांनी लोकांची करमणूक करणारे भटके लोक, उत्पादक व सेवाकर्म करणाऱ्या भटक्यांहून भिन्न असून त्यांपैकी कालबेलिया आणि जोगी हे सर्पांचा खेळ करून पोट भरणारे आहेत. या लोकांना पूर्वी गावोगावी अन्नधान्य, जुने कपडे इत्यादी मोबदला म्हणून मिळत असे. हिंदू धर्मातील पाप-पुण्य या संकल्पनांवर त्यांचा विश्वास दिसून येतो. लग्नविधीही हिंदू धर्मीयांप्रमाणेच कमी-अधिक प्रमाणात असतात. राजा व राज्यसत्ता यांनी अंगीकारलेल्या धर्माचा प्रभावही काही भटक्या जमातींवर झालेला दिसून येतो. उदा. काश्मीर आणि हिमाचल प्रदेशातील 'गुज्जर'सारख्या काही भटक्या जमातींनी इस्लाम धर्म स्वीकारला. भारतातील भटक्या जमातींमध्ये मुख्यत्वे पितृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात असून एक पत्नीत्वाची प्रथा रूढ आहे. मुसलमान भटके वगळता इतर भटक्यांमध्ये हिंदू विवाहपद्धती रूढ आहे, पण गांधर्व विवाह व वधुवरांच्या इच्छेनुसार जोडीदाराची निवड करता येत नाही. विधवा विवाह, घटस्फोट आणि विभक्त कुटुंबपद्धती या गोष्टींनाही काही भटक्या जमातीत परवानगी दिली जात नाही. आधुनिकरणाचा गावगाडयावर जसा परिणाम झाला तसा भटक्या जमातींवरही झालेला दिसून येतो. जसे की, औद्योगिकीकरणासाठी जंगलतोड करून जागा उपलब्ध करून देण्यात आली. जंगलतोडीमुळे गवताची कुरणे नष्ट होण्याच्या मार्गावर लागली. जळणासाठी जंगलतोड होऊ लागली व गर्द झाडाझुडपांनी व्यापलेले रानोमाळ रूक्ष दिसू लागले. या सर्वांचा भटक्यांच्या व्यवसायावर परिणाम होणे अपरिहार्य होते.

गुरांना चरण्यासाठी लागणारी कुरणे अपुरी पडू लागल्यामुळे गुरांचे कळप बाळगणे कठीण होऊ लागले. गुरांपासून मिळणारी उत्पादनेही थंडावली. जंगलात लागवडीखाली असणाऱ्या जमिनीबाबत बंधने आली. म्हणून भटक्यांना जमिनी कसणेही दुरापास्त होऊ लागले. परिणामी भटके व्यवसायहीन होऊन मोलमजुरी किंवा टाकाऊ उद्योग करू लागले तर काही भीक मागून जीवन जगू लागले. एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी भटकंती करणाऱ्या भटक्या जमातीतील लोकांना 'स्वतःचे ओळखपत्र' तयार करण्यात देखील असंख्य अडचणींचा सामना करावा लागतो. साधे आधार कार्ड/रेशन कार्ड बनवायला देखील दलालांच्या गर्दीत हजारो रुपये मोजावे लागतात, हेही तितकेच खरे आहे.एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी भटकंती करणाऱ्या भटक्या जमातीतील लोकांना 'स्वतःचे ओळखपत्र' तयार करण्यात देखील असंख्य अडचणींचा सामना करावा लागतो. साधे आधार कार्ड/रेशन कार्ड बनवायला देखील दलालांच्या गर्दीत हजारो रुपये मोजावे लागतात, हेही तितकेच खरे आहे. भारतीय जिप्सीना बंजारा किंवा वंजारा, खानाबदोश, लोक, घुमांतु, तांडा अशी अनेक नावे आहेत. अनुसूचित जमाती/विमुक्त जातींपैकी काही जमाती अशा आहेत की त्या आपला उदरनिर्वाह करण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करून भटके जीवन जगत असतात.

देशात जवळपास ५०० भटक्या-निम्न भटक्या जमातींची संख्या सुमारे १०० दशलक्ष (रेणके अहवाल २००८) इतकी आहे. त्यापैकी ४२ जमाती महाराष्ट्रात आहेत. यातील पारधी व भिल्ल जमातींचा अनुसूचित जमातींमध्ये समावेश करण्यात आला आहे. देशामध्ये एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात भटक्या जमातींची लोकसंख्या १० कोटींपेक्षा जास्त आहे. या जमातींच्या लोकांना अद्यापही कायम उत्पन्नाचे किंवा रोजगाराचे

साधन नाही. त्यांच्यामध्ये शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक मागासलेपण मोठ्या प्रमाणात दिसून येते. विमुक्त जमातीचे लोकही गावोगाव फिरून आपला उदरनिर्वाह करतात. गाढव, घोडे, तट्टू, बैलगाडी यांच्यावर आपला संसार लादून, त्यांच्या जीवनाचे चक्र चालू असते. वर्षातील आठ महिने फिरून पावसाळयाच्या दिवसांपुरते कोणत्यातरी गावात हे लोक स्थायिक होतात. हंगाम सुरू झाला की पुन्हा त्यांच्या भ्रमंतीला सुरुवात करतात. आता काळाच्या ओघात अनेक भटक्या जमातींनी आपले पूर्वीचे व्यवसाय सोडून दिलेले आहेत. त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी भटके लोक आता नव्या नव्या व्यवसायांकडे वळले आहेत. पण त्यातही त्यांना खूप मोठ्या प्रमाणावर संघर्ष करावा लागत आहे. भटक्या-विमुक्त जमातींच्या 'जातपंचायती' आज लुप्त झालेल्या आहेत. या जमातीचे लोक बहुभाषिक असतात. समाजात सर्वत्र संचार असल्याने त्यांना आपली मूळ भाषा सोडून इतर दोन-तीन भाषा सहजपणाने बोलता येतात. आधुनिकरणाचा भटक्यांच्या आचारविचारांवर मात्र अद्याप परिणाम झालेला नाही. अलिप्तपणामुळे त्यांच्यात मागासलेपणा दिसून येतो.

**निष्कर्ष :** १. कायम स्थलांतर करणारी व गुन्हेगार असणारी जमात म्हणून भटक्या जमातीवर शिक्का पडलेला असल्याचे दिसते. २. भटक्या जमातीला सामाजिक जीवनात मोठ्या कष्ट व संघर्षाला सामोरे जावे लागत असल्याचे दिसते. ३. भटकी जमात ही सामाजिक, आर्थिक मागास असल्याचे दिसते. ४. आजही भटक्या जमातीला अनेक प्रश्नांना व समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने त्यांच्या मानवाधिकार वर गदा येत असल्याचे दिसते. ५. विकासाच्या प्रक्रियेपासून भटक्या जमाती आजही मोठ्या प्रमाणात दूर असल्याचे दिसते.

***संदर्भ :***


1. *Government of India, Report of the Backward Classes Commission, Vol. I, New Delhi, 1982.*
2. *Majumdar, D. N. Races and Cultures of India, Bombay, 1961.*
3. *Russell, R. V. Hira Lal, Rai Bahadur, The Tribes and Castes of the Central provinces of India, Vols. 4,Delhi, 1975.*
4. *Singh. K. S. People of India, Calcutta, 1992.*
5. *चव्हाण रामनाथ, भटक्या विमुक्तांचे अंतरंग, पुणे, १९८९.*
6. *दैनिक लोकसत्ता २०२१.*

# संविधानात्मक तरतुदी आणि आदिवासी महिलांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन

**डॉ. रिटा मालचे,** *सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ ritasociology85@yahoo.com*

**प्रस्तावना:** प्रस्तुत शोध निबंध संविधानात्मक तरतुदी आणि आदिवासी समाजातील महिलांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन यावर लक्ष केंद्रित करते. महिला आणि पुरुषांमध्ये समानता प्राप्त करणे आणि महिलांवरील सर्व प्रकारचे भेदभाव दूर करणे हे मूलभूत मानवी हक्क आणि संयुक्त राष्ट्रांची मूल्ये आहेत. १० डिसेंबर १९४८रोजी संयुक्त राष्ट्र महासभेनेमानवाधिकारांची सार्वत्रिक घोषणा सर्वानुमते स्वीकारली असून. भारतीय संविधानाची प्रस्तावना केंद्र आणि राज्य सरकारला देशातील मानवाधिकारांचे उल्लंघन दूर करण्यासाठी पुरेसे अधिकार देते. परंतु आजपर्यंत आदिवासी महिलांच्या मानवी हक्कांचे सातत्याने आणि असामान्यस्वरूपात उल्लंघन होत आहे. त्यामुळे आदिवासी महिलांच्या स्थितीबाबत चर्चा होणे गरजेचे आहे. महिला आणि पुरुष यांच्यातील समानता प्राप्त करण्यासाठी आदिवासी महिलाना कोणत्या मार्गांनी आणि प्रकारे भेदभावाचा अनुभव येतो आणि त्यांना समानता कशी नाकारली जाते याविषयी सर्वसमावेशक चर्चा समजून घेणे आवश्यक आहे जेणेकरून असा भेदभाव दूर करण्यासाठी योग्य धोरणे विकसित करता येतील. आदिवासी समाजातील महिलांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाची प्रक्रिया तपासणे आणि पडताळणे ही विविध आणि बहुआयामी आहे. त्यांच्या जीवनातील मूलभूत गरजाच्यापरिपूर्ति पासून तर त्यांच्या निरक्षरतेचेप्रमाण, आरोग्याच्या सुविधा, शिक्षण साधनाचा अभाव आणि रोजगाराच्या संधी, १८ वर्षांखालील अल्पवयीन विवाह, त्यांच्याच समाजातील भेदभाव या सर्व क्षेत्रांत ते अस्तित्वात आहे.

१९८०च्या दशकापासून लिंगभेद आणि लिंगभावसंवेदनशील असा महिलांच्या समस्याचा अभ्यास समोर आला आहे आणि यात काही शंका नाही की, त्याच्यात विशेषत: समान संधी आणि समान काम, समान सहभाग, समान मोबदला आणि इतर गरीब महिलांसाठी महिलासक्षमीकरण या संदर्भात अनेक वैशिष्ट्ये आणि मुद्दे समोर आले आहेत. परंतु हे अति-विशिष्ट किंवा अति-सामान्य अटींशिवाय धोरण चौकट (पॉलिसी फ्रेमवर्क) किंवाअतिसूक्ष्म(मॅक्रो) संदर्भाशी क्वचितच जोडलेले दिसतात. म्हणून प्रस्तुत शोध निबंध आदिवासी महिलाच्या मानवी हक्कांचे उल्लंघन आणि त्यांच्या कुटुंबातील त्यांचा खालावलेला दर्जा, अस्मिता आणि स्थितीवर परिणाम करणारे घटक आणि त्यांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा अनुभव आणि प्रक्रियांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. हा शोधनिबंध आदिवासी महिलांचे कुटुंबातील आणि बाहेरील शोषण आणि भेदभावाच्या परिमाणांचे विश्लेषण असून ते त्यांची सामाजिक आर्थिक उन्नती वाढवण्यासाठी आणि त्यांचे मानवी हक्क जोपासण्यासाठी मदतीची एक प्रणाली आणि काही सूचना विकसित करते जेणेकरुन ते त्यांच्या जीवनाची उद्दिष्टे साध्य करू शकतील.

**मुख्य शब्द:** भारतीय संविधान आणि आदिवासी समाजासाठी तरतूद, आदिवासी महिलांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे स्वरूप, आदिवासी महिलांसाठी सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय हक्क आणि त्यांचे उल्लंघन, आदिवासी महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी घटनात्मक तरतुदी, समाजातील आदिवासी महिलांचे प्रश्न आणि आव्हाने, बहिष्कार आणि शोषण, आदिवासी महिलांचे मानवी हक्क जोपासण्यासाठी सकारात्मक कृती, निष्कर्ष, संदर्भग्रंथ यादी.

**परिचय:** आदिवासी समाजातील पारंपरिक अदिम आर्थिक व्यवस्थेचे चक्र आणि श्रमाचे समविभाजन यामुळे महिलांना महत्त्वाची भूमिका आहे. महिलांची भूमिका केवळ आर्थिक कार्यातच महत्त्वाची नाही, तर गैर-आर्थिक कार्यातही तिची भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. तसेच सामाजिक जीवनाच्या इतर आयामांचा मूलभूत पाया म्हणून कुटुंबात माता, बहीण, पत्नी, म्हणून आदिवासी महिलांची भूमिका संघटित आणि अत्यंत महत्त्वाची आहे. आदिवासी समजामध्ये विवाह, घटस्फोट आणि कौटुंबिक सुसंवाद यासंबंधीच्या वृत्ती आणि पद्धतींमध्ये लिंगांभावची सामाजिक-आर्थिक असमानता फारसी दिसून येत नाही. परंतु स्त्री- पुरुष समानता ही देखील वेगवेगळया जमातीमध्येवेगवेगळया प्रमाणात दिसते. असे असले तरीही आदिवासी समाजातील महिलांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाची प्रक्रिया तपासणे आणि पडताळणे ही विविध आणि बहुआयामी आहे. त्यांच्या जीवनातील मूलभूत गरजाच्यापरीपुर्ति पासून तर त्यांच्यातील निरक्षरतेचे प्रमाण, आरोग्याच्या सुविधा, शिक्षण साधनाचा अभाव आणि रोजगाराच्या संधी, १८ वर्षांखालील अल्पवयीन विवाह, त्यांच्याच समाजातील भेदभाव या सर्व क्षेत्रांत असमानता अस्तित्वात असल्याचे दिसून येत आहे.

**उद्दिष्टे:** आदिवासी महिलांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाची प्रक्रिया विविध आणि बहुआयामी असलेल्या आदिवासी समाजात पुढील उद्दिष्टांच्या आधारे तपासणे

आणि पडताळणे गरजेचे आहे. १) आदिवासी महिलांच्या लिंगभाव विषयी भूमिकेच्या निर्देशनाचे घटक ओळखणे. २) लिंगभाव असमानतामुळे आदिवासी महिलांच्या स्थितीवर आणि भूमिकेवर होणारा घातक परिणाम समजून घेणे. ३) आदिवासी महिलांना अधिक समान आणि अर्थपूर्ण सामाजिक सांस्कृतिक आर्थिक अधिकार आणि हक्क साध्य करण्यासाठी मदत करणे.

**पद्धती:** प्रस्तुत शोध निबंध दुय्यम स्त्रोताद्वारा गोळा केलेल्या माहितीवर आधारित असून सहभागी निरीक्षण पद्धती द्वारे आदिवासी संस्कृती आणि समाज तसेच महिलांची स्थिती यांच्यातील संबंध तपासण्यासाठी संदर्भात्मक पद्धतीचा वापर केला आहे आणि त्यानंतर अलिखित, तोंडी आणि मौखिक अभ्यासासाठी मौखिक पद्धत वापरली असून ज्यात त्यांच्या पारंपारिक कला संस्कृती ज्यामध्ये लिखित कागदपत्रांची कमतरता आहे परंतु समकालीन समाजातील आदिवासी महिलांचे संरक्षण आणि हक्क प्रदान करेल असा गुणात्मक माहिती उपलब्ध करते.

**भारतीय संविधान आणि आदिवासी समाजासाठी तरतूद :** आदिम काळापासून आदिवासी समाज हा भारतीय समाजाचा अविभाज्य घटक आहे. ते वसाहतवाद, त्यांच्या निवास स्थानांवर बाह्य आक्रमण, भेदभाव, अत्यंत गरिबी, बेरोजगारी, अशिक्षितपणा, जमिनींपासून अलिप्तता, सशस्त्र संघर्ष आणि मानवी हक्कांचे उल्लंघनाचे बळी ठरलेले आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या अशा समुदायाची संख्या मोठी आहे. आज त्यांना भेडसावणारे मुख्य प्रश्न म्हणजे त्यांना जमीन आणि वडिलोपार्जित प्रदेशात प्रवेश नसणे, न्यायालयीन सहाय्य मिळण्यासाठी परिस्थितीचा अभाव, त्यांचे पारंपरिक कायदे मजबूत करण्यात येणाऱ्या अडचणी, खाण आणि उत्खनन उद्योगांमुळे त्यांचे सातत्याने होणारे विस्थापन, शाश्वत पुनर्वसनाचा अभाव आणि परिणामत: त्यांचा सामाजिकआर्थिक विकासाचा अभाव, शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधांचा अभाव, महिला, मुले आणि तरूणांविरूद्ध होणारा भेदभाव आणि कायदेविषयक सुधारणांचा अभाव इत्यादी स्वरुपात दिसतात. २०११ मध्ये सुरू करण्यात आलेली युनायटेड नेशन्स इंडिजिनस पीपल्स पार्टनरशिप, त्याच्या आदेशानुसार सर्व नैतिक शक्तीसह या समस्यांचे निराकरण करण्याचा ते त्यांच्या पातळीवर प्रयत्न करते. तसेच मानवी हक्कांसाठी उच्चायुक्त कार्यालय The Office of the High Commissioner for Human Rights (OHCHR) ही मानवाधिकारांवर संयुक्त राष्ट्रांची आघाडीची संस्था आहे. जे सर्व लोकांसाठी सर्व मानवी हक्कांचा प्रोत्साहन प्रचार आणि संरक्षण देण्यासाठी कार्य करते. तसेच मानवी प्रतिष्ठेच्या सार्वत्रिक आदर्शांसाठी जगाच्या बांधिलकीचे प्रतिनिधित्व करते. OHCHR ची घोषणा आदिवासी लोकांवरील कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला गुन्हा ठरवते आणि या आदिवासी समुदायांना प्रभावित करणाऱ्या प्रकरणांमध्ये त्यांच्या सर्वात परी उच्च सहभागाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करते. तसेच ते त्यांचा आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विकास तसेच त्यांच्या आणि राज्यांमधील मैत्रीपूर्ण संबंध वाढवण्याचा देखील प्रयत्न करते.

हे घोषणा पत्र याचे ही समर्थन करते की, विविध राज्यांसोबत केलेल्या करारांची मान्यता, पालन आणि अंमलबजावणी करण्याचा अधिकार हा स्थानिक लोकांना आहे. या घोषणापत्राने आदिवासी समुदायांच्या स्वत:च्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय रचना, इतिहास, तत्त्वज्ञान आणि परंपरा आणि त्यांच्या जमीन, प्रदेश आणि सं-साधनांवरील अधिकारांवरून मिळवलेल्या अधिकारांचा प्रचार आणि आदर करण्याचे महत्त्व ओळखले आहे. इतर राज्यांसोबतच्या विविध करारांमध्ये आणि करारांमध्येनिहित असलेले त्यांचे अत्यावश्यक हक्क मान्य करण्याचे महत्त्व हे ओळखते. ज्यामुळे सर्वत्र सर्व प्रकारचे भेदभाव आणि दडपशाही संपुष्टात येईल अशा राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीसाठी त्यांनी स्वत:ला संघटित करण्यासाठी उचललेल्या पावलांचे हे घोषणापत्र स्वागत करते. तसेच युनायटेड नेशन्सचेघोषणापत्रहे आदिवासी समुदायांच्या पारंपारिक पद्धती, ज्ञान आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि त्यांचा आदर करते ज्यामुळे शाश्वत विकास आणि पारिस्थितिक तंत्राचे कार्यक्षम व्यवस्थापन होते. जाहीरनाम्यात सामाजिक आणि आर्थिक प्रगती आणि शांतता यांना प्रोत्साहन देणाऱ्या मुद्द्यांवर देखील महत्त्व देण्यात आले आहे.

**आदिवासी महिलांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे स्वरूप :** आदिवासी समुदायाच्या हक्कांवरील संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यात (युनायटेड नेशन्स डिक्लेरेशन ऑन द राइट्स ऑफ इंडिजिनिअस पीपल्स) UNDRIP हे गुरूवार, १३ सप्टेंबर २००७ रोजी सर्वसाधारण सभेने १४३ राज्यांच्या बाजूने बहुमताने स्वीकारले आहे,हे जगातील आदिवासी समुदायाच्या अस्तित्वासाठी, सन्मानासाठी आणि कल्याणासाठी किमान मानकांची एक सार्वत्रिक चौकट स्थापित करते आणि ते आदिवासी लोकांच्या विशिष्ट परिस्थितीवर लागू होत असलेल्या अस्तित्वातील मानवी हक्क मानके आणि मूलभूत स्वातंत्र्याचे तपशीलवार वर्णन करते. असे असले तरीही

आदिवासी महिलांच्या अधिकाराबाबत असे दिसते की, उदाहरणार्थ, (कलम१७.३) अटींनुसार श्रम, रोजगार आणि वेतनाच्या भेदभावापासून मुक्त होण्याच्या अधिकाराचा अर्थ केवळ सार्वजनिक क्षेत्रातील कामाशी संबंधित आहे (चार्ल्सवर्थ१९९५). खाजगी किंवा घरगुती क्षेत्रात आदिवासी स्त्रियांनी केलेले कार्य हे काम म्हणून मानले जात नाही,तथापि, हे नागरी हक्कांचे एक क्षेत्र आहे जे आदिवासी महिलांसाठी समर्पक आहे परंतु UNDRIP मध्ये ते संबोधित केलेले नाही. या प्रकारे लिंग/लिंगभाव समानता हक्क विरुद्ध सदस्यत्वाचा किंवा नागरिकत्वाचाअधिकार या प्रकरणांमध्ये केंद्रे सरकारे किंवा राज्य कायदे हे त्यांच्या मानवी आणि नागरी हक्कांचे उल्लंघन करतात (मॉस, १९९०; सिंग, २०१२ ( कुओकानेन) पान ७) म्हणून आदिवासी समुदाय म्हणून, त्यांच्या महिलांना UNDRIP ( २००७) मध्ये समाविष्ट केलेले त्यांचे हक्क सुनिश्चित केले पाहिजेत.

**आदिवासी महिलांसाठी सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय हक्क आणि त्यांचे उल्लंघन :** १८ डिसेंबर १९७९, युनायटेड नेशन्सने महिलांवरील सर्व प्रकारचे भेदभाव निर्मूलन विषयक अधिवेशन (Convention on the Elimination of All Forms of Discrimination against Women) (CEDAW) स्वीकारले असून त्याने महिलांच्या हमी हक्कांना मान्यता दिली आहे. एखाद्या देशाचा सर्वांगीण आणि पूर्ण विकास, जगाचे कल्याण, शांततेसाठी सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा जास्तीत जास्त सहभाग आवश्यक आहे हे पटवून दिले. तसेच कुटुंबाच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी महिलांचे मोठे योगदान लक्षात घेऊन समाजाने तिच्या मातृत्वाचे सामाजिक महत्त्व लक्षात घेतले पाहिजे कुटुंबात आणि मुलांच्या संगोपनात दोन्ही पालकांची भूमिका महत्त्वाची आहे. तसेच प्रजननामध्ये स्त्रियांची भूमिका नैसर्गिक रित्या महत्त्वाची आहे आणि असावी परंतु याची जाणीव भेदभावाचा आधार बनवू नये परंतु मुलांच्या संगोपनासाठी जबाबदारीची वाटणी आवश्यक आहे.

स्त्री-पुरुष समानता मिळवण्यासाठी समाजातील व कुटुंबातील पुरूषांच्या पारंपारिक भूमिकेत तसेच स्त्रियांच्या भूमिकेत होणारा बदल स्वीकारणे गरजेचे आहे. तसेच रोजगार आणि इतर गरजांसाठी प्रशिक्षण आणि संधी, समानता आणि न्यायावर आधारित नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची स्थापना स्त्री-पुरुष समानतेच्या संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल याचे महत्त्व सांगते. तर दुसरीकडे UNDRIP आदिवासी समुदायाच्या हक्कांवरील संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यात ४६ कलमांचा समावेश आहे, ज्यामध्ये फक्त तीनमध्ये महिलांचा उल्लेख आहे. अनुच्छेद २१.२ राज्यांना आदिवासी समुदायांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत प्रगती सुनिश्चित करण्यास उद्युक्त करते. अनुच्छेद २२.१ मध्ये आदिवासी वृद्ध, महिला, तरुण, मुले आणि शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींच्या कल्याणाकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले आहे. कलम २२.२ राज्यांना विशेषत: हुशार स्त्रिया आणि मुलांशी कोणत्याही बाबतीत भेदभाव केला जाणार नाही आणि त्यांच्यावर हिंसाचार होणार नाही याची हमी देण्यासाठी पावले उचलण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच अनुच्छेद ४४ घोषित करते की, ते विशेषत: येथे दिले जाणारे सर्व अधिकार आणि स्वातंत्र्य आदिवासी 'पुरुष आणि महिला यांना समान लागू होतील.

या तीन अनुच्छेद व्यतिरिक्त आदिवासी समुदायाच्या हक्कांवरील संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यात (युनायटेड नेशन्सडिक्लेरेशन ऑन द राइट्स ऑफ इंडिजिनिअस पीपल्स) UNDRIP ची भाषा ही लिंग-तटस्थ आहे आणि उल्लेख केलेल्या गटांसाठी महिलांचे अधिकार आणि विशेष गरजा काय असू शकतात हे ते स्पष्ट करत नाही (कुओकानेन२०१३)

तसेच वैयक्तिक हक्कांवरील घोषणांचा सखोल अभ्यास केला असता लक्षात येते की, ४६ पैकी दहा तरतुदींमध्ये वैयक्तिक हक्क समाविष्ट आहेत, त्यापैकी सात राजकीय अधिकारांच्या श्रेणीत येतात (कुओक्कनेनपान. ३). त्यामध्ये त्यांना भेदभावापासून मुक्त होण्याचा अधिकार आहे (अनुच्छेद २); राष्ट्रीयत्वाचा अधिकार (अनुच्छेद ६); एखाद्याच्या संस्कृतीचे आत्मसात किंवा अस्वीकारकरण्याचा अधिकार (अनुच्छेद ८); एखाद्याच्या समुदायाच्या किंवा राष्ट्राच्या सदस्यत्वाचा अधिकार (अनुच्छेद ९); भाषा आणि संस्कृतीत भेदभाव न करता शिक्षणाचा अधिकार (अनुच्छेद १४); काम करण्याचा अधिकार (अनुच्छेद १७) आणि लिंगभेदापासून मुक्त होण्याचा अधिकार (अनुच्छेद ४४). इतर तरतुदींपैकी, (अनुच्छेद ७.१) शारीरिक आणि मानसिक अखंडता, स्वातंत्र्य आणि व्यक्तीच्या सुरक्षिततेच्या अधिकाराशी संबंधित आहे. (अनुच्छेद २४.२ ) आणि शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या अधिकाराची हमी देण्याचा प्रयत्न करते. थोडक्यात काय तर UNDRIP मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक क्षेत्रातील नागरी आणि राजकीय अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी तयार केले गेले आहे आणि जे एक असे क्षेत्र ज्यामध्ये आदिवासी पुरुषांचे वर्चस्व आहे.

**आदिवासी महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी घटनात्मक तरतुदी :** भारतात संविधानाचे कलम १,२,३,४, आणि ५ भेदभाव, तात्पुरते विशेष उपाय,

लैंगिक भूमिका आणि साचेबद्ध (स्टिरियोटाइपिंग) यांच्याशी संबंधित आहेत (सिंग२०१५). भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिक समान आहेत असे स्पष्टपणे घोषित केले असले तरी, आदिवासी महिलांना वंश, लिंग आणि वर्गाच्या आधारावर भेदभावाचा सामना करावा लागतो. आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या आरोग्य आणि शिक्षणाच्या विकासासाठी विशेष उपाययोजना केल्या पाहिजे. राज्य शासनाने आदिवासी महिलांना प्रत्येक क्षेत्रात प्रभावीपणे आणि सर्जनशीलतेने भाग घेण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. अनुच्छेद ६ मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसायाशी संबंधित आहे. आजही आदिवासी स्त्रिया आणि मुलींमध्ये मोठ्या प्रमाणावर तस्करी प्रमाण आढळते ज्यामुळे शेवटी त्यांची परिणती गुलामगिरीत होते. त्यांच्या पारंपरिक व्यवसाय आता व्यवहार्य नसल्यामुळे हजारो आदिवासी महिलांनी आपला उदरनिर्वाह करण्यासाठी आणि आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी जवळपासची गावे आणि शहरे स्थलांतरासाठी निवडली आहेत. पण त्या ठिकाणी त्यांना पुरेसा उत्पन्न नाही; त्याच वेळी त्यांच्यापैकी बरेच जणी मानवी तस्करीचे बळी ठरत आहेत.

आदिवासी महिलांमधील अनेक घरकामगारांना विविध कायदे असूनही योग्य वेतन मिळत नाही. त्यांना अनेकदा कामाची सक्तीही केली जाते. त्याच प्रमाणात लैंगिक शोषणाबाबतच्या घटनांचे प्रमाण आदिवासी महिला मध्येसगळयात जास्त आढळते. याबाबत कामावर घेणाऱ्या कोणत्याही एजन्सींचे योग्य नियमन केलेले नाही आहे. सरकारने आता देशभरातअनेक योजना अंमलात आणण्यास सुरुवात केली आहे, त्यामध्ये महिलांच्या शोषण कमी करण्यासाठी पुनर्वसन केंद्रे स्थापना करून आणि १०००० किंवा त्यापेक्षा जास्त पोलिस कर्मचाऱ्यांना तस्करीचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशिक्षण दिले आहे. परंतु तरीही रेल्वे स्टेशन, पोलीस स्टेशन आणि तत्सम ठिकाणी आदिवासी महिलांवर पोलीस अत्याचाराच्या अनेक घटना घडत आहेत. अनुच्छेद १० आहे जे शैक्षणिक संस्थांमधील समानतेच्या मुद्द्याशी संबंधित आहे. परंतु दर्जेदार शिक्षणाच्या तरतुदी असूनही आदिवासी मुलींना पुरेशा सुविधा आणि वेळेवर शिष्यवृत्ती पाठ्यपुस्तक मिळत नाही. तसेच राज्यघटनेचेअनुच्छेद १२ कुटुंब नियोजन आणि आरोग्य सेवेशी संबंधित आहे. निकृष्ट रूग्णालयातील सुविधा आणि डॉक्टर आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे आदिवासी महिलांची आरोग्य स्थिती दिवसेंदिवस ढासळत चालली आहे. 'जननी सुरक्षा योजना' सारख्या आरोग्य योजनांची ग्रामीण भागात अद्याप योग्य अंमलबजावणी झालेली नाही, परिणामी आदिवासी महिलांना त्यांचा लाभापासून वंचित ठेवले जात आहे. शिवाय, त्यांना अशक्तपणा, मलेरिया, एचआयव्ही, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कर्करोग यांसारख्या आजारांनी ग्रासले आहे. याशिवाय कुपोषणामुळे होणाऱ्या माता मृत्यू आणि बालमृत्यूचे प्रमाण आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे.

आदिवासी महिलांच्या कल्याणाचा त्यांच्या सभोवतालच्या परिसंस्थेशी जवळचा संबंध आहे हे संदर्भानुसार लक्षात घेण्यासारखे आहे. सध्या कामधंद्याच्या निमित्ताने निसर्गाच्या कुशीपासून दूर राहिल्याने त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर घातक परिणाम होतो आहे. तसेच त्यांच्या निवासस्थानातील औषधी वनस्पतींचे त्यांचे पारंपारिक ज्ञान देखील हिरावून घेतले जात आहे. त्यांची जंगले जेथे त्यांनी यशस्वी संसाधन व्यवस्थापनाचा सराव केला आहे ते नष्ट होत आहेत. अनुच्छेद१३आणि १४ ग्रामीण महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक फायद्यांच्या संदर्भात आणि प्रश्नांशी संबंधित आहे, मात्र हे फायदे आदिवासी महिलां पर्यंत पोहोचत नाहीत. समाजाच्या विकासात आदिवासी महिलांची भूमिका महत्त्वाची असते. तथापि, त्यांचे अधिकार आणि प्राधान्यक्रम कायदेशीर कागदपत्रांमध्ये, अर्थसंकल्पात आणि राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवरील गुंतवणूक धोरणांमध्ये पुरेशा प्रमाणात संबोधित केले जात नाहीत. मालमत्ता आणि संसाधनांवर त्यांचे नियंत्रण असमानतेने वेढलेले आहे. फक्त लिंग -प्रतिसादात्मक आणि लिंग-अर्थसंकल्प तंत्र समानता आणि महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देऊ शकतात. परंतु आदिवासी महिलांना त्यांच्या वांशिकतेमुळेच त्यांना अनेकदा भेदभावांनासामोरे जावे लागते. त्यांना मालमत्ता हक्क किंवा वारसा हक्क मिळत नाहीत. त्यांच्या सर्वसमावेशक कल्याण आणि विकासाची बाजू मांडणाऱ्या सर्वांसाठी ही खरोखरच चिंतेची बाब आहे. गुलामगिरीत, अशक्त आणि अनेकदा हिंसाचाराला बळी पडलेल्या आदिवासी महिलांचे अस्तित्व हे प्राणी समान आहे. ग्रामीण वास्तवातील महिलांना त्यांच्या शेतीच्या कामासाठीही योग्य मोबदला मिळत नाही आणि शहरी वास्तवातील महिला घरकामगारांच्या हक्कांची खात्री करण्यासाठी आतापर्यंत राष्ट्रीय स्तरावर कायदेशीर रचना झालेली नाही. त्यामुळे महिलांची, विशेषतः आदिवासी महिलांची स्थिती सुधारण्यासाठी एक सर्वसमावेशक योजनेची चौकट आखण्याची वेळ आली आहे.

या प्रकारे अलीकडच्या काळातील आदिवासी महिलांच्या मानवी हक्कांच्या समस्या आणि आव्हानांचा विविध दृष्टीकोनातून अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, आदिवासी महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी घटनात्मक तरतुदी मध्ये सुधार करणे आणि वेगवेगळया आदिवासी समुदायातील महिलांचा सर्वांगीण विकास करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर आदिवासी समुदायांचे पारंपरिक कायद्याचे देखील सखोल अभ्यास करून त्यामध्ये बदलत्या काळानुसार सुधारणा करून संवर्धन करणे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे कारण यामध्ये आदिवासी महिलांना समान संधी आणि अधिकारांची हमी दिली आहे जी महिला वर होणाऱ्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय अन्याय कमी करण्यास मदत करते. जसे की, आदिवासी महिलांना नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता व मालकी हक्क आणि सामुदायिक निर्णय व्यवस्थेमध्ये सहभाग यामुळे त्यांना समाजातील सामूहिक कृती आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनापासून वंचित राहावे लागणार नाही. या अर्थाने हा अभ्यास केवळ संविधानिकतरतुदी आणि अधिकार हक्क आणि आर्थिक विकासावरच लक्ष केंद्रित करत नाही तर आदिवासी महिलांच्या त्यांच्या समाजाशी जोडलेल्या पारंपारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांच्या नावाखाली त्यांचे शोषण आणि भेदभाव आणि हक्कयांच्यातीलजोडणीचे धागे समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

**आदिवासी समाजातील महिलांचे प्रश्न आणि आव्हाने, त्यांचे बहिष्कार आणि शोषण :** हा अभ्यास या अर्थाने अद्वितीय आहे की, याठीकाणी आदिवासी महिलांचे घटनात्मक अधिकार आणि त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन आणि अलीकडच्या काळातील त्याच्या समोरीलआव्हानांचा विविध दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. राज्यात सगळयांना सार्वभौम स्वातंत्र्य असूनही आदिवासी महिलांचे राजकीय क्षेत्रात क्वचितच सहभाग आढळतो, घरगुती पातळीवर त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात नाही, परंतु राजकीय आणि धर्माच्या विषयांमध्ये त्यांना योग्य श्रेय आणि महत्त्व दिले जात नाही. ते समाजाची रचना घडवणारे आणि कुटुंब सांभाळणारे अदृश्य हात म्हणून त्यांच्या कडे पहिले जाते. जगातील बहुसंख्य लोकसंख्येतील आदिवासी महिलांना विकासाच्या संधींचा अल्प वाटा मिळताना दिसतो. एकीकडे राजकीय यंत्रणांकडून किंवा पुरेशा आरोग्य सेवेतून सर्व सामान्य महिलांसाठी शिक्षण आणि आरोग्याच्या संधी झपाट्याने उघडल्या गेल्या असल्या तरी आदिवासी महिलांना मात्र या विभागात पुरेशी संधी मिळताना दिसत नाही त्यांना अनेकदा शिक्षणातून किंवा चांगल्या नोकऱ्यांपासून देखील वगळले जाते, आणीधर्म आणि राजकीय क्षेत्रात प्रवेश करणे अजूनही त्यांना सहज शक्य नाही. समाज कल्याणप्रणालींतर्गत त्यांना असमान वागणूक दिली जाते ज्यामुळे कुटुंबातील त्यांची स्थिती आणि शक्ती प्रभावित होते. आदिवासी महिलांना औपचारिक बँकिंग संस्थांकडून कर्जाचा अल्प वाटा मिळतो, कारण त्यांच्याकडे तारण ठेवण्यासाठी कोणतेही शाश्वत साधने नसतात कारण आदिवासी महिलांना साधारणपणे पुरुषांपेक्षा खूपच कमी सरासरी वेतन मिळते. यासाठी हा शोधनिबंधातील प्रत्येक माहिती सुधारित धोरणासाठी आणि आदिवासी महिलांच्या उत्थानासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि सर्वांगीण कल्याणासाठी नियोजनाच्या उद्देशाने उपयुक्त ठरेल. शेवटी, आदिवासी महिला आणि त्यांची सामाजिक रचना आर्थिक स्थिती आणि संस्कृती आणि कुटुंबातील त्यांच्या भूमिका तसेच त्यांचे आरोग्य, शिक्षण, अधिकार हक्क या सगळ्या प्रश्नावर विद्यमान साहित्यातील अंतर भरून काढण्यात देखील हा शोधनिबंध योगदान देतो.

**आदिवासी महिलांचे मानवी हक्क जपण्यासाठी सकारात्मक कृती:**

**राष्ट्रीय महिला आयोग :** राष्ट्रीय महिला आयोग ही भारत सरकारने स्थापन केलेली एक महत्त्वाची वैधानिक संस्था आहे. १९९२मध्ये राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९० च्या तरतुदींनुसार त्याचे कार्य सुरू झाले. केंद्र सरकारने भारतीय संविधानातील तरतुदी विचारात घेऊन या आयोगाची स्थापना केली आणि भारतीय महिलांच्या होणाऱ्या मानवी हक्कांचे उल्लंघन सोडवण्यासाठीसक्षमीकरण केले. राष्ट्रीय महिला आयोग हे प्रामुख्याने भारतीय समाजात महिलांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे यावर भर देते. राष्ट्रीय महिला आयोगाचे उद्दिष्ट म्हणजे महिलांच्या कल्याणासाठी चिंतन करणे, त्यांच्या हक्कांची बाजू मांडणे आणि त्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करणे. स्त्रियांना ज्या मुख्य समस्यांना सामोरे जावे लागते ते म्हणजे हुंडा, अन्यायकारक वागणूक, त्यांना धार्मिक किंवा राजकीय क्षेत्रात, नोकरीच्या बाजारात त्यांचे असमान प्रतिनिधित्व आणि इतर अनेक प्रकारचे शोषण. राष्ट्रीय महिला आयोग एक वैधानिक संस्था बनल्यानंतर, त्याने महिलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी अनेक पावले उचलण्यास सुरुवात केली. यामध्ये विशेषत: आदिवासी महिलांच्या समस्या आणि समाजातील एकंदरीत त्यांच्या अमानुष दुरावस्थेपासून त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. या प्रकारे आदिवासी

महिलांच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांची प्रगती घडवून आणण्याच्या उद्देशानेराष्ट्रीय महिला आयोग व इतर कायदेशीर संरक्षणा मध्ये सुधारणा करणे काळाची गरज आहे कारण भरपूर कायदेशीर साधने असूनही, हे एक धक्कादायक सत्य आहे की,सर्वसमावेशक शाश्वत विकासासाठी आदिवासी महिलांच्यापुढे अजून अनेक मैलांचा प्रवास बाकी आहे.

**निष्कर्ष:** प्रस्तुत शोध निबंधाद्वारा आदिवासी महिलांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या स्वरुपाचा अभ्यास आणि त्यांना समान हक्क आणि संधी मिळावीत यासाठीची सूचना या अर्थाने उपयुक्त आहे की, त्यातून त्यांच्या सामाजिक आर्थिक शोषण आणि समाजाशी जुळवून घेण्याच्या प्रक्रियेशी संबंधित विविध नवीन तथ्ये समोर आणते. पुढे हा अभ्यास त्यांच्या काही विशेष समस्या देखील उघड करते ज्या आदिवासी महिलांना दैनंदिन जीवनात भेडसावत आहेत त्यांच्यात शिक्षण, उत्पन्न, उपभोग, दर्जा आणि सत्ता मिळवण्याबाबत भेदभाव केला जात आहे, त्यांची आरोग्याची नोंद पुरुषांपेक्षा वाईट आहे, त्यांना संधी आणि निवड आणि कार्यक्षमतेच्या समानतेचा संदर्भ देणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक आणि कायदेशीर भेदभावाचा त्रास होताना दिसत आहे आणि बऱ्याचदा हिंसाचारामुळे, समानतेच्या आधारावर त्यांच्या बाबत भेदभाव केला जातो त्यामुळे आदिवासी महिलांच्या हक्कांचे मूल्यांकन करण्यासाठी सांस्कृतिक आणि अधिकार निर्देशकांच्या संपूर्ण संचासाठी परिमाणात्मक मापन आवश्यक आहे.तसेच आदिवासी महिलां वर घरगुती हिंसाचार, बलात्कार आणि लैंगिक अत्याचार, तस्करी, चेटकीण-शिकार यासह सर्व प्रकारच्या हिंसाचारासाठी त्या सर्वात असुरक्षित आहेत. याप्रकारेआदिवासी महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांकडे राज्य यंत्रणाने काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. कारण हिंसाचार आणि अत्याचारापासून आदिवासी महिलांच्या संरक्षणासाठी कायदे आणि उपाय योजना अस्तित्वात असतानाही हजारोपीडितांना न्याय दिला जात नाही. या सगळ्या घटनाचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


1. Bakshi, P.M.*The Constitution of India.*New Delhi: Universal Law Publishing Co., 2010.
2. Bhargava, Gopal.*Meaning and source of Human Rights.*New Delhi: Kalpaz Publications, 2003.
3. Kumar, Ashok. *Women's Human Rights* .Jaipur: Prateeksha Publications, 2014.
4. Kuokkanen, Rauna. *Indigenous Women's Rights and International Law: challenhes of the UN Declaration on the Rights of Indigenous Peoples.* New York: Routledge , 2013.
5. L, Mehata P. *Constitutional Protection to Scheduled Tribes in India.* New Delhi: A K Publishers and Distributers, 1991
6. Saraswati, Dr.ShashiNath. *Right to Equality in the Indian Constitution:AGandhian Perspective.* New Delhi: Concept Publishing, 2002.
7. Sastry, T S. *Human Rights of Vulnerable and Disadvantaged Groups Course Book- II.* Pune: The Registrar Pune University, 2012.
8. Sing, Dr.Jagadeep. *Myth and Reality of Human Rights.*New Delhi: Oxfoed Book Company, 2015.
9. S.Subramanian. *Human Rights; International Challenges.* New Delhi: ManasPublications, 2007
10. *United Nations On the Rights of Indigenous Peoples.* Resolution, Newyork: United Nations , 2008.

# आदिवासी अस्मितेच्या संदर्भात स्वयंसेवी संस्थाची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन

***संजय किसन चव्हाण,*** *स. प्राध्यापक, यादवराव कला महाविद्यालय, तळोधी (बाळापूर) ता.नागभीड जि.चंद्रपुर*

***सारांश :*** *राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तथामहाराष्ट्र स्टेट फकल्टी डेव्हलोपमेंट अॅकॅडमी, पुणे द्वारा "Tribal Pride journey- Experiential Leadership" फॅकल्टी डेव्हलोपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम आयोजित करण्यात आला. सदर प्रशिक्षणामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील विविध विषयाचे प्राध्यापक तथा प्राचार्यांचा समावेश होता. प्रशिक्षणाचा महत्वाचा उद्देशच असा होता की, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्हयातील दुर्गम भागाचे निरिक्षण करून तेथील आदिवासी व वंचित घटकाचा अभ्यास करावा, प्रत्यक्ष निरिक्षण करून त्यांचा सांस्कृतिक वारसा, परंपरा यांचा अनुभव घ्यावा त्याच बरोबर उपरोक्त दोन्ही जिल्हयात आदिवासी, वंचितांसाठी आरोग्य, शिक्षण, विकास सेवा इत्यादींबाबत कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना (NGO) प्रत्यक्ष भेटी घेवून त्या कशा प्रकारे काम करीत आहेत त्याचा त्यांना काय फायदा होत आहे, त्यांच्या राहणीमानात तथा जीवनात परिवर्तन होण्यास कशी मदत होते. तसेच संबंधीत स्वयंसेवी संस्थेचे संचालक तथा समाजसेवाकांची प्रत्यक्ष मुलाखती घेवून त्यांची कार्यपद्धती कशी आहे त्याचा इतर वंचित घटकांना तथा आदिम जमातीकरीता कशी फायद्याची ठरू शकेल यासाठी विचारमंथन करण्यासाठीचा हा प्रवास होता.*

*आदिवासी तथा वंचित सूमहाच्या बाबतीत सर्वसामान्य तसेच शिक्षण क्षेत्रातील विचारवंतांना पूस्तकी ज्ञानाच्याद्वारे बरीच माहिती असते. परंतू अशा क्षेत्रात प्रत्यक्ष जावून त्याचे निरिक्षण करण्याची संधी ह्या Tribal Pride Journey च्या माध्यमातून प्राप्त होते. कारण बरेच महाविद्यालय ग्रामीण तथा आदिवासी क्षेत्रात काम करतात त्या महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक सुद्धा संबंधित असतात. म्हणून अशा सर्व स्तरातील घटकांना आदिवासी सांस्कृतिक वारसा व वंचित घटकाच्या उत्थानासाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थानाची कार्य पद्धती व त्याची परिणामकारकता प्रत्यक्ष अनूभावात्मक अध्ययनातून व्हावी आणि त्यातून सदर घटकांमध्ये नवीन दृष्टीकोन निर्माण व्हावा व त्या संदर्भात त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्याकरीता योजना आखण्याकरीता शासनाला, स्वयंसेवी संस्थांना अर्थातच देशाला मदत होईल.*

**प्रस्तावना :** जगातील प्रत्येक देशात आदिवासी जमातीचे अस्तित्व असल्याचे दिसते. भारतात सुद्धा अनेक आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. महाराष्ट्रात सुद्धा गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्हयात गोंड, माडिया, कोईलूर, परधान या जमातीचे अस्तित्व असून प्रामुख्याने माडिया गोंड जमातीची संख्या मोठया प्रमाणात असल्याचे दिसून येते. ब्रिटीशाचे आगमन झाल्यानंतर तसेच इतर परकीय वसाहतवादाच्या खालसा करण्याच्या साधनांनी आदिवासींना दबावाखाली आणल्या गेले. स्वातंत्र्यानंतर सुद्धा विविध यंत्रणाचा वापर आदिवासींना फसवणूक, शोषण, अत्याचार करण्यात आला. आदिवासींचा सांस्कृतिक वारसा, प्रथा, परंपरा, प्रमाणके इत्यादीबाबत वसाहतवादी शासन तथा स्वातंत्र्योत्तर काळातील यंत्रणा सुद्धा उदासीन होती. आदिवासींच्या सांस्कृतिक वारसावर एक प्रकारचा अतिक्रमण झाला असे म्हणता येईल. कारण जिथे त्याची संस्कृती वाढली, स्वतंत्र व्यवस्था आदिवासींनी निर्माण केली त्या जंगल, जल, जमीन पासून त्यांना बेदखल करण्यात आल्याचे दिसून येते. म्हणून आदिवासींचा सांस्कृतिक वारसा हा समृद्ध असा आहे. परंतू त्यांच्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे आदिवासी व वंचित समूहावर प्रभावित झाले आहे व ते कसे प्रभावित झाले याचे प्रत्यक्ष अनुभवातून निरिक्षण करण्याकरीता "Tribal Pride Journey – Experiential Learning" हे महत्वाचे ठरते.

**संशोधनाचा उद्देश :** गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी तथा वंचित समूह जीवनाशी संबंधित उद्दीष्ट ठरविण्यात आली ते पुढीलप्रमाणे - १) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिम समूदायाच्या समाज जीवनावर विविध सामाजिक उपक्रमाचा प्रभाव समजून घेणे. २) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा अनुभव घेणे. ३) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींच्या वनहक्कांचे प्रश्न समजून घेणे. ४) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींचा समृद्ध सामाजिक, सांस्कृतीक वारसा चे निरिक्षण करणे. ५) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयात आदिवासीकरीता कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाची भूमिका समजून घेणे.

**संशोधनाची गृहितके :** १) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था तथा सुरू असलेल्या विविध उपक्रमाचा समाजजीवनावर तथा

आदिवासी जीवनावर सकारात्मक प्रभाव पडतो. २) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींमध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, संरक्षणविषयक समस्या आहेत. ३) गडचिरोली जिल्हयातील आदिवासींना जमातीचे मूलभूत हक्क तसेच वनहक्कांपासून वंचित ठेवले जाते. ४) गडचिरोली जिल्हयातील आदिवासींना समृद्ध, सामाजिक- सांस्कृतिक वारसा प्राप्त झालेला आहे. ५) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींसाठी स्वयंसेवी सस्थेची परिणामकारक ठरते.

**संशोधनाचे महत्व :** प्रस्तूत संशोधन हे गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाचा समाजजीवनावर तसेच आदिवासींवर प्रभाव तसेच दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींच्या समस्या व वनहक्कांचे प्रश्न समजून घेणे फार महत्वाचे आहे. समाजजीवनाचा विचार करता समाज अतिशय वेगाने बदलतो. परंतू समाजातील इतर घटक आदिवासी यांच्या जीवनातील बदल फार मंद गतीने असतो म्हणून समाजाच्या मुख्य प्रवाहापासून ते दूर सारल्या जाते. त्यांना अनेक आव्हानांना समोरे जावे लागते. त्याच्या विविध समस्या आहेत. म्हणून त्यांच्या समस्या त्यांचे आव्हाण समजून घेणे महत्वाचे ठरते. करिता अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींचा संदर्भ घेण्यात आला आहे. तसेच त्याच्या समोरील आव्हाणांना तथा समस्यांना स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न विविध उपक्रमातून केला जातो. त्याची सुद्धा परिणामकारकता तपासणे आवश्यक ठरते. त्यानंतरच त्यांच्या समस्या, आव्हाणे आणि विविध उपक्रमांचा प्रभाव दिसून येईल. म्हणून सदर संशोधन हे महत्व प्राप्त होते.

**संशोधन पद्धती :** प्रस्तूत संशोधन हे गुणात्मक संशोधन असून त्यात प्रत्यक्ष निरिक्षण पद्धतीचा (Observation) आणि लोकविधीविज्ञान (Ethuomethologu) पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. सदर संशोधनात प्रामुख्याने निरिक्षण (Observation) पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधन कार्य पूर्ण करण्याकरीता संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोत (Primary Data) वर आधारलेले आहे. तसेच संशोधनासाठी तथ्य संकलनाकरीता, माहिती मिळविण्याकरीता विविध स्वयंसेवी संस्था, संचालक, तज्ञ, समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते कडून असंरचित मुलाखतीद्वारे तथ्याचे संकलन करण्यात आले आहे.

**संशोधन क्षेत्र :** संशोधनाचा अध्ययन क्षेत्र म्हणून चंद्रपूर जिल्हयातील वरोरा येथील तालुक्यातील आनंदवन गाव (देशातील कृष्ठ रोग्याची पहिली ग्रामपंचायत) तसेच मुल येथील सोमनाथ (देशातील तरूणांना श्रमसंस्कार देणारे पहिले श्रमविद्यापीठ प्रस्तावित) तसेच गडचिरोली जिल्हयातील अहेरी तालुक्यातील आदिवासी बहुल पेठा गाव (आरोग्यविषयक उपक्रम राबविले जाणारे आदिवासी गाव), भामरागड तालुक्यातील हेमलकसा (लोकबिरादरी प्रकल्प – आदिवासींच्या करीता, आरोग्य शिक्षणाकरीता कार्य) , गडचिरोली जिल्हयातील सर्च ग्राम (आरोग्य आणि जीवन शिक्षण, श्रमशिक्षण देणारी स्वयंसेवी संस्था), लेखा मेंढा (सामुदायिक शेती व सामूहिक विकासावर आधारलेली ग्रामपंचायत) हे गाव संशोधन अध्ययन करण्याकरीता अध्ययन क्षेत्र म्हणून सहेतूक पद्धतीने निवडले आहे.

**तथ्य संकलन पद्धती :** प्रस्तूत संशोधन हे आदिवासी जमातीचे हक्क, अधिकार, संस्कृती, मूल्य, परंपरा तसेच आदिवासींना भेडसावणाऱ्या समस्या संदर्भात असून आदिवासी समाजजीवन स्वयंसेवी संस्थेच्या विविध उपक्रमाचा प्रभावाविषयी अध्ययन अपेक्षित असल्यामुळे प्रस्तूत संशोधनामध्ये तथ्य संकलनाकरीता समाजशास्त्रात प्रचलित असलेल्या गुणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यात व्यष्टी अध्ययन, समूह चर्चा, तज्ञांच्या भेटी, निरिक्षण प्रकल्प भेट इत्यादी तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे. तथ्य संकलनाकरीता द्वितीयक स्त्रोताचा वापर करण्यात आला असून त्यात संशोधन विषयासंबंधी लिखित साहित्य, अहवाल, संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेटवरील साहित्य तसेच गडचिरोली जिल्हयातील माहिती संदर्भातील शासकीय/ निमशासकीय दस्तऐवजाचा उपयोग करण्यात आला आहे.

**तथ्याचे विश्लेषण :** प्रस्तूत संशोधन करण्यासाठी सर्व प्रथम तथ्याचे संकलन करण्यात आले. कारण तथ्य संकलनाशिवाय संशोधन कार्य पूर्ण करता येत नाही. प्राप्त तथ्याच्या आधारे, तथ्याचे उद्दीष्टानुसार विश्लेषण करण्यात आले. सदर संशोधन विषयाच्या मांडलेल्या उद्देशाची पडताळणी करून निष्कर्ष काढण्यात आले. प्रस्तूत विषयाचा सखोल अध्ययन करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**आदिवासी जमातीचे अध्ययन :** गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली व राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान तसेच महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलोपमेंट ॲकेडमी द्वारा पाच दिवसीय आदिवासी जमातीचे अनुभवात्मक अध्ययनाचे आयोजन करण्यात आले. ते खालीलप्रमाणे

**आनंदवन :** महारोगी सेवा समिती वरोरा यांचे द्वारे कृष्ठरोग्यांसाठी तसेच वंचितांना आश्रय देणारी देशातील पहिली ग्रामपंचायत आहे. आनंदवनातील प्रवासात असे दिसून आले की, कृष्ठरोग्यांना तसेच वंचितांना स्वाभिमानाने जीवन जगता यावे म्हणून त्यासाठी तेथे स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. कृष्ठरोग्यासाठी मेडिकल, उपचार, पनर्वसन, स्वावलंबी जीवन जगण्यासाठी आनंदवन कार्य करीत आहे. त्याच बरोबर स्मार्ट व्हिलेज, डेन्स फॉरेस्ट जंगल निर्माण केला असून तेथे विविध प्रकारची दुर्मीळ झाडे आढळतात आनंदवनात कृष्ठरोगी तथा वंचित घटकातील व्यक्तीचा समावेश असून तेथील प्रशासन फारच लवचिक असल्यामुळे तेथील सदस्य आपल्या क्षमतेनुसार प्रामाणिकपणे काम करतात. बरेच सदस्य शारीरिक व्याधी किंवा दिव्यांगजन असले तरी आपल्यामध्ये असणाऱ्या कौशल्याचा वापर करून आनंदाने जीवन जगतात. सामान्यपणे व्याधीग्रस्त किंवा दिव्यांगजन हे परावलंबी असतात. मात्र आनंदवनातील दिव्यांगजन अथवा व्याधीगस्त व्यक्ती स्वाभिमानाने जीवन जगतांना दिसतात. आनंदवनातील वातावरणात पाहिल्यावर असे लक्षात येते की, मानसाला जर पूर्ण स्वातंत्र्य दिलं तर तो चांगले काम करू शकतो. आनंदवनात अंध, अपंग, रोगी, आदिवासी, वंचित तथा सगळया घटकांना समजावून घेतलं आहे. त्यांना जीवन जगण्यासाठी आनंदवन डॉ. बाबा आमटे यांनी उभं केलं आहे. त्याचा वारसा डॉ. विकास आमटे सामाजिक जान ठेवून तथा सामाजिक बांधीलकीतून पुढे नेतो आहे ते फारच उत्तम कार्य आहे जे देशाला त्याबद्दल अभिमान वाटावा असाच आहे. कारण बाबा आमटे म्हणतात रोग हा महारोग असतो. तसेच श्रम हेच श्रीराम आहे म्हणून आनंदवनात एकही मंदीर, मस्जिद, पुतळे नाहीत. तथे श्रमाला महत्व दिले आहे. आनंदवनात कृष्ठरोगी, दिव्यांगजन, हस्तकला, रेडीमेड कपडे, वस्तू, कलाकसुलीच्या वस्तू, ग्रिटींग कार्ड इत्यादी उच्च प्रतिची बनवतात. तिथे त्यांच्या कला गुणांना व कौशल्यांना वाव मिळतो. आनंदवनातील दिव्यांगजनांचा "स्वरानंद" नावाचा सुगम संगिताचा कार्यक्रम बघितल्यावर असे लक्षात येते की, प्रत्येक अंध, अपंग, रोगी ह्याकडे विशेष असे गुण असतातच पण त्याला समाजाकडून संधी मिळत नसल्यामुळे त्याचा तेथेच लय होतो. परंतू आनंदवनामध्ये संधी उपलब्ध करून दिल्यामुळे त्याच्या जीवनात आनंद निर्माण झाल्याचे दिसून येते.

**सोमनाथ :** चंद्रपूर जिल्हयातील मुल तालुक्यात सोमनाथ हे गाव आहे. तेथे 1964 मध्ये बाबा आमटे सोमनाथ येथे श्रमशक्ती व युवाशक्ती एकत्र यावी याकरीता श्रमविद्यापीठ निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले. तसेच कृष्ठरोग्याचे पुनर्वसन आणि वंचित आदिवासींना स्वावलंबी जीवन जगता यावे म्हणून येथे प्रकल्प उभारला. आजही सोमनाथ येथे दि. 15 मे 22 रोजी देशातील युवकांकरीता श्रमछावणी शिबिराचे आयोजन करण्यात येते. त्यात देशातील हजारोच्या संख्येने युवक सहभागी होतात. युवकांमध्ये नवनिर्मितीचे श्रमसंस्कार व्हावेत म्हणून बाबा आमटेंनी देशातील तरूणांना एकत्र आणण्याचे काम केले आहे. तरूणांच्या माध्यमातून ताडोबाच्या जंगलाला लागून असलेल्या सोमनाथच्या हद्दीत एकूण 80 ठीकाणी बंधारे बांधले असून त्याद्वारे 100 एकर शेती बंधारातून ओलिताखाली आणली आहे. बाबा आमटेंनी मोठ्या धरणाचा विरोध करून छोट्या बंधाऱ्यातून विकास होते असे हे दाखवून दिले. म्हणून शाश्वत विकास होते असे हे दाखवून दिले. म्हणून शाश्वत विकास कसा करता येतो याचे उत्तम उदाहरण आपणास सोमनाथ येथे बघायला मिळेल. सोमनाथ प्रकल्पाच्या माध्यमातून 29 गावात विकासाची कामेकेली आहेत.त्यात टायर बंधारा हा फार महत्वाचा आहे. कारण बंधारा बांधण्याकरीता वापर झालेल्या टायरचा उपयोग बंधारा बांधण्याकरीता करण्यात आला आहे. असे तंत्रज्ञान देशात अर्थात राज्यात शेतकऱ्यांपर्यंत पोहचले नाहीत ते पोहचने आवश्यक आहेत. सोमनाथ येथे कार्यरत असलेले श्री. अरूण कदम यांनी प्रत्यक्ष सोमनाथ प्रकल्पाची संपूर्ण माहिती दिली. ते 1972 पासून सोमनाथ प्रकल्पात कार्य करतात. त्यांनी असे सांगितले की, सोमनाथ येथे आज रोजी 342 कृष्ठरोग्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. कृष्ठरोगी प्रकल्पाच्या शेतजमीनीवर श्रम करतात. तसेच आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या सहाय्याने शेती कार्य केले जाते. सोमनाथमध्ये अनाथ, बरोजगार, परितक्त्यांना, कृष्ठरोग्यांना, दिव्यांगजनांना समजावून घेतात. सोमनाथ येथे श्रमीक कार्यकर्ते तयार व्हावेत म्हणून 1965 पासून श्रमसंस्कार छावणी सुरू आहे. सदर श्रमसंस्कार शिबीर दहा दिवसांचा असून त्यामध्ये देशातील विविध राज्यातील तरूण –तरूणींचा समावेश असतो. त्यातून श्रमीक शिबीरार्थी घडविले जातात असे अत्यंत मोलाचे कार्य सोमनाथ येथे प्रकल्पामधून केले जाते.

सोमनाथ येथे कृष्ठरोग्याची पुनर्वसनाची सामुहिक वसाहत आहे. तेथील सामुदायिक, सार्वजनिक भोजनव्यवस्था रोटेशन पद्धतीने सगळे आनंदाने काम करतात. जसे स्वयंपाक, शेती, स्वच्छता इत्यादी सामूहिक शेती करण्याची पद्धती तसेच शेतीमध्ये अन्नधान्य अथवा भाजीपाला हे आपल्या गरजा भागविण्यासाठी असते. व्यापारी तत्वासाठी नाही.

अतिरिक्त उत्पादनाची मात्र विक्री करून आलेल्या पैशाची प्रकल्प विकासात उपयोग होतो. एकंदरीत 1200 ते 1300 हेक्टरवर शेती केल्या जाते. कृष्ठरोग्यांना अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचाराच्या व्यतीरिक्त त्याच्या कुवतीनुसार मानधन सुद्धा दिले जाते. त्यांच्यासाठी मोफत आरोग्य केंद्र उभारली आहेत. कृष्ठरोग्यांसाठी स्वतंत्र 100 घर असून येथे 300 च्या वर व्यक्ती राहतात. तसेच येथे जोडपे असलेल्याची वस्ती वेगळी व जोडपे नसलेल्या व्यक्तीची वस्ती वेगवेगळी आहे. वृद्ध, अपंग, अंध व्यक्तींना सामूहिकपणे जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. सोमनाथ येथे रोज 100 लिटर दुध काढल्या जाते. तसेच भाजीपाला , दाळ, तांदळाची गरज प्रकल्पाच्या माध्यमातून केली जाते. 400 एकर शेतात कापूस आहे. शेती करण्यासाठी प्रकल्पातील रहिवासी आणि स्थानिक शेतकरी यांच्या सहकार्याने काम केलं जाते. असे आदिवासी व वंचित, पिडित, रोग्यांसाठी महत्वाचे कार्य करणारे सोमनाथ येथील प्रकल्प मानसाला मानुसकी, तरूणाला, शिस्त, श्रमसंस्कार व गरजुंना मदतीचा सहकार तथा जीवन जगण्यास दिशा दाखवणारे आहे असे म्हणता येईल.

**रोल स्वयंसेवी संस्था (पेठा) :** रोल ही गडचिरोली जिल्ह्याच्या अहेरी तालुक्यातील आरोग्यविषयक काम करणारी आदिवासींच्या आरोग्यासाठी 12 महिने कार्य करणारी अत्यंत महत्वाची स्वयंसेवी संस्था आहे. पेठा हे गाव अतिशय दुर्गम असून तेथे पावसाळयात दळणवळणाकरीता कोणतेही साधने नसतात अथवा पाय रस्ते सुद्धा नसतात कारण सर्व बाजूने पाण्यानी भरलेले नाले, नदी असल्यामुळे आदिवासींनी आरोग्य विषयक गरज पूर्ण होऊ शकत नाही. तेव्हा रोल या संस्थेच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थेचे आरोग्यसेवक खूप कसरत करत मलेरिया, डायरीया, कुपोषण, बाळंतपणासाठी लागणारे औषध, रोग्यांना घरपोच उपलब्ध करून देतात व आदिवासी रोग्यांना रोगापासून बचाव करण्याचा महत्वाचा काम करतात. रोल संस्थेचे संस्थापक श्री. सुरेशजी डंबोळे हे स्वत: अतिदुर्गम भागात जावून आपल्या आरोग्यसेवकामार्फत आदिवासींच्या आरोग्यासाठी सतत कार्य करीत असतात. सन 2007 साली रोल या संस्थेची स्थापना झाल्यापासून आजतागायत कार्य सुरू आहेत. चिचगुडी येथे प्रकल्प असून पेठा ह्या दुर्गम भागात स्थानिक लोकांच्या मदतीने तेथील लोकांसाठी औषधीची व्यवस्था करण्याचे महान कार्य सदर संस्था करत आहे. रोल ही संस्था अहेरी तालुक्यातील एकूण 22 गावात सुरू आहे. डॉ. निलकंठ देशमुख हे बुलढाण्याचे असून ते गडचिरोली जिल्हयातील आदिवासी बांधवाच्या आरोग्यासाठी सेवाभावी व मानवतेच्या दृष्टीकोनातून काम करत आहे. सदर संस्थेत आरोग्य सेवक, सेविका, बचत गट इत्यार्दिच्या माध्यमातून आदिवासी जीवन सुकर करण्याचे प्रयत्न रोल संस्था करत आहे. रोल या संस्थेने आरोग्य रक्षक म्हणून प्रत्येक गावात नियुक्त केले असून त्याद्वारे आरोग्य रक्षणाची जबाबदारी आरोग्य रक्षक प्रामाणिकपणे करत आहे. त्याचा फायदा वतनकार, गोवारी, माडिया, गोंड, हलबी इत्यादी आदिवासी जमातींना होत आहे म्हणून रोल या स्वयंसेवी संस्थेचे कार्य मानवता आणि सेवाभाव याचा संगम आहे असे म्हणता यईल.

**लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा :** गडचिरोली जिल्हयातील भामरागड या अतिदुर्गम भागातील हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्प आहे. डॉ. प्रकाश आमटे या प्रकल्पाच्या माध्यमातून माडिया तथा गोंड या आदिवासी जमातीच्या आरोग्य शिक्षण तथा अन्य समस्याच्या निवास्थानाकरीता या प्रकल्पाच्या माध्यमातून कार्य करत आहे. डॉ. प्रकाश आमटे यांनी आपले वडिल बाबा बामटे यांच्या प्रेरणेमुळे 23 डिसेंबर 1973 ला आले. त्यापूर्वी बाबा आमटे माडिया जमातीच्या समस्या व आव्हानांवर काम करत होते. डॉ. प्रकाश आमटे हेमलकसा येथे आले तेव्हा माडिया जमातीची फार वाईट स्थिती होती. भामरागडची लोकसंख्या 400 एवढी होती असे डॉ. प्रकाश आमटे म्हणाले. माडिया आदिवासींकरीता एका झाडाखाली त्यांनी सर्वप्रथम दवाखाना सुरू केला. 1976 साली त्यांनी आदिवासींकरीता शाळा सुरू केली त्यावेळी 21 माडिया जमातीची मुले शाळेत जात होती. शेकडो मुले-मुली शिक्षण घेत आहेत. त्याच शाळेमधून शिकून आज बरेच आदिवासी मुलं डॉक्टर, इंजिनिअर वकील झाली आहे. त्यातील माडिया जमातीमधील पहिला डॉक्टर कन्ना मडावी सुद्धा आपल्या आदिवासी जमातीसाठी कार्य करतो. हे फार अभिमानाची गोष्ट आहे. तसेच नेलगुन्डा येथे देशातील पहिली शाळा सुरू केली ती पूर्णपणे इंग्रजी माध्यमाची असून ती अतिदुर्गम भागातील माडिया आदिवासीच्या मुलांकरीता असून भामरागड पासून 38 कि. मी. च्या अंतरावर आहे. तिथे जाण्यासाठी कोणताही रस्ता नाही. तेथील मुलं इंग्रजी समजतात, बोलतात याचे प्रत्यक्ष निरिक्षण करण्यात आले. लोक बिरादरी प्रकल्पामध्ये चांगलं आधुनिक आरोग्य विषयक साधनाने सुसज्ज असं आज हॉस्पीटल आहे. त्याचा फायदा माडिया जमातींना मोफतमध्ये होतो आणि 24 तास आरोग्यविषयक सुविधा परविल्या जाते. त्याच बरोबर हेमलकसा येथे 12 वी पर्यंतचे शिक्षणाची व्यवस्था व वसतीगृहाची सुद्धा व्यवस्था प्रकल्पाद्वारे केली आहे.

त्याचा माडिया जमातीचा पाल्यांना अतिदुर्गम भागात होत आहे. इत्यादी कार्य माडिया जमातीच्या कल्याणासाठी लोकबिरादरी प्रकल्प हेमलकसाच्या माध्यमातून होत आहे.

**सर्च ग्राम :** गडचिरोली जिल्हयातील चातगांव येथे पद्मश्री डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांनी सरू केलेलं एक फार महत्वाचं प्रकल्प आहे. 1993 मध्ये डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांनी सर्च ग्रामची सुरूवात केली. तेव्हापासून आजपर्यंत गडचिरोली जिल्हयातील आदिवासींच्या सेवेत कार्यरत आहे. "आरोग्य स्वराज्य" हे सर्च या संस्थेचे ब्रिद वाक्य आहे. सर्च या संस्थेचे 134 गावांमध्ये काम सुरू आहे 152 कार्यकर्ते (आरोग्य सेवक) पूर्णवेळ काम करतात. गडचिरोली जिल्हयातील 12 तालुक्यांमध्ये सर्चचे काम सुरू आहे. 150 अर्धवेळ कार्यकर्ते असून अतिदुर्गम भागात आरोग्यविषयक समस्यासाठी काम करतात. जिल्हयात माडिया, गोंड या जमाती प्रामुख्याने आढळून येतात. त्याच्या आरोग्यविषयक समस्या गंभीर आहेत. अशा समस्या निवरणाकरीता सर्च ग्रामच्या हॉस्पीटलमध्ये आशिया खंडातील तसेच देशातील नामवंत डॉक्टर येथे सेवा देतात. गोंड जमातीतील व्यसनाधिनता, व्याधी, आजार, मलेरिया, डायरिया, फायलेरिया इत्यादी रोगावर उपचार करण्यासाठी सर्च सदैव कार्यरत असल्याचे दिसून येते.

सर्च ग्राममध्ये 32 एकरामध्ये Organic शेती केली जाते. शेतीमध्ये 600 आंबा व 400 चिकुचे झाड लावले आहेत. त्यांचा उपयोग सर्चमध्ये येणाऱ्या व रोग्यांना दिला जातो. येथे 100 बेड असणारा हॉस्पीटल असून सर्जरी कॅम्पचे आयोजन करण्यात येते. म्हणून आदिवसींच्या कल्याणाकरीता सर्च ग्रामचा फार योगदान आहे. आदिवासींचे बालमृत्यू रोखण्यास सर्चने कार्य केले असून दारूबंदी व तंबाखूमुक्त गडचिरोली जिल्हा होण्याकरीता मुक्तीपथ अभियान सुरू केला आहे. 2015 पासून व्यसनमुक्ती कार्यक्रम सर्च द्वारे सुरू आहे. सर्च संस्थेद्वारे देशातील तरूणांकरीता निर्माण शिबीर घेतला जातो. त्याद्वारे तरूणांना उद्देशपूर्ण जीवन जगण्याचा मार्ग निवडण्याकरीता मदत होते. त्यात तरूणांना जीवन जगण्याच्या उद्देशाबरोबर श्रमसंस्कार, जीवनमुल्ये, कशी अंगीकारता येईल या संदर्भात 8 दिवसांची शिबीर घेतली जाते. त्यामधून देशातील अनेक तरूण घडविले जात आहे. तसेच गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि सर्च या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जीवन कौशल्यावर आधारीत 1 वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. तो फारच महत्वाचा असून त्यात प्रत्यक्ष जीवनाशी निगडीत गोष्टींचा समावेश असल्यामुळे आजच्या तरूणाची गरज पाहता जीवनाला कलाटणी देणारा ठरणार आहे. कारण शेतीच्या खालोखाल शिक्षण ही सर्वात मोठी इंडस्ट्री आहे. परंतू शिक्षण या इंडस्ट्रीमधून बाहेर पडणारे उत्पादन फारसे कामाचे नसतात म्हणून जीवनाशी निगडीत उत्पादन झाले पाहिजे यावर भर सर्चच्या माध्यमातून होते. जीवनाचा हेतू शोधने हाच शिक्षणाचा हेतू असला पाहिजे. तरूणांचा हेतू शोधण्यासाठी संधी निर्माणच्या शिबीरातून प्राप्त होते. समाजात अनेक अविष्कार होत आहेत. तंत्रज्ञान विकसित होत आहे. परंतू सामाजिक विषयावर असे अविष्कार होणे कठीण आहे. सामाजिक समस्या सोडविण्याकरीता असे सामाजिक सेवक निर्माण केले पाहिजे किंवा निर्माण होणे महत्वाचे आहे. देशाच्या समस्या सोडविण्यासाठी सर्च अँबेसेडर बनवत आहे. एकंदरीत सर्च संस्थेने समाजभान ठेवून अत्यंत महत्वाच्या गोष्टीवर कार्य करत आहे.

**लेखा मेंढा :** गडचिरोली जिल्ह्यात लेखा मेंढा ही एक ग्रामपंचायत आहे. सामुहिक वनहक्क प्राप्त करणारी देशातील पहिली ग्रामपंचायत अथवा पहिला गाव आहे. लेखा – मेंढा येथे 100 टक्के माडिया गोंड लोकांचे वास्तव्य आहे. संपूर्णपणे वनावर अवलंबून असणारा गाव असून आत काही प्रमाणात शेती करू लागला आहे. देवाजी तोफा यांच्या नेतृत्वात संपूर्ण गावातील लोकांचे जीवनमान उंचावले आहे. जंगल, जमीन, जल ही व्यक्तीची व्यक्तीगत संपत्ती नाही ती सामूहिक आहे असा सगळया गावकऱ्यांचा विश्वास आहे. तसेच गरीबी ही मानवनिर्मित आहे. ती निसर्ग निर्मित नाही. बाहेरून आलेल्या लोकांनी अशिक्षित , अज्ञानी आदिवासींना फसविले आहे. त्यांचे शोषण केले आहे. लेखा-मेंढा या गावात प्रश्न व्यक्तीगत असला तर उत्तर सामूहिक शोधतात तसेच प्रश्न सामूहिक असेल तर त्यावर उत्तर वैयक्तीक शोधतात. अशी या गावाची कार्यपद्धती आहे. ते म्हणतात की, "दिल्ली मुंबईत आमचे सरकार आमच्या गावात आम्हीच सरकार"असे दृष्टीकोन आदिवासी ठेवतात. अठराशे हेक्टर जमीन लेखा मेंढा या गावाची सामूहिक आहे. बायोडायव्हर्सीटी टीकवून ठेवणे आवश्यक आहे. म्हणून लेखा-मेंढा गावाने बांबूची लागवड केली आणि वर्षाकाठी 1 कोटी 15 लाखाचा नफा बांबूपासून मिळाला म्हणून आदिवासी लोक निसर्गाला हानी पोहचवत नाही ते निसर्गाचे रक्षण करतात. परंतू व्यापारी, उद्योगपती, कारखानदार हे निसर्गाला हानी पोहचवितात.

लेखा-मेंढा या गावात लोकं ग्रामपंचायत मध्ये सर्वसम्मतीने एकमताने निर्णय घेतात. ग्रामसभेत मतदार असलेली व मतदार नसलेली दोन्ही व्यक्तीला मतदान व

सहभाग घेण्याचा अधिकार असतो तसेच "हाताला काम आणि कामला दाम" हा मुख्य हेतू घेवून ग्रामपंचायत काम करत असते. म्हणून गावातील प्रत्येक व्यक्तीचा विचार करून निर्णय घेतले जातात. म्हणून देशातील एकमेव ग्रामपंचायत म्हणून लेखा-मेंढा ही आदिवासींची ग्रामपंचायत ठरते. एकंदरीत आदिवासींच्या अस्मिता जोपासण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्वाची ठरते.

**निष्कर्ष** : गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील स्वयंसेवी संस्थेच्या कार्याचे अवलोकन तथा आदिवासींकरीता कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे संचालक, समाजसेवक, आदिवासी नागरीक यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन आणि प्रत्यक्ष समूहाचे निरिक्षण करून खालील काही निष्कर्ष काढण्यात आले आहे. १) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींच्या समस्या निवारण करण्यात स्वयंसेवी संस्थेची महत्वाची भूमिका दिसून येते. २) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींना समृद्ध असा सामाजिक – सांस्कृतिक वारसा नैसर्गिकरित्या प्राप्त झालेला आहे. ३) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील वंचित, पिडित आदिवासी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याकरीता स्वयंसेवी संस्थेचे योगदान महत्वाचे ठरते. ४) देशातील तरूणांमध्ये श्रमसंस्कार, आरोग्य, सेवाहे मूल्य रूजविण्याचे महत्वाचे कार्य स्वयंसेवी संस्था करते. ५) गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींच्या विकासाकरीता स्वयंसेवी संस्थेचे विविध उपक्रमाचे सकारात्मक प्रभाव दिसून येते.

***संदर्भ :-***


१. *खोडेवाड देविदास, (2018) महाराष्ट्रातील आदिवासी जीवन, औरंगाबाद, विद्या प्रकाशन.*

२. *डॉ. बंग अभय, (2021), सेवाग्राम ते शोधग्राम , गडचिरोली, सर्च प्रकाशन.*

३. *डॉ. बंग अभय, (2020), शिक्षणाचे जादुई बेट, पुणे, मनोविकास प्रकाशन.*

४. *डॉ. आमटे विकास, (2014), आनंदवन प्रयोगवन, पुणे, समकालिन प्रकाशन.*

५. *डॉ. शिरोळे धैर्यशील, (2011), भगीरथ पुत्र: बाबा आमटे, पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन.*

६. *नाडगोंडे गुरूनाथ, (1986), भारतीय आदिवासी, पुणे, कॉन्टीनेंटल प्रकाशन.*

७. *कुमरे मन्साराम, (2014), गोंड वंश का इतिहास एवं संस्कृती, नागपूर, विश्वभारती प्रकाशन.*

८. *Kainthla Anita, (2019), Baba Aamte, New Delhi, Viva Book Pvt. Ltd.*

९. *Paul Anuradha, (2013), The Gonds-Genesis History and Culture, New Delhi, National Book Trust.*

# शिक्षणाच्या खाजगीकरणाचा दुर्बल घटकांवर पडलेला प्रभाव

**प्रा. डॉ. दीपक कृष्णराव पवार,** प्राध्यापक व समाजशास्त्र–विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट अॅन्ड कॉमर्स, ३१०–ब, नविन नंदनवन, नागपूर–०९

***संक्षेप*** :– *स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील व्यवसाय जातीगत परंपरेवर आधारीत होते. या जातिव्यवस्थेच्या बंधनामुळे जनसामान्यांना परंपरागत व्यावसायिक कामे करावी लागत होती. त्यामुळे त्यांना विकासापासून पद्धतशीरपणे वंचित ठेवण्यात आले होते. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्व प्रकारची विषमता नष्ट होऊन प्रत्येकाला शिक्षणाची व विकासाची संधी प्राप्त झाली. भारत नव्या विचारांची कास धरू लागला. पंचवार्षिक योजनांची व शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी होऊ लागली. भारतातील हरीतक्रांती व धवलक्रांतीमुळे विविध उद्योगधंदे व सेवाक्षेत्र वाढीस लागले आणि अल्पकाळातच व्यावसायिक शिक्षणाची विद्यापीठे, महाविद्यालये व संस्था मोठया प्रमाणात सुरू करण्यात आली. ही सर्व व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये व संस्था सरकारी नियंत्रणात व अनुदानावर चालणारी होती. त्यांचे खाजगीकरण झाले नव्हते. पण १९९० च्या दशकात भारताला गॅट करारात सहभागी होऊन खाजगीकरणाचे धोरण स्विकारावे लागले. यामुळे शिक्षणक्षेत्रात खाजगीकरणाचा शिरकाव झाला. आज व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण फार मोठया प्रमाणात झाले आहे. त्यामुळे दुर्बल घटकातील मुलामुलींना उच्च व व्यावसायिक शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. परिणामत: आर्थिक व सामाजिक विकासातून मिळणाऱ्या लाभांना ते मुकलेले आहे. त्यामुळे व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणाचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिगत विकासावर, कुटूंबावर, समाजावर व देशावर देखील होत आहे.*

**प्रस्तावना** — प्राचीन काळापासूनच भारतीय समाजाची स्तररचना वर्ण व्यवस्था आणि जातीवर आधारलेली होती. त्यामुळे जातिविशिष्ट व्यवसाय कौशल्ये समाजात दृढ झाली होती. या जातीव्यवस्थेच्या बंधनामुळे जनसामान्यांना परंपरागत व्यावसायिक कामे करावी लागत होती. जसे ब्राह्मणाला धर्म, यज्ञ, हवन या संबंधित धर्मकर्माचे शिक्षण दिले जात होते. क्षत्रियांना युद्ध विद्या व राजनितीचे शिक्षण दिले जायचे, वैश्यांना वाणिज्य, व्यापार व कृषिविषयक शिक्षण मिळत होते. तर शुद्रांना शेती व हस्तकलांचे शिक्षण दिले जात होते. हे 'पारंपारिक व्यावसायिक शिक्षण प्रत्येक मुलाला त्याच्या कुटुंबातूनच परंपरागत पद्धतीनुसार शिकण्यास मिळत होते. त्या त्या व्यवसासाचे शिक्षण त्यांना घरीच प्राप्त होत होते, यात स्पर्धेला वाव नव्हता. अशाप्रकारे भारतात जातीआधारीत व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था केल्या गेली होती. पण या बंद स्तरीकरणातील जातीव्यवस्थेत अस्पृश्य जातीतील लोकांना शिक्षण पूर्णत: नाकारले होते. शुद्र जातीतील लोकांनीसुद्धा शिक्षण घेऊ नये अशी तत्कालीन समाजातील मुल्य व्यवस्था होती. तसेच आदिवासी व भटका समाज हा तर प्रगत समाजापासून कोसो दूर होता, त्यांच्या शिक्षणाचा प्रश्नच नव्हता.

एकंदरित समाजातील ७० टक्के दुर्बल वर्गाला विकासापासून वंचित ठेवून दाबून ठेवण्यात आले होते. त्यामुळे प्रगती होऊ शकली नाही. त्याला हजारो वर्षे गरिबीत जीवन काढावे लागले. पण अठराव्या शतकात पाश्चिमात्य देशात व इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. या औद्योगिक क्रांतीच्या प्रभावामुळे व इंग्रजांचे भारतातील आगमनामुळे भारताच्या समाजव्यवस्थेत व अर्थव्यवस्थेत बदल होत गेला. यामुळे कुटूंबातच वंशपरंपरेने प्राप्त होणाऱ्या व्यावसायिक शिक्षणाची परंपरा खंडीत होऊ लागली. त्यामुळे भारतीय हस्तव्यवसाय व परंपरागत उद्योग मागे पडले. औद्योगिक क्रांतीमुळे व इंग्रजांच्या धोरणामुळे आपल्या देशात हळुहळु वेगवेगळया व्यवसायांचा विकास होऊ लागला. उद्योगधंदे वाढले व वस्तुंचे मोठया प्रमाणावर उत्पादन करणारे कारखाने निर्माण झाले. तरीही आवश्यक त्या प्रमाणात व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना झालेली नव्हती. कारण स्वातंर्त्यपूर्व काळात इंग्रजांकडून भारतात कारकूनी विद्येचेच शिक्षण प्रामुख्याने दिले जात होते.

देशाला स्वातंत्र्य मिळाले, स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत सर्व धर्म, जाती, पंथ, वंश आणि लिंग असा कोणताही भेद न करता शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली आणि घटनात्मक व कायदेशीरदृष्टया सर्व प्रकारची विषमता नष्ट झाली. जनतेला शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाने घेतली. त्यानंतर विविध शैक्षणिक आयोग व धोरणामुळे अल्पकाळातच व्यावसायिक शिक्षणाची विद्यापीठे, महाविद्यालये व संस्था मोठया प्रमाणात सुरू करण्यात आली. त्यामुळे भारतात उच्च व व्यावसायिक शिक्षण हे सर्वसामान्य लोकांपर्यंत लोकांपर्यंत पोहचण्यास सुरूवात झाली. तसेच अनेक थोर पुरुष व समाजसुधारकांच्या प्रयत्नाने आणि प्रेरणेने वंचित व दुर्बल घटकात शिक्षण घेण्याप्रती जाणीव निर्माण झाली. परंपरागत धर्म व जातीच्या बेडयांना तोडून या दुर्बल घटकाने शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन करीत विकास साधायला सुरूवात केली होती. त्याला वेग यायला लागला होता. वंचित आणि आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकातील मुलगा किंवा मुलगी बौद्धिक गुणवत्तेच्या आधारावर कोणत्याही शिक्षणात पुढे जाऊ शकत होती, शिक्षण घेऊ शकत होती. कारण उच्च व व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये व संस्था सरकारी नियंत्रणात व अनुदानावर चालणारी होती. त्यांचे खाजगीकरण झाले नव्हते. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळून गुणवंत व्यावसायिक व तज्ञ तयार होत होते. पण १९९० च्या दशकात भारताची आर्थिक स्थिती बिघडली. देश आर्थिक संकटात सापडला. या आर्थिक अडचणीवर मात करण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडीमुळे भारताला गॅट करारात सहभागी होऊन उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारावे

लागले. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात खाजगीकरणाचा शिरकाव झाला. खाजगी कायम विनाअनुदानित विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन करायला परवानगी देता यावी यासाठी 'खाजगी विद्यापीठे (स्थापना व नियमन) विधेयक' १९९५ ला संसदेसमोर आणले व त्यासंबंधी अध्यादेश २००४ ला जारी करण्यात आले. उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणासंबंधी असे अनेक विधेयके संसदेत पारित झाले आहे. त्यामुळे भारतात कायम विनाअनुदानित तत्त्वावरील महाविद्यालये, स्वायत विद्यापिठे, अभिमत खाजगी विद्यापीठे आणि इतरही स्वयंअर्थसहाय्यित उच्च व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था मोठया प्रमाणात स्थापन झालेल्या आहेत, इतकेच नव्हे तर शासनाच्याही उच्च व व्यावसायिक संस्थांमध्ये विनाअनुदानित तत्त्वावरील विविध अभ्यासक्रम चालविले जात आहे.

अशाप्रकारे मागील दोन–तीन दशकात उच्च व व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण मोठया प्रमाणात झाले आहे. भारतात २००१ ला खाजगी विद्यापीठांची संख्या ०२ होती, तर २०११–१२ ला १११ झाली. तसेच अभिमत विद्यापीठांची संख्या १२३ वर पोहोचलेली आहे. आजच्या स्थितीत भारतात ७९९ विद्यापीठे व ३६०७१ महाविद्यालये असून यातील उच्च व व्यावसायिक शिक्षणाची ७८ टक्के महाविद्यालये ही पारंपारिक व सरकारी नियंत्रणाच्या विद्यापीठाशी संलग्न असली तरी ती खाजगी कायम विनाअनुदानित आहे. तसेच FICCI Higher Education Summit 2012 नुसार खाजगी कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील संख्येचा विचार केल्यास २००१ मध्ये ४२.६ टक्के, २००७ मध्ये ६१.८ टक्के तर ती २०१२ मध्ये ६३.८ टक्के इतकी होती.

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**Total No. of Universities in the Country as on 25/11/2022**

| Universities | Total No. |
|---|---|
| State Universities | 460 |
| Deemed to be Universities | 128 |
| Central Universities | 54 |
| Private Universities | 430 |
| **Total** | **1072** |

| Universities Under 12(B) | Total No. |
|---|---|
| State Universities | 267 |
| Deemed to be Universities | 50 |
| Central Universities | 54 |
| Private Universities | 25 |
| **Total** | **396** |

Source – https:www.ugc.ac.in>oldpdf

**शिक्षणाच्या खाजगीकरणाची संकल्पना** : भारतात अलिकडच्या दशकात उच्च व व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण विविध स्वरूपात होत आहे. ते पुढीलप्रमाणे आहे. १. शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक संस्था व विद्यापीठांना स्वयंअर्थसहाय्यित म्हणजेच कायम विनाअनुदानित तत्त्वावर चालविण्यास मान्यता देणे व त्यासाठी लागणारा खर्च, भरमसाठ फी च्या रूपाने विद्यार्थ्यांकडून वसूल करणे. २. शासकीय व अनुदानित उच्च व व्यावसायिक संस्थेत तसेच महाविद्यालयात विना अनुदानित तत्वावर विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणे. ३. खाजगी अनुदानित संस्थांचे स्वयंअर्थसहाय्यित संस्थांमध्ये रूपांतरण करणे. ४. भारतात परदेशी गुंतवणुकीची खाजगी विद्यापीठे स्थापन होत आहे, ही विद्यापीठे आपल्या गुंतवणुकीचा नफा भरमसाठ शैक्षणिक शुल्काच्या रूपाने वसूल करीत आहे. ५. भारताने १९९१ ला मुक्त आर्थिक धोरण स्विकारल्याने व गॅट्स करारामुळे 'शिक्षण' हे सेवाक्षेत्र हळूहळू खाजगी क्षेत्रात हस्तांतरित करण्यात येत असुन ते व्यवसायिक क्षेत्र झाले आहे.

अशाप्रकारे सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या उच्च व व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे. यामध्ये व्यावसायिक शिक्षणातून सरकारने आपला सहभाग काढून खाजगी संस्थांना खाजगीरीत्या चालविण्यासाठी स्वातंत्र्य दिले आहे. यामध्ये व्यवस्थापन व फी आकारणीवर सरकारचे आवश्यक नियंत्रण दिसून येत नाही.

**दुर्बल घटकाची संकल्पना** :— भारतात चातुर्यवर्ण व्यवस्था जेव्हापासून अस्तित्वात आली तेव्हापासून जातीव्यवस्थेवर आधारीत रचनेतील सर्वात तळागळातील दुर्बल घटक म्हणून अनुसूचित जाती–जमाती, मागासवर्गीय व स्त्रियांना ओळखले जाते. पण आधुनिक काळातील वेगवेगऱ्या विचारवंतांच्या मते, 'जे दारिद्रय रेषेखालील जीवन जगत आहे त्यांना दुर्बल घटक म्हणता येईल.' याचा अर्थ दारिद्रय म्हणजे काय? हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

**गिलीन आणि गिलीन** च्या मते, 'दारिद्रय ही एक अशी परिस्थिती आहे की, ज्यामुळे कोणतीही व्यक्ती अपुरे उत्पन्न किंवा गैरवाजवी खर्चामुळे स्वत:चा जीवनस्तर हा उंचावू शकत नाही. व्यक्ती स्वत:ची शारीरिक व मानसिक तंदुरूस्ती टिकवून ठेवू शकत नाही. तसेच ते ज्या समाजाचे सदस्य आहेत त्या समाजाच्या जीवनमूल्याप्रमाणे योग्य प्रकारें कार्य करू शकत नाही.

**गोगार्ड** च्या मते, 'एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर लोक यांचे स्वास्थ्य, आरोग्य व त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा अभाव किंवा अपर्याप्त पुरवठा म्हणजे दारिद्रय होय.

थोडक्यात, 'समाजातील जे घटक अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मुलभूत आवश्यकतांची पूर्तता करू शकत नाही त्यांना दुर्बल घटक म्हणता येईल. ' या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आज अनेक व्यक्ती असमर्थ ठरत आहेत. याचे मूळ कारण भारतातील सर्वसामान्य जनतेचे दारिद्रय होय . आज जगातील एकूण दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ८ टक्के (७०.५५ कोटी) असून त्या तुलनेत भारतातील एकूण दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २१.८ टक्के (२६.८७ कोटी) इतके आहे. तर महाराष्ट्रातील एकूण दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १७.४ टक्के (९.८७ कोटी) आहे. तसेच देशात ७.५ टक्के स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींचे सरासरी उत्पन्न दरमहा ७५०० रूपयांपेक्षाही कमी आहे. तर ५७ टक्के नियमित नोकरी करणाऱ्या व्यक्तीचे सरासरी उत्पन्न दरमहा १००००

रूपयापेक्षाही कमी आहे. यावरून लक्षात येते की, एकंदरीत भारतातील ५० टक्के सामान्य जनता ही दुर्बल घटकातील असून त्यांचे सरासरी उत्पन्न खूप कमी आहे.

त्यामुळे समाजातील जवळजवळ ५० टक्के असलेल्या वंचित व दुर्बल घटकांतील प्रतिभा देशाच्या प्रगतीत वापरता येत नाही, यामुळे देशाच्या बौद्धिक संपत्तीची मोठया प्रमाणात हानी होत आहे. अशाच प्रकारची हानी हजारो वर्षे झाली असुन, जातीव्यवस्थेने समाजातील मोठया घटकाला शिक्षण, विकासाची संधी आणि मानवी हक्क नाकारले होते. त्यामुळे त्यांच्यातील मोठया प्रतिभेला मुकावे लागले. एकोणिसाव्या शतकापर्यंत पाश्चिमात्य राष्ट्रांत अनेक महत्त्वपूर्ण शोध लागलेत. त्यांची प्रगती झाली. पण भारतात सर्व नैसर्गिक उपलब्धता असूनही देश मागासलेला राहिला. जो पर्यंत समान संधी आणि सुविधा मिळणार नाही, तो पर्यंत भारत जागतिक महासत्ता होणार हे दिवास्वप्न नक्कीच राहणार आहे, यात कोणताही किंतु नाही.

**अभ्यासाचे महत्त्व** — भारतातील एकूण लोकसंख्येतील जवळ जवळ ५० टक्के समाज स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही शिक्षणाच्या मूलभूत अधिकारापासून वंचित आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे** — १. संविधानातील तरतुदी आणि स्वातंत्र्यानंतर सरकारच्या प्रयत्नामुळे दुर्बल घटकात शिक्षणाचे प्रमाण वाढले होते. २. १९९१ नंतरच्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचे खाजगीकरण जलद गतीने होऊन दुर्बल घटक शिक्षणापासून वंचित होत आहे. ३. शिक्षणाच्या खाजगीकरणाच्या धोरणातून गरीब श्रीमंत दरी वाढत आहे.

**अध्ययनाच गृहितके** — दुर्बल घटकातील मुलांचे एकूनच शिक्षणातील आणि विशेषता उच्च व व्यावसायिक शिक्षणातील प्रमाण कमी झाले आहे तसेच शिक्षण श्रीमंतांची मक्तेदारी होऊन सर्व प्रकारची विषमता वाढलेली आहे.

**संशोधन पद्धती** प्रस्तुत अध्ययन करता दुय्यम स्त्रोतांचा वापर केला असून यामध्ये या विषयाशी संबंधित प्रकाशित अप्रकाशित लिखाण संदर्भ ग्रंथ नियतकालिके मासिके जर्नल साप्ताहिकी व इंटरनेटवरील माहितीचा वापर केला आहे

**संबंधित साहित्याचा आढावा:** १. डॉ. धनगरे द. ना. , २०१०, उच्च शिक्षण ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे (पुस्तक) २. डॉ. मिश्रा यांचा, 'उच्च शिक्षणाचे खाजगीकरण समस्या व संभाव्यता' हा लेख

**दुर्बल घटकावर पडलेला प्रभाव:—** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत एक प्रगतिशील, विज्ञाननिष्ठ राष्ट्र बनावे यासाठी पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आय. आय. टी., इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, आय. आय. एम. यासारख्या उच्च शिक्षण संस्थांची पायाभरणी केली. ग्रामीण व शहरी भागांमध्ये शिक्षणाचा मोठ्य प्रमाणावर प्रसार व्हावा म्हणून काही योजना कार्यान्वित केल्या. त्यांनतरच्या काळात भारताने विज्ञानासह अनेक क्षेत्रांत कौतुकास्पद प्रगतीही साधली असली तरी शिक्षणाचा सर्वांगीण प्रसार होण्याबाबत आजही निराशाजनक परिस्थिती आहे. आज उच्च व व्यावसायिक शिक्षण क्षेत्रामध्ये सरकारी शिक्षण संस्थांपेक्षा खासगी शिक्षण संस्थांचा वरचष्मा निर्माण झाला आहे. सरकारी शिक्षण संस्थामधील शिक्षण शुल्क हे समाजातल्या दुर्बल घटकातील उच्च व घेणाऱ्या मुलांच्या पालकाच्या खिशाला परवडण्यासारखे असते. मात्र खासगी शिक्षण संस्था आकारत असलेले शिक्षण शुल्क हे गोरगरिबांच्या आवाक्यापलीकडे गेलेले आहे.

आज मोठया प्रमाणात शाळेपासुन महाविद्यालय स्तरापर्यंत आणि व्यावसायिक शिक्षणाचे खाजगीकरण झालेले आहे. अभियांत्रिकीसाठी प्रतिवर्ष ५० हजार हजार ते २ लाख खर्च येतो. वैद्यकिय शिक्षणाला २० हजार ते १० लाख पर्यंत प्रतिवर्षाला खर्च येतो. विधी शाखेतही हे शुल्क ३५ हजारापर्यंत गेले आहे. तसेच भारतातील बहुसंख्य जनता दारिद्रियात खितपत पडली आहे. त्यामुळे अशा महागडया व्यावसायिक शिक्षणाचा लाभ फक्त श्रीमंताच्या मुलामुलींनाच घेता येतो. यामुळे श्रीमंत हे श्रीमंतच होत आहे तर गरीब हे गरीबच राहत आहे. त्यामुळे दुर्बल घटकातील विद्यार्थी हे शिक्षणात तसेच जीवनाच्या विकासात मागे पडत आहे. पैसा, शैक्षणिक वातावरण व उत्तेजन यांच्या अभावी जन्मत: बुद्धिमान असलेल्या अनेक मुलांची बुद्धी गंजून जाते आहे. शासनातील अधिकारी वर्ग म्हणतात की, दुर्बल घटकांच्या विकासासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु महाविद्यालयातील प्रवेश फी, इतर निधी, पुस्तकांचा खर्च, इ. असे अनेक बाबी सांगून विद्यार्थायाकडून अतिरिक्त शुल्क घेतले जाते. ज्यामुळे शिष्यवृत्ती मिळूनही इतर अवाढव्य खर्चामुळे दुर्बल घटकातील मुलांना व्यावसायिक शिक्षण घेणे परवडणारे नसते. तसेच इतर मागास वर्गातील विद्यार्थायांना ५० टक्के स्कॉलरशिप मिळते, तर गरीब पण खुल्या प्रवर्गातील विद्यार्थायांना काहीच सवलती नाही. यामुळे समाजात एक असमतोल निर्माण होऊन सामाजिक विषमता वाढतच आहे.

सध्यातरी खाजगीकरणामुळे व पैशाअभावी दुर्बल घटकांना व्यावसायिक शिक्षणाची समान संधी प्राप्त होत नाही. त्यामुळे या घटकात बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. आज भारतात बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिसा, झारखंड आणि उत्तर भारतातील पहाडी राज्यांमधील तरूणांमध्ये बेरोजगारी मोठया प्रमाणात आहे. 'आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या (International Labour Organization)' वर्ल्ड' एम्प्लॉयमेंट सोशल आउटलुक : ट्रेण्ड्स २०१८' च्या अहवालानुसार २०१७ ला भारतातील बेरोजगारीचे प्रमाण ३.५ टक्के होते. आकडेवारीत सांगायचे झाल्यास २०१७ ला बेरोजगारांची संख्या १.८३ कोटी होती तर २०१९ ला १.८६ कोटी झाली. तर २०१९ मध्ये १.८९ कोटी तर २०२२ ला ३. ०० कोटी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच आगामी दोन वर्षात भारतातील बेरोजगारी कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत, असे आय. एल. ओ. या संस्थेना अंदाज आहे. आज लाखों अकुशल मुलांना रोजगारांसाठी वणवण करावी लागत आहे. त्यांच्याकडे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी आर्थिक परिस्थिती नसते,

नोकरी सुद्धा मिळत नाही. व्यावसायिक किंवा रोजगाराभिमुख शिक्षण न मिळाल्याने ते बेरोजगार होत आहे. अशा परिस्थितीत ही मुले गुन्हेगारी क्षेत्राकडे सहज वळू शकतात. त्यामुळे त्यांच्यात व्यसनाधिनता, खून, दरोडे, चोरी इ. अशा अनेक वाईट सवयी हळूहळू जडत आहे. त्याचबरोबर असा अभावग्रस्त, वंचित व दुर्बल घटकातील तरुण वर्ग नक्षलवाद, आतंकवाद आणि गैरविधायक प्रवृत्तीला बळी पडत आहे. केवळ कागदी नोटांचे चलन कोटी रूपयांमध्ये जमा करणारे सरकार व शिक्षणसम्राट या राष्ट्राची संपत्ती, सामाजिक आधार असलेली तरुणाई उध्वस्त करीत असतांनाही आत्मसंतुष्ट व विचारांनी संकुचित झालेला समाज जागतिकीकरणाच्या गुंगीतून पारतंर्त्यात जात असल्याचे जाणवते. पर्यायाने राष्ट्राचे स्वातंत्र्यही अबाधित कसे राहू शकेल? सामाजिक व शैक्षणिक अध: पतन सहन करणारा समाज हा षंढत्त्वाचे लक्षण आहे. शिक्षणाचा बाजार मांडणारे शिक्षणसम्राटच सत्तेच्या ठिकाणी पोहचल्याने हजारो कोटी रूपये मिळवून व सत्ता संपादनासाठी वापरणारे सत्ताधीश झाल्याचे दिसत आहे. शिक्षण प्रक्रियेतून समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्याथ्यांचे, पालकांचे आर्थिक शोषण हे सरकारातील सत्ताधाऱ्यांना व शिक्षणसम्राटांना मान्य असल्याने त्यांना रोखणारे मनगटे दुबळी झाली.

आज देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास साडेसात दशके झाली. स्वातंत्र्य मिळाल्यावर परिस्थिती बदलेल अशी आशा होती. काही प्रमाणात परिस्थिती देखील बदलली. पण आपल्या प्रगतीची गती मंदच राहिली. आज आधुनिक भारतात शिक्षण, नोकरी, व्यवसाय वा इतर कोणत्याही बाबतीत आपला विकास करून घेण्यासाठी कोणतेही बंधन राहिलेले नाही. पण सद्यस्थितीत आर्थिक परिस्थिती उत्तम असलेल्या पालकांनाच आपल्या मुलांच्या विकासासाठी उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी व साधने उपलब्ध होऊ शकतात. ती दुर्बल घटकातील विद्याथ्यांना उपलब्ध होऊ शकणार नाही म्हणजेच गरीब, वंचित, दुर्बल घटकातील मुलांचा विकास होऊ शकणार नाही. तात्पर्य या दुर्बल घटकांमध्ये प्रगती करण्यांच्या आशा—आकांक्षांना अडथळा निर्माण झाला आहे. खाजगीकरण व पैश्याअभावी दुर्बल घटकामध्ये नैराश्यता निर्माण होऊन ते भावी जीवनातही दु:खी व निराश असतात. त्यांना रोजगाराभिमुख शिक्षण न मिळाल्याने त्यांच्या बेरोजगारीत वाढ होत असून ते गुन्हेगारी व इतर वाईट मार्गावर वळत आहे याचा परिणाम त्यांच्या मानसिक व सामाजिक आरोग्यावर होऊन समाजाची सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची गती मंदावत आहे आणि समाजात सामाजिक व आर्थिक विषमतेत वाढ होत आहे. एकंदरित या दुर्बल घटकांमध्ये अस्थिरतेची भावना वाढून समाजाचे अध: पतन होऊन देशाचे नुकसान होत आहे.

**निष्कर्ष** :— स्वतंत्र प्राप्तीनंतर भारत एक प्रगतीशील, विज्ञाननिष्ठ राष्ट्र बनावे यासाठी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी आय. आय. टी., आय. आय. एम., इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स यासारख्या उच्च शिक्षण संस्थांची पायाभरणी केली. ग्रामीण व शहरी भागांमध्ये शिक्षणाचा मोठया प्रमाणावर प्रसार व्हावा म्हणून केजी ते पीजी पर्यंत अनेक योजना कार्यान्वित केल्यात. त्यामुळेच भारताने विज्ञानासह अनेक क्षेत्रात कौतुकास्पद प्रगतीही साधली व ती अशीच वेगाने साधता आली असती पण व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षणाचा सर्वांगीण प्रसार होण्याबाबत निराशा निर्माण झाली आहे. उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे सरकारी शिक्षण संस्थांपेक्षा आता खाजगी शिक्षण संस्थांचा वरचष्मा निर्माण झाला आहे, सरकारी शिक्षण संस्थांमधील शिक्षण शुल्क हे अनुसूचित जाती, जमाती, अन्य मागासवर्गीय, महिला, भटके, विमुक्त तसेच दुर्बल घटकातील मुलांच्या पालकांच्या खिशाला परवडण्यासारखे असते. मात्र खाजगी शिक्षण संस्था आकारत असलेले शिक्षण शुल्क हे वंचित व दुर्बल घटकांच्या आवाक्यापलीकडे गेलेले आहे.

अलीकडच्या शैक्षणिक धोरणातून मानवी क्षमता विकसनाची संधी समाजातील वंचित व दुर्बल घटकांना देत नाही. या वंचित व दुर्बल घटकातील प्रतिभा देशाच्या प्रगतीत वापरता येत नाही. यामुळे देशाच्या बौद्धिक संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. आज व्यावसायिक अनेक दुर्बल शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे विद्यार्थ्यांना या शिक्षणापासून घटकातील पद्धतशीरपणे वंचित ठेवले जात आहे. त्यामुळे या दुर्बल घटकात अकुशल कामगारांचे व बेरोजगारीचे प्रमाण वाढत असून त्यांच्यात अनेक वाईट सवयी जडत आहे. याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिविकासावर, कुटूंबावर, समाजावर, देशावर तसेच त्याच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनावर होत आहे. याकरिता सरकारने या नवीन उच्च व व्यावसायिक शिक्षणातील धोरणांचा फेरविचार केला पाहिजे.


*संदर्भ:*

१. *धनागरे डॉ. द. ना. (२०१०), उच्च शिक्षण ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे, लोकवाङ्मयगृह, मुंबई., पृष्ठ १६७, १६८*

२. *All India Survey on Highter Education (2015-16) MHRD, Department of Higher Education] New Delhi.*

३. *Higher Education in India & 12th FYP (2012 & 2017) and beyond, FICCI Higher Education Summit 2012.*

४. *आगलावे डॉ. प्रदिप (२०१५), भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठ १८४*

५. *आगलावे डॉ. प्रदिप (२०१३), भारतीय समाज संरचना आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठ १३६*

६. *तत्रैव पृष्ठ १३७.*

७. *https://ourworldindata-org/eÛtreme poverty*

८. *Report of the Expert Group to Review the Methodology for measurement of Poverty] Government of India] Planning Commission] Jume 2014.*

९. *https://cmle-com/kommon/bin/sir& php\kall (warticle & 2016 &09 & 30% 2013 %55 % 47& ¾993 msec*

१०. *पवार डॉ. दिपक कृ. (मार्च २०१६), उच्च शिक्षणाचे वर्तमान स्वरूप, मराठी समाजशास्त्र परिषद, समाजशास्त्र संशोधन पत्रिका, औरंगाबाद, अंक २०, पृष्ठ २२, २३*

११. *World Employment Social Outlook: Trends 2018, International Labour Organization, Geneva*

# कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण: एक सामाजिक समस्या

**डॉ. हिरालाल भोसले**, समाजशास्त्र विभाग, श्रीमती एम.एम.पी. शाह कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, (स्वायत्त), माटुंगा मुंबई १९

***सारांश:*** *कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळामुळे महिलांच्या मुलभूत अधिकारांचे विशेषत: कलम १४ व १५ अन्वये ''समानेतचा अधिकार'' आणि भारतीय राज्य घटनेच्या कलम २१ नुसार तिला जगण्याचा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार यांचे उल्लघन होते. भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३५४(ए) नुसार हा एक फौजदारी गुन्हा आहे, तो लैंगिक छळाचा अर्थ आणि लैंगिक छळाच्या शिक्षेशी संबंधित आहे. "विशाखा विरुध्द राजस्थान राज्य" या सर्वोच्च न्यायालयातील महत्वाच्या खटल्यात मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली होती. लैंगिक अत्याचाराबाबत कोणताही स्वतंत्र कायदा कायदेमंडळाने केलेला नसल्याने सर्वोच्च न्यायालयाने आपल्या सक्रिय अधिकाराचा अवलंब करुन १९९७ साली एक मार्गदर्शिका जारी केली. यालाच 'विशाखा मार्गदर्शिका' असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४१ नुसार याला कायदयाचे स्वरुप प्राप्त झाले. हा कायदा महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सरकारी किंवा खाजगी क्षेत्रातील सर्व प्रकारच्या लैंगिक छळापासुन सरंक्षण देतो. त्याचप्रमाणे लैंगिक गुन्हयांपासुन बालकांचे संरक्षण कायदा २०१२ हा बालकाचे लैंगिक अत्याचारापासुन संरक्षण करण्यासाठी आणि अशा घटनातील गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी भारत सरकारने २०१२ साली तयार केलेला कायदा आहे. त्यानंतर "कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण (प्रतिबंध, प्रतिरोध आणि निराकरण) अधिनियम २०१३" हा कायदा केलेला आहे. या संशोधन पत्रिकेत लैंगिक शोषण म्हणजे काय, लैंगिक शोषणाच्या विविध प्रकारची माहिती जाणून घेणे. तसेच कामाच्या ठिकाणी महिलांना कशाप्रकारे लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागते, त्याचा महिला कर्मचाऱ्यांच्या ारीरिक व मानसिक आरोग्यावर तसेच कार्यक्षमतेवर काय परिणाम होतो. तसेच लैंगिक शोषणाला आळा घालण्यासाठी कोणकोणते प्रतिबंधात्मक उपाय आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.*

***मुख्य शब्द:*** *लैंगिक शोषण, विशाखा मार्गदर्शिका, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण (प्रतिबंध, प्रतिरोध आणि निराकरण) अधिनियम २०१३, पोस्को अधिनियम २०१२*

**प्रस्तावना:** आधुनिक काळात भारतीय महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. महिलांच्या समस्यांचे ऐतिहासिक समालोचन केले असता वेगवेगळया कालखंडात त्यांच्या समस्येत बदल झालेला दिसुन येतो. प्राचिन व मध्ययुगीन भारतीय समाजात आढळून येणाऱ्या समस्या आधुनिक काळात दिसुन येत नाहीत. उदाहरणार्थ केशवपण, सतीप्रथा, पडदा पध्दती हयासारख्या समस्या नष्ट झालेल्या आहेत. पुर्वी स्त्रियांना शिक्षण घेणे अथवा नोकरी करणे गैर मानले होते. आज स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या आहेत. शिक्षणामुळे त्यांच्यात स्वत्वाची जाणीव निर्माण झालेली आहे. वेगवेगळया क्षेत्रात महिला नौकऱ्या करु लागल्या आहेत. प्रत्येक क्षेत्रातच पुरु ांच्या बरोबरीने काम करु लागल्या आहेत. यामुळे स्त्रियांचा दर्जा नक्कीच सुधारलेला आहे. यामध्ये तीळमात्र शंका नाही. हे जर सत्य असले तरी आज नोकरी करणाऱ्या महीलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक अत्याचार ही आजच्या आधुनिक युगातील महीलांना भेडसवणारी प्रमुख सामाजिक समस्या आहे. ही समस्या दिवसेंदिवस वाढत असुन अधिक चिंताजनक बनत आहे. महिलेवर होणारे अत्याचार व शोषण ही एक जागतिक समस्या बनलेली आहे. जगाच्या पाठीवर अनेक महीलांना कधी ना कधी लैंगिक शोषणाचा सामोरे जावे लागते. कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण हे एक प्रकारे हिंसेचेच दुसरे रुप आहे. अर्थाजन करणाऱ्या महीलांवर अशा लैंगिक शोषणामुळे अतिशय वाईट परिणाम घडून येतात. उदाहरणार्थ अतिशय अपमान झाल्याची भावना, आत्मविश्वासाचे खच्चीकरण, मानसिक संतुलन बिघडणे, प्रति ठेला धक्का पोहचणे, शारिरीक इजा वा जखमा होणे इत्यादी. स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार म्हणजे एकप्रकारे स्त्रियांच्या मुलभूत व मानवधिकाराचे उल्लघन होय. गेल्या काही वर्षापासुन महीलांवर होणाऱ्या या अत्याचाराचे निर्मूलन करण्यासाठी व महीलांचे सरंक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व स्थानिक पातळीवर प्रयत्न केले जात आहे. मात्र त्याला फारसे यश प्राप्त झालेले नाही. आज एकीकडे स्त्री—पुरुष समानतेच्या घोषणा होत असल्या तरीही महीलांवरील होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले नाही. हे पुढील आकडेवरीवरुन स्पष्ट होते. २०२० मध्ये ५६.५ च्या तुलनेत २०२१ मध्ये प्रति लाख महिला लोकसंख्येमध्ये ६४.५ गुन्हे नोंदविले गेले. २०२१ या दरवर्षी आयपीसी अंतर्गत महिलांवरील गुन्हयाखालील बहुतांश प्रकरणे पती किंवा तिच्या नातेवाईकाद्वारे केली जाणारी क्रुरता यांचे प्रमाण ३१.८ टक्के आहे. तिच्या नम्रतेच्या /चारित्र्याचा अपमान करणाऱ्या हेतुने महिलांवर केलेला हल्ला किंवा जबरदस्ती यांचे प्रमाण २०.८ टक्के इतके आहे. स्त्रियांचे अपहरण आणि जबरदस्तीने पळवून नेण्याचे प्रमाण १७.६ टक्के आहे. तर बलात्कार याचे प्रमाण ७.४ टक्के इतके आहे. एकुण महिला विरुध्दच्या गुन्हयाचा विचार केल्यास प्रती लाख ६४.५ इतका गुन्हयांचा दर आहे. अनेक गुन्हयाच्या घटना पोलीसापर्यंत पोहचत नाही. त्यामुळे त्याची नोंद सुध्दा घेता येत नाही. अनेक घटना दडपून टाकल्या जातात.

**आयपीसी अंतर्गत महिलांवरील गुन्हयाखालील प्रकरणे (२०२१)**

| अ. क्र | गुन्हयाचा प्रकार | एकुण घटना | एकुण पिडीत महिला |
|---|---|---|---|
| १ | पतीकडून व नातेवाईकाद्वारा छळ | १३६२३४ | १३७९५६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | बलात्कार | ३१६७७ | ३१८७८ |
| ३ | समुहिक बलात्कार व खुन | २८४ | २९३ |
| ४ | बलात्काराचा प्रयत्न | ३८०० | ३८११ |
| ५ | ॲसीड हल्ला | १५० | १५५ |
| ६ | अपहरण | ७५३६९ | ७६२६३ |
| ७ | अल्पवयीन मुलीची विक्री | १२ | १५ |
| ८ | महिलांची तस्करी / विक्री | ९१४ | १५८० |
| ९ | तिच्या नम्रतेचा / चारित्र्याचा अपमान करणाच्या उद्देशाने महिलांवर हल्ला | ८९२०० | ९०६७५ |
| १० | स्त्रियांच्या नम्रतेचा अपमान / विनयभंग | ७७८८ | ७८८६ |

स्त्रोत : राष्ट्रिय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो अहवाल २०२१ खंड १ ला

**संशोधनाची उद्दिष्टे :** १) लैगिक शोषण ही संकल्पना समजून घेणे. २) विशाखा मार्गदर्शिका, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैगिक शोषण (प्रतिबंध/प्रतिरोध आणि निराकरण) अधिनियम २०१३, पोस्को अधिनियम, २०१२ या कायद्याबाबत थोडक्यात माहिती जाणून घेणे. ३) कामाच्या ठिकाणी महिलेचे होणारे लैगिक शोषणाचे प्रकार व त्यावरील उपाययोजना समजुन घेणे.

**संशोधन पध्दती:** प्रस्तुत शोध निबंध हा पूर्णत: द्वितीय तथ्य सामग्रीवर आधारित आहे. विविध संदर्भग्रंथ, शासकीय, अशासकीय अहवाल, इसंकेत स्थळे, मासिके, वृत्तपत्रे इत्यादी द्वितीयक साधनांच्या आधारे माहिती संकलीत करुन तथ्याचे विश्लेषण केलेले आहे. त्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा ही पध्दती वापरली आहे.

**लैगिक शोषणाचा अर्थ:** लैगिक शोषणाची व्याख्या करताना 'जागतीक आरोग्य संघटना ' म्हणते की, पीडित व्यक्तीच्या नात्यात असलेल्या वा नसलेल्या कुठल्याही व्यक्तीने केलेली लैगिक कृती, लैगिक गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न, नकोशा लैगिक टिपण्या किंवा लगट करण्याचे प्रयत्न, एखाद्या व्यक्तीच्या लैगिकतेचा व्यापार करण्याचे प्रयत्न आणि जबरदस्ती, इजा करण्याची धमकी किंवा शारीरिक बळजबरी या अशा गोष्टी घर, कार्यालयीन परिसरात किंवा त्याबाहेर कुठेही घडू शकतात. केवळ बलात्कारच नव्हे तर शारीरीक स्पर्श, शरीर संबंधाची मागणी किंवा विनंती करणे, स्त्रियांच्या मर्जीविरुध्द तिची मिठी घेणे किंवा चुंबण घेणे, तिच्या गुप्त इंद्रियांना स्पर्श करण्यासाठी लज्जास्पद कृती करणे, अश्लील भाषेचा वापर करुन पत्र लिहीणे, अश्लिल अर्थाची गाणी म्हणणे, लैगिंक सुचक शेरे मारणे किंवा बोलणे, कामूक किंवा अश्लिल चित्र दाखविणे, अश्लिल ई मेल्स पाठविणे, एसएमएस पाठविणे, शरीराकडे टक लावून पाहणे, स्त्रियांच्या ईच्छेविरुध्द केलेली कोणतीही शारीरीक जवळीकतेचा प्रयत्न लैगिक शोषण या सदरात मोडते.

**विशाखा गाईडलाईन:** १९९७ साली राजस्थानातील एका उच्चवर्णीय घरात अल्पवयीन मुलीचा विवाह सोहळा होत होता. तेव्हा तिथे ग्रामसेविकेचे काम करत असलेल्या भंवरीदेवी हिने विवाह थांबविण्याचा प्रयत्न केला. तिथे उपस्थित असलेल्या उच्चवर्णीयांना हा विरोध सहन झाला नाही. त्यामुळे विवाहात सहभागी असणाऱ्या व्यक्तींनी भंवरीदेवीवर सामूहिक बलात्कार केला. भंवरीदेवीवरच अतिप्रसंग आला होता. ग्रामसेविका असलेल्या भॅवरीदेवी सरकारी कर्तव्य बजावत असतांनाच हा प्रसंग तिच्या उद्‌भवला होता. ही घटना म्हणजे एका अर्थाने भंवरीदेवीच्या कामकाजाच्या ठिकाणी झालेले लैगिक शोषणच होते. मात्र त्यावेळी कायदा तिला कोणतीही मदत करु शकला नाही. याचे कारण होते या गुन्हयासंबधी कोणतीच तरतुद तेव्हा नव्हती. तेव्हा याबाबतीत सर्वच संघटनांनी आवाज उठवला. राजस्थानातील स्वयंसेवी महिला संघटनांनी एकत्र येऊन सर्वोच्च न्यायालयात राजस्थान सरकारविरुध्द खटला दाखला केला. ही केस "विशाखा आणि इतर विरुध्द राजस्थान राज्य" या नावाने ओळखली गेली. या केसच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैगिक अत्याचाराबाबत १९९७ मध्ये काही मार्गदर्शक तत्वे सांगितली. याला विशाखा गाईडलाईन म्हटले गेले.

विशाखा गाईडलाईननुसार सर्व शासकीय निमशासकीय, खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कार्यालयात महिलांच्या होणाऱ्या लैगिक शोषणाची तक्रार ऐकुन निवाडा देण्यासाठी एक महिला तक्रार निवारण समिती असणे अनिवार्य आहे. त्यासाठी प्रथम समितीकडे अत्याचार झालेल्या महिलेने तक्रार करणे गरजेचे आहे. शासनाच्या नियमानुसार या समितीमध्ये निम्म्या महिला सदस्य असतील. स्वयंसेवी महिला संघटना, महिला आयोग यांचेही प्रतिनिधी या समितीत असतील. याशिवाय या समितीत कायदेतज्ञ असतील.

**कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ —** अलीकडच्या काळात लैगिक छळाच्या संबंधात अनेक प्रकरणे सातत्याने समोर येते आहेत. तेव्हा पुन्हा एकदा कायदा करणे भाग पडले. म्हणूनच शासनाने विशाखा गाईडलाईनच्या आदेशात काळानुरुप सुधारणा करुन काही गोष्टींची भर घालुन आणि काही बाबी वगळून 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' हा संसदीय कायदा केला.

**पोक्सो कायदा:** महिला आणि बाल विकास मंत्रालयाने हा कायदा नोव्हेंबर २०१२ मध्ये अस्तित्वात आणला. या कायद्याचे पूर्ण नाव The Protection of Children from Sexual offences Act 2012 असे आहे. यालाच मराठी मध्ये "लैगिक गुन्हयापासुन बालकांचे संरक्षण कायदा" असे म्हणतात. या कायद्यामध्ये बालकाची व्याख्या ही अठरा वर्षाच्या आतील कोणतीही व्यक्ती त्यामध्ये पुरुष, महिला किंवा तृतीयपंथी यांचा समावेश होतो. या कायद्याद्वारे लैगिक छळ, लैगिक शोषण आणि अल्पवयीन मुलांवर पोर्नोग्राफी, विनयभंग अशा लैगिक गुन्हयांमध्ये कारवाई केली जाते. २०१८ साली भारतात कथुआ आणि उन्नाव येथे बालिकांवर बलात्कार झाल्याच्या घटनांनंतर गुन्हेगारांना अधिक कडक शिक्षा देण्याच्या दृष्टिने पोक्सो कायद्यात बदल करण्यात आले. त्यानुसार आता बारा वर्षाखालील मुलींवर बलात्कार

केल्यास गुन्हेगाराला फाशीची शिक्षा देण्यात येईल. १६ वर्षाखालील मुलीवर बलात्कार केल्यास कमीत कमी १० वर्षे ते २० वर्षे शिक्षेची तरतुद करण्यात आलेली आहे.

**लैगिक छळाचे प्रकार:** महिलेच्या इच्छेविरुध्द शरीर संबंधाची मागणी करणे, जबरदस्तीने शारीरिक स्पर्श करणे, मिठी मारणे, जवळीक साधणे, पाठ थोपटणे अथवा सलगी करण्याचा प्रयत्न करणे, लैगिक संबंध प्रस्थापीत करण्यासाठी लैगिक सुखाची जबरदस्ती अथवा विनंतीद्वावारा मागणी करणे. लैगिक अर्थपूर्ण शब्दाचा वापर करुन बोलणे अथवा महिलेला संबोधने स्वत:च्या लैगिक कल्पना महिलेची संमती नसताना जबरदस्तीने सांगणे, विनाकारण चेष्टा—मस्करी (विनोद) करणे. अश्लील शेरेबाजी करणे, महिलेला अस्वस्थ वाटेल अशी असभ्य गाणी म्हणून चाळे करणे. महिलेला उद्देशुन शिटी वाजविणे, महिलेला बळजबरीने अश्लील चित्रफीत, फोटो, पुस्तके इत्यादी अश्लील साहित्य किंवा सामग्री दाखवणे अथवा तिच्या परवानगीविना तिचे फोटो —चित्रफीत काढणे ते विविध संकेतस्थळांवर (व्हाटसऍप, फेसबुक इत्यादी) टाकणे एखादया महिलेचा तिच्या कळत न कळत पाठलाग करणे, तिचा मागोवा घेणे, लैगिक सुखाच्या मागणीला महिलेने नाकारल्यास तिच्या शारीरिक, प्रतिष्ठा व मालमत्ता यांस हानी पोहचविणे अथवा तशी धमकी देणे इत्यादी.

**लैगिक शोषण टाळण्यासाठी महीलांनी घ्यावयाची काळजी:**

१. **अश्लिलतेला प्रोत्साहन देऊ नका :** महिला कर्मचाऱ्यांनी किंवा कामगारांनी कामाच्या ठिकाणी आपले वर्तन अश्लिलतेला प्रोत्साहन तर देत नाही ना याची काळजी घ्यावी. जर आपल्या वर्तनातून अश्लिलतेला वाव मिळत असेल तर लैगिक शोषण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच कामाच्या ठिकाणी पुरुष सहकारी किंवा वरिष्ठ आपल्यांशी अश्लिल संभाषण करित असेल किंवा आपल्यापूढे अश्लिल विनोद किंवा अश्लिल हावभाव करित असेल तर त्याला प्रतिसाद देवू नका किंवा त्यात सहभागी होवू नका. एखादा पुरुष सहकारी आपल्या खाजगी किंवां वैयक्तीक लैगिक संबंधाविषयी विचारपूस करीत असेल तर उत्तर देणे टाळावे.

२. **पुरुषांशी शारिरीक जवळीक टाळा :** अनेकदा कामाच्या ठिकाणी आपला पुरुष सहकाऱ्यांशी आपला जवळचा संबंध येत असतो. त्यातच आपला सहकारी वरिष्ठ अधिकारी असेल तर ती नित्याचीच बाब असते. अशावेळी आपल्या पुरुष सहकाऱ्यांशी अती लगट करु नका. त्यांच्याशी मर्यादित संबंध ठेवावे. मैत्री करावी परंतू एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच कारण पुरुष सहकाऱ्यांशी विनाकारण साधलेली जवळीक इतरांचे लक्ष वेधून घेत असतो. त्यामुळे आपणाकडे पाहण्याचा इतराचा दृष्टिकोन बदलतो. आपल्याला टिका टिपण्णीला सामोरे जावे लागते.

३. **कार्यालयात विनाकारण उशीरापर्यंत थांबू नका** : कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांनी आपले काम शक्यतोवर कार्यालयीन वेळेतच संपवून घ्यावेत. म्हणजे ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ थांबविण्याची गरज भासणार नाही. जर जास्त उशीरापर्यंत थांबणे आवश्यक असेल तर अशा वेळी कार्यालयात तुम्ही एकटया नाही ना याची खात्री करुन घ्यावी. तरीही जर एकटे थांबविण्याचा कोणी वरिष्ठ अधिकारी आग्रह करत असेल तर अशा वेळी थांबण्यास विनम्रपणे नकार दयावा. त्यामुळे पुढील संभाव्य धोका टाळता येतो.

४. **संतुलीत वर्तन ठेवा:** महीला कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामाच्या वेळात आपल्या कर्तव्याबाबत कठोर रहावे. कार्य संस्कृती जोपासावी. कार्यालयीन काम करताना वापरायला योग्य अशाच कपडयांचा वापर करावा. तोडके कपडे घालु नये. उत्तान देहप्रदर्शन होणार नाही याची काळजी घ्यावी. कारण अशा कपडयामुळे पुरुषांच्या मनात आकर्षण निर्माण होऊ शकते. त्यांच्या भावना चाळल्या जातात. परिणामी असे पुरुष वेळप्रसंगी अशा स्त्रियांवर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करु शकतात. म्हणून आपला पोषाख व आपले वर्तन संतुलीत ठेवणे अत्यावश्यक आहे. आपल्या वागण्यातून पुरुषांना अयोग्य संदेश जाणार नाही. अशा प्रकारची देहबोली हावभाव ठेवावेत हे सर्व स्त्रियांनी जाणीवपुर्वक करायला हवे.

५. **व्यावसायीक दृष्टिकोन ठेवा:—** महीला कर्मचाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी नेहमी व्यावसायीक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. आपल्या कामाशिवाय अन्य वायफाळ गोष्टीत रस घेऊ नये. त्यामुळे कामावर विपरीत परिणाम तर होतोच. शिवाय इतर पुरुष सहकाऱ्यांना कामाव्यतिरीक्त विषयावर बोलण्याची, चर्चा करण्याची संधी मिळू शकते. त्यां संधीचा ते गैरफायदा घेऊन आपल्याशी जवळीकता किंवा लगट साधण्याचा प्रयत्न करु शकतात.

६. **कार्यालयात निरोगी वातावरण असावे :** आधुनिक काळात स्त्री पुरुषांना एकत्र काम करावे लागते. म्हणून कामाच्या ठिकाणचे वातावरण निरोगी असावे. लिंगभेदापलिकडे एक निखळ मैत्रिचे, स्त्री—पुरुष कर्मचाऱ्यांच्या समोर अश्लिल बोलत असेल, अश्लिल विनोद करीत असेल तर इतरांनी त्याला प्रतिसाद न देता त्याचा प्रतिकार करावा. असे बोलणे —वागणे इथे चालणार नाही असे ठामपणे सांगावे. म्हणजे पुन्हा तो तसा वागणार नाही किंवा बोलणार नाही.

७. **आपल्या सिमारेषा आखा/निश्चित करा :** एखाद्या वेळी आपणास मनाविरुध्द एखाद्या ठिकाणी जावे लागत असेल, कृती करावी लागत असेल, प्रश्नांना उत्तरे द्यावी लागत असतील किंवा ज्या वातावरणात आपणास असुरक्षीत व गैर सोईचे वाटत असेल तर अशावेळी ठामपणे व स्पष्टपणे नकार द्यावा. अशावेळी समोरच्या व्यक्तीला वाईट वाटेल किंवा त्याच्या अहंकाराला ठेच पोहचेल, त्याला राग येईल अशा गोष्टींचा विचार करु नये. प्रथम प्राधान्य स्वत:च्या सुरक्षिततेला देण्यासाठी आपण आपल्या सिमारेषा निश्चित करणे आवश्यक असते.

**लैगिक पिडीत कर्मचाऱ्यांनी काय करावे:**

१. **इतरांशी बोलावे :** लैगिक शोषण थांबविण्याची पहिली पायरी म्हणजे त्याबद्दल इतरांशी बोलावे त्यामुळे

तुमच्या समस्येविषयी इतरांनाही कळेल. ती समस्येवर उपाय शोधायला सुरुवात होईल. शोषणकर्त्याला तुमचा नकार स्पष्ट शब्दांमध्ये कळू द्यावा.

२. **नोंद ठेवा** : कामाच्या ठिकाणी जर कोणी अश्लिल किंवा गैरवर्तन करीत असेल तर त्याची नोंद करुन ठेवा. त्या संदर्भातील तारीख, वेळ व स्थळ आणि काय घडले याचा तपशील तुमच्या डायरीमध्ये लिहून ठेवावा. कोणी साक्षीदार असल्यास त्याचीही नावे लिहून ठेवावीत.

३. **गाफील राहू नका** : आपल्याला ज्या लोकांपासुन धोका संभवतो, ज्या परिस्थितीत व वातावरणात धोकादायक वाटते, याबाबत गाफील राहू नये जर आपणास कोणी एखाद्या व्यक्ती विषयी किंवा ठिकाणाविषयी सावधान करीत असतील तर त्यांच्या सुचनेकडे दुर्लक्ष करु नका, कारण आपल्या काळजीपोटीच ते सांगत असतात.

४. **साक्षीदार निर्माण करा** : जेव्हा कोणत्याही प्रकारचे लैंगिक शोषण होत असेल तर तेव्हा त्यांचे साक्षीदार निर्माण करावेत, तुमच्या अगोदर ज्या कोणी त्या व्यक्तीपासुन पिडीत झालेल्या असतील त्यांचीही तुम्हाला साक्षीदार म्हणून मदत घेता येईल. पोलीसांकडे तक्रार करतांना त्यांची तुम्हाला मदत व आधार मिळू शकेल.

५. **योग्य तक्रार करा** : १० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या अशा सर्व संस्थाना महिला तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. प्रत्येक कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती' आहे का याची माहिती करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. कार्यालयीन लैंगिक शोषणाची तक्रार महिलेला आधी आपल्या कार्यालयाच्या 'महिला तक्रार समिती' कडेच करणे बंधनकारक आहे. तक्रार करताना घटना घडुन तीन महिन्यांहून अधिक काळ लोटलेला नसावा आणि एकापेक्षा जास्त घटना घडल्या असल्यास, पिडितेला शेवटच्या घटनेच्या तारखेपासुन तीन महिन्यांपर्यंतचा कालावधी आहे. जर ही समिती योग्य कारवाई करत नसेल किंवा त्यास विनाकारण विलंब करत असेल तर महिला आयोग त्यात हस्तक्षेप करु शकतो. पण सर्वात आधी लेखी तक्रार कार्यालयातील महिला समितीकडेच करणे आवश्यक असते.

६. **स्थानिक तक्रार समितीकडे तक्रार करावी** : प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या मार्फत त्या त्या जिल्हयासाठी एक 'स्थानिक तक्रार समिती' स्थापन केलेली असते. १० पेक्षा कमी कामगार असल्यामुळे अंतर्गत तक्रार कमिटीचे गठन होऊ न शकलेल्या सर्व कामाच्या ठिकाणांमधील लैंगिक छळाच्या तक्रारीची नोंद करुन घेतात. जिल्हाधिकारी ग्रामिण व आदिवासी भागात प्रत्येक तालुक्यासाठी एक व शहरी भागात प्रभाग किंवा महानगरपालिका स्तरावर एक नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करतील. जे त्यांच्याकडे दाखल झालेल्या तक्रारी ७ दिवसाच्या आत स्थानिक तक्रार कमिटीकडे पाठवतात व त्यावर पुढील कार्यवाही करतात.

७. **जागरुकता प्रशिक्षण:** स्टॉफमधील कर्मचाऱ्यांसाठी लैंगिक शोषण विषयक प्रशिक्षण शिबीर घेणे हे लैंगिक शोषण थांबविण्याच्या दृष्टिने उचलेले महत्वाचे पाऊल म्हणता येईल. स्त्री—पुरुष कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण सक्तीचे असावे. त्यातुन त्यांना लैंगिक शोषण होत असल्यास ते ओळखण्यासाठी मदत मिळेल. लैंगिक शोषण विरोधी पॉलीसी राबविण्यासाठी आणि ती समजून घेण्यासाठी असे प्रशिक्षण देणे हा एक उत्तम उपाय आहे. हया प्रशिक्षणात लैंगिक शोषणा विषयीचे लोकांचे आकलन, त्याविषयीची योग्य जाणीव, समज शोषणाचा कार्यालयीन कामकाजावर व व्यक्तींवर होणारा परिणाम लैंगिक शोषण विरोधी पॉलिसीला अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेणे आणि तक्रार व्यवस्थेची माहिती देणे इत्यादी विषय हाताळता येतात.

**निष्कर्ष:** कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ हा नवीन किंवा दुर्मिळ मुद्दा नाही, तरीही त्यांची नोंद केली जात नाही किंवा त्याबद्दल पुरेशी चर्चाही केली जात नाही. गेल्या काही वर्षापुर्वी सोशल मिडीयावर 'Metoo' चळवळ उदयास आली होती. चळवळीत कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ किंवा लैंगिक अत्याचार यावर जगभरातील महिलांनी व तरुणींनी आपल्याला कशाप्रकारे लैंगिक शोषणाला बळी पडावे लागले होते याबाबत जाहीरपणे आपली मत मांडली होती. तेव्हा या समस्येची तीव्रता अधिक दिसुन आली. या समस्येमुळे कित्येक पीडितांचे आयुष्य उध्वस्त झालेले आहे. अनेकांच्या मनावर अशा अत्याचाराचा गंभीर परिणाम झालेला दिसुन येतो. सध्याची परिस्थिती पाहता महिला त्यांच्या कामाच्या ठिकाणी या हिंसाचाराला अधिक बळी पडतात कारण त्यांच्या नोकऱ्यांचे स्वरुप ज्यामध्ये त्यांच्या सहकाऱ्यांशी रोज संपर्क येतो. लैंगिक छळ हा कायदयाने दंडनीय मानला गेला आहे. कायदयामध्ये मोठया शिक्षेची तरतुद देखील करण्यात आलेली आहे, मात्र या कायदयाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने तसेच याबाबत फारशी जागरुकता नसल्याने आजही मोठया प्रमाणात महिलेला अत्याचाराला बळी पडावे लागते.

**संदर्भ:**


1. *Alok Bhasin (2007) "Sexual Harassment Work", Eastern Book Company Publishing (P) Ltd, Lucknow.*
2. *Astha Poonia (2019) " Sexual Harassment at Workplace "Amity International Journal of Juridical Sciences (Vol. 5, (2019*
3. *Choo Eern Yie" ,Sexual Harassment in Workplace: A Literature Review ,The International Journal of Humanities & Social Studies August 20211 SSN 9203 – 2321*
4. *NCRB, (2019), Crime in India: Statistics-2019, National Crime Records Bureau,*
5. *Ministry of Home Affairs, Government of India, New Delhi*
6. *Panday Rameshwari (2010) "Working women Issues & Challenges", Serials Publication, Delhi.*
7. *दत्ता आदिती, अंकुर शेट्टी व देविका प्रसाद, अनुवाद — भोसले शर्मिला, '' लैंगिक गुन्हयाची पोलीस नोंदणी, कॉमनवेल्थ हयुमन राईटस इनिशिएटिव्ह अहवाल २०२०*
8. *महाराष्ट्र राज्य महिला आयोग ''नोकरदार महिलांसाठी उपयुक्त कायदे '' साहिल पब्लिकेशन, मुंबई २०१८*
9. *'बाललैंगिक शोषण प्रतिबंध आणि प्रतिक्रिया'' मार्गदर्शिका, अर्पण स्वयंसेवी संस्था*

# नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये

**प्रा. डॉ. जयमाला लाडे,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, मिलिंद महाविद्यालय, मुळावा मो. ९४२००४५६३२

**सारांश:** 'मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्य' हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. स्वतंत्र भारताच्या संविधानात प्रत्येक नागरिकांसाठी मूलभूत हक्क काय आहेत व त्यातून सर्वाचा व देशाचा विकास कसां होईल हे निर्देशीत केले आहे. १९७६ मध्ये ४२ वी घटनादुरूस्ती करून मूलभूत कर्तव्यांचा समावेश संविधानाच्या चौथ्या भागात केला आहे. भारतीय संविधानात नागरिकांसाठी अकरा कर्तव्य संगीतलेली आहेत. जसे भारताचे संविधान, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करणे, गौरवशाली परंपरांचे अनुसरण करणे, भारताची एकता, एकात्मता व सार्वभौमत्ता याचे रक्षण करणे, देशाचे संरक्षण करणे, बंधुभाव वाढविणे, सांस्कृतिक मूल्यांची जोपासणे करणे, नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण करणे, विज्ञानवादी व मानवतावादी दृष्टीकोणाची कास धरणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, राष्ट्राच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे, ६ व्या ते १४ व्या वर्षा पर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे ही सर्व मूलभूत कर्तव्य आहेत जी संविधानात संगीतलेली आहेत. परंतु ह्या मूल्यांबरोबरच / कर्तव्याबरोबरच इतरही कर्तव्ये महत्वाची आहेत. जसे की स्वातंत्र, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांनुसार वागणे, स्वच्छता बाळगणे, शिष्टाचार, आपले हक्क वापरतांना दुस—याना त्रास न होता ते वापरले पाहिजे. हयासारखी अनेक कर्तव्ये महत्वाची आहेत.

**प्रस्तावना :—** कोणत्याही मानवी समुहात राहणा—या व्यक्तिला त्याला चांगल्या प्रकारचे जिवन जगता यावे हयाकरिता तसेच दुस—यांनच्या कार्यात कोणतेही अडथळा येऊ नये त्याकरिता प्रत्येकांनी आपले उत्तरदायित्व योग्य रितीने सांभाळले पाहिजे. ह्यासाठीच संविधानात्मक तरतुदी केलेल्या आहेत. संविधानाने प्रत्येक व्यक्तिला अधिकार दिलेली आहेत. मात्र नागरिकाला जसे हक्क / अधिकार प्राप्त होतात तसे प्रत्येक नागरिकांनी आपल्या कर्तव्याचे पालन करणे सुद्धा गरजेचे आहे. आपल्या हक्कांबाबत नागरिकांनी जसे जागरूक असले पाहिजे तसेच आपल्या कर्तव्यांबाबतही असले पाहिजे हक्क आणि कर्तव्ये परस्परांवर अवलंबून असतात. एकाचा हक्क हा दुस—याचा कर्तव्य असते. प्रत्येक व्यक्तिला वाटते की आपले हक्क हे सुरक्षित असले पाहिजे, तसेच प्रत्येक व्यक्तिला वाटणे साहजिकच आहे. म्हणुनच दुस—याला त्याचे अधिकार / हक्क उपभोगता आले पाहिजे अशी जाणिव प्रत्येकानी ठेवली पाहिजे. तेव्हांच समाज व राज्य सुव्यवस्थित राहिल आणि राज्याचा विकास होईल कारण व्यक्तिंच्या विकासातच राज्याचा विकास आहे हे निश्चितपणे सांगता येईल.

अलिकडे राज्यात वाढती अस्थिरता, वाढते गुन्हाचे प्रमाण, राजकारणातील आरोप — प्रत्यारोप, वाढता दबावतंत्राचा वापर ह्या व अनेक कारणांनी नागरिक हवालदिल झालेला आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या माध्यमातून प्रकाशित होत असलेले समाजशास्त्र संशोधन पत्रिका मध्ये ह्या विषयावर शोधनिबंधातून चर्चा करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १) नागरिकांच्या मूलभूत हक्काचा अर्थ पाहणे. २) नागरिकांचे मूलभूत कर्तव्य म्हणजे काय हे पाहणे. ३) नागरिकांचे हक्क व मानवी कर्तव्यांचे महत्व अभ्यासणे.

**अभ्यासपद्धती:** प्रस्तुत निबंधात दुय्यम स्त्रोताचा आधार घेतलेला आहे. जसे संदर्भग्रंथ, वर्तमान पत्रे, इंटरनेट इत्यादि.

**नागरिक हक्क म्हणजे काय:** भारतीय राज्य घटनेने प्रत्येक नागरिकाला विशीष्ट किमान अधिकार / हक्क दिलेले आहेत. राज्याने विशेषत: वंचित वर्गाचा सामाजिक, आर्थिक विकास करण्यासाठी काही कर्तव्यांचाही समावेश केलेला आहे. मूलभूत हक्क हे राज्यघटनेच्या भाग तीन मध्ये आणि राज्याची कर्तव्ये राज्यघटनेच्या भाग चार मध्ये राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे या अंतर्गत मांडली आहेत.

**मूलभूत हक्क, समानतेचा हक्क (कलम—१४ कायद्यापुढे समानता):** 'राज्य, कोणत्याही व्यक्तिला भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत म्हणजे कोणीही विशेष हक्क सांगू शकत नाही आणि सर्व वर्गांना देशाचा कायदा समानतेने लागू पडतो. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान ह्या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई म्हणजेच राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून भेदभाव करणार नाही.

**सार्वजनिक सेवा योजनेच्या बाबतीत समान संधी:** राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांना समान संधी असेल.

**मूलभूत हक्क —स्वातंत्र्याचा हक्क (कलम — १९):** सर्व नागरिकांना भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, विनाशस्त्र जमण्याचा, संघटना स्थापण्याचा, भारताच्या सर्व भूभागात मुक्तपणे संचार करण्याचा, भारताच्या कोणत्याही प्रदेशात राहण्याचा व स्थायिक होण्याचा, कुठलाही व्यवसाय किंवा व्यापार धंदा करण्याचा, कोणताही पेशा आचरणाचा हक्क आहे.

**मूलभूत हक्क — शोषणाविरुद्ध हक्क (कलम — २३):** मानवी अपव्यापार आणि बिगार आणि त्यासारख्या इतर स्वरुपातील वेठ बिगारीस मनाई करण्यात आली आहे. आणि या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

**मूलभूत हक्क — धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम — २५):** म्हणजेच सद्सद्विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण आचरण व प्रचार होय. प्रत्येक व्यक्तीस आपल्या धर्माचे पालन व त्याचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. व या स्वातंत्र्याचा उपयोग कायदा व सुव्यवस्था,

नीतीमत्ता, आरोग्य आणि मूलभूत अधिकार ह्यांच्याशी सुसंगत असायला हवा.

**मूलभूत हक्क — सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (कलम — २९):** अल्पसंख्यांकांचा हितसंबंधाचे संरक्षण — भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणा—या कोणत्याही नागरिकाला स्वत:ची भाषा, लिपी, संस्कृती जतन करण्याचा हक्क दिलेला आहे. तसेच राज्याकडून चालवल्या जाणा—या किंवा राज्य निधीतून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकांस केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**राज्याने लोककल्याणाच्या वाढीसाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे (कलम — ३८):** राज्य, त्यास शक्य होईल तितक्या परिणामकारक रितीने सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाद्वारे राष्ट्रीय जीवनाचा सर्व घटकांमध्ये प्रेरणा निर्माण करेल अशी समाजव्यवस्था प्रस्थापित करून आणि तिचे जतन करून लोककल्याणाच्या वाढीसाठी प्रयत्नशिल राहील. तसेच राज्य हे, विशेषत: केवळ व्यक्ति — व्यक्तींमध्येच नाही तर निरनिराळ्या क्षेत्रामध्ये राहणा—या किंवा निरनिराळ्या व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसमुहांमध्ये देखील उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी प्रयत्न करेल व दर्जा, सुविधा आणि संधी याबाबत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशिल असेल.

**अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन (कलम — ४६):** राज्य, जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषत: अनुसूचीत जाती, जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हित विशेष काळजीपूर्वक करेल आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करेल.

हयासारखे विविध कलमाद्वारे मूलभूत हक्क संविधानाने मानवांकरिता आहेत. येथे काहीच मूलभूत हक्कांचा उल्लेख केला आहे.

**मूलभूत हक्कांचे चिकीत्सक अध्ययन:** कलम १४ नुसार समानतेचा हक्क दर्शवितो तरी शिक्षण, रोजगार, व्यवसाय, लिंग ह्या व इतर घटकांबाबत असमानता दिसून येते. शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रात शैक्षणिक सुविधा व संधी अल्प प्रमाणात आहेत. आर्थिक विषमता सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे. २०२१ मध्ये ४७,००० हजार मजुरांनी आत्महत्या केलेली आहे. त्यात ४ हजार महिला आहेत. एका वर्षात १७ हजार ७२४ बेरोजगारांनी आत्महत्या केली. (नॅशनल क्राइम ब्युरो अहवाल — २०२१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजवादी अर्थव्यवस्था सामाजिक आणि राजकीय न्यायासाठी अपरिहार्य मानले आहे. संविधान निर्मात्यांच्या संकल्पनेतील समाजवाद आज भांडवली समाजवाद होताना दिसत आहे. गरिबी हटाव ते 'सबका न्याय सबका विकास' या सुंदर वाटणा—या घोषणेत समाजवादाचा मूळ सिद्धांतच हरवून बसला आहे. वाढते औद्योगीकरण श्रीमंताच्या संपत्तीत दिवसेंदिवस होत चाललेली वाढ आणि आर्थिक विवंचनेत भरडला जात असलेल्या संविधानातील केंद्रबिंदू असलेल्या 'आम्ही भारताचे लोक' शोषणाचेच हक्कदार राहणार आहोत की काय ?

कलम — १९ नुसार सर्व नागरिकांना स्वातंत्र्याचा हक्क आहे. स्वातंत्र्यामध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, गटांचे स्वातंत्र्य, व्यवहारातील स्वातंत्र्य समावेश होतो. परंतु प्रत्यक्षात असे स्वातंत्र्य प्रत्यक्षातच असतेच असे नाही. जसे स्त्रियांना अनेक अधिकार दिलेले तर असतात पण व्यवहारात पुरुषसत्ताक समाज ते त्यांना वापरू देत नाही. तसेच अंतरजातीय विवाहाचा विचार करता येईल. परस्पर संमतीने विवाह करणे हा झाला स्त्री—पुरुषांच्या स्वातंत्र्याचा मुद्दा पण जातीच्या तथाकथित सन्मानाच्या गैरलागू आग्रहापोटी अशा विवाहाना कडवा विरोध होतो त्यातून भ्वदवत ज्ञपससपदह (ऑनर किलिंग) सारखे प्रकार घडतात. तसेच कर्नाटकात ०३ फेब्रुवारी २०२२ रोजी कुंदापुरा येथे सरकारी महाविद्यालयात हिजाब घालून आल्यामुळे त्यांना प्रवेश नाकारला आणि देशात हिजाबचा वाद सुरू झाला होता. ह्याबाबत न्यायमूर्ती हेमंत गुप्ता व न्यायमूर्ती सुदर्शन धुलिया ह्यांचे मत पाहणे गरजेचे आहे. न्यायमूर्ती गुप्ता असे म्हणतात की, हिजाब घालणे ही 'धार्मिकदृष्ट्या आवश्यक प्रथा' असू शकते किंवा मुस्लिम धर्मातील स्त्रियांसाठी ती सामाजिक आचरणाचा भाग असू शकते. पण सरकारी अनुदानावर चालणा—या कोणत्याही धर्मनिरपेक्ष शाळेत धार्मिक प्रथांचा अवलंब करता येणार नाही. न्यायमूर्ती धुलिया ह्यांच्या मते, हिजाब घालणे ही एक अत्यावश्यक धार्मिक प्रथा आहे की नाही हा या वादाची तड लावण्यासाठी महत्वाचा ठरेल असा मुद्दा नाही. एखाद्याची एखाद्या गोष्टीवर प्रामाणिक श्रद्धा असेल आणि त्यामुळे इतर कोणाचेही नुकसान होत नसेल, तर मग वर्गात हिजाब वर बंदी घालण्याचे कोणतेही न्याय्य कारण असू शकत नाही. तसेच एखाद्या विद्यार्थिनीला हिजाब घालून वर्गात बसायचे असेल तर, तिला कुणीही अडवू शकत नाही. कदाचित असेही असेल की हिजाब घातला तरच महाविद्यालयात जाता येईल असे तिचे कुटुंब तिला सांगत असेल कदाचित हिजाब हा तिच्यासाठी शिक्षण घेण्यासाठीच ह्या विद्यार्थीनी स्वेच्छेने हिजाब घालत असेल. मुस्लिम स्त्रियांना आजही तलाक, बहुपत्नित्व, हलाला, हिजाब ह्या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. आदिवासी स्त्री अनुसूचीत जातींच्या स्त्रियांना आजही जाती व्यवस्थेमुळे अनेक प्रश्न भेडसावत आहेत.

कलम २५ नुसार धर्मस्वातंत्र्याचा व कलम २९ नुसार सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क दर्शवितो. मात्र सध्या देशात अल्पसंख्याकांना दहशतीखाली ठेवल्या जाते. धर्माचा बडेजाव केला जात आहे. अल्पसंख्याकांवर हल्ले चढवले जातात. हे हल्ले धार्मिक आणि सांस्कृतिक दहशतवाद निर्माण करणारे आहेत. धर्माच्या नावाखाली दहशतवाद निर्माण करणे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची हत्या करणे होय. हिंदू देवालयात जातीच्या कारणास्तव प्रवेश नाकारला जातो. धर्मस्वातंत्र्याच्या व्याप्तीमध्ये व्यक्तीगत कायद्याचा समावेश सामाजिक सुधारणा करण्याच्या शासनाच्या क्षमतेवरच मर्यादा पडेल, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. भारतात विविध धर्म—समूहात गोमांस खाण्याची पूर्वापार

परंपरा आहे. धर्माच्या नावावर भारतात काही राज्यात गोमांस खाण्यावर बंदी घातली. गेल्या आठ—दहा वर्षात गोमांस खाल्ले, गोमांस बाळगले, गायींची तस्करी केली, गोहत्या केली अशा संशयाने सुद्धा मुस्लिमांवर हल्ले केले. जबलपूर येथे श्रावण महिन्यात एका मुस्लिम युवकाने फुड डिलीव्हर केले म्हणुन एका हिंदू व्यक्तीने नाकारल्याची घटना घडली. दहशतीखाली वावरत असलेल्या मुस्लिम भाजी विक्रेत्यांनी स्वतःचे हिंदू नाव धारण करून भाजी विक्री करीत होते असे कोरोनाच्या काळात घडलेल्या घटना आहेत. घरवापसी च्या घटना, लव्ह जिहाद सारख्या घटना धर्माच्या आधारावर घडत आहेत त्यामुळे धार्मिक संप्रदाय मोठ्या प्रमाणात वाढत आहे. धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी एकात्म समाजाचे स्वप्न दुभंगण्याची शक्यता वाढत आहे.

या देशातील व्यक्तिजीवनाला व समाजजीवनाला बाबासाहेबांनी आधुनिक दृष्टीची विचार क्षमता प्राप्त करून दिली आणि त्याचबरोबर त्या विचारांच्या निर्भीड अभिव्यक्तीचा हक्क प्रदान करून दिला. कलम १९ नुसार मूलभूत हक्क म्हणुन आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलेले आहे. बळजबरीने होत असलेले धर्मांतर हा सुद्धा मूलभूत स्वातंत्र्याच्या हक्कावर गळचेपी होत आहे असे म्हणता येईल. धमकावून, भेटवस्तू देऊन आणि आर्थिक प्रलोभन दाखवून अनेक भागात धर्मांतर होत आहेत असे निदर्शनास आल्यानंतर त्यासाठी महिला तसेच सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या संरक्षणासाठी आवश्यक असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे.

**नागरिकांचे कर्तव्य:** भारतीय संविधानाने नागरिकांना काही मूलभूत कर्तव्य दिली आहेत आणि आपण या कर्तव्याचे पालन केले पाहिजे जसे संविधानाने आपल्याला मूलभूत अधिकार दिलेले आहेत तसेच आपले पण काही मूलभूत कर्तव्ये आहेत. नागरिकाला हक्क प्राप्त होतात, तशी त्यांची काही कर्तव्येही असतात. आपल्या हक्कांबाबत नागरिकांनी जसे जागरूक असले पाहिजे तसेच आपल्या कर्तव्याबाबतही असले पाहिजे. हक्क आणि कर्तव्य परस्परांवर अवलंबून असतात. एकाचा हक्क हे दुस—याचे कर्तव्य असते. आपले हक्क सुरक्षित रहावेत अशी आपली अपेक्षा असते. त्याचप्रमाणे दुस—यालाही त्याचे हक्क उपभोगता आले पाहिजे याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. हीच आपली कर्तव्याबद्दलची जाणीव होय. व्यक्ति आणि राज्य यांतील संबंधा बाबतही हेच म्हणता येईल अशी आपली अपेक्षा असते. त्याचप्रमाणे राज्यसंबंधीची आपली कर्तव्येही प्रत्येकाने पार पाडली पाहिजेत तरच शासनाचे काम सुरळीत प्रमाणे चालू शकेल. जेणेकरून समाज्यात सुव्यवस्था निर्माण होईल आणि राज्याचा विकास होऊ शकेल. नागरिकांची मूलभूत कर्तव्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.

भारताची सर्वभौमत्ता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.

धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणा—या प्रथांचा त्याग करणे.

आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारसाचे मोल जाणून तो जतन करणे.

अरण्ये, सरोवर, नद्या व वन्य जीवसृष्टि यासुद्धा नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे, आणि सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे.

विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक बुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

सहा ते चौदा वयापर्यंतच्या बालकांचे आई—वडिल किंवा पालक, त्यांच्या बालकांना किंवा पाल्यांना जे लागू असेल त्याप्रमाणे, शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतील (हे प्रत्येक नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे.)

वरील प्रमाणे भारताच्या मूळ संविधानात नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचा उल्लेख नाही. १९७६ मध्ये ४२ वी संविधान दुरूस्ती करून मूलभूत कर्तव्यांचा समावेश संविधानाच्या चौथ्या भागात करण्यात आला. हा चौथा भाग म्हणजे मार्गदर्शक तत्वांचा आहे. म्हणजे ही कर्तव्ये भारतीय नागरिकांनी आपल्या आचरणात आणने अपेक्षित आहे. ही कर्तव्ये पार न पाडल्याने न्यायालयाद्वारा कारवाई केली जाणार पण नागरिकांनी स्वतःच या कर्तव्याचे पालन करावे, भारतीय संविधानाने नागरिकांसाठी वरिलप्रमाणे महत्वपूर्ण अकरा कर्तव्य स्पष्ट केलेली आहेत.

नागरिकांचे नैतिक आणि कायदेशीर कर्तव्य असतात. शांततेच्या काळात राज्यात कायदा आणि सुव्यवस्था टिकून राहिल यासाठी सर्वतोपरी मदत करणे हे नागरिकांचे कर्तव्य ठरते. त्याचप्रमाणे आपण जिथे कुठे कार्य करतो तिथे उत्कृष्ठपणे कार्ये पार पाडणे हे महत्वाचे कर्तव्य आहे. युद्धाची परिस्थिती निर्माण झाल्यास देशाच्या संरक्षण कार्यात सहभागी होणे हे नागरिकांचे कर्तव्य असते.

**मूलभूत कर्तव्यांचे चिकीत्सक अध्ययन:** वरिलप्रमाणे आदर्शात्मक व सुव्यवस्थित शासनव्यवस्था, कायदेव्यवस्था, समाजव्यवस्था निर्माण होण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे ४२ व्या संविधान दुरुस्तीने पहिलेच कर्तव्य असे म्हणते की, संविधानाचे, राष्ट्रध्वजाचे व राष्ट्रगीताचे आदर करावे. पण सध्या देशात परिस्थिती पाहता संविधान बदलण्याची भाषा बोलतांना दिसून येत आहेत. राष्ट्रचिन्हाच्या मूळ चिन्हात असलेल्या प्रतिकात बदल झालेला आहे. दीपक गौड नावाच्या व्यक्तिने संविधानाची प्रत जाळली होती. नुकतेच त्याला न्यायालयाने देशद्रोही जाहिर करून त्याचे भारतीय

नागरिकत्व रद्द केले आहे. हा अपराध म्हणजे आतंकवादी व्यक्तींपेक्षा नऊ पट जास्त घातक अपराध आहे. असे न्यायालयाने नमूद केले आहे. २६ जानेवारी १५ ऑगस्ट ला प्लास्टिकचे ध्वज कुठेही फेकतात ते पायाखाली तुडले जातात.

आज तर भारताची सार्वभौमत्ता, एकता व एकात्मता धोक्यात आलेली दिसून येते. धर्म, प्रांत, भाषा ह्या घटकाच्या आधारावर सांप्रदायिक दंगे होत आहेत. हिंदू—मुस्लिमांतील दरी वाढत जात आहे. (वाढविल्या जात आहे) वास्तविक पाहता धर्माच्या नावाखाली दहशतवाद निर्माण करणे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची हत्या करणे होय. म्हणूनच स्वातंत्र्य, समता, बंधूता, सामाजिक न्याय जे संविधानाचा गाभा आहे. त्या या संविधानिक मूल्यांचे पालन करणे प्रत्येक नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे.

आपल्या प्रदेशात असलेल्या नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करणे, हे सुद्धा प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. पण प्रत्यक्षात असे दिसून येते कि, मानवाने जंगलतोड केली, नद्या, पर्वत, तलाव प्रदूषित केले. एवढे प्रदूषण वाढले कि, गंगेचे शुद्धीकरण करण्यासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करावी लागली. किल्ले, लेण्या ह्यांना पर्यटक नुकसान पोहचवित आहेत. सातारा जिल्ह्यातील कास पठारावर पर्यटकांची झुंबड जमली होती. त्यावेळेस तेथील जैव—विविधतेवर परिणाम पडला होता. केवळ नागरिकांमुळेच नाही तर प्रशासकीय धोरणामुळे सुद्धा (टायगर प्रोजेक्ट, कारखाने, रास्ते, रेल्वे) नैसर्गिक संसाधनाचे नुकसान होते. प्राणी जिवीत हानी होते. पक्षी स्थलांतरित होतात.

विज्ञानवादी दृष्टिकोन व मानवतावादी दृष्टीकोणाचा विकास करणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे. परंतु भारतात आजही मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा आहे. नरबळी, देवदासी प्रथा आहेत. ग्रहणा संबंधी अंधश्रद्धा आहेत. आजही अपत्यप्राप्तीसाठी महिलांना अघोरी प्रथेला बळी पडावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैज्ञानिक, विवेकी व मानवतावादी विचार होते. बाबासाहेब मानवतावाद व विज्ञानवादाचे कट्टर समर्थक होते. ते प्रखर स्त्रीवादी देखील होते. महिलांच्या कल्याणासाठी ते हिंदू कोड बिल तयार केले होते. परंतु आज महिलाच अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेली आहे. २१ व्या शतकात भारतात मुलीच्या जन्माचे स्वागत करा असे सांगावे लागते. ही शोकांतिका आहे. समानतेचे मूल्य अंगिकारायला अजून किती वर्षे लागतील ?

**मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांचे महत्व:** नागरिकांना हक्क प्राप्त होतात, तशी त्यांची काही कर्तव्येही असतात. हक्क आणि कर्तव्य ही परस्परांशी संबधित आहेत. कारण एकाचे हक्क हे दुस—याचे कर्तव्य असते. आपले हक्क सुरक्षित राहावे अशी आपली अपेक्षा असते. त्याचप्रमाणे दुस—यालाही त्याचे हक्क उपभोगता आले पाहिजे. मूलभूत हक्क आणि कर्तव्ये ह्याचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

राज्याने तयार केलेल्या कायद्यांचे पालन करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. सर्वांनी कायद्याचे पालन केल्यास समाजात शांतता व सुव्यवस्था टिकून राहिल. एखादा कायदा हा अन्यायकारक असेल तर शांततामय आणि कायदेशीर मार्गाने नागरिक त्या कायद्याला विरोध करू शकतात आणि त्यात बदल घडवून आणू शकतात. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायदे असतात म्हणजे प्रत्येक नागरिक हा सुरक्षित असला पाहिजे हा त्याचा हक्क असतो तर प्रत्येक नागरिकाने कायद्याचे पालन करणे हे त्याचे कर्तव्य असते.

शासन हा विविध घटकांवर कर आकारत असतो. कारण कराच्या माध्यमातून शासनाजवळ भांडवल (उत्पन्न) येते आणि या उत्पन्नातून राज्य विकासाची कामे करतो. म्हणून राज्याने आकारलेले कर (पाणी, वाहतूक, शेती) ही व इतर कर भरणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य ठरते. मात्र आज नागरिकांना मात्र खूप मोठ्या प्रमाणात कारचे भरणे करावे लागत आहे. उदा. जी.एस.टी.

भारतीय संविधानाने मानवाला जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिले आहेत. त्याला शिक्षणाचा, जगण्याचा, व्यवसायाचा, अभिव्यक्तीचा, मतदानाचा एकंदरीत मानव म्हणून जीवन जगण्याचा अधिकार मिळालेले आहेत. परंतु प्रत्येक नागरिकाने स्वातंत्र्य, समता, बंधूता, सामाजिक न्याय, राष्ट्रप्रेम ह्या मूल्यांचा नैतिक कर्तव्य म्हणून पालन केले तरच कोणत्याही व्यक्तिच्या स्वातंत्र्यावर किंवा त्यांच्या जगण्यावर गदा येणार नाही. म्हणून मानवाच्या, राष्ट्राच्या, राज्याच्या विकासासाठी मूलभूत हक्क गरजेचे आहेत तेवढेच कर्तव्यही गरजेचे आहे. उदा. एखादी स्त्रीने नोकरी करणे हे तिचा अधिकार आहे परंतु घरातील सदस्यांनी व कामाच्या ठिकाणचे सहका कायद—यांनी तिला सहकार्य करणे व पोषक वातावरण तयार करणे हे सर्वांचे कर्तव्य ठरते. दलितांना, आदिवासींना, मागासवर्गीयांना महिलांना, अल्पसंख्याकांना घटनेने अनेक अधिकार विविध कायदे करून दिलेले आहेत. मात्र त्यांचा विकास करणे आपले कर्तव्य आहे असे वाटत नाही ते दडपशाहीचा वापर करून सर्व वंचित घटकांचे शोषण करतात. म्हणून आज ही स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सव साजरा होतांना आदिवासी, दलित, महिलांवर अनेक अन्याय — अत्याचार होत आहेत. रायगड जिल्ह्यातील आदिवासींना २—३ हजारासाठी आपली मुल विकतांनाचे प्रकरण उघडकीस आले. टायगर प्रोजेक्ट च्या नावाखाली आदिवासींना विस्थापित करीत आहेत. दलित म्हणून अस्पृश्यांचे चटके आजही बसत आहेत. शिक्षणाचे खाजगीकरण करून वंचितांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा घाट सुरू आहे. सर्व भारतीय नागरिकांना निर्भय, आनंदी, समाधानकारक जगू द्यायचे असेल चांगली मानसिकता (मानवतावाद) असलेल्या व्यवस्थेची गरज आहे असा विचार प्रस्तुत निबंधात मांडत आहे.

हक्क आणि कर्तव्ये ही परस्परांशी संबंधित आहेत. प्रत्येक हक्काबरोबर कर्तव्यांचे पालन करणे अपरिहार्य ठरते. कर्तव्याची जाणिव समाजातील लोकांना नसेल तर अधिकाराचाही उपयोग सर्व व्यक्तींना घेता येणार नाही. म्हणून हक्क व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. व्यक्तीला जे हक्क प्राप्त होतात स्वाभाविकच व्यक्तिने समाजासंबंधीची आणि राज्यासंबंधीची आपली कर्तव्ये पार

पाडणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीकडून समाज विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची अपेक्षा करतो. समाजाची ही अपेक्षा म्हणजेच व्यक्तीचे कर्तव्य होय. जी व्यक्ती आपल्या कर्तव्य पालनाबाबत दक्ष असते तिलाच हक्कांची मागणी करण्याचा नैतिक अधिकार प्राप्त होतो. केवळ हक्कांचा लाभ घेऊन कर्तव्यांकडे दुर्लक्ष केल्यास समाजाचे स्वास्थ्य धोक्यात येईल. जी गोष्ट व्यक्ती आणि समाज हयांतील संबंधाबाबत खरी आहे. तीच व्यक्ती आणि राज्य यांतील संबंधाबाबतही खरी आहे. राज्याकडून नागरिकांच्या अनेक प्रकारच्या अपेक्षा असतात. कायदा आणि सुव्यवस्था राखणे, नागरिकांच्या हक्काचे रक्षण करणे, समाजाचा सर्वांगीण विकास साध्य करणे अशा अनेक जबाबदा—या राज्याला पार पाडाव्या लागतात. हयासारखी विविध कार्ये राज्याने योग्यरित्या पार पाडून नागरिकांचे संरक्षण करावे अशी अपेक्षा असेल, तर नागरिकांनी सुद्धा राज्यासंबंधीची आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. (उदा. — सार्वजनिक मालमत्तेचा योग्य वापर, स्वच्छता इत्यादि) तेंव्हाच विकास साधता येईल. 'सबका साथ, सबका विकास' केवळ अशा घोषणा देऊन विकास साधता येत नाही.

**निष्कर्ष:** मूलभूत हक्क आणि कर्तव्ये ह्यांचा अभ्यास करतांना असे दिसून येते कि, हक्क व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सध्या देशात परिस्थिती पाहता असे लक्षात येते कि, राज्याला आणि नागरिकांना त्यांच्या कर्तव्यांचे विसर पडत आहे कि काय ? असा संभ्रम निर्माण झाला आहे. प्रत्येकजण आपल्या हक्कांचे बोलतो आहे. परंतु दुस—या बाजूने असे निदर्शनास येते कि, आजच्या घडीला सुद्धा अनेकांना त्यांचे हक्कचं माहीत नसतात / हक्क प्राप्त झालेले नाहीत त्यामुळे त्यासाठी आंदोलने मोर्चे करावे लागतात. भारतीय राज्य घटनेची जात, धर्म, लिंग, भाषा, प्रदेश ह्यांचा कोणताही भेद न करता समानतेचा हक्क दिलेला आहे. कायद्यापुढे सर्व व्यक्ति समान आहेत असे हा कायदा आपल्याला सांगतो. परंतु कायद्यानुसार वर्तन करीत नसल्यामुळे समस्या निर्माण होतात. भारतीय संविधानाने भारतीय नागरिकाला भाषणाचे, व्यवसायाचे, शिक्षणाचे, धर्म निवडीचे स्वातंत्र्य दिलेले आहे परंतु वर्चस्व निर्माण करू पाहणा—या संघटना नागरिकांच्या मौलिक अधिकारांचे हनन करीत आहे. कुणि काय खायचे, कुणि काय परिधान करायचे हे ठरवितांना दिसून येत आहे. राष्ट्रद्रोहाचे खटले दाखल होत आहेत. सांप्रदायिकता वाढत आहे. एका विशिष्ट संप्रदायाबद्दल समाजात घृणास्पद वातावरण निर्माण करीत आहेत. सत्ताधारी वर्ग सत्तेचा दुरुपयोग करतांना दिसून येत आहे. उदा. विरोधी पक्षाच्या नेत्यावर ई. डी. चे छापे, अर्बन नक्षलवादी, सामान्य आदिवासींना नक्षलवादी ठरविल्या जात आहे. ह्या व अनेक उदाहरणांवरून मौलिक हक्कांचे, मूल्यांचे, कर्तव्यांचे हनन होत आहे हे निश्चितपणे म्हणता येईल.

नजीकच्या काळात स्वतंत्र विचार करणारे विचारक, पत्रकार, आदिवासी कार्येकर्ते, माहिती अधिकारांची कार्येकर्ते, न्यायप्रक्रियेतील वकील, न्यायाधीश यांच्या हत्या झालेल्या पाहिली आहोत. वस्त्या जाळल्या, बुलडोझरने नष्ट केल्या, विद्यार्थ्यांना अमानुष मारलं गेलं, निरपधरांना तुरुंगात डांबल गेलं. खून, बलात्कार, झुंडबळी खुले आम झालेले दिसून आले. इतर धर्माविषयी असहिष्णुता, संविधानीकरीत्या निषेध करणा—या. शेतक—यांना अपमानास्पद वागणुक त्यांना देशद्रोही म्हटले गेले. अशात—हेने लोकशाहीची पायाभूत मूल्यं आणि संविधानातील निर्देश पायदळी तुडविल्या जात आहेत. म्हणूनच लेखकानं, कलावंतानं, शास्त्रज्ञानी आपला समाजात पोहचविणे गरजेचे आहे. ही आजच्या घडीची गरज झाली आहे. ह्यासाठीच मूलभूत हक्क आणि कर्तव्याचा अभ्यास करणे काळाची गरज आहे. आपण संविधानाला जितके सक्षम बनवू तितकेच संविधान लोकांना अधिकार देते.

सर्वोच्च न्यायालयात २६ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या कार्यक्रमात देशाचे पंतप्रधान ह्यांनी कर्तव्यपालनास प्राधान्य द्या ! असे आवाहन केले. ते म्हणाले की, समानता आणि सशक्तीकरण या संकल्पनांना नीट समजून घेण्यासाठी तरुणांमध्ये राज्यघटनेविषयी जागरूकता वाढविण्याचे प्रतिपादन केले. कारण आज देशात परिस्थितीच अशी निर्माण झाले आहे की, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करण्यावर बंदी आली आहे. असे वाटायला लागले आहे. म्हणूनच देशाच्या पंतप्रधानांना प्रत्येक नागरिकाने आपली मूलभूत कर्तव्य पार पाडण्यास प्राधान्य द्यावे असे आवाहन करायची गरज वाटली.

***संदर्भ:***


*१. आंबेडकर, बाबासाहेब, 'भारताचे संविधान,' सुधारित आवृत्ती २० ऑक्टोबर २०२२.*
*२. चव्हाण, शांताराम, गवई, सुभाष एस., 'भारतीय राज्यव्यवस्था,'वेद मुद्रा प्रकाशन, जुलै २०१०, अमरावती.*
*३. थोरात, सुखदेव, 'भारतातील दलित समाज' सामूहिक विधिलिखिताच्या शोधात, सेज प्रकाशन, नई दिल्ली, २००९.*
*४. दीक्षा (सकाळ) धम्मचक्र प्रवर्तनदिन विशेषांक — २०२२ सकाळ मिडीया प्राइव्हेट लिमिटेड, नागपूर — २०२२.*
*५. आंतर भारती — दिवाळी विशेषांक — २०२२.*
*६. www-mathsisfuns-com-*
*७. चिदम्बरम, पी, 'हिजाब' निवड की सक्ती ? लोकसत्ता, २३ ऑक्टोबर २०२२.*
*८. लोकसत्ता, २७ नोव्हेंबर २०२२.*
*९. लोकसत्ता, २९ नोव्हेंबर २०२२.*

# अपंग आणि कुष्ठबाधितांच्या सक्षमीकरणात आनंदवनाचे योगदान

*डॉ. प्रवीण दिगांबर मुधोळकर, pmudholkar17@gmail.com*

***सारांश:*** *प्रस्तुत अध्ययनात आनंदवनातील कुष्ठबाधितांच्या समस्या आणि त्यांनी त्यावर केलेली मात याबाबत विश्लेषण करण्यात आलेले आहे. रस्त्यावर पडलेल्या एका कुष्ठरोग्याच्या दयनीय स्थितीने विश्वविख्यात कुष्ठसेवक बाबा आमटे यांच्या विचारात आणलेल्या बदलाने आनंदवनाची निर्मिती झाली.आनंदवनाची निर्मिती हा योगायोग असला तरी कुष्ठबाधितांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांच्यासोबत केलेले कार्य, त्यांच्यात निर्माण केलेला आत्मविश्वास,तसेच स्वावलंबन, शिस्त, श्रमप्रतिष्ठेला दीलेले महत्व या सर्व गोष्टी आनंदवनाच्या अधिष्ठानासाठी कारणीभूत आहेत. बाबा आमटे यांच्या नंतर डॉ विकास आमटे यांच्या कल्पनेतून साकारलेल्या वेगवेगळे उपक्रम आणि स्वरानंदवनाने सुदृढ समाजाशी जवळीक साधल्यामुळे अंध अपंग यांच्याबद्दलची दयेची आणि लाचारीची भावना तसेच कुष्ठबाधितांबद्दलची लांछनाची भावना कमी होण्यास मदत झाली.कुष्ठमुक्त झालेल्या लोकांनी कुटूंब आणि समाजात परत जाण्याची संधी असतांनाही आनंदवनाला आपले कुटूंब मानून आपले संपूर्ण जीवन आणि कष्ट अर्पित केले आणि मानवतावादी,पर्यावरणपूरक अशा सौंदर्यस्थळाची निर्मिती केली.यासाठी कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या याचा अभ्यास याठीकाणी करण्यात आला आहे. विद्रुप जखमा,हातापायाला नसलेली बोटे किंवा संपूर्ण हात नसलेल्या लोकांनी समाजासाठी सुंदर वस्तूसोबतच नामांकित महाविद्यालयांचे देणे दीले. समाजाने नाकारलेल्या, बहिष्कृत केलेल्या शारीरीक व्यंगत्व असलेल्या लोकांनी ही निर्मिती केली. ही घटना मानवी समाजाच्या इतिहासातील परिवर्तनाचे महत्वपूर्ण उदाहरण आहे. या परिवर्तनासाठी कारणीभूत घटकांवर प्रस्तुत संशोधन विषय केंद्रीत आहे.*

***बिजशब्द—****अपंग, कुष्ठबाधित, सक्षमिकरण, आनंदवन.*

**प्रस्तावना:** मानवी इतिहास हा शोषक आणि शोषितांच्या संघर्षाच्या असंख्य घटनांनी भरलेला आहे. सत्ता आणि संपत्तीने संपन्न माणसांनी आपल्याच दुर्बल बांधवांवर अन्याय केल्याचे आपणास लक्षात येते. या अन्यायाला न्याय्य ठरविण्यासाठी अनेक साधनांचा आधार घेतल्या गेला त्यामध्ये वर्ण, जाती,धर्म या महत्वपूर्ण माध्यमांचा समावेश होता. भारतातील जातीवर आधारीत स्पृश्य—अस्पृश्यता, अमरिकेतील काळा आणि गोरा असा वर्णभेद किंवा कुष्ठरोगासारख्या ओंगळवाण्या रोगाने ग्रस्त अशा लोकांच्या समुदायाशी अमानवीय वागणूक असो. या सर्व शोषण आणि अन्यायाच्या समर्थनार्थ वरील सर्व बाबींचा सर्रास वापर झाल्याचे लक्षात येते. शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्षात शोषित वर्गांचा नाश होतो किंवा हे शोषित सुडाच्या भावनेने हिंसेचा मार्ग स्वीकारतात. भारतातील नक्षलवाद हे त्याचे समर्पक उदाहरण आहे. सामाजिक बहिष्कार किंवा अन्याय यामुळे काही जमातींनी गुन्हेगारीचा कायमस्वरूपात व्यवसाय म्हणून स्वीकार केला आहे. परंतू या असंतोषाला विधायक वळण दील्यास त्यातून मानवाचे कल्याण साधता येऊ शकते. हे काही प्रयोगशील घटनांनी दाखवून दीले आहे. अमेरिकेतील निग्रोंना गुलामीतून मुक्त केल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी जॉर्ज वाशिंग्टन कार्व्हर यांचे प्रयोगशील प्रयत्न, तसेच आनंदवनातील अंध, अपंग आणि कुष्ठबाधितांच्या सक्षमीकरणासाठी कुष्ठसेवक बाबा आमटे आणि त्यांचे सुपूत्र डॉ. विकास आमटे यांनी केलेले प्रयत्न व त्यातून घडलेले परिवर्तन हे मानवी समाजाच्या इतिहासातील एक महत्वपूर्ण उदाहरण आहे.जीवनभर गुलामी अनुभवलेले, न्युनगंडामुळे आत्मविश्वास हरवीलेले अमेरीकेतील निग्रो तसेच समाज आणि कुटूंब यापासून बहिष्कृत, एकाकी झालेले सामाजिक अन्यायामुळे दुखावलेले कुष्ठबाधित लोक या दोनही वर्गाच्या मनातील असंतोष हे त्यांच्यातील साम्य दर्शवीते. पण याच लांच्छनग्रस्त, अपमानीत, सर्वस्व गमावलेल्या कुष्ठमुक्तांनी समाजाच्या अन्यायाची परतफेड अन्न पाणी शिक्षण यासारख्या सुविधांच्या रूपात करावी ही मानवजातीच्या इतिहासातील दुर्मिळ स्वरूपाची सामाजिक घटना आहे. वंचितांच्या जीवनातील सकारात्मक परिवर्तनाचे या संशोधन विषयात शास्त्रीय स्वरूपात विश्लेषण केले आहे.

**अध्ययनाची उद्दीष्टे:** १) कुष्ठरोगाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि कुष्ठबाधितांच्या समस्यांचे अध्ययन करणे. २) आनंदवनाव्दारे कुष्ठबाधितांच्या सक्षमीकरणासाठी केल्या गेलेल्या प्रयत्नांचे अध्ययन करणे. ३) आनंदवनातील कुष्ठबाधितांच्या जीवनात आलेल्या परिवर्तनाबाबत विश्लेषण करणे.

**कुष्ठरोगाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:** कुष्ठरोग हा मानवाइतकाच जुना आहे. जगातील कुठल्या ना कुठल्या देशात याचे अस्तित्व दीसून येते. आणि काही कारणांमुळे याचे अस्तित्व नष्ट देखील झाल्याचे लक्षात येते. पण या पृथ्वीतलावर कुठे ना कुठे तो मानवी शरीराची नासधुस करीत असतो. कुष्ठरोग पसरण्यासंबंधी अनेक लोकांचे वेगवेगळे मत आहेत. चीन, आफ्रीका आणि भारताचा उल्लेख कुष्ठरोग पसरण्यासंदर्भात होत असला तरी हा रोग पसरण्यामागे अनेक कारणे होती. आज युरोपात कुष्ठरोग दीसत नाही परंतू एकेकाळी येथेही कुष्ठरोग पसरला होता. ज्यू, अरब आणि क्रुसेडस् (मुसलमान आणि ख्रिश्चनांची जेरूसलेमसाठी झालेली युध्दे) मध्ये भाग घेतलेल्यांकडून कुष्ठरोग युरोपात पसरायला मदत झाली. बाराव्या शतकात केवळ लंडनमध्येच सात कुष्ठरूग्णालये (लाझरेटो) होती. फ्रांसमध्ये तर जवळजवळ सर्व मोठया गावात एखादे तरी कुष्ठरूग्णालय असे. त्या काळात कुष्ठरोग्यांची सेवाशुश्रूसा करणारे अनेक धार्मिक पंथ निघाले होते. कुष्ठरोग हा संसर्गजन्य मानला जाई. शिवाय त्यावर औषध माहित नसल्याने कुष्ठरोग्यांना समाजापासून दूर ठेवल्या जाई.काही ठीकाणी तर 'कुष्ठरोग्याला समाजापासून दूर ठेवण्याची पध्दत ' म्हणून

काही खास 'विधी' अस्तित्वात होते. भारतात देखील या रोगासंबंधी भ्रामक समजूती असून कुष्ठरोग्याला विविध राज्यांमध्ये अमानवीय वागणूक देण्याच्या वेवेगळया पध्दती अस्तित्वात होत्या. कुष्ठरोगाला फक्त एक रोग किंवा व्याधी म्हणून स्वीकारले गेलेले नाही.संपुर्ण जगात कुष्ठरोगाकडे अतिंद्रीय शक्तीचा परिणाम किंवा पुर्वजन्माचे पाप म्हणून पाहिल्या जाते. कुष्ठरोगाचा संबंध हा अनैतिक वर्तन किंवा तथाकथित अशुध्द रक्ताशी देखील जोडल्या जातो.याकडे एक लाच्छन किंवा अपराध म्हणून पाहिले जाते. ज्याचे परिणाम संबंधित कुटूंबाला भोगावे लागतात. कुष्ठरोगाशी जुळलेला लांच्छनाचा संबंध हा धर्माशी जोडल्या जातो. कुष्ठरोग हा ईश्वराने दीलेली शिक्षा किंवा पाप आहे असे मानल्या जाते. कुष्ठरोग हा माणसाला जीवनाच्या सर्वच क्षेत्रातून उध्वस्त करून टाकतो म्हणूनच त्याला दीलेल्या महारोग या नावामध्ये त्याचे नाममाहात्म्य दीसून येते. कुष्ठरोग हा त्वचा आणि मज्जातंतूचा आजार **'मायक्रोबॅक्टेरियम लेप्रि'** या जिवाणुमुळे होतो. कुष्ठरोगावरील उपचारामध्ये सर्वात प्रचलित डॅप्सोन हे औषध दिले जात असे. जेव्हा हे औषध नव्याने वापरात आले, त्यावेळी त्याची परिणामकारकता उत्तम होती. पण काही वर्षामध्ये डॅप्सोन प्रतिकार जिवाणू आढळल्यानंतर बहु उपचार पध्दती वापरण्यात येऊ लागली.

**आनंदवन या समाजसेवी संस्थेची निर्मिती आणि त्याची वैचारिक तत्वप्रणाली:** आनंदवन ही कुष्ठरूग्णांच्या पुनर्वसनासाठी समर्पित संस्था महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हयातील वरोरा या तालुक्याच्या ठीकाणी आहे. कुष्ठरूग्णांच्या आश्रय, उपचार व पुनर्वसनासाठी फादर डेमियन, महात्मा गांधी, मनोहर दिवाण, शिवाजीराव पटवर्धन यासारख्या अनेक लोकांकडून अनेक प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यातील मुरलीधर देवीदास उर्फ बाबा आमटे यांनी स्थापन केलेले आनंदवन हे जगातील सर्वात महत्वाच्या प्रकल्पांपैकी एक आहे. आनंदवनाने कुष्ठरोगाला कुरवाळत ठेवले नाही तर कुष्ठरोग्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना आपणही सामान्य माणसांप्रमाणेच आहोत ही भावना निर्माण केली. श्रमप्रति ठेतून सन्मान प्राप्त झाल्यामुळे त्यांच्यातील न्युनगंड दूर होऊन त्यांच्यातील अपार कौशल्यांची अनुभूती आली. आत्मप्रतिष्ठेमुळे ते जीवनातील नकारात्मक भावनेपासून दूर राहीले आणि आपल्यातील कलागुणांचा उपयोग समाजासाठी केला. भीती न्युनगंड यामुळे ग्रस्त असलेल्या कुष्ठबाधितांचे पुनर्वसन हे इतर व्याधींपेक्षा वेगळया स्वरूपाचे आणि आव्हानात्मक कार्य होते. या पुनर्वसन कार्यात आनंदवन हे यशस्वी मॉडेल ठरले. कुष्ठरोगाशी घृणा, कीळस आणि बहिष्कृततेची भावना संबधीत आहेत. जगातील अनेक देशांच्या विविध परंपरांनुसार या कुष्ठरोग्यांशी व्यवहारांच्या पध्दती या अमानवीय होत्या असे लक्षात येते. अशा भयाण परिस्थितीत बाबा आमटे यांनी जे कार्य करून दाखवीले ही घटना जगाच्या इतिहासातील उल्लेखनीय घटना होय. कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन, त्याचा आनंदवन निर्मितीत सहभाग आणि पुढे सर्वांगिण विकास ही अशक्यप्राय वाटणारी गोष्ट शक्य होण्यामागे बाबा आमटे यांचे व्यक्तीमत्व कारणीभूत आहे. जमीनदारीचे ऐश्वर्य त्यागून सेवाकार्यात झोकून देण्याची त्यांची तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. आणि याच तळमळीतून आनंदवन उभे राहीले. कुठल्याही संस्था उभे राहणे, टीकणे आणि अखंड प्रगतीच्याच दीशेने वाटचाल करीत राहणे हे फार मोजक्या संस्थांच्या बाबतीत अनुभवायला मीळते. आनंदवन संस्थेचा पाया भक्कम करण्यात बाबा यांनी काय केले हे पाहणे महत्वाचे आहे. वर आलेल्या उल्लेखानूसार बाबा आमटे यांना एक कुष्ठरोगी रस्त्याच्या कडेला आढळून आला. त्याचे नाव तुळशीराम होते. त्याची दयनीय अवस्था बाबांना अस्वस्थ करून गेली. या घटनेने त्यांच्या मनावर परिणाम झाला. त्यामुळे त्यांनी कुष्ठसेवाकार्यात स्वत:ला झोकून दीले. त्यासाठी त्यांनी कुष्ठरोग कार्यकर्त्याचे प्रशिक्षण घेतले. कुष्ठकार्यात गढून गेल्यावर त्यांना असे लक्षात आले की विकृती झालेल्या कुष्ठबाधिताला समाज आणि त्याचे कुटूंब स्वीकारास मान्यता देतच नाही. त्यामुळे त्यांच्यात आनंद निर्माण करण्यासाठी त्यांना कामात गुंतवणे आवश्यक आहे. बाबा आमटे यांनी हया संस्थेची पायाभरणी फार वेगळया पध्दतीने केली असे लक्षात येते.

**आनंदवन निर्मितीमध्ये बाबा आमटे याच्यासोबत कुष्ठबाधितांचा सहभाग:** कुष्ठरूग्णांची घाणेरडी जागा म्हणून ओळखली जाणारी ही भूमी आणि तेथील कुष्ठभूमीपुत्र हे समाजाच्या घृणेचाच विषय होता. बाबांनी त्यांच्या कार्यात गांधीवादी तत्वाव्दारे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. **'हाथ लगे निर्माण मे, न मॉगने नही मारने'** आणि **'श्रम ही श्रीराम है हमारा'** अशा प्रेरणात्मक विचारांनी कुष्ठबाधितांमधील श्रमावरची निष्ठा कायम राहीली. स्वयंपुर्ण समाजाची निर्मिती हे आनंदवन प्रकल्पाचे प्रमुख वैशिष्टय राहीलेले आहे. या प्रकल्पांतर्गत २००० पेक्षा जास्त व्यक्ती भारताच्या विविध भागांमधून आलेल्या असून त्यांच्या बहुतांश गरजा ते स्वत:च भागवीत आहेत. यातूनच एक स्वयंभू गाव विकसीत झाले आहे. येथील कुष्ठबाधित व्यक्तींच्या कौटुंबिक, सामाजिक जीवनाची पायाभरणी ही बाबा आमटे आणि त्यांच्या सहचारीणी स्व. साधनाताई आमटे यांच्या काळात झाली. या भूमीवर हळूहळू समाजातील कुष्ठरोगी मोठया प्रमाणात येवू लागल्यावर त्यांच्या सहजीवन अर्थात वैवाहिक जीवनाचा प्रश्न निर्माण झाला. या कुष्ठरोग्यांपैकी बहुतांश लोक हे एकएकटे होते. कारण कुष्ठरोगामुळे कुणी नवऱ्याने सोडलेल्या स्त्रीया, किंवा बायकांनी सोडलेले पुरूष होते. एकटेपणामुळे नैराश्याच्या अधिन झालेल्या या लोकांना अन्न वस्त्र निवारा प्रतिष्ठा यासोबतच लैंगीक भावनांची पुर्ती देखील आवश्यक होतीच. यावर साधनाताई यांनी कुष्ठरोग्यांचे आपसात विवाह करण्यात यावे यासाठी आग्रह धरला. त्यातून पुढे कुष्ठरोग्यांची कुटूंबे निर्माण झाली. १९५६ नंतर आनंदवन प्रकल्पाच्या कार्याने झपाटयाने वेग घेतला. कौटुंबिक समाजजीवन सुरू झाल्यावर गरजांमध्ये वाढ होत गेली. या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने विविध प्रकल्प हाती घेण्यात आले. परिणाम स्वरूप प्रत्येक गरजेची वस्तू आनंदवनात निर्माण

होत असल्याचे लक्षात येते. सामुदायीक विकास प्रकल्पांच्या धर्तीवर महात्मा गांधींच्या संकल्पनेतील स्वयंपुर्ण खेडे येथे साकारल्याचा अनुभव येतो. पण आनंदवन येथेच थांबले नाही. बाबा आमटे यांच्या प्रोत्साहनाने कुष्ठरोग्यांमध्ये इतका आत्मविश्वास निर्माण झाला आहे की जे काही करायचे ते सर्वोत्तम करायचे या भावनेने आनंदवनात मानवी गरजांच्या पुर्ततेचे सर्व स्त्रोत निर्माण केल्या गेले. आज उर्जानिर्मीती, साधनांचा पुनर्वापर, यामुळे आनंदवन हे आदर्श खेडे म्हणून विकसीत झाले आहे.

**आनंदवनातील कुष्ठबाधितांच्या आनंदाचा स्त्रोत:** आपण कुष्ठरोगी असल्यामुळे आपण या जमीनीवर भार आहोत किंवा आपले जीवन निरर्थक आहे अशी भावना कुष्ठरोग्यांच्या मनात कधीच निर्माण होवू नये म्हणून बाबा आमटे यांनी फार सावधपणे नियोजन केले असल्याचे दीसून येते. कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन हेच त्यांच्या रोगावरचा प्रभावी उपाय आहे हे लक्षात घेवून त्यांना त्यांच्या परीने झेपतील अशीच कामे दीलीत. त्यामुळे रीकाम्या डोक्यात येणाऱ्या विघातक प्रश्नांना प्रतिबंध केल्या गेला. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांच्यातील सर्वोत्कृष्ट वस्तू निर्मितीच्या कौशल्यामुळे आपल्यातही वेगळेपण आहे ही भावना त्यांच्यात निर्माण झाली. यामुळे त्यांना समाजात मान मीळू लागला. त्यामुळे ते स्वत:वर प्रेम करू लागले. त्यांच्या जीवनातील सर्व गरजा पुर्ण झाल्यामुळे त्यांना जीवनात समाधान प्राप्त झाले. बाबा आमटे यांनी या लोकांसाठी अनेक उपक्रम सुरू केलेत. त्यामध्ये सीनेजगतातील प्रसिध्द व्यक्ती, संगीत कलाकार, राजकीय नेते यांच्या आनंदवनाला भेटी घडवून आणल्यामुळे कुष्ठरोग्यांच्या जीवनातील उदासीनता दूर होवून त्यांच्या जीवनात चैतन्य निर्माण झाले. कारण बाहेरील समाजात राहून मीळणारी तुच्छता आणि हिन भावना यापेक्षा आनंदवनात मीळणारी सन्मानाची वागणुक, कामातून मीळणारा आनंद, सर्व गरजांची पूर्ती यामुळे तृप्त झालेल्या कुष्ठरोग्यांनी आनंदवनाला आपली कर्मभूमी मानून आपले जीवन आनंदवनाच्या कार्याला समर्पित केले. ही आनंदवनाच्या कार्याची फलश्रुती होय. आनंदवनाच्या निर्मितीत 'व्यक्तीसाठी नाही तर व्यक्तीसोबत' या तत्वाने व्यक्ती आणि समुदायाच्या समस्या सोडविण्यावर व त्यांच्या सक्षमीकरणावर भर दील्याचे लक्षात येते. बाबा आमटे यांच्या काळात दोन नामवंत महाविद्यालये तयार झाली होती. विशेष म्हणजे या महाविद्यालयांच्या निर्मितीमध्ये कुष्ठमुक्त कार्यकर्त्यांचा फार मोठा सहभाग होता. या शैक्षणिक संस्थांमुळे परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक अडचणी दूर होण्यास मदत झाली.

**डॉ. विकास आमटे यांच्या प्रयोगशील कार्यात कुष्ठबाधित व अपंगांचा सहभाग:** बाबा आमटे यांनी कुष्ठबाधितांना आश्रय, उपचार, रोजगार देऊन त्याचे पुनर्वसन केले. आनंदवनाचे कार्य मार्गी लागल्यानंतर बाबा आमटे यांनी पाणी, पर्यावरण, राष्ट्रीय ऐक्य, मोठी धरणे यासारख्या प्रश्नांमध्ये लक्ष घातले. त्यामुळे डॉ विकास आमटे यांच्याकडे आनंदवनाची जबाबदारी आली. अंध अपंग कुष्ठबाधित लोकांसोबत काम करणे फार कठीण होते. परंतू डॉ. विकास आमटे यांनी कल्पकतेने या सर्वांचे नियोजन करून आव्हानांचा स्वीकार केला. त्यांनी आनंदवनातील विभिन्न प्रकल्पांना कल्पकतेने जोडले. डॉ विकास आमटे यांनी खालील प्रश्नांवर काम केले.

**पाण्याची कमतरता:** १९७९ मध्ये डॉ. विकास आमटे यांनी श्रमदानातून पहिला तलाव खोदला. त्यानंतर अनेक तलाव आनंदवनात खोदले गेले. पाण्याचे पुनर्भरण झाल्यामुळे अशोक बोलगुंडेवार या तंत्रज्ञाच्या मार्गदर्शनात कुठलेही परिपूर्ण असे तंत्रज्ञान आणि साधने नसतांना प्रयोग पध्दतीने अनेक विहिरी, बोअरवेल्स खोदण्यात आल्यात.

**जलक्रांतीतून हरितक्रांती:** तलावाचे खोलीकरण झाल्यामुळे आनंदवनात पाण्याचे रीचार्जींग झाले. त्यातून आनंदवनाची शेती आणि फळबागा फुलल्या, पॉलिहाऊस मधूनही भाजीपाला उत्पादन घेतल्या जाऊ लागले. तलावातून मत्स्योत्पादन होऊ लागले. तलावातील पाण्याचा उपयोग प्रोटीनयुक्त चारा लागवडीसाठी झाला आणि त्यातून पशूधन आणि दुग्धोत्पादन वाढत गेले.

**हरितक्रांती ते धवलक्रांती:** प्रोटीनयुक्त चारा आणि त्यातून पशूधन आणि दुग्धोत्पादनाची वाढ यामुळे आनंदवनात आणि परिसरामध्ये दुध आणि त्यापासून बनविलेले पदार्थ यांची मोठी मागणी निर्माण झाली. गजानन वसु या कुष्ठमुक्त कार्यकर्त्याच्या प्रयोगशीलतेमुळे आनंदवनातील डेरी अत्याधुनिक बनली. त्यांने गाई म्हशी आणि त्यांचा चारा यांचा अभ्यास वेगवेगळया ठीकाणी जाऊन केला. दुधापासूनही वेगवेगळे पदार्थ तयार केले. वरोरा येथील लोकांना ते फार आवडले. कधीकाळी कुष्ठरोग्याचा हात लागला म्हणून वस्तूला नाकारणारे लोक अनेक तास रांग लावून दुध आणि इतर ऊत्पादने घरी न्यायला लागली. आनंदवनाच्या डेअरीचे दुध १० ते २० रूपयांनी महाग विकल्या जात असूनही लोक आनंदाने घेत असत.२००९ साली डेअरीचा टर्नओव्हर ३२ लाख तर त्याच्या पुढच्या वर्षी ८५ लाखांवर पोहोचला. २०१२—१३ साली तो एक कोटींवर पोहोचला. सातवा वर्ग उत्तीर्ण असलेल्या कुष्ठमुक्त व्यक्तीने केलेले हे कार्य म्हणजे उद्योजकतेमधील यशस्वीतेचे आगळेवगळे उदाहरण होते.

**पशुधनापासून उर्जानिर्मिती:** डेअरीतील पशुधनापासून मिळणारे दुध महत्वाचे असले तरी त्यापेक्षा शेण हे जास्त उपयुक्त ठरले कारण या शेणाचा उपयोग बायोगॅस मध्ये करण्यात आला. त्यामुळे कधीकाळी रोज २ हजार लोकांच्या स्वयंपाकासाठी लागणाऱ्या १८ गॅस सिलेंडर्सची बचत झाली. या प्रकल्पाचे व्यवस्थापन कुष्ठमुक्त कार्यकर्ते करीत असतात.

**कचऱ्यापासून खत निर्मिती:** आनंदवनातील लोकसंख्यमुळे कीचन वेस्ट वाढले. त्यातून सात बायोगॅस प्लॅंट तयार केले. याचा उपयोग चारा निर्मितीसाठी खत म्हणून झाला. यामुळे माशांच्या उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली.

**आनंदवनातील उद्योगक्रांती:** आनंदवनाच्या सुरूवातीच्या काळात येथे दाखल झालेली माणसे ही

शरीराने जीवंत असली तरी मनाने खचलेली असत, कुटूंबाने घराबाहेर हाकललेली जखमांच्या वेदना, नसांचे दुखणे, जीवनाप्रती नैराश्याचा भाव अशा विविध समस्यांनी ग्रस्त लोकांना मन गुतवण्यासाठी उद्योग सुरू करणे गरजेचे होते. यासाठी बाबा आमटे यांनी आनंदवनातील चरख्यांपासून उद्योगाला सुरूवात केली. पुढे आनंदवनात यंत्रावर टीन कॅन आणि इतर उत्पादने सुरू झाली. डॉ. विकास आमटे यांच्या काळात हॅंडलूम्सनंतर पॉवरलूम्स आले. मोठया प्रमाणात सतरंज्यांचे उत्पादन सुरू झाले. यासाठी सुधाकर कडू या तपोवनातून आलेल्या कार्यकर्त्याने महत्वाची भूमिका बजावली आनंदवनात टेबल, कपाट, खुर्च्या, पलंग, कुलर्स, व्हिलचेअर 'मायक्रो सेल्युलर रबरापासून बनणाऱ्या खिळेविरहित चपलां या सर्वांचे उत्पादन होऊ लागले. बाबा आमटे यांच्यांवर गांधी विचारांचा प्रभाव होता. ते श्रमप्रतिष्ठेला अत्यंत महत्व देत. कुष्ठरूग्णांना 'दान देऊ नका, तर संधी द्या' अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे आनदवनाची निर्मिती ही आपली व आपल्यासाठी आहे ही भावना कुष्ठरूग्णांच्या मनात पक्की रूजली. यामुळे कुष्ठरूग्ण हे पक्के उपक्रमशील बनले व ते आनंदवन निर्मितीच्या प्रक्रियेत सामिल झाले. बाबा कुष्ठरूग्णांना राबवून घेतात असा आरोप होत राहीला. पण बाबा आमटे आपल्या भूमिकेपासून ढळले नाहीत. त्यामुळे आनंदवन उभारणीचा पाया मजबुत झाला. तो आजही तसाच मजबूत आहे.

**कुटीर आणि कलात्मक उद्योग:** ज्या व्यक्तींना अवजड कामे शक्य नाही त्या सर्व लोकांना शिलाईकाम आणि शुभेच्छापत्र तयार करण्याचे काम दील्या गेले. कागदाचे तुकडे, धान्याचे फोलपट, केळीच्या साली, अशा टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून रिसायक्लींग आणि रियुज या तत्वावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे या उपक्रमातून पर्यावरणविषयक जनजागृती होत आहे.

**स्वस्त आणि टीकाऊ घरे:** आनंदवनाच्या सुरूवातीच्या काळात महाविद्यालयासहित अनेक इमारतींना आता ५० पेक्षा जास्त वर्षांचा कालावधी उलटला असल्यामुळे त्याला वाळवी आणि इतर समस्या तयार झाल्या. अशा परिस्थितीत कमी किंमतीची घरे कुष्ठमुक्त लोकांनी बांधली. फक्त विटा आणि सिमेंट यांच्या उपयोगाने कार्यकर्त्यांची घरे, कार्यालये, महाविद्यालयाचे वर्ग खोल्या, प्राचार्यांचे कक्ष निर्माण करण्यात आले. हा उपक्रम मोठया प्रमाणात यशस्वी झाला. या सर्वच इमारती अजूनही भक्कमपणे दिमखात उभ्या आहेत.

**प्लास्टिक पुर्नवापर:** प्लास्टीकच्या अतिरेकी आणि अनियंत्रित उपयोगामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर आनंदवनाने पथदर्शी आणि प्रभावी प्रयत्न केले. गजानन वसु, या कुष्ठमुक्त व्यक्तीने प्लास्टीक निर्मुलनाच्या समस्येला हात घातला. प्लास्टीकच्या गाद्या बनवून त्याचा वापर आनंदवनाच्या दवाखान्यात करण्यात आला. याच चुऱ्याचा उपयोग कॉक्रीटमध्ये करण्यात आला. तसेच आनंदवनाच्या आसपासच्या दगडांच्या खाणीच्या खड्डयांमध्ये देखील प्लास्टीक भरून त्यावर माती टाकून जंगल निर्माण केले. जुन्या टायर्समध्ये प्लास्टीक मिश्रित सिमेंट भरण्यात आले व स्पिल ओव्हर डॅमची निर्मिती करण्यात आली. शासकीय पध्दतीच्या बंधाऱ्याच्या तुलनेत हे बंधारे स्वस्त आणि टीकावू असून सोमनाथ, मुळगव्हाण आणि आनंदवनाच्या परिसरात आजही मजबूत स्थितीत आहेत. यासोबतच आनंदवनाने नाविण्यपूर्ण पध्दतीने देशी वृक्षांची अभयारण्ये तयार केली आहेत.

**स्वरानंदवन वंचितांना समाजाशी जोडणारा सेतू:** स्वरानंदवन हा समाजाने नाकारलेल्या वंचित पिडीत लोकांना न्याय देणारा त्यांचे पुनर्वसन करणारा तसेच त्यांना प्रगतीच्या शिखरावर पोहोचविणारा असा एक उपक्रम आहे. अंध, अपंग, मुकबधिर आणि कुष्ठरोगी हे सर्व कलाकार वैशिष्टयपुर्ण आणि कौशल्याने कलेचे शिस्तबध्दतेने सादरीकरण करतात. वेदनेच्या नात्यांनी जोडलेल्या या वंचितांनी जाती, धर्म आणि इतर भेदांच्या पलिकडे जाऊन एकमेकांचा स्वीकार केला आहे. त्यातून इंटरकास्ट आणि इंटरडिसॅबिलीटी मॅरेज ही संकल्पना उदयास आली. त्यामुळे अपंगत्वाचे दु:ख कमी होऊन जीवन सुकर होण्यास मदत झाली. आतापर्यंत अशा प्रकारचे २०० पेक्षा जास्त विवाह या ठीकाणी संपन्न झालेले आहेत. अंध हा अपंग आणि मुकबधिराशी तर कुष्ठरोगी शारीरीक दृष्टया सुदृढ व्यक्तीशी विवाह करून आज आनंदात जगत आहेत. या प्रकल्पाचे मुख्य व्यवस्थापक सदाशिव ताजणे यांनी एका मुकबधिर मुलीशी विवाह केला. आज त्यांचे वैवाहिक जीवन यशस्वी आहे. स्वरानंदवन या उपक्रमामुळे समाजाचा आनंदवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण जास्त सकारात्मक झाला. त्यामुळे या लोकांचा साहित्य, नाटक आणि सीनेसृष्टीतील लोकांसोबत संपर्क आला.

**आनंदवन निर्मितीमध्ये कुष्ठबाधितांच्या सहभागीची कारणे:** कुष्ठबाधितांसोबत कार्य करतांना बाबा आमटे यांनी समाजकार्याला अभिप्रेत असणाऱ्या दक्षता घेतल्यामुळेच संस्था म्हणून महारोगी सेवा समितीची पायाभरणी अत्यंत मजबूतपणे झाली असे लक्षात येते. आनंदवनाच्या प्रगतीसाठी खालील घटक कारणीभूत होते.

१) कुष्ठरोगाशी संलग्नीत नकारात्मकता आणि उदासीनतेतून व्यक्ती भिक्षावृत्ती किंवा आत्महत्येकडे वळतो. बाबा आमटे यांच्या श्रमप्रतिष्ठेच्या तत्वामुळे कुष्ठबाधितांना या गोष्टींपासून दूर ठेवण्यात यश मिळाले. कुष्ठबाधितांच्या जीवनात एकाकीपण येऊ नये म्हणून विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला आनंदवनाशी जोडण्याचा प्रयत्न केला. मानवी मुल्ये आणि व्यक्तींच्या कलागुणांना बाबा आमटे यांनी निरंतर प्रोत्साहन दीले. आनंदवन येथील संस्थात्मक परिवेशात रूग्णांना उपचारादरम्यान काटेकोरपणे औषधे घेणे बंधनकारक असल्यामुळे येथील व्यक्ती निश्चितपणे रोगमुक्त होतो तसेच त्याच्या विकृतीवर आळा बसतो. त्यामुळे कुष्ठरोग निर्मुलनासाठी आनंदवन हे विश्वासाचे ठीकाण बनले.

२) आनंदवनातील वातावरण, जेवण, शिस्त, कामाचे स्वरूप मनोरंजनाची साधने आणि त्यांच्या आरोग्यात सुधारणेची हमी यामुळे येथील रूग्णाचा जीवनक्रम आनंदी असून त्याला आपल्या कुटूंब किंवा समुदाय यापासून दूर असल्याचे दु:ख कमी प्रमाणात

जाणवते. समाजात कुष्ठरोगामुळे होणाऱ्या अपमानापेक्षा समाजापासून दूर आनंदवनातील सन्मान हा त्याला सुसहय वाटतो. त्यामुळे भिक्षावृत्ती किंवा आत्महत्या अशा विचारांपासून तो दूर राहातो.

३) आनंदवनाने उपचारानंतर बरे झालेल्या कुष्ठबाधित लोकांना तेथील विकासप्रक्रीयेत सामावून घेतले. त्यांच्यातील गुण आणि कौशल्ये ओळखून त्यांच्याकडे संस्थेच्या प्रशासकीय आणि आर्थिक व्यवहारांची जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे या लोकांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण होण्यास मदत झाली. त्यामुळे एकदा आनंदवनात आल्यावर त्यांना ही संस्था सोडून दुसऱ्या संस्थेत जाण्याची गरज वाटत नाही. ही या संस्थेची जमेची बाजू होय.

४) आनंदवनात 'इंटरकास्ट आणि इंटरडिसॲबिलीटी मॅरेज' आणि संतती जन्माला घालण्याचे स्वातंत्र्य यातून कुष्ठबाधितांच्या मानवाधिकारांना महत्व दील्या गेल्याचे लक्षात येते. सामान्य निरोगी माणसाला समाजात राहून गरजांची पूर्ती आणि सामाजिक जीवनाचा जो आनंद मिळतो तसाच आनंद संस्थेतील कुष्ठरूग्णांना प्राप्त होतो. यामुळे समाजापासून वेगळे पडल्याची भावना, स्वयंकेंद्रीतता किंवा न्युनगंड यापासून कुष्ठरूग्ण दूर राहू शकले.

५) संस्थेचा प्रमुख आणि पालक या नात्याने बाबा आमटे यांची कृतीशीलता आणि सकारात्मक तत्वज्ञान यामुळे कुष्ठबाधितांमध्ये जीवनाबाबत सातत्याने सकारात्मक दृष्टीकोण कायम ठेवण्यास मदत झाली.

६) कुष्ठबाधितांनी आपल्यातील कलागुणांचे सर्वश्रेष्ठ प्रदर्शन केल्यामुळे समाजाचा कुष्ठबाधितांकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलला. आनंदवन ही कुष्ठरोग्यांची भूमी नसून कर्तृत्वाची आणि पुरूषार्थाची भूमी आहे याची समाजाला जाणिव झाली. त्यामुळे कुष्ठबाधित लोकांना सामान्य व्यक्तीप्रमाणे मान मीळू लागला.

७) आनंदवनातील कुष्ठबाधितांनी समाजाला सर्वोत्तम आहे ते देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे समाजात त्यांच्याप्रती सदिच्छा निर्माण झाली. समाजाचा मोठा वर्ग आनंदवन आणि त्यांच्या कुष्ठबाधित लोकांच्या कार्याने प्रभावित झाला. अनेक सीनेकलावंत आनंदवनाला भेटी देतात व आनंदवनात निर्माण झालेल्या वस्तू नित्यनेमाने वापरत असतात. त्यामागे सहानुभूती नसून गुणवत्ता व कौशल्याप्रती आदर असतो.

८) आनंदवनाने श्रमप्रतिष्ठेला महत्व दील्या गेल्यामुळे कुष्ठबाधितांनी जीवनकौशल्ये प्राप्त केली. याचा फायदा त्यांना संस्थेमध्ये आणि संस्था सोडून गेल्यावर सामाजिक आणि कौटुंबिक जीवनात होण्यास मदत झाली.

९) आनंदवनात अनेक आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या मुद्यांवर कार्य केल्या गेले. या कार्यात कुष्ठबाधित व्यक्तींनी दीलेला सहभाग व त्यांना मिळालेला सन्मान यामुळे नैराश्यापासून हा वर्ग दूर राहीला.

१०) समस्याग्रस्त व्यक्तीसाठी काम करण्यापेक्षा व्यक्तीसोबत काम करणे हे समाजकार्याचे महत्वाचे तत्व या कार्यात वापरल्या गेले. त्यामुळे कुष्ठबाधित व्यक्तींच्या मनातील लांच्छनाची भावना दूर होण्यास मदत झाली.

**निष्कर्ष:** १) आनंदवनातील कौटुंबिक वातावरणामुळे कुष्ठबाधितांच्या मनातील लांच्छनाची भावना कमी होण्यास मदत झाली आहे. आनंदवनात येणारा हा प्रत्येक व्यक्ती समस्यांनी ग्रस्त होता. त्यामुळे एका समस्याग्रस्ताने दुसऱ्याचे दु:ख पाहिल्यावर त्याच्या दु:खाची तिव्रता कमी होण्यास मदत झाली. २) आनंदवनाचे नेतृत्व हे सुरूवातीपासूनच प्रेमळ पालकत्वाच्या रूपात उदयास आले. यामुळेच कुष्ठबाधितांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडून आले आहे. संस्थेबाबत जिव्हाळा असल्यामुळेच आनंदवनाचा विकास झाला. ३) आनंदवनातील कुष्ठमुक्त लोकांमध्ये कौशल्यनिर्मिती, उपक्रमात सहभाग, नेतृत्वाची व कलागुणांच्या प्रदर्शनाची संधी, आणि या कामांचा विशेष उल्लेख यामुळे येथील लोकांमध्ये आत्मसन्मान जागवल्या गेला त्यामुळे ते संस्थेला जुळून राहीले आणि त्यांनी स्वत:च्या आणि समाजातील समस्या सोडविण्यास योगदान दीले.

***संदर्भ सूची:—***


१. *आमटे,वी.,कुलकर्णी,सु.(संपा.).(२०१४).आनंदवन प्रयोगवन. पुणे,समकालीन प्रकाशन.*
२. *बापट,बी.(२००६).बाबा आमटे. पुणे,राजहंस प्रकाशन.*
३. *गवाणकर,वी.(२०१२).एक होता कार्व्हर. पुणे,राजहंस प्रकाशन.*
४. *सोनेगावंकर,ए.(२००५).आनंदवन प्रकल्पांची यशोगाथा. नागपूर, विद्या विकास पब्लिशर्स प्रा.लि.*
५. *Mehandale,M. Health Education and Social Aspects in Leprosy Work.Poona, District Leprosy Committee,Poona.*
६. *MUTATKAR,R. SOCIETY AND LEPROSY.Wardha, Gandhi Memorial Leprosy Foundation.*
७. *REPORT OF THE STUDY TEAM ON LEPROSY MAHARASHTRA STATE.*

# तुकडोजी महाराजांच्या अंधश्रद्धा निर्मुलन विषयक विचारांचे सामाजिक परिवर्तन प्रक्रियेतील योगदान

***शुभांगी विजयराज मोहोड,*** *पीएच. डी. संशोधक विद्यार्थीनी, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

***गोषवारा:*** *प्रस्तुत शोध निबंधामध्ये तुकडोजी महाराजांनी आपल्या विविध भजने, भाषणे आणि प्रबोधनाद्वारे व्यक्त केलेल्या अंधश्रद्धा निर्मुलन विषयक समाज परिवर्तनवादी विचार आणि कृतीकार्याचा आढावा घेण्यात आला आहे. शोध निबंध लिहिण्यासाठी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला गेला आहे. साहित्यरूपाने आविष्कृत झालेले त्यांचे विचारधन राष्ट्र व समाजोत्थानासाठी अत्यंत उपयुक्त ठरले. आधुनिकतेकडे वाटचाल करणा-या समाजास नवयुगधर्म शिकवावा त्यामुळे गावे सुधारावित राष्ट्रोन्नती व्हावी यासाठी त्यांनी 'ग्रामगीते' सारखा ग्रंथ लिहिला. समाजमनात मुरलेल्या धर्मभावना न दुखविता त्यांनी अज्ञान व अंधश्रद्धा यावर पुरोगामी व व्यवहार निपुण विचार मांडून समाजपरिवर्तनाला चालना दिली. या योगे प्रस्तुत शोध निबंधामध्ये सामाजिक परिवर्तन प्रक्रियेमध्ये महाराजांच्या अंधश्रद्धा निर्मुलन विषयक विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.*

***सुचनक शब्द*** *: सामाजिक परिवर्तन, अंधश्रद्धा निर्मुलन.*

**प्रस्तावना:** राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज हे नविन युगातील महत्त्वाचे थोर समाजसुधारक, ग्रामसंस्कृतीचा आणि शेतीव्यवस्थेचा बारकाईने अभ्यास करणारे विचारवंत आहेत. भारतीय समाजव्यवस्थेत अंतर्बाह्य बदल घडवून आणल्याशिवाय आपल्या भारत देशाचा सर्वांगिण विकास होऊ शकणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते. याच विचाराने प्रेरीत होऊन त्यांनी अहोरात्र आपली वाणी, लेखणी आणि देह झिजविला. तुकडोजी महाराज एक युगदृष्टे महापुरूष होते. भारत देश विविध जाती, धर्म, पंथ व संप्रदायामध्ये विभागलेला आहे. या विभागलेल्या बहुजिनसी मानसिकतेला एका सुत्रात बांधून त्यातून सामाजिक ऐक्य राखणे सोपे नाही. पण तो कायदा वा प्रशासनाच्या पातळीवरही साध्य होण्यासारखे नाही. तर समाज परिवर्तनाच्या अखंडीत व प्रभावशाही चळवळीतुनच हे साकार होऊ शकते. याच पार्श्वभूमीवर त्यांनी सर्व सामान्य भारतीय समाजाला देवभक्ती कडून राष्ट्र भक्तीकडे नेले. भारतीय लोकमानस मुळातच देवभोळा आहे. या जनतेच्या भावनांना जपून राष्ट्रसंतांनी मोठ्या कौशल्याने त्यांना समाजकार्यासाठी प्रवृत्त केले. एक संत म्हणून अध्यात्मिक विचार देताना त्यांनी सामाजिक चळवळ निर्माण केली. अंधश्रद्धा, रुढीवादाच्या विरोधात प्रत्यक्ष जनजागृती करून अनेक प्रयोगात्मक घटना त्यांच्या कार्यातून सिद्ध झाल्या. तळागाळातील माणसाला न्याय मिळावा, त्याच बरोबर उच्च-निच्चतेचा भेदभाव संपवावा म्हणून कसोटीने प्रयत्न केले. त्यांनी एकाच कोणत्यातरी विषयावर आपले विचार मांडले नाही. तर सामाजिक समस्यांचा बारकाईने अभ्यास करून त्या समस्या लोकसहभागातून कश्या सुटतील याचा प्रयत्न केला. ते अल्पशिक्षित असूनही दांडगा लोकसंग्रह त्यांच्या पाठीशी होता. त्यांच्या शब्दांवर लोकांचा विश्वास होता. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये तुकडोजी महाराजांनी आपल्या भजन, भाषण व प्रबोधनाद्वारे मांडलेले अंधश्रद्धा निर्मुलन विषयक विचार व कार्याचे सामाजिक परिवर्तन प्रक्रीयेतील योगदाना संबंधीचा सखोल आढावा संशोधिका घेत आहे.

**उद्दिष्टये :** १. तुकडोजी महाराजकालीन सामाजिक परिस्थितीचा आढावा घेणे. २. तुकडोजी महाराजांच्या अंधश्रद्धा निर्मुलन विषयक विचारांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला असून यामध्ये या विषयाशी संबंधित प्रकाशित अप्रकाशीत लिखाण, ग्रामगीता, संदर्भ ग्रंथे, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**विषय प्रतिपादन:** तुकडोजी महाराजांच्या काळातील तत्कालीन परिस्थिती ही वैज्ञानिक युगाचा परिणाम म्हणावा लागेल. शिक्षण, शेती, राजकारण, ग्रामिण जिवन, स्त्री जिवन, व्यसने, विवाह पद्धती इत्यादी बाबतीत त्याकाळी बरेच परिवर्तन घडले होते. याचा समाजावर झालेला परिणाम प्रखरतेने जाणवत होता. शिक्षण क्षेत्रामध्ये प्रगती होऊन साक्षरतेचे प्रमाण वाढले होते. शेतीमध्ये ब-याच सुधारणा झाल्या, उद्योगधंद्यांचा लक्षणिय विकास झाला. राजकीय क्षेत्रात फार प्रचंड प्रमाणात जनजागृती होत होती. ग्रामिण जिवनाचा पूर्ण साचाच बदलू लागला, स्त्रियांना आपला सर्वांगिण विकास करून घ्यायला बराच वाव मिळायला लागला. या सर्व गोष्टींच्या बाबतीत जरी महाराजांचा काळ प्रगतावस्थेत दिसत असला तरीही राजकारणामुळे समाज जिवनात हेवेदावे, सत्ता स्पर्धा, तंट- बखेडे ब-याच प्रमाणात निर्माण झाले. पाश्चात्य संस्कृती, चित्रपट आणि आश्लिल साहित्य यांचाही विपरीत परिणाम समाजावर होवू लागला. शिक्षण क्षेत्रात पुस्तकी विद्येला महत्व प्राप्त झाले. नानाविध व्यसनांनी समाजात कहर उडवून दिला. फॅशनच्या नावाखाली उत्तान शृंगारता विकोपास गेली. चित्रपट व अश्लिल साहित्य यामुळे युवा पिढी छंदिष्ट बनली. विवाह पद्धतींमध्ये हुड्यांचे प्रस्थ बळावले प्रतिष्ठेची मुल्ये बदलली. सत्तापिपासून प्रवृत्तीचा सैतानी संचार समाज जिवनात सर्रास सुरू झाला. भरमसाट लोकसंख्या वाढली आणि बेकारीचा भस्मासुर 'आ' वासुन उभा राहीला. न्याय, निती, सत्य, धर्म याची फारशी चाड कुणाला राहीली नाही. ऐतखाऊपणा, आळशीपणा, कामचुकारपणा अशा प्रवृत्ती समाज जिवनात वेगाने पसरल्या.

तुकडोजी महाराज ज्या काळात वावरले ते वैज्ञानिक युग म्हणता येईल. त्याकाळी समाज जिवनातून धर्मविषयाची श्रद्धाही ढळत चालली होती. सत्ता, संपत्ती यांना विलक्षण प्रतिष्ठा प्राप्त झाली. विज्ञानाने जग जवळ आले परंतु माणसांपासून माणुसकी दूर झाली. समाज संकुचित बनला. पूजा-अर्चा, यज्ञयाग, ध्यानधारणा इत्यादी विषयी लोकांमध्ये फारशी आस्था राहीली नव्हती. मंदिरा सारख्या पवित्र स्थळाला संपूर्ण अवकळा आली होती. पुजा-याची वृत्तीही बिघडली होती, पुजारी मंदीराच्या व्यवस्थेचा उपयोग आपला संसार सुधारण्यासाठी करू लागले. याच काळात बुवाबाजी, अंधश्रद्धेचे प्रस्थ बोकाळले होते. आणि कनिष्ट देवदेवतांच्या पूजेचे अवास्तव स्तोमही माजले होते. या विषयी महाराज म्हणतात की,

"ही बुवाबाजी भुलवी जना... भ्रष्ट करी ग्रामजीवना...
फसवोनि भोळ्या - बापड्यांना... भलत्या छंदा लाविता......
काही देवासी बलिदान देती... देवीच्या भिसे मांस खाती...
तीर्थ म्हणोनि मद्य पिती... पिसाळलेले......"

असे महाराजकालीन समाज जिवन देव धर्माच्या नावाखाली अनावश्यक असानमुलक अवडंबरांनी ग्रासलेले होते. अशा या सामाजिक जिवनाच्या व त्यातून उद्‌भवलेल्या समस्यांच्या संदर्भात तुकडोजी महाराजांनी आपल्या खंजरी भजनांमधून आणि आपल्या साहित्यातून समाजाला मौलिक मार्गदर्शन केले. तत्कालीन समाजातील अनिष्ट कल्पनांचा नाश करून त्या अनिष्ट चालीरीतींना व वाईट रूढी-प्रथांना काळानुसार वळण लावण्याचा प्रयत्न करून समाज परिवर्तनाला चालना देण्याचे कार्य महाराजांनी केले.

अंधश्रद्धा, व्यसने यांनी बुरसटलेल्या चालीरीतींनी समाज अंतर्बाह्य ग्रासल्याचे त्यांना ज्ञात होते. प्राप्त परिस्थितीत समाजाला जे गरजेचे आहे तेच त्यांनी विवेकदृष्टी जागृत ठेवून सांगण्याचा प्रयत्न केला.

भौतिकदृष्टीने ग्रामविकास करीत असताना गावातील लोकांची बुद्धी विकसीत करण्याची गरज महाराजांची 'ग्रामगीता' करीत आहे. गावचे लोक बुद्धीवादी होतील तेव्हांच गावाचा विकास होईल. अंधश्रद्धा निर्मुलन करणे ही काळाची गरज आहे. शालेय शिक्षण गावोगावी सुरू झाल्यामुळे काही गावकरी शिक्षित होत आहेत. तथापि त्यांच्यात अद्यापही अंधश्रद्ध मोठ्या प्रमाणात आहे, हे महाराजांना दिसत होते.

"देवी-देवतांचा कोप झाला..कॉलरा-पटकीचा झटका आला...
म्हणजे सुधरूच न शके कुणाला... बाप वैद्याचा......"
असे मानणारे लोक आणि 'देवता राहती प्रसन्न...
ऐसे करावे पूजन...'
असा आग्रह धरणारे अद्यापही गावात आहे.
'कुणी करणी, कौटाळ म्हणती ... कोणी पिशाच्च भारती ...
औषधेही न देता रोगी मारती... मुर्खपणाने......'
'भगत, मांत्रिक, अरबडी, जाणने....
धुमारे बघती भाविक कोणते...
पोटासाठी नाना मते... फैलावती लोकांमाजी ......
करविती नवसयास थोर... देवी पूजेचा जोर सारे...
रेडे, बकरे, कोंबडे पामर... कापितात अज्ञानाने......'
असे महाराज म्हणतात.

'कोणी पुजिती सर्प, व्याघ्र... कोंबडी-बकरी देवोनि...' अशा लोकांचे पितळ महाराजांनी ग्रामगीतेत उघडे केले आहे. महाराजांच्या मते, अशा गोष्टींकडे गावक-यांचे लक्ष वेधलेच पाहिजे आणि ढोंगी, अंधश्रद्धा पसरविणा-या लोकांपासून गावक-यांना सावध केले पाहीजे. आपण वैज्ञानिक जगात वावरत आहोत, विज्ञानाचे धडे आपण घेतले आहे. हे सर्व ग्रामीण जनतेला समजावून सांगितले तर ग्रामविकास होईल. अशी तुकडोजी महाराजांची वैज्ञानिक दृष्टी होती. त्यांनी जिवनभर चमत्कारांचा विरोध करून अनेक पोथ्यांतील भोंदूपणा उघड केला. 'स्वगासही नाचविले दोन बोटांवरी......' असे म्हणून महाराजांनी सर्व पोट-पुजा-यांचे अन पुराणिकांचे वाभाडे काढले आहे. 'संशयात्मे विनाशती' या गीता वचनाचा आपल्या सोयीने पुराणिकांनी अर्थ काढला आहे. हे ग्रामीण जनतेने समजून घेतले पाहिजे असे महाराज म्हणतात.

सध्याच्या काळात कुणीही नाक, तोंड, घागर यातून जन्म घेत नाही. कोणी पर्वत सोन्याचा करीत नाही कोणी पृथ्वी पळवून नेऊ शकत नाही. हे पुनः पुन्हा जनतेने समजून घेणे गरजेचे आहे. ग्रामगीतेच्या मते ही रूपक वाणी आहे. ही जनजागृती करून ग्रामीण जनतेला अंधश्रद्धेपासून दूर ठेवले पाहीजे. तरच ग्रामविकास होईल. आणि यातुनच सामाजिक परिवर्तन घडून येण्यास मदत होईल. तुकडोजी महाराज आपले विचार केवळ लेखणीतून, किर्तनातुन व्यक्त न करता ते आपल्या कृतीकार्यातूनही करून दाखवित. नवस पूर्ण करण्याकरीता आलेल्यांना ते सांगित की, देवी म्हणजे सर्वांची आई आहे ती बोकडं कशी खाईल तिनेच जन्माला घातले तीच कशी त्याचा नाश पाहु शकेल. त्याऐवजी तुम्ही सर्वांनी वाटीभर दही चढवा त्यानेच देवी प्रसन्न होईल. यापुढे जावून महाराजांनी देवी खणून बाहेर काढली आणि प्रशस्त जागेत प्रतिष्ठापना केली. हे सर्व करून तुकडोजी महाराजांना काहीही झाले नाही यातुनच त्यांच्या शब्दांवर लोक विश्वास ठेवू लागले. भिती हाच आपल्या विचारांतील दैत्य आहे असे सांगून महाराजांनी स्मशाणभूमीतच भजनांचे कार्यक्रम घेवून लोकांच्या विचारांतील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला. देव देवता हे कृपावंत असतात त्यांच्या ठायी कोप असत नाही. क्रोध करायचाच झाला तर ते दुष्टदुर्जनांवर करतात त्यातही त्यांचा उद्धाराचाच भाव असतो. आणि देवच जर विरूद्ध वागत असतील तर ....

'तेथे निरपराध्यास छळती जरी... तरि त्या देव न म्हणावे...'

असे महाराज परखड शब्दांत सांगत. देविदेवतांना बळी नको असुन केवळ सात्विक आचार विचारांची अपेक्षा असते.

'भक्ती चमत्कारादिकासाठी... म्हणोनि झाली फजिती मोठी...
घरदारही लावूनि नेले पाठी... लुबाडले ढोंगी बुवांनी......'

म्हणून यांच्या दूरच राहावे. हे लोक चतूर असतात. आंधळा कर्मकांड कोणी करू नये. सद्भावनेने, सर्वांच्या हीताचे आहे ते करावे.

'परि पंड्याचि व्यसनी, दुराचारी... फुकट लुटाया खटपट करी.
तरी तो कैसेनि उद्धारी... समाजासी......'

असे म्हाराज म्हणतात. स्वार्थाने विकृत होऊ अंध जिवन जगू नये. पूर्वीचे ग्रंथ हे रूपकात्मक असत त्यातील चमत्कारच केवळ आपण लक्षात ठेवले. बुद्धीही गहाण टाकली असे आता होऊ नये असे तुकडोजी महाराजांनी सांगितले आहे.

**सारांश :** तुकडोजी महाराजांनी जीवनभर चमत्काराचा विरोध केला. लोकांच्या धर्मभावना, समजुती न दुखविता त्यांच्या भाव-भावना व विचार आंदोलित करण्याचे कार्य केले. किर्तन मनोरंजानाद्वारे कृती कार्यक्रमही राबविले. त्यांनी आपल्या ग्रामगीतेद्वारे सांगितले की, प्राचीन काळची ग्रंथे ही रूपकवाणीवर आधारित होती. या विषयी कायम जनजागृती करून लोकांना अंधश्रद्धेपासून दूर ठेवले पाहीजे तरच ग्रामविकास होईल. यातूनच देश विकासास मदत मिळेल. असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी वयाच्या विसाव्या वर्षापासूनच अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य सुरू करून सामालिक परिवर्तनाला चालना देण्याचा प्रयत्न केला.

***संदर्भ ग्रंथ सुची :***

*1. कडवे रघुनाथ, 2013, 'राष्ट्रसंत तुकडोजींचे व्यक्तिमत्व', अमोल प्रकाशन, नागपूर.*
*2. कामत अशोक, 'ग्रामगीता : सुबोध निरूपण', गुरूकुल प्रतिष्ठान, पुणे.*
*3. कडवे रघुनाथ, 2007, 'ग्रामविकास दृष्टी', अमोल प्रकाशन, नागपूर.*
*4. तुकडोजी महाराज, 2013, 'ग्रामगीता', श्रीगुरूदेव प्रकाशन, अमरावती.*
*5. तुकारामदादा गिताचार्य, 2017, 'गद्य-ग्रामगीता', श्री- गुरूदेव प्रकाशन मंडळ, द्वितीय आवृत्ती, चंद्रपूर.*

# जागतिकीकरण आणि कोरोना काळातील महिला कामगारांच्या समस्या

***निर्मला कारभारी वाघ**, संशोधक विद्यार्थीनी, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद. मो. ९६७३०९४१४६*

**प्रस्तावना**: जागतिकिकरणामुळे वस्तु व सेवा यांच्या किमंती प्रचंड प्रमाणात वाढत आहे. किमंत निर्देशकात होणा-या वाढीच्या तुलनेत सर्व सामान्याच्या वेतन निर्देशांकात वाढ होत नसल्याने तसेच देशांचा आर्थिक विकास व शहरीकरण यामुळे शहरातील रोजगांराच्या संधी वाढल्या. घरातील महिला नोकरीसाठी घराबाहेर पडू लागली त्यामुळे घरकामगांराची गरज भासू लागली त्यातुनच त्यांची मागणी वाढू लागली. कोरोना काळात बेकारी, महागाई, आर्थिक दुर्बलता, शिक्षण, सामाजिक न्याय श्रमिक गटातील कामगार त्याचबरोबर संघटित असंघटित काम करणा-या महिलांच्या जीवनात नैराश्यग्रस्त स्थिती, मारझोड, हुंडाबळी अशा विविध समस्या निर्माण झाल्या. घर कामगार स्त्रियांची संख्या मुंबई, पुणे पाठोपाठ औरंगाबाद सारख्या महानगरात जास्त आहे. घरखर्च, कुटुंब उदरनिर्वाहाचा प्रश्न, रोजीरोटीचा प्रश्न मिटविण्यासाठी लहान मुला-मुलींपासून 60 वर्षांपर्यंतच्या महिला कामगार, बालकामगार, मातांच्या प्रश्नांची गंभीर स्वरुप धारण केलेले आहे. जागतिकीकरण ही बहुआयामी प्रक्रिया आहे. मुलतः ही आर्थिक प्रक्रिया असली तरी त्यामुळे संपूर्ण समाजजीवन प्रभावित झाले आहे. केवळ आर्थिक क्षेत्राशी मर्यादित न राहता जागतिकीकरणाने सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्रावर प्रभाव पडला आहे. जलद दळणवळणाच्या सोयी व माहिती आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग जवळ येण्यासोबतच त्यांच्यातील स्थळ आणि वेळेचे अंतर कमी होऊन सीमांची बंधनेही शिथिल होऊ लागली. परिणामी विविध समाज संस्कृतींनी परस्परांना प्रभावित केले. त्याचप्रमाणे जगातील कोणतीही वस्तु वा सेवा उत्पादन करणे त्याचे विनिमय करणे सहज शक्य झालेले दिसून येते.

"विश्वव्यापी घनिष्ठ सामाजिक संबंधाचा आधार म्हणजे जागतिकीकरण होय." ही प्रक्रिया सामाजिक आंतरक्रियांना उत्तेजन देते ज्यामुळे मानवी विश्वात आमुलाग्र परिवर्तन नवयुग अवतरण, सांस्कृतिक विस्तार व आविष्कार घडून एक समाज व्यवस्थेचे रुप धारण करते. औद्योगिक क्रांतीमुळे कामगारांचा मोठा वर्ग निर्माण झाला. या वर्गाला आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी संघटित होण्याची गरज भासली. त्यामुळे कामगार संघटना स्थापन होण्यास सुरुवात झाली.

**जागतिकीकरणाच काळात नव्याने उदयाला आलेला असंघटित कामगार :** ब्रिटीश काळापासून आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, कारखानदारी वाढीस लागली. लहान - मोठे शहरे, नगरे यात राहणा-यांची संख्या वाढू लागली. पुढे औद्योगिकीकरण आले. शहरीकरण आले. कुटुंबाचे आकार, त्याची कामे बदलली समाजातही खूप बदल घडून आले. नोकरी - धंद्यासाठी घरातील नवरा - बायकोही बाहेर पडू लागले. या सर्वांतून काही नवे व्यवसाय करण्यासाठी कामगार आले. अनेक असंघटित क्षेत्रे यामुळे निर्माण झाली. त्यातील काम करणा-या लोकांची स्थिती, कामाच्या पद्धती, कामातील, जीवनातील समस्या वाढत गेल्या. उदा. घरकाम करणारे कामगार - घरगडी, मोलकरीने सायकली, मोटारसायकलही दुरुस्त करणारे कामगार हॉटेलातून काम करणारे कामगार इ. या प्रकारातील कामगार त्यांच्या कामाच्या पद्धती त्याचे प्रश्न यात खूप विविधता आहे. ती कामे वाढू लागल्यामुळे जागतिकीकरणामुळे असंघटित क्षेत्रात वाढ होत आहे. दारिद्र्याबरोबरच रोजगार आणि रोजगाराच्या मोबदल्याची अनिश्चितता, अनेक कौटुंबिक, मानसिक, आर्थिक विवंचना आणि दारिद्र्यामुळे मानवी जीवन जगण्यासाठी येणा-या संधीच उपलब्ध न होणे, अनेक प्रकारच्या समस्या आणि संकटांना तोंड द्यावे लागते. 2007 मध्ये प्रसिद्ध झालेल्या असंघटित क्षेत्रातील व्यवसायच अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या राष्ट्रीय आयोगाच्या (ग़क्क्छ) अहवालानुसार भारतातील असंघटित कामगार हे अत्यंत कमी उपजीविकेचे पर्याय असणा-या दुःखदायक परिस्थितीत जगत आहेत. या अहवालानुसार देशात काम करणा-या लोकसंख्येपैकी 86 टक्के कामगार हे असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यापैकी 79 टक्के जणांना दररोज रु. 20 इतके उत्पन्न मिळणेही दुरापास्त असते.

**उद्दिष्टे :** १) जागतिकीकरण प्रक्रिया मध्ये महिला कामगारांची भूमिका अभ्यासणे. २) महिला कामगारांच्या आर्थिक आणि सामाजिक समस्या अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुतच्या शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन स्त्रोत :** प्रस्तुतचा शोध निबंध दुय्यम स्त्रोतावर असून त्यासाठी विविध पुस्तके, ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे इ. वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व :** जागतिकीकरणाचा परिणाम म्हणजे संघटित सुरक्षित रोजगारामध्ये झालेली घट आणि पर्यायाने असंघटित कोणत्याही सक्षम कायद्याचे कवच नसलेल्या रोजगारात झालेली वाढ होय. स्त्रियांचा विचार केल्यास रोजगारावर आर्थिक धोरणाचे अतिशय गुंतागुंतीचे परिणाम दिसून येतात. आर्थिक सामाजिक संघटनेत स्त्रियांना नेहमीच कमी मोबदला दिला जातो. इतर कामाप्रमाणे घरकामगार कामाला महत्त्व नसल्याने समाजातील त्याचे स्थानही महत्त्वाचे मानले जात नाही. घरकाम करणा-या महिलांचे अनेक प्रश्न असून देखील त्याची सेवा ही समाजासाठी उपयुक्त ठरली आहे. लोकसख्येपैकी 86 टक्के कामगार हे असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यापैकी 79 टक्के जणांना दररोज रु. 20 इतके उत्पन्न मिळणेही दुरापास्त असते. देशभर मुलीच्या शाळा बंद, घरगुती अत्याचारात वाढ, घरगुती हिंसाचारात वाढ इ. घरकामगार महिलांच्या समस्या वाढलेल्या या काळात दिसतात. कोरोना साथीच्या संकटाच्या काळात संपूर्ण जग सामाजिक, आर्थिक आणि बहुतेक प्रमाणात राजकीय दृष्ट्या बंद पडलेले दिसत आहे. भारतात कोरोना साथ येण्याचे मुख्य कारण विदेशातून विमान प्रवास करुन येणारे ठरले. साहजिकच देशातील कोरोना साथीचा फटका मुंबई आणि महाराष्ट्राला बसला. भारतात कोवीडचा पहिला रुग्ण 30 जानेवारीला केरळमध्ये सापडला. भारत सरकारने फारशी दखल घेतली नाही. मार्चमध्ये सरकार जागे झाले आणि टाळेबंदी करणत आली.

टाळेबंदी करणपूर्वी कोणतेही पुरेसे नियोजन केलेले नव्हते. देशाचा आकार लोकसंख्या शहरातील दाटीवाटी लक्षात घेऊन भारत सरकारने उपाययोजना करणे आवश्यक होते. लॉकडाऊनचा सर्वात जास्त वाईट परिणाम हातावर पोट असणा-या कामगारांवर व महिलांवर झाला. काम बंद झाल्यामुळे पैसा नाही, अन्नधान्य संपल्यामुळे त्यांची उपासमार वाढली. गावाकडे हजारो किलोमीटर चालत असताना कामगार अतिश्रम आणि उष्माघाताने मरण पावले.

आर्थिक दुर्बलता, श्रमीक वर्गातल्या कामगार शेतकरी, शेतमजुर, मध्यमवर्गीय नोकरदार दलित उपेक्षित घरेलु कामगार मागासवर्गीय गिरणी कामगार अशा असंघटित क्षेत्रात काम करणा-या सगळ्या महिलांना आजही पैशापासून आरोग्यापर्यंत आणि मारझोडीपासून हुंडाबळी पर्यंत अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे आणि अशावेळी जर एखादी नैसर्गिक आपत्ती आली तर त्याचा सर्वात जास्त परिणाम महिला वर्गावर होतो. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये महिलांच्या जीवनात पुरुषाशी असलेले तिचे नाते अतिशय महत्त्वाचे मानले जाते. चार घरची धुणीभांडी करुन घरकामगार महिला कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवीत असते. अशा परिस्थितीत जर कोरोना सारख्या रोगाने थैमान घातले की त्याचा परिणाम जास्त महिलांवर होतो. त्याच्यामध्येही ज्या महिला घरकामगार म्हणून काम

करत आहेत आपल्या कुटुंबाचे पोषण करीत आहे. त्यांच्यावर या कोरोना काळात उपासमारीची वेळ आली आहे.

**महिला कामगारांच्या समस्या :** स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतामध्ये शहरातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती वेगाने बदलत गेली आहे. पुरुषाच्या बरोबरीने महिलाही नोकरी - व्यवसाय करत आहे आणि नोकरदार महिलांचा एक वर्ग तयार झालेला आहे. त्यामुळे घरकाम करण्यासाठी घरेलू कामगारांची मोठ्या प्रमाणात मागणी निर्माण झाली. महाराष्ट्रात घरकामगाराचे प्रमाण मुंबईत सर्वाधित असून त्या खालोखाल पुण्याचा क्रमांक लागतो. नंतर औरंगाबाद जिल्ह्याचा पण सध्या सर्वच शहरी व निमशहरी भागात घरकामगाराची आवश्यकता वाटू लागली आहे. घरकामगारामुळे घरातील कामे वेळेत झाल्यामुळे नोकरदार महिलांना नोकरी करताना घरातील कामाची चिंता करावी लागत नाही. या घरकामगार अनेक प्रकारची कामे करीत असतात. यामध्ये कपडे, धुणे, भांडी स्वच्छ करणे, फरशी साफ करणे, झाडून मारणे, जेवण बनविणे, मुलांची देखभाल करणे वृद्ध व आजारी अपंग व्यक्तीची देखरेख, घराची काळजी घेणे अशा प्रकारे अत्यंत महत्त्वाची कामे ह्या करत असतात.

ग्रामीण भागातील दारिद्र्यामध्ये वाढ झाल्यामुळे ग्रामीण भागातील लोक कामधंद्याच्या निमित्ताने शहरी भागात स्थलांतरीत होतात. या महिलांना मग घरकामगार म्हणून काम करावे लागते. त्याचे शोषण केले जाते. घरकामगारांना कामाच्या ठिकाणी मिळणारा पगार कामाच्या वेळेच्या तुलनेमध्ये कमी असून कामाच्या ठिकाणी मिळणारी वागणूक ही कनिष्ठ प्रतीची असते. किमान वेतन कायद्याचे संरक्षण नसल्यामुळे त्यांना कमी पगारावर जास्त काम करावे लागते.

**लॉकडाऊनमुळे पगार कपात :** घरकाम करणा-या महिलांच्या मध्ये साधारणतः अत्यंत गरीब कुटुंबातील महिलांचा समावेश होतो. यामध्ये विधवा, परितक्ता, महिलांचा सर्वाधिक समावेश आहे. घरकाम करणा-या काही महिलांना लॉकडाऊनच्या काळात महिन्याचा पगार मिळाला मात्र अनेक महिलांना घरमालकांनी पगार दिला नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ सुद्धा आली.

**आधी महिला मिळत नव्हत्या आता महिलांना काम नाही :** घरकाम करणा-या महिलांसाठी काम करणा-या महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार संघटनेच्या अध्यक्षांनी राज्यात घरकाम करणा-या महिलांची संख्या जवळपास लाखोच्या घरात आहे. यामध्ये धुणी-भांडी, फरशी पुसणे, दळण, घरातील मुलांना सांभाळणे अशी कामे करणा-या महिलांचा समावेश आहे असे सांगितले. कोरोनाच्या स्थितीमुळे घरकाम करणा-या महिलांना काम मिळणे अवघड बनले आहे.

**सरकारची योजनाही तुटपुंजी :** सरकारने 3 महिने 500 रुपये आणि 5 किलो तांदूळ दिले, पण ते पुरेसे नव्हते. त्यामुळे घरकाम करणा-या महिलांची महिलांची मोठी आर्थिक ससेहोलपट झाली. त्यामुळे घरकाम करणा-या महिलांना कामावर घेतली नाही. जिथे एक महिला आधी 7-8 घराचे काम करुन महिन्याकाठी 8 ते 10 हजार रुपये मिळवत होती तिच्या वाट्याला आता केवळ 4-5 घराचे काम येत आहे.

**सरकारकडून आर्थिक मदतीची मागणी :** या स्थितीमध्ये सरकारने आर्थिक मदत करावी अशी मागणी घरकाम करणा-या महिलांकडून करण्यात येत आहे. काही वर्षापुर्वी राज्य सरकारने घरेलू कामगार कल्याणकारी महामंडळ स्थापन केले होते. ज्यातून 50 वर्षावरील महिलांना 10 हजार

**मुलींची शाळा बंद :** या कोरोना विषाणूमूळे आज मुला-मुलींची शाळा बंद आहे. गावातील मुलामुलींना शाळेसाठी दुसरीकडे जावे लागते. खेडेगावातील आदिवासी भागातील अनेक मुली वसतीगृहात राहून शाळा शिकत आहेत. या मुलींच्या पालकांचे उत्पन्न अत्यंत कमी आहे. लॉकडाऊनमुळे ते संपूर्णतः बंद झाले आहे. पोट भरण आधी गरजेचे झाले. एक ते पाच वर्षात एकूण सहा ते सात कोटी मुली शाळा सोडून घरी बसतील असे मत या क्षेत्रात काम करणा-या तज्ञांनी व्यक्त केले आहे. एवढ्या मुली घरी बसणार असतील तर ग्रामीण भागात त्यांचे लग्न लावून देण्याचे प्रकार वाढतील.

**बाल विवाहात वाढ :** बाल विवाह ही भारतातील सर्वात मोठी समस्या आहे आणि लॉकडाऊनमुळे ही समस्या तीव्र होईल हे छ्रङ्क ने 2020 चा जो (च्यङ्मद्ध दृढ ज्दृद्भध्ड्ढ घ्दृद्रद्वध्र्द्वत्दृद ङड्ढद्रदृद्धद्य) सादर झाला त्यात भारतात 26 टक्के मुलींचे लग्न 18 वर्षे पूर्ण व्हायच्या आधी लागलेली दिसतात. लग्न लवकर करण्या पाठीमागे दारिद्र्य हे सर्वात मोठे कारण आहे. तसेच शिक्षणाचा अभाव, लिंगभेद यामुळे काही मुलींना शाळेतच पाठविले जात नाही. बाल विवाह झालेल्या मुलींना घरगुती हिंसाचाराला सामोरे जावे लागते. बालविवाह होऊ नये त्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. पण या कोविड -19 मुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे ही समस्या अधिक तीव्र होण्याचा धोका वाढताना दिसत आहे. बालविवाहाचा प्रश्न गंभीर आहे त्यातून ज्या मुली शाळेत जातात त्यांना आता शाळेने सरकारने ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग सुचवला आहे. पण यासाठी किमान मोबाईल गरजेचा आहे. घरात एकच मोबाईल असेल तर मुलगा आणि मुलगी यापैकी मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाईल. स्त्री शिक्षणाचा इतिहास पाहिला तर अजूनही मुलींच्या शाळा गळतीचे प्रमाण कमी झालेले नाही. गरिबी सामाजिक विषमता, जातीप्रथा, पितृसत्ताक पद्धती आणि लिंगभेदभाव अशा कारणामुळे अनेक मुलींनी शाळेची पायरी कधीच चढली नाही. अशा अल्पशिक्षित मुलींचे बाल विवाह केले जातात त्या मुली भविष्यात घरेलू कामगार म्हणून काम करीत असल्याचे दिसून येते.

**घरगुती हिंसाचार :** महिलांना घराच्या चार भिंतीच्या आत घुसमट, हिंसाचार नेहमी सोसावा लागतो. मात्र लॉकडाऊनमुळे हे हिंसाचाराचे प्रमाण वाढले आहे. काही महिलांना रोज गुरासारखे मारले जात आहे. महिलांवर केला जाणारा हिंसाचार हा फक्त अशिक्षितामध्ये नाही तर सुशिक्षितामध्ये तेवढ्याच प्रमाणात बघायला मिळतो. मग ती रोजंदारीवर काम करणारी लोक असो, व्यसन केल्याशिवाय झोप न येणार कोणी असो किंवा मग उच्चभ्रू कुटुंबातील महिलांनी आपली मतं मांडू नयेत. असा विचार करणारा कुणीही, हे सगळेच महिलांवर घरी बसून राग काढणं, त्यांना मारणं हा आपला जन्मसिद्ध अधिकार समजत असल्याचे दिसत आहे.

**निष्कर्ष :** अशा प्रकारे या लॉकडाऊनमुळे महिलांच्या समस्येत आणखीनच वाढ झाली आहे. मोलकरणीच्या कुटुंबाची उपासमार चालू आहे. रोज नव-याच्या त्रासाला आणि अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. काही प्रमाणात मोकळेपणाने जगत आहे. पण हे जर शिक्षण बंद झाले तर बालविवाहाचे प्रमाण आणखी वाढेल. त्यामुळे सर्व महिलांनी संघटित होऊन आपला लढा आपणच लढावा लागेल. तरच एक नवे जग आपणा निर्माण करु जिथे स्त्रीला पुरुषाप्रमाणे स्वतंत्र मनसोक्त जगता येईल. यासाठी प्रस्थापितांनी आखलेल्या वाटेवरुन न जाता आम्हाला एका नव्या वेगळ्या समतेच्या वाटेने जाण्याचे आवाहन पेलावे लागेल. बाईपणाच्या चौकटीतून बाहेर येऊन माणूस म्हणून स्वतःकडे बघावे लागेल. तरच मग कोणतीही आपत्ती आली तरी ठामपणे उभे राहून त्याचा सामना करता येईल.

*संदर्भ :*

1. *जागतिकीकरण आणि देशीवाद, रंगनाथ पठारे, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई.*
2. *भट्ट इला, द अन ऑर्गनाइज्ड सेक्टर, वर्क सिक्युरिटी अॅण्ड सोशल प्रोटेक्शन नवी दिल्ली, सेज पब्लिकेशन, इंडिया, 2001, प्रा. लि. पृ. क्र. 01.*
3. *http://www.vedamsbooks.com/no 14270.*
4. *www.empowerpoor.orgrelated.news. asp?report=614*
5. *भांडारकर पु.ले. 1987 सामाजिक संशोधन पद्धती म. ग्रंथनिर्मिती मंडळ नागपूर.*
6. *डॉ. सुनीता अमृतसागर 2021, कोरोनानंतरचे जग.*
7. *https://www.etvbharat.com*

# जागतिकीकरणाच्या विकासाचा तुलनात्मक अभ्यास : ग्रामीण व नागरी औरंगाबाद २०२२

**प्रा. डॉ. नंदलाल भिमराव बर्डे**, *नेहरु कनिष्ठ कला महाविद्यालय सावखेड, ता.गंगापुर, जि.औरंगाबाद मो.क्र. १४२३७०४५२८*

***सारांश** : प्रस्तुत संशोधनात जागतिकीकरणाचा प्रभाव व परिणाम हा औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील समुदायावर आधारीत आहेत. एकंदरीत शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीणी समुदयावर वाईट परिणाम अधिक आहेत. तर नागरी समुदायावर विकासात्मक फायदे अधिक आहेत. असे निष्कर्षावरुन आढळून आले आहे. तसेच आभासी संबंध वाढत चालेले आहेत. ग्रामीण समुदायावरील सांस्कृतीक वारसा रुढी पंरपरा, याचा -हास होत आहे. त्याऐवजी नविन संस्कृतीचा प्रभाव दिसून येत आहे. नागरी समुदायावर औद्योगीकरणाचा परीणाम व फायदा होत आहे. शारीरिक कष्टाचे प्रमाण कमी झाले आहे. यंत्राचा वापर जीवनात वाढला आहे. मानव व यंत्र असे सुत्र निर्माण होत आहे. त्यात मोबाईलचा अतिवापर याचा प्रभाव नागरी समुदयावर दिसून येत आहे. त्यातून क्रुरता, भ्रष्टाचार, आतंकवाद दहशत, वाद या समस्या डोके वर काढत आहेत. तसेच मानवाचे जीवन धोक्यात आले आहे. एकंदरीत ग्रामीण व नागरी समुदयावर जागतिकीरणाचा परिणाम दिसून येत आहे. भारतीय समाज ढवळून निघत आहेत.*

**प्रस्तावना** : जागतिकीकरण एक वैज्ञानिक विकासाचा पर्याय आहे. परंतु तुमची इच्छा असो व नसो जीवनाच्या सर्व क्षेत्रांना प्रभावित करण्यासाठी बाध्य आहे. देशाच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी जागतिकीकरण हा एक मार्ग आहे. देशाच्या प्रगतीचे फायदे निम्न स्तरापर्यंत आणि गरीब लोकांपर्यंत जातील त्यातून गरीबी दूर होईल असा हा विकासाचा एक वैश्विक पर्याय आहे. जागतिकीकरण हि एक विश्व अर्थव्यवस्था आहे. स्थानिक व राष्ट्रीय अर्थ व्यवस्थेला एकीकृत करण्याची प्रक्रिया आहे. इ.स. १९९१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत एक क्रांतीकारी परिवर्तन झाले की, एक नवी आर्थिक तिनी लागू केली. भारताला खच्चीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनांची ओळख झाली. जागतिकीकरणामुळे भाडंवलशाही अतिशय वेगाने विकसित झाली. त्याचे विपरीत परिणाम भारतीय शहर व खेडे यावर दूसन येतात. या रेट्यामुळे भारतीय समाजात परितर्वन होत आहे. यातून इस्ट अनिष्ठ बदल दिसून येत आहे. या बदलामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतीक घडी विस्कटली आहे. काही प्रमाणात भारतीय समाजावर आघात होत आहेत. तसेच खजगीकरण, उदारीकरण, औद्याकीगीकरण यामुळे भारतीय ग्रामीण व नागरी समुदायात परिवर्तन दिसून येत आहे. कौटुंबिक सामाजिकरण व्यक्तीच्या भूमिका, समाजातील स्थान आभासी दुनियेकडे जात आहे.

जागतिकीकरणामुळे संपूर्ण भारतीय समाज ढवळून निघाला आहे. भारतीय मिश्र अर्थ व्यवस्थेचे स्वरुप बदलले आहे. कमी अधिक प्रमाणात शहरी व ग्रामीण समुदायावर खोलवर परिणाम दिसून आहेत. शेतकरी, कामगार, नोकरदार, मालक, मजूर व्यापार, उद्योग, बाजार, यावर नकारात्मक व सकारात्मक परिणाम होत आहेत. जागतिकीकरणच्या प्रक्रियेने मानवी जीवनाकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. भारतीय खेडे व शहरे यावर जागतीकरणाचा कोणतचा परिणाम दिसून येत आहे याचा तुलनात्मक अभ्यास येथे विशद केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे** : १) जागतिकीकरणाची संकल्पना समजून घेणे. २) जागतिकीकरणा पुढील आव्हानाचे अध्ययन करणे. ३) जागतिकी करणामळे ग्रामीण व नागरी समाजजीवनाचे स्वरुप तुलनात्मक दृष्टीने अध्ययन करणे. ४) जागतिकीकरणाचा ग्रामीण व शहरी समाजावरील परिणामचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके** : १) जागतिकीकरणामुळे ग्रामीण व नागरी समाज जीवन बदलत आहे. २) जागतिकीकरणाचा गामीण समाज जीवनावर प्रभाव दिसून येतो. ३) जागतिकीकरणाच्या नागरी समाजजीवनावर प्रभाव दिसून येतो. ४) ग्रामीण व शहरी जीवनावर तुलनात्मक दृष्ट्या परिणाम दिसून येत आहे.

**संशोधन पध्दती** : प्रसुत संशोधन कार्यासाठी सामाजिक संशोधन पध्दतीचा अलवंब केला आहे. प्रसतुत संशोधनासाठी उत्तरदात्याकडुन माहिती संकलनासाठी मुलाखत तंत्रचा वापर केलेला आहे. नमुना निवड तंत्रनुसार सहेतूक नमुना निवड पध्दतीचा उपयोग घेऊन नागरी समुदायातून १० तर ग्रामीण समुदायातून १० अशा रितीने २० उत्तरदात्याची निवड केली आहे. तसेच प्राथमिक स्तरावर तथ्य संकलनासाठी प्रत्यक्ष सहभाग व निरीक्षण पध्दतीचा वापर केला आहे आणि दुय्यम तथ्य संकलनासाठी ग्रंथ, अहवाल, मासिक, लेख, संपादकीय लेख, निबंध, या साधनांचा वापर करुन अहवाल तयार केला आहे.

**तथ्य संकलन** : प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलीत करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलनाच्या तंत्रात मुलाखत तंत्राचा वापर केला आहे. तसेच ग्रामीण व शहरी भागाचे सर्वेक्षण केले ओ. यात ग्रामीण व शहरी समुदायातून १० + १० = २० उत्तरदात्याकडुन मुलाखतीद्वारे तथ्य सकंलीत केले आहे. तर दुय्यम मानधनामध्ये ग्रंथ, मासिक, अहवाल,लेख, निबंध, योजना अहवाल, शोध निंबंध संशोधन पत्रिका या साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन केले आहे.

**संशोधनाची गरज व महत्व** : जागतिकीकरण ही संकल्पना विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी महत्वाची ठरते. विकसीत राष्ट्राच्या जोडीला विकसीनशील राष्ट्रे कसे येतील त्यांचा व्यापार कसा वाढेन त्यांच्यात खाजकीकरण, उदारीकरण, औद्यागीकीकरण कसे विकसित होईल या हेतूने भारत सरकारने १९९१ साली जागतिकीरणाात उडी घेतली. भारत कृषी प्रधान देश आहे. भारतीय समाजात सर्वधर्म समभाव ही भावना आहे. याच जोडीला व्यापाराची व्याकता दळणवळणाची व्यापकता औचारीक प्रगल्भता,आधुनिकीकरणाची वैश्विकता जागतिकीकरणातून आली आहे. जगातील इतर देशाप्रमाणे भारतीयांची विचार सरणी, धर्म निरपेक्षता दृष्टी, समता खुली अर्थव्यस्था गरजेची आहे. याचा परिणाम भारतीय ग्रामीण व नागरी समाज व्यवस्थेवर कसा होत आहे याचा तुलनात्मक अभ्यास प्रस्तुत संशोधनातून मांडलेला आहे. भारतीय व्यापार, उद्योग, संस्कृती, परंपरा, शिक्षण, यावर काय परिणाम होत आहे याचा संशोधनात्मक आढावा प्रस्तुत संशोधनातून घेतलेला आहे. जागतिकीकरणाची संकल्पना, चिकित्सा, दृष्टीकोनातून अभ्यासाचे कार्य या संशोधनातून केले आहे.

**समस्येचे विधान** : 'जागतिकीकरणाच्या विकासाचा तुलनात्मक अभ्यास : (ग्रामीण आणि शहरी औरंगाबाद)'

**कार्यात्मक व्याख्या** : प्रस्तुत संशोधनातून जागतिकीकरण उदारीकरण खाजगीकरण या संकल्पनाचा वापर केलेला आहे.

१. जागतिकीकरण : "मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार आणि दर्घिकालीन भांडवल हेच जागतिकीकरण होय" - प्रा. अनलोक रॉय.

२. औद्यागिकीकरण : "आर्थिक वस्तू व सेवा यांच्या उत्पादनासाठी अमानवी आणि अजैविक शक्तीचा प्रचंड वापर करणे असा औद्योगीकरणाचा ममुलभूत अर्थ आहे."

३. उदारीकरण : "सरकारी नियंत्रण कमी करणे म्हणजे उदीकरण खाजकीकरण म्हणजे सरकारच्या मालकीच्या कंपन्यां किंवा क्षेत्र खाजगीकरण संस्थांना अंशतः किंवा पूर्णपणे हस्तांतरीत करणे होय"

या संशोधनात जागतिकीकरणात वरील संकल्पनांचा विचार करुन संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

**माहिती संकलनाची साधने** : प्रस्तुत संशोधनासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी समुदायावर जागतिकीकरणाचा प्रभाव विकास या परिणाम जाणून घेण्यासाठी २० उत्तर दात्याकडून मुलाखत तंत्राद्वारे माहिती संकलीत केली आहे. तसेच इतर ग्रंथ, मासिक अहवाल शोधनिबंध, वृत्तपत्र याचा वापर करुन तथ्य संकलीत केली आहेत. तसेच प्रत्यक्ष भेटी, निरीक्षण, सहभाग यातून तथ्यांचे संकलन करुन अहवाल मांडलेला आहे.

**माहिती विश्लेषणाची तंत्रे :** प्रस्तुत संशोधनासाठी मिळविलेल्या तथ्यावर संशोधनात्मक पातळीवर विश्लेषण करण्यासाठी गणितीय पध्दतीचा वापर केलेला आहे. यात बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार सरासरी टक्केवारी आणि संख्याशास्त्राचा उपयोग करुन प्राप्त तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी उपयोग करुन माहितीचे विश्लेष्नण केले आहे.

**माहितीचे विश्लेषण** : प्रस्तुत संशोधनासाठी औरंगाबाद जिल्ह्यातून ग्रामीण व नागरी समुदायाकडून प्रत्येकी १०-१०-२० च्या उत्तरदात्याच्या द्वारे मुलाखत घेवून माहिती गोळा केली आहे. या मुलाखत या मुलाखती नोव्हेंबर महिन्यात सुरूवातीला घेऊन संशोधन अहवाल मांडला आहे.

१. प्रस्तुत संशोधनातून शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला असता ग्रामीण समुदायात व्यवासायीक पदवी घेतलेले २० टक्के कुटुंब प्रमुख आहेत. तर नागरी भागात व्यावसायीक शिक्षण घेतलेल्या कुटुंबाचे प्रमाण ४० टक्के आहे. शिक्षण न घेणारे कुटुंब ० टक्के हे नागरी भागात आहेत तर ग्रामीण भागत शिखण न घेणा-याचे प्रमाण १० टक्के आहेत.

२. व्यवसायाचा आढावा घेतला असता ग्रामीण भागात व्यापार करणारे १०टक्के आहेत. तर नागरी भागात २० टक्के आहेत. ग्रामीण भागात बेकारीचे २० टक्के आहेत तर नागरी भागात १० टक्के आहेत.

३. दळणवळाच्या साधनांचा आढावा घेतला. असता ग्रामीण भागात चार चाकी वाहन असणारे १० टक्के आहेत. तर नागरी भागात हेच प्रमाणे ३० टक्के आहेत. मोटार सायकल असणारे ग्रामीण भागात ४० टक्के लोक आहेत तर नागरी भागात ६० टक्के आहेत. कोणत्याच स्वरुपाचे वाहन नसणारे ग्रामीण भागात २० टक्के आहेत तर नागरी भागात हेच प्रमाण शुन्य आहे.

४. मनोजरंजनाचे साधन याचा आढावा घेतला तर दूरदर्शनाचा वापर करणारे शहरी भागात ९० टक्के आहेत तर ग्रामीण भागात ७० टक्के आहे. तसेच मोबाईलचा वापर ग्रामीण भागात ९० टक्के आहे तर नागरी भागात १०० टक्के आहे.

५. जागतिकीकरणाचा प्रभाव याचा आढावा घेतला तर त्यात ग्रामीण समुदायावर ६० टकके कुटुंबावर प्रभाव आहे. तर नागरी भागात हे प्रमाण १०० टक्के आहे.

६. जागतिकी करणा विषयी ज्ञान असणारे प्रमाण ग्रामीण समुदायात ४० टक्के आहे तर नागरी समुदायात ९० टक्के आहे. यावरुन नागरी भागावर प्रभाव अधिक आहेत.

७. शिक्षणासाठी जागतिकीकरणाचा उपयोग / फायदा झाला आहे कीह नाही याचा आढावा घेतला असता ग्रामीण समुदायावर २० टक्के फायदा आहे तर नागरी भागावर १०० टक्के फायदा दिसून येतो.

८. घरगुती वस्तु वापरात ग्रामीण भागात ४०टक्के लोक आहेत तर नागरीभागात ९० टक्के वापर आहे याचा आढावा नागरी समुदायावर अधिक आढळत आहे.

९. रोजगार मिळविण्यासाठी जागतिकीकरणाचा उपयोग ग्रामीण भागात १० टक्के आहे तर नागरी समुदायात हे प्रमाण ७० टक्के आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी समुदायात रोजगार मिळविण्यासाठी उपयोग दिसून येत आहे.

१०. जागतिकीकरणाचा कुटुंब व्यवस्थेवर प्रभाव ग्रामीण भागावर २० टक्के आहे तर नागरी समुदायात ८० टक्के आहेत.

११. विवाह संस्थेवर जागतिकीकरणाचा प्रभाव ग्रामीण समुदायावर ४० टक्के आहे तर नागरी भागावर हे प्रमाण ९० टक्के आहे.

१२. जाती संस्थेवर ग्रामीण भागात ४० टक्के प्रभाव झालेला आहे. तर नागरी भागात हे प्रम्राण ९० टकके आहे.

१३. धर्मावर प्रभाव ग्रामीण भागात ७० टक्के दिसून येतो तर नागरी भागावर १०० टक्के दिसून येत आहे.

१४. राजकारणावरील प्रभाव याचा आढावा घेतला असता ग्रामीण भागावर ७० टक्के प्रभाव आहेत तर नागरी भागावर १०० टक्के प्रभाव दिसून येत आहे.

अशा स्वरुपाचा परिणाम ग्रामीण व नागरी समुदायावर दिसून आला आहे. एकंदरीत जागतिकीकरणाचा फायदा हा दोघांच्या मानाने अधिक झला आहे. असे स्पष्ट झाले आहे.

**मर्यादा :** प्रस्तुत संशोधन हे औरंगाबाद जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. तसेच या संशोधनात असंख्य आकडेवारी ही प्रायोगिक तत्वावर आधारीत आहेत. मानवी स्वभाव सतत बदलत असतो. या मर्यादा आहेत.

***संदर्भ :***


*१. समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३१ वे अंक -१८ वा डिसेंबर २०१४*

*२. समाजशास्त्र संशोधन पत्रिका वर्ष ३७ वे अंक २४ वा डिसेंबर २०१९ पान नं. ५७.*

*३. 'डॉ. प्रदिप आगलावे (१९९७) आधुनिक भारतातील सामाजिक समस्या' साईनाथ प्रकाशन नागपुर.*

*४. घाटोळे रा.ना. (१९९४)'ग्रामीण समाजशास्त्र' आणि सामुदायीक विकास' श्री मंगेश प्रकाशन नागपूर.*

*५. डॉ. सुधीर बोधनकर (१९९४) 'सामाजिक संशोधन पध्दती' साईनाथ पब्लिकेशन, नागपुर.*

*६. पद्माकर दुभाषीः 'जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकरण' श्री विद्या प्रकाशन पुणे.*

*७. डॉ.भागवत विष्णू 'जागतिकीकरण नविन गुलामगिरी' समता प्रकाशन, नागपुर.*

*८. Chronicle of Humanities and Cultural Studies Book (IV) 27 January 2018, Editor Mr. Eshwar L. Rathod ISSN No. 2454-5503 P-200*

# मोबाईलचा समाजावर झालेला परिणाम : एक समाजशास्त्रीय अभ्यास
## (मोठीवाडी गावांच्या विशेष संदर्भात)

**श्री. नवनाथ विश्वनाथ खेत्री** संशोधक विद्यार्थी, मु. पो. मोठीवाडी, ता. माजलगाव जि. बीड

***सारांश :*** *मोबाईलच्या अतिवापरामुळे घराघरांतील व्यक्तीमधील संवाद संपत चालला आहे. पूर्वी घरात ज्या गप्पा मारल्या जात असे त्या कमी होत आहेत. आज घरातील आई-वडील आणि मुले आपआपल्या मोबाईलमध्ये मग्न झालेले पाहायला मिळतात. त्यामुळे आपापसांतील संवाद कमी झाले आहेत. शाळा-कॉलेजमधील मुलेसुद्धा मोबाईलचा गैरवापर करताना पाहायला मिळतात आणि शाळेत तासाला बसून मोबाईलचा वापर केल्यामुळे मुलांमध्ये आत्मकेंद्रीपणा वाढताना दिसत आहे. त्याचबरोबर मोबाईलमुळे वेळेचा अपव्यय होतो. जसे, सरकारी कर्मचारी म्हणा किंवा खासगी कर्मचारी हल्ली सगळ्यांच लोकांकडे मोबाईल असतो. हे लोक कामाच्या ठिकाणी पण मोबाईलवर टाईमपास करताना पाहण्यास मिळतील. आज काल लहान मुलेदेखील आई-वडिलांचा मोबाईल हाताळताना दिसतात. अनेक लहान मुले अगदी हुशारीने मोबाईल हाताळत असतात, परंतु अति मोबाईलच्या वापरामुळे मुलांनादेखील त्याची सवय लागते आणि मग अगदीच लहान वयात चष्मा लागणे वगैरे सारख्या गोष्टी होतात. काही वाईट प्रवृत्तीचे लोक या मोबाईलचा गैर वापर देखील करू शकतात. काही लोक आपली अति गोपनीय माहिती जसे की, एटीएम पासवर्ड, ऑनलाइन बँकिंग पासवर्ड हे मोबाईलमध्ये स्टोअर करून ठेवतात, परंतु मोबाईल जर नकळत दुसऱ्या व्यक्तीच्या हाती लागला किंवा हरवला आणि नको त्या व्यक्तीच्या हातात गेला तर त्याचे गंभीर परिणाम मोबाईलधारकाला भोगावे लागतात. मोबाईलला हेडफोन लावून अगदी जोरात आवाजात जास्त वेळ गाणी ऐकल्यानेदेखील त्रास होऊ शकतो. तसेच अनेकांना रात्री झोपताना हेडफोन कानात लावूनच झोपायची सवय असते. त्यामुळे कानाचे आजार किंवा ऐकू येणे यावर देखील परिणाम होऊ शकतात.*

**प्रस्तावना :** मोबाईल आता दैनंदिन जीवनाचा एक भाग असून मोबाइलच्या सवयीचा परिणाम सामाजिक जीवनावरही होत आहे. सभा किंवा बैठकांसारख्या सामाजिक उपक्रमांच्या ठिकाणी मोबाइलचा उपयोग करणाऱ्या व्यक्तीची संख्या जास्त होत आहे. वाशिंग्टन येथील प्यू रिसर्च सेंटरने केलेल्या या सर्वेक्षणात 82 टक्के लोकांनी सामाजिक उपक्रमात सहभागी असताना मोबाइल वापरणे चुकीचे असल्याचे म्हटले आहे. परंतु, त्याच वेळी तब्बल ८9 टक्के लोकांनी आपण स्वतः अशा कार्यक्रमात सहभागी असताना एसएमएस, कॉल किंवा फोटोची देवाणघेवाण केल्याची कबुली दिली आहे. सामाजिक कार्यक्रमामधील सहभागाचे फोटो, व्हिडीओ, नियमितपणे पोस्ट करणाऱ्यांची संख्या अधिक होत आहे. सार्वजनिक कार्यक्रमात बसल्यानंतर कार्यक्रम कंटाळवाणा वाटल्यामुळे वेळ घालवण्यासाठी मोबाइलशी खेळणाऱ्यांची संख्या वाढत आहे. तसेच लोकांना टाळण्यासाठी मोबाइलचा आधार घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. आज अनेक कुटुंबामधल्या बहुतांश मुलांकडे स्वतःचा मोबाईल आहे. पालक आपली मुले इतकी स्मार्ट आहेत, की त्यांना ही साधने वापरता येतात. याचा अभिमान बाळगतात. मात्र हे तंत्रज्ञान अतिशय हानिकारक आहे. हे आपल्याला माहित आहे का? अनेक पालक मुलांना आनंदाने मोबाईलही घेऊन देतात, पण पालक घरी नसताना वा असतानाही मुले काय पाहतात याकडे आपले लक्ष आहे का. याचाही गांभीर्याने विचार करने गरजेचे आहे. भ्रमणध्वनी हे एक इलेक्टॉनिक्स उपकरण (यंत्र) असून याचा दूरसंचारासाठी उपयोग केला जातो. याला इंग्रजीमध्ये मोबाईल फोन (मोबाईल) किंवा सेल्युलर फोन (सेल फोन) असे म्हणतात. भ्रमणध्वनीच्या साहाय्याने संभाषणाची व माहितीची देवाणघेवाण करता येते. मोबाईल हे एक उत्कृष्ट संवाद साधण्याचे उपकरण असून मोबाईलचे फायदे व दुष्परिणाम पाहिल्यानंतर असे म्हणावेसे वाटते की, मोबाईल आपल्यासाठी आहे, आपण मोबाईलसाठी नाही. हे प्रत्येकाने लक्षात घेणे गरजेचे आहे. कोणतीही गोष्ट अति केल्यास त्याचे दुष्परिणाम हे होतातच. म्हणून स्वतःला अशा दुष्परिणामांपासून वाचवण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. मोबाईल हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील महत्वाचा घटक व गरजेची वस्तू बनला आहे. पूर्वी अन्न, वस्त्र, निवारा या तीनच मानवाच्या मूलभूत गरजा आहेत असे बोलले जात आहे. परंतु आता मोबाईल देखील मानवाची मूलभूत गरज बनली आहे.

**संशोधन क्षेत्र :** माजलगाव तालुक्यापासून 16 कि.मी. अंतरावर वसलेले मोठीवाडी गाव हे संशोधनाचे क्षेत्र आहे. मोठीवाडी गावची एकूण

लोकसंख्या 2986 पुरुष 1576, स्त्री 1410 एवढी आहेत. यापैकी संशोधनासाठी सहेतूक व उद्देशात्मक नमुना निवड पध्दतीने 50 उत्तरदात्याची निवड केली होती. त्याच्याकडून मुलाखत अनुसूची भरून घेतली आहे. संशोधन क्षेत्र हे मोठीवाडी गाव आहे. या गावातून सहेतूक व उद्देशपूर्ण पध्दतीने 50 उत्तरदाते निवडून त्यांच्याकडून मुलाखत अनुसूची भरून घेतली आहे. समाजशास्त्रीय व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केला आहे. या संशोधनासाठी काही उद्दिष्टे समोर ठेवली होती ती मोबाईलचा समाजावर झालेला परिणाम अभ्यासणे, दुष्परिणाम जाणणे, उपाययोजना अभ्यासणे इत्यादी. मुलाखत अनुसूचीमध्ये विचारण्यात आलेली प्रश्न मोबाईलचा वापर कशासाठी केला जातो, मोबाईल किती तास वापरता, रात्री किती वाजेपर्यंत मोबाईल बघितला जातो, घरातील इतर व्यक्ती मोबाईलमध्ये व्यस्त असतात काय, मोबाईल नेटवर्क / रेज नसल्यास अस्वस्थ वाटते का, सतत मोबाईल वापरत असल्यामुळे कोणता त्रास होतो, मोबाईलमुळे मनोरंजनाचे साधन उपलब्ध झाले आहे, मोबाईलच्या वापरामुळे वेळ वाया जातो का, तुम्ही जास्त वेळ मोबाईल वापरत असल्यामुळे घरामध्ये भांडणे होतात काय, मोबाईलमुळे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी मोबाईलचा कमी वापर कराल काय, मोबाईलचा जास्त वापर होत असल्यामुळे सामाजिक संबंधावर काही परिणाम झाले आहेत का हे प्रश्न विचारण्यात आले होते.

**संशोधनाची उदिष्टे :** मोबाईलच्या वापराचे दुष्परिणाम अभ्यासचे, मोबाईलमुळे समाजावर / व्यक्तीवर झालेले परिणाम जाणून घेणे, मोबाईलच्या वापरामुळे व्यक्तीच्या शरीरावर वाईट परिणाम होत आहेत ते टाळण्यासाठी काही उपाययोजना आहेत त्या जाणून घेणे, मोबाईल वापराचा उद्देश जाणून घेणे.

**अभ्यासांची व्याप्ती व मर्यादा :** प्रस्तुत अभ्यसाची व्याप्ती ही माजलगाव तालुक्याती मोठीवाडी गावापुरतीच आणि वरील उद्दिष्टांच्या अभ्यासापुरती मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत अध्ययनाच्या उद्देशांना अनुसरून अभ्यास करताना समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच विश्लेषणात्मक पध्दतीचाही वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक माहितीवर आधारित असले तरी पूरक अशी द्वितीय माहिती गावासंदर्भात आलेल्या दै. वतृपत्रांचा आधार घेतला आहे. तसेच मोबाईलचा समाजावर झालेला परिणाम यासंदर्भातील माहिती इंटरनेवरून घेतली आहे. प्राथमिक माहिती मिळवीण्यासाठी सहेतूक व उद्देशपूर्ण नमुना निवडीच्या आधारे या गावातील तरूण व ग्रामस्थांकडून मुलाखत अनुसूचीच्या आधारे व निरीक्षणाच्या साहाय्याने प्राथमिक माहिती मिळवीली आहे.

**तथ्यांचे विश्लेषण:** 1 ते 10 नोंव्हेबर 2022 या कालावधीत मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली आहे. तसेच निरीक्षणाच्या आधारे गोळा केलेली तथ्य. त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे

**मोबईलचा वापर कशासाठी केला जातो.** हा प्रश्न विचारला तेव्हा असे उत्तर मिळाले, एकूण उत्तरदात्यांपैकी 30 उत्तरदात्यांनी सांगितले की, आम्ही मोबाईलचा वापर फोन करणे, व्हिडोओ पाहने, फेसबुक व व्हॉट्सएप पाहण्यासाठी करतो. 10 उत्तरदाते सांगतात की, व्हॉट्सएप, फेसबुक व युट्युब बघण्यासाठी करतो. 5 उत्तरदाते सांगतात की, नवीन माहिती मिळविण्यासाठी, संदेश पाठवणे, फेसबुक व व्हॉट्सएपसाठी उपयोग केला जातो. 5 उत्तरदात्यांनी सांगितले की, फोन करणे, युट्युब, ट्विटर, फेसबुक, व्हॉट्सएपसाठी वापर केला जातो. यावरून असे दिसते, आज सोशल मिडीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. फेसबुक, व्हॉट्सएप व युट्युब चा वापर जास्त वाढला आहे.

**मोबाईल किती तास वापरता** असे विचारले असता असे दिसून आले की, दिवसातील तीन तास मोबाईल वापरणारे 25 उत्तरदाते आहेत. 5 उत्तरदाते 4 तास वापर करतात. 5 जण सांगतात 2 तास वापरतो. तर 10 जण सांगतात 1 तास वापरतोत, 5 उत्तरदाते 5 तास मोबाईल वापरतात. यावरून असे दिसून येते की, जास्त वेळ मोबाईल वर घालणारे जास्त आहेत.

**रात्री किती वाजेपर्यंत मोबाईल बघितला जातो :** 50 उत्तरदात्यांपैकी 30 उत्तरदात्यांनी सांगितले की, आम्ही रात्री 10 पर्यंत मोबईल बघत बसतो. 5 उत्तरदाते सांगतात की आम्ही 12 नंतरपण मोबईल पाहत असतो. 5 जण सांगतात 9 पर्यंत मोबाईल बघत बसतो. थोडक्यात, 12 पर्यंत मोबाईल बघणारे सर्वात जास्त आहेत.

**घरातील इतर व्यक्ती मोबाईलमध्ये व्यस्त असतात काय:** एकूण उत्तरदात्यांपैकी 20 उत्तरदाते सांगतात, होय. तर 15 उत्तरदाते सांगतात काही प्रमाणात व्यस्त असतात. 15 जण सांगतात घरातील इतर व्यकती मोबाईलमध्ये व्यस्त नसतात. यावरून असे दिसते की, घरातील सर्वच व्यक्ती मोबाईलमध्ये व्यस्त असतात.

**मोबाईला नेटवर्क / रेज नसल्यास अस्वस्थ वाटते का:** 35 उत्तरदात्यांनी सांगितले की, मोबाईला

नेटवर्क नसल्यास खरच अस्वस्थ वाटते. 10 उत्तरदाते सांगतात आम्हाला काही परिणाम होत नाही. 5 उत्तरदाते सांगतात काही प्रमाणात अस्वस्थता जाणवते. थोडक्यात, मोबाईला नेटवर्क नसल्यास लोकांना अस्वस्था जाणवू लागते हे प्रमाण सर्वात जास्त आहे.

**सतत मोबईल वापरत असल्यामुळे कोणता त्रास होतो:** सतत मोबईल वापरत असल्यामुळे डोळे दुखणे, ताणतणाव, चिडचिड होणे असे त्रास आम्हाला होतात असे 30 उत्तरदाते सांगतात. 7 उत्तरदात्यांनी सांगितले चिडचिड होणे, राग येणे, ताणतणाव असे नेहमी होत असते. 8 उत्तरदाते सांगतात मानसिक आजार, मानेचा त्रास, डोळे दुखणे अशा प्रकारे त्रास होतात. 5 उत्तरदाते म्हणतात, डोळे दुखणे, मानेचा त्रास व डोळे दुखणे अशा प्रकारचा त्रास होतो. थोडक्यात, प्रत्येकाला कोणत्यांना कोणत्या प्रकारचा त्रास होत आहे.

**मोबाईलमुळे मनोरंजनाचे साधन उपलब्ध झाले आहे:** 35 उत्तरदाते सांगतात की, होय मोबाईलमुळे मनोरंजनाचे साधन उपलब्ध झाले आहे तर 10 उत्तरदाते सांगतात काही प्रमाणात मोबाईलमुळे मनोरंजन होते. 5 उत्तरदाते सांगतात आमचे मोबाईलमुळे मनोरंजन होत नाही. सर्वात जास्त उत्तरदात्यांनी सांगितले की मोबाईलमुळे मनोरंजन होते.

**मोबाईलच्या वापरामुळे वेळ वाया जातो काय:** एकूण उत्तरदात्यांपैकी 33 उत्तरदाते सांगतात की, मोबाईलच्या वापरामुळे वेळ वाया जातो. 7 उत्तरदाते सांगतात, आमचा काही प्रमाणात वेळ वाया जातो. 10 उत्तरदाते सांगतात की, मोबाईलच्या वापरामुळे आमचा वेळ वाया जात नाही. सर्वात जास्त उत्तरदाते असे आहेत की ते म्हणतात मोबाईलच्या वापरामुळे आमचा वेळ वाया जातो.

**तुम्ही जास्त वेळ मोबाईल वापरत असल्यामुळे घरामध्ये भांडणे होतात काय:** 40 उत्तरदात्यांनी सांगितले आहे की, होय आम्ही जास्त वेळ मोबाईल वापरत असल्यामुळे घरामध्ये नेहमीच भांडणे होतात. 7 उत्तरदाते म्हणतात काही प्रमाणात आमच्या घरात भांडणे होतात. तर 3 उत्तरदाते सांगतात, आमच्या घरात कधीही मोबाईलवरून भांडणे झाली नाहीत. थोडक्यात, आज काल जास्त वेळ मोबाईल वापरणाऱ्यांची संख्या जास्त झाली आहे. जास्त वेळ मोबाईल वापरल्यामुळे घरातील इतर लोकांसोबत भांडणे होत आहेत. एकमेकांत सामाज्यस राहिले नाही.

**मोबाईलमुळे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी मोबाईलचा वापर कमी कराल काय:** 36 उत्तरदाते सांगतात की, मोबाईलमुळे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी मोबाईलचा वापर कमी करायला तयार आहोत तर 14 उत्तरदाते या दुष्परिणामाकडे लक्ष देत नाहीत ते मोबाईलचा वापर कमी करायला तयार नाहीत. थोडक्यात, मोबाईलमुळे होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी अनेक लोक पुढे येवू लागले आहेत. हे दुष्परिणाम कमी करण्यासाठीही प्रयत्न करू लागले आहेत.

**काही प्रमाणात तुम्ही ऑनलाईन व्यवहार मोबाईलच्या माध्यमातून करता काय:** 23 उत्तरदाते सांगतात की, आम्ही सर्व व्यवहार हे ऑनलाईनच्या माध्यमातून करतो, आता आम्हाला यांची सवय झाली आहे. 27 उत्तरदाते सांगतात आम्हाला मोबाईलच्या माध्यमातून ऑनलाईन व्यवहार करता येत नाहीत. यावरून आज काल मोबाईलचा वापर करून लोक ऑनलाईन व्यवहार करत आहेत. त्यांना ऑनलाईन व्यवहार सोपे वाटतात. गुगल पे, फोन पे व इतर एप च्या माध्यमातून आज मोठ्या ऑनलाईन व्यवहार केले जातात. ऑनलाईनमुळे व्यवहार करणे अत्यंत सोपे झाले आहे.

**मोबाईलचा जास्त वापर होत असल्यामुळे सामाजिक संबंधावर काही परिणाम झाले आहेत का:** 27 उत्तरदाते सांगतात की अति / जास्त मोबाईल वापरत असल्यामुळे आमच्या सामाजिक संबंधावर नकारात्मक परिणाम झाले आहेत. आम्ही सतत मोबाईल वापरत आहोत म्हणून आमचे मित्र, शेजारी, समाजातील लोक, कुटुंबातील व्यक्ती हे दूर जात आहेत. 6 उत्तरदाते सांगतात, यांचा आमच्या जीवनामध्ये सकारात्मक परिणाम झाला आहे. 10 उत्तरदाते सांगतात सामाजिक संबंध दुरावत चालले आहेत तर 7 उत्तरदाते सांगतात, सतत मोबाईल वापरत असल्यामुळे माझे मोठ्या प्रमाणात सामाजिक संबंध संपुष्टात आले आहेत. यावरून सतत मोबाईलचा वापर होत असल्यामुळे सामाजिक संबंधावर त्यांचा परिणाम होत आहे. हे परिणाम सकारात्मक, नकारात्मक, नाहीसे होणे (संपुष्टात येणे) व सामाजिक संबंध दुरावणे इत्यादी आहेत.

**अतिरिक्त मोबाईल वापर ही वाढीच्या वयातील मुलांमध्ये डोळ्याचे दोष निर्माण करणारी गोष्ट आहे.**

अनेक मुले तास न तास मोबाईल पाहतात, अंधारामध्येही मोबाईल पाहण्याचे प्रमाण अधिक असते. सतत स्क्रीनवर पाहिल्यामुळे मुलांमध्ये डोळ्याचे दोष निर्माण होतात. लहान वयापासून अतिरिक्त स्क्रीन पाहण्यामुळे मुलांच्या वाढीमध्ये अनेक

चिंता निर्माण होण्याची शक्यता असते. स्क्रीनच्या प्रकाशामुळे / किरणामुळे केवळ त्यांच्या डोक्यावर परिणाम होतो इतकेच नव्हे, तर त्यांच्या झोपेच्या चक्रावरही दुष्परिणाम होऊन रात्रीची झोपही कमी होते "वाढीच्या वयातल्या मुलांमध्ये लठ्ठपणा मोठ्या प्रमाणावर आढळतो कारण मुले मोबाईल पाहात पाहात अनेकदा जंक फुड खातात जे आरोग्याला घातक आहे. मुले मोबाईल पाहताना इतकी तल्लीन होतात, की त्यांना काय आणि किती खाने याचे भान राहत नाही.

**बसण्याच्या पद्धतीमध्येही बदल:** मोबाईल स्क्रीनसमोर बराच वेळ बसल्यामुळे मुलांची बसण्याची पद्धत बदलते. ही मुले पोट काढून बसतात. त्यामुळे त्यांच्या पाठीला बाक येऊ लागला आहे. प्रौढांमध्ये ही समस्या नेहमी आढळत होती. जी मुले स्क्रीनसमोर अधिक प्रमाणात वेळ घालवतात त्यांची वागणुक आक्रमक, हिंसक दिसते तसेच या मुलांमध्ये अभ्यासामध्ये लक्ष लागत नाही, शिक्षणातला रस कमी होतो. मोबाईल दिला नाही की मुलं प्रचंड चिडताल मोबाईल देण्यासाठी घरातल्या वस्तू फेकतात, एकाच घरात राहूनही मुलांना त्याच्या आई- वडीलाना बोलायला वेळ नाही. सतत मोबाईलवर असल्याने घरातल्या माणसांशीही काहीच संवाद नाही, ड्रगची नशा असते तभी मोबाईलची सवय होत आहे.

**मोबाईलमुळे आपल्या शरीरावर वाईट परिणाम होऊ शकतात.-** मोबाईलच्या वापरामुळे एकाग्रतेचा अभाव, ब्रेन ट्यूमर, डोकेदुखी, मानसिक ताणतणाव, तोंडाचा कॅन्सर, अपघात, आळशीपणा, थकवा, रक्तदाब व रक्ताभिसरण संस्थेवरील परिणाम, इलेक्ट्रोमॅग्रेटिक रेडिएशनमुळे शरिरावर व बुद्धीवर होणारा हाणीकारक प्रभाव, कानाचा पडदा फाटणे व बहिरेपणा किंवा कमी ऐकू येणे, डोळयांची जळजळ, चष्मा लागून कमी दिसणे.

सध्या इंटरनेटच्या वापराने मोबाईलवर सर्व प्रकारची माहिती आणि सुविधा पुरवल्या जात आहेत. त्या सुविधांचा लाभ घेणे आणि माहिती मिळवणे यामुळे मोबाईल अतिप्रमाणात हाताळला जात आहे. त्याशिवाय एकमेकांशी संपर्क साधणे, व्हिडियो कॉल करणे या बाबी देखील नित्यनेमाच्या झालेल्या आहेत. मोबाईल ही इलेक्ट्रोनिक वस्तू असल्याने त्यामधून अतिनील किरणे बाहेर पडत असतात. मोबाईल स्क्रीन देखील प्रकाशित असल्याने आणि त्यामध्ये सतत आपण बघत राहिल्याने डोळयावर विपरीत परिणाम जाणवू लागलेले आहेत. मोबाईल वापरताना देखील आपल्याली मान आणि पाठ खाली झुकवावी लागत असल्याने मणक्याचे दुखणे देखील वाढलेले आहे. तसेच त्वचाविकार, हातांच्या स्नायुंची संवेदना कमी होणे, अनिद्रा सततची भीती, चिंता असे इतर परिणाम देखील डोके वर काढू लागलेले आहेत. माणसाचे सर्व लक्ष मोबाईल वेधून घेत असल्याने मार्केटिंग कंपन्यांनी त्याचा लाभ घेत ऍप्लिकेशन्स, विविध गेम्स आणि सोशल मीडिया म्हणून एका वेगळ्याच दुनियेचा शोध लावलेला आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. त्यामुळे माणून वास्तविक उत्साही आणि आनंदी न राहता एका काल्पनिक दुनियेत जगू लागलेला आहे. अनेक प्रकारचे सर्व्हे आणि संशोधनाने असे आढळले की सरासरी तीन ते चार तास मोबाईल वापरल्याने मेंदूवर विपरीत परिणाम होऊ शकतात. माणसाची संवेदना, स्मरणशक्ती आणि एकाग्रता कमी होऊ शकते. मोबाईलची सततची सवय ही कालांतराने व्यसन बनू शकते त्यामुळे माणूस चिंताग्रस्त राहु शकते. सध्या बैंकिंग, शिक्षण, ऑनलाईन बुकींग, गेमिंग, सोशल मीडिया अशा विविध प्रकारच्या सेवांचा लाभ मोबाईलवर घेता येणे शक्य असल्याने सहजा सहजी कोणी मोबाईलचा वापर टाळू शकत नाही परंतु त्यावर नियंत्रण ठेवणे मात्र शक्य आहे.

**मोबाईल व्यसनाधीनतेवर उपाय काय?**

**नोटीफिकेशन बंद करने :** अनेक लोकाना सकाळी उठल्यानंतर ईमेल, फेसबुक, व्हॉट्सअप आणि इतर तत्सम एप्सचे नोटिफिकेशन चेक करण्याची सवय असते. रात्री झोपताना मोबाईलचा इंटरनेट डेटा बंद करणे किंवा नोटिफिकेशन ऑफ करून ठेवणे ही, डिजिटल डिटॉक्सची उत्तम पद्धत आहे. सकाळी उठल्यानंतर वर्तमानपत्र वाचणे, अगदी योग्य आहे.

**जेवताना स्क्रीन पाहायचा नाही :** जेवणाच्या वेळी संपूर्ण लक्ष खाण्याकडे असणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे जेवत असताना कोणताही स्क्रीन पाहू नये. असे केल्याने शरीर आणि मन निरोगी राहते.

**रात्री मोबाईल फ्लाईट मोडवर ठेवणे :** डिजिटल डिटॉक्स प्रभावीपणे पार पाडायचे असेल तर रात्री झोपण्यापूर्वी तुमचा मोबाईल फ्लाईट मोडवर ठेवा आणि तो मिळालेला वेळ आपल्या कुटुंबाबरोबर घालवा.

**झोपताना मोबाईल दूर ठेवा :** रात्री झोपण्यापूर्वी १ तास अगोदर तुम्ही तुमचा मोबाईल तुमच्यापासून दूर ठेवा. कारण, मोबाईलमधून निघणारा निळया रंगाचा प्रकाश तुमच्या डोळयांसाठी हानीकारक असतो. जर महत्त्वाचे मॅसेज येत असतील, तर त्याची माहिती ऐकू येणारी ॲप्सदेखील बाजारात आहेत, त्याचा वापर करा.

**आपल्या शरिरावर वाईट परिणाम टाळण्यासाठी पुढील उपाययोजना कराव्यात. -** १) अपघात टाळण्यासाठी वाहन चालवित असतांना मोबाईलचा वापर टाळावे. २) शक्य होईल तितक मोबाईलचा वापर टाळावे. आठवड्यातुन एखादा दिवस मोबाईलशिवाय जगावे. ३) झोपतांना मोबाईल स्विच ऑफ करुन दुर ठेवावा. मोबाईल जवळ घेऊन झोपु नये. ४) लहान मुलांची डोळे कोवळी असतात त्यांमुळे त्यांना मोबाईल जास्त वेळ वापरण्यासाठी देवु नये. ५) बाहेर जातांना मोबाईल वरच्या खिशात किंवा खालच्या खिशात ठेवु नये कारण इलेक्ट्रोमॅग्नेटिक रॅडिएशनचा परिणाम शरिरावर होतोच. ह्रदय व किंडणी व स्वादुपिंड यांचे रक्षण होण्यासाठी केल पाहिजे. ६) मोबाईल हा ठेवण्यासाठीचे पाकिटे बाजारात मिळतात ति वापरली पाहिजे. ७) मोबाइल कानाजवळ लावुन न बोलता स्पिकर फोन चा वापर करावा. ८) सामान्य दर्जाचे हेडफोन वापरु नये. ९) दर्जेदार व चांगल्या कंपनीचे मोबाईलच वापरली पाहिजे. १०) एकसारखे मोबाईल ला चिकटुन राहु नये. ११) एकसारखं सातत्यपूर्ण मोबाईलमध्ये बघत किंवा एकत राहु नये. १२) आपल्या मोबाइल मधिल संपर्क यादि वहीमध्ये लिहुन ठेवावी. १३) मोबाइलमधील कागदपत्रे, फाईल हे पेन ड्राइव्ह किंवा मेमरी कार्डमध्ये सेव करुन घ्यावित. १४) मोबाइलमुळे जास्त बोलतं राहिल्यामुळे संबंध बिघडणे व भांडणे होतात हे टाळण्यासाठी मोबाईलवर कमी बोला. १५) आपला मोबाईल कोणाच्याही हातात पडू देवु नका. १६) मोबाईलसाठी खास पिन नंबर, पासवर्डचा व फिंगरप्रिन्टचा वापर करण्यासाठी विसरु नका. १७) मोबाईल ढगाळ वातावरणांत व विजा चमकत असतील तेव्हा स्विच ऑफ ठेवा. १८) मोबाईलमध्ये गुगल वापरतांना https असा लिंक सुरक्षित असतिल तेव्हाच ओपन कराव्यात. १९) मोबाईलमध्ये व्हायरस स्कॅन करुन रिस्क कमी करुन घ्यावी.

**मोबाइल वापराचे दुषपरिणाम:** १) गर्भवती महिलांसाठी आणि त्यांची मुले यांना विशिष्ट धोका असतो, म्हणूनच सेल फोनचा वापर कमी करण्याची त्यांना शिफारस केली जाते. २) पुरुष प्रजनन संस्थेमध्ये फोनचे हानिकारक प्रभाव होतात म्हणून पुरुषांनी त्यांच्या पॉन्टीच्या खिशात फोन घेऊन जाऊ नये. ३) मोबाइल फोनवर मचकूर पाठवणे आणि विविध खेळ खेळणे डोळयांसाठी हानिकारक आहे. ४) विशेषतः किशोरवयीन मुलांमध्ये चिडचिडेपणा आणि आक्रमकता येते. ५) डोकेदुखी, लक्ष कमी लागणे, स्वभाव चिडचिडेपणा होणे, झोपे कमी लागणे आणि नैराश्य इ. विकार होऊ शकतात.

**सारांश:** भविष्यात मोबाईलचा वापर वाढतच जाणार आहे, त्यामुळे दुष्परिणाम देखील वाढणार आहेत. त्याचा वेळीच विचार झाला नाही आणि ठोस उपाय योजना आखल्या गेल्या नाहीत तर व्यक्तीला आणि मोठ्या स्तरावर संपूर्ण समाजाला त्याचे घातक परिणाम भोगावे लागतील. मोबाईलचे व्यसन हे लहान मुलांपासून वयस्क नागरिकांपर्यंत सर्वांना लागलेले आहे. त्यामध्ये एक आई आपल्या बाळाला घास भरविताना त्याच्या हातात –मोबाईल सुरु करून देते. कोरोनामुळे ऑनलाईन शिक्षण जरी विद्यार्थ्यांपर्यंत गेले असले तरी त्यातून विविध पॉर्न विडिओ पाहण्याची मुलांना सवय लागलेली आहे. विद्यार्थ्यांमध्ये अगदी सहज पॉर्न हिडिओ पाहण्याची सोय झालेली आहे. त्याचा परिणाम शरीरावर आणि मनावर होताना दिसत आहे. यातून पालकांनी मोबाईल काढून घेतला की, त्यांची हत्या करण्यापर्यंत ही मुले जाताना दिसत आहेत"

***संदर्भ ग्रंथ :***


1. *https://maharashtratimes.com/gadget-news/mobile-phones/social-impact-of-mobile/articleshow/48704188.cms दि. 14 / 11 / 2022*
2. *https://www.bbc.com/marathi/india-55841578 दि. 13 / 11 / 2022*
3. *https://dailymarathinews.com दि. 13 / 11 / 2022*
4. *https://mr.quora.com/%E0%A4%AE%E0%A5%8B%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%88%E0%A4%B2%E0%A4%AE%E0%A5%81%E0%A4%B3%E0%A5%87-%E0%A4%86%E0%A4%AA%E0%A4%B2%E0%A5%8D%E0%A4%AF%E0%A4%BE-%E0%A4%B6%E0%A4%B0%E0%A5%80%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%B5%E0%A4%B0*
5. *योजना (मासिक) जुलै 2022*
6. *प्रा. डॉ. शारदा वामन मोरे, नोव्हे. 2021, साठोत्तरी ग्रामीण साहित्य : नवा आयाम, लालू प्रकाशन*
7. *http://www.eshodhan.com/2020/07/blog-post_91.html*

# गडहिंग्लज येथील हिरण्यकेशी पर्यावरण मंडळाची पर्यावरण क्षेत्रातील जाणीव जागृती

***डॉ. सतिश नामदेव धनवडे,*** *समाजशास्त्र विभाग,एस. एम. आर. के. बी. के. ए. के. महिला महाविद्यालय, नाशिक.*

**गोषवारा :** अलीकडच्या काळामध्ये नागरी भागामध्ये अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. पर्यावरणीय समस्यासंबंधी लोकामध्ये जाणीव जागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविण्यामध्ये बिगर शासकीय संघटना अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ हि अनोदणीकृत बिगर शासकीय संस्था सन १९८७ पासून लोकांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबऊन पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे काम करीत आहे. सदरची संघटना हि तालुका पातळीवर काम करणारी संघटना आहे. संघटना केवळ पर्यावरण या क्षेत्रामध्ये करते. संस्थेने प्रामुख्याने नैसर्गिक पाण्याचे साठे सुरक्षित व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी महत्वाचे काम केले आहे. होळी लहान पोळी दान उपक्रम, फटाके विरोधी अभियान, सर्प वाचवा अभियान, वन्यजीव सप्ताह साजरा करणे, पर्यावरणविषयक व्याख्यानांचे आयोजन, औषधी वनस्पतीची ओळख, लागवड व संवर्धन, जैवविविधता ओळख व संवर्धन, वनसंपदा ओळख व संवर्धन इत्यादी अनेक उपक्रम हाती घेऊन गडहिंग्लज मधील लोकांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविले आहेत.

प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक माहिती स्त्रोतावर आधारीत असून त्यामध्ये हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ या संघटनेच्या पर्यावरण संरक्षण व संवर्धन क्षेत्रातील जाणीव जागृती व कृती कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. माहितीचे संकलन प्रश्नावली तंत्राच्या साह्याने तसेच संघटनेतील पदाधिकारी यांच्या मुलाखती घेऊन करण्यात आले आहे.

**हिरण्यकेशी पर्यावरण मंडळाची पार्श्वभूमी:**हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ हि अनोदणीकृत बिगर शासकीय संस्था सन १९८७ पासून गडहिंग्लज मधील लोकांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबऊन पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे काम करीत आहे. सदरची संघटना हि बिगर शासकीय अनोंदणीकृत संस्था (Non-Registered NGO) या प्रवर्गात मोडते. सदरची संघटना हि तालुका पातळीवर काम करणारी संघटना आहे. संघटना केवळ पर्यावरण या क्षेत्रामध्ये करते. संघटनेचे स्वत:चे स्वतंत्र कार्यालय नाही. संस्थेचे कार्यकारी मंडळ असून त्यामध्ये एकूण ०८ सभासद आहेत. कार्यकारी मंडळातील सदस्य हे उच्च शिक्षित असून शिक्षक, प्राध्यापक, व डॉक्टर आहेत. कार्यकारी मंडळाव्यतिरीक्त एकूण ०९ सभासद आहेत. त्यापैकी ०५ पुरुष सभासद असून ०४ स्त्री सभासद आहेत. संघटनेची लिखित घटना नाही. संघटनेमध्ये पगारी कर्मचारी नाहीत. कोणताही आर्थिक मोबदला न घेता संघटनेतील सदस्य स्वत: वर्गणी काढून पर्यावरण जनजागृती तसेच संघटनेचे सर्व उपक्रम राबवितात. संस्थेस इतर व्यक्ती व संस्थेकडून निधी उपलब्ध होत नाही. वर्षातून साधारणपणे पाच ते सहा सभा होतात. या सभांचे आयोजन कार्यकर्त्याच्या घरी केले जाते. यामध्ये पर्यावरण रक्षनासंदर्भात प्रत्यक्ष कृती कार्यक्रमाचे नियोजन केले जाते. सदरची संघटना ही गडहिंग्लज तालुक्यामधील इतर संघटनाशी जोडली गेली आहे. त्यामध्ये मराठी विज्ञान परिषद, अंधश्रद्धा निर्मुलन समिती, गार्डन्स ग्रुप ऑफ गडहिंग्लज, सह्याद्री ॲडव्हेनचर या पर्यावरणीय विषयावर काम करणाऱ्या संघटना बरोबर जोडली गेली आहे.

पर्यावरणीय विषयावर काम करताना संस्थेने अनेक मार्गांचा अबलंब केला आहे त्यामध्ये जाहीर सभांचे आयोजन करणे, लोकांना संघटीत करून संबंधीत पर्यावरण जाणीव जागृती करणे, पर्यावरण प्रश्नासंबंधी वर्तमानपत्रातून लेख लिहणे इत्यादी अनेक मार्गांचा अवलंब संस्थेद्वारे केला जातो. पर्यावरण प्रश्नावर काम करण्यासाठी संस्थेतील सभासद हे डॉ. राजेंद सिंह, मेधा पाटकर, सुंदरलाल बहुगुणा, माधव गाडगीळ यांच्यासारख्या देश पातळीवर पर्यावरण विषयावर काम करणाऱ्या तज्ञाना आपले प्रेरणास्त्रोत मानतात. संस्थेने प्रामुख्याने नैसर्गिक पाण्याचे साठे सुरक्षित व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी महत्वाचे काम केले आहे. होळी लहान पोळी दान उपक्रम, फटके विरोधी अभियान, सर्प वाचवा अभियान, वन्यजीव सप्ताह साजरा करणे, पर्यावरणविषयक व्याख्यानांचे आयोजन, औषधी वनस्पतीची ओळख, लागवड व संवर्धन, जैवविविधता ओळख व संवर्धन, वनसंपदा ओळख व संवर्धन इत्यादी अनेक उपक्रम हाती घेऊन गडहिंग्लज मधील लोकांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविले आहेत. प्रस्तुत अभ्यासासाठी पुढील अभ्यासपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**अभ्यासपद्धती:** प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक माहिती स्त्रोतावर आधारीत असून त्यामध्ये हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ या संघटनेच्या पर्यावरण संरक्षण व संवर्धन क्षेत्रातील जाणीव जागृती व कृती कार्याचा आढावा घेणे हे अभ्यासाचे प्रमुख उद्दिस्ट आहे. सदरच्या संस्थेची निवड ही हेतुपूर्वक नमुना निवड पद्धतीने केली आहे. माहितीचे संकलन प्रश्नावली तंत्राच्या साह्याने तसेच संघटनेतील पदाधिकारी यांच्या मुलाखती घेऊन करण्यात आले आहे.

**हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ संघटनेची उद्दिष्ट्ये:** १( पर्यावरणाच्या विविध समस्यावर लोकांमध्ये जाणीव जागृती करणे. २( वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रम राबविणे. ३( निसर्ग सहली व अभ्यास शिबिरे यांचे आयोजन करणे. ४( पर्यावरण जागृतीसाठी व्याख्यानांचे आयोजन करणे व पर्यावरण विषयक माहिती पत्रके काढून ते लोकापर्यंत वितरीत करणे.

**हिरण्यकेशी पर्यावरण मंडळाच्या पर्यावरण क्षेत्रातील जाणीव जागृती व कृती कार्याचा आढावा:**

**१( नैसर्गिक पाण्याचे साठे सुरक्षित व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी राबविलेले उपक्रम:** गडहिंग्लज मधील हिरण्यकेशी नदीचे पाणी सुरक्षित व प्रदूषण मुक्त ठेवण्यासाठी प्रथम सन १९९६ साली प्लास्टर ऑफ प्यारीस च्या गणेश मूर्ती व निर्माल्य संकलनास संस्थेद्वारे सुरवात केली गेली. पूर्वी गणपतीच्या मूर्ती लहान व शाडू माती पासून तयार केल्या जात होत्या. पण सद्या नैसर्गिकपणे मिळणारी शाडू माती कमी झाली आहे. त्यामुळे प्लास्टर ऑफ प्यारीस वापरून खूप मोठ्या आकाराच्या घरगुती तसेच सार्वजनिक गणपती तयार केले जात आहेत. मूर्ती तयार करण्यासाठी निसर्गिक रंग ऐवजी कृत्रिम रासायनिक रंग वापरले जाऊ लागले आहेत. निर्माल्य मोठ्या प्रमाणात नदी मध्ये सोडले जात आहे. त्यामुळे हिरण्यकेशी नदी प्रदुषण वाढत आहे. त्यासाठी संघटनेद्वारे काहिली मध्ये गणेश मूर्तीचे विसर्जन, घरीच बादली मध्ये गणेश मूर्ती विसर्जन, कृत्रिम तलावाची निर्मिती करून त्यामध्ये गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी लोकामध्ये जाणीव जागृती वाढविण्यासाठी प्रबोधन केले जात आहे. तसेच निर्माल्य संकलन करून त्यापासून गांडूळ खताची निर्मिती केली जाते. संघटनेद्वारे सुरु केलेल्या या उपक्रमामध्ये भागातील लोक मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. संस्था या साठी मराठी विज्ञान परिषद, शिवराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना मध्ये सहभाग असणारे विद्यार्थी तसेच विविध तरुण मंडळातील युवकांचे सहकार्य घेऊन उत्सव काळामध्ये माहिती पत्रके वाटणे, स्थानिक केबल वाहिनीवर प्रदूषण टाळण्यासाठीचे आवाहन तसेच विविध शाळा महावीद्यालयामध्ये व्याख्यानांचे आयोजन करून संस्था जाणीव जागृती कार्यक्रम राबविते.

**२( होळी लहान–पोळी दान उपक्रम:** परंपरेने चालत आलेलेल्या होळी सणाला शास्त्रीय दृष्टीकोन देऊन नव्याने पण वेगळया पद्धतीने पर्यावरण दृष्टीकोन ठेऊन होळी लहान – पोळी दान हा उपक्रम संस्थेद्वारे उपक्रम राबविला जात आहे. होळीच्या दिवशी शाळा, वसतीगृह परिसरात स्वचतामोहीम राबविणे व कचरा एकत्र करून कंपोष्ठ खड्यात टाकणे, थोडासा कचरा वापरून मानवी राक्षस बनविणे व या राक्षसास भ्रष्टाचार, व्यसनाधीनता, दारू, गुटखा, गुंडागर्दी, व्यभिचार, एड्स, लाचखोरी इत्यादी लेबल लाऊन त्याची प्रतीकात्मक होळी करणे. गावागावात पेटविल्या जाणाऱ्या होळ्या कमी करण्यासाठी संस्थेद्वारे शेणी दान हा महत्वपूर्ण उपक्रम राबविला जातो. गोळा झालेल्या शेणी स्मशानभूमीला दान केल्या जातात. होळीला फ़क़्त नैवैध दाखऊन पुरणपोळया एकत्र करून त्या झोपडपटी, उसतोड कामगार व इतर गरीब लोकांना वाटल्या जातात. यातून होळीतून वाया जाणाऱ्या इंधनाची बचत, अन्नाची बचत करून तापमानवाढ कमी करणे, पर्यावरण रक्षण इत्यादी उद्देश संस्थेद्वारे साध्य केले जातात. सदरच्या उपक्रमामध्ये शाळेतील मुलांना सामाऊन घेण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे वतीने परिपत्रक काढून मुलांना प्रोत्साहित केले जाते.

**३( फटाके विरोधी अभियान:** दररोजच्या नागरी जीवनात विविध प्रकारच्या प्रदुषणाच्या समस्या भेडसावत आहेत.त्यामध्ये आवाजाचे व हवेचे प्रदूषण गंभीर रूप धारण करीत आहे. त्यासाठी हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ लोक्जाग्रुतीचे काम करीत आहे. यासाठी मुख्यता गणेश उत्सवापासूनच व्याख्याने व माहिती पत्रके वाटणे असे उपक्रम राबविले जातात कारण गणेश उत्सव, दसरा, दीपावली या सणांना मोठ्या प्रमाणात फटाके फोडून आवाज व हवेचे प्रदूषण केले जाते. या प्रदूषणाचे परिणाम मुलांना व्याख्यानातून पटवून दिले जातात व पर्यावरण पूरक सण साजरे करण्याची शपथ दिली जाते. फटाक्याच्या वाचलेल्या पैशातून पुस्तक खरेदी करून गरीब वर्गमित्राना आर्थिक मदत करणे, वृक्षारोपण करणे इत्यादी उपक्रम राबविले जातात.

**४( सर्प मानवाचा मित्र उपक्रम:** सर्प मानवाचा मित्र उपक्रमाअंतर्गत परिसरात सापडणारे विविध प्रकारचे जिवंत साप यांचे प्रदर्शन व सचित्र व्याख्यानाचे आयोजन आजरा, चंदगड व गडहिंग्लज तालुक्यातील शाळा, महाविद्यालये यामध्ये संस्थेद्वारे केले जाते. नागपंचमी

निमित्त सरकारी दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामपंचायती, शाळा, महावीद्यालये, इत्यादी मध्ये सर्पदंशावरील उपचार व ओळख याविषयी माहिती देणारे फलक लावण्यात येतात. वन विभागाचे वनरक्षक, अग्निशामन दल, पोलीस विभाग, या शासकीय विभागातील कर्मचार्याना आपत्तीच्या काळामध्ये नागरी वस्तीमध्ये सर्प आल्यास त्यास पकडणे, ओळखणे याची शास्त्रीय माहिती देण्यात येते. संस्थेद्वारे आतापर्यंत २००० पेक्षा ज्यास्त सर्प बाबतच्या छोट्या माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले आहे.

**५( ०१ ते ०७ ऑक्टोबर वन्यजीव सप्ताह साजरा करणे:** दरवर्षी ०१ ते ०७ ऑक्टोबर वन्यजीव सप्ताह प्राथमिक, माध्यमिक व जुनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यासाठी संस्थेद्वारे साजरा केला जातो. यामध्ये मुलांच्यासाठी विविध वयोगटात विविध विषय देऊन चित्रकला, रांगोळी, रंगभरण स्पर्धा तालुक्यातील विविध ठिकाणी घेतले जातात. यामध्ये साधारणता १२०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभाग घेतात. यशस्वी विद्यार्थी यांना प्रमाणपत्र, पुस्तके देऊन सत्कार केला जातो. याच कालावधीत विद्यार्थी व शिक्षक, नागरिक यांच्यासाठी 'पक्षी निरीक्षण व जंगल वाचन' असा कार्यक्रम संस्थेद्वारे घेतला जातो. परिसरातील विविध पक्षी ओळखणे, त्यांची नोंद करणे, त्यांची घरटी, त्यांचे अन्न यांचा अभ्यास केला जातो. तसेच पर्यावरणातील पक्षांचे व वृक्षांचे महत्व विद्यार्थी यांना पटवून दिले जाते. गडहिंग्लज जवळील शेंद्री तलावावर येणाऱ्या परदेशी पक्षांचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी दरवर्षी संस्थेद्वारे घेतल्या जातात. सदरच्या उपक्रमात गडहिंग्लज तालुका काळ अध्यापक संघ, मराठी विज्ञान परिषद, विविध शाळा, विविध संघटना यांचा सहभाग घेतला जातो.

**६( पर्यावरण विषयक व्याख्यानांचे आयोजन:** पर्यावरण जाणीव जागृती व प्रबोधन अंतर्गत विविध मान्यवर व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.

**७( पर्यावरण जाणीव जागृती अभियान:** दरवर्षी पर्यावरण व वनमंत्रालय, राजीव गांधी तंत्रशिक्षण प्रचार व प्रसार परिषद यांचेमार्फत जाहीर केल्या जाणाऱ्या एकाद्या विषयावर पर्यावरण जाणीव जागृती अभियान राबविला जातो. आतापर्यंत पुढील विषयावर संस्थेने अभियान राबविले आहेत. १( औषधी वनस्पती ओळख, लागवड व संवर्धन. २( पाणी जल जीवन अमृत. ३( जागतिक तापमान वाढ कारणे व उपाय. ४( कचरा समस्या व उपाय. ५( थेंबागणिक अधिक पीक संतुलित पाणी वापर. ६( जैवविविधता ओळख व संवर्धन. ७( वनसंपदा ओळख, लागवड संवर्धन व संरक्षण.

वरील विषयास अनुसरून पोस्टर प्रदर्शन व्याख्याने,चर्चासत्रे,निबंध स्पर्धा इत्यादी उपक्रम संस्थेद्वारे राबविले जातात. सदरचे उपक्रम राबविण्यासाठी बाएफ, शिवराज महाविद्यालय, मराठी विज्ञान परिषद, गडहिंग्लज नगरपरिषद, दुधसाखर महाविद्यालय, बिद्री, डॉ. घाली कॉलेज, आजरा महाविद्यालय आजरा, यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, चंदगड कॉलेज, याच्याद्वारे व्याख्यानाचे आयोजन करण्यामध्ये संस्थेस सहकार्य लाभते.

**८( औषधी वनस्पती प्रदर्शन:** आपल्या संपन्न जैव विविधतेचे दर्शन व्हावे म्हणून परिसरात सापडणारी विविध वनस्पती (ताजे व वाळलेले) प्रदर्शन विविध ठिकाणी भरवून त्यांचे महत्व लोकांना पटवून देण्यात येते. तसेच विविध रोगावरील औषधी वनस्पतीचे महत्व लोकांना सांगण्यात येते. औषधी वनस्पतीची लागवड, संवर्धन कसे करावे याची माहिती दिली जाते.

**समारोप:** हिरण्यकेशी पर्यावरण मंडळ हि अनोदणीकृत बिगर शासकीय संस्था गडहिंग्लज मधील लोकांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबऊन पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे काम करीत आहे. संस्थेने प्रामुख्याने नैसर्गिक पाण्याचे साठे सुरक्षित व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी महत्वाचे काम केले आहे. होळी लहान पोळी दान उपक्रम, फटाके विरोधी अभियान, सर्प वाचवा अभियान, वन्यजीव सप्ताह साजरा करणे, पर्यावरणविषयक व्याख्यानांचे आयोजन, औषधी वनस्पतीची ओळख, लागवड व संवर्धन, जैवविविधता ओळख व संवर्धन, वनसंपदा ओळख व संवर्धन इत्यादी अनेक उपक्रम हाती घेऊन गडहिंग्लज मधील लोकांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृती व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविले आहेत.

)प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक माहिती स्त्रोतावर आधारीत असून माहितीचे संकलन प्रश्नावली तंत्राच्या साह्याने तसेच संघटनेतील पदाधिकारी यांच्या मुलाखती घेऊन करण्यात आले असल्याने संदर्भ सूचीचा समावेश करण्यात आलेला नाही(

# लिंगभाव आणि कायदे

**प्रज्ञा अभिजीत बेलेकर**, न्यू कॉलेज, कोल्हापूर. pradnyabelekar1292@gmail.com

**प्रस्तावना:** कायदा आणि लिंगभाव यांचा विचार करायचा झाल्यास त्यामागचा इतिहास सुद्धा बघितला पाहिजे. नैसर्गिक रित्या किती प्रकारची लिंग आणि लिंगभाव मानवांमध्ये असू शकतात याबादधल आपली समज कशी बदलत गेली, नागरी समाजात राहण्यासंबधीचे नियम स्वीकारल्यानंतर त्यातील प्रत्येक प्रकारच्या मानवांच्या सामाजिक परिस्थितीत तसेच हक्क आणि अधिकारात काय बदल घडत गेले याचा ऊहापोह होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने,सध्या अस्तित्वात असणारे कायदे आणि त्यांचा इतिहास हा विषय हाताळावासा वाटतो. संविधानाने जरी समानतेचा अधिकार आपणास देऊ केला असला तरी, समाजातील दुर्बल समजल्या जाणाऱ्या घटकांसाठी, त्यांच्या सामाजिक उत्थानासाठी, वेगळे कायदे करता येतील असा अपवादही देऊ केला. कोणतेही भेद नसावेत, पक्षपातीपणा नसावा, हे खरे; पण काही विशेष हक्क असावेत ज्यायोगे समानतेचे मूल्य सर्व घटकांसाठी समानप्रकारे लागू करता येईल. असमान पातळीवर असणाऱ्या लोकांना समान पातळीवर आणून मग समानतेवर विचार करावा लागेल. लिंगभाव असमानतेमुळे भारतीय राज्यघटनेत प्रत्येक व्यक्तीला सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक न्याय मिळेल अशी तरतूद करण्यात आली. तसेच घटनात्मक तरतुदी शिवाय महिलांच्या विकासासाठी सरकारकडून अनेक कायदेही मंजूर झाले आहेत. प्रस्तुत शोध निबंधात लिंगभाव असमानता, लिंगभाव म्हणजे काय? तसेच स्त्रीविषयक कायदे यांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधनाचा हेतु :** १( लिंगभाव म्हणजे काय?त्याचा अभ्यास करणे. २( लिंगभाव कायदे यांचा अभ्यास करणे.

**संशोधन सामग्री :** प्रस्तुत संशोधन पेपर लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असून यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित साहित्य, संदर्भग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, संकेतस्थळे इत्यादी स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती :** सदरचा शोध निबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक पद्धतींचा वापर केला आहे.

**लिंगभाव म्हणजे काय? :** स्त्रिया आणि पुरुष यांच्या शरीर रचनेमध्ये फरक आहे. पण समाजामध्ये स्त्रिया आणि पुरुषांबाबत जे भेदभाव केले जातात, त्या सर्वांचे कारण आपल्याला त्यांच्या शारीरिक फरकांमध्ये सापडेलच असे नाही. लिंग हे शारीरिक आहे तर लिंगभाव समाजात घडवला जातो. स्त्रिया आणि पुरूषांना वेगवेगळ्या प्रकारे वाढवले जाते.यात स्त्रियांनी व पुरुषांनी कसे वागावे हे शिकवले जाते. यात स्त्रियांनी व पुरुषांनी कसे वागावे हे शिकवले जाते; यात स्त्रियांनी व पुरुषांनी कसे वागावे हे शिकवले जाते,याच स्त्री आणि पुरुष या कल्पना आहेत. ह्या कल्पना माणसांच्या वागणुकीवर खोलवर प्रभाव टाकतात. स्त्री आणि पुरुष यांना साचेबद्ध करून एकमेकांविरुद्ध उभे करतात. उदा. १) स्त्रीने सहनशील, नम्र असावे, आज्ञाधारक असावे, सर्वांशी जुळवून घ्यावे अशी अपेक्षा असते तर पुरुषांना आक्रमक बनवायला मुभा असते. ह्या कल्पना स्त्री-पुरुषांवर अवास्तव ओझे लादतात. २) पुरूषांना रडायची मोकळीक नसते. एखादा पुरुष रडायला लागला तर, काय मुलीसारखा मुळूमुळू रडतोस म्हणून हिणवले जाते. ३) एखादी स्त्री जोरजोरात बोलली, हसली तर तिच्याकडे पुरुषी म्हणून बघितले जाते.

घरकाम, चूल-मूल ही बाईची जबाबदारी तर घराबाहेरच्या जबाबदऱ्या पुरुषांच्या मानल्या जातात. मुलींना लहानपणी खेळायला बाहुली, भातुकली तर मुलांना सायकल, कार, बंदूक अशी खेळणी दिली जातात. प्रौढ वयात येणाऱ्या जबाबदारीचे प्रशिक्षण लहान वयातच सुरु होते. स्त्री-पुरुषांमधला शारीरिक फरक हा प्रामुख्याने त्यांच्या पुनरुत्पादनासंदर्भातील भिन्न जबाबदऱ्या हा आहे. पुरुषाकडे रेतन तर स्त्रीकडे गर्भारपण, बाळंतपण आणि स्तनपान अश्या प्राकृतीक जबाबदऱ्या आहेत. मात्र यापलीकडे कोणतेही कामे स्त्री-पुरुष कोणीही करू शकतात. उदा. स्वयंपाक, घरसफाई, शिवण-तिफण, शेतातील काम डॉक्टर, नर्स, इनजिनीयर, शिक्षक, इ. मात्र घरकाम आणि बालसंगोपन या आजही स्त्रीच्याच प्राथमिक जबाबदऱ्या मानल्या जातात. इतक्या की बाहेरच्या जगातही स्त्रियांना बहुतेकवेळा घरकामाची विस्तारीत कमे मिळतात. उदा. शिक्षिका, नर्स, स्वागतिका अश्या प्रकारच्या कामात स्त्रीयांचा अधिक भरणा असतो. अगदी शेती कामातही स्त्रियांना पुरुषाच्या तुलनेत कमी मजुरी देण्याची मानसिकता आढळते. अर्थात काळानुसार आणि समाज परिवर्तनांच्या प्रयत्नांमुळे लिंगभावाच्या कल्पना आता बदलत चालल्याचे/खुल्या होऊ लागल्याचेही दिसते. या लिंगभावाचा उल्लेख **'जेंडर'** असाही केला जातो.

अश्यातऱ्हेने लिंगभाव हा सामाजिक-सांस्कृतिक संरचनेतून घडविला जातो. उदा. जात, धर्म, वय, इ. वेगवेगळ्या संस्कृती नुसार, लिंगभाव बदलत राहतो. पुरुष प्रधान समाजात लिंगभावाची जडणघडण पुरूषांना झुकते माप देणारे असते. आणि तुलनेने स्त्रियांना पक्षपातला अधिक तोंड द्यावे लागते. पुरुष कुटुंब प्रमुख, पुरुषाकडे मालमत्तेची मालकी, लग्न झाल्यावर स्त्रियांनी सासरी जाणे, पितृवंशीय व्यवस्था या सामाजिक प्रक्रिया

आपली समाज व्यवस्था पुरुष प्रधान असल्याचे दर्शवितात. अश्याप्रकारे समाजामध्ये स्त्रीयांचे स्थान दुय्यम दर्जाचे बनते. याचा एक गंभीर परिणाम म्हणजे स्त्रियांवर होणारे अत्याचार. बहुतेकदा स्त्रियांना आपल्या दुय्यम स्थानामुळे अत्याचारांना तोंड द्यावे लागते.

एखादी व्यक्ति स्त्री आहे किंवा पुरुष आहे म्हणून तिच्याकडून ज्या अपेक्षा केल्या जातात त्याचा संदर्भ लिंगभावाशी असतो. स्त्रिया व पुरुष यांच्यात समाजाने निर्माण केलेला संबंध म्हणजे '**लिंगभाव**'. एकाच घरातील किवा संस्कृतीतील स्त्री-पुरुष यांच्यात समाजाने निर्माण केलेला फरक म्हणजे लिंगभाव. हा फरक समाज व संस्कृतींनी घडवलेला असतो व तो काळानुसार बदलत असतो.

**स्त्री कल्याणाचा ऐतिहासिक आढावा:** ऐतिहासिक दृष्टीकोणातून स्त्रियांच्या स्थानाचा आणि कल्याणाचा आढावा घेतल्यास त्यामध्ये चढ उतार झाल्याचे आढळते. या काळात शिक्षणाच्या बाबतीत स्त्री-पुरुष यांना समान अधिकार होते. मुलींना जीवनसाथी निवडण्याचा अधिकार होता. याचबरोबर वैदिक काळात सुरवातीस महाभारताची रचना करण्यात आली. अश्या संक्रमक काळातही स्त्रियांच्या बाबतीत सुधारणावादी मते आढळतात. अनुशासन पर्वात पितामह भीष्माने 'स्त्रियांना सदैव पवित्र आणि पूज्य समजून त्यांच्याशी स्नेहाचा व्यवहार केला जावा' असे म्हणल्याचे आढळून आले आहे. यावरून याकाळात स्त्रियांची स्थिति अतिशय उत्तम असल्याचे दिसते. हळूहळू जैन आणि बौद्ध धर्माचा प्रभाव वाढला आणि स्त्रियांना अतिशय आदराने पाहू जाऊ लागले. परंतु नंतर या धर्मांना उतरती कळा लागली आणि स्त्रियांची स्थितीतही उतरती कळा लागली. मनुस्मृतीत सर्वप्रथम स्त्री स्वातंत्र्यावर प्रतिबंध लादण्यात आले.स्त्री कधीच स्वतंत्र नसते हे वचन मनुनेच निर्माण केले.तिच्यावर अनेक निर्बंध लादण्यात आले आणि तिला गुलामगिरीत ढकलण्यात आले. पुढे मोघल काळात सुद्धा हे निर्बंध अधिकाधिक वाढले पाचव्या - सहाव्या वर्षी मुलींची लग्न आई वडील करू लागले. विधवा झाल्यावर तिला सती जाण्यास भाग पडण्यात आले. बहुपत्नीत्त्वाची प्रथा निर्माण करण्यात आली. स्वातंत्र्यपूर्वीच्या कालखंडात राजाराम मोहन रॉय, न्या. रानडे, ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज यांनी केलेल्या विविध चळवळीमुळे ब्रिटीशांना स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक सामाजिक कायदे संमत करावे लागले.

**लिंगभाव कायदे :** वरील परिच्छेदामध्ये स्त्रियांचा ऐतिहासिक आढावा बघितला, ब्रिटीशांनी जरी काही कायदे संमत केले तरीही, गेल्या अनेक वर्षात स्त्रियांवर होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसते. शारीरिक शोषण, घरघुती हिंसाचार, लैंगिक छळ, आणि महिलांवरील स्त्री भ्रूण हत्या, खुनासारख्या घटना समाज रोज उघड्या डोळ्यांनी बघत आहे. महिला हिंसाचार आणि अत्याचार यावर अंकुश बसावा या उद्देशाने महिलांच्या विशेष सुरक्षिततेसाठी अनेक प्रकारचे कायदे तयार करून ते देशाला लागू करण्यात आले आहेत. भारतामधील महिलांसाठी असलेल्या अधिकारांची माहिती, त्यांच्या अधिकारांची जाणिव आणि कायदेविषयक संरक्षणाची माहिती असणे गरजेचे आहे.

१( घटनेतील अनुच्छेद १४ हे महिलांना समानताप्रतिष्ठा आणि सामाजिक सन्मानाची हमी देतो. याशिवाय महिला आणि पुरुषांमधील भेदभावाला लगाम लावतो.

२( घटनेच्या १५ (३) अन्वये, राज्यांना (भारतीय संघ) महिला आणि मुलांसाठी विशेष तरतूद करण्याचा अधिकार आहे. महिलांची उन्नतीसाठी विशेष प्रावधान करणे हा यामागचा उद्देश आहे. त्याचप्रमाणे घटनेचा अनुच्छेद १६(२) सर्व स्त्री आणि पुरुष या दोघांनाही समान संधी प्रदान करतो.

३) घटनेच्या कलम ३९ (ए) नुसार, राज्यातील पुरुष आणि स्त्रियांसाठी पुरेसा उपजीविका उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. तसेच घटनेच्या कलम ३९ (डी) अनुसार पुरुष आणि महिलांना कामाची संधी आणि समान वेतन देणे बंधनकारक आहे.

४) याप्रमाणे कलम ३९ (ई) अनुसार महिला कामगारांच्या आरोग्याचा आणि शक्तीचा गैरवापर होत नाही हे निश्चित करणे राज्यांना आवश्यक आहे. आणि आर्थिक मजबूरीमुळे महिलांच्या शक्तिपलीकडे त्यांना कोणताही व्यवसाय करायला भाग पडायला नको.

५) घटनेचे अनुच्छेद ४२ मध्ये असे म्हटले आहे की, राज्य योग्य आणि मानवी कामांच्या प्रसूतीपासून बचाव करण्याची तरतूद करेल.

६) १९६१ मध्ये महिलांच्या हितासाठी प्रसूती लाभ कायदा मंजूर झाला आहे.

घटनेच्या अनुच्छेद ५१-अ (ई) महिलांच्या सन्मानासाठी नागरिकांनी अपमानास्पद वागणूक देण्याचा त्याग करावा व हे कर्तव्य समजावे अशी शिकवण देतो. यावर अधिक स्पष्टीकरण द्यायचे झाले तर भारतीय घटनेतच महिलांच्या संरक्षणासाठी प्रभावी तरतुदी आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४, १५, १६, ३९ आणि ५१-अ च्या मूळ उद्दिष्टाला लक्षात घेता राज्यांनी अनेक कायदे तयार केले आहेत.

१) स्वातंत्र्यापूर्वी वुमान राईट्स ऑफ प्रॉपर्टी कायदा १९३७ लागू करण्यात आला होता. त्यामध्ये महिलांच्या देखरेखीचे अधिकार निश्चित करण्यात आले आहेत.

२) नंतर असे म्हंटले गेले आहे की, वुमन राईट्स ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९३७ ला द हिंदू सक्सेशन ॲक्ट १९५६ द्वारा अधिग्रहीत केले आहेत. जेथे कलम १४ अन्वये हिंदू मुलींसाठी हिंदू वारसा कायदा १९५६ अंतर्गत नुकतीच

केलेल्या दुरूस्तीनुसार भागीदार /संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेत उपस्थितांचा दर्जा देण्यात आला आहे.

३) सती (प्रतिबंध) आयोग कायदा (१९८७) सती प्रथा आयोग अधिक प्रभावी प्रतिबंध प्रदान करतो. किंवा कोणत्याही सोहळ्याच्या निरीक्षणद्वारे विधवा जिवंत जाळण्यासाठी किंवा दफन करणे कारवाईवर स्थगिती मिळवून देते.

४) हुंडा देणे व घेणे टाळण्यासाठी हुंडाबंदी कायदा १९६१ लागू करण्यात आला. या कायद्यानुसार हुंडा मागणी करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

५) त्याचप्रमाणे, गर्भधारणा अधिनियम १९७१ च्या अंतर्गत वैद्यकीय समाप्तीद्वारे, गर्भधारणेची बेकायदेशीर समाप्ती आणि स्त्री भ्रूण हत्या आणि दंड अशाप्रकारच्या संरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

६) प्रसूती लाभ अधिनियम १९६१ प्रसूतीच्या वेळी महिलांच्या रोजगारचे संरक्षण करते आणि प्रसूती व इतर काही फायद्यांसाठी महिलांना प्रेरणा देते. प्रसूती लाभ कायदा (दुरूस्ती) अधिनियम २००७ म्हणजे मातृत्त्व लाभ कायदा १९६१ मध्ये दुरूस्ती होय. कायद्यात आधीपासूनच सुधारित कायद्यातील कंत्राटी किंवा सल्लागार महिलांना लागू आहे. अंमलबजावणीच्या वेळी प्रसूतीच्या रजेवर आहेत.

७) अलिकडेच २००५ साली कौटुंबिक हिंसाचारात महिलांचे संरक्षण कायदा २००५ तयार करण्यात आला. महिलांचे हित लक्षात घेता त्यांना घरघुती हिंसा किंवा कोणत्याही हिंसाचारापासून संरक्षण देण्यासाठी हा एक व्यापक कायदा आहे. घरघुती सबंधांमध्ये महिलांवर अत्याचार होणे ही एक सामान्य घटना आहे. म्हणूनच, या कायद्यात आर्थिक हिंसा, भावनिक हिंसा, शारीरिक हिंसा इत्यादि सर्व प्रकारच्या हिंसाचाराचा समावेश आहे. या कायद्यांतर्गत महिलांना संरक्षणाची प्रभावीपणे काळजी घेण्याचे हमी देते. या कायद्यात संरक्षक अधिकाऱ्याची नियुक्तीचीही तरतूद करण्यात आली आहे. या कायद्या अंतर्गत जरी न्यायालयाने दिलेला संरक्षणाच्या काही कामांना हा गुन्हा ठरत नसला तरी ज्याद्वारे प्रभावी उपाय प्रदान केले जातात आणि नमूद केलेल्या संरक्षण ऑर्डर चे पालन न केल्यास हे चुकीच्या कृत्याबद्दल शिक्षा मानते.

८) पूर्व गर्भधारणा आणि प्री-नेटल डायग्नोस्टिक तंत्रे (लिंग निवडीवर निर्बंध) कायदा (१९९४) लिंग निवडीवर प्रतिबंध लावते. तसेच स्त्री भ्रूण हत्येसाठी कारणीभूत असलेल्या लिंग निश्चितीसाठी जन्मपूर्व निदान तंत्र प्रतिबंधित करते आणि प्रतिबंधित करत हे गैरवर्तन मानते.

९) समान काम समान वेतन कायदा १९७५ पुरुष व महिला कामगार दोघांनाही समान मोबदल्याची भरपाई प्रदान करते. महिला भरती आणि सेवेच्या पदांवर तसेच लैंगिक आधारावर भेदभाव प्रतिबंधित करते.

१०) किमान वेतन कायदा १९४८ पुरुष किंवा किमान वेतांनामध्ये भेदभावास परवानगी देत नाही.

११) मुस्लिम महिला (घटस्फोटावरील हक्कांचे संरक्षण) कायदा २०१३ सार्वजनिक आणि खाजगी अश्या क्षेत्रातील कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळापासून संरक्षण प्रदान करते.

१२) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंधित व संरक्षण) कायदा २०१३ सार्वजनिक आणि खाजगी अश्या दोन्हीं क्षेत्रातील कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळापासून संरक्षण प्रदान करते.

१३) खाणींचा कायदा १९५२ आणि कारखाने कायदा १९४८ सायंकाळी ६ ते ७ वाजतापर्यंत कामावर ठेवण्याला प्रतिबंधित करते आणि त्यांना सुरक्षा प्रदान करते.

**सारांश :** पुरुषसत्ताक समाजामध्ये विकसित झालेल्या लिंगभाव संकल्पना विषयीची माहिती आपण घेतली. खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता आणण्याचे दृष्टीने अनेक वर्षानुवर्षे प्रयत्न सुरू आहेत. इतिहासातील स्त्रियांच्या स्थानाचा विचारवंत, समाजसुधारक यांच्याद्वारे सुरू झालेल्या व सुरू असणाऱ्या या भूमिकांना, कार्याना शासनाने विविध राज्यघटनेतील कायद्यांद्वारे, योजनेंद्वारे, उपक्रमांद्वारे पाठबळ दिले आहे, देत आहेत. या विषयात सगळ्यात महत्त्वाचे सरकारी पातळीवर महिलांविषयक आयोग, समित्या, नेमल्या गेल्या आहेत. व त्या संदर्भित त्या कार्य करीत आहेत. समाजातील पुरुषप्रधान, पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये व्यक्ति म्हणून, माणूस म्हणून स्थान न मिळालेल्या व गुलामगिरीच्या बंधनात अडकलेल्या या स्त्रीचे स्थान स्वातंत्र्य, समता, अधिकार या मूल्यांशी जोडण्याचे या तत्त्वाप्रमाणे जीवन जगण्याचे, उपभोगण्याचे अधिकार स्त्रीला मिळवून देण्यासाठी स्त्रीवादी विचारसरणी विविध कायद्यांद्वारे सदरच्या शोध निबंधाच्या सहाय्याने आपल्याला आढळून येते.

**संदर्भग्रंथ सूची**

१. *लक्ष्मण कोत्तापल्ले, (२०१४), भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.*
२. *https://palakneeti.wordpress.com// पालक नीतीपरिवार*
३. *https://mr.m.wikipedia.org//lingbhav*
४. *https://roundtableindia.co.in*
५. *अमीर शेख, (२०१८(, महिला व बालविकास कायदे, निराली प्रकाशन, पुणे.*

# समाज माध्यमांच्या विळख्यातील समाज: समाजशास्त्रीय अभ्यास

***डॉ. भगवान सुरेश मनाळ***, *समाजशास्त्र विभाग, श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर जिल्हा औरंगाबाद*

***सारांश:*** *एकविसावे शतक हे विज्ञान, माहिती–तंत्रज्ञानाचे आणि माध्यमक्रांतीचे म्हणून ओळखले जाते. आजच्या ह्या तंत्रज्ञानाच्या युगात जग हे सोशल मिडिया (समाजमाध्यम) भोवती फिरत आहे. संगणक, स्मार्टफोन आणि इंटरनेटने सर्व घटकांना संपूर्णरित्या व्यापून टाकले आहे. आजच्या घडीला इंटरनेट हा जीवनाचा एक प्रमुख भाग झाला आहे. जिथे इंटरनेटचा वापर होत नाही असे क्षेत्र म्हणजे अपवादच म्हणावे लागेल. माहितीची देवाण घेवाण, शिक्षण, करिअर, नोकरी, व्यवसाय, संवाद, संपर्क, मार्केटिंग इ. सारख्या अनेक घटकांना इंटरनेट चा स्पर्श झाला आहे. त्यामुळे इंटरनेटचे जग अधिक व्यापक होत चालले आहे. इंटरनेटवर आधारित जी माध्यमे आहेत त्यासाठी 'सोशल मिडिया' किंवा 'समाजमाध्यम' हा शब्द वापरला जातो. सोशल मीडिया हा दोन अक्षरी शब्द असला तरी त्याची व्याप्ती खूप मोठी आहे. फेसबुक, ट्विटर, व्हाट्सॲप, युट्यूब, पिंटरेस्ट, स्काईप, इंस्टाग्राम इ. अशा अनेक माध्यमांचा समावेश समाजमाध्यमांमध्ये होतो. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे संपूर्ण समाज या माध्यमांनी प्रभावित आणि संकुचित बनत चालला आहे, असे दिसून येते. प्रभावित या अर्थाने म्हणजे समाज हा प्रसारमाध्यमांच्या मुळे एकमेकांजवळ येत चालला आहे आणि आणि दुसरे संकुचित या शब्दाचा दृष्टीकोण म्हणजे समाज आत्मकेंद्री होत चालला आहे का? या दोन्हीही बाबी यामुळे घडताना दिसून येतात. माध्यमे ही प्रारंभी समाजाच्या कुतूहलाचा आणि औत्सुक्याचा विषय होता. प्रसार माध्यमे ही समाजाची गरज, क्रांती, प्रगती, विकास म्हणून त्या परिवर्तनाचा गौरव समाजाने केला; परंतु तीच माध्यमे सद्यकालीन परिस्थितीमध्ये कुटुंबाची, समाजाची आणि पर्यायाने राष्ट्राची डोकेदुखी ठरत आहेत. माध्यमांची स्वैर हाताळणी आणि त्याचा विघातक, आत्मकेंद्री वापर जवळच्या काळात खूप मोठी जागतिक समस्या बनेल यात शंका नाही. त्यांवर काही बंधने घालता येतील का? की ती स्वनियंत्रण घालू शकतील? याबाबत प्रसार माध्यमांचे निर्माते, नियोजनकर्ते आणि समाज नियंत्रण व्यवस्थेने विचार आणि कार्य करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. आणि म्हणूनच समाज व्यवस्थेवर समाजमाध्यमांचा कसा प्रभाव पडला आहे हे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केला गेला आहे.*

***बीजसंज्ञा** : समाजमाध्यम (सोशल मीडिया), इंटरनेट, आंनियंत्रित समाजमाध्यमे*

**संशोधनाचे उद्देश:** १( समाजमाध्यमांमुळे समाज व्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे. २( समाजमाध्यमांच्या वापराने समाज व्यवस्थेच्या बदलत्या मूल्यांचा अभ्यास करणे.

**गृहितके :** १( समाजमाध्यमांमुळे समाज व्यवस्थेवर सकारात्मक तथा नकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येते. २( समाजमाध्यमांच्या वापरामूळे समाज व्यवस्थेच्या सांस्कृतिक, नैतिक, सामाजिक मूल्यांची घसरण होत आहे.

**अध्ययन क्षेत्र :** प्रस्तूत अध्ययनासाठी गंगापूर तालुक्यातील वाहेगाव या ग्रामीण भागातील समाज हा अध्ययन क्षेत्र म्हणून घेतले आहे.

**तत्थ संकलन :** प्रस्तूत शोधनिबंधासाठी प्राथमिक साधनांव्दारे तथ्य संकलन करण्याकरिता निरीक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**अध्ययन पध्दती :** प्रस्तूत शोधनिबंधाकरिता सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**प्रस्तावना:** माध्यमे गरज म्हणून वापरली तर त्यांचा विधायक वापर होऊ शकतो; परंतु माध्यमांच्या आहारी जाणारा समाज स्वकेंद्री बनत आहे. स्वरंजनाचे ते निरर्थक, वेळखाऊ व्यसन अत्यंत घातक आणि मानवी संवेदना व मानवाचा विवेक बधीर करणारे ठरत आहे. माध्यमांच्या अतिरिक्त व बेजाबदार वापरावर निर्बंध आणले नाही तर नजीकच्या काळात संपूर्ण तरुण पिढी आणि समाज यांच्या सर्वांगीण विकासासाठी बाधा निर्माण होण्याचे संकेत अटळ आहे . तरुण पिढी ही मानसिक पातळीवर आपले संतुलन राखण्याकरिता सक्षम राहू शकणार नाहीत आणि सद्य परिस्थितीत त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. अनेक मानसोपचार तज्ज्ञांनीही ती भीती वर्तवली आहे. भावनिक उन्माद, निराशा, डिप्रेशन, अस्वस्थता, चिडचिडेपणा, स्वमग्नता, मेंदुविकार, डोळ्यांचे विकार, मानेचे विकार या समस्यांबरोबरच माध्यमांच्या अविवेकी वापराने अनेकांना त्यांचे प्राण गमावावे लागले आहेत. माध्यमे ही माणसाच्या हातातील फक्त खेळणे नव्हे तर ती त्याचा बाह्य अवयव बनून गेली आहेत. माणसे मोबाईल, स्मार्टफोन कोठे विसरली तर अस्वस्थ होतात. त्या

माध्यमांनी जीवनशैली; तसेच, त्यांचे आंतरिक व बहिर्गत असे विश्व प्रभावित झालेले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात वर्तमानपत्रे, आकाशवाणी व दूरदर्शन या माध्यमांतून माहितीची देवाणघेवाण, प्रबोधन, माहिती संप्रेषण व्हायचे. पेजर सन १९९० नंतर आले. त्यानंतर मोबाईल, विविध वाहिन्या आणि इंटरननेट यांचा बोलबाला वाढला. तेव्हा ती माध्यमे वापरणे सर्वाना परवडणारे नव्हते. काहींची ती गरज होती आणि ती प्रथमतः 'स्टेटस सिम्बॉल' म्हणूनही वापरली गेली. माध्यमे सर्वांच्या हातात सन २००० नंतर आली; सर्वांना परवडणारी झाली. माध्यमांनी मोठी जागतिक बाजारपेठ तयार केली आणि समाजाचे मनोविश्वही व्यापून सोडले. त्यामुळे त्यांनी समाजाचे चलनवलन बदलून टाकले. माध्यमांमुळे माणसा माणसांतील विसवांद, गैरसमज, सामाजिक दुही, खोट्या माहितीचे व चुकीच्या साहित्याचे प्रसारण होत असल्याचे दिसून येत आहे. माध्यमे अनियंत्रित आणि निरंकुश बनत आहेत. सत्यता, दर्जा, ज्ञान यांपासून विलग बनलेली माध्यमे मानवी जीवनाला कोणता आकार देणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

जगातील जवळजवळ सर्व देशांच्या राज्यघटनांनी त्या त्या देशांतील लोकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलेले आहे. तो प्रत्येक व्यक्तीचा आधुनिक काळात मुलभूत अधिकार आहे. माध्यमांमुळे प्रत्येकाला त्याच्या मनातील भावना, विचार मांडण्याचे मोठे, जागतिक व्यासपीठ मिळाले आहे; ती गोष्ट गौरवास्पद आहे. परंतु त्याची दुसरी अविवेकी बाजू मात्र घातक आणि काळीकुट्ट आहे.

माध्यमांमुळे छुपे शीतयुद्ध मुक्त भांडवलशाही समाजव्यवस्थेत जाणवते. माध्यमे कोणाच्या तरी हातची बाहुले बनून गेली आहेत. ती प्रायोजित आहेत. त्यामुळे साहजिक त्यांच्यावर मालकांचा प्रभाव असतो. टीव्ही वाहिन्या, न्यूज चॅनेल्स आणि त्यांचा मनमानी विवेकवाद, वाढती स्पर्धा रोज अनुभवत असतात. नैसर्गिक संकटे, दुःख, समस्या, भक्तिभाव, एवढेच काय, युद्धजन्य भीषण प्रसंगांचेही माध्यमांत 'इव्हेंट' होऊ लागले आहेत. भारत हा संपूर्ण विश्वात आपली ठोस प्रतिमा उभा करण्याच्या लढाईत मार्गक्रमण करत असतांना भारतासारख्या विकसनशील राष्ट्रासमोर आज अनेल ज्वलंत समस्यांचे डोंगर पुन्हा पुन्हा निर्माण होत आहेत, आपल्या प्रचंड नैसर्गिक आणि मानवनिर्मित संसाधनांच्या बळावर भारत आपली प्रतिमा उच्च करतांना येणाऱ्या समस्या यादेखील नैसर्गिक आणि मानवनिर्मित आहेत. यात भारतातील वाढत जाणारी लोकसंख्या, त्यातून निर्माण होणाऱ्या विविध समस्या, अन्न, वस्त्र, निवारा, निवासाची टंचाई, वाढती महागाई, भ्रष्टाचार यासारखे असंख्य प्रश्न सध्या भारतीय समाजासमोर आहेत. प्रसार माध्यमांची भूमिका ही या समस्यांचे मूळ नेमके काय आहे आणि त्यास जबाबदार घटकांचे विश्लेषण करणे आहे, त्यावर समाजाचे आणि शासनाचे लक्ष केन्द्रित करण्याकरिता माध्यमांनी आपली भूमिका आणि जबाबदारी पार पाडणे क्रमप्राप्त आहे.

**अनियंत्रित आणि निरंकुश माध्यमे :** आपल्या राज्यघटनेत १९ (१) (अ) नुसार प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे. स्वातंत्र्यासह काही मर्यादाही राज्यघटनेत नमूद केल्या आहेत. पण, त्याची नेमकी अंमलबजावणी समाज माध्यमांवर होताना दिसत नाही. तसेच ती प्रक्रिया प्रचंड अवघड आहे. या माध्यमांना 'माध्यमे' म्हणायचे तर सत्य, अचूकतेसारख्या तत्त्वांचा काही प्रमाणात अभाव आहे. माहितीचा वापर एक शक्ती म्हणून होताना दिसत आहे. त्यामुळे एकांगी, सनसनाटीपणा, बटबटीतपणा असलेला आशय समाज माध्यमांवर पसरवला जात आहे. समाज माध्यमांचे इतक्या मोठ्या प्रमाणावर जे जाळे पसरले आहे, त्याचा दुरूपयोग समाज विघातक प्रवृत्तींकडून होत आहे. पण, ज्या प्रमाणात जनजागृती होत आहे त्याचा फायदा होताना दिसत आहे. तसेच या समाज माध्यमांचा वापर नियंत्रित आणि सकारात्मक पद्धतीने होईल, अशी आशा ठेवायला हरकत नाही. समाज माध्यमांचा विघातक वापर जगात आणि भारतात वाढतांना दिसून येत आहे.

भारतीय माध्यमांनी चुकीच्या दिशेने झेप घेतली आहे. दर्शक, रेटींग आणि महसूल या त्रिसुत्रीभोवती वाहिन्यांचे गणित फिरते. वृत्तवाहिन्यांवर चालणाऱ्या चर्चावरून त्याची प्रचिती येते. प्रसारमाध्यमांकडून केल्या जाणाऱ्या सर्कशीला आपणच एकप्रकारे कायदेशीर मान्यता दिली आहे. त्यामुळेच हे जर असेच सुरू राहिले तर एक काळ असा येईल जेव्हा मौखिक दहशतवाद, दृश्य अतिरेकीपणासाठी नवा गुन्हा बनेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. परंतु आधीच्या तीन स्तंभांच्या अपयशामुळेच प्रसारमाध्यमे ही आपल्याला न्याय देऊ शकतात, असा विश्वास लोकांमध्ये आहे असे मत वकील सी. ए. सुंदरम यांनी व्यक्त केले. मात्र, माध्यमांकडून आंधळयासारखे लोकांचे नेतृत्व केले जाऊ नये, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

प्रसारमाध्यमे चांगले काम करतात असे या ज्येष्ठ वकीलांना वाटत आहे. मात्र प्रसार माध्यमे कधीच देशातील बेरोजगारी, भूकबळी, उपासमारी, रसातळाला गेलेली अर्थव्यवस्था, मुस्लीमांचे मॉब लिंचिंग या

विषयावर बोलत नाही. या मुख्य विषयांवरून लक्ष विचलित करण्यासाठी इतर असंख्य विषय पुढे आणण्यात येतात. त्यामुळे बहुतेक प्रसार माध्यमे ही राजकारणांच्या हातातील बाहुले आहेत. त्यांच्यावर कॉर्पोरेट हाऊसचा पगडा आहे. एवढेच नव्हे तर धार्मिक ध्रुवीकरण करून देशात अशांतता माजवण्याचे कामही प्रसारमाध्यमे करत असतात. म्हणूनच २०२० च्या अहवालात जागतिक प्रसार माध्यमांमध्ये भारतीय प्रसार माध्यमांचे रँकींग १४२ आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेला संघर्ष आणि त्याची माध्यमांत उमटलेली प्रतिक्रिया पाहिली, की या पुढील जग व त्यांतील राष्ट्रसंघर्ष कोणत्या वळणावर असणार आहे याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. राष्ट्रहिताच्या अनेक गोपनीय गोष्टी या माध्यमांनी तर्कांच्या आधारे उघड केल्या आहेत. माध्यमांनी भारतीय वायू सेनेकडून अ‍ॅटॅक होण्याआधीच ती बाब उघड केली होती. तसे वार्तांकन आणि शक्यता वर्तवल्या जात होत्या. माध्यमांनीच ते युद्ध हाती घेतले की काय? अशी परिस्थिती त्या अभिनिवेशी 'पोझ'मध्ये होती. माध्यमांचा लोकमानसावर प्रचंड प्रभाव आहे. त्यामुळे समाजमनही प्रभावित होते. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी त्याबाबत चिंतादेखील व्यक्त केली होती. ते म्हणाले, की 'सरकारी भूमिका जनतेपर्यंत पोचवणे हे प्रसार माध्यमांचे खरे काम असते; परंतु टीव्ही वाहिन्या स्वतःच भूमिका ठरवू लागल्या आहेत.' ते 'अजेंडा सेटिंग' खूप भयावह आहे. माध्यमे अव्वल स्थान टिकवण्यासाठी, शोधपत्रकारितेच्या नावाखाली धुमाकूळ घालत आहेत. त्याचे प्रखर दर्शन आणि बदलणारी पत्रकारिता सन १९८० च्या दशकात नाटककार तेंडुलकर यांनी 'कमला' नाटकात चित्रित केली होती. पण ते मुद्रणमाध्यम होते.

तरुण व किशोरवयीन मुले आणि त्यांचे पालकही काही अंशी माध्यमांनी ग्रासलेले आहेत. त्या प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे. ते सर्व त्यांच्या हाती असलेले माध्यम कोणताही विचार न करता, अत्यंत बेजाबदारपणे वापरत आहेत. माध्यम कोणत्या वेळी, कोणत्या प्रसंगी व कसे वापरावे याचे कोणतेही भान आणि तारतम्य कोणालाही राहिलेले नाही. कोरोना आणि लॉकडाउनच्या काळात समाज माध्यमे हा एकच विरंगुळयाचा पर्याय उरल्याने सर्व वयोगटातील मंडळी त्याकडे वळली. सर्वसाधारणपणे आपण वेगवेगळ्या समाज माध्यमांवर दिवसाला दोन तास असतो. कायम आपण जोडलेले असतो. वुई आर सोशल च्या २०२० च्या अहवालानुसार सुमारे अर्धे विश्व (३८० कोटी लोकसंख्या) सध्या इंटरनेट वापरत आहे आणि नेहेमीप्रमाणे भारत ही त्याची मोठी बाजारपेठ आहे. समाज माध्यमांचे महत्वाचे वैशिष्ट्य असे की ती आपले लक्ष खिळवून ठेवतात म्हणूनच प्रत्यक्ष भेटी किंवा बोलण्यापेक्षा आपण आता या माध्यमांद्वारे इतरांशी जोडलेले असतो.

समाजमाध्यमांचे उपभोक्त्यांवरील म्हणजे वापरकर्त्यांवर चांगलेवाईट परिणाम ही गोष्ट अलीकडची नसून गेले दशकभर जागतिक आरोग्य संघटनेने याची नोंद घ्यावी आणि मनःस्वास्थ्य व समाजमाध्यमे यांच्यावर संख्याशास्त्रीय अभ्यास व्हावा, विशेषतः मानसिक अनारोग्य आणि विकृती याबाबत संशोधन व्हावे अशी मागणी होत आहे. सध्या हा विषय अधिक ऐरणीवर आला आहे इतकेच! एक विचारप्रवाह असा आहे – स्मार्ट फोनचा अतिवापर, सतत समाजमाध्यमे चाळून पाहणे / त्यावर व्यक्त होणे, ही चटक आता व्यसनात परावर्तित व्हायला लागली आहे. भ्रमणध्वनीचा वापर बोलण्यापेक्षा समाज माध्यमे चाळणे याकडेच जास्त होत आहे.

लहान मुलांचा आणि तरुण पिढीचा स्क्रीन टाइम किती असावा आणि प्रत्यक्षात तो किती असतो, यावर विचारमंथन होण्याची वेळ आली आहे तसेच वयस्कर/सेवानिवृत्त मंडळी सतत समाज माध्यमांवर का असतात याचीही कारणे शोधायला हवीत. वैफल्य आणि आतल्या आत कुढणे जगभरातील लाखो लोकांची समस्या होऊन बसली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने २०१७ साली याबाबत काही प्राथमिक आकडेवारी जाहीर केली होती. अर्थात अजूनही हे सगळं वरपांगी आहे आणि ठाम अनुभवजन्य मांडणी झालेली नाहीए. तरीही सभोवतालच्या घटना, बातम्या बरेचदा हादरवून सोडतात. पौगंडावस्थेतील आणि शाळेतील मुले मुली इंटरनेट वरील कोणत्या संकेतस्थळांना भेटी देतात, त्यावरील अश्लील विडिओ पाहणे आणि यासोबतच कोणाशी चॅट करतात.

माध्यमांमुळे समांतर आभासी जग (आभासी प्रतिसृष्टी) निर्माण झाली आहे आणि आजची पिढी वास्तवापेक्षाही त्या आभासी जगात रममाण झालेली दिसते. माणसाने वास्तवापासून तुटणे, परात्म होणे हे चित्र भयावह आहे. मुले मैदानावरील खेळांऐवजी आभासी खेळात अडकली आहेत. मोबाईलवरील स्क्रीन हे त्यांचे प्लेग्राउंड बनले आहे. अफवांचे पीक माध्यमांतून पसरवले जात आहे. माध्यम हे काहींचे वेळ घालवण्याचे साधन बनले आहे तर अनेकांसाठी माध्यमे वेळखाऊ बनली आहेत. काही वृद्ध माणसेही त्याच्या आहारी जाताना दिसतात. कुटुंबकलह, पतिपत्नींमधील विसंवाद, अविश्वास व त्यातून निर्माण होणारे घटस्फोट ही समस्या... तिलाही समाजमाध्यमे कारणीभूत होत आहेत. इंटरनेट, युट्यूब यांतील माहितीची सत्यासत्यता

पडताळली जात नाही. इंटरनेटवरील सर्व सत्य असते याची खात्री देता नाही. महाजालावरील माहितीच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. धार्मिक, जातीय, प्रांतीय तेढ माध्यमांच्या बेजबाबदार वापरामुळे वाढत आहे. त्यामुळेच माध्यमांच्या काळजीपूर्वक, विवेकी विधायक कामासाठी वापर होणे गरजेचे आहे.

**सोशल शोषक फेसबुक :** इंटरनेटच्या महाजालावरचं सोशल मीडिया म्हणून फेसबुक ही जगातील सर्वांत मोठी कंपनी, याच कंपनीने गेल्या काही वर्षांत व्हॉट्सअपही विकत घेतले आहे आणि ते संवादाचे माध्यमही जगात पहिल्या क्रमांकावर आहे. मात्र, नंबर वनचे मुकुट मिरवताना त्याचे टोक कधी ना कधी बोचणार हे नक्कीच. तसेच फेसबुकचे झाले आहे. फायद्याचे चक्र वेगात फिरत गेले. या गणिताच्या जात्यात तरुणाई भरडली जातेय, याकडे फेसबुकने साफ दुर्लक्ष केले. तरुणाईला तासन्तास खिळवून ठेवण्यासाठी जे जे करता येईल ते ते फेसबुकने केले. चांगल्या गोष्टी शेअर करण्यासाठी सुरू झालेला हा खेळ मग वाईट मार्गानेही सुरू झाला. वाद, तंटे, आरोप, टीका आणि गलिच्छ शब्दांमध्ये होणारे भांडण, तेढ निर्माण करणारे व्हिडिओ आणि बरेच काही फेसबुकच्या या महासागरात गटारासारखे पसरू लागले. त्यातूनच अधिक धंदा असल्याचेही फेसबुकच्या लक्षात आले. कारण जिथे वाद किंवा वादग्रस्त मजकूर, फोटो किंवा व्हिडिओ असेल तिथे यूजर्सची संख्या अधिक... तिथे व्यक्त होणारे लोक अधिक आणि त्यामुळे मिळणारा महसूलही अधिक... फेसबुक एवढ्यावरच थांबले नाही. प्रत्येक यूजरची मानसिकता ओळखून त्यांचे विचार बदलण्यापर्यंतही मजल मारली. सोशल मीडियातून होणारा प्रचार व्यक्तिपरत्वे बदलता येतो, त्यातून निवडणुकांची चक्रे कशी फिरवता येतात हे फेसबुकने कोणाच्याही नकळत करून दाखवले. पण, हे लपून राहिले नाही आणि फेसबुकचे हसे झाले. फेसबुकवरचा विश्वास कमी होत गेला. अनेक देशांमध्ये फेसबुकने आपल्या यूजर्सच्या डेटाचा असा वापर करू दिल्याचा आरोपही झाला आहे. आताही फेसबुकवरील विश्वासाला तडे बसतील अशा गोष्टी नव्याने समोर येऊ लागल्या आहेत. आपल्या फायद्यासाठी कंपनीने लोकांच्या डेटाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केले, असा आरोप फेसबुकच्या एका माजी उच्चपदस्थ कर्मचारी फ्रान्सिस हेगन यांनी नुकताच केला आहे आणि त्यामुळे फेसबुकच्या विश्वासार्हतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दीडशे कोटी यूजर्सची वैयक्तिक माहिती फेसबुकवरून चोरली गेली आणि ती हॅकर्सच्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाल्याची माहितीही काही दिवसांपूर्वी आली. या यूजर्सचे फ़ोन नंबर, त्यांचे नाव, ठिकाण आणि इतर बरेच काही विक्रीसाठी उपलब्ध झाले. याचा फायदा हॅकर्स सहजरीत्या करून सामान्य यूजर्सकडून लाखो रुपये उकळू शकतात, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. कारण अशी अनेक उदाहरणे आपल्याही आसपास रोज घडत आहेत. फेसबुकचेच अपत्य असलेल्या इन्स्टाग्रामचेही असेच आहे. इन्स्टाग्राममुळे तरुणाई नैराश्यात जात असल्याचे कंपनीच्या लक्षात आले, पण त्याकडेही साफ दुर्लक्ष केले गेल्याचा आरोपही माजी कर्मचाऱ्यांनी केला आहे. शिवाय सेलिब्रिटी यूजर्सना फेसबुक व्हीआयपी सेवा देत असल्याचाही ठपका कंपनीवर आहे. हे सगळे कशासाठी, तर आपलं अपत्य कमावत राहावं, यासाठी. पण त्याचा समाजमनावर काय परिणाम होतोय, मानसिकरीत्या तरुणाई किती अस्थिर होत आहे याचा विचार होणेही तेवढेच गरजेचे आहे. चाइल्ड पोर्नोग्राफी, अश्लील गोष्टी रोखण्यासाठी फेसबुकने पावले उचलली आहेत. मनावर विपरीत परिणाम करणारे खून, मारामारी, रक्त दिसत असलेल्या पोस्ट टाकल्या जाणार नाहीत यासाठी धोरणेही ठरवली आहेत, पण तरीही फेसबुकवरचा अशा पोस्टचा मारा कमी झालेला नाही. आता आपण समुद्रातील घाण आमच्याकडे येऊ देणार नाही, अशी भूमिका फेसबुकने घेतली आहे. म्हणजे गलिच्छ मजकूर, आरोप, कोणाचा छळ होईल अशा पोस्ट आपण फेसबुकवर ठेवणार नाहीत, त्या काढून टाकणार असल्याचे फेसबुकने जाहीर केले असले तरी त्यावर किती व कसा विश्वास ठेवायचा? या नंबर वन सोशल मीडियाला सोशल म्हणायचे की सोशल शोषक म्हणायचे, याचाही विचार नव्याने करण्याची वेळ आली आहे

**समाज माध्यमांचा प्रभाव आणि त्याच्या उणिवा :**

इंटरनेटवर आधारित जी माध्यमे आहेत, त्यांसाठी 'सोशल मीडिया' किंवा 'समाज माध्यमे' हा शब्द वापरला जातो. फेसबुक, ट्विटर, युट्युब अशा अनेक माध्यमांचा सोशल मीडियात समावेश होतो. या माध्यमांत खरचं किती सामाजिकता आहे, की हे आभासी जग आहे, हा एक गहन प्रश्न आहे. समाज माध्यमांची ताकद सध्या अशाच लोकांना समजली आहे ज्यांना प्रत्येक वेळी सत्ता हस्तगत करायची असते किंवा सत्तेच्या जवळ सतत राहायचे असते. यासाठी समाज जसजसा विकसित होत गेला, तसं तशी साधने विकसित होत गेली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. माणूस जेव्हा शेती करत होता, तेव्हा कृषिप्रधान समाजाची निर्मिती झाली. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर समाज उद्योगप्रधान झाला. आता २१व्या शतकातील आजचा समाज माहितीप्रधान समाज म्हणता येईल. कारण, माहितीला प्राप्त झालेले अनन्यसाधारण महत्त्व. ही माहिती आपल्याजवळ असणे किंवा या माहितीचे जलद गतीने हस्तांतरण करणे या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या आहेत. यातली बरीचशी

माहिती ही सकारात्मक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचते. कारण, मुख्य प्रवाहातील मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर कुणाचे तरी वर्चस्व अथवा मालकी आहे. त्यामुळे या माहितीवर हे वर्चस्व सतत डोकावत असते. समाज माध्यमांचे मूलभूत वैशिष्ट्य असे की, सामान्य माणसांकडे याची मालकी आहे. इंटरनेटच्या माध्यमातून एक वेगळे आभासी जग प्रत्येक जण तयार करत असतो. अतिशय वेगाने बातम्यांचे आदान-प्रदान या समाज माध्यमांतून होत असते. समाजात जे वेगवेगळे घटक आहेत - व्यक्ती, संस्था, संघटना, राज्य-देश यांना सशक्त करण्याचे प्रयत्न या समाज माध्यमांतून होत आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय या सगळ्याच दृष्टिकोनातून राष्ट्राला किंवा व्यक्तीला समृद्ध करण्याचे कार्य समाज माध्यमे करत आहे. या सगळ्यात जाती, धर्म, लिंग, भाषा यांचा अडसर होत नाही आहे, ही समाज माध्यमांची मोठी ताकद आहे. पाश्चात्य राष्ट्रांत फेसबुक, ट्विटर, युट्युब या सगळ्या माध्यमांचा वापर राजकीय व्यक्ती आणि संस्थांकडून राजकारणात आणि निवडणुकीत पूर्वीपासून केला जातो. भारतात त्याचा वापर तितका होत नव्हता. शशी थरूर हे काँग्रेस खासदार फार आधीपासून ट्विटरवर सक्रिय होते. त्यांच्या फॉलोअर्सचे प्रमाणसुद्धा लक्षणीय होते. पण, या माध्यमाचे महत्त्व त्यांच्याच पक्षाला माहीत नव्हते. २०१४च्या लोकसभा निवडणुकीवेळी भारतीय जनता पक्ष आणि पर्यायाने नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांचा, तसेच त्या वेळच्या काँग्रेसविरोधी वातावरणाचा प्रचारासाठी पूर्ण उपयोग करून घेतला. तसेच युवा वर्गात निवडणुकीबद्दल जागरुकता निर्माण होण्यात समाज माध्यमांचा मोठा वाटा आहे. त्या आधी २०११ साली अण्णा हजारेंच्या आंदोलनाला समाज माध्यमातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला होता, तर २०१३ साली निर्भया प्रकरणात लोकांनी रस्त्यावर उतरून या घटनेचा निषेध केला. या गोष्टीसाठी समाज माध्यमे बऱ्याच अंशी कारणीभूत ठरली. सध्या मोठे सेलिब्रिटीदेखील समाज माध्यमांवर सक्रिय राहून, त्यावर पोस्ट टाकणे, लोकांशी संपर्कात राहून, त्यांना प्रतिसाद देणे याचे प्रमाण वाढले आहे. मात्र अती तिथे माती जेव्हा आपण म्हणतो, तशी परिस्थिती सध्या आपल्या समाज माध्यमांबद्दल दिसत असून, या माध्यमांच्या उणिवा समोर येत आहेत. या समाज माध्यमांवर खूप सारी माहिती येत असते. माहितीच्या स्पर्धेत खोट्या माहितीचे प्रमाणही जास्त आहे. विशिष्ट विधान विशिष्ट नेत्याच्या नावाने फोटोसह पाठवले जाते. बऱ्याच वेळेला एकच विधान अनेक नेत्यांच्या नावे खपवले जाते. त्यामुळे माहितीच्या सत्यतेवर आणि विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. या माध्यमांवर सातत्याने आशयनिर्मिती होत असते. बऱ्याच वेळेला या आशयाचा निर्माता कोण आहे, हे सांगणे अवघड होऊन जाते. या माध्यमांत खाजगीपणाचा अभाव असतो किंवा खाजगीपणा भंग पावतो. नुकत्याच झालेल्या केंब्रिज ऍनेलेटिका प्रकरणामुळे ही गोष्ट समोर आलेली आहे. वेगवेगळे सॉफ्टवेअर वापरून माहितीत छेडछाड करून भ्रम आणि खोटी माहिती पसरवली जाते. दोन समाजात तेढसुद्धा निर्माण व्हायला समाज माध्यमांतील आशय कारणीभूत ठरतात.

**निष्कर्ष :** १. माध्यमे गरज म्हणून वापरली तर त्यांचा विधायक वापर होऊ शकतो; परंतु माध्यमांच्या आहारी जाणारा समाज स्वकेंद्री बनत आहे. स्वरंजनाचे ते निरर्थक, वेळखाऊ व्यसन अत्यंत घातक आणि मानवी संवेदना व मानवाचा विवेक बधीर करणारे ठरत आहे. २. समाजाध्यमांमूळे वेळ व श्रमाची बचत झालेली दिसून येते. घरबसल्या अनेक कामे करता येतात. आजचे तरूण सोशलमिडीयावर दिवसातील कित्येक तास खर्च करतात. ३. समाजाध्यमांमूळे कुटूंबातील व्यक्तींशी आपापसातील आणि विचारांचे आदान प्रदान, संवाद फार कमी झालेले दिसून येतो. ४. बहुतेक प्रसार माध्यमे ही राजकारणांच्या, सत्ताधाऱ्यांच्या आणि उद्योगपतींच्या हातातील बाहुले बनत चालल्या आहेत. त्यांच्यावर विविध राजकीय पक्ष जे आपली मते आणि विचार जनतेवर लादू इच्छितात, सत्ताधारी, भांडवलदार या सारख्या प्रबळ ताकदीचा पगडा आहे. एवढेच नव्हे तर यातील काही घटक हे समाज व्यवस्थेत धार्मिक ध्रुवीकरण करून देशात अशांतता माजवण्याचे काम करण्याकरिता काही प्रसारमाध्यमांचा वापर करत असतात. म्हणूनच २०२० च्या अहवालात जागतिक प्रसार माध्यमांमध्ये भारतीय प्रसार माध्यमांचे रँकींग १४२ आहे. ५. सोशलमिडीयाच्या अती वापरामूळे तरूणांच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाल्याचे दिसून येते. तासंतास समाजमाध्यमासोबत आजची युवा पिढी आपला मौल्यवान वेळ खर्च करताना आढळतात. यात शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी यांचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे.

**उपाययोजना :** १. समाज माध्यमांचा वापर हा काळजीपूर्वक, विवेकी विधायक कामासाठी वापर होणे गरजेचे आहे. त्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर तरुण पिढीने स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणण्या करिता करावा. २. ज्ञानाच्या महासागरातील नेमके व अचूक ज्ञान

शोधून त्याचा वापर आपल्या जीवनात यशस्वी बनण्याकरिता करावा. ३. सोशल मिडीयाचा वापर मर्यादित करावा. ४( सोशल मिडीयावर मूले काय बघतात, त्याचा कसा वापर करतात यावर पालकांनी लक्ष ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. ५. एकमेकांशी प्रत्यक्षपणे संवाद आणि सपंर्क करावा. ६. तरूणांनी सोशल मिडीयाचे जग हे वरवर आकर्षित करणारे एक आभासी जग आहे हे जाणून घ्यावे व त्यातून बाहेर पडून खऱ्या जगात वावरण्याचे धाडस ठेवावे. ७. तरूणांना सोशलमिडीयाच्या वापराबाबत समुपदेशन करणे अत्यंत गरजेचे आहे. ८. सोशलमिडीयाच्या वापरावरती सरकारचे सुध्दा नियंत्रण असणे आवश्यक आहे.

**समारोप :** तंत्रज्ञानाच्या जगात वावरत असताना त्याचा वापर करणे अत्यंत स्वाभाविक आहे. परंतू तंत्रज्ञानाचा योग्य तो वापर समाजाने करणे गरजेचे आहे. माध्यमे माणसाच्या विकासात्मक वाटचालीसाठी गरजेची आहेत. ती अनेक अडचणींवर मात करणारी आहेत. स्मार्टफोन मिनी कॉम्पुटर बनला आहे. कागदपत्रांची देवाणघेवाण, माहिती प्रसारण, प्रशासनिक व्यवहार आणि कामकाज माध्यमांमुळे सुलभ बनले. माध्यमे गरजेपुरती वापरणे आवश्यकच आहे. परंतु माध्यमे केवळ मनोरंजन आणि निरर्थक वृत्तीने वापरली गेली तर माणसाचे काळ, वेळ आणि मन यांचे गणित बिघडणार आहे. म्हणून माध्यमे अत्यंत विवेकी वृत्तीने वापरणे गरजेचे आहे; नाहीतर पुढील उमलती पिढी... तिचे भावविश्व, मनोविश्व आणि तिचे एकूण भावी जीवनच या सायबरविश्वात उध्वस्त होईल की काय अशी शंका येते. जगाच्या उंबरठ्यावर असलेल्या या समस्येला पाय फुटण्यापूर्वीच रोखले गेले पाहिजे. ते मानवी बुद्धीच्या विवेकी उपयोजनेनेच शक्य होईल. एकीकडे समाज माध्यमांची लोकप्रियता, समाजातील त्यांची वाढती अपरिहार्यता, भारत सरकारच्या डिजिटल इंडिया सारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पांची आवश्यकता अशा कात्रीत आपण सापडलो आहोत आणि आता तारतम्याने स्वतःची जबाबदारी स्वतःच घेणे क्रमप्राप्त झाले आहे. आणि विषारी नात्यांना वेळीच ठेचले तर पुन्हा पूर्वीसारखी सकारात्मकता आपल्या आसपास वावरायला लागेल. शक्यतो समाज माध्यमांचे फक्त फायदे घ्यायचे आणि त्यांना आपल्यावर अतिक्रमण करू द्यायचे नाही हा संकल्प आता सगळ्यांनी तातडीने करायला हवा. शेवटी स्वास्थ्य महत्वाचे, समाज-माध्यमे नाहीत!

***संदर्भसूची :-***


1. *सुतार प्रफुल्ल,(२०१०), सोशल मिडीया- डिजीटल दुनिया, मल्टीव्हर्सिटी प्रकाशन, मुंबई.*
2. *http://m.lokmat.com/maharastra / www.bookganga.com /माध्यमे आणि सामाजिक बदल.*
3. *युवापिढीची नवी ओळख,( १ ऑगष्ट २०१८), दैनिक सकाळ, कोल्हापूर।*
4. *विलानिलम जे. व्ही,(२०१४), दळवी अनूवाद जयमती: भारतातील प्रसार माध्यमे काल आणि आज, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे.*
5. *हरीश साळवे (१३.०९.२०२०), https://www.mulnivasinayak.com/marathi/details.php?id=17097*
6. *लिंबेकर अशोक, (०९.०४.२०१८), https://www.mahamtb.com/Encyc/2018/4/9/Article-about-social-media-and-its-reaction-on-human-minds-.html*
7. *लिंबेकर अशोक, (२०.०३.२०२०), थिंकमहाराष्ट्र मंथन, https://www.google.co.in/amp/s/www.thinkmaharashtra.com*

*देवडा गजेंद्र https://tarunbharat.org*

# ग्रामीण महिलांच्या जमीनहक्क मागणीनंतरचे सामाजिक परिणाम

***दिपक हरिभाऊ शिंदे,*** *पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.*

***सारांश:*** *आजच्या जागतिकीकरणाच्या काळात स्त्री-पुरुष भेद आणखी वाढले आहेत. स्त्रियांचे सिमंतीकरण, हंगामीकरण होत आहे असे दिसून येत आहे. समाजसुधारणा होत असल्या तरी त्या मालमत्तांच्या संदर्भात होत नाहीत. मालमत्ता वापरण्याचे अधिकार स्त्रियांना नाहीत. घर, गाड्या, पैसे, दागिने ह्या मालमत्तापेक्षा जमीन हि वेगळी मालमत्ता आहे. कारण ती उपजीविकेशी, प्रतिष्ठेशी जोडली आहे. आधुनीक काळात जमिनीचे भाव हे गगनाला भिडलेले आहेत. अशा जमीन मालमत्ता स्त्रियांच्या नावावर येण्याचे प्रमाण कमी आहे. जमिनीची मालकी ही स्त्रियांच्या मुक्ततेचे साधन एक साधन मानले जाते. ज्या स्त्रियांच्या नांवावर जमिनी आहेत. त्या नव्या कायद्याने त्यांना मिळाल्या आहेत की, त्या जमिनी भांडणातून मिळालेल्या आहेत. जमीन मालमत्तांचा अधिकार जास्तीत जास्त स्त्रियांना मिळणार आहे का? भावाबरोबर बहिणीला जमिनीचा वाटा मिळाला आहे का? डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोडबिलात वडीलांच्या संपत्तीत मुलींना समान अधिकार मिळाला पाहिजे अशी तरतूद करण्यात आली होती. परंतु हे बिल १९५६ मध्ये नाकारले गेले होते. मात्र नंतर अनेक कायद्यांनी जमिन मालकीचा अधिकार स्त्रियांना दिला गेला. तरीही प्रत्यक्षात स्त्रियांच्या मालकी हक्कांचे प्रमाण कमी आहे. हे हक्क मागणे गुन्हा समजला जातो. या बाबतीतील विकास, जागतीकीकरण, इ. बदलाचे संदर्भ लागू होतांना दिसत नाही. असे सामान्य चित्र दिसते. नाशिक जिल्हयातील ग्रामिण समाजात स्त्रियांच्या जमिनीविषयक मालकीचा आभ्यास करुन आदर्श, कायदा, अपेक्षा आणि सामाजिक वास्तविकता यातील अंतर स्पष्ट करणे, त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक आर्थिक, राजकीय घटकांचे विश्लेषण करण्याचा मुख्य हेतूने प्रस्तुत संशोधनाचा विषय मांडला आहे.*

**प्रस्तावना:** भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा मूलाधार आहे. भारतातील जवळपास ६५ ते ७० टक्के लोकसंख्या ही शेती व्यवसायात गुंतलेली आहे. गरिबांच्या बाबतीत शेती हा मुख्य उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत त्यामुळेच शेती क्षेत्र नेहमीच महत्वाचे राहिले आहे. "जमीन" पाण्याप्रमाणेच निसर्गाची असून ह्या दोन्ही मालमत्ता खर तर सार्वजनिक मालकीच्या आहेत. आदीमानवाला शेतीचा शोध कधी लागला याचा निश्चित कालखंड सांगणे शक्य नाही तथापी मात्र हे निश्चितपणे सांगता येईल की, जमीन हे उत्पादनाचे, अन्नधान्य उत्पन्न करणारे व त्यातून अतिरिक्त संपत्ती देणारे एक साधन आहे. हे जेव्हा आदी मानवाला लक्षात आले तेव्हापासून 'बळी तो कान पिळी' ह्या न्यायाने जमिनीची मालकी प्रस्तापित होऊ लागली. मानव जातीच्या उत्क्रांतीत ही प्रथमता टोळी प्रमुख व त्या नंतर राजा, ह्या क्रमाने जमिनीची मालकी प्रस्तापित झाली.[१] (कांबळे यादवराव-कर्मवीर दादासाहेब गायकवाड काळ कर्तव्य -२००२-पृष्ठ -१५३) कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत, जमीन केवळ उत्पादनाचे आणि उत्पन्नाचे अति महत्वाचे साधन नसते. तर ते सामाजिक आणि आर्थिक संक्रमण अवस्थेत दारिद्रय आणि भूक यापासून सुरक्षा मिळवून देणारे एक साधन असते. जमीन असणे म्हणजे पत, प्रतिष्ठा असणे आणि त्यामुळे वित्तपुरवठा, ग्रामीण संस्था निविष्ठा व सेवा यासाठी पात्र ठरविले जाणे व त्यांच्या सुविधाची उपलब्धता होणे होय. सामाजिक, आर्थिक व राजकीय सत्ता मिळविण्यासाठी जमीन हे एक माध्यम आहे. जमीन तुम्हाला ओळख मिळवून देते आणि त्याच ठिकाणी तुमचे अनुबंध पक्के रुझले आहेत असे दर्शविते.[२] (अग्रवाल २००२, भारताच्या महिला शेतकरी – मैत्रयी कृष्णराजन, अरुणा कांची, अनुवादित – विजया साळुंके -२०१३ पृष्ठ ८८)

भारतीय स्त्री ची 'स्त्री- मुक्तीच्या' दिशेने वाटचाल २१ व्या शतकात गतिमान होत आहे. हे सर्वसामान्य विधान तृणमूल पातळीवर तपासले पाहिजे. त्यातही शहरी स्त्री आणि ग्रामीण स्त्री यांच्यात मोठे अंतर दिसते. ग्रामीण स्त्रीचे दुय्यमत्व प्रामुख्याने सत्ता व मालमत्ता या बाबतीत अजूनही लक्षणीय आहे. जमीनधारणा हा ग्रामीण उपजीविकेचा आणि आर्थिक सुरक्षेचा आधार मानला जातो. या जमीनीची मालकी हा स्त्रियांचे दुय्यमत्व मोजण्याचा एक आधार मानला जातो. ग्रामिण महिलांची जमीन मालकी पुरुषांच्या तुलनेने खुपच कमी आहे. पुरुषसत्ताक अशा भारतीय समाजात स्त्री ही शुद्र-अतिशुद्रांच्या बरोबरीने वंचित गटात (नाहिरे गटात) मोडणारी आहे असे महात्मा फुले यांनी स्पष्ट केले होते. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, निर्णयक्षमता, शिक्षण आदि क्षेत्रात शुद्रातीशुद्रांप्रमाणे वंचितत्व व दास्यत्व भारतीय स्रीयांच्या वाट्याला आहे. त्याची जडणघडण प्राचीन कालखंडापासून होत आली आहे. शिक्षण, संपत्तीची वंचितता / वर्जितता पुढे अनिष्ठ प्रथांशी जोडून स्त्रियांचे दुय्यमत्व वाढवीत आली. मध्ययुगीन कालखंडात याचा अतिरेक झाला ब्रिटीशकाळात सुधारणा अथवा ज्ञानोदय यामुळे अनेक समाज सुधारणा आकाराला येऊ लागल्या

दर्जा, शिक्षण, प्रथा, परंपरा यांना सुधारणांचे पाठबळ लाभले. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. राज्यघटनेनुसार कारभार सुरु झाला. १९३५ मध्ये स्रियांना मर्यादित प्रमाणात असणारा मतदानाचा हक्क घटनाकारांनी २१ वर्ष वय पूर्ण असणाऱ्या स्त्री पुरुषांना दिला नंतर तो १८ वर्ष वय करण्यात आला भारतीय राज्यघटनेनुसार सर्व भारतीय नागरिकांना जात, धर्म, लिंग, वंश यावर आधारित नसलेले, भेदभावविरहीत स्वातंत्र्य व हक्क प्रदान करण्यात आले आहे. परंतु वस्तुस्थितीकडे दृष्टीक्षेप टाकला असता संसदेमध्ये एकूण सभासदसंख्येच्या १५ टक्के पेक्षा जास्त महिला कोणत्याही काळात नव्हत्या.

१९५६ साली हिंदू कोटबिल पास होऊन स्त्रियांना विवाह, वारसा हक्क, घटस्पोट, दत्तक इ. विषयक महत्वाचे अधिकार मिळाले. १९६१ च्या maternity Benefit Act नुसार स्त्रियांना बाळंतपणात रजा व इतर फायदे मिळू लागले व याच वर्षी हुंडा प्रतिबंधक कायदा लागू झाला. त्यामुळे काही प्रमाणात स्त्रियांनासुरक्षा मिळू लागली. २६ जानेवारी १९६२ ला महाराष्ट्रात जमिनीची कमाल मर्यादा ठरविणारा कायदा लागू करण्यात आला. १९७६ साली समान वेतन कायद्याप्रमाणे स्त्रियांना समानवेतन मिळू लागले. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या सरकारने केलेल्या पाटपुराव्यामुळे सन १९९३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कारकिर्दीत ७३ व्या घटना दुरुस्तीने ग्रामिण भागातील महिलांसाठी, तर ७४ व्या घटना दुरुस्तीने शहरी भागातील महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली. सध्या या जागा ५० टक्के इतक्या झाल्या आहेत. १९८८ मध्ये स्त्री संघटनांच्या प्रयत्नामुळे 'महाराष्ट्र प्रसुतीपूर्व गर्भनिदान तंत्रनियंत्रण कायदा" अस्तित्वात आला. १९९४ मध्ये हाच कायदा देशपातळीवर लागू करण्यात आला. त्यामुळे स्त्रियांचे घटत जाणारे प्रमाण सुधारले. २००६ मध्ये घरगुती छळातून स्त्रियांची सुटका करणारा कायदा पास झाला. पुढे हाच कायदा "घरगुती छळ महिला सुरक्षा कायदा २००५" या नावाने ओळखला जाऊ लागला. मालमत्ता, जमीन मालकीच्या संदर्भात कायदेशीर सुधारणा झाल्या. त्यांचा प्रभाव मात्र स्त्री–मुक्तीच्या प्रक्रियेत मर्यादित राहिला. जागतिकीकरणानंतर सामाजिक, आर्थिक पैलूंमध्ये बदल झाला असून नोकरहीनवाढ )Jobless growth( होताना दिसून येत आहे. आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. स्त्रीयांकडे असणाऱ्या नोक-या कमी कमी होत असून त्या पुरुषांकडे जाताना दिसत आहे. स्त्रियांना हंगामी नोक-यात ढकलले जात आहे. )Feminization of casual labour(. स्त्री पुरुष विषमतेचे आयाम हे आर्थिक, राजकीय व सामाजिक-सांस्कृतिक असे आहेत.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात हे भेद आणखी वाढले आहेत. स्त्रियांचे सिमंतीकरण, हंगामीकरण होत आहे असे दिसून येत आहे. समाजसुधारणा होत असल्या तरी त्या मालमत्तांच्या संदर्भात होत नाहीत. मालमत्ता वापरण्याचे अधिकार स्त्रियांना नाहीत. घर, गाड्या, पैसे, दागिने ह्या मालमत्तापेक्षा जमीन हि वेगळी मालमत्ता आहे. कारण ती उपजीविकेशी, प्रतिष्ठेशी जोडली आहे. आधुनीक काळात जमिनीचे भाव हे गगनाला भिडलेले आहेत. अशा जमीन मालमत्ता स्त्रियांच्या नावावर येण्याचे प्रमाण कमी आहे. जमिनीची मालकी ही स्त्रियांच्या मुक्ततेचे साधन एक साधन मानले जाते. ज्या स्त्रियांच्या नांवावर जमिनी आहेत. त्या नव्या कायद्याने त्यांना मिळाल्या आहेत की, त्या जमिनी भांडणातून मिळालेल्या आहेत. जमीन मालमत्तांचा अधिकार जास्तीत जास्त स्त्रियांना मिळणार आहे का? भावाबरोबर बहिणीला जमिनीचा वाटा मिळाला आहे का? डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोटबिलात वडीलांच्या संपत्तीत मुलींना समान अधिकार मिळाला पाहिजे अशी तरतूद करण्यात आली होती. परंतु हे बिल १९५६ मध्ये नाकारले गेले होते. मात्र नंतर अनेक कायद्यांनी जमिन मालकीचा अधिकार स्त्रियांना दिला गेला. तरीही प्रत्यक्षात स्त्रियांच्या मालकी हक्कांचे प्रमाण कमी आहे. हे हक्क मागणे गुन्हा समजला जातो. या बाबतीतील विकास, जागतीकीकरण, इ. बदलाचे संदर्भ लागू होतांना दिसत नाही. असे सामान्य चित्र दिसते. नाशिक जिल्हयातील ग्रामिण समाजात स्त्रियांच्या जमिनीविषयक मालकीचा आभ्यास करुन आदर्श, कायदा, अपेक्षा आणि सामाजिक वास्तविकता यातील अंतर स्पष्ट करणे, त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक आर्थिक, राजकीय घटकांचे विश्लेषण करण्याचा मुख्य हेतूने प्रस्तुत संशोधनाचा विषय मांडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :** १) नाशिक जिल्ह्यातील ग्रामिण महिलांच्या जमीनधारणांचा आकार, स्वरुप, प्रमाण यांचा अभ्यास करणे. २) नाशिक जिल्ह्यातील स्त्री व पुरुष यांच्या जमीन धारणांची तुलना करुन त्यांच्यातील लिंगभाव आधारित विषमतेचे स्वरुप स्पष्ट करणे. ३) नाशिक जिल्हयातील ग्रामीण महिलांच्या जमीन हक्क मागणीनंतरच्या सामाजिक परिणामाचा अभ्यास करणे. ४) जमीनविषयक मालकी महिलांना प्राप्त व्हावी यासाठी कायदेशीर उपाय योजना सुचविणे.

**गृहीतकृत्य :** १) नाशिक जिल्ह्यातील महिलांच्या जमीन मालमत्ता वाढीवर कायद्याचा सकारात्मक परिणाम झाला नाही. २) पितृसत्ताक, सामाजिक

सांस्कृतिक, राजकिय धार्मिक कौटुंबिक कारणे व परंपरा इ. घटकामुळे ग्रामिण स्त्रीकडे जमीन मालकी अत्यल्प आहे. **३**) महिलांनी तोंडी व लेखी जमीनचा हक्क मागितल्याने त्यांना विविध सामाजिक परिणामांना सामोरे जावे लागते.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत अध्ययनाचा मुख्य हेतू नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या जमीनविषयक मालकीचा समाजशास्त्रीय अभ्यास असा आहे. हा अभ्यास क्षेत्रिय (empirical) स्वरुपाचा असून त्यामध्ये नाशिक जिल्यातील ग्रामीण महिलांच्या मालमत्ता विषयक समाजस्थितीचा व परिवर्तनाचा अभ्यास तृणमूल पातळीवर होणार आहे. या अभ्यासात संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही अभ्यास पद्धतींचा वापर केला आहे.

**संशोधनाची तंत्रे :** अनुसूची )Interview schedule( अनौपचारिक मुलाखती )Informal Interview ( व्यष्टी अध्ययन )Case Study(.

**नाशिक जिल्ह्यातील स्रियांची जमीन मालकीच्यासंदर्भात सध्याची स्थिती:** कृषी गणनेच्या आकडेवारीनुसार नाशिक जिल्हयातील जमीन मालकीच्या संदर्भात असे दिसून येते की, १५.०३ टक्के स्त्रीयांच्या नावावर जमिनी आहेत व त्यांच्याकडे १३.०८ टक्के जमिनीचे क्षेत्र दिसून येते.

नाशिक जिल्हयातील नावावर जमिनीची आकडेवारी पुढील प्रमाणे:

| अ.न. | नाशिक जिल्ह्यातील तालुके | स्रियांची सरासरी जमीनमालकी% |
|---|---|---|
| १. | दिंडोरी | १२.२५ |
| २. | इगतपुरी | १७.९६ |
| ३. | नाशिक | १६.४० |
| ४. | निफाड | ११.३९ |
| ५. | सिन्नर | १६.९४ |
| ६. | त्र्यंबकेश्वर | १७.०७ |
| ७. | मालेगाव | २२.६४ |
| ८. | नांदगाव | २३.६१ |
| ९. | देवळा | २२.८६ |
| १०. | बागलाण | २१.९१ |
| ११. | चांदवड | १६.२२ |
| १२. | कळवण | १९.४७ |
| १३. | पेठ | २३.३१ |
| १४. | सुरगाणा | १६.१४ |
| १५. | येवला | २०.६८ |

संदर्भ:14.agricultural Census, 2010-11Dated: 11/12/2018.

नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक कमी स्रियांची जमीन मालकी असणारा तालुका निफाड हा असून येथे ११.३९ टक्के स्त्रीयांच्या नावावर जमिनीची मालकी दिसून येते. तर मालेगाव तालुक्यात २२.६४ टक्के सर्वाधिक स्त्रियांची जमीन मालकी असणारा तालुका दिसून येतो.

**संशोधनाची व्याप्ती :** प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील सहा तालुक्यांशी (नाशिक, निफाड दिंडोरी, चांदवड, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी) निगडीत आहे. या सहा तालुक्यांची सहेतुक संशोधन पद्धतीने निवड करण्यात आली. या तालुक्यातील निवडक ३० (५ टक्के नमुना निवड) ग्रामपंचायती आणि तलाठी तसेच गावांमधील निवडक ३०० महिला ग्रामस्थांकडून प्रत्यक्ष मुलाखत अनुसूची भरून घेतली आहे.

**महिलांच्या जमीनहक्क मागणीनंतरच्या सामाजिक परिणामाचा तपशील %**

| अ क्र | तपशिल | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | लेखीस्वरुपात जमिनीची मागणी केली असता भावाने वडिलांच्या मदतीने कायदेशीर विरोध केला | ५७ | १९.०० |
| २ | कुटुंबातील सगळयांनी अबोला धरला भांडण करु लागले | १४६ | ४८.६७ |
| ३ | धार्मिक दृष्टयासमाजात पापी समजले जाऊ लागले | १८ | ६.०० |
| ४ | गावातील लोकांना चर्चेचा विषय झाला | ६४ | २१.३३ |
| ५ | सुखदुखात येणे जाणेबंद झाले | १५ | ५.०० |
| | एकूण | ३०० | १००.०० |

वरील तक्ता क्र ४.७४ मध्ये नमुना निवड केलेल्या नाशिक जिल्हयातील सहा निवडक तालुक्यातील ग्रामीण शेतकरी महिलांचे जमीन, मालमत्ताचा कायदेशीर, कौटुंबिक, धार्मिक विरोधचे वर्गीकरण केलेले आहे. या तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की नमुना निवड केलेल्या ३०० महिला पैकी लेखी स्वरुपात जमिनीची मागणी केली असता भावाने वडिलांच्या मदतीने कायदेशीर विरोध केलेल्या महिलांची संख्या ५७ (१९.०० टक्के) आहेत, कुटुंबातील सगळयांनी अबोला धरला भांडण करु लागलेल्या महिलांची संख्या १४६ (४८.६७ टक्के) आहेत, धार्मिक दृष्टया समाजात पापी समजले जाऊ लागलेल्या महिलांची संख्या १८ (०६.०० टक्के) आहेत, गावातील लोकांना चर्चेचा विषय झालेल्या महिलांची संख्या ६४ (२१.३३ टक्के) आहेत. सुखदुखात येणे जाणे बंद झालेल्या महिलांची संख्या १५ (५.०० टक्के) यावरुन असे निदर्शनास येते की कुटुंबातील सगळयांनी अबोला धरला भांडण करु लागलेल्या महिलांची संख्या सर्वाधिक १४६

(४८.६७ टक्के) आहे. आणि सुखदुखात येणे जाणे बंद झालेल्या महिलांची संख्या सर्वात कमी १५ (५.०० टक्के) आहेत या तक्त्यावरुन असे स्पष्ट होते. की कुटुंबातील सगळयांनी अबोला धरला कुटुंबीय भांडण करु लागलेल्या महिलांची संख्या सर्वाधिक आहे.

**संशोधनाचे महत्व:** १. प्रस्तुत संशोधनात ग्रामीण महिलांच्या जमीनधारणा विषयक विषमतांचे नाशिक जिल्ह्यातील स्वरुप स्पष्ट झाले आहे. २. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या जमीनधारणा विषयक विषमतांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक संदर्भ आणि त्यातील मुख्य प्रश्न, अडथळे उजेडात आले आहे. ३. जमीनधारणा विषयक अडथळयांच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना सुचविणे शक्य झाले आहे. याचा फायदा कायद्याची अंमलबजावणी, कल्याणकारी योजना, महिला सक्षमीकरणाच्या योजनाची अंमलबजावणी करणे शासनास शक्य होईल.

**निष्कर्ष :** १. विवाहासाठी होणारा खर्च : जमीन मागणी केल्यानंतर भावाची प्रतिक्रिया समजून घेतल्या असता त्या पुढीलप्रमाणे दिसून येतात. भाऊ हा प्रत्यक्ष जमिन मालमत्तेचा प्रत्यक्ष उपभोक्ता असल्याने जमीन मागण्याची प्रत्यक्ष झळ त्याला बसणार आहे. हे लक्षात आल्याने सुरुवातीला तो बहिणीची मनधरणी सुरु करतो तुझे लग्न थाटामाटात करुन दिले. लग्नासाठी जमीन विकली, हुंडा दिला वेळोवेळी मदत केली तू आता जमिनीत हक्कसोड पत्र करुन दे असे म्हटले जाते. २. दागिने देऊन परावृत्त: नमुना निवड केलेल्या ३०० माहितीदार महिलांपैकी १४५ (४८.३३ टक्के) महिलांना हुंड्यामुळे व विवाहखर्चामुळे जमीन मागणीस विरोध झाल्याचे दिसून आले. वारसा हक्क कायद्याने जरी स्त्री ही जमिनीची मालकी होणार असेल तरीही तिला त्या हक्कापासून वंचित ठेवण्यासाठी तिला पैसे देऊन, दागिने देऊन परावृत्त केले जाते. ३. अबोलाः जमीन मागणी केल्यामुळे भावाबरोबर भावाची बायको (भावजायी) अबोला धरते कुटुंबातील इतर सदस्यही भावाची बाजू घेताना दिसून येतात. आई-वडील दोघांमध्ये समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न करतात काही वेळेस वडिलांकडून सहानुभूती मिळते. तेव्हा भावाकडून विरोध केला जातो. नमुना निवड केलेल्या ५७ टक्के स्त्रियांना भावाने विरोध केला ६७ टक्के स्त्रियांना जमीन मालकीचा आई-वडिलांनी तटस्थता दाखवली. ३० टक्के स्त्रियांच्या बाबतीत वडिलांनी पाठिंबा दिला काही प्रसंगी वडील हे मुलीला जमीन देण्यास ठामपणे विरोध करताना दिसून आहे. नमुना निवड केलेल्या ३०० माहितीदार महिलांपैकी ७५ (२५.० टक्के) महिलांशी माहेरच्या नातेवाईकांनी अबोला धरल्याचे निदर्शनास आले आहे.

**शिफारसी:** १( महिलांना जमीन मालमत्ता मिळविण्यात कायदेशीर अडचणी येऊ नये त्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. २) शिक्षणाद्वारे लिंगभाव समानता निर्माण करण्याचा प्रयत्न व्हावा. पितृसत्ताकतेची चौकट मोडणारे शिक्षण द्यावे. ३) समुपदेशन व माहिती कार्यशाळांचे आयोजन करावे त्याद्वारे सामोपचाराने जमीन मालकीचे प्रश्न सुटतील अशी व्यवस्था करायला हवी. ४) जमीन मालकी असणाऱ्या महिलांना कृषी मंत्रालया मार्फत असणाऱ्या योजनांचा जास्तीतजास्त लाभ करून द्यावा. ५) विवाहाबरोबरच महिलांच्या नावे घर व जमीन मालमत्ता करण्यात यावी.

***संदर्भसूची:***


1. *Agarwal, B. 1994. A field of one's own: Gender and land rights in South Asia. Cambridge: Cambridge University Press. : p-8*
2. *Rao N. 2011, Women Access to land, An Asian perspective, FAO, 2011. P-12.*
3. *Maies and Lalita kuamari, 1994:1455).*
4. *Rakesh K. 2011, Women's Rights to Property under Hindu Law a Socio Legal Study, Ph.D Thesis Rohatak University Haryana. Page 1-7.*
5. *Kelakar G. 2009, Gender and productive assets: Implications of national rural employment guarantee for women's agency and productivity UNIFEM, India Paper p. 59-60*
6. *सोनवणे आशालता, २०१८, भारतीय स्त्रियांचे शेतीतील स्थान www.sjifactor.com.vol-VII-Oct-Des-2018, Ajanata-ISSN 2277-5730, pp-110-111.*
7. *Pavitra R.: २०१७ http://research advance oth /under php/rajmass page 1 -7.*
8. *कांबळे यादवराव, २००२, कर्मवीर दादासाहेब गायकवाड काळा कर्तव्य, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृत मंडळ, मुंबई-पृष्ठ-१५३*
9. *अग्रवाल, २००२, ए फील ऑफ वन्स ओन जेंडर अँड लँड राइटस् इन साऊथ एशिया प्रकाशक, केम्ब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, न्यूयार्क पृष्ठ- १-३, भारताच्या महिला शेतकरी, मैत्रयी कृष्णराजन अरुणा कांची, अनुवादित विजया साळुंके-२०१३, प्रकाशक नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया पृष्ठ-८८.*
10. *देहाडराय स्वाती, तांबे अनघा, २००९, स्त्रिया, कायदा आणि राजकारण, प्रकाशक, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ पुणे पृष्ठ-११.*
11. *भागवत विद्युत, २०११, समकालीन भारत, प्रकाशक, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ, पुणे पृष्ठ-८६*
12. *मुकुंद, १९९९, साळुंखे विजया, २०१३, भारताच्या महिला शेतकरी, प्रकाशक, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, पृष्ठ -३४*
13. *साळुंखे विजया, २०१३, भारताच्या महिला शेतकरी, प्रकाशक, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, पृष्ठ -३५*

# लॉकडाऊन आणि कौटुंबिक हिंसाचार

**प्रा. पूनम गायकवाड,** *समाजकार्य विभाग, सिंधुदुर्ग उपपरिसर, मुंबई विद्यापीठ, सावंतवाडी मो. ९०८२३६८९८८*

**प्रस्तावना** : स्त्रीला तीचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी स्वतःसह कुटुंबासोबत आणि समाजाबरोबर आजवर संघर्ष करावा लागलेला आहे. तिच्या अस्तित्व मान्यतेसाठी तिला पिढ्यानपिढ्या झुंजावे लागले असून प्रसंगी दमन आणि शोषणाच्या विरोधात तिला बंड पुकारावे लागत आहे. हा तिचा अस्तित्वाचा प्रवास अनेक वर्षापासून सूरु आहे. तथापि, तिच्या आयुष्यातली दीन अवस्था आपण खऱ्या अर्थाने संपवू शकलो का हा मोठा प्रश्नच आहे. स्त्री अक्षरात अफाट ऊर्जा आहे. महिला या शब्दातील 'महि' याचा अर्थच पृथ्वी असा आहे. मानवी उत्क्रांतीच्या प्रवासात मानव जात पृथ्वीवर कुठेही वास्तव्यास जाते तेव्हा त्या ठिकाणची जागा किंवा परिसर रहाण्यायोग्य बनविण्याची उपजत क्षमता स्त्रीमध्येच असल्याचे आपल्याला पहायला मिळते. मानवी जीवनाला जगवण्याचे म्हणजेच आपल्या कुटुंबाचे रक्षण करण्याचे नैसर्गिक कर्तव्य ती स्त्री पार पाडत असते. या कर्तव्यात ती चूकूनही कुचराई करत नाही. उलट कुटुंब कल्याणासाठी नरापेक्षाही म्हणजे पुरुषांपेक्षाही अधिक कष्ट, मेहनत करण्याची ऊर्मी तिच्या ठायी पहावयास मिळते. एखाद्या बाळाला तीने जन्म दिला तर ते बाळ मोठे होईपर्यंतच नव्हे तर ते जिवंत असेपर्यंत त्यांच्या जीवाची काळजी ती स्त्री करत असते. परंतु खेदजनक बाब अशी की मानवकल्याणाची अभिजात कला सक्षमपणे स्वतःच्या खांद्यावर पेलणाऱ्या या स्त्रीचा केवळ वापर करुन घेण्यात भारतीय समाजव्यवस्थेने धन्यता मानली. 'उपभोग्य वस्तू' याच एकमेव 'दृष्टीकोनातून' तिच्याकडे पहात तिला दुय्यम स्थान दिले. इतकेच नव्हेतर तिला तुच्छ, हीन, शुद्र ठरवून पुरुषप्रधान संस्कृतीने तिचे पिढ्यानपिढ्या शोषण केले. त्यामुळे घरादारापासून ते गावचावडीपर्यंत आजवर तिच्या अस्तित्वाचा अक्षरशः चुराडा होत आला. मान, सन्मान अन् प्रतिष्ठेचे जगणे तिला कोणी दिले नाही.

तथापि, एकोणिसाव्या शतकाने सावित्रीबाई ही महानायिका भारताला दिली त्यामुळे स्त्री परिवर्तनाच्या प्रवासाला एक जबदरदस्त हिंमत मिळाली आणि स्त्री अस्तित्व, अस्मिता अधोरेखित झाली. आपल्याकडे स्त्रियांवर कौटुबिक हिंसाचार होणे हे म्हणेज अगदी सहज. हे तर होणारच अश्याच पद्धतीने सारे काही घडत असते. जणू स्त्रीचे शोषण करणे हा पुरुषांचा आद्यधर्म आहे असेच पुरुषसत्ताक व्यवस्था वागताना दिसते. केवळ ती एक स्त्री आहे म्हणून तिला दुय्यम वागणूक देणं, छोट्या छोट्या शुल्लक कारणावरून तिला टार्गेट करणं हे नित्याचेच. येथे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर पुरुषी विकृत मानसिकतेचा तिला नेहमीच सामना करावा लागलाय. या कोरोनाच्या कालखंडात लॉकडाऊनमुळे तर मुलींची - स्त्रियांची घुसमट कमालीची वाढल्याचे आपल्याला पहायला मिळाली होती. शहरी भागातील जी व्यथा मुलींची, स्त्रियांची आहे तीच वेदना ग्रामीण मुलींची-स्त्रियांची होती.

**लॉकडाऊनविषयी** : कोव्हीड १९ चा पहिला रुग्ण चीनमधील वूहान येथे सापडल्याचे चीनकडून ३१ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक आरोग्य संघटनेला कळविण्यात आले. भारतात कोव्हीड १९ ने बाधित रुग्ण ३० जानेवारी २०२० मध्ये केरळ येथील थिसूर येथे मिळाला तर महाराष्ट्रात पहिला रुग्ण पुणे येथे ९ मार्च २०२० रोजी सापडला. संपूर्ण लॉकडाऊन २४ मार्च २०२० झाले आणि इथूनच स्त्रीयांवर होत असलेल्या आधीच्याच अत्याचारात अधिकच भर पडली व अत्याचाराची परिसीमा यातून गाठलेली आपल्याला दिसून आली. सर्व जण लॉकडाऊनमुळे घरात बंद झाले होते. दररोज कामाला जाणाऱ्या पुरुषांना २४ तास घरात राहावे लागत होते. त्यामुळेच अगदी सुरुवातीलाच मार्च २०२० मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाकडे आलेल्या तक्रारीचे प्रमाण २९१ एवढे होते. आता त्याचा बारकाईने विचार केला तर आपली सर्वच पोलीस यंत्रणा लॉकडाऊनच्या नियमावलीचे पालन सर्वजण करत आहेत कि नाही याकडे लक्ष देण्यात व्यस्त होती. त्यामुळे तक्रार आली असून सुद्धा त्यांना त्याकडे बघायलाही वेळ नव्हता. घराबाहेर तर पडायचे नाही. नोकरीनिमित्ताने बाहेर पडणाऱ्या महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून थोडीशी मोकळीक मिळायची पण कोरोनामुळे तिला घरात राहावे लागत होते आणि आपल्यावर होणारा अत्याचार सहन करावा लागत होता.

**कौटुंबिक हिंसाचार एक संकल्पना** : आजही 'कौटुंबिक हिंसाचार' ही व्यापक व भयावह समस्या असून ती इतर गंभीर समस्येपैकी एक महत्वपूर्ण समस्या आहे. सुरुवातीच्या काळापासून स्त्रीला समाजव्यवस्थेमध्ये दुय्यम स्थान देण्यात आले आहे. कौटुंबिक हिंसाचार वेगवेगळ्या प्रकारचा आहे. शारीरिक हिंसाचार, मानसिक हिंसाचार इत्यादी हिंसाचारातील अनेक बारकावे व्यवस्थित समजून घेणे गरजेचे आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या अहवालानुसार दर चौथ्या मिनिटाला एक महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी

पडते. कोणत्याही समस्येवर तोडगा काढण्यासाठी कारणांच्या मुळाशी जाणे आवश्यक असते. कौटुंबिक हिंसाचाराच्या वाढलेल्या घटनांमागील कारणेही अनेक आहेत. आजही समाजातील रुढीवादी विचारसरणीचा पगडा कमी झालेला दिसत नाही. समाजव्यवस्थेमध्ये असलेल्या पुरुषी मानसिकतेमुळे घरकाम करणे हे काम स्त्रियांचे, तर बाहेर जाऊन पैसे कमावणे हे पुरुषांचे काम आहे, असे आपल्याकडे मानले जाते. त्यामुळे लॉकडाऊनमुळे घरात अडकलेल्या पुरुषांना घरकाम करण्यास सांगितल्यावर कुठेतरी त्यांचा अहंकार दुखावला जातो. तसेच जागतिक मंदी, बंद पडलेले उद्योगधंदे, बेरोजगारी, पगारातील कपात, आर्थिक अडचणी, गरीबी, या सर्व संकटांतून आपण सावरु की नाही याची भिती, दडपण, राग अशा संमिश्र भावना - अशा अनेक गोष्टी कौटुंबिक हिंसाचाराला पूरक असे वातावरण निर्माण करतात.

**कौटुबिक हिंसाचार व्याख्या** : अंथोनी गिडन्स : "कौटुंबिक हिंसाचार म्हणजे कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या किंवा अनेक व्यक्तीच्या विरोधात केलेला शारीरिक दुरुपयोग होय."

मेरीअम- वेबस्तर शब्दकोष- "कुटुंबातील किंवा घरातील एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस शारीरिक दुखापत वा इजा करणे असा वर्तन प्रकार पुन्हा व सराईतपणे करणे होय."

**कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप** : पूर्वीचा कालखंड थोडासा विचारात घेतला तर आपणाला असे पहायला मिळेल की चातुर्वर्ण्य व्यवस्था ही माणसामाणसात उच्चनिच्चता आणि भेदाभेद करत आली. स्त्री ही तर समाजव्यवस्थेतला एकदम शूद्र घटक असल्याने तीची फरफट आणि चौफेर शोषण झाले. ती कोणत्या जातीची, धर्माची आहे किंवा उच्चवर्णीय आहे की खालच्या स्तरातील आहे, याचा विचारही केला गेला नाही. ती शुद्र आहे, असे मानून पुरुषप्रधान संस्कृती वर्षोनुवर्षे फिदीफिदी हसत आली. कधी धर्माच्या, कधी देवाच्या तर कधी परंपरेच्या नावाखाली तिला सांस्कृतिक, मानसिकदृष्ट्या गुलाम बनवले गेले. त्यामुळे राजरोसपणे तिच्यावर अत्याचार करणं सहज शक्य होत राहिले. मानव प्राणी टोळ्या करून राहू लागला अगदी तेव्हापासून ते आतापर्यंतच्या स्त्री कहाण्यात हिंसाचार नाही असे अजिबात नाही.

थोडक्यात, स्त्रीकडे माणूस म्हणून पाहिलेच गेले नाही. त्यामुळे त्याच्या झळा स्त्रीला पिढ्यानपिढ्या बसत राहिल्या आणि त्यांचा परिणाम स्त्रीच्या मनावर, भावनेवर, शारीरिक आरोग्यावर व एकूणच जडणघडणीवर कायम होत आला. खरंतर, स्त्रीला अनेक प्रकारचे हिंसाचार सहन करावे लागतात. यामध्ये प्रामुख्याने पहिला हिंसाचाराचा प्रकार म्हणजे शारीरिक हिंसा होय. महिलेवर नियंत्रण ठेवण्यासाठी तिला शारीरिक इजा करणे. म्हणजे तिला वस्तूने अथवा हाताने मारहाण करणे. चिमटा काढणे, ओरबाडणे या सगळ्याचा समावेश यामध्ये होतो. दुसरा हिंसाचाराचा प्रकार, हा मानसिक –भावनिक स्वरुपाचा होय. यामध्ये सतत टीका करणे, चुका काढणे, अपमान करणे, अबोला धरणे, वाईट व हीन वागणूक देणे, माहेरच्या लोकाबद्दल वाईट बोलणे, संशय घेणे आणि अविश्वास दाखवणे हे सगळे मानसिक व भावनिक हिंसेमध्ये समाविष्ट होते. तिसरा हिंसाचाराचा प्रकार हा लैंगिक छळाचा आहे. शारीरिक बळाचा वापर करून स्त्रीच्या इच्छेविरोधात लैंगिक संबंध करावयास भाग पाडणे. छेडछाड करून आई – बहिणीवरून मानहानीकारक बोलणे, लैंगिक अवयवांना इजा करणे, इच्छेविरुद्ध शारीरिक स्पर्श, लैंगिक भाषेचा वापर आणि छळ यांचा समावेश या तिसऱ्या प्रकारात होतो. चौथा प्रकार म्हणजे नियंत्रण किंवा बंधन घालणे. स्त्रीला घराबाहेर काम करण्यास अडवणूक करणे, एकाकी पाडणे, सतत देखरेख ठेवणे, माहिती - पैसा - मालमत्ता, साधन सामुग्रीवर नियंत्रण ठेवणे, तिच्या पैशाचा वापर करणे, तिचे दागिने, पैसे चोरून वापरणे आणि सगळयात महत्त्वाचे हुंड्यासाठी सतत छळ करणे. या आणि अशा बाबी चौथ्या प्रकारात मोडतात.

खरं म्हणजे या सर्व प्रकारच्या हिंसाचाराचा स्त्रियांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असतो. दररोजचा हिंसाचार स्त्रीचे माणूसपण उदध्वस्त करत असते. अशा हिसांचारात एखाद्या गर्भवती स्त्रीला जर पोषक आहार मिळाला नाही तर गर्भात बाळाची नीट वाढ होत नाही. मग गर्भपात आथवा बालमृत्यू यासारख्या प्रसंगाना सामोरे जावे लागते. त्यातूनही प्रसुती झालीच तर बाळ कुपोषित असते. म्हणजे काहीतरी व्यंग घेऊन ते जन्माला येते . मग ते व्यंग मूल आयुष्यभर सांभाळण्याची जबाबदारी ओघाने त्या स्त्रीवर येते. शिवाय सतत तिला सासरच्या लोकांसह समाजाकडून वाईट ऐकून घ्यावे लागते. यातून तिचे भावविश्व कोलमडून जाते आणि ती नैराश्येच्या गर्तेत अडकून पडते.

**कौटुंबिक हिंसाचाराची कारणे** : भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीयांना कायम दुय्यम स्थान देण्यात आले आहे फक्त आणि फक्त याचमुळे स्त्रियांवर कायम अत्याचार होत असताना आपल्याला पाहायला मिळतो. आपल्याकडे असणाऱ्या प्रथा परंपराही याला कारणीभूत आहेत. कौटुंबिक हिसाचाराला कारणीभूत असणाऱ्या कारणाचा थोडक्यात आढावा घेऊया.

**पुरुषसत्ताक समाजव्यवस्था :** आपल्या समाजव्यवस्थेमध्ये नेहमीच पुरुषाला महत्व दिले गेलेले आहे. लिंगभाव असमानता ही मुलाच्या जन्मापासून सुरू झालेली असते. त्याचे घरातील स्थान ती मुलगी आहे की मुलगा यावरून ठरत असतात. मुलगा हा वंशाचा दिवा समजला जातो. घरातील प्रत्येक गोष्टी मधून हा मुलामुलीमध्ये भेदाभेद केला जातो. पुरुषाच्या मताला महत्व देणारी व्यवस्था इथून रूढ झाली आहे.

**स्त्रियांचे पुरूषांवरील परावलंबीत्व :** पूर्वीपासून स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे चूल आणि मूल इतकेच मर्यादित होते. आजच्या काळात हे स्वरूप फारसे बदलले दिसत नाही. आता महिला शिक्षण घेऊन पुढे गेल्या असल्या छोट्या छोट्या गोष्टीसाठी त्यांना पुरूषांवर अवलंबून राहावे लागत आहे. जाणीवपूर्वक समाजामध्ये अशी स्थिती निर्माण केली जाते. स्त्रियांचे पुरूषांवरील परावलंबित्व वारंवार स्पष्ट केले जाते.

**हुंडा प्रथा :** कौटुंबिक हिंसाचार घडण्याचे सर्वात मोठे कारण कोणते असेल तर ते हुंडा प्रथा आहेत. लग्नाच्या वेळी मुलीकडून किंवा लग्न झाल्यानंतरही काही मोठी रक्कम, एखादी मोठी वस्तू आपल्या माहेरकडून सासरच्या मंडळीना दिली नाही तर तिला मोठ्या प्रमाणात कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते.

**लॉकडाऊन आणि स्त्रियांची परिस्थिती :** कोरोना व्हायरसने अवघं जग भयकंपीत झालं होत. जगावर राज्य करू पहाणारे आणि स्वतःला महासत्ता म्हणू पाहणाऱ्या देशांनी या अदृश्य व्हायरसपुढे हात टेकले होते कोणत्याच राष्ट्राला लॉकडाऊनची अपरिहार्यता टाळणे शक्य नव्हते. परिणामतः जागतिक आयात निर्यातीवर मर्यादा आल्या होत्या. मेडिसीन पासून ते अनेकविध अत्यावश्यक आणि तत्सम महत्वाच्या वस्तुंचा तुटवडाही बाजारपेठांमध्येही जाणवत होता. लघू, मध्यम आणि मोठ्या उद्योगधंद्यांचेही शटरडाऊन झाले. अदृश्य स्वरुपातील व्हायरसने सपूर्ण दुनियेच्या चक्राचा वेग मंदावून गेला होता. भारतालाही या परिस्थितीला सामोरं जावं लागतं होते. एकापाठोपाठ एक असे लॉकडाऊनवर लॉकडाऊन आदळत होते. जवळपास शंभर कोटी लोकसंख्येला पूर्वीप्रमाणे मुक्तपणे वावर करता येणं अशक्य होऊन बसलं होते लोकजीवन संपूर्णपणे बदलून गेल होते. त्यामुळे इथला व्यापार उद्योगही ठप्पच होता. एक दिवस जर भारत बंद राहिला, तर त्या एका दिवसाचे नुकसान भरून काढावयास साधारपणे महिना जावा लागतो. लॉकडाऊनच्या दिवसांतलं बिघडलेल अर्थगणित कसं दुरुस्त होणार किंवा ते कसे रुळावर येणार हे एक भारतापुढे मोठे आव्हानच ठरलं होते. लॉकडाऊनमुळे भारतीय लोकसमुहातील जो गरीब, कष्टकरी, मजूर ज्यांचे हातावरचे पोट आहे त्यांची हालअपेष्टा आणि कुंचबणा पराकोटीची होऊन गेली. स्त्रियांना तर यातना, वेदनांचा जो भोगवटा वाट्याला आलाय तो तर मन हेलावून टाकणारा असाच राहाला. स्वस्तातले लग्न म्हणून या काळात बालविवाहाच्या अनेक घटना घडल्याचे आपणास पहायला मिळाले. या आणि अशा वेगवेगळ्या संकटाना, त्रासाला सामोरे जाताना स्त्रीयांची अक्षरशः दमछाक झाली.

या लॉकडाऊनच्या काळात कौटुबिक हिंसाचाराच्या प्रमाणाचा आलेख वर गेला. या दिवसांत कुटुंबातील सदस्यांच्या म्हणजेच मुले, नवरा किंवा सासूसासरे यांच्या मागणीनुसार सर्वांच्याच खाण्यापिण्याच्या गरजा तीला पूर्ण कराव्या लागल्या. त्यात काही चूकभूल झाली तर त्यावरून उसळणारा वादंगाला तीला सामोरे जावे लागले. अनेक स्त्रिया मारहाणीच्या बळी ठरल्या. खरंतर शारीरिक मारहाणीपेक्षा मानसिक होणारा त्रास, घुसमट ही त्याहून फार भयंकर. मात्र कुटुंबात असल्याने निमुटपणे सर्व सहन करण्याशिवाय तिच्यापुढे काहीच पर्याय उरला नाही. त्यात काम करणारी (वर्क फ्रॉम होम) स्त्री असेल तर तिला खूपच कसरत करावी लागत होती. ऑफीसमधून येणारे फोन्स कॉल, मोबाईलवर येणारे मेसेज या आणि अशा कारणास्तव त्या स्त्रीला कुंटुबातून विचारले जाणारे प्रश्न या साऱ्या प्रकारामुळे येणारे मानसिक दडपण याचा अप्रत्यक्षपणे तिच्या सर्वप्रकारच्या आरोग्यावर परिणाम झाला. तदवत मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य ढासळलेलं आपणास पहायला मिळालं.

महिलाच्या न्याय हक्कासाठी काम करणाऱ्या बऱ्याच सामाजिक संस्था आपल्या सेवा ऑनलाइन देत होत्या. त्यामध्ये ऑनलाईन समुपदेशन केले जात होते. यामध्ये काही महिला पुढे येऊन आपल्या अडचणी सांगत होत्या. कोरोना काळात आपल्याला आपले हात धुण्याचे वारवार प्रसार माध्यमाकडून सांगितले जात होते. यासंबधाने एका महिलेने सांगितलेला तक्रारीचा किस्सा असा, आपण बाहेर जात नसलो तरी मला व मुलांना नवरा सारखेच हात धुण्यासाठी सांगत होता. बाहेर आणलेल्या सर्व वस्तू गरम पाण्यातून काढून मग वापरण्याची सक्ती करत होता. बाजारातून आणलेल्या भाजीपाला गरम पाण्यातून धुवून काढायला लावत होता. तसे नाही केले तर सरळ मारत सुटायचा. खरं म्हणजे माणूस घरात आहे तर त्याने आपल्या कुटुंबासाठी वेळ द्यायला हवा. परंतु तसे न होता नको तिथे आणि छोट्या छोट्या घटनावरून घरातील महिलेचे खच्चीकरण करणे हे कितपत योग्य ? वास्तविक ही कृती हळूहळू त्या महिलेचे शारीरिक तसेच मानसिक शोषण खूप मोठ्या प्रमाणात करत असते, मात्र याचे

कसलेही देणंघेणं (काही पुरुषांचा अपवाद सोडला ) पुरुषांना रहात नाही. ग्रामीण भागात तर शहराकडील सर्वच लोक राहायला अचानक आल्यामुळे ग्रामीण महिलांचे खूप हाल झाले. अतिरिक्त श्रम आणि सगळयासाठी सगळे जुळवाजुळव करणे. सगळे नीट झाले नाही तर सासू सासरे आणि नवरा त्यांच्याकडून टोमणे तसेच मारझोड ही सहन करावी लागली.

यादरम्यान एक दिलासादायक गोष्ट झाली ती अशी की लॉकडाऊन काळातील जगातील विविध देशानी कौटुंबिक हिंसाचाराला आळा घालणाऱ्यासाठी विविध उपाययोजना आखल्या. फ्रान्स सरकारने कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांना सुरक्षित ठिकाणी राहण्यासाठी आथिर्क मदत देण्याचे जाहीर केले. त्याबरोबर दुकानांमध्ये समुपदेशन केंद्र सुरू करायचेही त्यांनी ठरवले, जेणेकरून महिला दुकानात सामान घेण्यासाठी आल्या तर त्या मोकळेपणाने बोलतील आणि तिथून या महिलांना मदत करता येईल. कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांनी ९९९ या क्रमांकावर फोन करून ५५ क्रमांक डायल केल्यास काहीतरी चिंतेचे कारण असल्याचा निरोप पोलिस यंत्रणेला मिळेल अशी व्यवस्था अमेरिकेने केली होती. महिलांनी या सुविधेचा जास्तीत जास्त उपयोग करावा यासाठीही तेथील पोलिस यंत्रणाही सतर्क राहिली होती. ऑस्ट्रेलिया सरकारने कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांसाठी १४२ दशलक्ष डॉलरचा निधी जाहीर केला होता. स्पेन आणि फ्रान्स या देशांमध्ये 'मास्क १९' हा कोडवर्ड प्रचलित केला होता. मेडिकल स्टोअरमध्ये जाऊन महिलांनी जर हा कोडवर्ड उच्चारला तर त्यांना मदत मिळण्याची व्यवस्था होत होती. आपल्याकडे लॉकडाऊनच्या काळात वाढत्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना पाहता कठोर पावले उचलून उपाययोजना करणे गरजेचे होते.

प्रचलित कायद्याच्या आधारे व तज्ञांच्या सल्ल्याने सदर परिस्थिती हाताळायला हवी होती. परंतु त्या वेळेस आपल्याकडे अशी कोणतीही भक्कम यंत्रणा नव्हती. काही स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन हेल्पलाईन सुरू केल्या होत्या. तसेच ई-मेल मार्फतही त्या महिलांना मदत करण्याचा प्रयत्न करत होत्या. पण त्या परिस्थिती हे सर्व अपुरे असेच होते. ईमेल आणि फोन करणे ग्रामीण भागातील महिलांनाच काय तर शहरी भागातील स्त्रियांसाठी सुध्द ते अशक्यप्राय असे होते.

**समारोप :** स्त्री ही सुध्दा एक माणूस आहे. तिला तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे. तिची, मान - सन्मान - प्रतिष्ठा अबाधित ठेवण्याचे काम समाजव्यवस्थेने-शासनव्यवस्थेने केले पाहिजे. कोणत्याही प्रकारचा हिंसाचार हा निषेधार्हच. मग नैसर्गिक आपत्तीतील असो वा नसो. कोरोनातील असो वा नसो. कौटुंबिक हिंसाचार भविष्यात घडूनच नये यासाठी "लिंगभाव संवेदीकरण" होणे गरजेचे आहे. प्रत्येक गावागावात, शाळामधून, महाविद्यालयामधून याविषयी जनजागृती कशी होईल हे पहायला हवे. लिंगभाव संवेदीकरण हा विषय अभ्यासक्रमात प्राधान्य क्रमाने शिकवला गेला पाहिजे यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. महत्त्वाचे म्हणजे कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. एकंदर स्त्री अस्मितेचे अवकाश जोवर इथली व्यवस्था फूलवत नाही तोवर स्त्रीचे स्वातंत्र्य तिला मिळाले असे म्हणता येणार नाही. अन्याथा फ्रॅक्चर्ड फ्रीडम सारखी तीची अवस्था होईल.

***संदर्भसूची*** :


1. *Vora, M., Malathesh, B. C., Das, S. and Chatterjee, S. S. (2020), COVID-19 and domestic violence against women, Asian Journal of Psychiatry, 53, 102227*
2. *Nigam, S. (2020), COVID-19: India's Response to Domestic Violence Needs Rethinking, South Asia Journal.*
3. *Choudhary, R., Kaithwas, M. and Rana, G. (2017), Domestic Violence Against Women's in India A Study, PANACEA International Research Journal, Vol.1(2), 4955*
4. *अँड.प्राची पाटील.,(मे २०२०), लॉकडाऊन आणि घरगुती हिंसाचारात झालेली वाढ, कर्तव्यसाधना, साधना साप्ताहिक.*
5. *https://www.bbc.com/marathi/india-52910572*
6. *https://kartavyasadhana.in/view-article/lockdown-and-domestic-violence-writes-prachi-patil-marathi*

# महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता

***डॉ. साहेबराव हिवाळे,*** *समाजशास्त्र विभाग, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद*

***सारांश:*** *सरकारने दिनांक २९ जुलै २०२२ रोजी नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारून प्रस्थापित शैक्षणिक धोरण रद्द करण्यात येतअसल्याचा निर्णयावर शिक्कामोर्तब केले. शिक्षणासारख्या अतिशय महत्त्वाच्या विषयावरील धोरण पूर्णपणे बदलून टाकत असताना भारताच्या संसदेत यावर कुठल्याही स्वरूपाची सरकारनेबहुमत असताना देखील चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केलेला नाही. इथेच या धोरणाच्या मागील डाव काय आहे हे? कोणत्याहीविवेकवादी व्यक्तीच्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. शिक्षण केवळ विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित नसते तर संपूर्ण देशाचेच भवितव्यशिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असते.[१] तेव्हा अशा धोरणाची स्वीकार्यता व अंमलबजावणी पारदर्शकपणे व्यापक स्तरावर चर्चा, सूचना आणि शिफारशी इत्यादींचा वापर करून होणे गरजेचे असते.कारण यातून कोणत्याही धोरणातील उणिवा दूर होण्यास मदतच होते. असे असताना देखील देशातील केंद्र सरकार या धोरणावर उघडपणे चर्चा न करता एका रणनीतीचा वापर करून, अपेक्षितजन-मत तयार करूनहे धोरण अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक चर्चा घडवून न आणता जनतेवर जबरदस्तीने थोपवलेले दिसते. याच प्रकारचे ब्रिटिश सत्तेत जेव्हा लॉर्ड रिपन यांच्या काळात सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक शिक्षण आयोग नेमला होता. तेव्हा या आयोगासमोर महात्मा फुलेंनी जे निवेदन सादर केले, त्यातून शिक्षणाची व्यापकता, सर्वसमावेशकता व प्रासंगिकता यासारख्या बाबी अधोरेखित झाल्या होत्या. परंतु नवीन शैक्षणिक धोरण-२०२० संदर्भात असे निवेदन, सूचना, शिफारशी इत्यादींना महत्त्व दिलेले दिसत नाही. ही सर्वात महत्त्वाची आणि चिंताजनक बाब वाटते आणि इथेच धोरणाबद्दल शंका निर्माण होते.*

***मुख्य शब्द:*** *शैक्षणिक नीती, सामाजिक वास्तवता, शिक्षणाचे बाजारीकरण आणि सामाजिक परिवर्तन*

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंध आजच्या शैक्षणिक परिस्थितीतीसंबंधी चिकित्सक विचार करून महात्मा फुले यांचे शैक्षणिकविचारांच्या चौकटीतून आजच्या शैक्षणिक धोरणाकडे बघण्याचा संशोधकाचा वैज्ञानिक व वास्तववादी दृष्टिकोन असल्याने, यासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करून सामाजिक वास्तवता मांडण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केलेला आहे.

**संशोधनाचा उद्देश:** आजचे शैक्षणिक परिस्थितीचे मूल्यमापन करणे व या शैक्षणिक नीतीचा सिमांतिक समूह, बहुजन वर्ग, महिला व दुर्बल घटकांवर होणाऱ्या प्रतिकूल स्वरूपाच्या संभाव्य परिणामांची चर्चा करणे. या शोधनिबंधाचा मुख्य हेतू नजरेसमोर ठेवण्यात आला आहे होता.

**प्रस्तावना:** महात्मा फुले यांनी शिक्षणाला खूपमहत्त्वाचे स्थान दिले आहे. त्याचे कारण सुद्धा तसेच प्रबळ होते. वैद्य ज्याप्रमाणे रोगाचे निदान करतो. त्याप्रमाणे महात्मा फुले यांनी भारतीय समाजाला झालेला 'मागासलेपणाचा रोग' व त्याचे योग्य निदान करुन कारण शोधून काढले ते कारण म्हणजे लोकातील अज्ञानीपणा आणि हा अज्ञानीपणा दूर करावयचा असेल तर त्यासाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता असते. त्यादृष्टीने महात्मा फुले यांनी भारतामध्ये फार मोठी शैक्षणिक क्रांती घडवून आणली. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे हा अतिशय मूलगामी विचार त्यांनी 'तृतीय रत्न' यानाटकातून दिला आहे[२]. "आपल्या देशाची खरी सुधारणा जशी स्त्री शिक्षणाशिवाय व्हावयाची नाही तशीच अज्ञान अंध:कारात गडलेल्या अतिशूद्रांस विद्याधन प्राप्त त्यास त्यांचे मानवी अधिकार समजल्याशिवाय होणार नाही."[३] त्याचप्रमाणे, तत्कालीन शिक्षण वरच्या वर्गातून खालच्या वर्गात झिरपत जात असते, हा शिक्षण विषयक विचार समाजात प्रचलित होता. तो हिंदुस्थानातील जातीभेदाच्या व्यवस्थेमुळे पूर्णपणे व्यर्थ ठरला होता. त्या काळाच्या शिक्षणपद्धतीमध्ये शहरात उच्चवर्णीयांमध्ये एक लहानसा सुशिक्षित वर्ग तयार झाला होता, परंतु शिक्षण काही शूद्रातिशूद्र व स्त्रीवर्गापर्यंत झिरपत गेले नाही. हा समाजातील बहुजन वर्ग शिक्षणापासून वंचित राहिला. त्याकाळी हिंदुस्थानातील सर्व विचारवंत शिक्षण वरच्या वर्गापासून सुरू करावे, अशा विचाराचे होते. समाजातील खालच्या वर्गाच्या शिक्षणाचा कोणीही विचार करावयास तयार नव्हते. समाजातील उच्च वर्गीयाची शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी कायम राहिली पाहिजे. या मतलबी विचाराचेच सर्वजण होते. या सर्व परिस्थितीत सरकारने खालच्या वर्गातील शूद्रातिशूद्र व स्त्री वर्गातील शिक्षणाची हेळसांड केलेली दिसून येते. या वर्गाच्या शिक्षणाकडे संपूर्ण दुर्लक्ष केले होते. असे सरकारला सडेतोडपणे सांगणारे पहिले भारतीय शिक्षण तज्ञ महात्मा फुले यांच्या नावाचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी शिक्षण वरच्या स्तरातून खालच्या

स्तरात झिरपत येते, या विचाराला कडाडून विरोध केला होता. एवढेच नव्हे तर, प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावेत, यासाठी सरकारने कायदा करावा. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे व त्यांचे सार्वत्रिकीकरण करावे असे सांगणारे पहिले भारतीय म्हणजे ज्योतिराव गोविंदराव फुलेठरतात.[४]

हंटर कमिशनला सादर केलेले महात्मा फुले यांचे निवेदन खऱ्या अर्थाने या देशातील शिक्षण पद्धतीचा मूलभूत विचार करणारी प्रेरणा आणि शैक्षणिक विकासाची गाथा असून शैक्षणिक विचारांचा मूलमंत्रआहे. जेव्हा या देशातील सगळे शिक्षण तज्ञ शिक्षण वरच्या वर्गाच्या स्तरातून खालच्या वर्गाच्या स्तरात झिरपत जात असते. हा सिद्धांत मांडत होती त्या काळात एकट्या महात्मा फुले यांनी या सिद्धांताचे वाभाडे काढले. "प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक आणि सक्तीचे असले पाहिजे मागणी करणारे महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने भारतीय शिक्षणाचा पाया रोवणारे पहिले भारतीय ठरतात."[५] उच्च शिक्षणावर अवास्तव खर्च व प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष या सरकारी धोरणावर महात्मा फुले यांनी कडाडून हल्ला केला होता. शिक्षण पद्धतीतील आमुलाग्र बदलाची व पुनर्रचनेची महात्मा फुले यांनी स्पष्टपणे केलीली मागणी आजच्या घडीलाही आपल्याला दीपस्तंभासारखी दिशा दाखवणारी आहे. यावरून त्यांच्या विचारांचे महत्त्व आजच्या अधोगती प्राप्त झालेल्या शिक्षण व्यवस्थेला गती देण्यासाठी मोलाचे वाटते. कारण आज या पद्धतीने विचार न करता शासन राज्य आणि देशांमध्ये कुठली शैक्षणिकनीती लागू करू पाहत आहे आणि एवढेच नाही तर तिची सुरुवात देखील झालेली असल्याचे दिसून येते.

आजच्या शैक्षणिक धोरणाचा विचार केला आणि या परिस्थितीला महात्मा फुले यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनाशी जोडले तर, एक गोष्ट निश्चितच लक्षात येते आणि ती म्हणजे Social Impact Theory. इंग्रज काळातीलसर विल्यम हंटर आयोगाची पार्श्वभूमी बघितली तर त्या काळातील शैक्षणिक व्यवस्थेचा Factual Report महात्मा फुलेयांनी आयोगापुढे मांडताना समाजातील शिक्षणप्रसाराचा कार्यात्मक आणि रचनात्मक कृती आराखडा तयार करून देतात. या आराखड्यानुसार अनुदानितशाळा, महाविद्यालये किती आहेत? आणि किती अनुदानित शाळा-महाविद्यालयांची आवश्यकता आहे. यासारख्या बाबींचा देखील उल्लेख करतात तसेच शिक्षणक्रम, अभ्यासक्रम कसा असावा? शिक्षकवृंद कोणत्या प्रकारचे असावेत? अध्यापन पद्धती कोणती असावी? या सर्व बाबी अगदी परिस्थितीजन्य व अनुभवाधीष्टीत अध्ययनाच्या माध्यमातून व्यक्त करतात. एवढेच नाही तर शासनाच्या भरवशावर न बसता स्वतः दुर्बल घटकांसाठी, महिलांसाठी, अस्पृश्यांसाठी अशा सर्व स्तरातील लोकांसाठी स्वखर्चाने व इतर दानशूर व्यक्तीच्या मदतीने शाळा सुरु करतात आणि त्या यशस्वीपणे चालवितात. या सर्व घटना व परिस्थिती आपण बारकाईने अभ्यासले तर त्यांनी हे सर्व करताना कोणता सिद्धांत? कोणते तत्व? आणि नफा-तोटा गणित कधीही अजेंड्यावर ठेवलेले दिसत नाही. परंतु आज महाराष्ट्रातील किंवा देशातील इतर राज्येशासनाचे शिक्षण प्रकल्प राबवताना Social Impact Theory चा पुरेपूर विचार करतांना दिसतात, कारण या सिद्धांता नुसार, प्रामुख्याने नफा-तोट्याचे मूल्यमापन केले जाते. म्हणजे एखादा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तपासणी करून त्यासाठी मोजावी लागणारी किंमत आणि त्यातून मिळणारा परतावा मग तो आर्थिक, सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय अशा कोणत्याही स्वरुपातील असो, परंतु आज केवळ आर्थिक कारण पुढे करून महाराष्ट्रसारखा पुरोगामी राज्यात देखील पटसंख्या हे सूत्र पुढे करून वाडी-वस्ती आणि तांड्यावरील शाळा केवळ अपुरी विद्यार्थी संख्या (पटसंख्या) या नावाखाली बंद करण्याचे शासन धोरणात्मक पाऊल उचलत आहे.

शासनाचे हे धोरण असेल किंवा नवीन शैक्षणिक धोरण २०२० असेल. या दोन्ही धोरणांच्या अंमलबजावणीच्या प्रभावानेयेथील बहुसंख्य लोकांच्या व्यक्ति स्वातंत्र्याला हानी पोहोचतनाही का? वाडी-वस्ती, तांड्यावरील शाळा पटसंख्येच्या नावाखाली बंद केल्यामुळे तेथील मुला-मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणार नाही का? तेथील मुल-मुली शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे निरक्षरतेची टक्केवारी वाढणार नाही का? शिक्षणाची सोय जवळपास नसल्यामुळे इतर ठिकाणी हे लोक शिक्षणासाठी जातील काय? गेले तर सर्वच जातील काय? नाही गेले तर अशिक्षितपणामुळे दारिद्र्य, निरक्षरता, कुपोषण यासारख्या सामाजिक समस्या तसेच बालविवाह घडून येणार नाहीत काय? गुन्हेगारी वाढणार नाही काय? मग यातून भारत आत्मनिर्भर आणि महासत्ता कसा होईल? हे मात्र अनाकलनीय वाटते, शासनाने अशा पद्धतीचे निर्णय घेताना कोणता सिद्धांत? कोणते तत्व? आणि कोणता आधार घेतलेला आहे? की यातून एक नवी आशा आणि नवी दिशा निर्माण होणार आहे.

पटसंख्या हा प्रश्न खरे तर दुय्यम आहे. कारण पुरेशी पटसंख्या नाही, हे तत्त्व ज्या ठिकाणी पुरेशी लोकसंख्या नाही त्या ठिकाणी लावणे मुळात गैर आहे. कारण संख्या अपुरी आहे, हा दोष तेथील लोकांचाआहे का? नाही! तर

मग त्यांना याची शिक्षा सरकार का देत आहे? सरकारला हा अधिकार आहे का? लोककल्याणकारी राज्याची आणि सामाजिक न्यायाची भूमिका यांचे काय? असे असंख्य प्रश्न पडतात आणि ते सत्तेच्या राजकारणात जणू काही खोलवर दबून जातात, अशीच जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. मग अशा परिस्थितीत काय करावे? असा प्रश्न येथील समताधिष्ठित समाजरचनेचे स्वप्नउराशी बाळगून असणाऱ्या जनतेला पडत नसेल का? आणि मग आठवण होते, ती कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याची, महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याची आणि सावित्रीबाई फुले यांनी दिलेल्या योगदानाची, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवलेल्या समाजाची, समतेची, न्यायाची, मानवतेची आणि वाघिणीच्या दुधाचीही! या सर्वांच्या विचारांची प्रासंगिकता आजच्या घडीला तसूभरही कमी झालेली दिसत नाही. परंतु शोधनिबंधाची विस्तार मर्यादा लक्षात घेऊन येथे केवळ महात्मा फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता अभ्यासण्याचा एक छोटासा प्रयत्न अभ्यासकांनी केलेला आहे.

विद्येविना मति गेली,
मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली!
गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले[६].

महात्मा फुले यांच्या या ओळी शिक्षणाचा संबंधबुद्धिमत्ता, नीतिमत्ता, गतिशीलता, अर्थव्यवस्था आणि दारिद्र्य अशा घटकाशी आहे. तेव्हा शिक्षण हे असे एकमेव औषध आहे, की जे या सर्व रोगांवर एकमात्र उपाय आहे. अशी महात्मा फुले यांची पक्की धारणा होती आणि यामध्ये तीन मात्र खोटे अथवा अविवेकशीलता मुळीच नव्हती, हे सिद्ध झालेले आहे. म्हणजेच आ. ह. साळुंखे म्हणतात की,"या एका वचनात महात्मा फुले यांनी बहुजनांच्या जीवनातील शेकडो वर्षाच्या दुःखाची यथार्थ कारणमीमांसा केली आहे."[७]महात्मा फुले यांनीयेथील समाजाला अगदी जवळून अभ्यासले होते आणि या बहुजनांचे कल्याण अथवा मुक्तीसाठीचा मार्ग केवळ आणि केवळ ज्ञानाच्या मार्गातून जातो, अशी त्यांची पक्की खात्री पटली होती. त्यामुळेच तर ते म्हणतात, "विद्येचा अवेर कराल देशोधडीला जाल, डागवंशात".[८] आपण शिक्षणाकडे दुर्लक्ष केले तर आपली अधोगती निश्चित आहे आणि मग आपली उपेक्षितता, दारिद्र्य, गुलामगिरी, लाचारी यासारख्या गटात निश्चितच समावेश होतो. ही बाब निश्चितच मानवी उत्कर्षासाठी उपयुक्त नसते. हे आपण आजही अनुभवू शकतो. ज्यामध्ये तिळमात्र कमी अधिकपणा आपणास जाणार नाही. हे महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि दृष्टीचा मोठेपण आणि व्यापकता सिद्ध करण्यास निश्चितच पुरेशे ठरते. कारण आपण आपली तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता विकसित केली नाही तर आपल्याला खरे आणि खोटे यातील फरक करता येणार नाही.

आपण कोणत्याही विचारांची चिकित्सा करू शकत नाही. आपली 'सूचनग्रहण' क्षमता मात्र आपोआप विकसित होत जाते आणि मगआपण अविवेकी गोष्टीही स्वीकारु लागतो.त्यातून आपले धार्मिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय शोषण होते. याची जाणीव देखील आपणास होत नाही. ही फार मोठी शोकांतिका आहे. अशा परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग महात्मा फुले सोदाहरण सांगतात, यासंबंधी त्यांनी सांगितलेली बाब म्हणजे, "बुद्धीप्रमाण्य उद्योगाला गती, यश मिळवीत धंद्यामध्ये"[९]व्यक्तीला कोणताही व्यवसाय करावयाचा असेल तर त्यास नफा तोट्याचे गणित कळलेच पाहिजे, हे गणित समजून घेण्यासाठी विद्या आवश्यक आहे आणि एकदाव्यक्तीने विद्या ग्रहण केली आणि तो आपल्या बुद्धीचा वापर करू लागला, कोणतीही बाब बुद्धीच्या कसोटीवर शहानिशा करूनच स्वीकारू लागला की आपोआप त्याचा विकास होतो. त्यास जीवनात यश मिळते. तो जे कार्य करत आहे त्यामध्ये यशस्वी होतो आणि यातून उत्साहदेखील वाढतो, उत्कर्ष होतो, व्यक्ती स्वतःची क्षमता जाणतो. अशा विविध बाबींचा शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्ती जीवनात शिरकाव झाला की कोणत्याही व्यक्तीतील धैर्यशीलता, आत्मविश्वास आणि जिद्द देखील निर्माण होते. या सर्व गुणांमुळे तो स्वतःबरोबरच आपल्या समुदायाला सुद्धा गुलामगिरीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा यासाठी येथील व्यवस्थेने नाकारलेलाशिक्षणाचा अधिकार त्यांना प्राप्त करून देणे आणि विद्यार्जन करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. हे महात्मा फुले यांनी पदोपदी सांगण्याचा आणि रुजविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

येथील विषमतेवर आधारलेल्या व्यवस्थेने जाणीवपूर्वक बहुजन समाजाला गुलामगिरीच्या जोखडात गुंतून ठेवले आहे. कारण या बहुजन समाजाला गुलामगिरीत ठेवले तरच येथील व्यवस्थेला फायदा होतो. कारण त्यातून त्यांचे शोषण करून आपली पोळी आपणास व आपल्या येणाऱ्या कित्येक पिढ्यांनाभाजता यावी यासाठीची ती एक व्यवस्था होती. महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला म्हणजे सावित्रीबाई फुले यांना जेव्हा शिक्षण देऊन साक्षर केले आणि समाजाच्या कामी त्यांनी

आपले जीवन झोकून दिले, तेव्हा सावित्रीबाईच्या देखील लक्षात आले होते की, येथील समाजातील मूठभर लोकांनी बहुजनांना शिक्षणापासून दूर गुलामगिरी ठेवले आहे. दुसऱ्या बाजूला इंग्रजी राजवट आली आहे. तर अशा इंग्रजी राजवटीचा फायदा घेऊन आपण शिकलं पाहिजे, असा आग्रह सावित्रीबाई आपल्या कवितेतून करतात आणि शिकण्यासाठी जागे व्हा! हा संदेश देताना म्हणतात,

"उठा बंधुंनो अतिशुद्रांनो जागे होऊन उठा
परंपरेची गुलामगिरी ही तोडणे साठी उठा
बंधुनो शिकणे साठी उठा ॥ ध्रु ॥
गेले मेले मनु पेशवे आंग्लाई आली
बंदी मनूची विद्या घेण्या होती ती उठली ॥
ज्ञानदाते इंग्रज आले विद्याशिकून घ्यारे
ऐशी संधी आली नव्हतीहजार वर्षे रे[१०]

वरील कवितेत सावित्रीबाई फुले यांनी भारतातील शिक्षणाची दुरावस्था कशा पद्धतीने झालेली आहे? व या प्रकारची व्यवस्था करण्यात कोणाचे हित आहे? हे देखील स्पष्ट केले आहे, म्हणजेच इंग्रजांनी येथील सत्तेचा पराभव करून आपले साम्राज्य निर्माण केले आणि या साम्राज्य कडून सावित्रीबाईंना शिक्षण प्रसाराची अपेक्षा वाटत होती,आशावाद वाटत होता. तो त्यांनी या कवितेच्या माध्यमातून व्यक्त केलेला आहे. त्यासाठी त्यांनी येथील बांधवांना आव्हान करून शिक्षण घेण्यासाठी जागे करण्याचा प्रयत्न केला. मनुवादी आणि पेशवे राजवट या दोन्ही बहुजन घटकासाठी विद्या बंदी घालणारी होती. यानिमित्ताने आता विद्या बंदी राहिलेली नाही, तेव्हा या कारणासाठी इंग्रजी राजवट चांगली वाटणे सहाजिक होते. कारण यातून हजारो वर्षापासून स्त्री शिक्षणावर घातलेली बंदी प्रथमच उठले ली दिसते.

**पर्यायी शिक्षण व्यवस्था:** महात्माफुले केवळ शैक्षणिक सुधारणा किंवा उपायोजना करून थांबत नाहीतर प्रचलित समाजव्यवस्थेत पर्यायी शिक्षण व्यवस्था कशी असली पाहिजे, असाही विचार मांडतात त्यांचा हा विचार महत्त्वाचा वाटतो व या विचाराला दिलेली कृतीची जोड तर खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांचा शैक्षणिक कृती कार्यक्रम वाटतो व त्यातून त्यांची समाजाबद्दल असलेली तळमळ किती महत्त्वाची आहे. याची जाणीव होते.या पर्यायी शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात महात्मा फुले प्राथमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण या दोन्ही शिक्षणावर आपले विचार व्यक्त करताना म्हणतात की, भारतातील प्राथमिक शिक्षण समाधानकारक आणि भक्कम पायावर उभारलेले नाही. शिक्षक विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने कुचकामी आहेत. "शिक्षकाची गुणवत्ता बेताची आहे."[११] म्हणून भविष्याच्या दृष्टीने उपयुक्त होऊ शकणाऱ्या आणि समाजाची शैक्षणिक गरज भागविण्याच्या दृष्टीने उपयुक्त शैक्षणिक सुधारणा महात्मा फुले यांनी सुचविल्या आहेत. त्या उपाय योजनांच्या अंमलबजावणीतूनखऱ्या अर्थाने पर्यायी शिक्षण व्यवस्था उभी राहील असे वाटते. यासंदर्भात हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेल्या निवेदनामध्ये महात्मा फुले असा आग्रह धरतात की, १. प्राथमिक शाळेतील शिक्षक प्रशिक्षित असले पाहिजे, २. हे शिक्षक शेतकरी वर्गातील असले पाहिजे. ३. शिक्षकी पेशात चांगल्या लोकांनी यावे म्हणून शिक्षकांचे वेतन वाढविले पाहिजे. ४. खेड्यातील ज्या शाळांमधून जास्त मुले उत्तीर्ण होतील त्या शाळांमधील शिक्षकांना पगाराव्यतिरिक्त उत्तेजन म्हणून खास भत्ता दिला गेला पाहिजे. अशा पद्धतीची शिक्षक भरती करून महात्मा फुले एक प्रकारे प्राथमिक शिक्षणाला जीवदान देण्यासाठी व भक्कम करण्यासाठी अशा पद्धतीचा पर्याय विचार सुचवतात याचा वर्तमान स्थितीत आपण विचार केला तर आजच्या शासनाची शैक्षणिक नीती कोणत्या दिशेने चालली आहे? याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. एवढेच नाही तर महात्मा फुले शालेय अभ्यासक्रमात तत्कालीन महत्त्व असलेल्या बाबी म्हणजेच मोडी लीपी, बालबोध, लेखन, वाचन, हिशेबाची माहिती, सर्वसाधारण इतिहास-भूगोल, व्याकरण इत्यादीचे प्राथमिक ज्ञान दिले पाहिजे. सर्व विद्यार्थी शेतकरी पार्श्वभूमी असल्यामुळे विद्यार्थ्यांना शेतीचे प्राथमिक ज्ञान, नीतीमत्ता, आरोग्य इत्यादी विषयक धडे देखील प्राथमिक शिक्षणातून दिले जावेत. असा आग्रह महात्मा फुले धरतात, तेव्हा त्यांच्या शिक्षणविषयक विचारांची उंची निश्चितच लक्षात येते. शहर आणि खेडे असा शैक्षणिक भेद देखील त्यांनी विचारात घेऊन पर्याय व उपाययोजना सुचविल्या आहेत. खेड्यातील शाळेतील अभ्यासक्रम शहराच्या तुलनेत कमी असावा परंतु शिक्षण व्यवहारोपयोगी होण्याच्या दृष्टीने त्यात कोणत्याही प्रकारची उणीव असू नये, असा इशारा महात्मा फुले देतात. तसेच भारत कृषिप्रधान देश असल्यामुळे आणि भारतामध्ये खेड्याचे बाहुल्या असल्यामुळे आदर्श शेतीची लहानशी योजना विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमात समाविष्ट असावी, असाही विचार सुचवितात. हा विचार निश्चितच आजच्या स्किल डेव्हलपमेंट पेक्षा कितीतरी पटीने पुढचा वाटतो.

"महात्मा फुले यांचा विचार हा मानवी स्वातंत्र्याकडे, नवमानवतावादाकडे आणि सामाजिक समतेच्या निर्मितीकडे समाज उभा करणारा होता."[१२] शाळा महाविद्यालय सुरू करणे आणि चालविणे

यासंदर्भात नियंत्रण यंत्रणा व निरीक्षण यंत्रणा कशी असावी? या संदर्भात देखील महात्मा फुले यांनी सुचविलेल्या उपायोजना अतिशय व्यवहारी वाटतात. या यंत्रणेच्या माध्यमातून शाळा महाविद्यालयांची तपासणी आणि तीही वर्षभरात किमान चार वेळेस व्हावी. म्हणजे दर तीन महिन्यानंतर सर्व शाळांची तपासणी व्हावी. तसेच ही तपासणी होत असताना कोणतीही पूर्वसूचना न देता झाली, तर शाळा महाविद्यालयाचा दर्जा व त्यातील सातत्य हे निश्चितच फलदायी असेल. असा दृष्टिकोन महात्मा फुले यांचा होता. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर बक्षिसे आणि शिष्यवृत्ती, व क्षमता पूर्ण शिक्षकासाठी अनुदान आणि प्रोत्साहनपर भत्ता इत्यादींची तरतूद असावी.शाळा महाविद्यालयाचे अनुदान थांबवल्यास शिक्षण क्षेत्राची फार मोठी हानी होईल. असा सणसणीत इशारा देखील महात्मा फुले यांनी दिलेला होता. तसेच शिक्षण व्यवस्था खाजगी संस्थांकडे सोपविण्यास महात्मा फुले यांचा प्रचंड विरोध होता. कारण यातून शिक्षणाचे बाजारीकरण निर्माण होईल, अशी भीती महात्मा फुले यांना वाटत होती. याअंगाने आजच्या शिक्षण व्यवस्थेवर नजर टाकली तर आपल्या लक्षात येईलच की, शिक्षण व्यवस्थेचे आज काय झालेले आहे? आणि हा बाजार कशा पद्धतीने आज फोपावलेला आहे.

एका बाजूला साधारणत: असा उल्लेख केला जातो की, इंग्रजांनी दीडशे वर्षे भारतावर राज्य केले. या दीडशे वर्षाच्या काळात शेवटचे पंच्याहत्तर वर्ष भारतातील येथील शिक्षणाचा पाया निर्माण करण्यात घातले. पुढे १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे पंच्याहत्तर वर्षाच्या काळात शैक्षणिक क्षेत्रात या महात्म्याने लावलेल्या शिक्षण रुपी रोपट्याचे कुठे वेगवेगळया टप्प्यावर वृक्षात रूपांतर होत असल्याचे दिसत असताना, आम्ही दारिद्य्र आणि बेकारीच्या डोक्यावर शस्त्र ठेवून, पुन्हा वेदाचे उदाहरण देऊन आणि स्कील डेवलपमेंट स्वप्न दाखवून या शिक्षणरुपी बहरलेल्या वृक्षाचे संवर्धन व त्यात सुधारणा करण्याचे सोडून आमचे सरकार मात्र यास मुळासकट उखडून टाकण्यात बऱ्यापैकी यशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे.

***संदर्भ***


१. *सरोदे भास्कर, (संपा.),(२०२१),राष्ट्रीय शिक्षणधोरण-२०२० भारतीयांच्या गुलामीचा जाहीरनामा, जीवन प्रकाशन औरंगाबाद, पृ. क्र. ७०*
२. *हिवाळे साहेबराव, (२०१९), महात्मा फुले यांचा संस्कृती संघर्षवाद आणि समाजपुनर्रचना विचार,चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र.२४*
३. *लुलेकर प्रल्हाद जी. (संपा.), (२०१९), सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. क्र. १५६*
४. *कांडगे राम (२००४), महात्मा फुले व्यक्ती व कार्य, राजश्री प्रकाशन चाकण पृ.क्र.१५५-१५६*
५. *कित्ता पृ. क्र.१६६*
६. *कीर धनंजय, मालशे स.ग. आणि इतर (संपा.) (१९९१), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.२६३*
७. *साळुंखे आ. ह. (२०१९), महात्मा फुले आणि शिक्षण, लोकायत प्रकाशन, सातारा, पृ. क्र.२०*
८. *कीर धनंजय, मालशे स.ग. आणि इतर (संपा.) (१९९१), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.६०६*
९. *कित्ता पृ. क्र. ५७६*
१०. *माळी मा. गो. (संपा.), (२०११), सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, पृ. क्र.२४*
११. *भोळे भास्कर लक्ष्मण, (२०१७), भारतीय साहित्याचे निर्माते महात्मा जोतीराव फुले, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, पृ. क्र.५*
१२. *कल्याणकर बा. ह. (१९९५), महात्मा फुले विचार आणि संदर्भ, प्रकाशक सुनिता जी. औरंगाबाद, पृ- ५.*

# बळीराजा चेतना अभियानाचे शेतकऱ्यांच्या जीवनावर व उपजीविकेवर झालेले परिणाम

**प्रा. डॉ. संपत काळे,** *टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.*

***सारांश:*** *राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य सरकार बरेच प्रयत्न करीत आहे. विदर्भ आणि मराठवाडा या विभागांत गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या दोन्ही विभागातील पीक पद्धती जरी वेगवेगळी असली तरी शेतकरी त्रस्त होण्याची कारणे व परिणाम निरनिराळे आहेत. फक्त नापिकी किंवा कर्जबाजरीपणा हेच कारण नसून त्यापाठीमागे समाजशास्त्रीय कारणेही आहेत. समाजातील, कुटुंबातील वीण विस्कटणे, संयुक्त कुटुंबाचे विभक्त कुटुंबात परिवर्तन होणे, नातेवाइकांचे वेळोवेळी सहकार्य न लाभणे तसेच आजारपणामुळे देखील वैफल्य निर्माण होऊन शेतकरी आत्महत्या होत आहेत. मराठा कुटुंबाचे वर्चस्व असले तरी सर्वाधिक शेतकरी आत्महत्या मराठा कुटुंबातील झाल्याचे दिसून येत आहे. विवाहाच्या वयात देखील मोठी वाढ झाली आहे. वधूला शेतकरी 'वर' नको अशी अवस्था निर्माण होताना दिसत आहे, व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक कलह आणि सर्वात महत्वाचे म्हणजे निसर्गाचा लहरीपणा वाढल्यामुळे जबर धक्का, वैफल्य, उपजीविका धोक्यात येणे यासोबतच आरोग्यावरील खर्चात प्रचंड वाढ, हतबलता आणि त्रस्तपणा वाढला आहे. २०२१ मध्ये आपल्या देशात १,६४,०३३ व्यक्तींनी आत्महत्या केली. त्यापैकी १०,८८१ शेतकरी आत्महत्या आहेत. ५,३१८ शेतकरी जमीन कसणारे व ५,५६३ हे शेतमजूर आहेत. सर्वाधिक आत्महत्या कौटुंबिक कलहातून झाल्या असून त्यानंतर आजारपण हे महत्त्वाचे कारण समोर आले आहे.*

*बळीराजा चेतना अभियानाची आर्थिक मदत योग्य लाभार्थी निवड करून तसेच निवडीचे निकष किंवा निर्देशांक ठरवून देणे खूप महत्वाचे आहे. त्यासाठी संशोधन, जाणीवजागृती मोहीम किंवा अभियान योग्य पद्धतीने राबविणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांवरील ताणाची कारणे दूर करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करणे, पाणी वापर संस्था तयार करणे, शेतकरी गटांची निर्मिती करण्यासाठी तसंच बिनव्याजी कर्जाची व्यवस्था करणे खूप महत्वाचे आहे. आरोग्य सेवांचे होणारे खासगीकरण थांबवून सरकारी आरोग्य व्यवस्था बळकट करण्यावर जोर दिला पाहिजे. हे अभियान खूप यशस्वी होऊ शकले नाही, कारण योग्य लाभार्थीची निवड न झाल्यामुळे अभियान राबविण्यात अडचणी आल्या. जिल्हयातील शेतकरी आत्महत्या शून्य टक्क्यावर आणण्यासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे पण त्याचे हवे तसे परिणाम दिसून येत नाहीत. बळीराजा चेतना अभियान गावोगावी खऱ्या अर्थाने जर पोहोचले असते तर किमान जाणीव जागृती व शेतकऱ्यांचा आत्मविश्वास तरी वाढेल व कदाचित शेतकरी आत्महत्या काही प्रमाणात थांबू शकतील. पण त्यासाठी निरंतर प्रयत्न हवेत. सरकार जसे बदलते तसे योजनेचे होऊ नये.*

**प्रस्तावना:** पॅकेजवर जगणारे विभाग म्हणून विदर्भ आणि मराठवाडयाची ओळख निर्माण होत आहे. दुष्काळ, दारिद्रय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कुपोषण, बेरोजगारी, विषमता, गरिबी आणि भूक हे शब्द जणू पाचवीलाच पुजलेले आहेत असे सर्वत्र पसरविले जात आहे. नैसर्गिक आणि मानवनिर्मित समस्यांबाबत लोकांची मानसिकता सरकार मायबाप यापुढे सरकलेली नाही. किल्लारीच्या भूकंपाला एकोणतीस वर्षे झाल्यानंतरही लोकांना एखादे पॅकेज किंवा योजना मिळावी हीच मानसिकता तयार झाली आहे. जे काही करावे ते सरकारनेच करावे ही जनतेची मानसिकता विकासाला बाधक ठरत आहे. या सर्व प्रश्नांची चर्चा देशभर होताना दिसते पण त्या बाबतीत ठोस उपाययोजना मात्र होताना दिसत नाहीत. कुपोषण, दलितांवरील वाढते अन्याय-अत्याचार आणि नक्षलवादाचा वाढता प्रभाव हे प्रश्न एकीकडे तर दुसरीकडे विदर्भ मराठवाडयतील सिंचनाचे अपूर्ण प्रकल्प, पर्यायाने तीव्र पाणी टंचाई, विजेच्या टंचाईने सर्वसामान्यांचं कंबरडं मोडलं आहे.

विदर्भातील अकरा जिल्हे आणि मराठवाडयातील आठ जिल्हे हे नेहमीच मागासलेपणाचे बळी ठरले आहेत. दोन्ही विभागातून किती वेळा मुख्यमंत्री झाले आणि त्यांना आपापल्या विभागासाठी पॅकेज आणता आले व ते कितपत टिकविता आले हा प्रश्न महत्वाचा आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळासाठी हजारो कोटी रूपये उभे होऊ शकतात मग या दोन विभागाच्या विकासासाठी का नाही होऊ शकत? दोन हजार कोटींचा प्रकल्प वीस हजार कोटींवर जातो याला जबाबदार कोण? दर वर्षी एक अधिवेशन नागपूरला घेऊन विदर्भाला काही हजार कोटी देउन खूष करण्यात येते त्याचप्रमाणे औरंगाबादेत काही बैठका घेऊन खेळवत ठेवले जात आहे. आर्थिक मदत आणि न्याय्य विकासासाठी ठोस निधी देण्यात आलेला नाही. अस्मानी संकटांचे बळी ठरलेले विभाग आता सुलतानी संकटांमुळे अधिक त्रस्त झाले आहेत.

१९९६ ते २००७ या काळात शेतीवरील अरिष्टामुळे देशभरात दीड लाख शेतकऱ्यांनी मरण पत्करले आहे. तर अलिकडे आपल्या राज्यात सुमारे ३०,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्यापैकी ७० टक्के शेतकरी हे विदर्भाच्या अकरा जिल्ह्यातील होते. त्यातही सर्वाधिक आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात झाल्या आहेत.

२०२१ मध्ये आपल्या देशात १,६४,०३३ व्यक्तींनी आत्महत्या केली. त्यापैकी १०,८८१ शेतकरी आत्महत्या आहेत. ५,३१८ शेतकरी जमीन कसणारे व ५,५६३ हे शेतमजूर आहेत. सर्वाधिक आत्महत्या कौटुंबिक कलहातून झाल्या असून त्यानंतर आजारपण हे महत्त्वाचे कारण समोर आले आहे.

आत्महत्यांची कारणं पाहिली असता असे समजते की, नापिकी, सिंचनाच्या सुविधांचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, सावकाराकडून प्रचंड पिळवणूक आणि चिकनगुनियाची साथ यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये भर पडली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानसन्मान, प्रतिष्ठा आणि उत्पादनाचे साधनच हातून निघून जात असल्याने आत्महत्या होताना दिसतात. सोयाबिन आणि कापूस ही विदर्भातील प्रमुख पिके आहेत. मालाला चांगला हमी भाव मिळत नाही तसेच लागवड खर्च जास्त आणि उत्पादन कमी हा विरोधाभास शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे सीमांत शेतकऱ्याचे अधिकाधिक सीमांतीकरण वाढत आहे.

देशाच्या एकूण धरणांपैकी जवळपास ४० टक्के धरणं एकट्या महाराष्ट्रात आहेत. तरीही आपण सिंचनाच्या बाबतीत १८-२० टक्के च्या पुढे जाऊ शकलेलो नाही. ज्यांना नव्याने जमिनी मिळाल्या आहेत त्या जमिनींना पाणी कसे मिळेल हा भविष्यामध्ये कळीचा मुद्दा असणार आहे. वंचित घटकांना पाणी मिळणे तर दुरापास्त आहे असेच म्हणावे लागेल. शहरी आणि ग्रामीण भागातील पाणी वाटपातील विषमता प्रचंड प्रमाणात वाढत आहे. अशा प्रक्रियेतून दलित, आदिवासी आणि भटक्या विमुक्त समूहांचे अधिकच सीमांतीकरण होत आहे. (संपत काळे, समाजशास्त्र संशोधन पत्रिका २०२१)

मराठवाड्यातील गायरान जमिनीचा प्रश्न गेली अनेक वर्ष भिजत ठेवला आहे. गायरान जमीन दलित भूमिहीनांना मिळावी यासाठी आंदोलन सुरू आहे पण शासनाने इच्छाशक्ती दाखवली तरच हा प्रश्न धसास लागेल असे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० साली गायरान जमिनी दलितांनी ताब्यात घेण्याविषयीची भूमिका माणगावच्या परिषदेत केली होती. त्याही पुढे जमिनीचे राष्ट्रीयीकरण करून भूमीहीनांना किमान जमीन मिळेल असाही विचार त्यांनी मांडला होता. त्यानंतर कर्मवीर दादासाहेब गायकवाडांनी 'कसेल त्याची जमीन, पण नसेल त्याचं काय' हा प्रश्न उभा केला आणि संपूर्ण देशभर जमीन हक्कासाठी भूमिहीनांची जेलभरो आंदोलने झाली. सध्याही मराठवाड्यात जमीन अधिकार आंदोलन आणि मानवी हक्क अभियान शासकीय पड आणि गायरान जमिनीवरील उपजीविका शेती नियमानुकूल करण्याबाबत २८ डिसेंबर १९९१च्या शासन निर्णयाच्या आधारावर लढा देत आहे. काही प्रकरणे नियमानुकूल करण्यात आली पण शासनाने अजूनही मोठ्या प्रमाणवर दलितांना जमिनी दिल्या नाहीत. नियमानुकूल करण्यासाठीचा खर्च शासनाने उचलला पाहिजे. समानता आणि सामाजिक न्यायासाठी शासनाने अर्थसहाय्य केले पाहिजे. गरिबांचे जीवनाधार मजबूत करण्यासाठी संसाधनाचे समन्यायी वाटप करणे रास्त ठरेल.

गायरान जमिनींच्या प्रकरणामुळे दलितांवरील अन्यायात भरच पडली आहे. स्वातंत्र्याच्या साठ वर्षानंतरही 'दलित आपले सेवक आहेत', 'त्यांना जमीन जुमला कशाला', 'आमच्या शेतावर काम कोण करणार', 'आमची गुरंढोरं कोण सांभाळणार', 'दलित म्हणजे केवळ रोजगार हमीवर राबण्यासाठी असणारी फौज' म्हणूनही मराठवाड्यातील दलितांकडे उत्पादनांची साधने येऊ नयेत असा कावा दलितेतर समाजाकडून खेळला जात आहे. ज्यांना जमिनी मंजूर झाल्या त्यांना शेतीच्या उत्पादकतेसाठी रोहयोतून खास प्रयत्नांची आवश्यकता आहे. रोजगार हमीचा पैसा गायरानधारकाच्या विकास कामासाठी वापरला गेला तर जमिनीची सुफलता वाढेल आणि पर्यायाने राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेल.

**बळीराजा चेतना अभियानाचे उद्देश:** बळीराजा चेतना अभियांचे शेतकऱ्यावर नेमके काय परिणाम झाले हे जाणून घेण्यासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्थेमार्फत (टिस) २०१७ व २०१८ साली उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये १०४३ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये काहीतरी कारणाने त्रस्त असणाऱ्या कुटुंबांची निवड करण्यात आली होती पण त्यांनी कोणीही आत्महत्या केलेली नाही व इतर हतबल शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत असे निदर्शनास आले आहे.

हतबल शेकऱ्यांचे मनोबल उंचावणे, त्यांच्यामध्ये जगण्याची उमेद निर्माण करणे, शेतकरीं बांधवासाठी जगण्याचे साधन निर्माण करणे, मनोबल उंचवेल असे साहित्य तयार करणे, विविध मार्गदर्शन कार्येक्रम तयार करणे, विविध मनोरंजनाच्या माध्यमातून त्यांचे मनोरंजन करणे व आर्थिक सहाय्य पुरवणे. योगयवेळी आर्थिक सहाय्य मिळाल्यामुळे अनेक कुटुंबे हातबलतेतून बाहेर पडू शकली. बळिराजाला धीर देण्यासाठी विविध मेळावे भरवणे, पत्रकार सोबत चर्चा घडहून आणणे.

**संशोधन पद्धती :** गुणात्मक आणि संख्यात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. तसेच नमुना निवड पद्धती वापरली, शेतकरी गटचर्चा, सहभागी निरीक्षण, प्राथमिक आणि दुय्यम स्वरूपाची माहिती विचारात घेऊन समाजशास्त्रीय विश्लेषण केले आहे. अभ्यासाची चौकट ही इमाइल दुर्खाइमच्या आत्महत्येच्या सिद्धांतावर आधारित आहे. टोकाचे एकटेपण व विस्कटलेली समाजाची वीण तसेच आपल्याच नतेवाइकांनी मदत न करणे आणि विभक्त कुटुंब पद्धती आत्महत्येस कारणीभूत ठरत आहे. या अभ्यासासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील ८ तालुके, ७७ गावे, १०,१३६

त्रस्त कुटुंबापैकी १,०४३ त्रस्त असलेली कुटुंबे निवडण्यात आली, तसेच ७५ शेतकरी गट व ७७ गावातील सरपंच व उपसरपंचांच्या मुलाखती घेऊन करण्यात आला. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे तत्कालीन उपसंचालक प्रा. अब्दुल शाबान, प्रा. बिपिन बिहारी दास यांचे मार्गदर्शन आणि आमच्या संस्थेचे सामाजिक कार्येकर्ते व माहिती संकलन करण्यासाठी कार्यक्षम चमूने काम केले आहे. हा लेखही या अभ्यासावर व माझ्या दुष्काळ, पाणी, मजुरांचे स्थलांतर, उपजीविका व शेतकऱ्यांशी चर्चा व सहभागी निरीक्षणावर आधारित आहे. दुष्काळग्रस्त गावांना भेटी, मदत, पुनर्वसन, दलित, आदिवासी व पारधी समाजाला वेळोवेळी मदत व अभ्यास या वास्तवाबर कृती संशोधन व कृती- समाज शिक्षण या प्रेरणेतून हा लेख लिहीत आहे.

**उस्मानाबाद जिल्हयाविषयी:** उस्मानाबाद जिल्हा हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागामध्ये आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात कळंब, तुळजापुर, वाशी, भूम, परांडा, उस्मानाबाद, लोहारा व उमरगा असे एकुण ८ तालुके आहेत. या ८ तालुक्याअंतर्गत एकूण ७३४ गावे आहेत. जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ हे एकूण ७,६४,३४५.४५ हेक्टर एवढे आहे. एकुण क्षेत्रफळाच्या ९०.६४ टक्के क्षेत्रफळ (६९२८०२ हे.) हे लागवड करण्यायोग्य आहे. तसेच जिल्ह्यातील वाशी तालुक्यात लागवड करण्यायोग्य क्षेत्रफळाचे प्रमाण सर्वाधिक ९३.९७ टक्के आहे, तर लोहारा तालुक्यात सर्वात कमी ८७.२३ टक्के. तसेच लागवड करण्यायोग्य क्षेत्रफळाच्या फक्त १३.२८ टक्के क्षेत्रफळ हे सिंचनाखाली आहे. महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांमध्ये, उस्मानाबाद जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने २१ व्या नंबर वर येतो तर लोकसंख्या च्या दृष्टीने २६ व्या नंबर वर येतो.

मांजरा व तिच्या उपनद्या तेरणा, तावरजा, घरना या उस्मानाबाद जिल्ह्यातील सिंचनाच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाच्या मुख्य नद्या आहेत. जिल्ह्यात सरासरी पाऊस ८०० मिमी एवढा होतो. तसेच जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ७८.४४ टक्के इतके आहे त्यात पुरुष साक्षरता ८५.८४ टक्के तर महिला साक्षरता ७०.५१ टक्के आहे. जिल्ह्यामध्ये एकूण लोकसंख्येतील १६ टक्के म्हणजेच २ लाख ६५ हजार १८४ एवढी अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे तर २.१७ टक्के एवढी म्हणजेच ३६,०३९ एवढी अनुसुचित जमातीची लोकसंख्या आहे. जिल्ह्यात एकुण ७,७३,९१६ कामगार आहेत. त्यामध्ये ४२.३४ टक्के मुख्य कामगार, ४.३५ टक्के सीमांत कामगार तर ५३.३१ टक्के लोकांची नोंद कामगार म्हणून केलेली नाही. तसेच एकूण कामगार लोकसंख्येतील २,९७,३६१ शेतकरी, तर २,९९,५२५ शेतमजूर आहेत, १९८३१ हे घरगुती उद्योगांमध्ये काम करणारे तर १,५७,१९९ जणांची नोंद कामगार म्हणून केलेली नाही.

महाराष्ट्रातील एक अतिशय मागास जिल्हा हा उस्मानाबाद होय कारण तिथे उपजीविकेची शाश्वती नसणे, रोजगाराच्या आपुऱ्या सुविधा व नेहमीचाच दुष्काळ. जिल्हयाच्या एकूण क्षेत्रफळापैकी केवळ १७ टक्के जमीन सिंचनाखाली आहे. कोरडवाहू शेती हेच मुख्य जगण्याचे साधन आहे. भूजल उपसा प्रचंड वाढल्यामुळे पाणी पातळी ७०० फुटावर गेली आहे. कूपनलिका घेण्याची स्पर्धा मराठवाड्यात दिसून येते. यामुळेच अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. २०११ ते २०१७ काळात ५९७ शेतकऱ्यानी आत्महत्या केल्या आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक आत्महत्या मराठा समाजातील आहेत. २०११ ते २०१७ मध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी ६५ टक्के मराठा आहेत. त्याखालोखाल धनगर व लिंगायत समाजातील आत्महत्या झाल्याचे समजले.

उसासारख्या बागायत पिकासाठी विहिरी, विंधन विहिरी, पाईपलाइन, सिंचन सुविधा उभ्या करण्यासाठी बहुतेक शेतकऱ्याना खाजगी सावकारकडून कर्ज घ्यावे लागते. काही वेळा जमीन गहाण ठेऊन कर्ज घेतात व शेवटी ते कर्ज फेडू शकले नाहीत तर आत्महत्येचा मार्ग पत्करतात.

शेतात चांगले उत्पन्न, शहरी सुविधा ग्रामीण भागात हव्यात, पेयजल, उत्तम आरोग्य सुविधा तसेच दर्जेदार शिक्षण या माफक पायाभूत सुविधा मिळाव्यात म्हणून शेतकरी दिवसरात्र कष्ट करून आपले पोट भरीत आहे. वाढलेल्या अपेक्षांचे ओझे न झेपल्यामुळेही आत्महत्या होत आहेत. उस्मानाबाद जिल्हयाची ओळख नेहमीच मराठवड्यातील एक मागास जिल्हा म्हणून राहिलेली आहे. अजूनही मोठ्या प्रमाणावर लोकांची उपजीविका व प्राथमिक व्यवसाय शेती व पशुपालन आहे. अतिशय तोटके औद्योगीकरण, दर्जेदार शिक्षणाचा अभाव आणि सतत वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्ती त्यामध्ये दुष्काळ तर कधी काही भागात पूर, गारपीट, या आणि अश्या प्रकारच्या समस्यांचा सामना लोकाना करावा लागतो.

**हतबल, त्रस्त शेतकरी आणि शेतीवर झालेले परिणाम:** बळीराजा चेतना अभियानामुळे खूप मोठ्या आशा निर्माण करण्यात आल्या व काही प्रमाणात कामेसुद्धा झाली. सदर अभ्यासाच्या माध्यमातून पुढील बाबी प्रकर्षाने समोर आल्या आहेत. पेरणीसाठी योग्य वेळी आर्थिक मदत मिळाल्यामुळे उत्पन्नात सुमारे २५ टक्के भर पडली होती. पण आणखी एक कारण महत्वाचे म्हणजे योग्य वेळी पाऊसही पडला होता. सर्वेक्षणातील एकूण २७ टक्के शेतकऱ्यांनी बी- बियाण्याचा वापर कण्यासाठी मदत घेतली होती. जास्तीत जास्त ३०० शेतकरी कुटुंबांनी खरीप व रब्बी पिकासाठी आर्थिक मदतीचा वापर केल्याचे समजते. आठ ते दहा कुटुंबांनी धरणातील गाळ काढून आपल्या शेतात टाकून जमीन सुपीक केल्याचेही समोर आले आहे त्यामुळे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेला अधिक बळ देण्याची गरज असल्याचे दिसते. जास्तीत जास्त ८० टक्के कुटुंबाना योग्य

वेळी आर्थिक मदत मिळाल्यामुळे त्यांची हतबलता कमी झाल्याचे तसेच मानसिक त्रास कमी झाल्याने नैराश्य कमी होण्यास मदत झाली. अनेक कुटुंबांचे स्थलांतर झाले असते पण आर्थिक मदत झाल्यामुळे ही कुटुंबे तग धरून गावातच राहू शकली. एकंदरीत जे त्रस्त कुटुंब होते त्यामध्ये आत्महत्या दिसून आल्या नाहीत.

विविध आजार व सर्वसाधारण आरोग्याची स्थिती पाहिली असता जवळपास ३५ टक्के कुटुंबामध्ये एक तरी व्यक्ती आजारी असल्याचे समजते. शारीरिक अपंगत्व, मानसिक आरोग्य, मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, दमा आणि विविध आजार असल्याचे समोर आले व बहुतेक २६ टक्के कुटुंबांनी मिळालेल्या मदतीचा वापर औषधोपचारासाठी केला आहे. सर्वसाधारण औषधांसाठी थोडी मदत झाली पण दीर्घकालीन आजारासाठीचे ताण तणाव लोकांमध्ये दिसून आले. अन्न, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सेवा मिळणे खूप महत्वाचे आहे. फिरते आर्थिक मदत केंद्र निर्माण केल्यामुळे जवळपास ३७ टक्के उत्तरदात्यांनी समाधान व्यक्त केले आहे. जास्तीत जास्त ५७ टक्के लाभार्थी कुटुंबाना ३०० ते ५०० रूपयांची मदत मिळाली आहे.

शेतकरी गटाना आर्थिक मदत मिळाल्यामुळे बहुतेक गटांनी उद्योग सुरू केले आहेत पण सर्वच यशस्वी झाले असे नाही. शेळीपालन, कुक्कुटपालन व कृषी सेवा केंद्र उभे करून व्यवसाय थाटले आहेत. जे गट अडचणीत आले त्याची कारणे पहिली असता, बऱ्याच लोकांकडे योग्य कौशल्याचा अभाव, मार्गदर्शनाचा अभाव, विविध आजारपणाची माहिती नसणे तसेच आपुऱ्या सुविधांमुळेही बरेच गट अपयशी ठरले. जवळपास ७५ गटाचे सर्वेक्षण करण्यात आले त्यापैकी फक्त चार गट महिलांचे आहेत. विशेष म्हणजे ते सर्व व्यवस्थित सुरू आहेत. या पथदर्शी प्रकल्पात ५० टक्के रक्कम सरकारने दिली तर ५० टक्के पैसे शेतकऱ्यांनी उभे केले.

**निष्कर्ष आणि धोरणात्मक शिफारशी :** बळीराजा चेतना अभियान दीर्घकालीन राबवले तर त्याचे परिणाम चांगले असू शकतील असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या सर्वेक्षणातून असे समोर आले की विभक्त कुटुंबात राहणारी मंडळी सर्वात असुरक्षित आहेत. आत्महत्या केलेल्या कुटुंबापैकी ७५ टक्के कुटुंब विभक्त कुटुंबातील होती. एक खूप महत्त्वाची गोष्ट समोर आली की गटात व सामूहिक शेती किंवा व्यवसाय करणाऱ्यामध्ये तणाव किंवा हतबलता कमी जाणवली. त्यामुळे गटांना अधिक सहकार्य करण्याचं धोरण शासनाने राबवायला हवं. शेतकरी उत्पादन गट किंवा कंपनी स्थापन करून उपजीविका बळकट कण्यासाठी आर्थिक सहाय्यसुद्धा आवश्यक आहे. आधुनिक माहिती व प्रशिक्षण, योग्य तंत्रज्ञान मिळणे, शेतीपूरक व्यवसायाला चालना मिळणे महत्वाचे आहे. गावापतळीवर शेतकरी सक्षम गट तयार करणे, समुपदेशन केंद्र सुरू करणे, महाग औषधांचा खर्च झेपत नसल्याने औषधोपचारांचा सरकारकडून परतावा मिळाला पाहिजे असे लोकांचे म्हणणे आहे. पंचायती राज अजून सक्षम करून ग्रामपंचयातीना लक्ष्य करून आत्महत्या रोखण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार दिले जावेत जेणेकरून गावामध्ये सामाजिक सलोखा, एकमेकांना सहाय्य करण्याची प्रवृत्ती जागृत होईल.

गरिबाभिमुख धोरणे, सर्वसमावेशक योजना व त्यामध्ये सर्व समाज घटकांचा साकल्याने विचार करावा लागेल. आपल्या कोणत्याही घटकाला आपण विकास प्रक्रियेतून बाहेर फेकले गेलो आहोत अशी परात्म भावना जाणवणार नाही यासाठी सजगपणे काम करावे लागेल. समाजातल्या विशेषतः वंचित, दुर्बल घटकांच्या मानवी हक्कांचं उल्लंघन होणार नाही यासाठी दक्ष समाज आणि कर्तव्यदक्ष शासन तितकेच आवश्यक आहे. वंचितांच्या नजरेतून विकासाच्या संकल्पना पुढे येतील यासाठी शासनाने संवादी पद्धतीने राज्याची धोरणे निर्माण होणे आवश्यक आहे. तरच जगाच्या पाठीवरचा आपला सर्वात मोठा लोकशाही देश समृद्ध, संपन्न आणि आनंदी लोकांचा देश बनू शकेल.

***संदर्भ:***

1. *Census of India (2011), District Census Handbook of Osmanabad, Directorate of Census operations of Maharashtra.*
2. *https://ncrb.gov.in/sites/default/files/ADSI-2021/adsi2021_Chapter-2-Suicides.pdf, accessed on 15 December 2022 at 10.00 am.*
3. *Kale Sampat, (December 2021). Maharashtratil Sahabhagi Sinchanache Punurtjeevan, a Sociological analysis, Marathi Samajshtra Sanshodhan Patrika, Maharashtra.*
4. *Shaban Abdul. (February 2018) Farmers' Distress and Impacts of Baliraja Chetana Abhiyan, Osmanabad District of Maharashtra, Tata Institute of Social Sciences, Tuljapur Campus.*

# महिला उद्योजकता चळवळ आणि महिला सक्षमीकरण

***सम्राट कसबे,*** *संशोधक विद्यार्थी, टाटा समाज विज्ञान संस्था, तुळजापूर* Email-samkasbe2828@gmail.com

***सारांश :*** *सदर अभ्यास हा महिला उद्योजकता व महिला सक्षमीकरण यांवर आधारित आहे. अभ्यास हा मुख्यतः उस्मानाबाद जिल्ह्यातील परिस्थितीवर विशेष लक्ष केंद्रित करतो. यामध्ये उद्योजकते मध्ये महिलांचा सहभाग वाढवा म्हणुन शासन व स्वयंसेवी संस्था कशा प्रकारे प्रयत्न करत आहेत याचे परीक्षण केले आहे. तसेच उद्योग- व्यवसाय सुरु केल्यामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या आयुष्यात कशा प्रकारे परिवर्तन होत आहे व उद्योगांमध्ये महिलांना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते हे या अभ्यासाच्या माध्यमातुन दर्शविण्यात आले आहे. सदरील विषयावर सखोल माहिती प्राप्त करण्यासाठी जिल्ह्यातील शासनाचे उद्योजकता संबंधित विभाग अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे जाणकार प्रतिनिधी व महिला उद्योजाकांसोबत भेटी घेऊन चर्चा करण्यात आली. अभ्यासाच्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, राज्यामध्ये महिलांनी उद्योजकते मध्ये सहभागी व्हावे व स्वावलंबी बनावे यासाठी एक मोठी चळवळ उभा राहिली आहे. शासन तसेच स्वयंसेवी संस्था एकमेकांसोबत समन्वय साधुन महिलांच्या विकासासाठी नव-नवीन योजना आखत आहेत. उद्योजकतेमुळे शाश्वत रोजगार उपलब्ध होण्यासोबतच महिलांच्या जीवनात अनेक सकारात्मक बदल होत आहेत जसे की, आत्मविश्वास वाढणे, कुटुंबातील निर्णय प्रक्रियेमध्ये समाविष्टता, व्यावहारिक ज्ञान वाढणे, संवाद कौशल्य सुधारणे, ई. या अभ्यासातुन असा निष्कर्ष निघतो की, स्वयंसेवी संस्थांमार्फत जिल्ह्यामध्ये महिलांना उद्योगात आणण्यासाठी एक प्रभावी चळवळ उभा राहिली आहे व उद्योजकते मधुन महिलांचे सक्षमीकरण होत आहे.*

**प्रस्तावना :** उद्योजक हा निर्णय घेणारा, दिशा देणारा, विकासाचा ध्यास घेणारा असतो. "नैसर्गिक साधनसामग्री, भौतिक साधनसामग्री आणि मनुष्यबळ या तीन गोष्टींना एकत्र आणून कोणत्या वस्तूंची निर्मिती करता येईल याची शक्यता पडताळून पाहणारा समाजाचा गतिशील घटक म्हणजे उद्योजक होय" (अंकुश, २०२०). सध्याच्या काळामध्ये दुलर्क्षित राहिलेला, परंतु तेवढाच महत्वपूर्ण असलेला मनुष्यबळ क्षेत्रातला विषय म्हणजे उद्योजकता होय. देशामधील ग्रामीण अर्थव्यवस्था ही मुख्यतः शेतीवर आधारित आहे. मोठ्या प्रमाणात लोकांचा मुख्य रोजगार शेतीवर अवलंबुन आहे. ग्रामीण भागात शेती ही हंगामी स्वरुपात चालते त्यामुळे शेतीवर अवलंबुन असणाऱ्यांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध नसतो. या परिस्थितीत शेतकऱ्याना अनेकदा बेरोजगारी सारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्येवर पर्याय म्हणुन पुर्णपणे शेतीवर अवलंबुन न राहता, शेतीसोबतच शेतीपुरक किंवा इतर व्यवसाय करणे अधिक सोयीस्कर ठरते. यामुळे अचानकपणे येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे जर शेतीतील पिकांना हानी होऊन पीक उध्वस्त आले तर पूर्णपणे बेरोजगार न बनता शेतकरी आपल्या जोडधंद्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर आपण आपला उदरनिर्वाह करू शकतात.

पूर्वीपासुनच चालत आलेल्या आपल्या देशातील पुरुषसत्ताकता, भेदभाव, अंधश्रद्धा आणि भूमिकेच्या रूढीबद्धतेमुळे महिलांची क्षमता दडपली जात आहे. ही सर्व महिलांचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान कमी होण्यामागची कारणे होय यामुळे ते कष्ट, अवलंबित्व आणि निराशेचे जीवन जगतात. पण आज एकविसाव्या शतकात आपण सर्वजण जाणतो की प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला अग्रेसर आहेत. महिलांमध्ये असलेल्या कला-गुणांना व क्षमतांना फक्त एक संधी मिळण्याची गरज असते. ती संधी मिळाली की त्या स्वतःला सर्व क्षेत्रात सिद्ध करून दाखवत आहेत. महिलांनी स्वावलंबही व्हावे म्हणुन सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी जास्त प्रयत्नाची गरज आहे. सद्यस्थितीत आपण बघतो की महिला शिक्षण व नोकरी या क्षेत्रात पुढे आलेल्या दिसत आहेत परंतु ग्रामीण भागातील महिला अजुनही या संधींपासून खूप दूर आहेत. ग्रामीण भागातील लोकसंख्या मुख्यतः शेतीवर अवलंबुन असल्यामुळे, जास्तीत जास्त महिला या शेती व शेती आधारित क्रियांमध्ये व्यस्त असतात.

खरं तर उद्योग क्षेत्रात महिला पूर्वीपासूनच होत्या, जसे की नक्षीकाम करणे, बांगड्यांचा व्यवसाय करणे, फेऱ्या मारून भांडी विकणे, कुक्कुटपालन करणे, भाजीपाला विकणे असे पारंपारिक उद्योग महिला स्वयंरोजगार प्राप्तीसाठी करत असत. घरातील कामांमुळे इच्छा व क्षमता असताना देखील महिला उद्योग-व्यवसाय करू शकत नसत. पण पुढे १९९० च्या दशकात महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकास करण्याच्या दृष्टीकोनातून बचत गटांची चळवळ चालु झाली. बचत गटाच्या माध्यमातून महिला एकत्र येऊन भांडवल उभे

करू लागल्या व उभारलेल्या भांडवलामधुन लहान मोठे उद्योग करू लागल्या. आता हळूहळू महिला आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून शिवणकाम, ब्युटी पार्लर, कुक्कुट पालन, पापड बनविणे, मसाले बनविणे यांसारखे अनेक सुक्ष्म उद्योग करत आहेत.

ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी, त्यांना सक्षम बनवण्यासाठी सर्वात महत्वाची भूमिका निभावतो तो म्हणजे रोजगार किंवा उद्योग. जर महिला स्वतः रोजगार किंवा उद्योग करत असतील तर त्यामधून येणाऱ्या उत्पन्नातून ती आपल्या कुटुंबाच्या अत्यावश्यक गरजा भागवून आपल्या कुटुंबाची प्रगती करू शकतात. जर महिलांना सक्षम करायचे असेल तर त्यांना आर्थिक स्वातंत्र्य द्यावे लागेल तसेच स्वतःची काळजी घेण्यासाठी आणि परिवारासाठी स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना द्यावे लागेल (पांढरपट्टे, २०२१). जर महिला उत्पन्न कमावणाऱ्या असतील तर त्यांना स्वतःच्या घरात तसेच समाजात मान सन्मान मिळतो. घरातील प्रत्येक निर्णय प्रक्रियेमध्ये तिला समाविष्ट करून घेतले जाते. घर आणि समाजात स्त्रीची बहुआयामी भूमिका आहे; तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळाले तर कुटुंबासाठी अनुकूल निर्णय घेण्यास आत्मविश्वास वाढेल (साखलकर, २०१५).

अधिकाधिक महिलांना त्यांच्या सीमांमधून बाहेर पडावे लागेल आणि त्यांनी देशातील उद्योजगतेचा एक भाग बनणे आवश्यक आहे कारण उद्योजकतेनमुळे त्यांच्या वैयक्तिक समस्याचे निराकरण होऊ शकते आणि आपल्या देशाला एक नवीन उंची गाठण्यासाठी मदत होईल (मालती, तनशेट्टे, & कोडगे, २०१९). महिलांना गाव स्तरावर रोजगार उपलब्ध व्हावा व त्यांनी स्वतःच्या पायावर उभा राहुन स्वतः सोबतच कुटुंबाची व समाजाची प्रगती करावी म्हणुन मागील दशकात राज्यभरात महिला उद्योजकता चळवळ उभी राहिली आहे. यामध्ये महिलांना गावस्तरावर विविध प्रकारचे व्यवसाय करण्यासाठी शासन व इतर स्वयंसेवी संस्था सतत प्रोत्साहित करत आहेत. महिलांना उद्योग उभा करण्यास योग्य ते मार्गदर्शन करणे, त्यासाठी लागणारे भांडवल वेगवेगळ्या योजनेमार्फत किंवा बँकांकडून कर्ज मिळवुन देणे, व्यवसाय व्यवस्थित चालावे यासाठी उद्योजकता प्रशिक्षण देणे, इत्यादी प्रकारची मदत शासन व इतर स्वयंसेवी संस्था करत आहेत. महिला उद्योजकता चळवळ ही ग्रामीण भागात पोहचली पाहिजे, तेव्हाच प्रत्येक घरातील होतकरू महिलांना आपल्या क्षमता व कौशल्यानुसार व्यवसाय सुरु करण्यास मोठ्या प्रमाणात पाठबळ मिळेल. तसेच महिलांमार्फत विकसित केले जाणारे व्यवसाय हे देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्याचप्रमाणे या महिला स्वतःचा विकास करण्यासोबतच आपल्या परिसरातील इतर महिलांना सक्षम आणि स्वावलंबी बनवण्यास नक्कीच हातभार लावू शकतात. या लेखामध्ये महिला उद्योजकता विकास व्हावा म्हणुन शासन तसेच स्वयंसहाय्यता संस्थांमार्फत कशा प्रकारे प्रयत्न सुरु आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर उद्योग करण्यामध्ये महिलांना कोण-कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते व उद्योजकतेमधून महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया कशी सक्रीय आहे याचा अभ्यास केला आहे.

**उस्मानाबाद जिल्ह्यात महिला उद्योजकता विकासामध्ये शासन व सामाजिक संस्थांचे योगदान :** उस्मानाबाद जिल्ह्याची एकुण लोकसंख्या १६,५७,५७६ असुन यातील महिलांची लोकसंख्या ७,८१,०५७ एवढी आहे. उस्मानाबाद जिल्ह्याची शहरी लोकसंख्या २,८१,०५७ आहे तर ग्रामीण लोकसंख्या ही १३,७६,५१९ एवढी आहे. तसेच जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ हे ७,५६९ चौ.किमी आहे. जिल्ह्यात एकुण ८ तालक्यात्म्ध्ये ७३४ गावे आहेत (Census of India, 2011). उस्मानाबाद हा महाराष्ट्रातील अतिमागास जिल्ह्यांपैकी एक आहे. येथे दुष्काळा सोबतच मागासलेपणा, स्थलांतर, दारिद्र्य, विषमता व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आढळून येते. सततच्या दुष्काळामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही येथे जास्त आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात, ४५.२७ टक्के मुख्य कामगार असुन ४,३८ टक्के हे सीमांत कामगार आहेत, तर ५०.३५ टक्के हे कामगार नसलेली लोकसंख्या आहे. मुख्य कामगारांमध्ये ५३.०२ टक्के पुरुष आहेत तर ३६.८६ महिला आहेत. तसेच जिल्ह्यात एकुण महिला लोकसंख्या पैकी २,६०,२३७ एवढे मुख्य कामगार, ३९, ८८४ एवढे सीमांत कामगार, तर ४,९५,९२० कामगार नसलेली लोकसंख्या आहे. जिल्ह्यात एकुण महिला कामगारांपैकी १,०८,८१८ महिला शेतीकाम, १,४४,६९३ महिला शेतमजरी, ९९८७ महिला घरगती उद्योग काम तर ३६,६२३ महिला इतर काम करतात (Census of India, 2011).

उस्मानाबाद जिल्ह्यातील लोक हे मुख्यतः शेतीवर अवलंबुन असल्यामुळे अतिवृष्टी किंवा दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांची समस्या वाढते. यामुळे पूर्णपणे शेतीवर अवलंबुन न राहता शेती सोबतच शेतीपुरक किंवा इतर व्यवसाय करण्यासाठी शासन व इतर स्वयंसेवी संस्था नागरिकांना सतत प्रोत्साहित करत आहेत, यामध्ये शासनाचे जिल्हा उद्योग केंद्र, महिला आर्थिक विकास

महामंडळ (माविम) यासारखे विविध विभाग व स्वयम शिक्षण प्रयोग, पर्याय, कोहीजन फाऊंडेशन ट्रस्ट, हॅबिटट फॉर ह्युमॅनिटी इंडिया, ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्थान (RSETI), यांसारख्या अनेक सामाजिक संस्था देखील कार्य करत आहेत. राज्यामध्ये शासन तसेच सामाजिक संस्थांकडून महिलांना उद्योग सुरु करण्यासाठी प्रोत्साहित करून त्यांना सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी एक प्रकारची चळवळ उभा राहिली आहे. या महिला उद्योजकता निर्माण करण्याच्या चळवळीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया जलद गतीने सुरु झाली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये जिल्हा उद्योग केंद्र, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व स्वयम शिक्षण प्रयोग यांच्या मार्फत महिला उद्योजकता विकासाचे कार्य कशा प्रकारे चालु आहे याचा थोडक्यात आढावा घेतला गेला आहे तो पुढीलप्रमाणे;

**जिल्हा उद्योग केंद्र :** उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये उद्योगांना प्रोत्साहित करण्यासाठी शासनाचा जिल्हा उद्योग केंद्र हा विभाग सतत प्रयत्नशील असतो. समाजातील विविध घटकांना उद्योग सुरु करण्यासाठी विविध योजना अंतर्गत कर्ज सहाय्य पुरवुन, तसेच उद्योग यशस्वीरीत्या उभा करून चालविण्यासाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन पुरविते. भारत सरकार प्रामुख्याने सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांतर्गत (एमएसएमई) वस्तू आणि वस्तूंचे उत्पादन, उत्पादन उद्योग, तसेच सेवा उद्योग या अंतर्गत विविध उद्योग सुरु करण्यासाठी विशेष आर्थिक सहाय्य कर्ज स्वरुपात पुरविण्यावर भर दिला आहे. यात उत्पादन उद्योगामध्ये वेगवेगळे ५२ उद्योग तर सेवा उद्योगामध्ये वेगवेगळे २६ प्रकरचे उद्योग समविष्ट आहेत. उत्पादन उद्योगांसाठी ५० लाखांपर्यंत तर सेवा उद्योगांसाठी १० लाख रुपयांपर्यंत कर्ज पुरविले जाते. या योजनामार्फत महिलांना स्वतः एखादा लघु उद्योग सुरु करता यावा म्हणुन विशेष प्रावधान म्हणुन घेतलेल्या कर्जावर अनुदान दिले जाते. ग्रामीण भागातील महिलांसाठी ३५ टक्के तर शहरी भागातील महिलांसाठी २५ टक्के अनुदान दिले जाते. तसेच उद्योगांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून त्यांना सक्षम बनवण्यासाठी महिलांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत ३० टक्के आरक्षणही दिले जाते.

जिल्हा उद्योग केंद्र, उस्मानाबाद मार्फत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (CMEGP) या योजनेंतर्गत महिलांना विविध उद्योगांसाठी सन २०२० - २१ या वर्षात ३९ महिलांसाठी एकूण ३0 कोटी २० लाख तर सन २०२१- २२ व सन २०२२ – २३ या वर्षासाठी अनुक्रमे ४० महिलांसाठी ४ कोटी ८0 लाख तर ३५ महिलांसाठी १५ कोटी ५४ लाख इतका निधी देण्यात आला आहे . सोबत वितरीत केलेल्या कर्जाचा तपशील खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | वर्ष | एकुण महिला | वितरीत रक्कम (MM) |
|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | ० | ० |
| २ | २०१९-२० | ० | ० |
| ३ | २०२०-२१ | ३९ | ३०२.२५ |
| ४ | २०२१-२२ | ४० | ४८.०२ |
| ५ | २०२२-२३ | ३५ | १५५.४३ |
| | एकुण | ११४ | ५०५.७ |

*(स्त्रोत: जिल्हा उद्योग केंद्र, उस्मानाबाद)*

त्याच बरोबर जिल्हा उद्योग केंद्र, उस्मानाबाद मार्फत प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना (PMEGP) या योजनेंतर्गत महिलांना सन २०१७ – १८ या वर्षा अखेर एकूण ६ कोटी ४८ लाख चा निधी देण्यात आला होता. तसेच महिलांना उद्योगासाठी सन २०१८ – १९ व २०१९- २० या वर्षांसाठी अनुक्रमे ११ कोटी ५६ लाख व ९ कोटी ११ लाख देण्यात आले होते. याचप्रमाणे ६ कोटी २२ लाख रुपये हे २०२० – २०२१ या वर्षासाठी दिले होते. याचबरोबर महिलांना उद्योगामध्ये प्रगती करण्यासाठी सन २०२१ – २०२२ या वर्षाकरीता ५ कोटी ५६ लाख रुपये देण्यात आले आहेत. विविध उद्योगांसाठी वितरीत केलेल्या कर्जाचा तपशील खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | वर्ष | एकुण महिला | वितरीत रक्कम (MM) |
|---|---|---|---|
| १ | २०१७-१८ | १९ | ६४.८१ |
| २ | २०१८-१९ | २३ | ११५.६९ |
| ३ | २०१९-२० | २९ | ९१.१७ |
| ४ | २०२०-२१ | २२ | ६२.२६ |
| ५ | २०२१-२२ | २४ | ५५.६४ |
| | एकुण | १३१ | ४०५.६८ |

*(स्त्रोत: जिल्हा उद्योग केंद्र, उस्मानाबाद)*

**महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) :** राज्यामध्ये शासनामार्फत २४ फेब्रुवारी १९७५ ला अंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त माविम ची स्थापना झाली. तर २००३ मध्ये बचत गटा मार्फत महिला सक्षमीकरणाचे विविध कार्यक्रम राबविण्यासाठी माविम ला नोडल संस्था म्हणून घोषित केले. माविम चे ध्येय हे "समाजातील लैंगिक भेद नष्ट करणे , महिलांना न्याय आणि समानता मिळवन देणे, मानवी भांडवलामध्ये गुंतवणूक करून महिलांना सक्षम बनविणे, अशा प्रकारे त्यांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनवणे आणि त्यांना शाश्वत उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देणे" हे आहे. मागील ४५ वर्ष माविम हे महिला सक्षमीकरणाचे ध्येय नजरे समोर ठेऊन काम करत आहे.

माविमची प्रमुख उद्दिष्टे ही पुढीलप्रमाणे आहेत, बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे व्यवस्थापन, महिलांच्या एकुण क्षमतांचे संवर्धन, महिलांमध्ये आत्मविश्वास वाढविणे, महिलांचा उद्योजकीय विकास करणे, रोजगाराच्या संधी आणि बाजारपेठेतील संबंध समक्रमित करणे, तसेच समान संधी, समृद्धी आणि शासनातील सहभागासाठी महिलांच्या पुढाकाराला चालना देणे व शाश्वत विकासाचा मार्ग म्हणून स्वयंसहाय्यता गटांसोबत काम करण्यासाठी तळागाळातील संस्थाची निर्मिती करणे.

राज्यामध्ये आजपर्यंत १०४५० गावातील व ५२ शहरात एकुण १ लाख ५९ हजार स्वयंसहाय्यता गट निर्माण केले आहेत. त्यामध्ये जवळपास २० लाख १५ हजार महिलांना माविम ने संघटीत केले आहे. आज पर्यंत माविम ने महिलांना उद्योग सुरु करता यावे म्हणुन ५००० कोटी रु. हन अधिक रक्कम बँकांकडून गटांना कर्ज म्हणुन मिळवुन दिली आहे (माविम, २०२२ ). माविम च्या मार्गदर्शनाखाली महिलांनी उपजीविका ते उद्योजकता असा प्रवास सुरु केलेला आहे.

माविम जिल्हा कार्यालय येथुन मिळालेल्या माहितीनुसार, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये उमरगा, उस्मानाबाद, कळंब, तुळजापूर व परांडा या पाच तालुक्यातील १३५ गावे व ८ नगरपालिका यातील महिलांसोबत माविम काम करत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये माविम विविध प्रकल्पांतर्गत जवळपास २८००० महिलांपर्यंत पोहचले आहे व त्यांना विविध स्वरुपात लाभ दिला आहे. माविम सोबत जुडून उद्योग करणाऱ्या महिलांपैकी ६५ टक्के महिला दुग्धव्यवसाय, फळबागा, शेळीपालन, कुक्कुटपालन अशा प्रकारचे शेतीपुरक उद्योग करत आहेत. तर उर्वरित भुमीहीन महिला पापड, कुरडई, विविध प्रकारचे मसाला व चटण्या बनविणे तसेच सजावटीचे साहित्य बनविणे अशा प्रकारचे उद्योग करत आहेत.

जिल्ह्यामध्ये माविम विविध प्रकल्प व उपक्रम राबवीत आहे. त्यामधील दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजने अंतर्गत जिल्ह्यामध्ये एकुण २५०० बचत गट निर्माण केले आहेत. ज्या महिलांचे उत्पन्न 1 लाख रु. पेक्षा कमी आहे अशा महिलांचा यात समावेश असतो. या योजने अंतर्गत महिलांची क्षमता बांधणी करण्यासाठी प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच तेजस्विनी प्रकल्पा अंतर्गत स्वयंसहाय्यता गट बनविणे, गाव स्तरावर समिती बनविणे व लोकसंचित साधन केंद्र (सीएमआरसी) उभा करून ग्रामीण महिलांचे संघटन, क्षमता बांधणी, उद्योजकता विकास यासाठी माविम कडून काम केले जाते.

या अंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये ६ सीएमआरसी अंतर्गत १५०० महिला गट कार्यरत आहेत.पुढे याच तेजस्विनी प्रकल्पाचे रुपांतर नवतेजस्विनी- ग्रामीण महिला उद्यम विकास कार्यक्रम असे करण्यात आले आहे. हा उपक्रम पूर्णपणे रोजगार व उद्योग यावरती आधारित आहे. याप्रकाल्पास महाराष्ट्र शासन व आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) यांच्या कडून निधी मिळतो. नवतेजस्विनी अंतर्गत दर वर्षी जवळपास १००० नवे गट जोडले जातात. तसेच दर वर्षी महिलांना उद्योग वाढीसाठी जवळपास २४ ते २५ कोटी रु.पर्यंचे कर्ज वाटप जिल्हाभरात होते. अशा प्रकारे माविम हे महिलांना विविध उद्योग सुरु करण्यास मदत करून त्यांना सक्षम करण्याचे व त्यांची उन्नती करण्याचे उत्तम काम करत आहे.

**स्वयंसेवी संस्थांचे योगदान :** स्वयंसेवी संस्था या शासन व समाज यांतील पोकळी भरून काढण्याचे महत्वपूर्ण कार्य करतात. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये महिला उद्योजकता या विषयावरती स्वयम शिक्षण प्रयोग, पर्याय, कोहीजन फाऊंडेशन ट्रस्ट, हॅबिटट फॉर ह्युमॅनिटी इंडिया, ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्थान (RSETI), यांसारख्या अनेक सामाजिक संस्था सातत्याने कार्यरत आहेत. महिलांनी उद्योग सुरु करावे यासाठी गावस्तरावर मार्गदर्शन सभा घेऊन त्यांना माहिती देणे तसेच व्यवसायाबद्दल सखोल माहिती देऊन त्यांना प्रशिक्षण दिले जाते. महिलांना उद्योग सुरु करण्यासाठी आर्थिक भांडवल उपलब्ध करून देणे किंवा विविध योजनांशी जोडुन देऊन कर्ज उपलब्ध करून दिले जाते. महिलांच्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी महिला उद्योजकता मेळावे व त्यांच्या मालाला प्रसिद्धी देण्यासाठी विक्री मेळावे आयोजीत केले जातात.

यामागील मुख्य उद्देश हा महिलांची उद्योगातील क्षमता वाढवुन त्यांचे उत्पन्न वाढवणे, कार्य करण्याची प्रणाली सुधारणे, व्यवसायातील धोके कमी करणे व त्यांना व्यवसाय यशस्वीपणे चालवण्यासाठी सर्व प्रकारचे मार्गदर्शन आणि मदत पुरविणे हे होय.

प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे महिलांना उद्योग विकसित करण्याच्या संदर्भात, संवाद कौशल्य, व्यवसाय कौशल्ये, बाजारपेठेचे विश्लेषण, व्यवसायाची व्याप्ती, व्यवसाय संधी समजून घेणे, जोखीम, आर्थिक व्यवस्थापन ज्ञान या विषयांवरती मार्गदर्शन करण्यासाठी ५ दिवसांचे उद्योजक कौशल्य निर्माण प्रशिक्षण आयोजित केले जाते. यामध्ये ज्या महिला व्यवसाय करत आहेत त्यांना व्यवसाय वाढीसाठी तर इतर महिलांना नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. यासोबतच उद्योग करणाऱ्या महिलांना येणाऱ्या समस्यांवर मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी व्यक्ती उद्योग सल्लागार म्हणुन नेमुन दिले जातात. हे सर्व पाहता स्वयंसेवी संस्थांमार्फत जिल्ह्यामध्ये महिलांना उद्योजकते मध्ये आणण्यासाठी एक प्रभावी चळवळ उभा राहिली आहे असेही म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

**उद्योजकते मध्ये महिलांना येणाऱ्या समस्या :** महिलांना स्वतःचा उद्योग सुरु करण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, त्या पुढीलप्रमाणे - १( महिलांमध्ये उद्योग करण्याची जिद्द असते पण कुटुंब व समाजातील लोकांचा पाठींबा नसल्यामुळे आपण एकटे करू शकाल की नाही याचा आत्मविश्वास कमी असतो. २( उद्योग करण्यासाठी घरातुन संमती भेटत नाही, कारण कुटुंबातील सदस्यांना वाटते की महिलांनी घराच्या बाहेर फिरून उद्योग-व्यवसाय करू नये. ३( नवीन उद्योग सुरु करण्यासाठी आवश्यक तेवढे भांडवल उपलब्ध नसते. ४( उद्योग सुरु करण्यासाठी बँक कर्ज सहज मंजुर होत नाही, बँक क्षेत्रातील माहितीच्या अभावामुळे अनेकदा कर्ज मिळण्यास खुप विलंब होतो. ५( उद्योग करण्यासाठी मेहनत घेण्याची तयारी असते पण उद्योगाबद्दल पुरेसे ज्ञान व माहिती उपलब्ध नसल्यामुळे पाहिजे तेवढा फायदा भेटत नाही. ६( उद्योगामध्ये आर्थिक उलाढाल व हिशोबाचे पुरेसे ज्ञान नसणे. ७( ग्रामीण भागातील महिलांना व्यवसाय कौशल्य प्रशिक्षण गावस्तरावर सहज मिळत नाही. ८( बाजारपेठेच्या माहितीचा अभाव त्यामुळे विक्री करताना मध्यस्थांकडून महिला उद्योजकांची अर्थिक पिळवणूक होते. ९( नव-नवीन आधुनिक तंत्रज्ञानाच्या अभावामुळे अजुनही पारंपारिक पद्धतीने उद्योग करणे. १०( ब्रँडिंग व ऑनलाइन मार्केटिंगच्या माहितीची कमतरता त्यामुळे पुरेसा उद्योगाचा प्रचार प्रसार होत नाही. ११( उद्योग करणाऱ्या महिलांनी एकत्रितरीत्या मिळुन काम न करण्यामुळे बाजारपेठेत सौदा करण्याच्या शक्ती कमतरता.

**उद्योजकते मधून महिला सक्षमीकरण :** अलीकडील काळामध्ये महिला उद्योजकता चळवळीने जिल्हाभरात उत्तम प्रकारे जोर धरला आहे. शासकीय विभाग व कार्यरत स्वयंसेवी संस्थामार्फत ग्रामीण भागातील तळागाळातील होतकरू महिलांपर्यंत पोहचून त्यांना उद्योग सुरु करण्यासाठी शासनाच्या तसेच इतर विविध योजनांची माहिती पुरविली जाते. तसेच त्यांना त्या योजनांसोबत जोडुन देऊन महिलांना उद्योग उभा करण्यासाठी कर्ज मिळवुन देऊन भांडवल उपलब्ध करून दिले जाते. यानंतर उद्योग यशस्वीरीत्या चालवता यावा यासाठी त्यांना उद्योजकता विकास प्रशिक्षण दिले जाते. शासन व सामाजिक संस्था एकमेकांसोबत समन्वय साधुन महिलांना उद्योग करण्यास प्रोत्साहित करत आहेत. असे म्हंटले जाते की घरातील एक स्त्री शिकली म्हणजे पूर्ण कुटुंब प्रगती करते या उक्ती प्रमाणेच आपण असे म्हणू शकतो की जर कुटुंबातील एक स्त्री उद्योगात प्रगती करत असे तर पूर्ण कुटुंबाची प्रगती होते. महिला आपल्या मुलभूत गरजा भागवण्यासाठी पूर्णपणे आपल्या कुटुंबावर अवलंबुन न राहता, स्वतः उद्योग-व्यवसाय सुरु करत आहेत. त्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन त्यांना कायमस्वरूपी शाश्वत रोजगार उपलब्ध होत आहेत. या उत्पन्नामुळे त्यांच्या मूलभूत गरजा भागवण्यासोबतच त्यांच्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडत आहेत. उद्योगामुळे/ उद्योजकते मधून महिलांमध्ये अनेक गोष्टींचे निर्णय घेण्याची क्षमता येते जसे की घरगुती निर्णय, मुलांचे शिक्षण, कौटुंबिक खर्च, घरगुती वस्तूंची खरेदी आणि विक्री, स्वतःचे व कुटुंबाचे आरोग्य, घरगुती हिंसा रोखणे, गावातील विकास कामात नेतृत्व करणे, स्वतःच्या उद्योग वाढीवर खर्च करणे. यासोबतच त्या त्यांच्या कुटुंबाची देखभाल उत्तम प्रकारे करण्यास सक्षम होत आहेत. त्यांना समाजात अधिक चांगले स्थान आणि आदर मिळत आहे यासोबतच त्यांचे राहणीमान उंचावत आहे. उद्योगातील खरेदी विक्री महिला स्वतः करत असल्यामुळे त्यांचे व्यवहारीक ज्ञान वाढत आहे, तसेच त्यांचे संवाद कौशल्य सुधारत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे कुटुंबातील सत्ता संबंध बदलत आहेत, महिलांची समाजात पत-प्रतिष्ठा वाढत आहे, त्यांना घरातील एक कर्ती महिला म्हणुन पहिले जात आहे, यासोबतच महिलांचा आत्मविश्वास वाढत आहे. यातुन

असा निष्कर्ष निघतो की उद्योजकतेमधून महिलांचे सक्षमीकरण होत आहे.

**निष्कर्ष :** हा अभ्यास स्पष्टपणे दर्शवितो की उद्योग सुरु केल्याने महिला स्वतः आपले उत्पन मिळवु लागल्या आहेत. आपल्या मुलभुत गरजा भागविण्यासाठी त्यांना पूर्णपणे कुटुंबावरील अवलंबन कमी होत आहे. उद्योजकता असलेल्या व्यक्तींनी जीवनात स्वकर्तृत्वाने कठीण परिस्थितीवर मात करुन प्रगती केल्याचे दिसून येते. तसेच महिला उद्योजकता विकासासाठी महिलांनी आपल्या मध्ये पुढील प्रमाणे प्रगती करून घेण्याची आवश्यकता आहे. उद्योजकतेची गुणवैशिष्ट्ये कोणकोणत्या महिलांमध्ये आहेत हे अचूकपणे शोधून त्यांच्यावर अधिक जबाबदारी सोपवावी. त्याच बरोबर उद्योगधंदे वाढवण्यासाठी आवश्यक असणारे कला गुण किंवा अनुभव आपल्या उद्योग समूहातील कोणत्या महिलांमध्ये आहेत याचाही अभ्यास केला पाहिजे. तसेच सध्याच्या काळात तांत्रिक ज्ञान असणे फारच महत्वाचे आहे त्यामुळे आपल्या प्रत्येक महिलेला याची माहिती असणे गरजेचे आहे. यासाठी लागणारे भांडवल, उत्पादन साधने कसे उपलब्ध होईल आणि तयार होणाऱ्या मालाची विक्री कशी करता येईल याचाही विचार करणे गरजेचे आहे. त्यासाठी अन्य कोणकोणत्या संस्थाची मदत घ्यावी लागेल. या सर्वांचा विचार करुन नियोजन केले पाहिजे व विकास घडवून आणला पाहिजे. तसेच उद्योगांमधून मिळणाऱ्या उत्पन्नातून महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीवर सकारात्मक परिणाम झाला आहे. महिला कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून उद्योग करत आहेत व यातुन अनेक बदल घडत आहेत जसे की महिलांचा घरातील निर्णय प्रक्रियेत समावेश तसेच त्यांना कुटुंबात मान-सन्मान मिळणे, ई. यासोबतच महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांच्यातील नैराश्य कमी होत आहे. आज देशाच्या विकासात महिला महत्वपूर्ण योगदान देत आहेत. तसेच शासन व स्वयंसेवी संस्थांमार्फत उभा ठाकलेल्या महिला उद्योजकता चळवळीचे महिला सक्षमिकरणामध्ये अतिशय महत्वपूर्ण योगदान आहे.

***संदर्भ :***


1) *Census of India. (2011). DIstrict Census Handbook Osmanabad. Directorate of Census Operations Maharashtra.*
2) *Malti, P. S., Tanshette, R. V., & Kodge, B. G. (2019). Status and Role of Women Entrepreneurs in India: A Case Study of Latur District. Indian Journal of Commerce & Management, pp. 42-45, vol. vi.*
3) *Sakhalkar, M. (2015). Role of Swarnajayanti Gram Swarojgar Yojna in Empowering Women in Household Decisions. Online International Interdisciplinary Research journal, pp. 232-236, Vol. V,No.I.*
4) *अंकुश, ग. (२०२०, जून २२). उद्योजकता विकास व सबलीकरण. www.agrimoderntech.in: https://www.agrimoderntech.in/2020/06/udyojakata-vikas-sabalikaran.html पासून प्राप्त*
5) *पांढरपट्टे, द. (२०२१). सशक्त, कर्तत्ववान, महिलाशक्ती. मुंबई : लोकराज्य.*
6) *माविम. )२०२२ (. सांगाती- ध्येय नवतेजस्विनींच्या विकासाचे . मुंबई : माविम.*

# भारतीय तरुणाई पाश्चिमात्य जीवनशैली आणि जबाबदार पालकत्वाचा सहसंबंध

**डॉ. नीलिमा सरप,** प्रमुख समाजशास्त्र विभाग, शंकरलाल खंडेलवाल कला, वाणिज्य महाविद्यालय, अकोला.

***सारांश:*** *प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतातील बदलत्या परिवेशाचा तरुणाईवर होणारा परिणाम आणि त्या अनुषंगाने भारतीय पालकांसमोरील आव्हानांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

*वैश्विकरणाच्या प्रक्रियेद्वारा नवनवीन प्रसारमाध्यमे, समाज माध्यमांचा भारतीय समाजामध्ये वेगाने प्रवेश झाला आहे. गेल्या दहा वर्षातील प्रगती प्रत्येक क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटवीत आहे. आधुनिकीकरण, विकासाची गती, स्पर्धा आणि अस्तित्वाची लढाई या सर्व घटकांचा द्विध्रुवीय परिणाम आपल्याला पाहायला मिळतो आहे. त्यामध्ये विकासाकडे धावणारी तरुणाई, त्यांच्या पुढील आव्हाने प्रलोभाने यांचा उठापोट प्रस्तुत संशोधनामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.*

*त्याचबरोबर जबाबदार पालकत्वाची संकल्पना विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधनाकरिता प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा उपयोग माहिती संकलनाकरिता केला आहे. प्राथमिक स्त्रोतांद्वारा पालक आणि तरुण विद्यार्थी वर्गाच्या मुलाखती व अनुभव प्राप्त केले आणि दुय्यम स्त्रोता द्वारा माहिती यादृच्छिक पद्धतीने नमुना निवडणूक माहितीचे विश्लेषण केले आहे. वास्तविक माहितीच्या आधारे समाजामध्ये इंटरनेट यांचा अतिरेक वापर व त्याचा मुलावर होणारा परिणाम त्यांचे वेळ आणि करियर नष्ट करणार आहे. महानगरे, शैक्षणिक केंद्र असलेली शहरे यामध्ये पाश्चिमात्य संस्कृतीचा शिरकाव मोठ्या प्रमाणात झाला असून मुले आणि मुली व्यसनाधीनता बार संस्कृतीच्या आधीन झाले आहेत. हॉटेलिंग, डेटिंग, लिव्ह इन रिलेशनशिप, रिसॉर्ट एन्जॉयमेंट, यासारख्या संकल्पना रुजत आहेत. या सर्वांमध्ये ग्रामीण, नागरी, गरीब, श्रीमंत, मध्यमवर्गीय तरुण समाविष्ट होत आहेत. व्यापारासाठी तरुणाईला वेगवेगळी प्रलोभाने दाखवणारी माध्यमे, जाहिराती, दलाल या सर्वांना आळा घालने गरजेचे आहे.*

*पुढील पिढी कर्तव्यदक्ष व योग्य त्या मार्गाने मार्गक्रमण करावी त्याची जबाबदारी वाढली आहे. नवीन संकल्पना प्रगती आणि अडथळे या सर्वांवर मात करण्याकरिता पालकांनी मित्रत्व आणि आदर या दोन्ही घटकांचा वापर करून मुलांसोबतचे संबंधांमध्ये समन्वय साधला तर तरुण पिढीची वाटचाल योग्य मार्गाने होईल वैश्विकरणाच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट होणे गरजेचे आहे. परंतु आपला परिवेश, ध्येय, उद्दिष्टे, राष्ट्रीय प्रगती या सर्वांना मध्ये समन्वय साधण्यासाठी जागरूकतेने पाऊल उचलणे गरजेचे आहे.*

**प्रस्तावना:** तरुणांचे तीन 'त'कार स्पष्ट करणारे आचार्य दादा धर्माधिकारी म्हणतात. अशी कितीतरी तरुण मुलं आजूबाजूला दिसतात त्यांना तेजस्वी व्हायचं असतं त्यांच्यासाठी ते तत्पर असतात आणि तपस्वीतेला त्यांची ना नसते. आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तींसाठी आणि कारणांसाठी कशाचीही तमा न बाळगणारी करू नये आसपास दिसते परंतु स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांनी आज हि करू नये बेधुंदपणे वावरताना दिसते. तेव्हा दादा धर्माधिकारी यांना गवसलेली तरुणाई कुठे वाहावत जात आहे. ह्याचा जर आपण विचार केला तर दिसणारे वास्तव हादरवून टाकणारी आहे. पाश्चिमात्यांची जीवनशैली, वरवरची डोळे दिपवणारी चकाकी आणि अंदाधुंद नशा ह्या क्षणभंगुर गोष्टींमध्ये भारतीय करू नये गुरफटत चालला आहे.

**सामाजिक पार्श्वभूमी :** स्वातंत्र्यानंतर साधारणपणे तीन पिढ्या गेल्या असतील तिसऱ्या पिढीला प्रथम दोन पिढ्यांचा संघर्ष पाहिजे तेवढा माहित नाही. देशाच्या स्वातंत्र्याचे मोल त्यांच्यासाठी आपल्या पूर्वजांनी केलेले बलिदान आणि देश व समाजाच्या कुटुंबाच्या विकासासाठी झटणारी दुसरी पिढी आणि त्यांचा संघर्ष याची जाणीव या पिढीला नाही. असे त्यांच्या एकूण वर्तनावरून जाणवते कारण आज पूर्वीपेक्षाही आर्थिक शैक्षणिक सामाजिक प्रगती दिसते आहे. त्यांची फळे ही पिढी उपभोगते आहे पण जीवन जगताना जी शिस्त आणि मूल्य हवी असतात ती हळूहळू लुप्त होत जात आहेत असे वाटते.

जागतिकीकरण आधुनिकीकरण आणि विकास यांचा मेळ घालताना आपण कुठे असायला हवे याचे भान या पिढीला नाही वरील चर्चेचा मतितार्थ समजून घेताना भारतीय तरुण पिढी चे वर्तन कसे आहे ते समजणे महत्त्वाचे आहे आज महानगराचे चित्र आपण लक्षात घेतली तर वेगवेगळ्या कारणांनी महानगरांमध्ये येणाऱ्या तरुण वर्गाचे प्रमाण फार मोठे आहे सुरुवातीला शिक्षणासाठी महानगरामध्ये प्रवेश केलेले आणि आयुष्याची उमेदीची वर्षे त्या ठिकाणी घालवणारा एक वर्ग आहे. शिक्षणाचे महत्त्व आणि प्रमाण दोन्ही वाढत

आहे. म्हणून शिक्षणाची केन्द्र झालेली काही दिल्ली, पुणे, मुंबई, चेन्नई, बेंगलोर ह्यासारख्या महानगरांमध्ये वेगवेगळया शाखांमध्ये शिक्षण घेणारा तरुण वर्ग आज लाखोच्या घरात आहे. त्यामध्ये इंजिनिअरिंग, मेडिकल क्षेत्र, उद्योग, व्यवस्थापन, स्पर्धा परीक्षा अशा वेगवेगळ्या ज्ञान शाखेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामध्ये तालुका, जिल्हा आणि छोटीमोठी खेडी येथून विद्यार्थी येत असतात. त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती जर आपण बघितली तर वेगवेगळ्या आर्थिक आणि सामाजिक स्तरातील हे विद्यार्थी असतात. काही नोकरदारांची, मध्यमवर्गीयांची मुले असतात, काही उद्योजकांची, श्रीमंतांची मुले असतात, तर काही खेड्यातील शेतकऱ्याची व शेतमजुरांची मुले आहेत. परंतु अतिशय मनापासून शिक्षण घेणारे व प्रामाणिकपणाने जीवन जगणाऱ्यांची संख्या आज २५ ते ३०% पर्यंत येऊन ठेपली आहे.

**उद्दीदष्ट्ये :**

१) पाश्चिमात्य जीवनशैलीचा भारतीय तरुणांवर होणारा परिणाम अभ्यासणे.

२) सद्यस्थितीतील समाज माध्यमे इंटरनेटचा समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे.

३) जबाबदार पालकत्वाचे विविध आयाम समजून घेणे.

संशोधन करताना उपयोगात आणलेल्या संकल्पना:

१) भारतीय तरुणाई

२) समाज माध्यमे

३) जबाबदार पालकत्व

**१) भारतीय तरुणाई :** भारतात १० ते २८ वयोगटातील तरुणांची संख्या ३४.६ कोटी आहे व तरुणांची संख्या सर्वात जास्त असलेला भारत जगातील एकमेव देश आहे संयुक्त राष्ट्राचे लोकसंख्या निधीचे कार्यकारी संचालक बाबाटुडे ओसोटी मेहीम यांनी सांगितले की १.८ अब्ज युवकांमध्ये भविष्य बदलण्याची प्रचंड शक्ती आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये तरुण आणि कार्यक्षम लोकसंख्या तब्बल ४०.७ आहे. एन.सी.बी. नुसार २०१९ च्या वर्षात भारतात ९०,००० तरुणाणीं आत्महत्या केली. संपूर्ण दक्षिण - पूर्व आशियात ही सर्वाधिक नोंद ठरलेली आहे.

**२) समाज माध्यमे म्हणजे काय?** समाज माध्यमे म्हणजे समाजाच्या लोकांच्या हातातील इलेक्ट्रॉनिक माध्यम आपण हे माध्यम पाहिजे तसे आणि हवे तसे वापरू शकतो आणि हे समाज माध्यमे वापरायला अगदी सोपी आहेत. कारण आज सगळीकडे स्मार्टफोन आहेत. हा स्मार्टफोन, व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंटरनेट, मेल इत्यादी द्वारा विविध संदेश अगदी कमी वेळात आणि प्रभावीपणे पोहोचू शकतो मग ते छायाचित्र, व्हिडिओ, डॉक्युमेंट्स इत्यादी प्रकारची माहिती पाठवू शकतो अगदी कमी वेळात तो वायरल होतो.

गौतम पेंढारकर - "इंटरनेटवर उपलब्ध असणारा विविध व्यक्तींची संपर्क साधून देणारा व ते जपू देणारा मंच म्हणजे सोशल मीडिया होय". सगळीच माध्यमे म्हणजे सामाजिक माध्यमे. सामाजिक माध्यमे समाजातील लोकांना परस्परांशी अति जलद वेगाने जुळण्याचे काम करतात. हे समाजावर मोठ्या प्रमाणात आधारित असतात. हे सर्वांच्या मालकीचे असतात कोणीही त्याचा वापर करू शकतो. मोठ्या प्रमाणावर प्रचार होतो.

**समाज माध्यमांचे प्रकार:**

१) इलेक्ट्रॉनिक माध्यमे

२) प्रिंट माध्यमे

३) परंपरागत माध्यमे

४) मौखिक माध्यमे

५) सामाजिक बातम्या स्थळे - उदा. ट्विटर, ब्लॉग.

६) सामाजिक जलांतर्गत संकेत स्थळे - उदा. Google. Linked in ७) मल्टीमीडिया संकेतस्थळे - उदा. युट्युब, इंस्टाग्राम

**३) जबाबदार पालकत्व :** पालकत्व ही संकल्पना फक्त जैविक नसून पालकत्व हे शारीरिक, भावनिक, मानसिक, सामाजिक, अध्यात्मिक, बौद्धिक, आर्थिक दृष्ट्या बालकाला सक्षम विकसित बनविण्यासाठी आधार देणारे प्रक्रिया आहे. सर्वात महत्त्वाचे काळजीवाहक आई-वडील व त्यानंतर शिक्षक असतात. याशिवाय नातेवाईक, शासन व समाज सुद्धा पालकत्वाच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाचा घटक आहे. मुलांची वाढ ही एक संस्कारक्षम प्रक्रिया आहे. त्यामध्ये पालकत्व हा घटक अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात प्रस्तुत संशोधनामध्ये परिवर्तनाच्या या परिवेशांमध्ये पालकत्वाची जबाबदारी अधिक पटीने वाढले आहे.

**सद्यस्थितीती व भौगोलिक प्रलोभने:** महानगरातील डोळे दिपवणारा लखलखाट या सर्व प्रकारच्या सामाजिक स्थितीतील तरुणांना भुलवतो आहे. जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा उद्योग या दोन्ही जगतिक विकासाच्या लाटेमध्ये भारतीय करू नये अलगत सापडली आहे. हॉटेलिंग, डेटिंग, लिव्ह इन रिलेशनशिप या सारखे नवनवीन कन्सेप्ट येत आहेत. आणि आयुष्याला वळण लावण्यासाठी येणारे तरुण वळणावळणाने या

मार्गाकडे जात आहेत. त्यामध्ये अगदी मुले आणि मुली सुद्धा आहेत. साधारण मध्यमवर्गीय श्रीमंत लोकांची मुले या गोष्टी पालकांच्या पैशांवर करतात तर ज्यांच्याकडे पैसा नाही पण या झगमगाटाचे आकर्षण असणारे आणि तरुण आणि तरुणी या मार्गाला लागले आहे.

अलीकडे सेंट झिविअर्स कॉलेज, मुंबई पश्चिम येथील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी यांनी एक सर्वेक्षण केले त्यामध्ये २१ वर्षाच्या आतील ७५ % तरुण अल्कोहोल घेतात असे आढळून आले आहे. हे सर्वेक्षण भारतीय महानगरे दिल्ली, मुंबई, पुणे, कोलकत्ता, राजस्थान आणि पेग राजधानी व युरोपची मध्यवर्ती शहर हंगेरी येथे सुद्धा करण्यात आले होते. या सर्व ठिकाणची तरुणाईची नशाखोरी करणारी आकडेवारी डोळे बाहेर करणारी आहे. २१ पूर्वीची मुले ७५% अल्कोहोल घेतात २० % सिगारेट ओढतात आणि ३०% लोक हुका पितात जवळपास ८८ % तरुण वेगवेगळ्या प्रकारचे नशे करतात. याचे महत्त्वाची कारणे जिज्ञासा, संवयस्कांचा दबाव आणि या सर्व वस्तूची सहज उपलब्धता होय. याशिवाय रात्रीच्या क्लब आणि पब मध्ये होणाऱ्या पार्ट्या शहरांमध्ये वा शहराबाहेर होणाऱ्या रेव्ह पार्ट्या सर्रास चालू असतात. फॅशन आणि प्रतिष्ठा जोपासणे मित्र-मैत्रीणवर रुबाब दाखविण्याकरिता या गोष्टी सतत सुरु असतात. पार्ट्यांमध्ये अनेक तरुण आणि तरुणी जातात हळूहळू पैशाच्या मोहामध्ये अडकून पडतात. अशा अनेक तरुणी आज आई-वडिलांनापासून क्लब पार्ट्या करतात. आमचे व कुटुंबाचे समांतर आयुष्य आहे असे सांगतात. अर्थात यामध्ये २५ ते ३५ % तरुण अजिबात कशातच इंव्होल नसतात परंतु या ७५ % तरुणांचे काय? याच्या बऱ्याच पालकांना याची उद्योग काय सुरू आहेत ते माहीत नसते. अभ्यास विद्यार्थ्याचा आहे यामधून यशस्वी झालेले. काही तरुण काही माझ्या परिचयातील आहेत. एक क्ष विद्यार्थी छोट्या शेतकऱ्याचा व छोट्या गावातील रहिवासी असलेला पोलिस निरीक्षक बनतो. पण दारूच्या आहारी जातो आज तो चार वेळा निलंबित झाला आहे. कारण बेजबाबदारपणा आणि नशाखोरी व्यसनापाई भ्रष्टाचार करतो. त्यामुळे पत्नी सोडून गेली, गावातील घर विकले गेली तर नव्याने शहरांमध्ये शिक्षणासाठी गेलेल्या मुली सर्रास पार्ट्या करून दारू पीत आहेत. हे विधान जबाबदारीने काय करते आहे. पालकांना याची माहिती नसते कारण मी सुद्धा एक पालक आहे. आणि सामाजिक समस्यांची अभ्यासक आहे. स्वातंत्र्यानंतरच्या साधारण दुसऱ्या तिसऱ्या पिढीतील पालकांनी संघर्ष करून मिळवलेली प्रतिष्ठा पद पैसा याची ही तरुण मुले आहेत. स्वतःला चांगले शैक्षणिक जीवन उपभोक्ता नाही आले पण आपल्या मुलांच्या वाट्याला आणखीन संघर्ष नसावा. म्हणून धडपडणारे हे पालक यांची मुले या आधुनिकीकरण व फॅशनच्या गर्तेमध्ये सापडत आहेत. दुर्दैवाने मुलांचे भविष्य त्याची जीवनशैली अतिशय चांगल्या पद्धतीने घडावी म्हणून जे प्रयत्न करतात. मग या सर्व प्रकारांमध्ये चुकते कुठे? त्याचा शोध घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. यासाठी जबाबदार असणारे घटक बाह्य आणि अंतर्गत दोन्ही प्रकारच्या आहेत.

**तरुणाईला भुलवणारे बाह्य घटक अथवा कारणे :** बाह्य घटकांमध्ये विद्यार्थी तरूण ज्या बाह्य समाजाच्या संघर्षामध्ये येतात. यामध्ये कॉलेज वेळ घालविण्याची सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल्स, मॉल्स, क्लब, सिनेमा हॉल्स, इत्यादी तसेच सहज उपलब्ध झालेले इंटरनेट महाजाळे त्यामुळे कुणाच्याही संपर्कात जाणे व ऑनलाईन पोहोचणे सोपे झाले आहे. त्या सर्वांच्या पाठीमागे आणखीन एक महत्त्वाचे कारण ते म्हणजे भारतीय लोकसंख्या आणि बाजारपेठ, बहुराष्ट्रीय, राष्ट्रीय कंपन्यांना त्यांचा उद्योग यशस्वी करण्यासाठी लागणारी बाजारपेठ भारतामध्ये आहे. आणि त्याकरिता वाटेल ते करण्याची त्यांची तयारी असते. केक असो वा नशावर्धक पेय असो, जाहिराती आणि मधले दलाल यांच्यामार्फत या सर्व नशेच्या वस्तू तरुणाईपर्यंत पोहोचत आहेत. आणि यामध्ये भरीत भर म्हणून की काय आपल्याच लोकांच्या मार्फत या सर्व ग्राहकांना वेगवेगळ्या माध्यमातून भुलवले जाते. मग ते इंटरनेट असेल प्रसारमाध्यमे आहेत सिनेसृष्टी आहे याची फार मोठी उदाहरणे आपण अनुभवली आहेत. सुशांत राजपूतच्या मृत्यूच्या निमित्ताने अनेक पडद्याआडच या गोष्टीवर प्रकाश पडला. त्याला न्याय नाही मिळाला नाही पण ड्रक्सचे रॅकेट भारतात आहे. आणि ते विशिष्ट उच्चभ्र समाजात पोहोचले आहे. हे आपण समजू शकतो त्यामुळे या तरुणांना या सर्व गोष्टींची जाणीव करून देणारी यंत्रणा आपल्याकडे असायला हवी.

**पालकत्व जबाबदारी एक मीमांसा :** पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणातून आणि आपल्या छोट्याशा विकासाला मधून आपण समाधानी होऊन अलिप्त राहिलो तर पुढची पिढी वाया जाण्याची भीती आहे. अर्थात अपवाद प्रत्येक गोष्टीला असतातच ते आपण विसरू शकत नाही आणि म्हणून आता पालकांनी अधिक सजग होणे महत्वाचे आहे. चांगले आणि वाईट यातील फरक सांगणारी प्रतिमाने म्हणजे मूल्य होत. या मूल्यांचे वर्धन कुटुंब शाळा समाज याठिकाणी जोपासणे कर्म प्राप्त आहे. आम्ही मुलांना शिक्षण त्यांच्या गरजा उपलब्ध करून दिल्या आणि आमची जबाबदारी संपली हे समजण्याचा हा काळ नाही. याकरिता मुलांसोबत राहणे किंबहुना त्यांचे मित्र बनणे आवश्यक पालक व मुले यांच्यामध्ये

सुसंवाद असायलाच हवा प्राथमिक पाया म्हणजे मुलांच्या विचारधारा एकदा कायम झाल्या ही त्यांची दळणवळण चांगली होते. मग कोणतीही बाह्य परिस्थिती त्यांच्यावर आहनत करू शकत नाही. मग प्रश्न ठरतो तो बाह्य घटकांचा त्यामध्ये शासन कायदा समाज यांनी योग्य वेळी योग्य ती कर्तव्ये पार पाडली. तर या सर्व गोष्टींना पायबंद बसेल यामध्ये पोलीस, न्यायव्यवस्था, कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा याचे कर्तव्य महत्त्वाचे आहे.

कोरोनामुळे सद्यस्थिती समाज माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. शाळा कार्यालयीन काम या सर्व बाबी समाज माध्यमांच्या मार्फत चालविल्या जातात. विद्यार्थी नोकरदार उद्योग व्यापार यांच्या संपूर्ण क्रिया समाज माध्यमाने द्वारा पार पाडत आहेत. जास्तीत जास्त वेळ विद्यार्थ्यांचा मोबाईल इंटरनेटवर जातो आहे. मुलांची जिज्ञासू वृत्ती मुळे गॅजेट्सचा वापर सर्व वयोगटातील विद्यार्थी फार मोठ्या प्रमाणात करतात. यामधील प्रगत तंत्रज्ञान त्याची हाताळणी विद्यार्थ्यांना तरुणांना फार लवकर आणि चांगल्या पद्धतीने करता येते. पालकांना त्यांचे कौतुकही वाटते परंतु इंटरनेटद्वारा अनेक चांगल्या वाईट गोष्टी विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध आहेत. त्यामध्ये वेगवेगळया गेम्स आहेत, पुरुषांसाठी च्या फिल्मस आहेत, व्यसनांची उत्पादने मिळतात. अनेक विद्यार्थी वसतिगृहामध्ये बाहेर खोल्या करून राहतात. पालकांपासून ते दूर असतात या काळात त्यांना सहज उपलब्ध असलेल्या गोष्टी या बोटांच्या टोकावर मिळतात. आणि संगत जर चांगली असेल प्रश्न येत नाही. परंतु वंडरलैंड, रिसॉर्ट, टूर्स, क्लब, पार्ट्या प्रमाण एवढे वाढले आहे. आणि हे सर्व पालकांच्या अपरोक्ष होते. म्हणूनच पालकांनी सजग होणे आवश्यक आहे. अर्थात मुलांवर अविश्वास सुद्धा दाखविता येत नाही कारण इतर मुलांना चैनीच्या वस्तू सहज मिळतात. मग मी त्याच वर्गातील असून मला का नाही? विचारधारा बदलत चालले आहेत. त्यामुळे पालकांना त्यांच्यासोबत किंबहुना त्यांच्यासारखे बनवून मित्रत्वाच्या नात्याने सर्व गोष्टी हाताळल्या पाहिजेत. जबरदस्ती रागावू नये, धाक दाखविणे हे प्रकार सध्याच्या पिढी सोबत केले तर त्यांचे दुष्परिणाम होतात. बऱ्याच पालकांचा अनुभव आहे की धाकाने रागाने जर एखादी गोष्ट मुलांच्या गळी उतरण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या उलट कार्य मुले करतात. म्हणूनच मुलांशी प्रेमाने गोडीगुलाबीने त्यांना समजून घेऊन योग्य या गोष्टी त्यांना समजून घेणे शक्य आहे. आदर्श वादापेक्षा वास्तवाची जाणीव महत्त्वाची आहे. आणि एकदा विशिष्ट वयाच्या टप्प्यांमधून मुले गेली किती समजस होतात. तेवढा काळ मात्र बालकांसाठी परीक्षेचा असतो. काळासोबत चालताना जबाबदार पालकत्व ही संकल्पना खऱ्या अर्थाने जबाबदारीने पार पाडणे व पुढच्या पिढीला सक्षम बनविणे या पद्धतीने शक्य आहे.

### *संदर्भ ग्रंथ*


१. *इंटरनेट विकिपीडिया*
२. *दैनिक लोकमत ऑक्सिजन पुरवणी*
३. *दैनिक लोकसत्ता*
४. *भारतातील प्रसारमाध्यमे काल आणि आज जयमती दळवी*
५. *प्रफुल्ल सुतार सोशल मीडिया डिजिटल दुनिया मल्टीव्हर्सिटी प्रकाशन*

# समाजमाध्यमांच्या विळख्यात मानवी जीवन: एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. बिरादार प्रतिभा रंगराव,** समाजशास्त्र विभाग, माऊली महाविद्यालय वडाळा ता.उ.सोलापूर जि.सोलापूर.

**प्रस्तावना** : मानवाने आपल्या प्रचंड बुध्दिमत्तेच्या आणि विवेकाच्या जोरावर उत्तुंग प्रगती साधली आहे. ज्ञानाच्या जोरावर आज माणूस पृथ्वी सोडून इतर ग्रहावर स्थलांतर करण्याच्या प्रयत्नात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामूळे माणूस पाताळात आणि अंतराळात संचार करीत आहे. षिक्षण आणि ज्ञानाच्या आधारावर आधूनिक साधनांची निर्मिती व वापर करून माणूस आधूनिक पध्दतीने जीवन जगत आहे. व्यक्तिच्या गरजा व गरजांची पूर्तता यामधून नवनिर्मीत समाज विकषित होत गेला. औद्योगीक क्रांतीनंतर कृषीप्रधान समाजातून उद्योगप्रधान समाज आणि आता २१ व्या शतकात माहिती प्रधान समाज विकसीत होत आहे. सध्याचे यूग हे माहिती विज्ञान तंत्रज्ञानाचे यूग आहे. अतिशय जलद गतीने माहीतीचे आदान प्रदान होत आहे. प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ मॅकआयव्हर आणि पेज यांच्या मते, 'सामाजिक संबंधाचे जाळे म्हणजे समाज होय' आज समाजमाध्यमांच्या जाळयाने प्रत्येक माणूस एकमेकांशी जोडला गेला आहे. इंटरनेटच्या विकासामूळे मानवाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला एक नवी दिशा मिळाली आहे. आपले विचार, आपले ज्ञान, कलाकृती लोकापर्यंत पोहचविण्यासाठी समाज माध्यमांचा मोठया प्रमाणात वापर होवू लागला. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये समाजमाध्यमांचा विकास हा दिल्लीपासून गल्लीपर्यंत झाला आहे. खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरण यामूळे समाजमाध्यमांच्या विकासाला गती व चालना मिळाली. सूरवातीच्या काळात ही साधने आर्थिकदृष्ट्या न परवडणारे असल्यामूळे गरज म्हणून समाजमाध्यमांचा वापर केला जात असे. सन २००० नंतर मात्र या साधनांची मोठी बाजारपेठ निर्माण केली. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी व आपले अस्तीत्व टिकविण्यासाठी सर्वसामान्यांना परवडेल या किमतीत सूविधा पूरविल्या जावू लागल्या. त्यामूळे समाज माध्यमांचीमूळे खोलवर व सर्वदूर पसरलेली दिसते. वेळेची आणि पैशाची बचत त्यामुळे आज समाजातील बहूसंख्य लोकांच्या आकर्षणाची केंद्र बनली आहे. वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरदर्शन किंवा टिव्ही लोकशिक्षणाचे, समाजप्रबोधनाचे व परिवर्तनाचे प्रभावी साधने असले तरी यावर समाजमाध्यमाने आपले वर्चेस्व निर्माण केले आहे. सध्या मूद्रित आणि इलेक्टधॅनिक माध्यमात मोठया प्रमाणत स्पर्धा वाढली आहे. भारतामध्ये सर्वसामान्यांना देखील कमीत कमी किमती मध्ये स्मार्टफोन मिळत आहे. सोशल मिडिया हा आज प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनत आहे.

**उद्देश** : १. संबंधीत साहित्याचा आढावा घेणे. २. समाज माध्यमांचा अर्थ स्पष्ट करणे. ३. समाज माध्यमांचा मानवी जीवनावरील प्रभावाचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्य** : १. समाज माध्यम हे संपर्काचे प्रभावी माध्यम आहे. २. तरूणपिढी समाजमाध्यमांचा मोठया प्रमाणात वापर करीत आहे. ३. समाजमाध्यमांचा सकारात्मक वापर करणे काळाची गरज.

**तथ्य संकलन** : संशोधन पेपर तयार करताना दुय्यम तथ्याचा आधार घेण्यात आला.

**समाजमाध्यमांचा अर्थ** : समाज माध्यम म्हणजे वेबसाईट व ॲपच्या वापरकर्त्यांना सामग्री तयार आणि सामायिक करण्यास किंवा सोशल नेटवर्किंगमध्ये भाग घेण्यास सक्षम करतात. साधारणपणे इंटरनेटवर आधारीत जी माध्यम आहे त्यासाठी समाज माध्यम असा शब्द वापरला जातो. सोशल मिडिया म्हणजे वेब २.० आधारीत इंटरनेट अप्लीकेशन असून यूजर्स ने तयार केलेल्या पोस्ट, कमेंट्स, फोटो, व्हिडिओ, ऑनलाईन पध्दतीने तयार झालेला डेटा हे सर्व मिळून सोशल मीडीया तयार होतो. यूजर्स त्यांच्या गरजेनूसार त्यात या सोशल मिडिया किंवा ॲपवर स्वतःची प्रोफाइल तयार करतात. सोशल मिडियावर सोशल नेटवर्क व्दारे एकमेकासोबत किवा ग्रूप तयार करून ऑनलाइन संपर्कात राहता येते. WhatsApp, Facebook, YouTube, Instagram, Twitter, LinkedIn, Viber, Pinterest, इ.सोशल मिडियाचे प्रभावी माध्यम आहे.

**समाजमाध्यमांच्या विकास** : भारतामध्ये १५ ऑगस्ट १९९५ पासून विदेश संचार निगम लिमिटेड च्या माध्यमातून इंटरनेटच्या सेवेची सूरवात झाली. १९९९ च्या दूरसंचार धोरणानूसार खाजगी इंटरनेटधारकांना देशात इंटरनेट सेवा देण्यास परवानगी मिळाली. २००२ पासून त्याची प्रत्यक्षात अमलबजावणी सूरू झाली. माणसाना एकमेकाशी जोडणे व संवाद घडून आणण्याच्या उद्देशाने १९९९ मध्ये 'सिक्स डिग्रीज डॉट कॉम'सूरू झाले. २००२ मध्ये 'फेंडस्टार' या अमेरीकन सोशल मिडिया कंपनीने भारतात आपली सेवा सूरू केले. त्यामूळे फेंडस्टारचा सर्वाधिक वापर करणा-या जगभरातील १५ देशामध्ये भारताचा क्रमांक हा वरचा होता. त्यानंतर

भारतीय वंशाच्या रामूयमलंची यांनी २००२ मध्ये 'हायफाइव्ह' या समाज माध्यमाला सूरवात केली. त्यानंतर २००४ पासून गूगूलचे 'आर्कूट' हे जगभरातील समाजमाध्यमांचे व्यासपीठ बनले. आर्कूट हे भारतातील सर्वात मोठे सोशल मिडिया व्यासपीठ होते. २००८ मध्ये सर्वाधीक भेट देणा-या लोकांची वेबसाईट म्हणून आर्कूट ची नोंद झाली. अवघ्या सहा वर्षानंतर म्हणजेच २०१४ मध्ये गूगलने ही सेवा बंद करण्याची घोषणा केली. २००६ मध्ये मार्क झुकेरबर्ग यांनी आपल्या फेसबूक या सोशल मिडियाची सेवा जगभरातील सर्वसामान्यांसाठी खूली केली. भारतात २००८ पासून यूट्यूब, ट्विटर आणि मायस्पेसच्या २००९ पासून linden या समाजमाध्यमाला सूरवात झाली. २०१० पासून इन्स्टाग्राम याने भारतीय समाज माध्यमांच्या स्पर्धेत आपला जम बसवला. २०२० ला स्टोटिस्टा च्या आकडेवारीनूसार भारतात एकटया फेसबूकचे तीसकोटी वापरकर्ते आहेत. जगातील सर्वाधिक फेसबूक वापरकर्त्यांचा देश म्हणून भारताची वेगळी ओळख तयार झाली आहे. २०१८ मध्ये भारतात समाजमाध्यम वापर करणा-यांची संख्या ३२ कोटी ६० लाखावर असून ही संख्या २०१३ पर्यंत ४५ कोटी पर्यंत पोहचण्याचा अंदाज स्टाटिस्टा ने वर्तविला आहे. अवघ्या तेविस वर्षाच्या काळात समाजमाध्यमांनी समाजातील प्रत्येक व्यक्तिवर आपले वर्चेस्व निर्माण करण्याचा प्रयत्न सूरू केला आहे. २००० नंतर विकसित झालेल्या समाजमाध्यमाने तर इंटरनेटची व्याख्याच बदलून टाकली आहे. सूरवातीच्या काळात इंटरनेटवरील अधिकतर माहीती ही एकतर्फी व स्थिर स्वरूपाची होती. पूढे जसजसे तंत्रज्ञान विकसित होत गेले तसतसे इंटरनेटचे स्वरूप हे परस्परसंवादी बनत गेले. स्थिर माहीतीला गतीमान स्वरूप मिळाले. माहीतीचे आदान प्रदान वाढले यातून माहीतीचे महत्व कंपणीच्या लक्षात आले. पैसा, मानवसंसाधन, पायाभूत सूविधा या बरोबरच डेटा देखील एक संपत्ती आहे हे त्यांनी ओळखल त्यातून समाजमाध्यम विकसित करून लोकांकडून अधिक अधिक माहिती गोळा करणे व त्या माहितीच्या विक्रितून पैसाा मिळवणे हे त्यांच्या उत्पन्नाचे साधन बनले. साधारणपणे २००४ पासून 'डाटा अनालीटिक्स' म्हणजे 'माहिती विष्लेशण' सूरू झाले. त्यामूळे कंपण्यांच्या उत्पन्नाचा एक प्रकारचा झरा सूरू झाला. समाजमाध्यमांवर लोकांना जास्तीत जास्त गूंतवणूक ठेवण्याच्या प्रयत्नातून 'उपभोक्ता गूंतवणूक' (यूजर एंगेजमेंट) ही नवी संकल्पना विकसित झाली.

**समाजमाध्यमांचा मानवी जीवनावरील परीणाम :** समाजमाध्यम हे दूधारी तलवारीसारखे आहे. ज्याचा परीणाम हा वापर कर्त्यावर अवलंबून आहे. समाजमाध्यमांचा गरज म्हणून योग्य वापर केला तर व्यक्तिमवाचा पर्यायाने देशाचा विकास होतो. समाज माध्यम हे प्रभावि असून माहिती आणि ज्ञानाचे भंडार आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय दृष्ट्या व्यक्तिला व राष्ट्राला समृध्द बनविण्याचे कार्य समाजमाध्यमातून करता येते. राजकारण, समाजकारण या विषयी मानवी समाजामध्ये जागरूकता व सजगता निर्माण करण्याचे कार्य समाजमाध्यमातून होवू शकते. हे २०११ साली अण्णा हजारे यांच्या उपोषणाला तर २०१३ च्या निर्भया प्रकरणाला समाजमाध्यमातून मोठा पाठिंबा मिळाला. वेगवेगळया प्रकारच्या अपत्तीग्रस्थांना मदत करण्यासाठी संकटाच्या काळात समाजमाध्यम मोठया प्रमाणत उपयोगी व महत्वाचे ठरले हे विसरता येत नाही. समाजाशी जूळलेल्या आणि आणि महत्वाच्या समस्यांना उघडकिस आणण्याबरोबरच शासनाचे जनतेकडे होणारे दुर्लक्ष, जनतेच्या विकासासाठी आखलेल्या योजना, त्याची अमलबजावणी, आणि त्याचे परीणामयाचा आढावा घेण्याचे महत्वाचे कार्य देखील समाजमाध्यमातून होत आहे. समाज जागृतीचे एक प्रभावी साधन आहे. कोरोणाच्या काळात समाजमाध्यमांचा सकारात्मक वापर करून किती तरी चांगल्या गोष्टीला प्रोत्साहन मिळाले आहे. शिक्षणक्षेत्र असो किंवा व्यवसाय यामध्ये समाजमाध्यमाणे प्रभावी भूमिका निभावली. राजकारणातील सर्व बारीकसारीक गोष्टी सर्वसामान्यापर्यंत पोहचवण्याचे कार्य समाजमाध्यमातून केले जात आहे. समाजमाध्यमातुन अतिशय जलद गतीने बातम्याचे प्रसारण होत आहे. व्यक्ती, संस्था, संघटना, राज्य, देश यांना सशक्त करण्याचा प्रयत्न समाजमाध्यमातून केला जातो. आपल्या राज्यघटनेने १९ (१( (अ( नूसार प्रत्येक नागरीकाला अभिव्यक्तिचे स्वातंत्र्य दिले आहे. स्वातंत्र्यासह काही मर्यादाही राज्यघटनेने नमूद केले आहे. पण याची नेमकी अमलबजावणी समाजमाध्यमावर होतांना दिसत नाही. आपण सर्वानी जबाबदारीने वापर करून समाज जीवन सूखकर व विकसित करण्याचा सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे. समाजमाध्यमांचा आधार घेवून सकारात्मक कामे करता येतात हे न विसरता समाजपरीवर्तनाचे महत्वाचे साधन म्हणून याचा सकारात्मक व विधायक कार्यासाठी वापर करणे आवश्यक आहे. समाजमाध्यमावरील अफाट माहीतीच्या साठयाला ज्ञानाची जोड देवून मूल्यसंवर्धन घडून आणणे हे सूजान नागरीकाचे कर्तव्य आहे व हे समाज विकासाच्या दृष्टीने

महत्वाचे आहे. हे सर्वांनी लक्षात ठेवून समाजमाध्येम वापरणे गरजेजे आहे.

कृत्रिम बूध्दिमत्तेचा वापर करून वापरकर्त्याच्या सर्व हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम या समाजमाध्यमातून केले जात आहे. मागणी तसा पूरवठा या सूत्राचा वापर करून विविध कंपण्या समाजमाध्यमांचा प्रसार व विकास करीत आहे. सर्वसामान्यांना आपल्या जाळयात ओढत आहे. सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत बहुसंख्य लोक हे समाजमाध्यमांच्या आहारी गेले आहे. मानवाने आपल्या गरजापूर्ततेसाठी समाजमाध्यमांचा मोठया प्रमाणत विकास घडून आणला आहे. समाजमाध्यम मानवाने विकसित केले आहे मात्र ते हाताळण्याचे भान तो हरवून बसला आहे. समाजमाध्यम हाताळतांना माणूस भावणाषून्य होवून हाताळतो की काय असे वाटू लागले आहे. समाजमाध्यमांचा मोठा परीणाम मानवी जीवणावर झाला आहे. समाजमाध्यमांचा गरज म्हणून वापर केल्यास सकारात्मक परीवर्तन घडून येते हे दिसत असले तरी आज याचा वापर हा मनोरंजनासाठी मोठया प्रमाणत होतांना दिसतो. त्यामूळे मानवाच्या वेळ, काळ, भान याचे संतूलन बिघडत आहे. समाजभान विसरून बेभान होवून समाजमाध्यमांतून आभासी जगातल सूख घेण्याचा व वास्तव विसरण्याकडे मानवी जीवन वळत आहे. ही बाब विचार करण्यास प्रवृत्त करते. प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ एमिल दूर्खीम यांच्या मते, 'मनुष्य स्वतःला काय अपेक्षित आहे असा कधीच जगत नाही तर तो समाजाला काय अपेक्षित आहे असा तो जगत असतो.' हे त्याचे विधान आजच्या समाजमाध्यमांचा विळख्यात अडकलेल्या समाजाकडे बघून खरे वाटायला लागते. कारण लोक वास्तविक जीवन जगण्यापेक्षा इतरांना दाखविण्यासाठी जीवन जगत असतांना दिसून येत आहे. मानवी समाजामध्ये सामाजिकरणाची प्रक्रिया ही अत्यंत महत्वाची प्रक्रिया आहे. कारण जन्माला आलेला बाळ हे केवळ हाडामासाचा गोळा असतो. त्याला अनेक घटकांच्या माध्यमातून समाजशिल प्राणी बनवल जाते. कूटूंब, शेजारी, नातेवाईक, शिक्षण, विविध संस्था, प्रसारमाध्यम, जनमत इत्यादी सर्व सामाजिकरणाची साधने आहेत. सध्याच्या काळात समाजमाध्यम हे सामाजिकरणाचे प्रभावी साधन दिसून येते. शिकणे आणि शिकविण्याच्या प्रक्रियेतून व्यक्तीचे व्यक्तिमत्व विकसित होते. जन्मापासून व्यक्तिवर समाजमाध्यमांचा परिणाम होतांना दिसून येतो. इंटरनेटच्या माध्यमातून आज आभासी जगाची निर्मिती झाली आहे. समाजमाध्यमामूळे मानवी मन हे वास्तविक जगापासून दूर होवून आभासी जगात रमतांनी दिसत आहे. मूले मैदानी खेळाऐवजी मोबाइलवर आभासी खेळात रमतांना दिसतात. लहानांनपासून वृध्दांपर्यंत व्यक्ति काल्पनिक जगात रममान होतांना दिसतो. समाजमाध्यम हे संवादाचे माध्यम आहे. आपल्यापासूनदूर राहणारे नातेवाईक मित्रमंडळी या सगळयांना एकत्र बांधून ठेवण्यास त्याचा उपयोग होईल म्हणून संवादासाठी निर्माण केले. समाजमाध्यमामूळे आज संवादाची परिभाषा बदललेली आहे. वास्तविक जगण्यापेक्षा दिखावू जगण्याला महत्व आले आहे. अभासी जगात रममान होणा-यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे याचा परीणाम म्हणून व्यक्ति वास्तविक जीवनातील सूख घेणेच विसरत आहे. आपल्याकडे जे आहे त्यात सूख न मानता जे नाही त्यासाठी दूःखी होवून जगत आहे. सतत समाजमाध्यमात रममान असणारी माणस ही एकलकोंडी बनत चालली आहे. समाजमाध्यमाच्या माध्यमातून सगळया मानव जातीच्या मेंदूचा ताबा हा जगातील काही मोजक्या लोकांच्या हाती जात आहे. हा भविष्यातील मानवजातीला सर्वात मोठा संभाव्य धोका आहे. परीवर्तन हा निसर्गाचा नियम असला तरी परीवर्तनाची दिशा मात्र विचारात घ्यावे लागणार आहे. समाजमाध्यमामूळे माणूस माणसाशी जोडला गेला पण त्यामधील प्रेम, आपूलकी, जिव्हाळा, संवाद हे कमी होत आहे. एकाच छताखाली राहणा-या लोकांमध्ये ही परकेपणा व औपचारीकता दिसून येते. माणसापेक्षाही माणसाला समाजमाध्यम ही जवळची वाटू लागली आहे. याचा परिणाम सामाजिक संरचनेवर, सामाजिक संस्थेवर होत आहे. इझराईलमधील तेलविल विद्यापीठात आणि शालवन हेल्थ केअर सेंटर मध्ये झालेले संशोधन असे म्हणते की, 'समाजमाध्यम हे मानवाला वास्तविक जगापासून दूर घेवून जात आहे. याच्या अती वापरामूळे माणूस अभासी जगावर विश्वास ठेवतात. लोकामध्ये मानसीक आजार वाढतांना दिसतात, समाजमाध्यमाच्या परिणामामूळे व्यक्तिचे खाण्याकडे दूर्लक्ष, मानसिक आजार, नैराश्य वृत्तीत वाढ, ताणतणवात वाढ, व्यसनाधिनतेत वाढ, कौटूंबिक कलह, धार्मिक कलह, सामाजिक असंतोष, नैतीकमूल्यांची घसरण, स्वतःला कमी लेखने, कौटूंबिक विघटन, विवाह संस्थेचे अस्तित्व धोक्यात येत आहे. बालकापासून वयोवृध्द व्यक्तिपर्यंत अनेक नव्या समस्या निर्माण झाल्याचे चित्र समाजात दिसून येत आहे. समाजमाध्यमामुळे महिलांना आज दृष्य स्वरूपातील गून्हयासोबतच आज अदृष्य स्वरूपातील अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. सोशल मिडीयाचा वापर करून महिलांची बदनामी करणे, तसेच त्यांचे चरित्रहनन करण्याचे प्रकार सर्रास सुरू आहे. नको त्या जाहीरात बाजीला महत्व देवून सर्वसामान्यांची

दिशाभूल करण्याचे काम समाजमाध्यमातून होतांना दिसते.

**निष्कर्ष :** वरील तथ्याच्या आधारे निघालेले निष्कर्ष पूढिलप्रमाणे.. १( सोशल मिडीयाचा वापर किती आणि कसा करावा ? याचे साधे गणित न समजल्यामूळे व समाजमाध्यमे या अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी अतिसंपर्क व अतिवापरामुळे विकृतपणा वाढत असून मोबाईलचे व्यसन जडून मानसीक आरोग्य धोक्यात येत आहे. २( समाजमाध्यमातून प्रसारीत होणारी माहिती ही शंभर टक्के बरोबरच असते असे नाही. सत्य-असत्य याची पडताळणी न करता केवळ आपल समाजमाध्यमावर अस्तीत्व दाखविण्यासाठी डोळे बंद करून अनेक गोष्टी आपण फॉरवर्ड करतो. माणूस हा बूध्दिमान प्राणी आहे. परंतू तो बूध्दिचा वापर न करता समाजमाध्यम हाताळतांना दिसतो. फॉलोवर्स आणि लाईक्स, व्हयूज या आकडयामध्ये तरून पिढी अडकलेली दिसते. समाजमाध्यमांनी आपल्या पैशापेक्षाही आपल्या प्रायव्हसीवर घाला घातला आहे. ३( समाजमाध्यमांचा वापर सकारात्मकरीत्या करणे काळाची गरज असून समाजमाध्यमांच्या सकारात्मक वापरातून विवेकी समाज निर्माण होवू शकतो. भारतात उपलब्ध असलेली पण अद्याप उपयोगात न आणलेले मनुष्यबळाचा सकारात्मक उपयोग करता येवू शकते. ४( समाजमाध्यमातून तरूणाईच्या अभिव्यक्तिचा विस्फोट घडून आला आहे. आपल्या पोस्टला लाईक कसे मिळतील यासाठी स्पर्धा सूरू झाली. समाजमाध्यमांचा वापर गरज म्हणून करणा-याचे प्रमाण कमी असून आज याचा वापर हा मनोरंजनासाठी मोठया प्रमाणात होतांना दिसतो. ५( समाजमाध्यमांच्या अती वापरामूळे माणूस वास्तविक जगापासून दूर जात असून आभासी जगात रममान होणा-याचे प्रमाण अधिक वाढत आहे. त्यातून मानसीक आजाराचे प्रमाण वाढत आहे. ६( समाजमाध्यमाच्या विकासाने माणूस माणसाशी जोडला गेला असला तरी त्याच्या अतिवापरामूळे आज मनुष्य भावनाश्युन्य व एकलकोंडा बनत आहे. समाजमाध्यमामूळे आज संवादाची परिभाषा बदललेली आहे. ७( समाजमाध्यमांवर लोकांना जास्तीत जास्त गूंतवणूक ठेवण्याच्या प्रयत्नातून 'उपभोक्ता गूंतवणूक' (यूजर एंगेजमेंट) ही नवी संकल्पना विकषित झाली आहे. समाजमाध्यमाच्या माध्यमातून सगळया मानव जातीच्या मेंदूचा ताबा हा जगातील काही मोजक्या लोकांच्या हाती जात आहे. ८( समाजमाध्यमावरील अफाट माहीतीच्या साठयाला ज्ञानाची जोड देवून मूल्यसंवर्धन घडून आणणे हे सूजान नागरीकाचे कर्तव्य आहे. व हे समाज विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

**सारांश :** समाजमाध्यमांचा वापर सकारात्मकरीत्या करणे काळाची गरज असून समाजमाध्यमांच्या सकारात्मक वापरातून विवेकी समाज निर्माण होवू शकतो. प्रत्यकाने आपल्या हातून चूकिचा संदेश जाणार नाही याची काळजी घेतल्यास सोशल मिडिया हे समाज विकासाचे व परीवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरेल. भारत हा यूवावर्गाचा देश आहे ज्याला या परीवर्तनात महत्वाची भूमिका पार पाडायची आहे. सोशल मिडिया समाजातील घडणा-या विविध घटना प्रतिर्बिबित करतात, समाजाशी जूळलेल्या महत्वाच्या गोष्टी समाजासमोर उघडकिस आणले जाते. सोशल मिडियाच्या माध्यमातून लोकांमधील सीमारेषा गळून पडत आहे. सोशल मिडियाचा वापर अतिशय काळजीपूर्वक आणि जबाबदारीने केला पाहीजे. आज सोशल मिडिया हा प्रत्येकाच्या जिवणाचा अविभाज्य घटक बनत आहे. सध्याच्या मार्केटिंग यूगात यूथफूल जनरेशनच्या सर्व मागण्या सोशल मिडियाकडून पूर्ण होत आहे या व्हर्च्यूअल जगाचे व्यवसायिक स्वरूपही आज प्रचंड वाढत आहे. समाजमाध्यमाच्या अति वापराचा परिणाम आपल्या शारीरीक व मानसिकतेवर देखील मोठया प्रमाणात होत आहे. यातून मनोरूग्णांची संख्या ही वाढत आहे. समाजमाध्यम कसे वापरतात, काय वाचतात, काय पाहतात, किती प्रमाणात त्याचा वापर केला जातो या सगळयाचा परीणाम व्यक्तिच्या व्यक्तीमत्वावर होतो व त्यामधून व्यक्तीची एक प्रतिमा तयार होते.

***संदर्भग्रंथ-***


१. *मीडिया अटोनौमी - डॉ. तुकाराम दौड, शैलजा प्रकाशन कानपुर. 2018*

२. *इलेक्ट्रोनिक मीडिया - सूधीर सोनी, वाईर्किंग बूक्स जयपूर. 2010*

३. *इलेक्ट्रोनिक मीडिया - डॉ. संजीव भानावत, राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, जयपूर 2009*

४. *http://www.esakal.com*

५. *http://www.lokmat.com*

६. *http://www.loksatta.com*

# भारतातील वृध्दांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास

*डॉ. रामदास वैद्य, समाजशास्त्र विभाग प्रमुख, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना. मो. ९४२३७१२५०५*

**प्रस्तावना**: कुटुंब संस्थेच्या विघटनातून वृध्दांची समस्या निर्माण झाली आहे. संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंब हे सदस्य संस्थावर आधारीत कुटुंबाचे प्रकार आहेत. भारतात वर्तमानस्थितीत वृध्दांची समस्या तीव्र स्वरूपात जाणवत आहे. जीवनातील मावळता कालखंड म्हणजे वृध्दावस्था'. साधारणत: वृध्द म्हटले की, चेह-यावर आणि त्वचेवर सुरकत्या अंगात कुर्ता धोतर, डोक्यावर पांढरी टोपी, हातात काठी, कपाळावर टिळा अशी व्यक्ती डोळयासमोर येते. त्याला आपन वृध्द म्हणतो. आपल्या देशात वृध्दांच्या जीवनातील समस्या दिवसेंदिवस भेडसावत आहेत.

प्राचीन काळी भारतात वृध्दांविषयी आदरभाव होता. लोक वृध्दांची सेवा अत्यंत आदराने स्नेहपूर्वक करत होते. परंतु सद्यास्थितीत वृध्दांचे महत्व कमी झाले असे वाटते. कुटुंबातील वृध्द मंडळी म्हणजे लोकांना अडचण वाटू लागली आहे. वृध्दांना आज अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. संयुक्त कुटुंब पध्दतीत वृध्द व्यक्तींना मानाचे स्थान होते. त्याचे अनुभव अनुभवाची शिदोरी समजली जात असे, परंतु विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारलेल्या औद्योगिक क्रांतीने व इतर क्षेत्रामुळे विभक्त कुटुंब पध्दती उदयाला आली. औद्योगिकरणाच्या वातावरणात व नव्या शिक्षण व्यवस्थेच्या कक्षेत जन्मलेली व वावरणारी मुले माता-पित्यांच्या नैतिक प्रभावापासून निसटून लागली आहेत. वृध्दांच्या समस्या मध्ये प्रमुख समस्यांचा विचार पुढील प्रमाणे:

१( **वैयक्तिक समस्या:** वृध्दत्व हा प्रत्येक आयुष्यातील एक अपरिहार्य असा टप्पा आहे. या टप्प्यावर अशी एक वेळ येते व व्यक्ती इतकी असाह्य होते की, त्याला इतरांच्या सहायते शिवाय जगणे अशक्य होते व स्वत:चेच वृध्दत्व ही एक समस्या वाटते. सजीवांचा नैसर्गिक विकास हा जन्मापासून बालवयाच्या किशोरावस्था, तारूण्यावस्था, पौढावस्था व वृध्दावस्था असा असतो. माणसाच्या आयुष्यात यातील प्रत्येक अवस्थेत काही व्यवस्थेतील समस्या भिन्न स्वरूपाच्या असतात. बहुतेक वृध्दांच्या जोडीदार त्यांना सोडून गेलेला असतो. सुख-दु:ख ऐकून व समजून घेणारे जवळचे कोणी नसते. वैयक्तिक अडचणी सोडविण्यासाठी इतरांची मदत टाकावू वाटते. तिच्यात उपकाराची भावना असते. आपलेपणाची ओढ नसते. आत्मीयता, जिव्हाळा, प्रेम, त्यागाची भावना नसते. हे सर्व वृध्द व्यक्तींच्या लक्षात आलेले असते. वृध्दांला हा अपमान वाटत असतो. लाजीरवाने जगणे नको असे त्याला वाटते. लाजीरवाणे जगणे नको असे त्याला वाटते म्हणजे वृध्दांची वैयक्तिक अडचण ही त्यांच्या समस्याशी निगडीत असते.

२( **कौटुंबिक समस्या:** वृध्द व्यक्ती व इतर कुटुंबियात नेहमीच मतभेद होतात. वृध्द आग्रही हट्टी बनल्याने समायोजना अभावी त्यांच्या कुटुंबियांना ते नकोसे व तापदायक वाटते. वृध्द व्यक्तींना नातेवाईकांचे सहकार्य मिळत नाही. कुटुंबातही मान, सन्मान, प्रतिष्ठा मिळत नाही. कुटुंबात वृध्दांच्या अडचणी सोडविण्यासाठी पाणी, अथरूण, भाकरी, शौचालयाला जाणे, गप्पा मारणे, फिरायला नेणे, इत्यादी बाबीकडे कुटुंबातील सर्व लोकांचे दुर्लक्ष होते. त्यामुळे वृध्दांच्या समस्या निर्माण होते.

३( **मानसिक समस्या**: वृध्दावस्थेत विचार शक्तीचा -हास होतो. वयोमानाप्रमाणे मानसिक बदल घडून येतात. कार्यक्षमता कमी होणे, काही शिकण्याची आवड नसने, विसरभोळेपणा वाढणे, इत्यादी मानसिक बदल होतात. वृध्द व्यक्ती भांडखोर, चिडचिड बनतात. वृध्दावस्थेमध्ये व्यक्तीत न्युनगंडाची भावना प्रामुखाने आढळून येते. घरातील व्यक्ती आपल्याला विचारीत नाहीत. त्यांना आमची गरज राहिली नाही. व्यक्ती मान, सन्मान देत नाही. अशा गोष्टीचाच ते जास्त विचार करतात. या सर्व गोष्टीचा परिणाम त्यांच्या वर्तनावर होतो आणि अनेकदा वृध्द लोकांचे वर्तन हे विक्षिप्त बनते.

४( **शारीरिक समस्या:** वृध्दावस्थेत व्यक्तीच्या शारीरात बराच जैवीक बदल घडून येतो. शारीरिक बदल हे अंतर्गत आणि बाह्य स्वरूपाचे असतात. वृध्दावस्थे मध्ये पचनसंस्था संतुलीत कार्य करत नाही. ब्लडप्रेशर कमी-जास्त होणे, कार्य शक्तीचा –हास कमी दिसणे, ऐकू न येणे, इत्यादी शारीरिक दोष निर्माण होतात. शारीरिक बदलामुळे अनेक आरोग्य-विषयक समस्या निर्माण होतात. वृध्दावस्थेत निर्माण झालेल्या शारीरिक समस्यामुळे त्यांना आरोग्यविषयक सोयी सवलती मिळणे आवश्यक असणे.

५( **बौध्दीक समस्या**: वृध्दांना बौध्दीक समस्यांचा सामना करावा लागतो. कारण जुनी मूल्य व्यवस्था जाऊन त्या जागी नवीन मुल्य व्यवस्था आलेली असते. त्यामुळे वृध्दांच्या कोणत्याही सल्ल्याचा फारसा कुणालाही उपयोग नसतो. तसेच काळाचा विचार करताना वृध्दांच्या सर्व कल्पना मान्य करणेही तरूणांना शक्य नसते. त्यामुळे घरात तरूण व वृध्द व्यक्ती यांच्यात वारंवार संघर्ष होतात. तसेच रिकाम्या वेळ असल्यामुळे त्यांना आपल्या भावना इतरांजवळ व्यवस्थित पध्दतीने व्यक्त करणेही शक्य नसते. त्यामुळे बहुतांश वृध्द हे स्वत:शीच बोलतात किंवा एकदम अबोला होतात. ही बौध्दीक समस्या बहुतेकांच्या संदर्भात निर्माण झालेली दिसुन येते.

६( **परावलंबनाची समस्या:** वृध्दावस्थेचा कालखंड हा टाळता येणारा नसतो. या काळात वृध्द अनेक दृष्टीने परावलंबी होतात. म्हणुन त्याला "परावलंबनाचा काळ" असे ही म्हणतात. ते कुटुंब भावनिकरित्या तुटलेले असतात. म्हणुन त्यांना सर्व प्रकारच्या समस्यांनी ग्रासलेले असतात. अपंगत्व तसेच सुश्रया करण्यासाठी इतरांच्या मदतीची गरज असते.

७( **स्वास्थ्यासंबधी समस्या:** वृध्दावस्था ही एक जैविक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे मानवी शरीरावर असंख्य आणि दुरगामी परिणाम होतात. त्वचेवर सुरकुत्या पडणे, केस पांढरे होणे, नाक कानाचा आकार बदलणे, दात पडणे, हातापायांना कंप सुटणे, इत्यादी बदल होतात. अंतर्गत बदलात काही पेशींचे विभाजन थांबणे, रोग प्रतिबंधक शक्तीचा –हास, श्रवण दोष, दृष्टिदोष निर्माण होतात. परंतु या आजाराकडे कुटुंबातील लोक ही लक्ष देत नाहीत. इतर ही स्वास्थ्य विषयक समस्या निर्माण होतात. अशा प्रकारे वृध्दांना विविध समस्येमधुन जावे लागणे. त्यांच्यामध्ये समायोजनाची समस्या निर्माण होते. वृध्दांना सुख आणि समाधानाने जगण्यासाठी कुटुंबातील इतर सदस्यासोबत समायोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. जर वृध्द व्यक्तीने मुलगा, सुन आणि नातेवाईकांशी समायोजन केले तर समस्या निर्माण होणार नाहीत. वृध्द लोक कुटुंबाशी समायोजन करीत नाहीत. स्वत:च्या मनात विनाकारण न्यूनगंड निर्माण करतात. कुटुंबातील सदस्यावर विनाकारण अरोप करतात. त्यामुळे कुटुंबातील इतर लोकही वृध्दांशी समायोजन करण्याचा प्रयत्न करत नाहीत. यातुन वृध्दांच्या समस्या निर्माण होतात.

८( **परकेपणाची जाणीव:** वृध्दावस्थेत परकेपणाची जाणीव होते. कर्तेपण संपल्यामुळे वृध्दाला परकेपणा आणि परावलंबित्व जाणवत असते. घर वा कुटुंबाचा सर्व अधिकार त्याच्या हातात असतो. तेव्हा त्याचे तरूणपण असते. परंतू वृध्दापकाळामुळे व्यवहाराची सर्व मुलाच्या स्वाधीन केलेली असतात. म्हातारपणात निव्वळ परकेपणा जाणवत असतो. मुलांनी आणि सुनांनी सांगावे तसे वर्तन करावे अशी शक्ती वृध्द माणसावर केली जाते. अशा प्रसंगी सर्व काही हातातून गेलेले असते. एकूनच कौटुंबिक व्यवस्थापनातून कारभारतून व्यक्ती पराधीन होते. तो काळ वृध्दत्वाचा असतो आणि याचेच दु:ख वृध्द व्यक्तीला होत असते.

९( **फुरसत वा रिकामपण:** समान वयाची माणसे गप्पा मारायला नसतात. फुरसत किंवा रिकामा वेळ वृध्दाकडे जास्त असतो. त्या वेळेत मनात नको ते विचार येत असतात. कर्ती माणसे त्यांच्या दैनंदिन कामात गर्क असतात. लहान मुले आपापल्या उद्योगात रमलेली असतात. जवळ कोणी नसते. मनातल्या गोष्टी सांगून मन हलके करण्याजोगी परिस्थिती नसते. शरीराच्या विकलांग अवस्थेमुळे कोणतेही शारीरिक कष्ट करता येत नाहीत. जाणती मानसे कामे करू देत नाही. ते आराम करण्याचा सल्ला देतात. बसल्या जागेवर शरीराला त्रास होतो. अपचन होते. भूक लागत नाही. एकुणच रिकामपण ही खरी वृध्दांची समस्या होऊन बसली आहे.

अशा प्रकारे वृध्दांना मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, बौध्दीक, स्वास्थ्यविषयक, इत्यादी अनेक समस्या भेडसावतात.

**उपाययोजना:** प्राचीन काळापासून भारतीय समाजात वृध्द व्यक्तीविषयी आदरभाव व्यक्त केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. "मातृदेवोभव-पितृदेवभव " असा आर्शिवाद गुरू शिष्यांना देत असत. परंतू आधूनिक काळात वृध्दांचे महत्व कमी झाले आहे. त्याना विविध समस्या भेडसावत आहे. म्हणुन त्या समस्या सोडवण्यासाठी पुढील उपाययोजना करता येतात. १( वृध्दांच्या समस्या सोडविण्यासाठी स्वयंसेवी संस्थानी पुढाकार घेणे गरजेचे आहे. २( वृध्दांसाठी मनोरंजन केंद्रे उभारावीत. ३( प्रत्येकाने आपले नैतिक कर्तव्य म्हणुन वृध्द आई-वडिलांचा सांभाळ करावा. ४( शासनाने प्रत्येक तालुक्यात किमान एक वृध्दाश्रम चालु करावे. ५( वृध्दांसाठी दिनकेंद्रे चालू करावीत. ६( प्रत्येक व्यक्तीनी आपल्या वृध्द आई-वडिलांचा सांभाळ करण्यासंदर्भात कायदे केले आहेत. अशा कायद्याची प्रभावीरित्या अमलबजावणी होणे गरजेचे आहे. ७( वृध्दापकाळालीन निवृत्ती वेतन सर्व वृध्दांसाठी चालु करावे.

**निष्कर्ष:** वृध्दांना मानसिक आणाराची गरज असते. शारीरिकदृष्टीने ते दुर्बल असतात. शरीराची अवयव व्यवस्थीत कार्य करीत नाही. पचनक्रिया मंदावते. शरीर दुर्बल बनते. कार्यक्षमता कमी होते. स्मरणशक्ती कमी होते. इत्यादी समस्या निर्माण होते. शारीरिक दुर्बलता असली तरी मानसिक आधार मिळाला तर वृध्द व्यक्ती चांगले जीवन जगू शकते.

***संदर्भ सुची:-***


१. *अवचार, स्मिता- भारतीय समाज व्यवस्थेतील वृध्दाश्रम.*
२. *खैरनार, दिलीप- वृध्दांच्या समस्या, चिंता आणि चिंतन.*
३. *Ahuja Ram- Social Problems in India.*
४. *माळी सुनिल- भारतीय समाज प्रश्न आणि समस्या.*
५. *आगलावे प्रदीप- भारतीय समाज प्रश्न आणि समस्या*
६. *क-हाडे बी. एम. - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या.*
७. *पाण्डये गणेश- भारतीय समाजिक समस्यॉए.*
८. *लोटे रा. ज.- भारतीय समाज आव्हाणे आणि समस्या*
९. *Sharma R. H. – Indian Social Problems.*
१०. *खडसे भा.कि. - भारतीय सामाजिक समस्या*

# भारतातील स्त्रियांप्रतीचा कौटुंबिक हिंसाचार : एक अध्ययन विशेष संदर्भ : मुंबई

***डॉ. सुरेंद्र रोटे***, *समाजशास्त्र विभाग प्रमुख, सिद्धार्थ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, फोर्ट, मुंबई*

**प्रस्तावना :** निसर्गामध्ये ज्याप्रकारे इतर प्राण्यांचा उदय झाला त्यातील मुख्यतः अनन्य साधारण प्राणी म्हणजे मानव होय. माणूस हा देखील इतर प्राण्यांसारखा पृथ्वीतलावरील एक प्राणी आहे. जिवंत राहण्यासाठी ज्याकाही मुलभूत गोष्टी इतर प्राण्यांना लागू होतात त्या गोष्टी एक प्राणी म्हणून माणसाला ही लागू होतात. जेकब ब्रोनोवास्कीच्या मते माणूस आणि इतर प्राण्यात एक मुलभूत फरक आहे तो म्हणजे इतर प्राण्यांची नवजात बालक जन्माला आल्यानंतर फार कमी अवधीत स्वतःची काळजी घ्यायला शिकतात आणि स्वंतत्र होतात. परंतु मानवी नवजात बालकांच्या बाबतीत तसे होत नाही. विशिष्ट वर्षापर्यंत जर मानवी बालकांची काळजी घेतली नाही तर ते जगू शकत नाही. त्यामुळे सामान्यतः मानवी मुल विशिष्ट वयापर्यंत दुसर्यांवर किंबहुना स्वतःच्या परिवारावर अवलंबून असते. तथापी, माणसाची एक विशेष आणि असामान्य बाब अशी आहे की माणसाच्या मेंदूचा विकास होतो. तो स्वतः मध्ये आणि आपल्या आजूबाजूच्या वातावरणात बदल घडवून आणण्याची क्षमता ठेवतो. जी इतर प्राण्यामध्ये दिसून येत नाही. मानवी समाजाच्या या मुलभूत गुणासंदर्भात विचार केला तर असे दिसून येते कि लहानपणापासून ते अगदी म्हातारे होईपर्यंत माणसाला सामाजिक प्रकियेतून जावे लागते. ज्या प्रक्रियेला आपण समाजशास्त्रामध्ये सामाजिकीकरण असे म्हणतो. सामाजीकीकरणाची ही प्रक्रिया मानवी मनावर विशिष्ट संस्कार घडवते. ज्यातून माणसाच्या वर्तणुकीची दिशा ठरते. मानवी इतिहासाच्या संशोधनातून असे दिसून येते की ज्या प्रकारे मानवी मनामध्ये दया, प्रेम, त्याग, शौर्य, घृणा आणि एकतेची भावना आहे त्यातलीच एक महत्वाची भावना जो आपण एक सामाजिक घटक म्हणून ज्याचा आढावा घेणार आहोत ती भावना म्हणजे 'हिंसाचार' होय. मानवी हिंसाचाराला अनेक पैलू आहेत. मानवी हिंसाचार हा सामाजिक आहे, धार्मिक आहे, घरगुती (ज्याला आपण डोमेस्टिक वायलंस म्हणतो) आहे. तसाच तो राष्ट्रीय आणि अंतर राष्ट्रीय देखील आहे. या संदर्भात प्रस्तुत संशोधन थोडक्यात भारतातील सार्वजनिक आणि स्त्रीयाप्रती घरगुती हिंसाचाराची वर्तणूक तसेच त्याची सामाजिक कारणे आणि टीकात्मक परीक्षण करण्याचा पर्यंत करीत आहे.

**समस्येचे विधान :** संशोधनात्मक अभ्यासामध्ये 'समस्येचे विधान' हा विभाग प्रामुख्याने महत्वाचा असतो. या विभागात, सद्यस्थितीचे सामाजिक वर्णन करून सामाजिक समस्येच्या घनतेला अधोरेखित केले जाते. समस्येचे विधान संशोधनाची गृहीतके किंवा प्रश्न परिभाषित करते. प्रस्तुत संशोधन असे गृहीत धरते की भारतीय समाजाला फार मोठा प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहास आहे. हा इतिहास उधृत करतो की प्रत्येक काळात तसेच समाज संक्रमित होत असताना आपल्याला जाती भेद, लिंग भेद, भाषा भेद आणि प्रांतीय भेद अशा अस्मितांच्या राजकारणामुळे सार्वजनिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले आहे. त्यामध्ये अंतर्गत यादवी युद्धांचा ही समावेश येतो. सातत्याने होणाऱ्या अशा प्रकारच्या हिंसाचाराच्या प्रक्रियेमुळे माणसांमध्ये हिंसाचार ही माणसाची मुलभूत, अंगभूत असलेले गुण वा कलाकौशल्य मानले जाऊ लागले. त्यामुळे आपल्या प्रांताचे परकीय टोळी पासून रक्षण होते व कुटंब ही सुरक्षित राहतात. परंतु काळाच्या ओघात समजामध्ये बदल होत गेला आणि एके काळी हिंसाचार हा सामाजिक मान्यता पावलेला मानवी स्वभाव समाजासाठी जाचक आणि विनाशकारी ठरू लागला. त्यामुळे जातीय हिंसा, धार्मिक हिंसा तसेच घरगुती हिंसा वाढू लागल्या. परिणामतः आधुनिक काळात सरकारला त्याविरोधात कडक कायदे करावे लागले. या समस्यांना समोर ठेवून प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास सुरु झाला. शब्द मर्यादा लक्षात घेवून प्रस्तुत संशोधन थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** प्रस्तुत संशोधनामध्ये प्रामुख्याने या गोष्टीवर भर देण्यात आला आहे की भारतीय समाजात एकंदरीत हिंसाचाराची वृत्ती वा वर्तणूकीचे उगमस्त्रोत काय आहे. तसेच प्रामुख्याने महाविद्यालयीन व मुंबई शहरातील तरुण मुला-मुलीं मध्ये सार्वजनिक आणि घरगुती हिंसाचाराची प्रमुख करणे काय आहेत. या बद्दलच थोडक्यात संशोधन आहे.

**साहित्य सर्वेक्षण :** साहित्य समीक्षा हा संशोधन अभ्यासाचा एक आवश्यक भाग आहे. कोणत्याही प्रस्तावित सामाजिक किंवा शैक्षणिक संशोधनामध्ये हे साहित्याचे आधारभूत सर्वेक्षण मानले जाते. साहित्य समीक्षा संशोधन रचना सुधारण्यास मदत करते. संशोधकाच्या संशोधनाच्या क्षेत्रातील ज्ञानाचा विस्तार करण्यासाठी देखील या गोष्टी मदत करतात. या गोष्टी स्पष्टता आणतात आणि विशेषतः संशोधन समस्येवर लक्ष केंद्रित करतात. ते संशोधन क्षेत्राची सैद्धांतिक मुळे प्रकट

करते. या संदर्भात, सध्याचा संशोधन अभ्यास विषयाची विशालता आणि घनता समजून घेण्यासाठी विविध सामाजिक संशोधन अभ्यासाचीही गणना करतो.

डॉ. बी. आर. आंबेडकरांनी त्यांच्या तीन पुस्तकातून हे स्पष्ट केले आहे की भारतातील जोपासलेला तसेच जनसामान्यात अंगीकृत असलेला हिंसाचार हा विशेषतः जाती द्वेषातून तयार झाला आहे. भारतातील जातीची उतरंड असमानतेवर आधारलेली आहे. एक जात दुसऱ्या जाती पेक्षा स्वतः ला केवळ श्रेष्ठ मानत नाही तर दुसऱ्या जातीला तुच्छ मानते. त्यामुळे जाती व्यवस्था ही परस्पर द्वेषावर आधारलेली असल्या कारणाने श्रेष्ठ मानल्या गेलेल्या जाती या कनिष्ठ जातींवर सातत्याने अत्याचार म्हणजेच हिंसाचार करीत असतात. डॉ. आंबेडकरांच्या मते भारतातील हिंसाचार हा प्रामुख्याने जाती व्यवस्थेवर आधारलेला आहे. अशा प्रकारच्या हिंसाचारात प्रामुख्याने महिलांना लक्ष केले जाते. भारतातील महिला ही अनेक पटीने हिंसाचाराला सामोरे जाते. जाती अंतर्गत असलेल्या दुय्यम स्थानामुळे तसेच अंतर जातीय वादातून महिलेवर जास्त प्रमाणात हिंसाचार केला जातो. (आंबेडकर:१९१९;१९३६;१९८९)

क्रिस्टोफर जेफरलोट या फ्रेंच संशोधकाच्या मते भारतातील हिंसाचार हा प्रामुख्याने धर्म आणि राष्ट्र या दोन नेहमी संभ्रमात ठेवलेल्या संकल्पनेतून जाणीव पूर्वक तयार करण्यात आला आहे. धर्म आणि राष्ट्र या संकल्पनेची पूर्ण माहिती नसलेल्या तरुण पिढीला धर्मांध बनवून नरसंहार करण्यात आल्याचे त्यांनी त्यांच्या पुस्तकात नमूद केले आहे. (जेफ्फ्रेलोट: २०२१; पान न. ४0)

**संशोधन पद्धतीशास्त्र:** संशोधन पद्धती हा प्रत्येक सामाजिक संशोधनाचा अपरिहार्य भाग आहे. संशोधन पद्धती म्हणजे आपण आपले संशोधन कसे करतो. कूपर आणि एमोरी यांनी संशोधनाची व्याख्या, 'समस्या सोडवण्यासाठी माहिती प्रदान करण्याच्या उद्देशाने पद्धतशीर चौकशी. मेथडॉलॉजी ही एक विशिष्ट शिस्तीने अनुसरण केलेली पद्धत आहे. संशोधन अभ्यासाची रचना एखाद्या विषयाच्या निवडीपासून आणि त्याच्या संशोधनाच्या नमुनासह सुरू होते. हे संशोधन अभ्यासाच्या नियोजनाच्या सुरुवातीपासून ते प्रकरणांच्या अंतिमीकरणापर्यंतच्या विषयाशी संबंधित आहे. राम आहुजा यांनी संशोधन डिझाइनचे वर्णन केले की, 'डिझाइन' या शब्दाचा अर्थ "रूपरेषा काढणे" किंवा नियोजन करणे किंवा तपशीलांची मांडणी करणे. ही परिस्थिती उद्भवण्यापूर्वी निर्णय घेण्याची प्रक्रिया आहे ज्यामध्ये निर्णय घ्यावा लागतो. 'रिसर्च डिझाईन' हे संशोधन करण्याचे धोरण आखते. तसेच ती याची योजना आहे: काय निरीक्षण करायचे आहे, ते कसे निरीक्षण करायचे आहे, ते केव्हा/कोठे निरीक्षण करायचे आहे, ते का पाहायचे आहे, निरीक्षणे कशी नोंदवायची, निरीक्षणांचे विश्लेषण/व्याख्या कसे करायचे आणि सामान्यीकरण कसे करायचे. . रिसर्च डिझाईन म्हणजे संशोधनाची उद्दिष्टे कशी साध्य होतील याची तपशीलवार योजना आहे. (आहुजा: 2001; pp. 120)

**अभ्यासाचे क्षेत्र, आणि प्रतीसादकर्ते :** प्रस्तुत संशोधनाचे अभ्यासाचे क्षेत्र हे मुंबई शहरापुरते मर्यादित होते. या मध्ये प्रामुख्याने तरुण पिढी सोबत चर्चा करून तसेच त्यांच्या अनुभवातून तसेच वाचण्यात आलेल्या पुस्तकातून हिंसाचाराची वर्तणूक, त्याची सामाजिक कारणे व ते कशा प्रकारे कमी करता येईल याबद्दल माहिती जमा करण्यात आली.

**नमुना प्रक्रिया आणि नमुना आकार :** संशोधनाची मर्यादा लक्ष्यात घेता २० प्रतीसादकार्त्यांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती जमा करण्यात आली. तर दोन गट चर्चा करण्यात आल्या. व तीन केस स्टडी करण्यात आल्या.

**नमुना तंत्र आणि नमुन्याची ओळख :** मुंबई विद्यापीठ, महाविद्यालय आणि स्थानिक असलेल्या नमुन्याकडून जे उपलब्ध असतील त्यांच्याकडून माहिती जमा करण्यात आली. तसेच नमुन्याची ओळख हा भाग वीस वायोगटापासून ते पस्तीस वायोगटापर्यंत निवडण्यात आला.

**संशोधनातून मिळालेले प्रतिसाद :** संशोधानातून मिळालेले प्रतिसाद हे प्रत्येक वयोगटातील तरुणांच्या माहिती नुसार आणि प्रगल्भतेनुसार नोंदवून घेण्यात आले. प्रश्नावलीचे काही विभाग करण्यात आले होते त्यानुसार त्यांनी त्यांची मते नोंदवली.

**घरगुती हिंसा :** घरगुती हिंसेच्या बाबतीत प्रश्न विचारले असता प्रतिसादकर्त्यांनी त्यांची उत्तरे नोंदविली की घरगुती हिंसा म्हणजे घरातील महिलेला मारहाण करणे. या मध्ये विशेष करून सासू सुनेचा छळ करते या उत्तरावर जास्त प्रतीसाद्कर्त्यानी भर दिला तर प्रतिसादकर्त्यामुलींच्या मते सासू सून एकत्र प्रेमाने राहू शकतात. तसेच सासू सुनेचा छळ करते असे नव्हे तर सून सुद्धा सासूचा छळ करते. आणखी घरगुती हिंसेचे प्रकार कोणते आहेत असे विचारले असता विद्यापीठातील विध्यार्थांकडून आलेली उत्तरे पुस्तकी अभ्यासातून आलेली पाहायला मिळाली. त्यांनी दिलेली उत्तरे अशा प्रकारे होती की घरगुती हिंसेचे प्रकार हे हुंडा मागण्याच्या प्रकारातून होतात. त्यातून महिलेचा शारीरिक छळ होतो. मानसिक छळ होतो. घरात सतत टोचून बोलणे,

विनाकारण जास्त काम सांगणे वा वेळ प्रसंगी पतीकडून वा घरातील इतर पुरुषांकडून लैंगिक अत्याचार होणे. साधारणतः स्थानिक प्रतिसादकर्त्याकडून महिलांना केवळ मारहाण होणे अशा प्रकारचे उत्तर जास्त देण्यात आले.

**सार्वजनिक हिंसा व धार्मिक दंगे :** सार्वजनिक हिंसेवर बोलताना तरुण प्रतिसादकर्त्यांनी त्यांची उत्तरे नोंदिवली की साधारणतः अशा प्रकारच्या हिंसा या दोन गटांच्या दुष्मनीतून होत असतात. मुंबईत असे प्रकार बहुतांशी झोपडपट्ट्यांमध्ये तसेच शाळकरी मुले आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थांमध्ये दिसून येतात. असे का होते असे विचारले असता या मागची प्रेरणा त्यांचे उमलत्या वयातील उसळते रक्त अशी प्रतिक्रया प्रतीसाद्कर्त्यानी दिली. तसेच आपल्याला कुणी कमी लेखू नये वा दुर्बल समजू नये अशा गोष्टींसाठी ते ताबडतोब हिंसेवर उतरतात. धार्मिक दंगे म्हणजे काय? किंवा धार्मिक हिंसा का होतात? या प्रश्नाला उत्तर देताना अधिकतम उत्तरे जी आहेत त्यांच्या मते या मागे सगळे राजकारण असते. राजकीय नेत्यांना त्यांची वोट बँक बनवायची असते. त्यामुळे अशी राजकीय मंडळी जनतेच्या जीविताची परवा करीत नाही. तसेच काही वयोगटामध्ये इतर धर्माच्या बाबतीत असलेली चीड आणि ते आम्हाला नकोत अशी भावना व्यक्त झालेली दिसली. जेव्हा अशा प्रतिसादकर्त्यांना विचारण्यात आले की तुमचे कधी वैयक्तिक नुकसान इतर धर्मियांनी केले आहे का किंवा तुमचे वैयक्तिक वाद झाले आहेत का तर त्यांच्या कडून नाही असे उत्तर आले.

**महिलांवर होणारे अत्याचार :** महिलांवर होणाऱ्या अत्याचावर प्रश्न विचारले असता जवळपास ३० ते ३५ वयोगटातील प्रतिसादकर्त्यांनी आपले पुढील प्रमाणे मत नोंदिवले. त्यांच्यामते शारीरिक हिंसेमध्ये व्यक्तीला मग ती पुरुष असो की स्त्री शारीरिक मारहाण केली जाते. पुरुषां-पुरुषांमध्ये होणाऱ्या मारहाणीमध्ये एक गोष्ट समान असते की, दोघेही पुरुष असतात. तरीसुद्धा त्यांच्यात होणारी हिंसा बघताना भीती वाटते. परंतु सगळयात घृणास्पद गोष्ट तेव्हा घडते जेव्हा एक पुरुष स्त्रीला मारत असतो. हे सहसा मुंबई सारख्या शहरी भागात सार्वजनिक ठिकाणी घडत नाही. कारण जनता सार्वजनिक ठिकणी अशा घटना सहन करत नाही. त्यामुळे स्त्रियांवर होणारे अत्याचार हे प्रामुख्याने बंद खोलीत आणि छुप्या पद्धतीने केले जातात. अशा पद्धतीमध्ये लैंगिक अत्याचार महिलेवर जास्त प्रमाणात होतो. काही प्रतीसादकर्त्यांनी असे उत्तर दिले की पूर्वी सारखे मुलींना सार्वजनिक ठिकाणी छेड छाड करण्याचे प्रकार जवळ पास आटोक्यात आले आहेत कारण मुंबईतील लोक फार संवेदनशील असल्याकारणाने अशा प्रकारात ताबडतोब हस्तक्षेप करून आरोपींना पोलिसांच्या ताब्यात देतात.

**निष्कर्ष :** संशोधनाच्या निष्कर्षात असे आढळून आले की, तरुण पिढीला हिंसाचार म्हणजे काय तसेच त्या संदर्भातील वरचेवर बाबींची माहिती आहे. तसेच हिंसाचार हा एक अमानवीय प्रकार आहे हे सुद्धा त्यांच्या प्रतिसादातून निदर्शनास आले. तथापि, हिंसाचाराचे मूळ कशामध्ये आहे हे सांगणे मात्र सगळयांनाच कठीण गेले. हिंसाचाराचा उगम कशात आहे याचे पुनर्विलोकन आपण साहित्य समीक्षेमध्ये संक्षिप्त रुपात केले आहे. हिंसाचार हा मनाविरुद्ध होणाऱ्या घटनेतून वा लहानपणापासून एखाद्या गोष्टीचा जाणीवपूर्वक तिरस्कार करण्याच्या संस्कारातून होत असतो. अस्मितेच्या राजकारणातून हिंसाचाराला प्रोत्साहन दिले जाते. हिंसाचाराची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर आहे. बाल लैंगिक शोषण, जबरदस्तीने वेश्याव्यवसाय, लैंगिक गुलामगिरी, मानवी तस्करी, वेश्यांविरुद्ध हिंसाचार बलात्कार आणि गर्भपात, कॅम्पस लैंगिक अत्याचार, सायबरसेक्स तस्करी सामूहिक लैंगिक अत्याचार, लैंगिक हिंसा बलात्काराचे प्रकार, व्हर्जिन क्लीनिंग मिथक विधवा शुद्धीकरण. हिंसाचाराचे असे असंख्य प्रकार नमूद करण्यासारखे आहेत. परंतु, आपल्या कडील शिक्षण व्यवस्थेकडे आज ही असे ठोस पर्याय उपलब्ध नाहीत जेणेकरून आपण घरगुती हिंसा आणि हिंसक वर्तणुकीवर कडक निर्बंध आणु शकतो. (टीप : शाब्दिक मर्यादेमुळे गटचर्चा आणि केस स्टडी यामध्ये अंतर्भूत केली नाही.)

***संदर्भ ग्रंथ***


१. *आंबेडकर बी. आर. (१९३६) : जाती संस्थेचे निर्मुलन, खंड. १. महाराष्ट्र सरकार प्रकाशित (१९७९)*

२. *आंबेडकर बी. आर. (१९१९) : भारतातील जाती. उगम, विकास आणि त्यांची यंत्रणा १. महाराष्ट्र सरकार प्रकाशित (१९७९)*

३. *आंबेडकर बी. आर. : अस्पृशतेवरील निबंध. खंड ५. महाराष्ट्र सरकार प्रकाशित (१९८९)*

४. *क्रिस्टोफर जेफरलोट (२०२१:) मोदी'ज इंडिया. प्रिन्स्टन युनिवर्सिटी प्रेस.*

५. *अहुजा राम (२००१): रिसर्च मेथड्स, रावत पब्लिकेशन, न्यू दिल्ली.*

# कोवीड-१९ : भारतीय स्त्रियांच्या संदर्भातील कौटुंबिक हिंसाचार

*प्रा. डॉ. अर्चना आर.कांबळे (जगतकर) प्रोफेसर व विभाग प्रमुख समाजशास्त्र. दि न्यू कॉलेज, कोल्हापूर*

स्त्रिया या समाजव्यवस्थेतील वंचित सिमांतिक समूहातील एक अत्यंत महत्वाचा घटक आहेत. त्यात पुन्हा स्त्रियांमधील वेगवेगळे वर्गीकरण करता येते. नोकरी करणा-या, व्यवसाय, शेतमजूर, बांधकाम मजूर, भांडी धुणी करणा-या, कचरा वेचक, आदिम, ग्रामीण असा वेगवेगळा अभ्यासाचा विषय आहे. परंतु कोवीड-१९ च्या निमित्ताने मात्र या विविध वर्गातील स्त्रिया या एकाच बिंदूवर येवून थांबल्या आहेत अशा दिशेने मांडणी या शोधनिबंधात करण्यात आली आहे. २० एप्रिल, २०१९ मध्ये इशानी रॉय या संशोधिकेने यासंदर्भात अभ्यास केला, त्यांच्या मते या अंत्यत आव्हानात्मक 'कोवीड-१९' या काळामध्ये आय टी क्षेत्रात काम करणा-या स्त्रिया आणि घरातील आपल्या भांडी, कचरा, स्वच्छ करणा-या स्त्रिया या एकाच बिंदूवर आल्या आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा विषय या अर्थाने आपणास समजून घ्यावा लागणार आहे. आपण सारे जाणतोच की कोरोनामध्ये संबंध जग हे वेगळ्या परिस्थिती मधून जात होते. त्याचा परिणाम समाजातील प्रत्येक घटकावर झालेला आहे. प्रस्तुतच्या शोधनिबंधामध्ये कोवीड-१९ च्या लॉकडाऊनमधील भारतीय स्त्रियांच्या संदर्भात कुटुंबात होणाऱ्या हिंसाचाराचे स्वरूप कशा प्रकारचे होते याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या निमित्ताने केला आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये** : १) कोवीड मधील भारतीय महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराचे अध्ययन करणे. २) कौटुंबिक हिंसाचारावर उपाय शोधणे.

**संशोधन पध्दती**: प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**संशोधनाचे स्त्रोत** : प्रस्तुतच्या शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून त्यासाठी पुस्तके, लेख विविध वेबसाईट वरील लेख, वापरले आहेत.

**सैधांतिक दृष्टिकोन** : या कौटुंबिक हिंसाचाराच्या लॉकडाऊन मधील कारणांचाही शोध या निमित्ताने घेण्यात आला. या पाठीमागे असणारा सैध्दांतिक दृष्टीकोन कोणता लागू पडतो याचा विचारही या निमित्ताने महत्त्वाचा आहे, या संदर्भातील सामाजिक मानसशास्त्राचा अभ्यास करणारे मानसशास्त्रज्ञ डॉलर आणि मिलर यांचा 'निराशा-आक्रमकतेचा_सिंध्दात' असे सांगतो आहे की, आक्रमकता ही नैराश्यातून येणारी बाब आहे आणि मग नैराश्य-आक्रमकता आणि त्यातून होणारा हिंसाचार हा मानवाच्या मनावरील ताणावरून वाढत जातो. अर्थातच हे सांगताना हा विचार महत्वाचा आहे की लॉकडाऊन मध्ये सगळयाच पुरूषांनी हिंसाचार केला का? तर नाही. हे मान्य करूनच काही महिने चोवीस तास एकत्र राहण्यातून पुरूषांच्या वागण्यात काही बदल दिसला का? तर 'हो'. त्याचं सामाजिक मानसिक पातळीवर चांगले विश्लेषण करता येईल.

कोरोनाच्या कालावधीत घराबाहेर पडण्याच्या मर्यादा, घरातच बंदीस्त झालो. भारतीय हे सारे उत्सवप्रिय आहेत. त्यामुळे एक प्रकारची घुसमट वाढली आणि या गोष्टींपासून अलगीकरण झाले आणि वास्तविकता सागांयची असेल तर बहुसंख्य घरांमध्ये पती-पत्नीमध्ये संवाद, वैचारिक देवाण घेवाण आणि बॉर्डिंग यांचा नक्कीच दुष्काळ आहे आणि आता तर लॉकडाऊन मध्ये तर मोबाईलमुळे अभासी जगाशी जास्त जवळीकता आणि घरातल्यांशी कमी संवाद, भिन्न संवाद, मुळात मनासारखं बाहेर जाता न येणं, पार्टीज, मित्र-मैत्रीणी बरोबर प्रत्यक्ष भेट बंद, पगार कपात, नोकरी गमावण्याची टांगती तलवार, त्या अनुषंगाने येणारी खर्चावर बंधने या सा-या वैफल्यामुळे छोटे-छोटे वाद, त्यातून मोठे वाद आणि मग शारीरिक हिंसा पत्नी, मुले मग सॉफ्ट टार्गेट त्यामुळे त्यांचा मानसिक, शारीरिक छळ, घरात तमाशा नको म्हणून स्त्रियांनी गप्प राहणे अशा अनेक गोष्टी याला कारणीभूत आहेत असा हा वर्तनात्मक फरक आहे. हा फरक ही आपल्याला समजून घ्यावा लागेल. तसेच या बाबतीत दुसराही पैलू आपण समजून घेतला पाहिजे. कोरोना काळात,"तिच्या" ही नौकरीचे स्वरूप बदलले आहे. तिच्यावर घर- कामाचा ताण वाढला आहे. घरात कामासाठी मदतनीस नाहीत, मग त्यातून येणारी चिडचिड, अपेक्षाभंग, शाब्दीक चकमक, त्यातून हिंसाचार, मानसिक, लैगिंक, शारीरिक या प्रकारे छळ होताना दिसतो आहे. हे पुन्हा अधोरेखित करावे लागते की, हे सर्व पुरुषांच्या बाबतीतले विधान नाही, उर्वरित पुरुष आहेत त्यांनी संयमाने, संवादाने, सहकार्याने नक्कीच आपल्या कुटुंबासाठी वेळ दिलेला आहे.

जागतिक पातळीवर जेव्हा जेव्हा अशी प्रकारची संकटे आली, तेव्हा त्या काळातील परिस्थिती लैंगिक असमानतेला अधोरेखित करते अशाही अर्थाने या विषयाला आपणांस समजून घेणे महत्वाचे ठरणार आहे. जागतिक महामारी (पेडांमिक) काळातील स्त्रियांच्या परिस्थितीच्या इतिहासाचे जागतिक चित्र असे आहे की,

जवळपास सर्वच युध्द, आर्थिक महामंदी, महामारी यासारख्या संकटकाळी स्त्रिया या लिंगभेदाच्या अधिक प्रमाणात बळी पडतात. त्यांची काही उदाहरणे देता येतील. डॅनियल स्नॉयडर यांनी १९३२ मधील आर्थिक महामंदीच्या परिणामांवर संशोधन केले आहे. त्यांचे हे संशोधन सांगते की, या दशकात स्त्री अत्याचाराच्या घटना वाढल्या त्याची कारणे त्यांनी शोधली. त्यामध्ये बेरोजगारी, आर्थिक चणचण, मंदी, नैराश्य आणि यातून व्यसनाधिनता आणि त्यातून होणारा स्त्रियांचा मानसिक आणि शारीरिक छळ अधोरेखित केला आहे. तर क्लेअर वेनहम आणि त्यांचे सहकारी यांनी ब्राझील मध्ये २०१४ ला इबोला व्हायरस आणि त्या नंतरचा झिका व्हायरस नंतरच्या स्त्रियांच्या परिस्थितीचे संशोधन केले आहे. त्यांच्या मते हे दोन्ही व्हायरस लिंगभाव असमानतेला अधोरेखित करतात. मुलींच्या शाळा बंद झाल्या. अल्पवयीन मुलींमध्ये गर्भधारणेचे प्रमाण वाढलेले होते. कौटुंबिक, मानसिक हिंसा वाढल्या तर सिएरा लिओ यांचे संशोधन दर्शविते की या काळात महिलांच्याच अर्थार्जनावर खूप मोठा परिणाम झाला. कारण care-taker म्हणूनची ही जबाबदारी होती त्याच बरोबर ज्यूलिया स्मिथ या आरोग्य धोरण संशोधक त्यांचे निष्कर्ष असे सांगतात की इबोला साथीनंतर पुरुषांना जॉब मिळाले आणि स्त्रिया त्यातून सोयिस्कररित्या वगळण्यात आल्या.

या विविध संशोधकांच्या निष्कर्षावरून असे सांगता येते की स्त्रिया या कोणत्याही संकटाच्या वेळी जास्त बळी पडतात. तसेच सेंटर फॉर मॉनिटरी इंडियन इकॉनॉमी चा रिपोर्ट सांगतो की, २००८ मध्ये ३५ टक्के स्त्रियांचे ज्या Highly Qualified होत्या त्यांचीही नोकर कपात करण्यात आली. म्हणजेच स्त्री आणि पुरुष या दोघांवर विविध संकट काळाचा जो परिणाम झाला तो वेगवेगळया पद्धतीने झाला म्हणूनच स्त्री-पुरुष भेदाकडे बघणे आवश्यक आहे. National Sample survey चा भारतातील रोजगाराच्या संदर्भातील एक रिपोर्ट आहे. हा अहवाल असे सांगतो की आरोग्य विभागात ८८ टक्के स्त्रिया आहेत. तसेच त्या त्यांच्या घरी आणि कामाच्या ठिकाणी नर्स, स्वच्छता कर्मचारी म्हणून त्या दोन्ही ठिकाणी केअर टेकर म्हणून भूमिका बजावतात. त्यामुळे तोही दुहेरी ताण त्यांच्यावर आलेला दिसतो आणि त्यातून कौटुंबिक कलह वाढताना दिसतात, मतभेद होताना दिसतात. तसेच भारताचा संदर्भ घेता "National women's commission" च्या चेअरपर्सन रेखा शर्मा यांच्या मते या काळात Gender based violence वाढला आहे. या संदर्भातील दखल घेण्यासाठी महिलांसाठी स्पेशल असा E-mail आणि what's app Group तयार करण्यात आला. मे २०२० चा जो अहवाल सादर केला त्यामध्ये दररोज ३५७ इतक्या केसेस रजिस्टर करण्यात आल्या होत्या, तसेच रेखा शर्मा यांची 'अमर उजाला' च्या मुलाखतीत सांगितले की त्यांनी जो what's app नंबर दिला होता त्याच्याव्दारेही दररोज ४० केसेस येत होत्या. याच लॉकडाऊनच्या काळामध्ये UNO च्या General Secretory ॲन्टीनिओ गुटेरस यांनीही जागतिक पातळीवर हिंसाचार वाढल्याचे नमूद केले होते.

भारतात 'आशा वर्कर्स' आणि 'अंगण वाडी सेविकांना' कुटुंब तपासणीचे आदेश देण्यात आले होते. एकूण २५ लाख असणाऱ्या या भगिनींना कोणत्याही संरक्षक साधनांचा पुरवठा केलेला नव्हता. ज्या परिस्थितीत त्या काम करत होत्या त्यातील काहीजणींनी सर्वेक्षणानंतर घरी गेल्यानंतरच्या पतीच्या हिंसाचाराला सामोरे जावे लागल्याचे नमूद करण्यात आले. यातीलच एक स्वाती ताई चा संदेश असा होता की, जेव्हा रामायण ही मालिका पुन्हा नव्याने सुरू झाली आणि हे टी व्ही वर बोलले जायचे की, "घरात बसा, मस्त चहा घेत रामायण बघा' परंतु ती म्हणते की, सरकारला काय जातय सांगायला, माझ्या घरी दुसरेच रामायण सुरु आहे, नवरा दारू मिळत नाही म्हणून माझ्यावर राग काढतो, शारीरिक, मानसिक छळाला सामोरे जावे लागते.


तसेच दुसरी एक अधोरेखित करण्यासाठी केस म्हणजे, एक मेल असाही एका भगिनीचा आला होता की, 'लॉकडाऊन संपेपर्यंत मला माझ्या घराऐवजी दुसरीकडे राहण्याची सोय करा. घरातील मारहाणीला, छळाला मी कंटाळली आहे. २४ तास नवरा घरातच आहे. यापूर्वी कधीतरी मारायचा आता दररोजच मारहाण करतो.

या विविध उदाहरणांवरून निश्चितपणाने असे सांगता येते की, लॉकडाऊन मध्ये महिलांच्या कौटुंबिक हिंसाचारात वाढच झाली आहे.

काही ठिकाणी मात्र अशी ही गंमत बघायला मिळाली की. काही पुरुषांनी घरात पत्नीला मदत म्हणून किचन मध्ये भाजी करतानाचा Video, फोटो मित्रांना, नातेवाईकांना दाखवण्याइतपतच 'ती' च्या कामांची जबाबदारी घेतली गेली. एखादया दिवशी घरात भांडी विसळली की दुसऱ्या मिनिटाला फोटो गेलाच तिच्या माहेरच्या ग्रुपवर, मग इथेही पुरुषांनी घरात काम केल्याचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न केला गेला.

घरच्या कामाची जबाबदारी, स्त्रीचीच हे सरसकटीकरण' समाज व्यवस्थेने मान्य केल्यामुळे अनेक पेचप्रसंग उभे राहिले आणि तिच्या कामाचा ताण, मोठ्या प्रमाणावर वाढला होता. त्यामुळे ही फार मोठ्या

प्रमाणावर मानसिक स्वास्थ बिघडलेले दिसते. लॉकडाऊन आणि कोवीडनंतरच्या काळात ही कौटुंबिक हिंसाचार असणारच आहेत. परंतु दररोजच्या त्रासातून तरी काही महिलांची मुक्ता होईल अशी अपेक्षा ठेवूयात.




वरील आकडेवारीवरून भारतातील कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप लक्षात येते. (Source - NFHS-5 2019-21)

**निष्कर्ष** : वास्तविक या परिस्थितीमध्ये बदल करण्यासाठी काय उपाय करायला हवे आहेत यावर लक्ष केंद्रीत करणे महत्वाचे आहे असे मला वाटते. १) घरातून काम करणाऱ्या, छोटे उद्योग व्यवसाय करणा-या स्त्रियांना जसे इतर कंपन्या आपल्या कर्मचा-यांना महामारीच्या अनुषंगाने इतर फायदे देऊ शकतात, तसेच फायदे या स्त्रियांना देण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. २) आरोग्य विभागात सेवा करण्याच्या संधी अधिकाधिक मिळाव्यात यासाठी प्रयत्न करावेत. ३) तसेच त्यांच्या आरोग्याची काळजी, उपचार याकडेही जाणीवपूर्वक लक्ष कुटुंबातील इतर सदस्यांनी देणे महत्वाची आहे. ४) प्रसुतीकालीन सेवेचा लाभ फक्त २१ टक्के महिलांनाच मिळतो, तर सर्व गरोदर स्त्रियांना या सेवेचा लाभ मिळावा. ५) कोवीड-१९ च्या प्रसारामुळे कदाचित पुढे शिक्षणातील लिंगभेद अधिक वाढू शकतो मुलींच्या गळतीचे प्रमाण, बालविवाहाचे प्रमाण वाढू शकते. त्यावरही ठोस उपायांची अमंलबजावणी होणे आवश्यक आहे. ६) कोवीड नंतरच्या विकासाच्या ज्या policies आहेत. त्याही सर्वेक्षण, अभ्यासानंतरच केल्या पाहिजेत. त्यात लिंगभावात्मक भेदविरहित विश्लेषण करून त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. ७) जगात दुदैवाने सगळ्यात वाईट लिंगभाव असंतुलन असलेला भारत हा एक देश आहे. त्यामुळे लिंगभाव, संतुलन निर्माण करण्याची गरज आहे. ८) कोवीड-१९ पेक्षाही जास्त हिंसाचार रूपी विषाणू हा चार भिंतीच्या आड दडलेला आहे असे म्हटले तरी अतिशयोक्ती ठरणार नाही. ९) सर्व जगालाच पुन्हा आपआपल्या देशामधील व्यवस्थेमध्ये पुनर्रचना करण्याची संधी आहे. १०) आरोग्य क्षेत्रात काम करणा-या स्त्रियांना अधिक संधी प्राप्त झालेली आहे. ११) आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या घरी त्यांच्या पतींना घरातून काम करण्याची परवानगी मिळणे आवश्यक तरच श्रमविभागणीत समतोल राहील. १२) स्त्रियांच्या ज्ञानाचा व अभिव्यक्तीचा उपयोग समाज विकासासाठी करता येईल. १३) उत्तम लिंगभाव दृष्टीकोनातून पाहिले जावू शकते.

सगळे जग आता Reset mode मध्ये आहे असे जून सरपोंग म्हणतात. त्याचा अभ्यास करून आवश्यक बाबींमध्ये सुधारणा करता आल्या पाहिजेत. एकूणच कोवीड-१९ लॉकडाऊन मध्ये पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेमध्ये, महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण वाढलेले होते हे नाकारून चालणार नाही. भविष्यात अशा प्रकारच्या जागतिक संकटाच्यावेळी लिंगभावातून निर्माण होणारा हिंसाचार कमी करण्यासाठी अभ्यासपूर्ण, जाणीवपूर्वक विचारांच्या उपायांची गरज आहे असेच निश्चितपणाने सांगता येईल.

***संदर्भ -***

1. *Krishnaraj Maithreyi, (1995), 'Women and Violence Rcws, SNDT Women's University, Mumbai.*
2. *Desai Neera and Krishnaraj Maithreyi, (1990), 'Women and Society in India', Ajanta Publication, Delhi.*
3. *Ahuja Ram, (1998), 'Violence Against Women', Rawat Publication, Jaipur.*
4. *Veena Das, (2008), Handbook of Indian Sociology OUP, New Delhi.*
5. *काळदाते सुधा, (2005), 'भारतीय समाज: प्रश्न आणि समस्या', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.*
6. *Gail Omvedt, (1997),'Violence Against Women: New Movements and New Theories in India', Kali for Women New Delhi.*
7. *https://www.goodreads.com*
8. *Nyla K/ Branscombe, Robert A Baron Adapted by Preeti Kapur, (2016),'Social Psychology', 4th Edition Pearson India Education Pvt.*
9. *म.न. पलसाने, प्रा. विद्या तळवलकर, (2000), 'सामाजिक मानसशास्त्र', कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.*
10. *महाजन जयश्री, २०१७, 'स्त्रिया आणि लिंगभाव' अथर्व प्र, जळगाव.*

# 'पेसा' कायद्याची अंमलबजावणी: एक समाजशास्त्रीय अध्ययन

***डॉ. श्रीनिवास पिलगुलवार,*** *सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा.*
***प्रा. शुभांगी भेंडे,*** *समाजशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपुर.*

**प्रस्तावना** : अनुसूचित क्षेत्र अधिनियम १९९६ पेसा हा कायदा २४ डिसेंबर १९९६ रोजी अस्तित्वात आला. या कायदयाअंतर्गत देशातील एकुण दहा राज्यांचा समावेश होता. त्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, ओरीसा, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, तेलंगाना या राज्यांना हा कायदा लागु आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील १३ जिल्हयांना हा कायदा लागु आहे. त्यामध्ये अहमदनगर, पुणे, ठाणे, पालघर, धुळे, नंदुरबार, जळगांव, अमरावती, यवतमाळ, नांदेड, चंद्रपुर व गडचिरोली यांना पेसा हा कायदा लागु आहे. हा कायदा अनुसूचित क्षेत्रातील आदीवासी लोकांशी संबधीत असून आदिवासी लोकांची संस्कृती, प्रथा, परंपरा यांचे जतन व संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातुन आदिवासींची स्वशासन व्यवस्था बळकट करणे हे या कायदयाचे प्रमुख सुत्र आहे. चंद्रपुर जिल्हयातील व तालुक्यातील ९६ गावात पेसा कायदयाची अमंलबजावणी होते. ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार पंचायत एक्सटेन्शन शेडुल एरिया अंतर्गत ५० टक्के आदिवासी भाग असणाऱ्या क्षेत्रात ग्रामसभेला विशेष अधिकार देण्यात आले आहे. चंद्रपुर जिल्हयातील ५० आदिवासीबहुल भागाचा समावेश या कायदयात आहे. चंद्रपुर जिल्हयातील राजुरा ३३, जिवत ३२, कोरपणा तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

**पेसा कायदयाची अमलबजावनी**: पाणी साठयाचे व्यवस्थापन, सामायिक जमिनीचा विकास करणे, सामायिक साधन संपदा व सामाजिक मालमत्ता विकसित करणे. गाव पातळीवरील तलावामध्ये मत्स्यबीज तयार करणे. खरेदी करणे. आदिवासींना त्यांच्या उदनिर्वाहासाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण आयोजीत करणे. त्याचप्रमाणे सार्वजनिक स्वछतागृहे, गावामध्ये स्वछता राखणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे, नविन गटारे बांधणे व त्याची देखभाल करणे, पिण्याच्या पाण्यासाठी सोय करणे. वन्य जीवन संवर्धन, जलसंधारण, पर्यटन, वण उपजीविका सामाजिक विकास वनीकरण पर्यटन स्थळांचा विकास करणे, नवीन झाडे लावणे. व जुन्या झाडांची देखभाल करणे, अतिकुपोषित बालकांचे प्रमाणे कमी करणे, बालविवाह यांच्यावर बंदी आणणे यावर मार्गदर्शन करणे, मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढविणे, वनजमीनीवर नव्याने होणारे अतिक्रमण थांबविणे, इत्यादी कामे ग्रमपंचायतीच्या गरजेनुसार घेतली जातात, पेसा अंतर्गत ग्रामपंचायतींना विशेष अनुदान रूपये उपलब्ध निधिपैकी २५ टक्के या प्रमाणात खर्च करावा.

**विभाग ग्रामपंचायत विभाग योजनेचे कार्यक्षेत्र**: अनुसुचित क्षेत्रातील पेसा गावे.

**योजनेची कार्यपध्दती**: या निधितुन संपुर्ण गावाचा विकास करण्यासाठी प्रामुखाने चार प्रकारची कामे आहे. पायाभुत सुविधा, वनहक्क अधिनियम व पेसा कायदयाची अमंलबजावणी, आरोग्य व स्वच्छता, शिक्षण. वनीकरण म्हणजे वन्यजीव संवर्धन वनजल संधारण वनतळी वन्यजीव पर्यटन व वनावर आधारित उपजिवीका अमलबजावनी.

१. ग्रामपंचायतीच्या खात्यात गावासाठी निधी उपलबध केल्या जातो. — ग्रामपंचायतीला आपल्या गावातील लोकसंख्येनुसार निधी मिळतो यासाठी ग्रामपंचायतीला एक वेगळे बॅक खाते उघडावे लागते, प्रत्येक वर्षाला ग्रमपंचायतीच्या खात्यात शासनाकडुन निधी जमा केल्या जातो, हा निधी वर्षाच्या सुरवातीलाच बॅकेत जमा केला जातो. जेणेकरून वर्षभरात गावाच्या विकासासाठी या निधिचा उपयोग करता येईल, हा निधी ग्रामतपंचायतीच्या येणाऱ्या सर्व महसुली गावासाठी आणि पांडया साठी लोकसंख्येच्या प्रमाणात वापरायचा असतो. ज्यामुळे सर्वांना लाभ मिळेल व कोणीही विकासापासुन वंचित राहणार नाही.

२. ग्रामसभेमार्फत निधीच्या खर्चाला मान्यता दिली जाते. — ग्रामपंचायतीच्या मिळालेल्या निधीतुन कोणती कामे करायची याचा निर्णय ग्रामसभा घेते, त्यामुळे विकासाचे निर्णय आणि त्याची अमलबजावणी झटकण केली जाते, मात्र तीन लाखापेक्षा जास्त खर्चाचे कामे असेल तर पंचायत समितीला प्रस्ताव पाठवुन मान्यता घ्यावी लागते, दरवर्षी ग्रामसभेमध्ये चार पैकी एका विषयाची निवड करून ती कामे वर्षभरात पुर्ण करायची आहे. आणि पुढच्या वर्षी उरलेल्या तीन पैकी एका विषयाची निवड करायची आहे. यामुळे आपल्या गावाचा विकास ग्रामस्थांना सगळया बाजुने करता येईल व सर्व गरजा गावातुन पुर्ण होतील अशा प्रकारची अमलबजावनी या कायदयात केलेली दिसुन येते.

**नियोजनाचा आराखडा**: निधीचा वापरा करण्याचे स्वातंत्र्य ग्रामसभेला असलयामुळे गावाचा पध्दतशिर नियोजन आराखडा तयार करण्याची जबाबदारी ग्रामसभेची असते. आराखडा दोन प्रकारे केला जातो, पुढच्या पाच वर्षात आपल्या ग्रामपंचायतीच्या विकास कसा व्हावा याचा दुष्टिक्षेप आराखडा आणि प्रत्येक वर्षी करायच्या कामाचा वार्षीक आराखडा, दरवर्षी दिनांक १ मे रोजी चा ग्रामसभेमध्ये वार्षिक आराखडयाला मान्यता द्यायची आहे. आणि हा आराखडा तयार करतांना प्रत्येक गावातील एक पाडयावरिल लोकांचा विचार होणे आवश्यक आहे. हयानंतर सर्वांच्या सहमतीने ग्रामपंचायतीचा आराखडा एकत्र केला जातो.

**गावाच्या विकासासाठी विशेष स्वरूपाची कामे**: गावाला मिळणाऱ्या थेट निधीतुन इतर योजनेखाली होणारी नेहमिची कामे वगळता काही विशेष स्वरूपाची कामे केली जाते, त्यामुळे गावाचा समतोल विकास होऊन गाव स्वावलंबी बनतो. कौशल्यवृध्दी रोजगार व उत्पनात वाढ, सार्वजनिक सुविधा जसे भात गिरणी, धान्य बॅक, दुरसंचार व दळणवळण सुविधांचे बळकटीकरण समुदायीक संसाधनाचे जतन व व्यवस्थापन, दुर्गम क्षेत्रामध्ये अतिरिक्त

सुविधा कर्मचारी देणे, छोटे तलाव व खनिजे इत्यादीचे व्यवस्थापन सार्वजनिक वनहक्काचे उपक्रम गोन वनउपज यावर प्रक्रिया च्या सुविधा पर्यटन विकासाचे उपक्रम नादुरूस्त सुविधांचे दुरूस्ती व पुनरूर्जीवन ग्रामपंचायत व ग्राम सक्षमीकरण.

**विकासाच्या कामात गावातील लोकांचा पुढाकार व मदत:** गाव विकासाचा आराखडा तयार करुन उत्तम दर्जाची कामे करण्यासाठी स्थानिक पातळीवरील स्थानिक संस्थांची मदत घेण्याचे स्वातंत्र्य असते. यासाठी कंत्राटी पध्दतीवर कर्मचारीसुध्दा न विचारता त्याचप्रमाणे गावातील समिती या गावांच्या विकास कार्यात मदत करतात. ग्रामसभेच्या मागणीनुसार विकास कामासाठी प्रशासकीय विभागांची अभियंता, तांत्रिक व्यक्तिंचे सहकार्य सुध्दा लागते.

**खर्चाचा हिशोब:** दरवर्षी गावाच्या निधीतून ही विकासाची कामे केली जातात त्याच्या हिशोबाची तपासणी आणि लेखाजोखा गावानेच करायचा असतो व संबंधित माहिती ग्रामपंचायतीच्या रजिस्टर व सूचना फलकावर जाहीर केली जाते यामूळे गावात विकासाच्या कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होतो व गावाच्या विकासाच्या कामात सर्वांचे हातभार लागणे व मनापासून सहकार्य प्राप्त होते मात्र जर कामे यामध्ये गैरव्यवहार आढळून आला तर गावाला पुढच्या वर्षी निधी मिळणार नाही.

**प्रोत्साहन निधी:** या योजनेच्या पहिल्या वर्षी लोकसंख्येनुसार शंभर टक्के निधी ग्रामपंचायतींना मिळतो. मात्र दुसऱ्या वर्षापासून ५० टक्के निधी ग्रामपंचायतीच्या कामगारी नुसार देण्यात येतो. १०० टक्के निधी मिळवण्यासाठी काही अटी पूर्ण कराव्या लागतात. जसे गावातल्या कुपोषित मुलांचे प्रमाण कमी झाले पाहिजे. बालविवाह थांबले पाहिजे. मुलींची शाळेतून गळती कमी झाली पाहिजे. चांगल्या वरच्या अतिक्रमण कमी व्हायला हवेच. संपूर्ण कर वसूली झाली पाहिजे. इत्यादी अशा पध्दतीने ग्रामपंचायत उत्कृष्ट रीतीने काम करेल त्या ग्रामपंचायतीला प्रोत्साहनपर बक्षीस स्वरुपाने भेटते. यासाठी संपूर्ण गावाचा हातभार जरुरी आहे.

भारतामध्ये भारतीय राज्यघटनेनुसार आदिवासींना **'अनुसूचित जमाती'** अशा नावाने वर्गिकृत करण्यात आले आहे. या आदिवासी जमातीचे भारताच्या सर्व राज्यात कमी—अधिक प्रमाणात वास्तव्य असल्याचे आपल्याला दिसुन येते. २००१ च्या जनगनणेनुसार भारताची एकुण लोकसंख्या १०२.७ कोटी इतकी होती. आदिवासी जमाती भारताच्या सहा विभागामध्ये मुख्यत: आढळतात १) ईशान्यभारत २) हिमाचल पायऱ्याचा भाग ३) मध्यभारत ४) पश्चिम भारत ५) दक्षिण भारत ६) अंदमान —निकोबार प्रदेश. तसेच आदिवासी समुदायात भिन्न—भिन्न भाषांचा उपयोग केला जातो. भारतीय भाषांचा सखोल अभ्यासावरून भारतात आदिवासींना चार भाषिक विभागात विभाजित केले आहे.

"गिअर्सन यांच्या संशोधन अहवालनुसार भारतात एकुण १८० भाषा व ११६ बोलीभाषा आदिवासीच्या आहेत.भाषेच्या आधारावर भारतातील आदिवासीचे विभाजन खालिल प्रमाणे चार विभागात केले आहे.

**१) आर्य भाषिक समुह:** आर्य लोकांचे भारतात झालेल्या आगमनामुळे भारताच्या बऱ्याच मोठया प्रदेशावर भाषेचा प्रभाव पडला. त्यामुळे त्याच्या मुळ भाषेवरून आजच्या हिंदी, पंजाबी, बंगाली, गुजरात, मराठी, उडिया, आसामी ईत्यादी भाषा विकसित झाल्या आहेत. महाराष्ट्रातील वारली कातकरी ठाकुर तसेच मध्य भारतातील भिल्ल यांच्या भाषा या विभागात मोडतात.

**२) द्रविड भाषिक:** वायव्य व दक्षिण मध्य भारतात द्रविड भाषा बोलली जाते. कोरवा, थरावा, बडग, तोडा, कोटा, गई, गोंड इ. भाषा मुळ द्रविड भाषेतुन जन्मल्या आहेत.

**३) ऑस्ट्रीक एशियायिक:** भारताच्या मध्यवर्ती राहणाऱ्या आदिवासींच्या या गटात समावेश केला जातो कोळी, मुंडा, खाती, निकोबरी, कोरकू, खरिया, सवरा, गडवा या जमातीच्या बोली या गटात मोडतात.

**४) तिबेट —चिनी भाषा:** भारताच्या उत्तर व ईशान्य भागात राहत असणाऱ्या आदिवासीच्या या गटात समावेश होतो. नागा, कुकी, खासी, डफळा, मिरामी, मिकीर हे लोक चिनी—तिबेट भाषिक समजले जातात.

महाराष्ट्रातील एकुण २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये असुन त्यापैकी ११ कार्यालये अतिसंवेदनशिल म्हणुन घोषीत करण्यात आली आहेत. यामध्ये नाशिक, कळवण, तळादा, जव्हार, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे.

**पूर्व साहित्याचा आढावा: बोकील, (२०१४),** बोकील यांच्या मते, शासन अनुसूचित क्षेत्रामध्ये भुमिसंपादन करणार असेल तर ग्रामसभेची फक्त विचारविनिमय करण्याची तरतुद आहे. मात्र ग्रामसभेचा भुमी संपादनास विरोध असेल तर शासन ते मानणार का हे स्पष्ट केले नाही. आणखी एक महत्वाची अडचन म्हणजे पेसा कायदा हा फक्त अनुसूचि क्षेत्रालाच लागु आहे. महाराष्ट्रात सुमारे ५० टक्के आदिवासी हे अनुसूचित क्षेत्रा बाहेर राहतात त्यांना या तुदतुदीचा फायदा मिळु शकत नाही. **अच्युतदास, (२००५)** ओडिशाच्या आदिवासी भागात पेसा कायदा त्याच्या खऱ्या आत्म्यापासुन कसा विचलित झाला आहे याबाबतचे अध्ययन केले. **अजीत मेनन, (२००७)** आदिवासी हक्क कायदा आणि पेसा कायदा यासारखे आदिवासी समुदयासाठी जे संरक्षणनात्मक कायदे अस्तित्वात आहे. तेव्हा हे कायदे आदिवासींच्या संघर्षकर्त्यासाठी दुहेरी भुमिका कशाप्रकारे बजावतात याबाबतचे अध्ययन कलेले दिसुन येते. **हिरालाल, एम. एच.,** प्रसिध्द समाजिक कार्यकर्ते मोहन हिराबाई हिरालाल यांनी पेसा कायदयातल्या त्रुटी संदर्भात पुणे येथिल महाराष्ट्र मानवशास्त्र परिषद च्या सातारा या मासिकामध्ये एक लेख लिहिला होता. त्यांनी असे म्हटले होते की महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ फेब्रुवारी १९९० रोजी निर्णय घेऊन दुर्गम आदिवासी भागातील ३००ते ५०० लोकसंख्या असलेल्या लहान गावांना पाडयांना, टोळयांना, वाडयांना आणि वस्त्यांनाही स्वतंत्र गाव घोषित करून त्यांच्या

स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करण्याचे काम जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने करावे असा आदेश क्रमांक व्हीपिएम ११८९/प्र.क्र.३००/२ काढला होता पण याची आजपर्यंत अंमलबजावनी मात्र केली नाही.

**अध्ययनाचे उद्देश:** १. पंचायत राज संस्थेमध्ये पेसा कायद्याच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करणे. २. पेसा कायद्याच्या अंमलबजावणी मुळे आदिवासी समुदाय व त्यांच्या विकासावर होणारा परिणाम जाणुन घेणे.

**उपकल्पना:** १. पंचायती राज संस्थेमध्ये राज्य स्तरीय पेसा अधिनियम १९९६ च्या तरतुदी विषयी अंमलबजावणीबाबत आदिवासी समाजात जागृती नसते. २. आदिवासी समुदायात स्वराज्य प्रक्रियेत नगण्य बदल झालेले दिसून येतात. ३. यशस्वी अंमलबजावणीसाठी यंत्रणेत काही कमतरता दिसून येते.

**संशोधन पध्दती व तथ्य संकलन:** सदर अध्ययनासाठी प्राथमिक आणि दुय्यम तथ्य संकलनाचा वापर करण्यात आला आहे. प्रथमिक तथ्य संकलन पध्दती मध्ये प्रश्नावली चा वापर गुगल फार्मच्या माध्यमातून करण्यात आला. गुगल फार्मच्या माध्यमातून चंद्रपूर मधील तीन तालुक्यातील ३० ग्रामस्थांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आली व त्याच प्रमाणे पुस्तके, लेख, इंटरनेटचा वापर विषय विश्लेषणासाठी केला आहे. माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक स्वरुपात केले आहे. थोडक्यात वर्णनात्मक आराखड्याचा वापर या ठिकाणी केला आहे. चंद्रपूर जिल्हयातील तीन तालुक्याचा अभ्यास केला गेला आहे. यामध्ये ९६ गावात पेसा कायद्याची अंमलबजावणी होते. चंद्रपूर जिल्हायातील राजुरा ३०, जिवती ३२, कोरपना तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतीचा समावेश होतो. संशोधनासाठी नमुना निवडीचा आकार ३० व्यक्ती इतका ठेवण्यात आला आहे.

सदर विषयाबाबत संशोधन करण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनातून संशोधन व्हावे यासाठी संभाव्य नमुना निवड पध्दतीतील सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर संशोधनकर्तीने केला आहे.

आदिवासी क्षेत्रातील लोकांचे कामांचे स्वरुप:

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | व्यवसाय | ९ | ३० |
| २ | नोकरी | ९ | ३० |
| ३ | ग्रामपंचायत सदस्य | ३ | १० |
| ४ | अन्य काम | ९ | ३० |
| | **एकूण** | **३०** | **१००** |

सारणी क. १: आदिवासी क्षेत्रांमध्ये स्वराज्य संस्था अधिक पारदर्शक बनविण्यासाठी भारत सरकारने कायदा केला होता त्या कायद्याची माहिती तुम्हाला आहे का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २४ | ८० |
| २ | नाही | ६ | २० |
| | **एकूण** | **३०** | **१००** |

सारणी क. २: पंचायत विस्तार अधिनियम १९९६ या आदिवासी सुशासन कायद्याबद्दल माहिती आहे का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २३ | ७६.७ |
| २ | नाही | ७ | २३.३ |
| | **एकूण** | **३०** | **१००** |

सारणी क. ३: या कायद्याबद्दल ची माहिती तुम्हाला कुठून मिळाली?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वर्तमानपत्र, रेडिओ, टीव्ही | ९ | ३०.० |
| २ | सरकारी अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांकडून | ५ | १६.७ |
| ३ | राजकीय पुढारी किंवा | ६ | २०.० |
| ४ | खाजगी संघटना | ३ | १०.० |
| ५ | इतरांकडून | ५ | १६.७ |
| ६ | याबद्दल काही माहिती | २ | ६.७ |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क. ४: गाव पातळीवर राबविलेल्या कामांमध्ये खर्च झालेल्या रकमेसाठी उपयोग प्रमाणपत्र कसे दिले जाते?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेच्या बैठकीत एक | ११ | ३६.७ |
| २ | कामाच्या खाते विधान आणि उत्पन्न खर्च चर्चेनंतर दिले | २ | ६.७ |
| ३ | सरकारी विभाग व पंचायत | ५ | १६.७ |
| ४ | आतापर्यंत असे कोणतेही | ८ | २६.७ |
| ५ | माहितीचा अभाव आहे | ४ | १३.३ |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क. ५: ग्राम स्तरावरील विकास कामासाठी जमीन संपादन व संपादनासाठी ग्रामसभा कोणत्या पातळीवर सल्लामसलत करते?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेच्या सर्वसाधारण | २१ | ७० |
| २ | पंचायत समितीच्या विशेष | १ | ३.५ |
| ३ | जिल्हा परिषदेच्या | ३ | १० |
| ४ | सरकारी अधिकाऱ्याने द्वारे | १ | ३.५ |
| ५ | माहितीची कमतरता आहे | ४ | १३ |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क. ६: वैयक्तिक पातळीवर विकासाद्वारे ची विस्थापित असते अशा वेळेस ग्रामसभेद्वारा वेगवेगळया पातळीवर चर्चा केली जाते का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २१ | ७०.० |
| २ | नाही | ९ | ३०.० |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. ७: अशा परिस्थितीत विस्तृत चर्चा आणि निर्णय कसे घेतले जाते?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेच्या बैठकीत | २० | ६६.७ |
| २ | ग्रामसभेमध्ये या संबंधित ठराव ठेवून जिल्हा परिषदेच्या सहमतीने | ६ | २०.० |
| ३ | ग्रामसभेच्या सहमती शिवाय सरकारी अधिकाऱ्याला द्वारे | २ | ६.७ |
| ४ | कोणत्याही परिस्थितीत नाही माहितीच्या अभावी | २ | ६.७ |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क्र. ८: गाव पातळीवर सामूदायिक आणि नैसर्गिक साधनांची देखभाल आणि नियंत्रण विशेषत: जलसंचय चे नियोजन आणि व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विभागीय यंत्रणेमध्ये पात्र | ७ | २३.३ |
| २ | ग्रामसभेच्या मंजुरीनंतर ग्रामविकास समितीद्वारे | १४ | ४६.७ |
| ३ | पंचायती राज व्यवस्थेमध्ये ग्रामसभेच्या मंजुरीनंतर जिल्हा परि द द्वारे | ५ | १६.७ |
| ४ | अशी कोणतीही व्यवस्था नाही किंवा माहिती सुध्दा नाही | ४ | १३.३ |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क्र. ९: वन उत्पादनाशी संबंधित कोणते अधिकार मिळाले आहे?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वन उत्पादनाशी संबंधित वनाचे नियोजन आणि उत्पादन | २ | ६.७ |
| २ | वन उत्पादनाशी संबंधित संपूर्ण संकलन व विक्री | ६ | २०.० |
| ३ | जंगलाचे संरक्षण पुनर्रचना आणि संपूर्ण जंगलाचा योग्य वापर | ७ | २३.३ |
| ४ | वनविभागा द्वारा रक्षा समितीच्या माध्यमातून | १५ | ५०.० |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क्र. १०: पंचायत विस्तार अधिनियमानुसार अनुसूचित क्षेत्र अंतर्गत जमीन हस्तांतरित करण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे याची तुम्हाला माहिती आहे का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २३ | ७६.७ |
| २ | नाही | ७ | २३.३ |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. ११: कोणत्याही कायद्या विरुध्द उपरोक्त कार्यवाही करण्यासाठी आणि त्या भागातील जमीन अन्य संक्रमण रोखण्याच्या दृष्टीने अल्पसंख्यांकांना जमीन परत घेण्याचे अधिकार अनुसूचित जमाती ला देण्यात आले आहे हे अधिकार गावात वापरले जाते का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १५ | ५०.० |
| २ | नाही | १५ | ५०.० |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. १२: या कायद्याद्वारे तुम्हाला दिलेले गेलेले अधिकार व त्याच्याशी संबंधित अधिकार व कर्तव्य या विषयी तुम्हाला माहिती आहे का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १७ | ५६.७ |
| २ | नाही | १३ | ४३.३ |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. १३: आपणास माहिती आहे का की आपल्या ग्रामसभेमध्ये आपल्या गावातील मादक पदार्थाच्या विक्रीवर किंवा वापरावर नियंत्रण ठेवण्याची किंवा कायद्याने बंदी घालण्याची क्षमता आहे?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | ८३.३ |
| २ | नाही | ५ | १६.७ |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. १४: गाव पातळीवर मादक पदार्थांच्या विक्रीवर आणि त्याचा उपयोग करण्यावर बंदी असायला पाहिज?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २८ | ९३.३ |
| २ | नाही | २ | ६.७ |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. १५: अशा परिस्थितीत तुम्ही ग्रामसभा गावामध्ये मादक पदार्थांच्या विक्रीवर आणि त्याच्या वापरावर कशाप्रकारचे तरतुद करुन अंमलबलावणी करणार?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेच्या मान्यते नंतर प्रतिबंध करुन | ११ | ३६.७ |
| २ | सर्वांच्या सहमतीने प्रतिबंधित करुन आणि शिक्षेची व्यवस्था करुन | ७ | २३.३ |
| ३ | स्वयंसेवी संघटना द्वारे किंवा समाजात जागरुकता निर्माण करुन | १ | ३.३ |
| ४ | कायदेशीर तरतुदी व पोलीसांच्या प्रतिबंधित प्रयत्न द्वारे | ११ | ३६.७ |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क्र. १६: तुमच्या गावात किंवा ग्रामपंचायत अंतर्गत कोणता बाजार भरवला जातो का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १४ | ४६.७ |
| २ | नाही | १६ | ५३.३ |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. १७: या कायद्या अंतर्गत ग्रामीण बाजाराची योग्य व्यवस्थापन व विकास करण्याची क्षमता ग्रामसभेला देण्यात आली आहे तेव्हा आपण हे कसे करता?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरकारने दिलेल्या पैशाच्या मदतीतून | ११ | ३७.९ |
| २ | खेडयातील नैसर्गिक साधनाच्या रॉयल्टी मधून | ५ | १७.२ |
| ३ | ग्रामिण बाजारपेठेतील व्यापारावर कर लादून | ७ | २४.१ |
| ४ | स्थानिक बाजारपेठे अंतर्गत कामात लिलाव करुन | ६ | २०.७ |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क्र. १८: आपल्या ग्रामपंचायती च्या अंतर्गत सरकारी विभाग व संस्थांमध्ये कार्यरत अधिकारी आणि कामगारांचे ग्रामसभा मूल्यांकर व नियंत्रण करते का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | ६६.७ |
| २ | नाही | १० | ३३.३ |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. १९: या कायद्यानुसार आदिवासींच्या विकास योजनांमध्ये अशा सर्व विकास योजनांचा समावेश आहे व त्यांच्या यशस्वी अंमलबजावणी आणि नियंत्रणाचा अधिकार ग्रामसभेत ला आहे याची तुम्हाला जाणीव आहे का?

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २४ | ८०.० |
| २ | नाही | ६ | २०.० |
| | **एकूण** | **३०** | **१००.०** |

सारणी क्र. २०: ग्रामसभा त्यांचे व्सवस्थापन व नियंत्रण कसे करते ?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | उपलब्ध संसाधनाची ओळख करुन आणि त्याचा आराखडा तयार करुन | १० | ३३.३ |
| २ | कार्यक्रमाचे व्यवस्थापन | १२ | ४०.० |
| ३ | कार्यक्रमाचा उद्देश आणि त्या स्थितीमध्ये बदल करुन | ० | ० |
| ४ | कोणत्याही प्रकारे नाही | ८ | २६.७ |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

सारणी क्र. २१: या कायद्यानुसार गाव पातळीवरील वाद कसा मिटवला जातो?

| अ. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेच्या बैठकीत खुली चर्चा आयोजित करुन एक | २० | ६६.७ |
| २ | पंचायत प्रतिनिधी द्वारे घेतलेल्या निर्णयाच्या आधारे | २ | ६.७ |
| ३ | सामाजिक मान्यता प्राप्त प्रमुखा द्वारे | १ | ३.३ |
| ४ | प्रशासन व पोलिस विभागाद्वारे कायदेशीर कार्यवाही च्या आधारे | ४ | १३.३ |
| ५ | कोणत्याही प्रकारे नाही | ३ | १० |
| | **एकूण** | **३०** | **१००.** |

**निष्कर्ष:** पेसा कायदा आदिवासीबहुल भागासाठी उचललेलं एक क्रांतिकारक पाउल होय. आदिवासींच्या स्वशासन संदर्भातील विशेष गरजांसाठी भारतीय राज्यघटनेला पाचवी व सहावी अनुसूची जोडण्यात आली होती. त्याचप्रमाणे भारतीय राज्य घटनेचे ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर शासनाचे आणि सहभागी लोकशाहीचे तत्व धोरण मान्य केले ते अनूसुचित क्षेत्रातील या आदिवासींना उपलब्ध झााले. याचबरोबर अनुसूचित क्षेत्रातील जी नैसर्गिक सांधन संपत्ती होती त्यावर केवळ आदिवासी लोकांचा अधिकार राहील हे तत्व सुध्दा मान्य करण्यात आले. तसेच आदिवासी लोकांची जमीन खरेदी विक्री गैरआदिवासी व्यक्ती करु शकणार नाही याची खबरदारी ग्रामसभा घेउ शकते. तसेच दारुसारख्या मादक द्रव्या वर नियंत्रण ठेवणे व सहकारी पध्दतीवर प्रतिबंध घालण्याचा अधिकार सुध्दा ग्रामसभेला मिळाला व याबाबत चंद्रपूर जिल्हयातील जिवती, कोरपना व राजुरा तालुक्यातील आदिवासी भागातील लोकांना याची माहिती असलेली वरील अध्ययनावरुन दिसून येते.

महाराष्ट्र राज्याने पेसा कायद्यात सुधारणा केल्या असल्या तरी तो फारच क्रांतिकारक आहे असे म्हणता येणार नाही स्वशासनाच्या दृष्टीने त्यात अद्यापही काही त्रुटी किंवा कमतरता आढळून येते. १. सहभागी लोकशाही प्रत्यक्षात आणायची असेल तर लोकांच्या राहण्याचे नैसर्गिक स्थान म्हणजे गाव (पाडा/पाडयांचा समूह) त्यांच्या ग्रामसभेला वनाधिकार कायदा २००६ मध्ये मान्यता दिली आहे तशी मान्यता या कायद्याअंतर्गत द्यायला पाहिजे होती. २. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये जी गावे आहेत त्यांची मागणी केल्यास त्यांना स्वतंत्र गाव म्हणून घोषित करण्याची तरतूद जरी असली तरी प्रकिया किचकट आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिलेली आहे व त्याविषयी गावातील लोकांना मागणी करता येईल आदिवासी बहूल भागांमध्ये सुशासन रुजवायचे असल्यास मागणी करण्याची काही गरज उरत नाही. ३. ज्या ग्रामसभांना सामूहिक वन अधिकार मिळालेला आहे त्यांना पुन्हा पेसा कायद्याअंतर्गत सरकारकडे अर्ज करावा लागतो त्यामुळे वनाधिकार आणि पेसा अशा दोन संकल्पनाबाबत

ग्रामसभांमध्ये विनाकारण गोंधळ तयार झालेला दिसून येतो. ४. पेसा कायद्याअंतर्गत गौण खनिजांच्या बाबतीत जी तरतूद आहे ती वन क्षेत्राकरिता लागू नाही फक्त महसूली क्षेत्रापुरताच लागू आहे. त्यामुळे आदिवासीबहूल क्षेत्राातील खनिजावर पेसा कायद्या अंतर्गत येणाऱ्या ग्रामसभांचा हक्क प्रस्थापित होत नाही. ५. पेसा कायदा फक्त अनुसूचित क्षेत्रालाच लागू आहे. महारा ट्र सुमारे ५० टक्के आदिवासी हे अनुसूचित क्षेत्राबाहेर राहतात त्यांना या तरतुदींचा फायदा मिळू शकत नाही. (बोकील २०१४)

**सूचना व उपायोजना:** चंद्रपूर जिल्हयातील राजुरा, कोरपना, जिवती हे तीन तालुके पेसा कायदा समाविष्ट होतात. पेसा कायद्यांतर्गत येणारा कोरपणा हा जिल्हयातील पहिला तर विदर्भातील सातवा हागणदारीमुक्त तालूका ठरला आहे. १. पेसा कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे व्हायला हवी. २. पेसा कायद्याविषयी कायद्याचे स्वरुप व कायद्याअंतर्गत अधिकार व हक्काविषयी आदिवासी लोकांमध्ये अजुनही अज्ञान दिसून येते तेव्हा कायद्याचे स्वरुप अधिक स्पष्ट होण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले जावे. ३. पेसा कायदा अंतर्गत मिळणाऱ्या मुलभूत सुविधांमध्ये वाढ करण्यात यावी. ४. पेसा क्षेत्रातील ग्रामस्थांच्या पैसा ग्रामसभा अनिवार्य कराव्या. ५. पेसा क्षेत्रातील ग्रामस्थांची प्रथा परंपरा व सांस्कृतिक वारसा यांचे जतन करण्यासाठी त्यांच्याच बोलीभाषेत संमेलने आयोजीत करावी.

**पेसा क्षेत्रातील ग्रामस्थांसाठी:** १. पेसा कायद्याची संपूर्ण माहिती करुन घ्यावी व आपल्याला मिळणाऱ्या अधिकार व हक्काचा उपयोग करुन घ्यावा. २. पेसा ग्रामसभेला प्रत्येक ग्रामस्थांनी हजर राहवे. ३. पेसा कायद्याअंतर्गत आदिवासी समुदायतील लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन करण्याच्या दृष्टीने नेहमी प्रयत्नरत राहावे. ४. पेसा कायद्याअंतर्गत ज्या कामाची निवड केली जाते ती ग्रामसभेच्या मार्फतच करण्यात यावी अशी विनंती करावी. ५. पेसा कायदा अंतर्गत लोकसहभागातून गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे.

***संदर्भग्रंथ सुची:***


१. *बोधनकर, अ.(२००७). सामाजिक संशोधन पध्दती. नागपुर. साईनाथ प्रकाशन*

२. *आगलावे, एम.(२०१४) पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ आणि आदिवासी विकास .पुणे .सेंट पॅट्रिक टाऊन जवळ*

३. *गोरे,गोविंद,संपा.(१९८८).महारा ट्रामील आदिवासी संस्कृती समस्या व विकास, पुणे.आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था*

४. *संघवे , वि. (१९७२),आदिवासींची सामाजिक जिवन, मुंबई. पापुलर प्रकाशन.*

५. *वाघमारे , एम.(२०११).पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ आणि आदिवासींचा विकास, पुणे.समर्थ ऑफसेट.*

६. *Das, A.(2005).Governance in tribal Regions : The myth And the Reality. Rayagada, Published by Agragamee(NGO), Kashipur, Odisha.*

७. *Mukul, (1997). 'Tribal Areas:Transition to self Governance'. Economic and political weekly, Vol.32, No.18.pp.928-929.*

८. *Pal, Mahi. 1998 .' Panchayat in Elections Manifestos: A comparative Analysis', Economic and political weekly, Volume.35 , No.50, pp. 4379-4382*

# भारतीय समाजव्यवस्थेत समतेचे महत्व

***प्रा. डॉ. राजकुमार भगत,*** *समाजशास्त्र विभाग प्रमुख, राजीव गांधी महाविद्यालय, सडक/अर्जुनी, जि. गोंदिया.*

***सारांश :*** *भारतीय समाज हा जातीव्यवस्थेवर आधारित आहे. जाती व्यवस्थेशिवाय भारतीय समाजाचा विचार करता येत नाही, भारतीय समाजात लोकांचा दर्जा समान नाही, व्यक्तींचा दर्जा हा त्याच्या जातीनुसार निश्चित होतो, म्हणून भारतीय समाजाची संरचना ही विषमताधिष्ठित जातीव्यवस्थेवर आधारित आहे. महत्वाची बाब म्हणजे जाती व्यवस्थेला हिंदू धर्माची मान्यता आहे. विषमता म्हणजे भेद किंवा फरक होय. समाजाने कोणत्या ना कोणत्या कारनाने निर्माण केलेल्या विषमतेला सामाजिक विषमता म्हणतात. भारतात जाती व्यवस्थे नुसार दर्जा ठरविण्यात आला आहे. काही जातींना जन्मताच श्रेष्ठ अधिकार मिळाले तर काहींना कनिष्ठ अधिकार मिळाले. जन्मताच जातीच्या आधारावर श्रेष्ठ आणि कनिष्ठ दर्जात झालेली विभागनी म्हणजे सामाजिक विषमता होय. ही विषमता नष्ट करुन सर्वांना समान लेखले जावे म्हणून भारताचे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मुलतत्वाचा स्विकार केला असून भारतात समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संविधानाच्या कलम नं. १५ नुसार सर्वांना समान लेखण्यात आले राज्य कोणत्याही नागरिकांविरुद्ध धर्म, वंश, जाती, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही आधारावर भेदभाव करणार नाही. तसेच दुकाने सार्वजनिक भेजनालये, उपहारगृहे, सार्वजनिक मनोरंजनाची स्थाने, विहिरी, तलाव इत्यादी ठिकाणी सर्वांना समान अधिकार देण्यात आला. संविधानामुळे काही बाबतीत समानता निर्माण झालेली असली तरी भारत देश हिंदू धर्मीय असल्यामुळे व त्याला जाती व्यवस्थेचा आधार असल्यामुळे ते पूर्णपणे शक्य होवू शकले नाही कायदयाच्या आधारावर काही बाबतीत समानता आहे परंतु ते सामाजिक बाबतीत आढळून येत नाही. त्याकरिता भारतीय समाजव्यवस्थेत समतेचे महत्व या विषयावर संशोधन पेपर लिहीण्याची गरज भासली आहे.*

***बिज शब्द***: *समता, विषमता, श्रेष्ठ—कनिष्ठ, संघर्ष.*

**प्रस्तावना** : मध्ययुगीन काळात स्वातंत्र्य आणि समता ह्या दोन्ही संकल्पनांचा अभाव होता. त्यावेळी स्वेच्छाचारी व निरंकुश शासन होते. जन्मत:च काही लोक श्रेष्ठ समजल्या जात होते आणि त्यांच्या जन्मश्रेष्ठत्वामुळेच त्यांना विशेषाधिकार मिळत होते. पण १७८९ साली फ्रान्समध्ये झालेल्या राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तीन महान तत्वांना जन्म दिला. १९१७ साली रशियामध्ये क्रांती झाली व आर्थिक विषमतेचा अंत झाला. राजकीय, सामाजिक, क्षेत्रांमध्ये समता प्रस्थापित करण्यात आली. अमेरिका आणि भारताच्या घटनेमध्ये समतेचे तत्व नमुद करण्यात आले. अलीकडे लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची आधारभुत तत्वे म्हणून मानली जातात.

समतेचा अर्थ: येशू ख्रिस्त व भारतीय संतांनी सर्व व्यक्ती जन्मत:च समान आहेत असे मत प्रतिपादन केले. त्याचा अर्थ मनुष्य—मनुष्यांमध्ये कोणत्याही आधारावर भेदभाव करुन विषमता प्रस्थापित करु नये हाच होतो.

**संशोधनाचा उद्देश** : १. भारत देशात स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा होत आहे. तरी सुद्धा समतेचा अर्थ नागरिकांना कळला किंवा नाही याचा अभ्यास करणे. २. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीचे वर्चस्व तपासून पाहणे. ३. भारतीय संविधानातील समानतेचा अर्थ समजवून सांगणे. ४. भारतीय जातीव्यवस्थेत समतेचा बदल कसा होत आहे ते अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये** : १. भारतीय संविधानातील समतेचा अर्थ नागरिकांना आजपर्यंत समजला नाही. २. हिंदू धर्मामधील असणारी जातीव्यवस्था श्रेष्ठ—कनिष्ठतेचा आधारावर विषमतेवर आधारित आहे. ३. संविधानाच्या कलमामुळे सामाजिक समता काही प्रमाणात कमी झाली. ४. भारतात जोपर्यंत जातीव्यवस्था आहे तो पर्यंत सामाजिक विषमता आढळून येणार.

**संशोधन महत्व** : १. भारतीय संविधानाने दिलेल्या समतेच्या अधिकाराविशयी नागरिकांना जागृत करणे व आपल्या कर्तव्याविषयी जाणिव निर्माण करून देणे, जेव्हा समाजामध्ये राहत असतांना श्रेष्ठ कनिष्ठतेच्या आधारावर कोणी भेदाभाव किंवा जातीभेद करित असतील तर त्याला हे कळून चुकेल की, ही सामाजिक विषमता आहे. यावर प्रतिबंध करणे गरजेचे आहे. २. केवळ सामाजिक अधिकार मिळाल्यामुळे व्यक्तींचा सर्वांगिन विकास होत नाही. तर आपल्या पात्रतेनुसार व योग्यतेनुसार समाजाला सामाजिक दर्जा मिळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या धोरण ठरविण्याच्या निर्णय प्रक्रियेवर देखील प्रभाव पाडून दबाव निर्माण केल्यास विषमतेचे परिवर्तन होवून सामाजिक समता निर्माण होईल. ३. जातीव्यवस्थेत असलेली विषमता नष्ट करुन समता निर्माण करायची असेल तर जातीअंतर्गत समुहामध्ये एकमेकांच्या लग्न समारंभामध्ये जाणे किंवा एक दुसऱ्या जवळ वा सोबत जेवण करण्याने विषमता नष्ट होणार नाही त्यासाठी अंतर्गत विवाहाची बंधने तोडून बहीर्गत विवाहाला सुरवात करणे महत्वाचे आहे असे झाल्यास समतेचे महत्व लक्षात येईल.

**संशोधन पद्धती** : प्रस्तुत संशोधनात अध्ययन पद्धत म्हणून व्दितीय स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. जसे की, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी.

**समतेचा अर्थ** : समतेचा अर्थ पुढील प्रमाणे सांगता येतो. १. समता म्हणजे सारखेपणा नव्हे—समतेचा अर्थ सारखेपणा असा होत नाही. सर्व लोकांना समान शिक्षण देणे, समान काम देणे व समान वेतन देणे ह्याचा अर्थ समानता असा होत नाही कारण जन्मत:च 'मनुष्य' म्हणून सर्व व्यक्ती सारख्याच असल्या तरी त्या सारख्याच

योग्यतेच्या असतात असे नाही. ज्याप्रमाणे आपल्या हातांची बोटे निसर्गतःच सारखी नसतात. त्याचप्रमाणे निसर्गानेही मनुष्या–मनुष्यामध्ये भेद निर्माण केला आहे. कोणी बुद्धिवान असतो, कोणी साधारण बुद्धीचा तर कोणी 'निबुद्ध' असाही असतो. तेव्हा समता म्हणजे सारखेपणा अथवा एकरुपता नव्हे तसा अर्थ मानल्यास साचेबंदपणा निर्माण होऊन विविधता नष्ट होईल. २. समता आणि बंधुता म्हणजे मानवनिर्मित विषमता नष्ट करणे. समतेचा अर्थ मानवनिर्मित विषमता नष्ट करणे असा होतो. प्राचीन काळापासून समाजरचना विषमता व विशेषाधिकार ह्यांवर आधारलेली आहे. ह्याच मानवनिर्मित विषमतेमुळे समाजाचा उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ, स्पृश्य–अस्पृश्य असे भेदभाव निर्माण झाले. त्यामुळेच व्यक्ती – व्यक्तीमध्ये संघर्ष झाला आणि तिच्या विकासात अनेक अडथळे येऊ लागलेत. आर्थिक विषमतेमधुनच दारिद्र्य वाढले. राजकीय विषमतेमधुनच हुकुमशाहीचा जन्म झाला. त्यामुळे मनुष्याचे जीवन दुःखी झाले परिणामतः राज्यक्रांत्याही झाल्या. म्हणूनच विषमता नष्ट करणे हे मानवाचे आद्य कर्तव्य ठरते. कारण मानवनिर्मित विषमता मानवाच्या अधोगतीला कारणीभुत ठरते. मनुष्याची शारीरिक कुरुपता वा त्याच्या कातडीचा रंग जरी आपण बदलवू शकत नसलो तरी अस्पृश्यता, आर्थिक विषमता व विशेषाधिकार इत्यादी सामाजिक कुरुपता आपण निश्चितच नाहीशी करु शकतो. ती नष्ट केली म्हणजेच समाजाची प्रगती होईल. मानवनिर्मित विषमता बाजूला सारुन प्रत्येकाला त्याच्या नैसर्गीक प्रवृत्तीप्रमाणे विविध प्रकारच्या विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे म्हणजेच समता प्रस्थापित करणे होय. ३. समता आणि बंधुता म्हणजे विशेषाधिकाराचा अभाव प्रा. लॉस्की असे म्हणतात की जोपर्यंत समाजात काही व्यक्तींना जन्म, जात, भाषा, वंश, संपत्ती वगैरेच्या आधारावर विशेष अधिकार मिळतात, तोपर्यंत समता प्रस्थापित होऊच शकत नाही. अशा विशेष अधिकारांमुळे समाजातील इतर व्यक्तींच्या विकासावर कनिष्ठ परिणाम होतो. इंग्रजी शासनाच्या वेळेत भारतात काही लोकांना संपत्तीच्या आधारावर विशेष मताधिकार प्राप्त झाला होता व म्हणूनच लोकांमध्ये दुजाभाव निर्माण झाला होता. त्यामुळे विषमतेला कारणीभुत ठरणारे विशिष्ट वर्गाचे, जातीचे व समुदायांचे विशेषाधिकार नष्ट करणे समानता निर्माण करणे होय. ४. समता आणि बंधुता म्हणजे सर्वांना समान संधी देणे– जन्मतः प्रत्येक व्यक्ती गुणात्मक दृष्टिने समान नसते. तरीही प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची समान संधी देणे म्हणजेच समानता होय. ह्या संधीचा फायदा घेऊन व्यक्तीला आपल्या गुणांचा विकास करता येईल. उदा. गरीबांच्या मुलांना पोटभर जेवायला मिळत नाही त्यामुळे त्यांची शरीरदृष्टी कृश राहत होती. त्यांना शिक्षण प्राप्त करता येत नाही. ह्याउलट श्रीमंतांच्या मुलांना चांगले अन्न मिळते. श्रीमंतांची बुद्धीहीन बालकेही संपत्तीची मालक बनतात. गरीबांच्या हुशार व बुद्धिवान मुलांना पैसाही मिळत नाही आणि धड–जेवायला पण मिळत नाही. म्हणूनच प्रत्येकाच्या विकासाच्या योग्य व समान संधी प्राप्त करुन देणे म्हणजे समता होय. त्यामुळे बंधुता निर्माण होते. ५. समता ही समतोल राखणारी प्रक्रिया आहे– समता म्हणजे सारखेपणा नाही. सर्वांना एकच पातळीवर आणल्याने समाजातील विविधता नष्ट होते व व्यक्तीचे स्वातंत्र्य संकुचित होते. पण त्याचबरोबर व्यक्तीमध्ये असलेली तफावत व विषमता नष्ट करणेही आवश्यक आहे कारण अशा विषमतेमधुनच संघर्ष उद्‌भवतात आणि मानवजातीचे नुकसान होते. ह्या समतोल प्रक्रियेनेच बंधुता निर्माण होते. विषमता निर्माण होऊन समाज चिघडू नये म्हणूनच समतेद्वारे समतोल राखल्या जातो. श्रीमंत–गरीब, सुशिक्षित, अशिक्षित, उच्चभ्र जाती व मागासलेल्या जाती ह्यांच्यातील तफावत समाजात असमतोल आणि विषमता निर्माण करते. शोषण व संघर्ष त्यामुळेच उद्‌भवतात म्हणून राज्यातील विविध स्तरावरील असलेल्या लोकसमुहांमध्ये सुसंवादित्य प्रस्थापिणे, समुहाच्या हिताचे संरक्षण न्याय आणि नैतिक दृष्टिकोनातून करणे, प्रत्येकाला त्याच्या हितसंरक्षणाची समान हमी देणे इत्यादी कृती मुळे समाजात समतोल राखला जातो. आणि बंधुता प्रस्थापित होते. अशा समतेमुळे प्रत्येकाला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची समान संधी प्राप्त होते. मानवनिर्मित भेदाभेद–नष्ट होतात. कोणालाही विशेष अधिकार मिळत नसतात. कायद्यासमोर प्रत्येक व्यक्तिला एक व एकच म्हणून संबोधल्या जाते. म्हणजेच व्यक्तिपरत्वे कायदे भिन्न नसतात. त्यामुळेच समता आणि बंधुता प्रस्थापित होते.

**समतेचे प्रकार : समतेचे पुढील प्रकार पडतात:** १) सामाजिक समता (Social Equality) २) राजकीय समता (Political Equality) ३) नागरिक समता वा वैधानिक समता (Legal Equality) (४) नैसर्गीक समता (Natural Equality) (५) आर्थिक समता (Economic Equality)

ह्यांचा विचार खालीलप्रमाणे केला आहे –

**१) सामाजिक समता**: समाजजीवनामध्ये प्रत्येक समान प्रतिष्ठा राखणे, धर्म, वंश, भाषा, जाती, लिंग इत्यादी आधारावर भेदाभेद न करणे प्रत्येकाला आपल्या व्यक्तित्वाच्या विकासाची समान संधी देणे हा सामाजिक समतेचा अर्थ होतो. मध्ययुगामध्ये जन्मानुसारच व्यक्तींची प्रतिष्ठा (Status) ठरविले जात असे. राजकुळामध्ये जन्मास येणारी व्यक्ती राजकुमार व राजकुमारी, अमीर–उमरावांच्या पोटी जन्मास येणारी व्यक्ती कुलीन व्यक्ति तर गुलामाच्या पोटी जन्मास येणारी व्यक्ती गुलाम म्हणूनच गणल्या जात असे. अर्थातच व्यक्तीला तिच्या जन्मानुसार त्या वर्गातील विशेषाधिकार मिळत असत. जन्मानुसार जाती निर्माण झाल्या व जातीजातींमध्ये श्रेष्ठ–कनिष्ठतेच्या विषमतेमुळे संघर्ष निर्माण झाला. असा भेदाभेद करुन आपले आणि समाजाचे नुकसान होऊ नये म्हणूनच सामाजिक समतेचे तत्व राष्ट्रांनी स्विकारले. उदा. भारत, अमेरिका वगैरे. पण सामाजिक समता केवळ कायद्याने प्रस्थापिल्या जात नाही. यासाठी प्रत्येकाने सद्‌सद्‌विवेक बुद्धिनुसार वागून समतेची भावना वाढीस लावली पाहिजे. आजही दक्षिण ऑफ्रिकेमध्ये काळा व गोरा असा फरक व्यक्तींमध्ये करण्यात येतो. ती एक सामाजिक विषमताच आहे.

**२) राजकीय समता**: आधुनिक लोकशाहीचा मुलाधार राजकीय स्वातंत्र्य व समता हाच आहे. प्रत्येक नागरिकाला राज्यव्यवस्थेमध्ये सहभागी होण्याची समान संधी देणे म्हणजेच राजकीय समता होय. ह्या राजकीय समतेमुळे प्रत्येक नागरिकाला मतदानाचा महत्वपूर्ण अधिकार प्राप्त होतो. तसेच आवश्यक ती पात्रता पूर्ण करुन कोणताही नागरिक निवडणुकीद्वारे कोणतेही पद प्राप्त करु शकतो. पुर्वी असा अधिकार लिंग, धर्म, जाती आणि संपत्ती ह्यानुसार प्राप्त होत असे. उदा. फ्रांसमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. इंग्लंडमध्ये रोमन कॅथॉलिक पंथीयांना पार्लमेंटचे सभासदत्व व सरकारी नोकरी करण्याचा अधिकार नव्हता. पण त्यामुळे राजकीय विषमता निर्माण होऊन संघर्ष झाले. राज्याचे स्थैर्य टिकविण्यासाठी राजकीय समतेचे तत्व मान्य करावेच लागते. त्यामुळे नागरिकाला आपल्या अधिकारांचे संरक्षण करता येते. राजकीय समता पुढील गोष्टींच्या पुर्ततेवर अवलंबुन असते. — (अ) सर्व प्रौढ स्त्री पुरुषांना मतदानाचा हक्क देणे. (ब) प्रत्येक नागरिकांच्या मताचे मूल्य समान मानणे. (क) अल्पसंख्याकांच्या हिताकडे लक्ष देणे. (ड) कायद्यासमोर प्रत्येकाला समान लेखणे.

**३) वैधानिक वा नागरिक समता:** नागरिक या नात्याने राज्यातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार असणे, राज्यातील नागरिकांसाठी एकच कायदा असणे, कायद्यासमोर उच्च—नीच, श्रेष्ठ—कनिष्ठ, श्रीमंत—गरीब, स्त्री—पुरुष असा भेदभाव कोणत्याही आधारावर न करणे ह्यालाच नागरिक समता असे म्हणतात. मध्ययुगामध्ये मोगल बादशाह हिंदुकडून जिझिया नावाचा कर वसुल करीत होते ही गोष्ट नागरिक समतेच्या विरुद्ध होती. आजही काही धर्माधिष्ठित राज्यांमध्ये धर्माच्या आधारावर विशेष सवलती प्राप्त होतात. ही गोष्ट नागरिक समतेला बाधक आहे. नागरिक वा वैधानिक समतेमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो — (अ) कायद्यासमोर प्रत्येक व्यक्तीला एक व एकच मानणे. (ब) प्रत्येकाला समान अधिकार देणे आणि अधिकारांचा समान उपभोग घेता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे. (क) कायद्याद्वारे मानवनिर्मीत विषमता नष्ट करणे. नागरिक समता हा लोकशाहीचा पाया आहे. त्यामुळेच राज्याला स्थैर्य लाभते.

**४) नैसर्गीक समता:** काही लेखकांच्या मते मनुष्य निसर्गतःच समान आहे. निसर्गानेच प्रत्येकाला समान गुणांची देणगी दिली आहे. प्रत्येकालाच विचारशक्ती व भावना आहे. त्यामुळे सर्वांनाच समान वागणुक आणि समान संधी दिली पाहिजे. लॉक ने ह्या नैसर्गीक समतेचा पुरस्कार केला. मानवी समाजाचा घटक म्हणून मानवाला मूलभूत हक्क देण्यात यावेत. अशी समजूत आज दृढ होत आहे. काही लेखक नैसर्गीक समतेला विरोध करतात. त्याचे मत असे आहे की निसर्गानेच प्रत्येक व्यक्तीला असमान निर्माण केले. ॲरिस्टॉटलने ह्याच नैसर्गीक असमानतेच्या आधारावर गुलामगिरीचे समर्थन केले. पण नैसर्गीक असमानतेला जर सामाजिक विषमतेची जोड मिळाली तर त्याचे समाजावर अनिष्ट परिणाम घडतात. नैसर्गीक समतेचा अर्थ मर्यादित स्वरुपात घेणेच इष्ट आहे.

**५) आर्थिक समता** : समाजविघटनाचे प्रमुख कारण आर्थिक विषमता हेच आहे. आर्थिक समतेच्या अभावी व्यक्तींची इतर स्वातंत्र्ये निरर्थक ठरतात. आर्थिक समता प्रस्थापित झाल्यावरच इतर सर्व प्रकारची विषमता आपोआपच नष्ट होईल, असे काही शास्त्रज्ञांचे मत आहे. आर्थिक विषमतेमधुनच राजकीय विषमता निर्माण होते. सगळया अनर्थाचे मुळ अर्थकारण आहे. आर्थिक आधारामुळेच मतांची खरेदी होते. अर्पण राज्यसंस्थेवर श्रीमंतांची मक्तेदारी निर्माण होते आर्थिक विषमतेमुळेच समाजवाद, साम्यवाद, हिटलरशाही, नाझीवाद निर्माण झाले. म्हणून प्रत्येक राज्याच्या स्थैर्यासाठी आर्थिक क्षमतेवर लक्ष केन्द्रित करणे आवश्यक ठरले आहे. आार्थिक क्षमतेचा अर्थ सर्वांना समान वेतन देणे असा नव्हे. कारण प्रत्येक व्यक्तीची योग्यता सारखीच नसते. पण त्याच वेळेस संपत्तीच्या संचयामुळे इतरांचे शोषण करणे राजकीय व सामाजिकदृष्टया योग्य नसते. आर्थिक समतेचा अर्थ प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा आर्थिक विकास करण्याची समान संधी देणे असाच होतो प्रत्येक व्यक्तीला तिच्या योग्यतेनुसार काम देणे आणि त्या कामानुसार वेतन देणे असा अधिक क्षमतेचा अर्थ समाजवादी शास्त्रज्ञ करतात. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करावे असे समाजवाद म्हणतो. कोणालाही जीवनावश्यक वस्तुंची वाण पाडू नये, प्रत्येकाला त्याच्या योग्यतेनुसार धनोत्पादनाची समान संधी देणे, समाजहिताच्या दृष्टिने उद्योगधंद्याची मालकी समाजाकडे असणे हेच आर्थिक क्षमतेचे मुख्य तत्व आहे. व्यक्तीचे वेतन हे तिच्या कार्याच्या सामाजिक उपयुक्ततेनुसार ठरविले पाहिजे. ''माझा शेजारी जर उपाशी राहत असेल तर मला मिष्ठान्न खाण्याचा अधिकार नाही'' म्हणजेच प्रत्येकाला जीवनासाठी निर्वाह वेतन मिळालेच पाहिजे. प्रत्येकाच्या जीवनावश्यक गरजा भागल्या पाहिजेत असाच अर्थ आर्थिक समतेचा होतो.

**निष्कर्ष** : १. बहुतांश नागरिक समानतेच्या अधिकाराविषयी जागरुक नसल्याचे दिसून आले. २. कर्तव्याच्या संदर्भात जागरुक नसणाऱ्या नागरिकामध्ये कर्तव्यात कसुर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. ३. भारतीय संविधानाच्या समानतेच्या अधिकाराविषयी समाजात जाणीव जागृती करण्याची गरज आहे. ४. हिंदू धर्मातील जातीव्यवस्था जोपर्यंत आहे तोपर्यंत समाजामध्ये असणारे श्रेष्ठ—कनिष्ठतेची भावना संपणार नाही. ५. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह झाल्याने समाजातील सामाजिक दर्जाची विषमता कमी होवून समता निर्माण होवू शकते. ६. आजच्या आधुनिक समाजात सामाजीक दर्जाची विषमता काही प्रमाणात कमी झाली असली तरी ती संपलेली नाही हे विसरता येत नाही.

***संदर्भग्रंथ सूची:***


*१. तिजारे, रा. अं., घांगरेकर चिं. ग., (१९९२), राज्यशास्त्राचे सिद्धांत आणि राजकिय विश्लेषन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.*

*२. भोळे, भाष्कर लक्ष्मण, (१९९७), राजकिय सिद्धांत आणि विश्लेषन, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, नागपूर.*

*३. लोटे, रा.ज. (२०१७), भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, नागपूर.*

# खुल्या कारागृहातील कैद्यांचा सुधारात्मक अभ्यास

***डॉ. विनोद बी. खेडकर,*** *समाजशास्त्र विभागप्रमुख, डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर मो. क्र. ९४२१५३७१२३*

***गोषवारा :*** *प्रत्येक देशातील प्रचलित कायद्यानुसार व न्याय संमत मार्गाने गुन्हा शाबीत होऊन बंदीवासाची शिक्षा झालेल्यांना निर्दिष्ट काळापर्यंत ताब्यात घेणारी शासकीय संस्था म्हणजे कारागृह होय. गुन्हा एक सार्वत्रिक सामाजिक समस्या आहे. ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून त्याचे स्वरूप वेळेनुसार बदलत राहते.[1] गुन्हा प्रत्येक समाजामध्ये प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक वेळी बदलत जातो.[2] त्यांच्या गुन्ह्याच्या स्वरूपावरून शिक्षेची पद्धती देखील बदलत गेली. तसेच शिक्षेच्या आधारभूत कल्पना जशा-जशा बदलत गेल्या तसतसे शिक्षेचे प्रकार आणि पद्धतीही बदलत गेल्या. कारागृहाच्या संदर्भातिही त्यांची उद्दिष्टे, व्यवस्था यात वेळोवेळी सुधारणा घडत गेल्या. कारागृहाची कल्पना गुन्हेगारा विषयीच्या दृष्टिकोनात बदल झाल्याचे द्योतक आहे. 'Tit for Tat' जशास-तसे या विचारसरणी मागे सुडाची भावना होती व शिक्षेच्या धाकाने संभाव्य गुन्ह्यावर व गुन्हेगारांवर वचक बसावा हा देखील त्यामागचा उद्देश होता. परंतु, शासनाच्या आर्थिक गरजा नुसार काही ठिकाणी आर्थिक दंडास अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. आर्थिक दंड देऊ न शकणारे व राजकीय कैद्यांना करिता कारागृहाची योजना आणली गेली. गुन्हेगारांना समाजापासून अलग ठेवून समाजाचे रक्षण करावे आणि गुन्हेगारांना सुधारण्याची संधी द्यावी, तसेच त्यांच्या हातून घडलेल्या गुन्ह्याबद्दल त्यांना उत्पादक कामात गुंतवावे असा दृष्टिकोण कारागृहाच्या योजनेमागे होता.*

**प्रस्तावना:** जसजसा समाज बदलत गेला तसे गुन्ह्याच्या स्वरूपामध्ये देखील बदल होत गेला. त्या बदलत्या स्वरूपानुसार व समाज परिवर्तनानुसार शिक्षेच्या संकल्पनेमध्ये देखील बदल होत गेला. तसेच कारागृहाच्या संकल्पनेत ही बदल होत गेला. बदलत्या काळानुसार कारागृहामध्ये बदल होऊन खुले कारागृह निर्माण झाले. खुल्या कारागृहाची संकल्पना ही अत्यंत अभिनव असून स्वातंत्र्योत्तर भारतात या संदर्भात बराच विचार झाला व जवळपास वीस वर्षाच्या प्रयत्नानंतर खुल्या कारागृहाची संकल्पना एक प्रयोग म्हणून भारतात अमलात आणली गेली. भारतासारख्या विकसनशील देशात धरणे, रस्ते व मोठमोठ्या प्रकल्पाच्या कामात कैद्यांचे मनुष्यबळ वापरण्यास वाव आहे आणि तशी गरजही आहे म्हणून भारतामध्ये खुले कारागृह निर्माण केले गेले. वर्तमान स्थितीमध्ये भारतातील बहुतेक राज्यात खुली कारागृहे असून हा प्रयोग अगदी यशस्वी झालेला दिसतो. महाराष्ट्रातसध्या १९ खुले कारागृह असून पैकी एक खुले कारागृह महिलांसाठी देखील आहे. यामध्ये एकूण १६१२ कैदी वास्तव्यास आहेत. यापैकी चार जिल्हा खुले कारागृह आहेत. खुल्या कारागृहामध्ये कैद्यांची सुधारणा हा महत्त्वाचा दृष्टीकोण समोर ठेवून त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करत आहे. खुल्या कारागृहामध्ये कायद्यांची व्यवस्था त्यांच्या दर्जानुसार असणे निश्चित केले आहे, कारण त्यांना विविध साधने, सुख-सोयी पुरविणे, निरोगी अंतर वैयक्तिक संबंध चांगले बनविणे, मुक्त वातावरणाची मोकळीक असणे, कारागृहातील वर्तन व समायोजन सुधारणे, मनोरंजनाच्या व मुक्त वातावरणाच्या कार्यक्रमांमधून सूक्ष्म दृष्टी, शैक्षणिक आणि मनोरंजक सुखसोयी व त्यांच्या योग्य पुनर्वसनाचा प्रयत्न करून कैद्यांना मदत करणे आणि उत्तम व्यवस्था पुरविणे हा दृष्टिकोन ठेवला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये खुल्या कारागृहातील कायद्यांचा सुधारात्मक अभ्यास करण्यात आला आहे. याकरिता महाराष्ट्रातील चार खुल्या कारागृहातील कैद्यांसाठी सुधारणेच्या दृष्टिकोनातून विविध उपक्रमांचा त्यांच्यावर झालेल्या सकारात्मक परिणामांचा अभ्यास करण्यात आला. प्रस्तुत संशोधनासाठी गैर-संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने चार कारागृह मधून ३०० कैद्यांची निवड करण्यात आली. यासाठी तथ्य संकलन पद्धतीतील प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीतील मुलाखत अनुसूची तंत्राद्वारे तथ्य संकलित केली आहे. तसेच दुय्यम तथ्य संकलन पद्धतीतील प्रकाशित व अप्रकाशित लिखाण, प्रबंध, ग्रंथ, लेख, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादींचा उपयोग केला आहे.

गुन्हा प्रत्येक समाजात एक अपरिहार्य आणि अंतर्भूत घटना मानली जाते.[3] गुन्हेगारी ही शाश्वत घटना आहे. मानवी उत्पत्तीपासून मानवाने आपल्या गरजा भागविण्यासाठी इतरांचे सहकार्य मिळविले. इतरांबरोबर कशा प्रकारे वर्तन असावे या संदर्भात अति प्राचीन काळात अलिखित नियम होते. जसजशी मानव प्रगती करत गेला, तसतशी मानवी वृत्ती बदलत गेली. आपल्या गरजा भागविण्यासाठी समोरच्याला इजा पोहोचविणे, त्याच्या इच्छेविरुद्ध कृती करून आपल्यागरजा भागवू लागला.

जिथे-जिथे माणूस आहे तेथे-तेथे गुन्हेगारी आहे. प्रत्येक समाजामध्ये कोणत्या-ना-कोणत्या प्रकारे गुन्हेगारी असणे हे त्याचे सार्वत्रिकता स्पष्ट करते.

वर्तमान समाजामध्ये गुन्हेगारांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये बदल झाला आहे. गुन्हेगार हा समाजातील एक घटक मानला जाऊ लागला. माणूस हा परिस्थितीशी सामावून घेताना चुकतो, असमर्थ ठरतो म्हणून तो गुन्हा करतो. त्याला जीवन जगण्याची पुन्हा एकवार संधी द्यावी अशा तऱ्हेचा विचार मान्य होऊ लागला. कैदी हा माणूस आहे व त्याला माणसाप्रमाणे वागवावे हा विचार आज मान्य होत आहे. गुन्हेगार हा रोगी आहे आणि त्याच्या रोगाची कारणे केवळ शारीरिक नसून काहीशी मानसिक विकृती आणि सामाजिक घटना यांच्याशी संबंधित असतात. त्याचा रोग बरा होईपर्यंत त्याला कारागृहात ठेवण्याची शिक्षा देणे हा आधुनिक दृष्टिकोन निर्माण झाला.[४] व्यक्तीकडून गुन्हा कोणत्या कारणामुळे घडला? का घडला? त्याच्या गुन्ह्याच्या पाठीमागे समाज हा देखील तितकाच कारणीभूत असतो. म्हणून त्याच्याकडे सुधारणेच्या दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. त्याच सुधारणेचा भाग म्हणून कारागृह निर्माण केले. पुढे कारागृह व्यवस्थेमध्ये बदल होत गेला, आज त्याचे स्वरूप बदलत गेले. यातूनच खुले कारागृह निर्माण झाले.

भारतात स्वातंत्र्यानंतर कैद्यांच्या उपचार पद्धतीमध्ये त्यांच्या गरजेनुसार परिवर्तन झाले. एका मानवी दृष्टिकोनातून व्यक्तींचा विचार केल्यास पर्यावरणाचा किंवा वातावरणाचा आणि तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा गुन्हेगारावर मानसिक, सामाजिक परिणाम होत असतो. दंडशास्त्र आणि अपराधशास्त्र अभ्यासकांच्या विचारानुसार कैद्यांची उपचार पद्धती आणि धोरणांमध्ये बदल करून त्यांचे पुनर्वसन केले जाते. युनायटेड नेशन्स आणि इतर देशांमध्ये कारागृह व्यवस्था व कैद्यांसाठी अनेक परिवर्तन झाले आहेत. कारागृह सुधारणेमध्ये वेगवेगळे प्रयोग, प्रशिक्षण केंद्रे, सामाजिक केंद्रे निर्माण झाली आहेत. त्याचबरोबर कारागृह अधिकाऱ्यांना प्रशिक्षण, कैद्यांसाठी पॅरोल, प्रोबेशन, मजुरी पद्धती, शैक्षणिक, नैतिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणे आणि कैद्याने खुल्या स्थितीमध्ये उपचार आणि प्रशिक्षण देणे हा नवीन दृष्टिकोन कैद्यांच्या पुनर्वसनासाठी व सुधारणेसाठी समोर आला आहे. भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर कैद्यांना खुला कारागृहामध्ये ठेवून उपचार करणे, व्यावसायिक प्रशिक्षण देणे, शैक्षणिक सुविधा देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा विधायक विचार निर्माण झाला. यामध्ये कैद्यांची मानसिक, शारीरिक आणि सामाजिक स्थिती पाहून त्यांना खुल्या कारागृहामध्ये ठेवू लागले.

**खुल्या कारागृहाची व्याख्या:**

१. **ऑल इंडिया जेल मॅन्युअल कमिटी** नुसार, खुले कारागृह हे कैद्यांना स्वातंत्र्याचे प्रशिक्षण, कारागृहातील वेळेचे नियोजन आणि विशिष्ट समस्यांच्या सुधारणांचे कार्य करण्याचे ठिकाण होय.[५]

२. **सेंट्रल ब्युरो ऑफ करेक्शन सर्विस** नुसार, अधिक सुरक्षा नसलेले, दरवाजा नसलेल्या कारागृहास खुले कारागृह म्हणतात. ज्यामध्ये, अशा कैद्यांना ठेवले जात आहे जो प्रारंभी न्यूनतम सुरक्षेसाठी योग्य मानले जात नाही, परंतु ज्यामध्ये नियंत्रण, बंदिस्त कारागृहाच्या तुलनेमध्ये जास्तीत जास्त उदार ठेवले जात आहे.[६]

३. भारतामध्ये, भिंती नसलेल्या कारागृहास खुले कारागृह संबोधले आहे. यामध्ये कैद्यांची स्व-सहायता, शिस्त व जबाबदारीची भावना निर्माण होण्यासाठी कमीत कमी संरक्षण आणि इतर घटकांबाबत सामाजिक जबाबदारीची जाणीव व कैद्यांच्या सुधारणेला महत्त्व देते.

गुन्ह्याचा अभ्यास शिक्षेच्या विभिन्न सिद्धांतानुसार केला जातो. या संबंधित सर्वात उपयोगी सुधारात्मक सिद्धांत आहे. सुधारात्मक सिद्धांतामध्ये वेळेनुसार विकास होत जाऊन एक नवीन दृष्टीकोन निर्माण झाला आहे. या दृष्टिकोनानुसार गुन्हेगारांना समाजातील सदस्या प्रमाणे वागणूक देऊन, त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणणे हा आहे. शिक्षेच्या दृष्टिकोनानुसार गुन्हेगारांना कारागृहामध्ये निश्चित कालावधी साठी कैद करणे, परंतु न्यूनतम सुरक्षा संस्थांमध्ये म्हणजे खुल्या कारागृहामध्ये गुन्हेगारांना ठेवून त्यांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयोग पुढे आला. हा एक सुधारात्मक उपाय असून बंदिस्त कारागृहामध्ये कैद्यांच्या समायोजनाची समस्या निर्माण होते. परंतु खुल्या कारागृहामध्ये कैद्यांना सर्व प्रकारच्या सुविधा देऊन त्यांच्या पुनर्सामाजिकरणावर भर देऊन, त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात परिवर्तन घडवून आणले जाते. स्वतःचे प्राबल्य आणि नवनिर्मिती हेच माणसाचे सर्वस्वी संरक्षण होय व याशिवाय माणसाचे जीवन एकाएकी, गरीब, क्रूर आणि कमकुवत बनते.[७] परंतु खुल्या कारागृहामध्ये कायद्यांच्या एकाएकी व कमकुवत जीवनास चालना देऊन त्यांचे पुनर्वसन केले जाते.

सद्यःस्थितीमध्ये कैद्यांचे जीवन सुधारण्यासाठी खुले कारागृह सर्वात यशस्वी प्रयोग आहे. या खुल्या कारागृहाचा प्रयोग स्वीत्झरलँड, युरोपीय देश, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, आफ्रिका, अमेरिका, इंग्लंड आणि

आशियायी देशांमध्ये, यशस्वीपूर्वक होत आहे. ई. स. १८९१ मध्ये स्विझरलँड मध्ये 'विडझविल' याठिकाणी पहिले खुले कारागृह स्थापन झाले. हे कारागृह पूर्णतः कमीत-कमी संरक्षणामध्ये स्थापन केले. ही कल्पना पूर्णतः 'आॅट्टोकिलरहॉल' यांची होती. भारतामध्ये १९०५ मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी नावाने पहिले खुले कारागृह स्थापन झाले. ही पद्धत ठाणे कारागृहात सुरू करून याच कारागृहातील विशेष वर्गातील कैयद्यांचे वर्तन, चांगले कार्य करणे आणि २/३ शिक्षा पूर्ण झालेली आहे, याची खात्री करून ४० कैद्यांना त्यामध्ये प्रवेश दिला. पुढे ही पद्धत काही प्रशासकीय अडचणी आल्यामुळे १९१० मध्ये बंद करण्यात आली. यानंतर भारतामध्ये उत्तरप्रदेश राज्यामध्ये पहिले खुले शिबिर ०१ ऑक्टोबर १९५२ ते ३१ ऑक्टोबर १९५३ या कालावधीत 'चंद्रप्रभा' नदीवर बांध )धरण( निर्माण करण्यासाठी 'संपूर्णानंद शिबिर' नावाने खुले कारागृह स्थापन झाले. हे कारागृह भारतातील पहिले खुले कारागृह म्हणून संबोधले जाते. सद्य स्थितीमध्ये भारतात ८८ खुले कारागृह असून, ५९५३ कैदी शिक्षा भोगत आहेत. पैकी १९ कारागृह महाराष्ट्रात असून, एकूण १६१२ कैदी शिक्षा भोगत आहेत. तसेच एकूण खुल्या कारागृह पैकी ०३ खुले कारागृह हे महिलांसाठीचे आहेत.[८]

**संशोधनाची उद्दिष्टे:** १( खुल्या कारागृहात घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचा कैद्यांच्या सुधारण्याच्या दृष्टीने अभ्यास करणे. २( खुल्या कारागृहातील उपक्रमांमुळे कैद्यांमधील बदललेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे अध्ययन क्षेत्र:** प्रस्तुत संशोधनासाठी 'महाराष्ट्रातील खुले कारागृह' अभ्यास विषयाचे समग्र किंवा क्षेत्र आहे. महाराष्ट्रात एकूण १९ कारागृह आहेत, पैकी जिल्हा खुले कारागृह, येरवडा )पुणे(, जिल्हा खुले मध्यवर्ती कारागृह, पैठण )औरंगाबाद(, जिल्हा खुले कारागृह, मोर्शी )अमरावती( व जिल्हा खुले कारागृह, गडचिरोली या चार कारागृहांची संशोधन क्षेत्र म्हणून निवड केली आहे.

**नमुना निवड व तथ्य संकलनाचे स्रोत:** प्रस्तुत संशोधनासाठी गैर-संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने चार करागृहानमधून ३०० कायद्यांची निवड केली आहे. तसेच, प्राथमिक तथ्य संकलनासाठी 'मुलाखत अनुसूची' या तथ्य संकलन तंत्राद्वारे तथ्य संकलित केली आहेत. दुय्यम स्त्रोतांमधील प्रकाशित व प्रकाशित लिखाण, प्रबंध, ग्रंथ, लेख, मासिके, वर्तमानपत्रे व संदर्भ ग्रंथे इत्यादींचा उपयोग केला आहे.

संशोधनात असे दिसून आले की, सर्वच कैद्यांच्या मते खुल्या कारागृहामध्ये सुधारणेसाठी सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक कार्यक्रम राबवले जातात. थोडक्यात, खुल्या कारागृहामध्ये सुधारणेसाठी सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक कार्यक्रम राबविले जातात. कैद्यांच्या मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकासाच्या दृष्टीने खुले कारागृह कार्यरत असून, त्याच दृष्टिकोनातून कैद्यांची सुधारणा होऊन त्यांना समाजामध्ये जाण्यासाठी योग्य व लायक बनविण्यासाठी सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये प्रामुख्याने खेळ, चित्रपट, नाटक, गायन, व्याख्यान, नृत्य, कीर्तन व प्रवचन इत्यादींचे आयोजन केले जाते. यामुळे कैद्यांच्या मनोरंजनाबरोबरच त्यांच्यामध्ये सुधारणांचे विचार रुजविले जातात. या मनोरंजनाच्या साधनांमधून कैद्यांचे मनोरंजन होतेच पण ही साधने कैद्यांच्या व्यक्तिमत्व विकास, सामाजिक परिस्थितीची जाणीव होते. जी कैद्यांच्या पुनर्वसनाच्या व सुधारण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. नृत्य व नाट्य प्रयोगांमुळे त्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, खेळ, क्रीडा या कार्यक्रमांमधून त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळतो, व्याख्यानामुळे कैद्यांच्या विचारांमध्ये बदल होऊन सकारात्मक विचार निर्माण करण्यास वाव मिळतो आणि हे उपक्रम सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

खुल्या कारागृहांमध्ये क्रिकेट, कबड्डी, हॉलीबॉल, बुद्धिबळ, कॅरम इत्यादी खेळ खेळले जातात. कैद्यांची मानसिक स्थिती चांगली राहावी, शारीरिक आरोग्य चांगले असावे, तसेच कैद्यांमध्ये सहकार्याची भावना वृद्धिंगत व्हावी, कैद्यांच्या मनामध्ये चांगले विचार निर्माण व्हावे व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा या दृष्टिकोनातून विविध खेळांचे आयोजन केले जात असल्याचे दिसून आले. कैदी खेळत असलेला खेळ व त्यामुळे कैद्यांमध्ये झालेल्या बदलांचा शोध घेतला असता असे दिसून आले की, बहुतांश कैद्यांमध्ये चांगले विचार निर्माण झाले व सांघिक भावना निर्माण झाली. जी कैद्यांना त्यांच्या कारागृह जीवनामध्ये सुधारण्यासाठी महत्त्वाची ठरते. तसेच खेळामुळे कैद्यांच्या शारीरिक तक्रारी दूर झाल्या व मानसिक तणाव दूर झाला. क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी हा खेळ मेहनतीचा आहे, जो कैद्यांना तंदुरुस्त बनवण्यासाठी मदत करतो. तसेच विविध खेळांमुळे कैद्यांचा थकवा दूर होऊन मानसिक सुधारणा होते जी मानसिक तणावांना दूर करते. कैद्यांची शारीरिक तक्रारी दूर झाल्यामुळे, सांघिक भावना निर्माण झाल्यामुळे व मानसिक तणाव दूर झाल्यामुळे कैदी चांगले विचार करतो. म्हणजेच सकारात्मक विचार करतो. या उपक्रमामुळे कैद्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन त्यांचे पुनर्सामाजीकरण होण्यास मदत होते.

खुल्या कारागृहामध्ये कैद्यांना २४ तास चित्रपट पाहण्याची परवानगी असून ते कौटुंबिक सामाजिक व फक्त मनोरंजनात्मक चित्रपट पाहतात. या चित्रपटांमुळे ८६.६७ टक्के कैद्यांमध्ये सुधारण्याची भावना निर्माण झाली, मानसिक थकवा गेला, मनोरंजन झाले व ताण-तणावातून मुक्तता मिळाली. कैद्यांच्या सुधारणेच्या दृष्टिकोनातून व मानसिक आरोग्य चांगले राहावे यासाठी मनोरंजनाचे साधन म्हणून खुल्या कारागृहातील प्रत्येक बराकीमध्ये टी.व्ही. बसविण्यात आले असून त्यांना २४ तास टी.व्ही. पाहण्याची परवानगी प्रशासनाने दिलेली आहे. त्यामुळे कैद्यांचा चित्रपटाबरोबर इतर सामाजिक कार्यक्रम व बातम्या पाहण्याकडे कल दिसून आला. या माध्यमातून संपूर्ण विश्वामध्ये कोण-कोणत्या घडामोडी घडत आहेत याची त्यांना माहिती तर मिळतेच परंतु त्यावर बहुतांश कैदी सखोल चर्चा देखील करताना दिसून आले. जो कैद्यांच्या सुधारण्याची व सकारात्मक विचाराची पावती देतो.

खुल्या कारागृहांमध्ये धार्मिक व नैतिक शिक्षण दिले जात असून भजन-कीर्तन शिबिरांचे आयोजन व व्याख्याने हे त्याचे माध्यम आहे. यामुळे सर्वच कैद्यांमध्ये सर्वधर्मसमभावाची भावना निर्माण झाली, इतरांचा सन्मान अधिक वाढला व आदर भावना निर्माण झाली. खुल्या कारागृहांमध्ये दर गुरुवार व शनिवारी भजनाचे आयोजन केले जाते. ज्यामध्ये गवळण, अभंग, भारुड तसेच इतर सर्व प्रकारची भजने गायली जातात. ज्यामुळे कैद्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होऊन इतरांचा सन्मान वाढला आहे. कीर्तन, शिबिरे व व्याख्यानांतून कैद्यांना विविध ज्ञान प्राप्त तर झालेच परंतु सर्वधर्मसमभावाची भावना निर्माण झाली. जी धर्म, जात व पंथ विसरून इतरांविषयी आदर भावना जागृत करते. बहुतांश कैद्यांमध्ये या उपक्रमांमुळे पश्चातापाची भावना जागृत झाली. ही पश्चातापाची भावना महत्त्वाची आहे, कारण यातून पुढे सुधारण्याची इच्छा निर्माण होते.

खुल्या कारागृहामध्ये विपश्यना शिबीर, गांधी विचार शिबिर, कायदे विषयक, आरोग्यविषयक शिबिर, आर्ट ऑफ लिविंग व योगा शिबिरांचे आयोजन केले जाते. अशा उपक्रमांच्या आयोजनांमधून कैद्यांना मानसिक, शारीरिक आणि भावनिक ताकद दिली जाते. यातून त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडून येतो व आत्मविश्वास वाढतो. यावरून असे दिसून येते की, विपश्यना शिबिरामुळे सर्वच कैद्यांना मानसिक तणावातून मुक्तता मिळाली, मनःशांती मिळाली, मनात चांगले विचार निर्माण झाले व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला. विपश्यनेमुळे व्यक्तीचा शारिरीक व मानसिक थकवा दूर होऊन मनातील नकारात्मक विचारांना बाहेर काढण्यास मदत होते. तसेच आत्मनिरीक्षण करून शांतीमय जीवन जगण्यास प्रोत्साहन देते. ज्यामुळे कैद्यांमध्ये मानसिक तणावातून मुक्ती मिळवून त्यांच्या मनामध्ये चांगले विचार व सकारात्मक विचार निर्माण होताना दिसून आले. खुल्या कारागृहातील कैद्यांमध्ये कायदेविषयक शिबिररामुळे कायद्याविषयी जागरूकता निर्माण होऊन जबाबदारीची जाणीव झाली आहे. कैद्यांकडून नकळतपणे गुन्हा घडलेला असतो. याची त्यांना जाणीवही नसते. अशा संघर्षग्रस्त कैद्यांचे सुधारणा व पुनर्वसन करणे कारागृहाचा मुख्य उद्देश आहे. त्यादृष्टीने खुल्या कारागृहात कायदेविषयक शिबिर घेऊन कैद्यांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करून देण्याचे काम करताना दिसून येते. व्यक्तीचे आरोग्य उत्तम असेल तर त्याला आपले कार्य करण्यास अधिक वाव मिळतो व त्याची मानसिकता उत्तम राहते त्याच दृष्टिकोनातून कैद्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य उत्तम राहावे, त्यांना कोणताही आजार होऊ नये यासाठी खुल्या कारागृहांमध्ये कैद्यांच्या वैद्यकीय तपासणी करीता आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. यामध्ये त्वचारोग, टीबी, कर्करोग, मलेरिया, कान, नाक, डोळे, एच. आय. व्ही. इत्यादी आजारांची तपासणी केली जाते. यामुळे कैदी आरोग्याच्या बाबतीमध्ये सजग होऊन स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. तसेच कोणताही आजार होऊ नये यासाठी कारागृह परिसर स्वच्छ ठेवत असल्याचे दिसून येते.

आर्ट ऑफ लिव्हिंगमुळे सर्वच कैद्यांमध्ये आत्मविश्वास वाढला व मानसिक शांती मिळाली आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगमुळे व्यक्तींमध्ये तणावाचे निरसन करण्यास मदत होते. तसेच हिंसा, निराशा आणि तनावाचे निरसन करण्यासाठी हे महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. तसेच आरोग्य सुधारून चांगले जीवन जगण्याची प्रेरणा प्राप्त होते, मनाची स्पष्टता वाढते, सर्जनशीलता वाढते, आव्हानात्मक परिस्थितीला हाताळण्याची क्षमता वाढते. यामुळे कैद्यांमध्ये सामाजिक जाणीव प्राप्त होऊन स्वतःबद्दल व समाजाबद्दल सजगता वाढली आहे. म्हणजेच त्यांच्यातील नकारात्मकता कमी होऊन आत्मविश्वासमध्ये वाढ झाली आहे. जी कैद्यांच्या सुधारणेसाठी महत्त्वाची ठरते. तसेच सर्वच कैद्यांमध्ये सुधारण्याची भावना निर्माण झाली व चांगला माणूस बनण्याची उमेद मिळाली आहे. आर्ट ऑफ लिविंगमुळे नैराश्य आणि चिंता यापासून मुक्ती मिळते. ज्यामुळे कैद्यांमध्ये सकारात्मक विचार निर्माण झाल्याचे दिसून येते. खुल्या कारागृहातील योगसाधनेमुळे कायद्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे. कारागृहात येणारा प्रत्येक कैदी हा मुळात गुन्हेगार नसतो त्याच्यावर

येणारे प्रसंग आणि परिस्थिती त्याला या प्रसंगापर्यंत नेण्यास भाग पाडले. त्यामुळे अनेक वेळा प्रत्येकजण मानसिक अस्थिरतेत खचून जातो. त्याचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. त्यांना यातून परावृत्त करण्याचे काम योग साधना करत आहे. ज्यामुळे मनातील नकारात्मक विचार दूर होऊन सकारात्मक विचार निर्माण झाल्याचे दिसून येते.

**समारोप:** खुल्या कारागृहाची संकल्पना ही अत्यंत अभिनव असून स्वातंत्र्योत्तर भारतात या संदर्भात बराच विचार झाला आहे. महाराष्ट्रात देखील याची सुरवात एका अभिनव कल्पनेतून झाली आहे. "सुधारणा व पुनर्वसन" हे महाराष्ट्रातील कारागृहाचे उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी महाराष्ट्र कारागृह विभाग व खुले कारागृह विभाग सातत्याने प्रयत्न करत आहे. आज समाजाचा गुन्हेगारांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. गुन्हेगारांकडे गुन्हेगार म्हणून न पाहता त्याच्याकडे एक माणूस म्हणून पाहत आहे. त्यांना गुन्हेगार म्हणून वागणूक न देता एक माणूस म्हणून वागणूक देणे व त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, विविध सुधारात्मक कार्यक्रमांचे आयोजन करणे व त्यांचे पुनर्वसन व सुधारणा करणे हा उद्देश ठेवूनच खुले कारागृह स्थापन केले. आपले विचार, वागणूक, तत्त्वे आणि आपल बाह्य स्वरूप या सर्वांचा मेळ आपल्या व्यक्तीमत्वात दिसतो. आपल्याला असलेले ज्ञान, प्रवृत्ती आणि आपली कौशल्ये त्या वेगळेपणात भर पाडतात. या दृष्टीकोनातून खुल्या कारागृहामध्ये विविध उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमांमुळे कैद्यांना मानसिक, शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या चालना देतात. साहसी खेळ क्रीडा, नृत्य, नाट्य, संगीत इत्यादी करिक्युलर कार्यक्रमांमुळे कैद्यांच्या सर्जनशीलतेस वाव मिळाला असून योग्य दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत झाली आहे. म्हणून खुले कारागृह कैद्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी व कैद्यांच्या पुनर्वसनासाठी महतत्वाची भूमिका पार पाडत आहे.

***संदर्भ सूची:***


1. *सिंह, बी. एन., सिंह, जनमेय. (2008). भारतीय समाज: मुद्दे एवं समस्याए. कानपूर: ज्ञानोदय प्रकाशन. पृ.क्र. ११४.*
2. *Ghosh, S. (1992) Open Prison in The Inmates (A Socio-Psychological Study). New Delhi: Mittal Publications. P. No. 01.*
3. *Gote-Gavhane, Shubhangi. (1997). Female Criminality and Sociological Theories. Aurangabad: South Asian Social Research Publication. P. No. 1.*
4. *काळदाते, सुधा, गोटे-गव्हाणे, शुभांगी. (२००३(. गुन्हेगारीचे समाजशास्त्र (अपराधशास्त्र). पुणे: श्रीविद्या प्रकाशन. पृ. क्र. १६.*
5. *Sethana, M.J. (1964). Society and The Criminal. Bombay: Kitab Mahal. P. No. 209.*
6. *Central Bureau of Correctional Services. (1973). Open Prison in India. New Delhi: Ministry of Home Affairs. P. No. 42.*
7. *Chowdhury, Nitai Roy. (2002). Indian Prison Laws and Corrections of Prisoners. New Delhi: Deep and Deep Publication Pvt. Ltd. P. No. XI*
8. *National Crime Records Bureau. (2022), Prison Statistics in India 2021. New Delhi: Ministry of Home Affairs, Govt. of India. P. No. 29.*

# आदिवासींच्या सामाजिक चळवळीत बिरसा मुंडा यांचे योगदान

**डॉ. रविंद्र विखार,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा

***सारांश:*** *सर्व समाजात सामाजिक चळवळी प्रत्ययास येतात. भारतात प्राचीन काळापासून अशा चळवळी झाल्यात. इतके मात्र खरे की लोकांमध्ये जेव्हा असंतोष पसरतो, त्यांना परिवर्तनाची आकांक्षा असते, वंचिततेची जाणीव होते तेव्हा त्या समाजातील धुरीण लोकांचे नेतृत्व करतात आणि चळवळ सुरू होते. दऱ्याखोऱ्यात राहणारा, निरक्षर, गरीब, परांपरागत जीवन जगणाऱ्या आदिवासींमध्ये अशा चळवळीचा अभाव होता. परंतु इतर समाजाशी संपर्क स्थापित झाल्यानंतर परिवर्तनाची गरज निर्माण झाली. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही लोकांची चळवळ होती आणि विस्तारानंतर चळवळीचा प्रभावही वाढला. स्वातंत्र्य चळवळ प्रादेशिक, जाती आणि धर्माच्या पलीकडे जाऊन देशातील सामान्य नागरिकांच्या सामुहिक संकल्पाचा अविष्कार ठरली. १८५७ पूर्वीही आदिवासी समाजाने वारंवार ब्रिटीशांविरुद्ध उठाव केला होता. इंग्रजांना आदिवासी भागात त्यांचे साम्राज्य स्थापन करण्यात अडचणी येत होत्या. भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासात आदिवासींचा सहभाग अत्यंत महत्वाचा होता. या स्वातंत्र्य संग्रामात आदिवासींचे मोठे योगदान होते. त्यापैकी बिरसा मुंडा हे ही एक होत. त्यांच्या कार्याचा उहापोह प्रस्तुत संशोधन लेखात केलेला आहे.*

**प्रस्तावना:** सामाजिक चळवळीचा संबंध हा प्रामुख्याने सामाजिक परिवर्तनाशी असतो. परंतु सर्व परिवर्तने सामाजिक चळवळी मुळेच घडून येतात असे नव्हे. संपूर्ण समाज व्यवस्थेत किंवा व्यवस्थेच्या एखाद्या अंगात परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने चळवळी बांधल्या जातात. अर्थात परिवर्तनाला विरोध करणाऱ्या किंवा प्रस्थापित व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या चळवळी देखिल असू शकतात. चळवळी या विशिष्ट तत्व प्रणालीवर विश्वास असणाऱ्या लोकांनी संघटितरित्या केलेला प्रयत्न आहे. सामाजिक चळवळीचा संबंध हा प्रामुख्याने सामाजिक परिवर्तनाशी असतो. सामाजिक चळवळीमध्ये सामाजिक संस्थांमधील एखादा भाग अथवा संपूर्ण समाज व्यवस्थेत बदल करण्याचा संभव असतो. म्हणजेच संपूर्ण समाज व्यवस्थेत अथवा व्यवस्थेच्या एखाद्या अंगात परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने चळवळी बांधल्या जातात. काही चळवळी सामाजिक प्रगतीसाठी उपयुक्त असतात तर काही प्रगतीत अडसर म्हणून उभ्या राहतात. म्हणजे सामाजिक चळवळी समाजातील मानवी संबंधामध्ये नवे परिवर्तन घडवून आणतात. समाजशास्त्रात कुटुंबसंस्था, जाती व्यवस्था, सामाजिक वर्ग, माणसा—माणसातील परस्पर संबंधाबाबत असलेले सामाजिक नियम, रूढी, यांच्या संदर्भात सामाजिक चळवळीचे अभ्यास केला जाते. परस्परांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणला जातो.

विद्यमान समाज व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणण्यासाठी केलेल्या सामुहिक प्रयत्नांमधून चळवळ निर्माण होत असते. चळवळीचा संबंध समाज व्यवस्थेत आर्थिक, राजकीय व सामाजिक संस्था अथवा सामाजिक जीवनात काही नवीन सुव्यवस्था निर्माण करणे या उद्देशाने करण्यात आलेले सामुहिक स्तरावरचे प्रयत्न म्हणजे चळवळ होय. असे प्रयत्न सर्व समाजांमध्ये व देशामध्ये भूतकाळात झालेले असतात व वर्तमान काळातही सुरू असतात. म्हणून चळवळी हे समाज जीवनाचे अविभाज्य अंग होय असे म्हणता येते. बदलत्या सामाजिक व्यवस्थेबरोबर समाजात या बदलाचे काय परिणाम होतात इत्यादिंशी सामाजिक चळवळ नियंत्रित असते.

ज्या चळवळी लोकांमध्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणतात. त्यांना समाज शास्त्रीयदृष्टया 'सामाजिक चळवळ' असे म्हणतात. समाज घटकांच्या सामुदायिक प्रश्नांना घेवून चळवळी आकार घेत असतात. या प्रश्नांना वाचा फोडण्याची सामुदायिक कृतीच्या स्वरूपात जेव्हा संप, मोर्चे, घोषणा, सभा, मिरवणूका अशा कृती होवू लागतात तेव्हा सामाजिक चळवळीचे दृष्यरूप समोरे येते. मात्र हया दृष्य रूपाला सामुदायिक कृतीच्या आधी परिवर्तनाचा विचार अस्तित्वात असतो. हा विचार एखाद्या व्यक्तीने दिलेला असतो. अशा चळवळींना त्या व्यक्तीचे नेतृत्व लाभते. ती व्यक्ती आपल्या वैचारिक तत्वज्ञानातून आणि कृतीयुक्त कार्यक्रमातून अशा चळवळीचे प्रतिनिधित्व करते. ही चळवळ जेव्हा पसरते तेव्हा त्या नेत्यांना अनेक अनुयायी लाभतात व ते या चळवळीचा प्रसार करतात. म्हणजेच सामाजिक चळवळी हया परिवर्तन घडवून आणण्याचा एक जाणीव पूर्वक व संघटित प्रयत्न आहे. काही चळवळी या कधी परिवर्तनाच्या गरजेनुसार तर कधी परिस्थितीच्या रेटयानेही उभी राहते. कधी या चळवळी अनुकूल बदल घडवून आणतात तर कधी त्याची फलश्रुती प्रतिकुलही ठरते. कधी कधी चळवळीमध्ये निदर्शने, बहिष्कार आणि काही वेळा हिंसा इत्यादी असंस्थाकृत साधनांचा अवलंब केला जातो.

आदिवासी समाज हा प्रादेशिक व सांस्कृतिक दृष्टया भारतीय सामान्य जनजीवनापासून वेगळा व अलिप्त आहे. त्यामुळे आदिवासींच्या आणि आदिवासीं मधील शेतकऱ्यांच्या चळवळी बऱ्याच जुन्या आणि नागरी समाजापेक्षा वेगळया आहेत. आदिवासी समाजात दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, अस्वच्छता, कर्जबाजारीपणा, निरक्षरता व शोषणाच्या चक्रात भरडून निघाला आहे. आदिवासी 'भूमीपूत्र' मानले जात असले तरी अधिकाधिक आदिवासी भूमीहीन आहेत. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन अनेक सुशिक्षित लोकांनी, ठेकेदारांनी त्यांच्या शेतजमिनी बळकाविल्या आहेत. पारंपारीक पध्दतीनेच ते शेती करतात. शेतीच्या अत्यल्प उत्पादनामुळे आदिवासी सतत कर्ज काढतो व आयुष्यभर सावकाराच्या कर्जात राहतो. तो कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो व कर्जातच मरतो असे म्हटल्या जाते. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सुशिक्षित लोकांनी त्यांच्या जमिनी बळकावल्या आहेत. आदिवासींची सावकार, जमीनदार, व्यापारी, जंगल ठेकेदार आणि सरकारी अधिकारी इत्यांदी कडून नित्याची

पिळवणूक होत असते. वनकायद्यामुळे आदिवासींना वनसंपत्तीचा लाभापासून वंचित राहावे लागत आहे. आदिवासी पारंपारिक पध्दतीनेच शेती करतात. ती परवडणारी नाही. शेतीवर अवलंबून असल्यास बारमाही कामे मिळत नाही. म्हणून ते शहराकडे रोजगार, मजुरीसाठी धाव घेतात. अनेक आदिवासी शहराकडे कामासाठी, रोजगारासाठी स्थलांतरीत होत आहेत. आदिवासी शहरात येऊन शारीरिक श्रमांची कामे करतात. रोजगाराच्या अभावी दारिद्रय, कर्ज काढून सण साजरे करण्याची प्रयत्न, उपासमार प्रामुख्याने दिसून येते. आर्थिक, सामाजिक, राजकीय, प्रादेशिक व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात आदिवासींचा मागासलेपणा दिसून येतो.

ब्रिटिश काळात आदिवासींनी अनेक चळवळी उभारल्या होत्या. जमीनदार आणि सावकारांनी इंग्रज सरकारच्या सहकार्याने बिहार मधील राजमहल टेकडयांच्या प्रदेशातील आदिवासींचे मोठया प्रमाणात शोषण केले गेले. म्हणून येथील आदिवासींना जागृत करण्यासाठी आणि इंग्रजांकडून सुरक्षिततेची हमी मिळविण्यासाठी आदिवासींनी चळवळी उभारली होती.

ब्रिटिश शासन काळात सरकारने आदिवासींच्या विकासाकडे फारसे लाभ दिले नसले तरी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आसाम, मिझोराम, नागालॅंड इत्यादी भागात जाऊन सेवा कार्य सुरू केले. त्याच बरोबर शिक्षण व धर्मप्रसारही केला. ज्या भारतीयांनी आदिवासीमध्ये जाऊन समाजकार्य करण्यास पुढाकार घेतला, त्यात प्रामुख्याने ए. व्ही. ठक्कर उर्फ ठक्कर बाप्पा यांचे नाव अग्रणी आहे. इ.स. १९१४ पासूनच त्यांनी 'भारत सेवक' समाजाच्या कार्यात स्वत:ला वाहून घेतले. नंतर 'भारतीय आदिवासी सेवक संघ' ही संघटना स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून आदिवासींसाठी सामाजिक कार्य केले जाते.

आदिवासी हे नदी, दऱ्या, खोऱ्यात, पर्वत इत्यादी निसर्गाच्या सान्निध्यात स्वयंपूर्ण व समाधानी जीवन जगत असतात. नैसर्गिक पर्यावरणात उपलब्ध साधन सामुग्रीचा ते पुरेपुर वापर करतात. प्रामाणिकपणा, निसर्गप्रेम व त्याप्रति आदर, निसर्गपूजा, पूर्वजपूजा ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. आदिवासींचा बाहय जगाशी म्हणजे आधुनिक संस्कृतीशी त्यांचा संपर्क नव्हता, तोपर्यंत त्यांच्या शांततामय सामाजिक जीवनात कोणतीही ढवळाढवळ किंवा आंदोलने झाली नाहीत. परंतु परकीय सत्ता, फिरते व्यापारी, सावकार, बाहय संस्कृतीतून स्वत:च्या हितसंबंधासाठी येणारी व आदिवासींचे शोषण करणारी माणसे या सर्वांच्या परिणामामुळे सामाजिक व आर्थिक बाबतीत परिवर्तन आणि शोषणपर्व सुरू झाले.

Anthropological Survey Of India, यांनी केलेल्या १९७६ च्या अध्ययनानुसार भारतात ३६ आदिवासी चळवळी होत्या. त्यातील १४ चळवळी या उत्तर–पूर्व भारतातील होत्या व त्या बहुतांशी राजकीय चळवळी होत्या.

**संशोधनाचे उद्देश:** १) आदिवासींच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे. २) आदिवासींचा सामाजिक चळवळीमधील सहभाग अभ्यासणे. ३) बिरसा मुंडा यांच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे. ४) बिरसा मुंडाच्या सामाजिक चळवळीचा आदिवासी समाजाला व देशाला काय फायदा झाला याचा अभ्यास करणे.

**गृहितके:** १) आदिवासींनी सामाजिक चळवळीत सक्रीय सहभाग घेतला. २) बिरसा मुंडा यांनी आदिवासींच्या सामाजिक चळवळीत सक्रीय कार्य केले. ३) बिरसा मुंडांच्या सामाजिक चळवळीचा देशाला व आदिवासींना फायदा झाला.

**बिरसा मुंडाची चळवळ (१८९५ ते १९०१):** भारतात काही आदिवासींनी आपले स्वतंत्र अस्तित्व व ओळख कायम राखण्यासाठी १८ व्या व १९ व्या शतकापासून ज्या चळवळी उभारल्या त्यात त्या चळवळीं मध्ये बिरसा मुंडाची चळवळ विशेष महत्वाची आहे. भारताच्या बिहार राज्यातील छोटा नागपूर या एका परगणा भागात मुंडा, ओरॉव, संथाल, गोंड, हो, कोल्हण व अन्य आदिवासी जमाती वास्तव्याला आहेत. त्यातील मुंडा जमातीत 'बिरसा' नावाचा महान क्रांतिकारकाचा रांची जिल्हयातील चुलकदजवळच्या उलिहातू नावाच्या खेडयात १५ नोव्हेंबर १८५७ रोजी जन्म झाला. सुगना मुंडा व करमी हातू यांच्या पोटी बिरासाचा जन्म झाला. कोमता व कानू असे दोन भाऊ. बिरसाचे प्राथमिक शिक्षण सालगा येथे झाले. बिरसा काही दिवस मावशीकडे शिकायला राहिला. मावशीकडे बकऱ्या राखायला बिरसा जायचा. एक दिवस जंगली पशूने बिरसाच्या एका बकऱ्याचा बळी घेतला. त्यामुळे त्याच्या मावशीच्या पतिने बिरसाला खूप मारले. बिरसा नाराज होवून खूप रडला. बिरसाने ठरविले की आपण इथे राहायचे नाही व एका रात्री तिथून बिरसाने पळ काढून आपल्या गावी आई वडिलांकडे आला. बिरसाच्या वडिलांने बिरसाला बुरजू येथील प्राथमिक शाळेत नाव दाखल केले. बिरसा बुरजूच्या ख्रिश्चन मिशनमध्ये राहू लागला. या मिशनचे प्रमुख फादर रेव्हरंट पुटस्कींग हे होते. त्यांनतर पुढील शिक्षण जी. ई. एल. मिडल स्कूलमध्ये पूर्ण केले. त्या शाळेच्या वातावरणात बिरसा रमला. तिथे त्याला बंगाली मित्र अमूल्य मिळाला. बिरसा एक आदर्श विद्यार्थी म्हणून ओळखला जायचा. सर्वांशी तो आदराने व प्रेमाने वागे. बिरसा फादर सोबत इतरांचाही आवडता विद्यार्थी ठरला.

बिरसाला मात्र बाहेरच्या वातावरणाची हळुहळू जाणीव होवू लागली. इंग्रजांच्या अन्याय अत्याचारांची त्याला चिड होती. तो विचार करू लागला. क्रांतिकारी विचारांचे बीज हळुहळू अंकुरीत होवू लागले. तेथेच काही मुंडा मुले त्याला सोबती मिळाले. मुंडा आदिवासींची 'स्वंतत्र सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था' होती. मुंडाची स्वतंत्र शेती व्यवस्था होती. त्यांची अर्थव्यवस्था शोषणमुक्त होती. ब्रिटिशांची राजवट आल्यानंतर मुंडाची शेतीव्यवस्था नष्ट करून आणि वनासाठी नवे नियम आणि कायदे तयार करण्यात आले. वसुलीच्या पारंपारीक पध्दती बंद करण्यात आल्यात. महसूल वसूल करण्यासाठी जिल्हाधिकारी, अबकारी अधिकारी आणि नव्या अधिकारांची नेमणूक झाली. पोलिस यंत्रणेमार्फत कायदा व सुव्यवस्था ठेवण्यात येवू

लागला. भांडणतंटे सोडविण्यासाठी न्यायालयाची स्थापना झाली. त्यामुळे आदिवासींची परंपरागत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था पूर्णत नष्ट झाली.

या नव्या व्यवस्थेचा परिणाम आदिवासी समाजावर झाला. छोटा नागपूर क्षेत्रातील खुंटकट्टी आदिवासी त्याच्या जमिनीचे स्वामी होते. ते आता स्वतःच्या जमिनीवर नोकर म्हणून राबू लागलेत. त्यांच्या जमिनी सावकार, जमीनदार, ठेकेदारांनी हडप केल्यात. ब्रिटिशांच्या नव्या व्यवस्थेचा फार वाईट परिणाम मुंडा आदिवासींवर पडला. ब्रिटिशांच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी मुंडा आदिवासी अनेकदा उठाव केले होते. १७८९ मध्ये मुंडांनी उठाव केला होता. १८३१—३२ मध्ये कोलांचा उठाव झाला. १८५८ मध्ये जमीन आणि आपल्या अधिकारांच्या रक्षणार्थ पुन्हा एकदा आदिवासी चळवळ निर्माण झाली. एकोणीसाव्या शतकाच्या मध्यंतरी अन्याय, अत्याचार व शोषण या विरूध्द आदिवासींतील असंतोष चौफेर प्रकटला. आदिवासींची अस्मिता व अस्तित्व यासाठी आंदोलन सुरू होते. हेच कालांतराने 'सरदारी आंदोलन' म्हणून प्रसिध्दीस पावले. या आंदोलनात मुंडा, संथाल, ओराव, खासी, हो, गारो, कोल्हाण, गोंड अशा विविध आदिवासी जमाती सक्रिय होवून विविध आघाडयांवर अविरत लढत होत्या. हडपल्या गेलेल्या जमिनी व प्रदेशावरचा त्याचा अधिकार त्यांना परत मिळावा ही सरदारी आंदोलनाची प्रमुख मागणी होती. हे आंदोलन दीर्घकाळ व टप्या—टप्याने चालले. सरदारी आंदोलन हे स्वहित रक्षणाचे आदिवासींचे एक प्रभावी हत्यार होते, ख्रिस्ती मिशनऱ्यांनी खोटी आश्वासने देऊन आदिवासींचा विश्वासघात केला याचे दुःख आदिवासी लोकांना होते. त्याचा परिणाम आदिवासींच्या शोषण मुक्तीची ती एक वैयक्तिक ललकारी होती. या आंदोलनातील सरदार जागरूक, स्वाभिमानी व लढावू होते. आपले न्याय हक्क मान्य करण्यात यावे अशी त्यांची मागणी होती. सरकारला कळविले, परंतु काही परिणाम झाला नाही. त्यामुळे सर्व सरदारांनी मिशन सोडले, ते बाहेर आले. बिरसानेही व त्याच्या कुटूंबासमवेत ख्रिश्चन धर्म सोडला. सरकारने सेना पाठवून ते आंदोलन दाबून टाकण्याची प्रयत्न केला.

बिरसाच्या कानावर सरदारी आंदोलनाच्या बातम्या आल्या आणि तो बेचैन झाला. काही दिवसांनी सरदारांनी पुन्हा बंड केले. फादर नैट्रॅट वर फार संतापले आणि त्यांनी सरदारांना 'चोर, भामटे, लुच्चे' म्हटले त्यामुळे बिरसा फार संतापला. फादर नैट्रॅटवर बिरसा खूप रागावला. दोघात फार भांडण झाले. नैट्रॅटने बिरसाला मिशनमधून काढून टाकले. १८८६ मध्ये बिरसाने मिशन सोडले. त्यामुळे बिरसाचे शिक्षण सुटले. त्यानंतर काही दिवस बिरसा आनंदपंत नावाच्या सद्गृहस्थांच्या सानिध्यात आला. पंतांनी त्यांनी भारतीय तत्वज्ञानाचे धडे दिले. वीर पुरूषांच्या साहसकथा सांगितल्या. अन्यायअत्याचारा विरूध्द लढण्यास शिकविले व बिरसाचे मत परिवर्तन झाले. जनमोहनसिंग पांडे या बंदगावच्या जमीनदाराला बिरसा भेटला. भारतीय धर्मग्रंथांचा अभ्यास त्यांच्या कडून केला. अनेक साधुसंतांच्या भेटी त्याने घेतल्या. भक्ति मार्गाचा अवलंब केला. अहिंसेचे तत्व अंगिकारले व साधुवृत्तीने बिरसा जगू लागला.

१८९४ मध्ये छोटा नागपूर परिसरात फार मोठा दुष्काळ पडला. लोकांची फार बिकट अवस्था झाली. आदिवासी हतबल झाले होते. महामारीची साथ, लोक बेजार झाले. भूक व आजाराने काही सुचेनासे झाले. सर्वत्र दुःखाचे सावट पसरले. ते बिरसाला पहावले नाही. आपल्या निष्ठावंत मित्रांना सोबत घेऊन बिरसा घरा—घरात फिरला. त्याने धन—धान्य पुरविले. निष्ठेने त्यांनी सेवा केली. त्यांचा विश्वास संपादन केला. त्याच्या सेवा भावाने लोक सुखवले. आदिवासींनी बिरसाला आपले कैवारी मानले.

'वन शुल्क माफी' चा लढा बिरसाने १८९४ मध्ये पुकारला. आदिवासींची त्यांनी जनजागृती केली. आदिवासींनी बिरसाच्या नेतृत्वात लढयासाठी सज्ज झाले. 'वन शुल्क माफ झालेच पाहिजे' अशा घोषणा देत बिरसाच्या नेतृत्वात आदिवासींचा विशाल समुदाय छैबासा येथील सरकारी कार्यालयावर पोहचला. हे बघून पोलिस सज्ज झाले. लोकांचा जमाव पेलवत नाही हे बघून पोलिसांनी गोळीबार केला परंतु आंदोलनकर्त्यांनी माघार घेतली नाही. या नेतृत्वात बिरसा मुंडा प्रसिध्द झाला व तो आदिवासीचा नेता गणला गेला. मात्र पोलिस बिरसाच्या हालचालींवर नजर ठेऊन होते.

छोटा नागपूर भागातील आदिवासींचे सावकार, जमीनदार, ठेकेदार, मोठया प्रमाणात शोषण करीत होते. त्यांच्या धूर्त चालींमुळे आदिवासींना आपल्या जमिनी गमवाव्या लागल्या, त्यांचा वन्य संपत्तीवरचा अधिकार धोक्यात आला. आर्थिक व राजकीय दृष्टीने या क्षेत्रातील मुंडा आदिवासींची स्थिती अत्यंत दयनीय झाली. या परिस्थितीत त्यांना ख्रिश्चन मिशनऱ्यांची मदत केली. त्यांचे भूमी संबंधी अधिकार वापस मिळाले परंतु त्याच्या मोबदल्यात त्यांना ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करावा लागला. मुंडा आदिवासींनी ख्रिश्चन धर्म स्विकारला असला तरी त्यामुळे त्यांच्या जीवनातील शोषण, दैन्य, उपासमार संपली नाही. एकप्रकारे धर्मांतराने त्यांचा भ्रमनिरास झाला. या पार्श्वभूमीवर इ.स. १८९५ च्या दरम्यान छोटा नागपूर क्षेत्रात तीव्र असंतोष पसरला. यावेळी बिरसा मुंडाचे यांचे नेतृत्व उदयाला आले. बिरसा ने चळवळीने नेतृत्व केले. त्यांनी एक योजना बनविली. त्या योजनेत लोकांना आपल्या आकांक्षा साकार झाल्याचे दिसू लागले. त्यांनी मुंडा आदिवासींना एक धर्म आणि एक जीवन पध्दती दिली. परकीय शासनाच्या ऐवजी मुंडा राज्याची योजना मांडली. बिरसाने एका सतनामी पंडिताच्या प्रभावामुळे शाकाहाराचा स्वीकार केला. त्यांना हिंदू व ख्रिश्चन धर्मातील काही तत्वांना स्विकारून नवे विचार मांडला. या धर्माने जीवनातील कष्ट संपतील असा आशावाद लोकांच्या मनात निर्माण केला. त्यांच्या धर्मात चमत्काराला जाग होती. मुंडा आदिवासी बिरसा मुंडाला ईश्वर स्वरूप मानित. हे त्यांना बिरसा भगवान म्हणू लागले. त्यांच्या संबंधी अनेक चमत्कार पसरवू लागले. बिरसा मुंडा दैवी पुरूष असून मृत व्यक्तीला जीवंत करतो, रोगराई पसरली तर ती दूर करतो, संकट प्रसंगी

धावून येतो असा विश्वास आदिवासींचा होता. बिरसा मुंडाला 'सीगबोंगा' म्हणजे ईश्वराने पाठविले आहे. लोक त्यांना नवजीवन देणारा प्रेषित मानू लागले. पुढे या चळवळीने अर्धराजकीय आणि सैनिकाचे रूप धारण केले. त्यांच्या समर्थकांनी सेनादल उभारले. अत्याचारी, शोषण करणाऱ्या जमीनदार, ठेकेदार, व्यापारी, सावकार, अधिकारी मिशनरी यांच्या विरूध्द संघर्ष सुरू केला. ब्रिटिश सत्तेविरूध्द बिरसाने विद्रोह सुरू केले. मायभूमीला स्वातंत्र्य करण्यास तो सरसावला. आदिवासी व शोषितांना शोषण मुक्त करण्याची त्याने शपथ घेतली. त्याने सशस्त्र युवकांची सेना उभारली. आदिवासींच्या प्रदेशात त्याने अनेक सभा घेतल्या. त्यांना त्याच्या हक्काची जाणीव करून दिली. वन शुल्क देवू नका, वेठबिगारी करू नका असे त्याने आदिवासीना पटवून दिले. लाकूड, फाटा, फळे—फुले, औषधी, कंदमुळे, शहद, मोहडोंबरी, खनिज संपत्ती, इत्यादी वस्तू इतर लोक घेवून जातात. जंगलावर आमचा पहिला अधिकार आहे. तो मिळालाच पाहिजे असे त्याने आदिवासींना आवाहन केले. त्याच्या प्रभावी वाणीने आदिवासी लोक खडबळून जागे झाले. आदिवासींना नवे भान आले. नवे चैतन्य त्यांच्यात संचारीले, बिरसाच्या शब्दांनी त्यांना संजीवनी मिळाली. बिरसाला आदिवासी आपला नेता, दु:खकर्ता व मुक्तिदाता समजू लागले.

बिरसाने स्वराज्याची घोषणा केली. बिरसाजवळ प्रचंड आत्मविश्वास होता. हा धीरगंभीर पुरूष सर्वांनाच सांगायचा की, "तो दिवस आता दूर राहिला नाही, जेव्हा ख्रिश्चन मिशनरी, सरकारी अधिकारी आणि त्यांची महाराणी (व्हिक्टोरिया) सुध्दा आपल्या पाया पडत जीवदान मिळावं म्हणून गयावया करतील. चला आपण सारे एक होवू या. हया महाराणीचे राज्य आता संपवून टाकू या. आता आपले राज्य येणार आहे."

१८९५ मध्ये बिरसा आंदोलनाचे स्वरूप धार्मिकतेने ओतप्रोत भरलेले होते. बिरसाने राजकीय चळवळी सोबतच आपल्या आदिवासी समाजातील अंध विश्वास आणि वाईट चालीरिती विरूध्द आंदोलन उभारले होते. ते मानसशास्त्रीय पध्दतीने आपल्या लोकांना समजावून सांगायचे, त्यांचा लोकांवर फार प्रभाव पडायचा. बिरसाचे विचार लोकांना फारच प्रेरणदायी आणि आशावादी वाटायचे, त्यामुळे बिरसाच्या चळवळीला लोकांचे प्रचंड समर्थन मिळू लागले.

इंग्रजांच्या विरूध्द चळवळीचा पहिला टप्पा म्हणून बिरसाने एक अभिनव असहकार चळवळ सुरू केली. त्याने सर्व आदिवासींना शेतात पेरणी न करण्याबद्दल सांगितले, त्यांनी 'आता इंग्रज सरकार पार संपलय' असे घोषित केले. त्यामुळे ब्रिटिश अधिकारी सावध झाले. त्यांनी बिरसाच्या अटकेचा आदेश काढला. त्याला पकडण्यासाठी ८ ऑगष्ट १८९५ रोजी चालकाडला पोहोचले. पण ते बिरसाला पकडू शकले नाही.

ब्रिटिश शासनाची हिंसात्मक प्रवृत्ती बघून बिरसाने आपल्या सहकाऱ्यांची चर्चा करून रक्ते सांडण्याची लढाई करण्याची योजना आखली. त्याची माहिती ब्रिटिश अधिकाऱ्यांना मिळताच २३ ऑगष्ट १८९५ ला एक विशेष बैठक घेऊन बिरसाचे बंड मोडून काढण्याचा आदेश दिला. २४ ऑगष्ट १८९५ ला पोलिस दल बिरसाच्या गावी चकदल येथे रवाना झाले. पोलिसांनी बिरसाच्या घराला वेडा घातला. बिरसा झोपला होता. पोलिसांनी सहजच त्याला अटक केली. त्यांच्या समर्थकांनी त्याला सोडविण्याचा भरपूर प्रयत्न केला परंतु ते यशस्वी झाले नाही. १९ नोव्हेंबर १८९५ रोजी बिरसाच्या केसचा निकाल जाहीर होऊन त्याला दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा आणि पन्नास रूपये दंड ठोठावण्यात आला होता. दंड न भरल्यास ६ महिने जास्तीची शिक्षा सुनावण्यात आली. शिक्षा भोगण्यासाठी बिरसाला रांचीच्या हजारीबाग जेलमध्ये पाठविण्यात आले. शिक्षा पूर्ण होण्याच्या काही दिवसापूर्वीच त्याला रांचीला आणण्यात आले. ३० नोव्हेंबर १८९७ ला बिरसा जेलमधून सुटून आपल्या चकदल या गावी आला. त्याने डेप्युटी कमिशनरला अशी हमी दिली होती की, आता तो उपद्रव फैलविणार नाही. परंतु त्याचे अनुयायी त्याला आपल्या अधिकाराच्या रक्षणासाठी आंदोलन करण्यास प्रेरित करीत होते.

सन १८९९—१९०० च्या मध्यंतरी विद्रोहाचे बिजारोपन झाले. जमीनदारांना लगाम न देणे, शेत जमिनीला मालगुजारीपासून मुक्त करणे तसेच मुंडांना जंगालाचे अधिकार वापस देणे इत्यादी मागण्या प्रमुख होत्या. सर्व गैरआदिवासींवर आदिवासींच्या जमिनी हडपण्याचा संबंधित आरोप लावण्यात आले. मुंडांनाच जमिनीचे खरे मालक संबोधण्यात आले. मुंडा राज्य परत करण्यावर सुध्दा भर देण्यात आला. या काळात चळवळीच्या साधन आणि साध्यामध्ये बरेच परिवर्तन झाले.

२४ डिसेंबर १८९९ या दिवशी सिंहभूम जिल्हयाच्या चक्रधरपूर तथा रांची जिल्हयाच्या खुटी, कर्रा, तोरपा, तमांड तसेच बसिया पोलिस स्टेशन अंतर्गत विद्रोहाची आग भडकली. ख्रिश्चन मिशन आणि पोलीस चौक्यांवर हल्ला करण्याचा निर्णय बिरसाने घेतला. फौजेची तीन तुकडयामध्ये विभागणी करून १८९९ च्या सरवादाग मिशन, बुडजू मिशन आणि मुढ मिशनवर हल्ले केलेत. हया हल्यांची बातमी रांचीमध्ये पसरली. जानेवारी १९०० मध्ये रांची मधील शासकीय पदाधिकाऱ्यांना बिरसाच्या हल्यांची माहिती मिळाली, रांची येथील कमिशनर फीवर्स व डेप्युटी कमिशनर फील्ड या आक्रमणाला नेस्तनाबून करण्यासाठी फौज घेवून रवाना झाले. ९ जानेवारी १९०० रोजी डुंबारी बुरूवर गोळीबार करण्याचे आदेश पोलिसांना मिळाले. बिरसाच्या अनुयायांना अटक करण्यास सुरूवात केली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी बिरसाच्या माणसांना पकडून देण्याचे काम केले. त्यापैकी जे धर्मांतर करून ख्रिस्ती होत त्यांना सोडून देत होते. अटकेच्या भितीने अनेक आदिवासींनी धर्मांतर केले. बिरसा इंग्रजांना सापडला नाही. तो सिंहभूम जिल्हयातील जाकोपाई जंगलात वसलेल्या चक्रधरपूरला पोहोचला. तिथे पुन्हा आपली फौज संघटिक करण्यासाठी तो हिंडू लागला. शासनाचे हेर बिरसाचे शिष्य म्हणून त्याला भेटले आणि त्यांनी बिरसाला त्यांच्या ऐंशी साथीदारासह अटक केली आणि

त्यांना रांची जेलमध्ये ठेवल्यात आले. तेथेच ९ जून १९०० ला बिरसाचा मृत्यु झाला.

बिरसा आंदोलनाच्या दरम्यान एकूण ४८२ आंदोलन कर्त्यांना अटक करण्यात आली. यातील ९८ लोकांवर गुन्हा सिंध्द झाला. ४८ विद्रोही क्रांतीकारकांना जेलमध्ये पाठविण्यात आले. २९६ कैद्यांविरूध्दच्या केसेस खारीज करण्यात आल्या. त्यानंतर बिरसा आंदोलन समाप्त झाले. बिरसा आंदोलनामुळेच छोटा नागपूर भागात आदिवासींमध्ये जागृती झाली व सुधारणेची पावले उचलल्या गेली.

**निष्कर्ष:** एकंदरीत आदिवासी क्षेत्रात अन्यायाची जाणीव करून देऊन, शोषणकर्त्याविरूध्द लढण्याचे व्यापक प्रमाणात लोकांच्या मनात असंतोष पसरविण्याचे कार्य बिरसामुंडा चळवळीने केले. जंगल, जमीन व निसर्ग संपत्ती यावरील आदिवासींचा पहिला हक्क त्यांना मिळवून देण्यात आले. आदिवासींच्या पूर्ण स्वातंत्र्यासाठी व न्याय हक्कांसाठी लोकमत जागविण्यात आले. आदिवासींच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांचे जतन करुन व त्यात ढवळाढवळ करणाऱ्यांना धडा शिकविण्यात आले आदिवासीमधील अंधश्रध्दा, कुप्रथा व धार्मिक अवडंबर यांचे उच्चाटन करून नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.


***संदर्भ ग्रंथ सूची :***

१. *आगलावे प्रदिप, २०१०, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', नागपूर, श्री. साईनाथ प्रकाशन.*

२. *देवगावकर शैलजा, देवगावकर श. गो., २००९, 'आदिवासी विश्व', नागपूर, आनंद प्रकाशन.*

३. *गारे गोविंद, 'महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती, समस्या विकास', पुणे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य.*

४. *कऱ्हाडे बी. एम., २०११, 'सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र', नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन.*

५. *कऱ्हाडे बाबु, २००४, 'आदिवासी जमातीचे समाजशास्त्र', चामोर्शी, जिल्हा गडचिरोली, मानवता सांस्कृतिक विकास व शोध केंद्र.*

६. *खडसे भा. की., १९९९, 'सामाजिक मानवशास्त्र', नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.*

७. *शहा घनश्याम, अणुवाद विकटे प्राची, २०११, 'भारतीय सामाजिक चळवळी', पुणे, डायमंड प्रकाशन.*

८. *शहा घनश्याम, अणुवाद वेंगूर्लेकर, २००२, 'सामाजिक चळवळी आणि सरकार', पुणे, डायमंड प्रकाशन.*

९. *खिखार रवींद्र, २०२२, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', सत्र सहावे, हर्षवर्धन पब्लिकेशन.*

१०. *मासिके: कुरुक्षेत्र, २०२२. लोकराज्य, योजना, जुलै २०२२, योजना ऑगष्ट, २०२२.*


# प्रसार माध्यमे आणि समाज

*प्रा. अनिल गावंडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य (सायंम) महाविद्यालय, नागपूर*

***सारांश:*** *वर्तमान समाजजीवनात प्रसारमाध्यमांचे महत्व खुपच वाढलेले आहे. किंबहुना प्रसारमाध्यमे आपल्या दैनंदिन जिवनाचा एक भाग बनलेला आहे. म्हणूनच आजच्या युगाला माहितीचे युग असेही म्हटले जाते. वर्तमानपत्रे, दुरचित्रवाणी, इंटरनेट यामुळे आपल्या जिवनात एक प्रकारची गतीशीलता प्राप्त झालेली आहेत. व्यक्ती, समाज व शासनसंस्था यांचा प्रसारमाध्यमांशी घनिष्ट संबंध असून व्यक्तीचे सामाजिक जिवन त्यामुळे अधीक सुकर व गतिशील बनलेले आहे. एकुणच आधुनिक काळात प्रसारमाध्यमे व्यक्तिच्या विकासात अत्यंत महत्वपूर्ण बनली आहेत. आज जगात सर्वत्र प्रसारमाध्यमांनी लोकांची माहितीची भुक वाढविलेली आहे. याचबरोबर व्यक्ती व समाज यांना प्रभावित सुध्दा केलेले आहे. एकुणच प्रसारमाध्यमे जनतेच्या सामाजीक, आर्थीक, राजकीय व सांस्कृतीक परीवर्तनाला प्रभावित करीत असतात. प्रसारमाध्यमे हा एक असा आरसा आहे ज्यामध्ये राष्टांचे प्रतिबींब दिसते. आकाशवाणी, वृत्तपत्रे, इलेक्टॉनीक साधने, दुरदर्शन आणि त्याच्या वाहीन्या व सोशल नेटवर्किंग यांनी तर व्यक्ती व समाज यांना अधिक जवळ आणलेले आहेत. प्रसारमाध्यमे लोकांमध्ये जागृती घडवून आणन्याचे व समाजप्रबोधनाचे कार्य करीत असतात. सुदृढ, निकोप, विवेकी आणि वैचारीक संतुलन असलेला समाज निर्माण करण्याचे उत्तरदायीत्व आज प्रसारमाध्यमांवर आहे. शासनाच्या विविध योजनांची माहिती, सामाजीक समस्या, राष्टीय समस्या लोकांपूढे आणण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत आहे.*

**प्रस्तावना:** भारतात सर्वप्रथम १८ व्या शतकात प्रसारमाध्यमांची सुरवात झाली. इ.स. १७८० मध्ये वर्तमानपत्र सुरु करण्यात आले. भारतीय पत्रकारीतेचे जनक राजा राममोहन रॉय तसेच अन्य समाजसुधारकांनी वृत्तपत्राच्या माध्यमातुन जनसामांन्यापर्यंत आपले विचार पोहचविण्याचे कार्य केलेले आहे. स्वातंत्र्यपूर्ण काळात 'केसरी' व 'मराठा', 'बंगाली', 'संवाद कौमुदी', 'न्यु इंडीया', 'वंदे मातरम', 'यंग इंडीया' आणि 'हरीजन' या वृत्तपत्रांच्या माध्यमातुन जनसामान्यात जागरुकता निर्माण करण्याचे कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात १९५० च्या दशकात २१४ दैनीक वर्तमानपत्र सुरु झाले होते. भारतातील महत्वाचे छापील प्रसारमाध्यमे म्हणजे 'द टाईम्स ऑफ इंडीया गृप्स' आणि 'द आनंद बाजार पत्रिका हे होय'. भारतातील वर्तमानपत्रांची विक्री इ.स. २००७ मध्ये ११.२२ टक्याने वाढली. तर २००७ मध्ये ९९ मिलीयन वर्तमानपत्रांच्या प्रत प्रकाशीत केल्या. त्यामुळे भारत हे जगातील सर्वात मोठे दुसऱ्या क्रमांकाचे वर्तमानपत्रांचे बाजारपेठ मानले जाते.

**शोधनिबंधाचा उद्देश :** १. प्रसारमाध्यमे व्यक्ति व समाज जिवनात किती उपयुक्त आहे याची माहिती घेणे. २. आधुनिक काळात प्रसारमाध्यमे सामाजीक समस्या सोडविण्यासाठी महत्वपूर्ण साधन आहे हे पटवून देणे. ३. प्रसारमाध्यमे लोकांमध्ये समाज जागृती व समाजप्रबोधन मोठ्या प्रमाणात करतात. यांच्या कार्याचा आढावा घेणे. ४. समाजातील स्त्रियांचे प्रश्न, समस्या, अंधश्रध्दा निर्मुलन, भ्रष्टाचार, इत्यादी प्रश्नांवर प्रसारमाध्यमे वाचा

फोडण्याचे कार्य करतात. ५. प्रसारमाध्यमांमुळे सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य करतात.

**गृहीतके :** १. प्रसारमाध्यमांमुळे व्यक्ती व समाज जिवनात मोठ्या प्रमाणात विकास घडवून आणण्याचे कार्य करतात. २. आधुनिक काळात प्रसारमाध्यमे सामाजीक समस्या, स्त्रियांचे प्रश्न, सामाजीक संदेश, समाजप्रबोधन करण्याचे कार्य करतात. ३. प्रसारमाध्यमांमुळे सामाजीक, सांस्कृतीक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात मोठया प्रमाणात परिवर्तन घडवून येतात.

**संशोधन आराखडा:** प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला गेला आहे.

**तथ्य संकलन:** प्रस्तुत संशोधनात दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला आहे.

**प्रसारमाध्यमे व समाजजिवन:**

१. रेडीओ: जनसंपर्काचे माध्यम म्हणून दुरदर्शनच्या पूर्ण रेडीओचा आवि कार व प्रसार झाला. रेडीओतून मिळणारी माहिती ही श्राव्य असते. रेडीओव्दारे जनतेला विविध योजनांची व संमस्यांची माहिती प्राप्त होत असते. अनुसुचीत जाती, जमाती, दुर्बल घटक, अल्पसंख्याकाच्या जिवनपध्दतीचा आणि समस्यांचा परीचय जनतेला रेडीओच्या माध्यमातून झाला.

२. दुरचित्रवाणी: जनसंज्ञापन माध्यम म्हणून दुरचित्रवाणीचे महत्व सारखे वाढत आहे. हे एक दृष्य माध्यम आहे. समाजाचे जतन केलेला सामाजीक वारसा दुरचित्रवाणिच्या पूढच्या पिढीकडे संक्रमीत करण्यात येतो. लोकांच्या अभिवृत्तीतील बदलातुन सामाजीक परीवर्तनाची आकांक्षा निर्माण करण्याचे हे प्रभावि माध्यम आहे. कुटूंबातील ताण—तणाव दोन पिढ्यातील संघर्ष, वृध्दाचे प्रश्न, भिक्षावृत्ती, वेश्यावृत्ती, संघर्षग्रस्त मुलांच्या समस्या, बेरोजगारी, वाढती लोकसंख्या, कुटूंबाचा आकार किती असावा या सारख्या अनेक प्रश्नांची चर्चा दुरचित्रवाणींवर करण्यात येते. तसेच जनतेला मार्गदर्शन मिळते.

३. दुरध्वनी: आधुनीक काळात जनसंज्ञापन माध्यम म्हणून दुरध्वनीचे महत्व निर्वीवाद आहे दुरध्वनीमुळे सामाजीक आंतरक्रियेत वाढ झाली. संदेशाची देवाण घेवाण सुलभ झाली. लोकांचा वेळ, परीश्रम आणि पैशाची बचत झाली. आज दुरध्वनीपेक्षा 'मोबाईल' चा उपयोग वाढलेला आहेत. मोबाईलमुळे व्यक्ती देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात दुसऱ्या व्यक्तीशी संपर्क साधून आपल्या समस्या व प्रश्न मांडू शकतात तसेच ती व्यक्ती अडचणीत असेल तर त्वरीत त्या व्यक्तीशी संपर्क साधून त्याच्या समास्यांची सोडवणूक करता येते.

४. चित्रपट: आधुनीक काळात अत्यंत प्रभावी माध्यम म्हणून चित्रपटाचा उल्लेख करावा लागतो. चित्रपट हे फक्त मनोरंजनाचे माध्यम नाही तर लोकांच्या अभिवृत्तीत परीवर्तन करणे, मुल्यांचे संक्रमण, इतिहासाची उदात्तता, सामजीक समस्यांची जाणिव, चित्रपटाव्दारे व्यक्तिला होत असते समाजीक समस्या उदा. मद्यपान, अस्पृश्यता, दारीद्र्य, सावकाराकडून शोषण, वेश्यावृत्ती, भ्रष्टाचार वगैरे समस्यासंबंधी लोकजागृती करण्यात येते. तसेच स्त्रियांवरचे अत्याचार, शोषण, हुंडापध्दती, आदिवासींचे शोषण, यावरचे विषय चित्रपटात हाताळण्यात आले आहेत. त्यातुन समाज सदस्यांना समस्यांचे वास्तविक स्वरुप कळते.

५. इंटरनेट: माहिती तंत्रज्ञान अंतर्गत जनसंज्ञापन माध्यम म्हणून इंटरनेटचे महत्व सारखे वाढत आहे. परमेश्वराने मानवाला दिलेले ज्ञानांद्रिये असा इंटरनेटचा उल्लेख करावा लागेल. इंटरनेट सेवेमुळे प्रत्येक व्यक्तीला जग हे जवळ आल्यासारखे वाटत आहे. त्यामुळे जग हे वैश्वीक खेडे ही संकल्पना विकसीत होत आहेत.

६. वर्तमानपत्रे: आधुनिक काळातील प्रसारमाध्यमे म्हणून वर्तमानपत्राची भुमीका अतीशय महत्वाची आहे नागरी समाजापूरते मर्यादीत असलेले वर्तमानपत्राचे क्षेत्र ग्रामीण व आदिवासी समुदायापर्यंत पसरलेले आहे. वाढते साक्षरतेचे प्रमाण देश—विदेशातील घटना जाणून घेण्याची जीज्ञासा, सभोवतालचे लोकजीवन, सामाजीक समस्या, आर्थीक, राजकीय घडामोडी व त्यानंतर घ्यावयाचे निर्णय, यासारख्या असंख्य बाबींचे संदर्भात वर्तमानपत्राचे वाचन उपयुक्त ठरलेले आहेत.

७. सामाजीक क्षेत्र: समाजातील स्त्रियांचे प्रश्न, आदीवासी, ग्रामीण जिवनातील वास्तव प्रश्न यांना वाचा फोडण्याचे कार्य वृत्तपत्रे करीत असतात. अंधश्रध्दा निमूलन, भ्रष्टाचार, आत्महत्या, लोकांच्या समस्या, एडस्‌विषयी जनजागृती, मलेरीया, कॉलरा, विविध रोगासबंधी प्रतिबंधात्मक उपायांची माहिती, लसीकरण, प्रदुषण, शेती, उद्योग रोजगार अशा अनेक विषयासंबधी समाज जागृती करण्याचे काम प्रसारमाध्यमे करीत असतात. प्रसार माध्यमांमुळे पूढील क्षेत्रात झपाट्याने परीवर्तन होतांना दिसून येते. प्रासारमाध्यमांचा सरळ परीणाम सामाजीक क्षेत्रावर होत असतो समाज संरचनेत बदल होत असतात. मुल्ये, प्रमाणके, ज्ञान, विश्वास, हे घटक नविन रुपात समोर येतात. सांस्कृतीक बदल घडून येतो वेशभुषा, खानपान, राहाणिमान, वेशभुषा, यांचा लवकर प्रसार होतो. त्यामुळे परिवर्तन घडून येते. शैक्षणिक बदल होतात. म्हणून सामाजीक प्रगती होण्यासाठी. प्रसारमाध्यमांचा वापर होणे काळजी गरज आहे.

**निष्कर्ष:** आधुनिक काळात प्रसारमाध्यमांनी संपूर्ण समाज जिवनावर विलक्षण असा प्रभाव पाडलेला आहे. समाजामध्ये परीवर्तन होत आहे. लोकांमध्ये जाणिव जागृती होत आहेत. लोकांच्या विचारसारणिवर प्रभाव पडत आहे. आदिवासी समाज, ग्रामीण समाज यांच्या शैक्षणिक प्रगती, समाजातील बदल, सांस्कृतीक बदल, वैचारीक बदल घडून येत आहे. संपूर्ण जग जवळ आलेले आहे. स्त्रियांचे प्रश्न व समस्या, सामाजीक समस्या, आर्थिक समस्या, प्रसारमाध्यमांव्दारे सोडविणे शक्य झालेले आहे. प्रसारमाध्यमे जनतेला जागृत करण्याची महत्वाची भुमीका पार पाडते. प्रसारमाध्यमांव्दारे भ्रष्टाचाराला आळा बसतो. प्रसारमाध्यमाव्दारे समाजीक बदल, परीवर्तन, आचार—विचार, खान—पान, वेशभुषा यांच्यात परीवर्तन घडुन येते. प्रसारमाध्यमामुळे लोकमताची निर्मीती होते व देशाचा, समाजाचा विकास घडून येतो.

**संदर्भ :**

१. डॉ. जोशी श्री. भा., माध्यम पत्रकारीता आणि आपण, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर.

२. डॉ. देवगावकर श. गो., 'राजकीय समाजशास्त्र' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

३. कोण्णुर सुजाता, कोण्णुर अनुप, कोण्णुर मेखला, माहिती तंत्रज्ञान, डायमंड पब्लीकेशन, पुणे, २००९.

४. कृष्णकुमार, भाषांतर, गणेश विसपुते, शासन समाज आणि शिक्षण, लोकवाङ:मय मुंबई, फेब्रुवारी, २००७.

५. खडसे भा. की., भारतीय समाज संरचना आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिकेशन, नागपूर, २००५.

६. Patil P.K. & Other – Information Technology Phadke Prakashan 2002

B. Kappuswami – Communication and Social Development in India, storling publication New Delhi 1976.

# भारतातील शेतकरी चळवळ - एक आढावा

***डॉ. रामेश्वर एम. मोरे,*** *समाजशास्त्र विभाग, संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप.*

***गोषवारा :*** *भारत हा कृषिप्रधान देश आहे. परंतु येथील शेतकऱ्यांचेच पूर्वीपासून शोषण झाल्याचे दिसून येते. भारतात स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांनी अनेक चळवळी केलेल्या दिसून येतात. त्यात प्रामुख्याने सन्यासी विद्रोह, रंगपुर किसान विद्रोह, संथाल विद्रोह, नक्षलवादी चळवळ, तेभागा चळवळ, तेलंगाना शेतकरी चळवळ, पाबना किसान विद्रोह इत्यादी प्रमुख चळवळींचा समावेश होतो. भारतातील शेतकरी चळवळीत सुरुवातीस महात्मा फुले, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यानंतर भारतात वेगवेगळया राज्यात वेगवेगळया संघटनांच्या माध्यमातून शेतकरी चळवळी झालेल्या दिसून येतात. महाराष्ट्रात शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेने विविध प्रश्नांसाठी आंदोलने केली आहेत. स्वातंत्र्यानंतर भारतात सर्वात मोठे शेतकरी आंदोलन २०२०-२१ मध्ये दिल्लीच्या सीमांवर कृषी कायद्यांच्या विरोधात झाले. देशातील विविध ३५ शेतकरी संघटनांनी सरकार विरोधात हे आंदोलन केले. स्वातंत्र्यापूर्वी भारतातील शेतकऱ्यांच्या चळवळी प्रामुख्याने जमीनदारांनी लावलेल्या अधिकच्या करासंदर्भात, शेतकऱ्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारासंदर्भात, सावकारांकडून केल्या जाणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात होत्या. तर स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांनी आपल्या मालाला योग्य हमीभाव मिळावा, आपल्या न्याय हक्काचे संरक्षण व्हावे यासाठी चळवळी केल्या आहेत.*

**प्रस्तावना** : भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. परंतु भारतात पूर्वीपासून शेतकऱ्यांचेच सर्वाधिक शोषण झाल्याचे दिसून येते. पूर्वापार काळात याची जाणीव शेतकऱ्यांना नव्हती. जमीनदार, सरंजामदार, जहागीरदार, राजे, महाराजे कृषकांचे मालक होते व कष्टकरी कृषक हा त्यांचा दास होता. मुघलांच्या काळात शेतकऱ्यांची काही बंडे झाली परंतु त्यावेळी याकडे बंड म्हणून न पाहता वर्गसंघर्ष म्हणून पाहिले गेले. ब्रिटिशांच्या आगमनानंतर परिस्थिती हळूहळू बदलू लागली. शेतकऱ्यांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊ लागली. तेव्हा अन्यायाच्या विरुद्ध शेतकऱ्यांनी अनेक चळवळी केल्या. या चळवळी कधी ब्रिटिश राजवटीविरुद्ध तर कधी राजेरजवाड्यांनी, जमीनदारांनी लावलेल्या अधिकच्या करा संदर्भात होत्या. या चळवळीत शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. स्वातंत्र्यानंतरही सरकारच्या शेती संदर्भातील उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात फारसे परिवर्तन झाले नाही. उलट शेतीचा उत्पादन खर्च वाढून उत्पन्न कमी झाले आहे परिणामी शेतकरी आत्महत्या करू लागले आहेत. म्हणून स्वातंत्र्यानंतरही भारतात शेतकऱ्यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध व आपल्या हक्कासाठी अनेकदा चळवळी केल्या आहेत करत आहेत.म्हणून प्रस्तुत संशोधन लेखात भारतातील शेतकरी चळवळींचा आढावा घेतला आहे.

**उद्देश :** १) भारतातील शेतकरी चळवळीचे स्वरूप समजून घेणे. २) शेतकरी चळवळीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती** : प्रस्तुत संशोधन लेख हा प्रामुख्याने दुय्यम तथ्यावर आधारित असून त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र इत्यादीचा आधार घेतला आहे व त्याद्वारे शेतकरी चळवळीचे विश्लेषण केले आहे.

**भारतातील काही प्रमुख शेतकरी चळवळी:**

**सन्यासी विद्रोह** (१७६३-१८००) : बंगाल आणि बिहारमध्ये हा विद्रोह झाला होता. हा विद्रोह ब्रिटिशांच्या भांडवलवादी धोरणाच्या आणि भारतातील जमीनदारांच्या विरोधात होता. या विद्रोहा मध्ये गरीबी, उपासमार, बेरोजगारी व ब्रिटिशांच्या अत्याचाराने पिडीत असलेले लोक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. या विद्रोहाचे नेतृत्व मजनु शाह, भुसा शाह आणि भवानी पाठक व देवी चौधरा यांनी केले होते.

**रंगपुर किसान विद्रोह** (१७८३) : हा विद्रोह जानेवारी १७८३ ला बंगालमध्ये झाला. बंगालमध्ये देवी सिंह हा शेतकऱ्यांचे व लहान जमीनदारांचे मोठ्या प्रमाणात शोषण करत होता. त्यामुळे देवी सिंह आणि इंग्रजांविरुद्ध हा विद्रोह होता. या विद्रोहात शेतकऱ्यांनी

शेतसारा भरणार नाही आणि ब्रिटिश शासनाचा स्वीकारही करणार नाही अशी घोषणा केली. त्याचबरोबर सारा वसूल करणाऱ्या लोकांना मार देऊन पळवून लावले होते.

**संथाल विद्रोह** (१८५५-५६) : हा विद्रोह १८५५-५६ मध्ये बिहार आणि बंगालच्या संथाल क्षेत्रात झाला. हा विद्रोह आर्थिक शोषण आणि अत्याचाराच्या विरुद्ध होता. या विद्रोहाचे नेतृत्व सिद्धू, कानू, चांद आणि भैरव यांनी केले होते. या विद्रोहामध्ये संथालानी अत्याचारी व शोषण करणाऱ्या सावकार आणि ब्रिटिश कर्मचाऱ्यांची हत्या केली होती.

**पाबना किसान विद्रोह** (१८७२-७३): या विद्रोहाचे मुख्य केंद्र बंगालमधील पाबना जिल्हा हे होते. हा विद्रोह प्रामुख्याने जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होता. या विद्रोहामुळे बंगाल मध्ये प्रजा स्वत्व कायदा पारित झाला. या कायद्यामुळे जे शेतकरी बारा वर्षापासून शेती करत होते. त्यांना त्या शेतीबाबत संरक्षण देण्यात आले.

**तेभागा चळवळ** (१९४६-४७) : तेभागा चळवळ ही बंगालमधील दिनापुर जिल्ह्यातील अतवारी गावात प्रथम सुरू झाली. ही चळवळ प्रामुख्याने जमीनदारांच्या विरुद्ध होती. जमीनदार आपली जमीन लहान-लहान तुकड्यात विभागून प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळांना या जमिनी देत होते व या जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी मोठा हिस्सा ते घेत होते. त्यामुळे जमीन कसणाऱ्या कुळांनी कष्टकऱ्यांनी आपल्या उत्पन्नातील एक तृतीयांश हिस्सा हा जमीनदारांनी घ्यावा व राहिलेले उत्पन्न आम्हास द्यावे म्हणून हे आंदोलन केले होते. ही चळवळ १९४६ मध्ये सुरू झाली व १९४७ पर्यंत चालू होती.

**तेलंगाना शेतकरी चळवळ** (१९४६-५१) : ही चळवळ हैदराबाद राज्यातील नलगौडा जिल्ह्यात १९४६ मध्ये सुरू झाली व नंतर संपूर्ण तेलंगणामध्ये पसरली. ही चळवळ प्रामुख्याने कर्जमुक्तीसाठी होती. या चळवळीत शेतकऱ्यांनी कर्जमाफीची सर्वात मोठी मागणी केली होती. या चळवळीत विशेषतः मागास जातीतील शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. हे शेतकरी प्रामुख्याने नवाब आणि देशमुख यांच्या विरोधात होते. नवाब व देशमुखांनी शेतकऱ्यांना कर्ज दिले होते. परंतु दुष्काळामुळे हे कर्ज परतफेड करणे शक्य नव्हते. म्हणून हे कर्ज माफ करावे अशी शेतकऱ्यांची मागणी होती. या चळवळीमध्ये पाच हजार शेतकऱ्यांची गुरिल्ला सेना होती. या सेनेने जमीनदार व स्थानिक अधिकाऱ्यांना मारून शेतजमिनीचे पुनर्वितरण केले. या चळवळीत भारतीय कम्युनिस्ट पार्टीने सहभाग घेतला होता. कम्युनिस्टांच्या मदतीने शेतकऱ्यांनी येथे वेगळ्या राज्याची स्थापना करून १९५० पर्यंत राज्य केले होते.

**नक्षलवादी चळवळ** : ही चळवळ १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील नक्षलबाडी या खेड्यातून सुरू झाली. ही चळवळ आता भारतातील तेरा राज्यातील १७० जिल्ह्यामध्ये पसरली आहे. ही चळवळ सामन्ती शोषण, अन्याय आणि भूमी सुधारणा कार्यक्रमाच्या विरोधात आहे. या चळवळीने जंगल ठेकेदार, सावकार आणि मालगुजार इत्यादींकडून आदिवासींवर होणारा अन्याय अत्याचार थोपविण्यासाठी कार्य केले आहे. आदिवासींची पिळवणूक करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना या चळवळीतून शिक्षा केली गेली. या चळवळीमुळे शासनाचे शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधून घेतले. भारतातील शेतकरी चळवळीत सुरुवातीस महात्मा फुले, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात शेतकऱ्यांची सावकार व जमीनदाराकडून होणारी पिळवणूक व अमानुष शोषण स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते ग्रामीण शेतकरी व शेतमजुरांचे शोषण करणारा दुसरा वर्ग म्हणजे भट ब्राह्मण पुरोहितांचा वर्ग होय. महात्मा फुले यांनी प्रत्यक्ष जरी शेतकऱ्यांची चळवळ उभी केली नसली तरी शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून त्यांनी सामाजिक परिस्थितीचा विचार केला. शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक हिताला विरोध करणाऱ्या सावकार व भट ब्राह्मण या वर्गाच्या कारवायाबद्दल शेतकरी वर्गात जागृती निर्माण केली. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली चंपारण्य-खेडा व बार्डोली सत्याग्रहाने शेतकऱ्यांच्या चळवळीला एक दिशा मिळाली. महात्मा गांधींनी या चळवळीद्वारे परदेशी मळेवाल्यांच्या बेकादेशीर नीळ लागवडी विरुद्ध व त्यांच्याकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिळवणूकी विरुद्ध तसेच अन्याय सारावसुली विरुद्ध लढा उभारला. त्याच बरोबर दुष्काळ निवारणाचा प्रश्नही हाताळला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, राजकीय समतेबरोबरच आर्थिक समता प्रस्थापित करण्याच्या हेतूनेच स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून शेतकरी व शेतमजूर यांचे प्रश्न सोडवले. त्यांनी सर्व कर्जबाजारी शेतकरी व शेतमजूर यांच्या स्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये दुरुस्ती सुचविणारे विधेयक मुंबईच्या विधानसभेत मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३८ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने मुंबई येथे शेतकऱ्यांचा मोर्चा काढला. या मोर्चाच्या प्रमुख मागण्या- जमीन कसणाऱ्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळाले पाहिजे, इनामदारांचे मध्यस्थ म्हणून खोत हटवावे, शेतकऱ्यांवर कराची आकारणी करण्यापूर्वी त्यांच्या चरितार्थाची योग्य सोय करावी, शेतमजुरांना किमान मजुरी देण्याची सोय कायद्याने करून द्यावी या होत्या. स्वातंत्र्यानंतरही भारतात विविध राज्यात शेतकऱ्यांच्या संघटनांनी आंदोलने केली आहेत.

१९६७-७० मध्ये तामिळनाडूमधील विवासैयगल संगम या शेतकरी संघटनेने विजेचे दर कमी करण्यासाठी

व कर्ज वसुली थांबवण्यासाठी आंदोलन केले. हे आंदोलन नारायण स्वामी नायडू यांच्या नेतृत्वात झाले. १९७२ मध्ये पंजाब मध्ये गव्हाला योग्य किंमत प्राप्त व्हावी म्हणून आंदोलन झाले. हे आंदोलन भारतीय किसान युनियन च्या माध्यमातून केले गेले. १९८० मध्ये कर्नाटक राज्यात रयत संघ उदयास आले याच्या माध्यमातून कर्नाटक मध्ये शेतकऱ्यांची विविध आंदोलने झाली. उत्तर प्रदेशमध्ये महेन्द्रसिंग टिकैत यांनी १९८८ मध्ये शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलने केली. या आंदोलनाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधले होते. महाराष्ट्रात शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेने १९८० पासून विविध आंदोलने केली. त्यात कांदा आंदोलन १९८०, ऊस आंदोलन १९८०, तंबाखू आंदोलन १९८१, दूध आंदोलन १९८२, कापूस आंदोलन १९८६, कर्ज मुक्ती आंदोलन १९८८-८९ हे प्रमुख होते. या आंदोलनाला शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी संघटना ही एक राजकीय शक्ती बनली. या आंदोलनाचा देशाच्या आर्थिक व राजकीय धोरणावर दूरगामी परिणाम झाला. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळावा ही या आंदोलनाची प्रमुख मागणी होती. परंतु नंतरच्या कालखंडात शेतकरी संघटनेस राजकीय स्वरूप प्राप्त झाले. शरद जोशी यांनी स्वतंत्र भारत पक्षाची स्थापना केली. परंतु त्यांना राजकारणात मिळावे तेवढे यश प्राप्त झाले नाही. नंतरच्या कालखंडात शेतकरी संघटनेत फूट पडली त्यामुळे शेतकरी संघटनेचा प्रभाव कमी झाला. पश्चिम महाराष्ट्रात राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी प्रामुख्याने ऊस दरासंदर्भात आंदोलने केली. परंतु नंतरच्या कालखंडात या संघटनेतही फूट पडली आहे. आज महाराष्ट्रात वेगवेगळ्या भागात शेतकऱ्यांच्या लहान मोठ्या संघटना आहेत. या संघटनांच्या माध्यमातून विविध प्रश्नांवर आंदोलने होतात. परंतु या आंदोलनात शेतकऱ्यांऐवजी राजकीय नेतेच आपला स्वार्थ साधताना दिसून येत आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतात सर्वात मोठे शेतकरी आंदोलन २०२०-२१ मध्ये दिल्लीच्या सीमांवर कृषी कायद्यांच्या विरोधात झाले. भारत सरकार ने कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य अधिनियम २०२०, शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) मूल्य आश्वासन करार आणि कृषी सेवा करार अधिनियम २०२०, जीवनावश्यक वस्तू दुरुस्ती अधिनियम २०२०, हे तीन कृषी कायदे केले. त्यानंतर या शेतकरी आंदोलनाला सुरुवात झाली. हे आंदोलन २६ नोव्हेंबर २०२० ते ९ डिसेंबर २०२१ म्हणजेच तब्बल ३७८ दिवस चालले. देशातील विविध ३५ शेतकरी संघटनांनी सरकार विरोधात हे आंदोलन केले. या आंदोलनात प्रामुख्याने पंजाब हरियाणातील शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. त्याच बरोबर भारतातील विविध राज्यात या आंदोलनाच्या समर्थनार्थ आंदोलने झाली. शेवटी सरकारने कृषी कायदे मागे घेतल्यानंतरच हे आंदोलन थांबले.


भारत हा कृषिप्रधान देश आहे. या देशाचा प्रमुख शेतकरी आहे परंतु येथील शेतकऱ्यांचे पूर्वीपासून शोषण झाल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यानंतरही सरकारचे शेतीसंदर्भात फारसे सकारात्मक धोरण नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आजही फारशा सुधारणा झालेल्या दिसत नाहीत. आजही शेतकरी दारिद्र्य व कर्जबाजारीपणाच्या चक्रव्यूहात अडकलेला आहे. वर्तमान स्थितीत शेतकऱ्यांची सामाजिक प्रतिष्ठा देखील खालावलेली आहे. परिणामी हळूहळू शेती क्षेत्रापासून नवीन पिढी दुरावत चालली आहे. शेतकऱ्यांमध्ये नैराश्याची भावना वाढत चालली आहे. परिणामी भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही समस्या गंभीर होत चालली आहे. भारतात स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांनी अनेक चळवळी केलेल्या दिसून येतात. स्वातंत्र्यापूर्वी भारतातील शेतकऱ्यांच्या चळवळी प्रामुख्याने जमीनदारांनी लावलेल्या अधिकच्या करासंदर्भात, शेतकऱ्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारासंदर्भात, सावकारांकडून केल्या जाणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात होत्या. स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांनी आपल्या मालाला योग्य हमीभाव मिळावा, आपल्या न्याय हक्काचे संरक्षण व्हावे यासाठी चळवळी केल्या आहेत. शेतकऱ्यांनी या चळवळीच्या माध्यमातून आपले अनेक प्रश्न सोडवलेले दिसून येतात.

*संदर्भ सूची -*

१. *Ghanshyam Shah (2004), Social Movement in India - A Review of Literature, Sage Publication, New Delhi.*
२. *बी.एन.सिंह, जनमेजय सिंह(2005), भारत मे सामाजिक आंदोलन, रावत पब्लिकेशन जयपुर.*
३. *जैन पी.सी. (2009), सामाजिक आंदोलन का समाजशास्त्र, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, जयपुर.*
४. *कऱ्हाडे बी. एम. (2011), सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.*
५. *ज्योतिराव फुले (1941), शेतकऱ्यांचा आसूड, संपादन- नागनाथ कोतापल्ले (2001) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.*
६. *गुरुनाथ नाडगोंडे (1986), सामाजिक आंदोलने, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.*
*सुनंदा भद्रशेट्टी, बी. बी. शेख, बाबासाहेब भालेराव (2010), भारतातील सामाजिक आंदोलने, अरुणा प्रकाशन, लातूर.*

# बौद्धांच्या सामाजिक जाणिवा : डॉ. नलिनी बोरकर (पुस्तक परिचय)

*प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना जि. औरंगाबाद.*




'बौद्धांच्या सामाजिक जाणिवा'
लेखक : डॉ. नलिनी बोरकर
प्रकाशक: श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
पृष्ठ संख्या :१८०
किमत :३०० रू.

"बौद्धांच्या सामाजिक जाणिवा" हे डॉ. नलिनी बोरकर यांचे त्यांच्या पीएचडीच्या संशोधनावर आधारित पुस्तक साईनाथ प्रकाशन नागपूर यांनी प्रसिद्ध केले आहे. प्रस्तुत ग्रंथ आठ प्रकरणांमध्ये विभागलेला असून पहिल्या प्रकरणात बौद्धांच्या सामाजिक जाणीवा यासंदर्भातील सैद्धांतिक पार्श्वभूमी स्पष्ट केलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची परिवर्तनाची चळवळ आणि त्यांनी केलेला बौद्ध धम्माचा स्वीकार या संदर्भातील मांडणी यात असून अस्पृश्यतेच्या संदर्भातील उत्पत्तीचे सिद्धांत यात स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचबरोबर आंबेडकरांच्या समतावादी चळवळीचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे. बौद्ध धम्माच्या स्वीकारामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका येथे स्पष्ट करण्यात आलेली आहे. भारतातील विविध राज्यांमध्ये बौद्धांची असलेली संख्या याविषयी माहिती दिलेली असून बौद्ध विचाराचा सबंध समाजात किती खोलवर परिणाम झाला आहे याची मांडणीही केलेली आहे. बौद्ध धम्माचा केंद्रबिंदू माणूस असून नैतिकता हा त्याचा पाया आहे. तसेच मानव कल्याण हा बौद्ध धम्माचा उद्देश असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध धम्मामुळे खूप प्रभावीत झाले. बुद्धाचा धम्म हा प्रज्ञा करुणा समतेची शिकवण देतो, तसाच तो बुद्धिवादी असून स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण देणारा धम्म आहे. १९५६ मध्ये केलेल्या बौद्ध धर्मांतरामुळे बौद्ध झालेल्या लोकांमध्ये सर्वच प्रकारच्या जाणीवा मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या दिसतात. सामाजिक जाणिवा प्रमाणेच शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय जाणिवा या मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहेत असे संशोधकाचे म्हणणे आहे. जाणिवा ह्या बदल दर्शवितात. जाणिव आणि आत्मभान यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. त्यामुळे परिवर्तनाला पोषक असे वातावरण या सामाजिक जाणिवामुळे बौद्धांमध्ये निर्माण झाले.

प्रकरण दोन मध्ये "जाणिवा" या संकल्पनेची सैद्धांतिक मांडणी केलेली आहे. 'जाणिवा' हा शब्द व्यवहारात वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. अनेक गोष्टींना एकत्र करून माहित करून घेणे असा याचा सर्वसाधारण अर्थ आहे. जॉन लॉक यांच्यामते, जाणिवेद्वारेच व्यक्तीची एकरूपता किंवा व्यक्तीच्या एकतेची निर्मिती होते कारण जाणिवाच ती वस्तू आहे जी क्रियांना एका व्यक्तीत संघटित करीत असते. थोडक्यात 'जाणिवा ' हा शब्द एखाद्या गोष्टीविषयी माहीत करून घेणे या अर्थाने वापरला जातो. 'जाणिव' म्हणजे मानवी बुद्धीचा असा भाग जो "स्व" ची ओळख करून देतो. जाणिवेची वैशिष्ट्ये, जाणीवेचे स्तर, सामाजिक जाणिवेची संकल्पना, जाणिवेच्या सामाजिक बाजू, स्व म्हणजे काय? स्व चा विकास, वैशिष्ट्ये, स्व विकासाची प्रक्रिया, त्याचबरोबर 'स्व' चे व्यक्तिमत्व विकासात असलेले स्थान, सामाजिक जाणीवेची व्याप्ती व तिचे स्वरूप याविषयीची ही चर्चा असून सामाजिक जाणीवासंदर्भात झालेले अभ्यास याचा आढावाही या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण तीन मध्ये संशोधनाची पार्श्वभूमी विशद केली आहे. नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, गोंदिया व गडचिरोली या सहा जिल्ह्यातील बाराशे बौद्ध लोकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन त्यांच्या सामाजिक जाणिवा विषयक माहिती संकलित केली आहे.

प्रकरण चार मध्ये सामाजिक परिवर्तन, चळवळ व विद्रोह या संदर्भात बौद्धांच्या सामाजिक जाणिवा याविषयीचे सविस्तर विश्लेषण केलेले आहे. यासंदर्भात

उत्तरदात्यांना विविध प्रश्न विचारून त्यांच्याकडून सामाजिक जाणिवा बाबत उत्तरे संकलित केली आहे. उदा. भारतीय समाजातील अनेक नियम आणि रूढी परंपरांना हिंदू धर्माची मान्यता आहे त्यामुळे त्यांना नाकारणे म्हणजे हिंदू धर्मास नाकारणे काय? त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनासाठी आपण आपल्या जुन्या चालीरीती, रूढी परंपरा, विश्वास यासारख्या सांस्कृतिक गोष्टींमध्ये परिवर्तन केले पाहिजे आहे काय? या स्वरूपाचे प्रश्न उत्तरदात्यांना विचारून त्यांच्या जाणिवा संकलित केल्या आहे. सामाजिक चळवळी विषयक विविध प्रश्न विचारून त्यासंदर्भातील विश्लेषणही संशोधकाने केले आहे. सामाजिक चळवळी ह्या सामाजिक परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण आहेत असा निष्कर्ष ही यात मांडला आहे. सामाजिक विद्रोह हा परिवर्तनासाठी अत्यंत आवश्यक असा घटक असून तो विद्रोह करणे अत्यंत गरजेचे आहे असेही संशोधकाचे म्हणणे आहे. समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा, रुढी जेव्हा समाजासाठी घातक ठरतात तेव्हा याविरुद्ध विद्रोह निर्माण झालाच पाहिजे यासंदर्भातील मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण पाच मध्ये अन्याय, शोषण आणि मागासलेपणा या संदर्भात बौद्धांच्या सामाजिक जाणिवा जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. पारंपारिक समाजात जातीव्यवस्थेच्या माध्यमातून दलित उपेक्षित वंचित समाजांना विविध अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागले. माणुसकीचे हक्क त्यांना नाकारले गेले या साऱ्या पार्श्वभूमीवर विविध प्रश्न उत्तरदात्यांना विचारले गेले व त्या संदर्भातील त्यांच्या जाणीवा संकलित केल्या गेल्या. अत्याचाराच्या विरुद्ध विद्रोहाची भावना निर्माण होणे सहाजिक आहे. हे अन्याय, अत्याचार जातीभेद, अस्पृश्यता श्रेष्ठ कनिष्ठता यामुळेच होतात असेही उत्तरदात्यांच्या म्हणणे आहे. सामाजिक शोषणसंदर्भात बौद्धांच्या जाणिवा या संदर्भातही सखोल चर्चा केलेली आहे आजही समाजात व्यक्तीचे शोषण मोठ्या प्रमाणावर होत असून सामाजिक आर्थिक शोषणामुळे गरीब व श्रीमंतांमध्ये तफावत अधिक वाढत आहे त्याचबरोबर आधुनिक समाजातील भांडवलदार, श्रीमंत आणि सावकार हे कामगार, गरिब, शेतकऱ्यांचे शोषण करतात हे सुद्धा लक्षात आणून दिले आहे. त्याचबरोबर शोषण हे मुख्यतः जातीभेद वर्णव्यवस्था आणि अस्पृश्यता यामुळे निर्माण झाले आहे यावरही विश्लेषण केले आहे. सामाजिक मागासलेपणाबद्दल बौद्धांच्या सामाजिक जाणिवा याचाही परामर्श संशोधकांना घेतला असून आदिवासी भटके विमुक्त, दलित, ओबीसी इत्यादी समूह अजूनही मागासलेले आहेत यावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर हे समूह का मागासलेली आहे? त्याची कारणमिमांसाही केली आहे. त्यासाठी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक व राजकीय मागासलेपण तसेच वैचारिक मागासलेपण कारणीभूत आहे असे संशोधकाचे म्हणणे आहे. आंबेडकरी चळवळीत सहभागी असलेल्या लोकांनी आपली सामाजिक प्रगती करून घेतली आहे असे बऱ्याच लोकांना वाटते व ही प्रगती त्यांनी कशामुळे करून घेतली त्यासाठी जबाबदार असणारे घटक याचीही चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे. प्रामुख्याने आंबेडकरी चळवळीतील लोकांच्या प्रगतीसाठी शैक्षणिक पुढारलेपण सामाजिक जाणिवा, आंबेडकरी प्रेरणा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला बौद्ध धम्म या घटकाच्या आधारे बौद्ध समाजातील लोक आपली प्रगती करून घेतात असा निष्कर्ष संशोधकाने काढला आहे.

प्रकरण सहा मध्ये बौद्धांच्या सामाजिक राजकीय लिंगभाव समानता आणि बांधिलकी याविषयीच्या जाणिवा या संदर्भातील विश्लेषण केले आहे. वर्तमान समाजात असणाऱ्या सामाजिक व राजकीय संघटना समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी समर्थ असून त्यासाठी समाजात एक प्रभावशाली दबाव गट निर्माण करणे गरजेचे आहे असे संशोधकाचे म्हणणे आहे. लोकशाही सुदृढतेसाठी बहुपक्षीय राजकारण आवश्यक आहे असे अनेक उत्तरदात्यांना वाटते. आदर्श समाज व्यवस्थेविषयी बौद्धांच्या सामाजिक जाणिवा याचाही परामर्श संशोधकाने घेतला असून समाजव्यवस्था आदर्श करण्यासाठी लागणाऱ्या विविध बाबींची चर्चा प्रस्तुत ग्रंथात केली आहे. बुद्धाने आदर्श समाज व्यवस्थेविषयी जे तत्वे दिलेली आहेत त्याचे आचरण जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत आदर्श लोकशाही निर्माण होणार नाही असे उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. बौद्ध धम्माच्या मौलिक विचारसरणीमुळे अनेक देशांचा सामाजिक आर्थिक विकास झाला आहे. बौद्ध धर्माचा विचार हा सर्वांगीण कल्याणाचा विचार आहे असे संशोधकाचे म्हणणे आहे. लिंगभाव समानता विषयक जाणिवा याविषयीची चर्चा केली आहे. राजकारणात व समाजकारणात महिलांचा सहभाग वाढत चालला असून त्या सक्रिय होत आहे. त्यामुळे राजकीय परिस्थिती सुधारेल असे संशोधकाला वाटते. सामाजिक बांधिलकी विषयी सविस्तर चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून इतर समाजांना आपण सोबत घेऊन विविध प्रश्नांवर लढले पाहिजे असा विचार उत्तरदात्याचा दिसून येतो. त्यासाठी विविध विकास विषयक कार्यक्रम राबविले जावेत व सर्वांनी एकत्र येऊन अन्याय -अत्याचाराला सामोरे जावे असे अनेक उत्तरदात्यांना वाटते या पार्श्वभूमीवर विविध स्वरूपाची चर्चा या प्रकरणात केली आहे.

प्रकरण सात मध्ये बौद्धांची वर्तमान सामाजिक परिस्थिती आणि त्यांच्या सामाजिक जाणिवा याविषयीची सखोल व सविस्तर चर्चा संशोधकांनी केली आहे. परिस्थिती वर्तमान सामाजिक परिस्थिती आणि बौद्धांच्या जाणिवा याचा परस्पर संबंध जोडला आहे. धार्मिक परिवर्तन, सांस्कृतिक परिवर्तन, वैचारिक परिवर्तन, मानसिक परिवर्तन, सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक परिवर्तन, आर्थिक परिवर्तन, राजकीय परिवर्तन इत्यादी घटकांच्या आधारे सामाजिक जाणिवा जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. त्याचबरोबर वैचारिक साहित्याच्या माध्यमाद्वारे कलाविषयक जाणिवा आदी बाबीची चर्चा प्रस्तुत ग्रंथात केली आहे.

प्रकरण आठ मध्ये बौद्धांच्या वर्तमान चळवळी आणि त्यांच्या सामाजिक जाणिवा याविषयीचे आहे. परिवर्तन ही सातत्याने घडून येणारी प्रक्रिया आहे. सामाजिक परिवर्तन हे प्रत्येक समाजाची अविभाज्य अंग आहे. ज्या काही सामाजिक चळवळी आहेत त्या खऱ्या अर्थाने समाजाला पुढे नेणाऱ्या असून एक नवा विचार देणारे आहे. भारतीय दलित चळवळीची पार्श्वभूमी या संदर्भातील चर्चा या प्रकरणात केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक परिवर्तनाची चळवळ व या चळवळीने केलेली विविध प्रकारची आंदोलन व मानवी मुक्तीचा केलेला लढा, मानवी हक्काची प्रस्थापना, राजकीय क्षेत्रातील पदार्पण याची चर्चा करून दलित चळवळीची अवनीती का झाली याचीही चर्चा या प्रकरणात केली आहे. विविध राजकीय संघटन त्याला आलेलं यश व अपयश याचाही मागु प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे. एकूणच सामाजिक जाणिवेच्या अनुषंगाने विविध पैलूंच्या संदर्भात संकलन करण्याचा प्रयत्न संशोधकांनी यशस्वी केला आहे. या निमित्ताने बौद्धांमध्ये विविध सामाजिक जाणिवा कशाप्रकारे रुजल्या व त्या कशा वाढीला लागल्या याची चर्चा संशोधकाने समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून केली आहे.

डॉ. प्रदीप आगलावे यांनी त्यांच्या प्रस्तावनेमध्ये म्हटले आहे की, डॉ. नलिनी बोरकर यांनी प्रस्तुत ग्रंथात 'बौद्ध तत्वज्ञान', 'डॉ. आंबेडकरांची प्रेरणा', 'बौद्धांचे वैचारिक व मानसिक परिवर्तन' या गोष्टीमुळे बौद्धांच्या सामाजिक जाणिवांचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे आणि त्यांच्यातील सामाजिक जाणिवा मोठ्या प्रमाणात वृद्धींगत होत आहेत. हे सप्रमाण सिद्ध केले आहे. धम्मक्रांतीनंतर एकूणच बौद्ध समाज हा जुनी कात टाकून नव्याने भरारी घेणारा समाज ठरला आहे. त्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, कलाविषयक अशा सर्वच प्रकारच्या जाणिवा वृद्धिंगत झाल्या आहेत आणि बौद्धांच्या सामाजिक जाणिवांची व्याप्ती सुद्धा वाढत असल्याचे या ग्रंथाने निदर्शनास आणून दिले आहे. डॉ. नलिनी बोरकर यांनी बौद्धांमधील सामाजिक परिवर्तन, चळवळ, विद्रोह, अन्याय-अत्याचार, शोषण, मागासलेपणा, सामाजिक-राजकीय संघटन, आदर्श समाजव्यवस्था, लिंग समानता आणि सामाजिक बांधिलकी बाबतच्या सामाजिक जाणिवांचे समाजशास्त्रीय विश्लेषण या ग्रंथात केले आहे. या ग्रंथामुळे वाचकांना निश्चितच नवीन माहिती आणि प्रेरणा मिळेल याची मला खात्री आहे. यावरून ग्रंथातील चर्चा विमर्षाची कल्पना येते.

प्रस्तुत अभ्यासाला बऱ्याच मर्यादा असल्यातरी एका विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत हा अभ्यास वाचकाला नवीन दृष्टी देतो. पूर्व अध्ययनाच्या संदर्भात अजून सविस्तर विवेचन यायला हवे होते. त्याचबरोबर सामाजिक जाणिवाचे कृतिशील स्वरूप यावरही अधिक भाष्य करण्याची गरज होती. जेणेकरून हा विषय वाचकांच्या सहज लक्षात येऊ शकेल. बौद्धांच्या सामाजिक जाणिवाच्या संशोधनाच्या निमित्ताने सविस्तर मागोवा डॉ. नलिनी बोरकर यांनी घेतला असून एक प्रकारची सामाजिक चिकित्साच त्यांनी प्रस्तुत ग्रंथात केली आहे. बारीक-सारीक प्रश्नाच्या मुळाशी जाऊन त्यांनी उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. बौद्धांच्या सामाजिक जाणिवेचे मूल्यमापन त्यांनी केले आहे. एका अलक्षित पैलूवर प्रकाश टाकण्याचे काम त्यांनी केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

# दि. ११ व १२ एप्रिल २०२२ रोजी गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी येथे संपन्न झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३१ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा संक्षिप्त अहवाल

*प्रा. डॉ. नारायण कांबळे, माजी अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद*

गोगटे जोगळेकर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग आणि मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ आणि १२ एप्रिल २०२२ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन गोगटे जोगळेकर महाविद्यालयात करण्यात आले होते. याचे उद्घाटन प्रा. डॉ. श्रुती तांबे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या रोपट्याला पाणी घालून केले. भारतात समाजशास्त्राच्या अभ्यासाची सुरूवात महाराष्ट्रात होऊन शतक उलटले असून, त्याचे जैविक मूल्यांकन होने आवश्यक आहे. ज्या भूमित समाजशास्त्र रूजले, त्याचे धागेदोरे जगातच्या इतर खंडातील अन्य भागात पसरले. त्याचे शतकोत्तर कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दस्ताऐवजीकरण करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन **प्रा. डॉ. श्रुती तांबे** यांनी केले. प्रास्ताविक समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. तुळशीदास रोकडे यांनी केले. स्वागतपर मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. प्रफुल्लदत्त कुलकर्णी** यांनी संस्था महाविद्यालयाच्या प्रगतीचा लेखाजोखा मांडून महाविद्यालयात असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रम, संशोधन याविषयी उपस्थितांना माहिती दिली. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी शुभेच्छापर संदेश देताना समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी कोरोनामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचा समाजजीवनावरील परिणामाचा अभ्यास करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. संस्थेचे सचिव सतीश शेवडे यांनी सर्व उपस्थिताचे शब्द सुमनाने स्वागत केले आणि परिषदेच्या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष **प्रा. डॉ. नारायण कांबळे** यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाची भूमिका, वाटचाल स्पष्ट केली. ते म्हणाले की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ७५ वर्षात जी विकास प्रक्रिया आपण अनुभवली तिने प्रश्न अधिक निर्माण केले उत्तरे मात्र कमी दिलीत. समाजशास्त्रातील सैध्दांतिक परंपरेने त्या प्रश्नांना गवसणी घालण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. तो मोलाचा आहे. तथापि सखोल विचारांनी त्यातील अपूर्णताच प्रकर्षाने जाणवते. म्हणून समाजशास्त्रीय चिंतन हे "पर्यायी विकास" नीतीकडे झपाट्याने वळले पाहिजे. सिध्दांत आणि विचारधारा, विशेषत: नैतिक अधिष्ठान असलेल्या वैचारिक परंपरेचा एकत्रितपणे विचाराचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासाठी निदान विकासाच्या समाजशास्त्राची संपूर्णपणे पुर्नमांडणी, पुनर्रचना होणे आवश्यक आहे असे आग्रहाने सुचवावेसे वाटते यावर अधिक भर देताना ते म्हणाले की, जशी विकास संकल्पना साकार होत जाते तस तसे विकासाचे समाजशास्त्र हे अध्ययन संशोधनाचे स्वतंत्र दालनच अस्तित्वात येत असते. ज्या समाजशास्त्रीय बौध्दिक परंपरेचे आपण वारसदार आहोत, ती पंरपरा एकूण ह्या गुंतागुंतीच्या आणि विलक्षण अंतर्विरोधानी व्यापलेल्या विकास प्रक्रियेला नेमकी कशी सामोरी गेली ? ती विकास प्रक्रिया समजून घेत असताना समाजशास्त्रातील अभिजात सैध्दांतिक आणि संकल्पनाच्या भांडाराच्या आपल्याला कितपत उपयोग होतो त्यांच्या अभ्यासाने विकासातंर्गत अंतर्विरोधीबद्‌लची आपली जाण कितपत समृध्द किंवा प्रगल्भ होते? या प्रश्नांची उत्तरे शोधणे या संदर्भात आवश्यक आहे असे ते म्हणाले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. प्रदीप आगलावे, सदस्य सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती, म. रा. मुंबई, प्रा. डॉ. बालाजी केंद्रे, हे उपस्थित होते. या कार्यक्रमात समाजशास्त्र विषयात भरीव योगदान देणाऱ्या अभ्यासकांचा मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. कार्यक्रमात म. स. प. चा २०१३ चा जीवन गौरव पुरस्कार प्रा. डॉ. बा. ल. जोशी औरंगाबाद यांना देण्यात आला. तर २०२० च्या जीवनगौरवाचे मानकरी प्रा. डॉ. एस. एल. गायकवाड औरंगाबाद व प्रा. डॉ. प्रदीप आगलावे नागपूर यांना गौरविण्यात आले. तर २०२१ चा जीवन गौरव पुरस्कार कोल्हापूर येथील प्रा. डॉ. रमेश जाधव यांना तर मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. रमेश कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, मोमेंटो, शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी सत्कार मुर्तींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. आनंद आंबेकर व प्रा. डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केले.

या उद्घाटनानंतर परिषदेचे बीजभाषक म्हणून अमृतसर विद्यापीठातील व इंडियन सोशिओलॉजीकल सोसायटी, नवी दिल्ली चे माजी **अध्यक्ष प्रा. डॉ. परमजितसिंग जज** यांना म. स. प. च्या वतीने त्यांचा शाल, श्रीफल व मानचिन्ह देऊन डॉ. नारायण कांबळे यांनी सन्मानित केले. परमजीतसिंग जज यांनी सलग एक तासात आपल्या बीजभाषणाची महत्वपूर्ण मांडणी केली. प्रा. डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी आभार मानले.

दि. ११ एप्रिल २०२२ दुपारी १.०० अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात परिसंवादाचे आयोजन केले होते. या परिसंवादाचा विषय **'भारतीय विकास प्रक्रियेतील अंतर्विरोध'** असा होता. या परिसंवादाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रशांत सोनवणे यांनी केले. या परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. शंकर एल. गायकवाड यांनी भूषविले या सत्रात वक्ते म्हणून प्रा. डॉ. धनराज पाटील (गडचिरोली) डॉ. संपत काळे (तुळजापूर) डॉ. प्रशांत बनसोडे (पूणे) हे मान्यवर उपस्थित होते. या सत्रात सर्व वक्त्यांनी आपल्या विषयाची मांडणी केली.

या प्रसंगी **प्रा. डॉ. धनराज पाटील म्हणाले की**, भारताच्या विकास प्रक्रियेतील अंतर्विरोधाचे अवलोकन करताना बुध्दांच्या सम्यक, शाश्वत व विचार निरपेक्ष दृष्टिकोनाची खरी गरज आहे. असे दिसून येते. यातूनच वेस्टर्न मॉडल ऑफ डेव्हलपमेंटपेक्षा एशियाई मॉडल ऑफ डेव्हलपमेंटची निर्णायकता खऱ्या अर्थाने विकासाच्या शाश्वत प्रक्रियेकडे जाणारा पर्यायी मार्ग ठरू शकतात. अशी महत्वपूर्ण व अभ्यासपूर्ण मांडणी केली. तर **डॉ. प्रशांत बनसोडे यांनी** "गरीबी आणि उदारनिर्वाहाच्या साधनांचा तुटवडा (जॉन ब्रेमन १९८५, १९९६( हे नवा मार्क्सवादी दृष्टिकोन यामध्ये ग्रामीण भागातून शहरी आणि मागास भागातून शेतमजूरांचे स्थलांतराची मांडणी केलेली दिसते. ते नास्तिकत्य बुध्दीकडे वळलेले दिसतात. राष्ट्रीय ग्रामीण श्रम आयोग, १९९१ आणि २००१ च्या नुसार हंगामी स्थलांतरितांमध्ये अनुसूचित जाती आणि ओबीसी चे प्रमाण प्रामुख्याने जास्त आहे, हे अहवाल असे विशद करतात की, हंगामी स्थलांतर हे असमान प्रादेशिक आर्थिक विकास आणि सामाजिक समूहांचे विषम विकास अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी हे स्थलांतराचे प्रमुख कारणे आहेत. भारतीय समाजात हंगामी स्थलांतर हे कर्जबाजारीपणामुळे आणि नवीन प्रकारच्या बंधपत्रित श्रम यामध्ये अडकल्यामुळे आणि विकासापासून बहिष्कार झाल्यामुळे दिसते. भारतीय परिस्थितीत हंगामी स्थलांतर आणि विकास यामधील अंतर्विरोध यावर सखोल चर्चा आणि विश्लेषण होऊ शकते. अशा स्वरूपाची अभ्यासपूर्ण मांडणी केली. तर **डॉ. संपत काळे** यांनी भारतीय विकास प्रक्रियेतील अंतर्विरोध स्पष्ट करताना विकास, विस्थापन आणि वाढती विषमता अशी सूत्रबध्द मांडणी केली. ते म्हणाले, वाढती विषमता आपल्या लोकशाहीला तसंच पर्यावरण आणि परिस्थिती किती धोकादायक ठरत आहे. तर मध्यम वर्गाच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी परिघावरील लोकांचे शोषण आणि वंचितीकरण आणि ओगंळ विकासाच्या नावाखाली सर्वसामान्यांचे उदात्तीकरण! आहे का? असा सवाल विचारत आहेत. दिवसेंदिवस दरी वाढत आहे. आरोग्य, शिक्षण आणि सामाजीक सुरक्षा सर्वसामान्यांसाठी दुरापास्त होत आहेत. विकास आणि विनाश ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत का? असे म्हणायची वेळ आली आहे. याकरिता या देशाच्या उन्नतीकरीता युवकांनी पुढं आलं पाहिजे तरच चांगलं राष्ट्र निर्माण होऊ शकेल. याकरिता युवकांनी शाश्वत, सुरक्षित विकासाच्या मार्गाचा अवलंब करावा लागेल अशी मांडणी केली.

या सत्राचा अध्यक्षीय समारोप **प्रा. डॉ. शंकर एल. गायकवाड (औरंगाबाद)** यांनी केला. ते म्हणाले की, विकासाबाबत अनेक विचारवंताचे अनेक मत दिसून येतात. व त्यात मतांतरे दिसून येतात. म्हणून विकास या संज्ञेची निश्चित अशी परिभाषा सांगता येईल असे नाही. विकासाचा मानवी विकास, सामाजिक विकास, आर्थिक विकास, शाश्वत विकास अनेक संदर्भातून विचार केला जातो. विकासाच्या प्रक्रियेत बऱ्याच मोठ्या प्रमाणात परस्पर विरोधाभासाचे चित्र दिसून येते. ते पुढे असे म्हणाले की, जसे की कृति विरोधात औद्योगिक शहरी विरोधात ग्रामीण, भांडवली विरोधात श्रमिक, आधुनिक विरोधात पारंपारिक, सामाजिक आर्थिक विरोधात भौतिक, केंद्रीकरण विरोधात विकेंद्रीकरण, राज्यांतर्गत आणि विभागातंर्गत, जातीय, वर्गीय आणि लैंगिक विषमतेवर आधारित विकास झुगारून विकास माध्यमातून न्याय, समानता आणि मानवी जीवनाची प्रतिष्ठा यांनी प्रेरित समाजरचना व्हावी अशीही व्यापक कल्पना केली जाते. विकास प्रक्रियेच्या अनेक मिती दिसून येतात. विकास प्रक्रिया सर्वसमावेशक आणि सर्वच बाबतीत सारखी राहिलंच असं नाही. यातून काही बाबींचा या सत्रात सादर केलेल्या तीनही शोधनिंबधातून त्यांनी मांडण्याचा वा त्यावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. तीनही वक्त्यांनी केलेली मांडणी प्रस्तुत विषयाच्या बाबतीत प्रसंगोचित दिसून येते. भारतातील विकास प्रक्रियेतील मुलभूत प्रश्न, नवी आणि जुनी आव्हाने आणि विकासाचे पर्याय मांडण्याच्या बाबतीत वा आकलनात निश्चितच यशस्वी प्रयत्न केलेला

आहे. त्याबाबत त्यांचे योगदान मान्यच करावे लागेल. अशी अभ्यासपूर्ण मांडणी त्यांनी केली. सत्राचे आभार प्रदर्शन प्रा. शिवाजी उकंरडे यांनी केले.

म. स. प अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रात दुपारी ३.०० वाजता **'इरावती कर्वे स्मृती व्याखानमाला'** आयोजित केली होती. यासाठी अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. रमेश कांबळे (मुंबई) हे उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. डॉ. संजय कोळेकर यांनी भूमिका मांडली. यावेळी व्याख्याते म्हणून **डॉ. मिलींद बोकील (पुणे )** यांना निमंत्रित केले होते. त्यांनी **'भारतीय समाज: नवे आकलन, नवे दृष्टिकोन'** या विषयावरची सविस्तर व अभ्यासपूर्ण मांडणी केली. डॉ. मिलींद बोकील म्हणाले की, आपल्या समाजासंदर्भात, निरनिराळया विद्याशाखांच्या मदतीने, जे संशोधन होते आहे त्याचा आपण कायम चिकित्सक वृत्तीने आढावा घ्यायला पाहिजे आणि त्यात नित्यनूतन भर घालायला पाहिजे. ह्या बाबतीत समाजशास्त्रालाच अग्रदूत व्हावे लागेल. कारण ह्या ज्या बाकीच्या विद्याशाखा आहेत त्यांचा दृष्टिकोन आणि आवाका हा फक्त त्यांच्या क्षेत्रापुरता मर्यादीत असतो. त्यांच्या विशिष्ठ संशोधनाचे जे निष्कर्ष आहेत त्यांचा सामाजिक अन्वयार्थ जर लावला नाही तर त्याची उपयुक्तता मर्यादित राहते समाजशास्त्र ही एकमेव अशी विद्याशाखा आहे की, जी साकल्याने, सर्वसमावेशक आणि सर्वसमन्वयी पध्दतीने हे संशोधन कवेत घेऊ शकते. समाजशास्त्राच्या अधिष्ठानातून तुम्ही बाकीच्या सर्व दिशांना सहज संचार करु शकता. ईरावतीबाई सारख्या आपल्या पुर्वसुरींनी संशोधनाची जी परंपरा निर्माण केली आहे, ती आपण पुढे चालवली पाहिजे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या समाजात अद्यापही गरीब, वंचित, शोषित असे अनेक घटक आहेत. ते केवळ विकासाकरिताच नाही तर अस्तित्वासाठीही झगडत आहेत. गेली कित्येक वर्ष, शतके हे लोक आपली भाषा आणि संस्कृती टिकवून उभे आहेत. आपल्यासारख्या अभ्यासकांकडून त्यांची अशी अबोल अपेक्षा असते की, आपल्याला जे स्थैर्य, समृध्दी आणि साधनसुविधा मिळालेल्या आहेत. त्याचा उपयोग करून आपण निर्भयपणाने आणि सत्यान्वेषी वृत्तीने समाज संशोधन केले पाहिजे. ही अपेक्षा जर आपण पूर्ण केली नाही तर आपल्या कर्तव्यात तर आपण चुकूच. शिवाय काळही आपल्याला क्षमा करणार नाही अशी सैध्दांतिक मांडणी आणि आव्हान केले. या समारोप सत्राचे आभार प्रा. डॉ. बळीराम पवार यांनी मानले. व्याख्यानमालेचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केले.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनात चौथ्या सत्रात 'समकालीन पर्यायी विकास चिंतन आणि संविधानात्मक चौकट' या विषयावर दि. ११ एप्रिल २०२२ रोजी आयोजित केला होता. या परिसंवादाचे प्रास्ताविक प्रशांत सोनवणे यांनी तर स्वागत डॉ. नारायण कांबळे यांनी केले. परिसंवादाच्या अध्यक्ष म्हणून डॉ. स्मिता अवचार उपस्थित होल्या. या परिसंवादात डॉ. सुरेश वाघमारे, लातूर, डॉ. प्रदिप मेश्राम भंडारा, डॉ. श्रुती तांबे पुणे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. डॉ. प्रदिप मेश्राम यांनी संविधान आणि विकासाचे पर्यायी मॉडेल या अनुषंगाने मांडणी केली. ते म्हणाले की, भारतीय समाजव्यस्थेत पितृसत्ता, जातीवर्ग व्यवस्था धर्मसत्तेचे कंगोरे आहेतच. परंतु ग्रामीण, शहरी, साक्षर, निरक्षर असे समानतेचे अनेक पैलू आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतातील या असमानतेचे नेमके भान होते त्यामुळेच संविधानाच्या निर्मितीबरोबरच आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व्यवस्थेत समानता आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सत्ता आणि अधिकाऱ्यांच्या वितरणाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला, संविधान कसे असावे याची स्पष्ट कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती असे प्रतिपादन केले. ते पुढे म्हणाले की, संविधानाच्या उद्देशिकेतून त्यांना अभिप्रेत असलेल्या भारतीय समाजाचे चित्र स्पष्ट केले आहे. परंतु नवीन शैक्षणिक धोरणातून जातीची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न आहे. आपण उलट्या दिशेला चाललो आहोत. या निष्कर्षापर्यंत येऊन पोहचलो आहोत. तर या परिसंवादात दुसरे साधन व्यक्ती डॉ. सुरेश वाघमारे यांनी भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास सांगून अलिकडेच झालेल्या संविधान बदलाच्या मोहिमेचा आढावा घेतला. आणि नव्याने तयार केलेल्या संविधानाचा एक मसुदा दाखवत भारतात पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न आहे असे प्रतिपादन केले. डॉ. श्रुती तांबे यांनी विकासाचे समाजशास्त्र या ज्ञानशाखेचा आढावा घेत अध्ययन, अध्यापन, संशोधन धोरण निर्मिती त्याची अमंलबजावणी व त्यानंतर मूल्यमापन असे टप्पे असतात असे सांगितले. भारतातील विकासाचे नकारात्मक परिणाम वंचित समूहांवर झालेले आहेत. असे मत प्रतिपादन केले. विकासाच्या समाजशास्त्रामध्ये विकासाचा आढावा घेण्यासाठी वृध्दिवर भर, संसाधनावर सत्ता किंवा अधिकार समन्यायी वाटप शाश्वत विकास असे सांगून त्या पुढे म्हणाल्या आजची लोकशाही ही खरी नाही. आजच्या लोकशाही समाजवादाचा अंत झालेला आहे म्हणूनच भारताचा हंगर इंडेक्समध्ये क्रमांक खाली आहे आणि त्यावेळेला अभिजन वर्ग महासत्तेची भाषा बोलतो आहे. या पार्श्वभूमीवर ज्ञानाची फेरमांडणीच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. ही फेरमांडणी भारतीय समाजाच्या मुलभूत आकलनावर आधारित असावी असे प्रतिपादन त्यांनी केले. आज कुठे

जायचं आहे याचे पेच समोर आहेत. १) उपजीविकेला महत्व द्यायचे की सार्वभौमत्व महत्वाचे. २) पाश्चात्य जगातील अतिरेकी व्यक्तिवाद की नव्या प्रकारचा समूहवाद. ३) वृध्दीचे राजकारण अर्थकारण की शाश्वत विकास. ४) पाश्चात्य ज्ञानावर आधारलेली परिभाषा की नवी परिभाषा जात, धर्म, लिंग यापलीकडे जाऊन प्रज्ञा, करूणा यांची नवी परिभाषा भारतीय संविधानावर आधारित नैतिकतेचा आग्रह करणे आवश्यक आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

या सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. स्मिता अवचार म्हणाल्या की, तीनही वक्त्यांनी मांडलेले विचार अधिक पुढे घेऊन जायचे असतील तर पर्यायी विकासाचे संविधानाच्या चौकटीत हे स्पष्ट झाले प्रारूप निर्माण करण्याची जी जबाबदारी कोणावर हा महत्वाचा मुद्दा आहे.? संविधानाचे नवीन प्रारूप तयार करतो आहे आणि आता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले संविधान पूर्णपणे बदलून टाकू असे कोणालाही शक्य नाही. म्हणूनच संविधानाला अपेक्षित असलेले विकासाचे प्रारूप अभ्यासक्रमात आणून ते नवीन पिढींना शिकविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. पण ही जबाबदारी पार पाडतो का? हा महत्वाचा प्रश्न आहे. कारण विद्यापीठ अनुदान आयोगाने २००२ मध्ये भारतीय पातळीवर सर्व विद्यापीठांमध्ये विकासाचे समाजशास्त्र हा विषय सक्तीचा केला, परंतु आज किती विद्यापीठामध्ये हा विषय शिकवला जातो हा कळीचा प्रश्न आहे. आपण हा विषय शिकवला असता त्यावर अध्ययन, अध्यापन आणि संशोधन झाले असते तर त्याचे प्रतिबिंब कदाचित शासकीय धोरणामध्ये पडण्याची शक्यता होती. विषय शिकलेली पिढी जर नोकरीत आली असती तर विकास प्रक्रियेमध्ये निर्माण होणारे गुंते सोडवणारी म्हणजेच अंमलबजावणी करणारी सक्षम पिढी आपण घडवू शकलो असतो. संविधानात्मक नैतिकता विषय आहे यापासून आपण लांब गेलो आहोत. त्यामुळे ते कुणी तरी येतील आणि आमचा हक्क मारतील अशा हाका मारण्यापेक्षा आम्हीच ज्ञानावर आधारीत भारतीय समाजाचे सम्यक आकलन करू शकलो असतो आणि त्यातून भारतीय समाजातील डॉ. प्रदिप मेश्राम ज्या समानतेचा उल्लेख करतात त्यांच्यावर मात करु शकलो असतो. डॉ. श्रुती तांबे ज्या लोकशाहीची नव्याने मांडणी करण्याची आवश्यकता निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादन करतात. ते करण्यासाठी नवीन सक्षम पिढी घडवून समाजवाद, सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थापित करणे नवी संवेदनशीलता निर्माण करणे शक्य आहे. हितसंबंधाच्या गदारोळात निर्माण होणाऱ्या परिवर्तनाच्या छोट्या छोट्या संधी घेत नव्याने समाजाची बांधणी करणे शक्य आहे. या संधीचे रूपांतर परिवर्तनाच्या शक्यता मध्ये करण्याची ताकद ही शिक्षकांमध्ये आहे. गरज आहे ती जागल्याची भूमिका निभावण्याची अशा स्वरूपाची मांडणी अध्यक्षीय समारोपात डॉ. स्मिता अवचार यांनी केली. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. आनंद आंबेकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. श्रीराम खाडे यांनी मानले.

**शोधनिबंध सादरीकरणासाठी संशोधन समितीची स्थापना :** २०२२ पासून म. स. प. ने डॉ. नारायण कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली शोधनिबंध सादरीकरणात महत्वपूर्ण बदल करण्याचे निश्चित केले आणि त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद ही मिळाला. Indian Sociological Society New Delhi च्या धर्तीवर मराठी समाजशास्त्र परिषदेने संशोधन समित्या गठीत केल्या आहेत. संशोधकांनी आपला शोधनिबंध कोणत्या संशोधन समितीला सादर करावयाचा आहे. हे सर्वप्रथम निश्चित करून संबधित समन्वयकांशी संपर्क करून तो शोधनिबंध / सारांश त्यांच्याकडे पाठवायचा आहे. हा आमचा नवीन उपक्रम करण्याच्या पाठीमागचा एकच उद्देश आहे की, संशोधकांना अधिकची संशोधनाची दालने खुली करणे, नवनवीन संशोधन विषय विकसित करणे व प्रोत्साहन देणे, आपल्या मातृभाषेतून होणारे संशोधन समृध्द करणे. सोबत बदलत्या काळाबरोबर त्याचे शोधनिबंध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचविणे हा नेमका उद्देश घेऊन हा बदल केला आहे.

संशोधन समित्याच्या माध्यमातून पहिल्यादांच हा प्रयत्न केला गेला. प्रामुख्याने दोन सत्रामध्ये पेपरचे वाचन झाले. म. स. प. अधिवेशनाच्या दि. ११ एप्रिल २०२२ च्या पाचव्या सत्रात सायंकाळी ५.०० वाजता संशोधन समितीच्या वतीने, आयोजित शोधनिबंधाचे वाचन, प्रत्येक संशोधन समितीच्या समन्वयकांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. म. स. प. ने अधिवेशनापूर्वीच एक ठराव अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेऊन नव्याने संशोधन समितीचे गठन करण्यात आले आहे. सदरील संशोधन समितीच्या वतीने शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात आले. यासाठी खालील संशोधन समिती व समन्वयक यांचे गठन करण्यात आले आहे. १( महाराष्ट्र सातत्य आणि परिवर्तन - डॉ. सुधीर येवले २( जागतिकीकरण आणि विकास - डॉ. अनिल जायभाये ३( लिंगभाव : असमानता आणि वर्जीततेचे प्रश्न - डॉ. अर्चना जगतकर ४( प्रसारमाध्यमे आणि समाज - डॉ. ज्योती गगनग्रास ५) नागरी समाज - डॉ. मधुकर देसले ६) कृषक समाज आणि स्थित्यंतरे - डॉ. दया पांडे ७( सामाजिक चळवळी आणि परिवर्तन - डॉ. संपत काळे ८( नागरिकांची कर्तव्ये - डॉ. राजकुमार भगत

९( हिंसा, गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार - डॉ. ज्योती पोटे १०) सीमांतिक समूह - डॉ. श्रीनिवास पिलगुलवार या सर्व समन्वयकांच्या अध्यक्षतेखाली शोधनिबंधाचे सादरीकरण पार पडले.

**आमसभा:** दि. ११ एप्रिल २०२२ रोजी सहाव्या सत्रात संध्याकाळी ठिक ७.०० वा मा. अध्यक्ष प्रा. डॉ. नारायण कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी समाजशास्त्र परिषदेची ३१ वी आमसभा पार पडली. यामध्ये आमसभेच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार विविध विषयावर चर्चा करुन ठराव पारीत करण्यात आले. प्रस्तुत आमसभेत सर्वप्रथम डॉ. प्रदीप आगलावे, (नागपूर) यांनी एक लाख रु. व डॉ. सुर्यकांत घुगरे (बार्शी) यांनी ५० हजार रूपये विषयाप्रति उत्तरदायीत्व म्हणून म. स. प. ला देणगी दिली. त्याबद्दल दोघांच्या ही अभिनंदानाचा ठराव मांडण्यात आला व सर्वानुमते टाळयांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले. म. स. प. च्या विकासाच्या अनुषंगाने काही नवीन उपक्रम घेतले होते. त्यामध्ये संशोधन समिती व्यक्तिपरिचय ग्रंथ, विविध भाषणाचे संग्रही विशेषांक, संशोधन पत्रिका या अनुषंगाने घेतलेल्या उपक्रमाला व आर्थिक खर्चाला आमसभेची मान्यता घेण्यात आली. २०२०-२०२२ या कालखंडात म. स. प. च्या सर्वाधिक सभासदाची नोंदणी प्रा. डॉ. श्रीराम खाडे मारेगांव यांनी केल्यामुळे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला. या आमसभेत गेल्या दोन वर्षाच्या कार्याचा आढावा व वृत्तांत म. स. प. चे सचिव डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी वाचला. वर्तमान कार्यकारणीचा दोन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे नवीन कार्यकारणी निवडण्याचा ठराव मांडण्यात आला. परंतु कोणत्याही स्थितीत सार्वमत न झाल्यामुळे निवडणूकीची प्रक्रिया ज्येष्ठ प्रा. डॉ. नारायण चौधरी, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. यावेळी मतमोजणीची प्रक्रिया होऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रा. डॉ. राहूल भगत अध्यक्षपदी बहुमताने निवडून आले. सचिव म्हणून प्रा. डॉ. अशोक बोरकर तर कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के यांची निवड केली. या नवनिर्वाचित पदाधिका-यांचे अभिनंदन व स्वागत म. स. प. चे अध्यक्ष प्रा. डॉ. नारायण कांबळे व निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. डॉ. नारायण चौधरी यांनी केले. या सत्रातील निवडणूकीसाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून मोठया संख्येने म. स. प. चे सभासद खासकरून उपस्थित झाले होते. या आमसभेच्या सत्राचे आभार म. स. प. चे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. बळीराम पवार यांनी मांडले.

अधिवेशनाच्या दूसऱ्या दिवशी दि. १२ एप्रिल २०२२ रोजी सकाळच्या सातव्या सत्रात विविध संशोधन समित्याचे उर्वरित शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. हे सादरीकरण पाचव्या आणि सातव्या अशा दोन सत्रात सर्व समन्वयकांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

म. स. प. च्या आठव्या सत्रात सकाळी ११.०० वा **'कोकणातील पर्यावरण आणि विकासाचे प्रश्न'** या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचे अध्यक्ष मा. सतीश कामत होते. या सत्रात वक्ते म्हणून प्रा. संजयकुमार कांबळे, (पुणे) व पत्रकार मनोज मुळे, (रत्नागिरी) हे उपस्थित होते. या सर्वाचे स्वागत व सत्कार म. स. प. च्या वतीने प्रा. डॉ. प्रदीप गजभिये, नागपूर यांनी केले. या परिसंवादाचे प्रास्ताविक प्रा. शिवाजी उकंरडे यांनी केले. तर कोकणातील पर्यावरण आणि विकासाचे प्रश्न या परिसंवादाच्या सत्रात **संजयकुमार कांबळे** (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, (पुणे) यांनी कोकणातील जमीन संसाधने आणि विकासाच्या प्रश्नांची मांडणी पर्यावरणवादी स्त्रीवादी दृष्टिकोनातून करताना कोकणचा इतिहास आणि वर्तमानाचा आढावा घेतला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या महाडच्या चवदार तळे सत्याग्रह (२० मार्च १९२७), कोकणातील खोतीचा प्रश्न (१९३९) यापासून सुरूवात डॉ. गेल ओम्व्हेट यांनी लिहिलेल्या कोकणातील दलित चळवळ - संभाजी गायकवाड यांच्या योगदानाविषयी लिहिलेल्या पुस्तकाचा संदर्भ देऊन कोकणातील सामाजिक स्थितीचा वेध घेतला. त्यानंतर सामाजिकशास्त्रापेक्षा मराठी साहित्याने कोकण विषयक केलेल्या सार्थ मांडणीचा आधार घेऊन बा. सी. मर्ढेकरांची कविता उध्दृत केली.

*माझ्या गोव्याच्या भूमीत, गड्या नारळ मधाचे*
*कड्या-कपा-यांमध्ये मधुन घट फुटती दुधाचे।।*
*माझ्या गोवाच्या भूमीत, आंब्या-फणसांची पाझर*
*फुली फळांचे पाझर, फळी फुलांचे सुवास।।*

ही कविता सांगून गोमंतक भागाचे त्यात आलेले विलोभणीय वर्णन केले. त्या नंतर मधु मंगेश कर्णिक यांच्या 'माझं गाव माझा मुलुक' 'माहीमची खाडी' या साहित्यातील कोकणच्या निसर्गाचे वर्णन आणि कोकणातील लोकांचे मुंबईत स्थलांतर केल्यानंतर येणाऱ्या अडचणी यांची मांडणी केली. या साहित्याने समाजव्यवस्थेतील शोषणापेक्षा निसर्गाच्या वर्णनावर लक्ष केंद्रित केले. तर माधव कोंडविलकर यांच्या 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' 'एक होती कातळवाडी' या मधून कोंडविलकर कोकणातील जातिव्यवस्थेची आणि एन्रॉन प्रकल्प या विषयी केलेली मांडणी तर लेखिका उर्मिला

पवार यांनी 'आयदान' या आत्मकथेतून दलित स्त्री प्रश्नांची केलेली मांडणी यांचा आढावा घेतला. हापूस आंबा अमेरिका आणि अरब देशात जातो पण तो आम्हाला मिळत नव्हता. सुरमई सारखे चांगले मासे आम्हाला मिळत नव्हते असेही उर्मिला पवार सांगतात, हे सांगून यावरून कोकणातील दलित स्त्रियांच्या स्थितीचा आणि समाजव्यवस्थेचा त्यांनी वेध घेतला.

ऐतिहासिक आणि साहित्यिक आढाव्यानंतरच्या भागात प्रा. कांबळे यांनी 'स्त्रिया, पर्यावरण आणि विकासा'तील आंतरसंबंध स्पष्ट केला. विकासाच्या भांडवली प्रारूपामध्ये निसर्गाचे शोषण आणि औद्योगिक प्रगतीमुळे यांत्रिक मत्स्य व्यवसायातील परिवर्तनाच्या मत्स्य व्यवसायातील स्त्रियावर झालेला परिणाम लक्षात आणून दिला. आम्ही डोलकर डोलकर दर्याचा राजा म्हणणारा आनंदाने दिसणारा मच्छीमार समुदाय भांडवलदारांच्या यांत्रिक ट्रोलर्स आणि पर्सिनेट जाळे यामुळे तो अडचणीत सापडला आहे. याचा सरकारने विचार केला पाहिजे. अभ्यासकांनी यावर संशोधन केले पाहिजे. असे म्हणून कोकणातील रोजगाराच्या दुरावस्थेमुळे तेथील स्त्रियांना जंगल, जमीन आणि उपजीवकेपासून तोडून त्यांचे विस्थापन कसे घडविले जात आहे हे सांगितले. कोकणातील निसर्ग संपदेचा कोणत्या समूहाला फायदा होतो हे सांगतानाच विकासाचा विचार केवळ पर्यायी विकास आणि शाश्वत विकास यापुरताच न करता विकासोत्तर सिध्दांत (पोस्ट डेव्हलपमेंट) समजून घ्यावे लागतील तर पर्यावरणाचा विचार मांडताना उथळ पर्यावरणवादाला टाळून सखोल पर्यावरणाचा विचार केला पाहिजे. मनुष्य हा विश्वाचा केंद्रबिंदू नाही तर तो निसर्गाचा एक इतरांसारखाच घटक आहे. पर्यावरण रक्षणार्थ आर्थिक धोरणात लोकांनुवर्ती बदल करावे लागतील. प्रश्न आहे तो मोठ्या प्रमाणावरील विकासाचा अजेंडा पर्यावरण, अन्नसुरक्षा स्त्रियांचे सबलीकरण आणि शोषित वंचित घटकांच्या गरजा या सर्वांची सांगड घालण्याचा असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. माधव गाडगीळ यांच्या पश्चिम घाटविषयक अहवालातील जैवविविधता आणि हरित दृष्टीचा विचार करून कोकणातील प्रश्नांचा वेध घेतला पाहिजे. त्यात समतामुलक सर्वांगीण मानवी समृध्दी बरोबरच पर्यावरणाचे संवर्धन करणाऱ्या समाजरचनेची आवश्यकता प्रा. संजयकुमार कांबळे यांनी अधोरिखित केली.

शहरीकरण किंवा केवळ पायाभूत सुविधा म्हणजे विकास नाही हे स्पष्ट करताना लवासातील पर्यावरणीय आणि स्थानिक लोकांपुढे समस्या कशा निर्माण झाल्या हे त्यांनी सांगितले. आणि कोकणचा मुळशी पॅटर्न होऊ नये म्हणून प्रश्नांची तीव्रता त्यांनी करून दिली. त्याच सोबत हिवरेबाजार या गावाने केलेल्या पर्यावरणीय विकासाचे प्रतिमान हे कसे महत्वाचे आहे ते पण सांगितले. स्त्रियांच्या विकासाची सांगड घालताना निसर्ग संवर्धनाच्या कार्यक्रमाशी घातली तर स्त्रियांचा सहभाग वाढू शकेल. नवे तंत्रज्ञान नवीन जैविक आणि अजैविक प्रजाती आणि घटक वापरण्यापूर्वी स्त्रियांच्या आयुष्यावर होणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. विशिष्ट जाती-वर्ग जमातींची संस्कृती त्यांची कौटुंबिक सामाजिक रचना यानुसार स्त्रियांचे प्रश्न आणि गरजा बदलतात. त्यामुळे त्या त्या ठिकाणची सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेवून स्त्री सबलीकरण आणि निसर्ग संवर्धन कार्यक्रमाची जोड देणे श्रेयस्कर ठरेल असे पण त्यांनी सांगितले. जमीन आणि वनसंपदा उपलब्ध होण्यासाठी एकत्र काम करणे आवश्यक आहे, रुढी अथवा परंपरा आणि स्त्रियांकडे असलेल्या जमिनीची माहिती घेणे, जिथे जमिनी सरकारी मालकीच्या असतात तेथे स्त्रियांना समाविष्ठ कसे केले जाईल हे पाहणे आणि भूमिहिन स्त्रियांच्या बाबतीत नवीन अभिनव उपाय शोधणे गरजेचे आहे. स्त्रियांच्या गटांना आर्थिक सहकार्य मिळावे यासाठी वित्तिय संघटनांशी संयोग करणे आवश्यक आहे. कोकणचा विकास कोकणच्या पर्यावरणाशी संबंधित पध्दतीने झाला पाहिजे. कोकणच्या निसर्ग संपदेचा कोकणच्या स्थानिक लोकांना तळागाळातील लोकांचा कसा फायदा होईल याचा विचार केला पाहिजे. भांडवली पध्दतीने भांडवलदारांसाठी तो विकास नसला पाहिजे. पुढच्या दोनशे वर्षाचा विचार करता आला पाहिजे तरच आपल्याला पुढे प्रगती करता येऊ शकेल असे त्यांनी प्रतिपादन केले.

या सत्रातील दुसरे साधन व्यक्ती **पत्रकार मनोज मुळे** यांनी कोकणातील रायगड जिल्ह्याचा उल्लेख करून तेथील विकासावर भाष्य केले. तर उर्वरित कोकण हे कसे विकास वंचित आहे याची मांडणी केली. दोन्हीकडचे पर्यावरण सारखे आहे पण दोन्हीकडच्या समस्या वेगळया आहेत. ग्लोबल वॉर्मिगचा परिणाम कोकणावर होऊन त्यातून २००५ पासून पाऊस कधीही आणि कितीही पडतो, थंडी कितीही उशिरा पर्यंत चालते, तीस-पस्तीस मर्यादेपर्यंत असलेले तापमान बेचाळीस ४५ अंश डिग्री सेल्सिअसपर्यंत कधीही पोहोचते, हे बदल २००९ नंतर चक्रीवादळ आले त्यानंतर झालेली आहेत. निसर्ग आणि तोकते वादळाचा कोकणावर विपरीत परिणाम झाला. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही मासे

आणि आंबे, काजू यावर आधारित आहे. आंब्याची उलाढाल पाचशे ते सहाशे कोटींची उलाढाल होते आणि चक्रीवादळाचा परिणाम आंबे आणि मासेमारी क्षेत्रावर झाला. लोकांचे आर्थिक नुकसान झाले याला बदलते हवामान जबाबदार आहे. पाऊस कधीही आणि कितीही पडल्यामुळे आंबा पिकांचे नुकसान होते. मासे आपले ठिकाण बदलतात. मुंबई विद्यापीठाच्या किंवा इतर कुठेही कोकणात कुठे समुद्राची पातळी वाढीचे काय परिणाम होतात याचा अभ्यास करण्याची यंत्रणा किंवा अभ्यासक्रम नाहीत असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राचे पर्यावरण आणि त्यातील कोकणाचे पर्यावरण याचा वेगळा अभ्यास झाला पाहिजे. कोकणातील महामार्गाचा निर्मितीचा पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास झाला पाहिजे त्यातील दोष काय होऊ शकतील याचा विचार केला पाहिजे. कारण मुंबई -गोवा महामार्गाची निर्मिती करताना ५५ हजार झाडे तोडण्यात आल्याचे त्यांनी सांगून पर्यावरण आणि उद्योग या सोबत कृषी पर्यावरणाचा, पर्यटनाचा विकास व्हायला हवा हे अधोरिखेत केले. प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्रदूषण नियंत्रण करीत नसल्याची टीका केली. जितकी झाडे तोडली तितकी ती नव्याने लावली पाहिजेत, आणि ती जगविली पाहिजेत पण तसे दिसत नाही. वृक्षलागवड केली नाही तर चिपळूण सारखी पुराची परिस्थिती उध्दभवू शकते चिपळूणच्या पुराला सातारा-कोल्हापूर येथील पुराच्या पाण्याचा संबंध आहे हे त्यांनी सांगितले. कोकणातील हिंदू-मुस्लिम सलोख्याच्या कराराचा उल्लेख करून त्याचे महत्व अधोरिखेत केले, आणि त्यातून १०० वर्ष सामाजिक सलोखा टिकून राहील याची त्यांनी भारताच्या पातळीवरील एक अनोखे उदाहरण असल्याचे त्यांनी दाखवून दिले. थोडक्यात अतिवृष्टी अवकाळी वृष्टी गारपीट आणि अति ऊन यांचा सामना कोकणवासीयांना कसा करावा लागतो हे मनोज मुळे यांनी सांगितले आणि त्याच्यासोबत उद्योगांची पण आवश्यकता त्यांनी अधोरिखत केली.

**मा. सतीश कामत** यांनी अध्यक्षीय समारोप केला. ते म्हणाले, हा विषय खूप गुंतागुतीचा असून कोकणातील समस्या ह्या निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित असल्याचे सांगितले. हवामान बदलाचा अभ्यास करणे, शेतीचे स्वरूप बदलणे आवश्यक आहे आणि बांबू यांची लागवड केली तर जास्त आणि दीर्घकाळ फायदा होऊ शकतो. जैतापूर एन्रॉन, रिफायनरी हे मानवनिर्मित संकट आहेत. शासनाने स्वत:च्या आर्थिक विकासापेक्षा निसर्गाच्या विकासाचा विचार केला पाहिजे. पर्यावरणास हितकारक विकासासाठी निसर्गाच्या प्रक्रिया उद्योगांची जोड दिली तर मानवनिर्मित पर्यावरणीय समस्या कमी होऊ शकतील. नवीन प्रकल्पांना विरोध होतो याचाही विचार करताना पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होतात. म्हणून विरोध होतो की स्थानिक हित संबंधांमधून विरोध होतो याचाही विचार केला पाहिजे. जर चांगल्या प्रकल्पांतून स्थानिक लोकांच्या रोजगाराचे प्रश्न सुटत असतील तर अशा प्रकल्पाचे स्वागत केले पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. या सत्रात झालेली 'कोकणच्या पर्यावरण आणि विकासाची चर्चा' धोरणात्मक स्तरावर नोंद घेतली पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी सत्राचे आभार प्रा.डॉ.हिरालाल भोसले यांनी मानले.

**समारोप :** दि. १२ एप्रिल २०२२ रोजी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३१ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा समारोप दुपारी २.०० वा. मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला. या समारोपाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. नारायण कांबळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. पी. जी. जोगदंड तर प्रमुख उपस्थिती मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख तथा इंडियन सोशालॉजिक सोसायटी नवी दिल्लीचे माजी सचीव प्रो. डॉ. जगन कराडे, रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या कार्याध्यक्ष मा. शिल्पाताई पटवर्धन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. पी. कुलकर्णी हे विचारपीठावर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे म. स. प. च्या वतीने सन्मान चिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. या समारोपीय कार्यक्रमात म. स. प. च्या अधिवेशनाचा वृत्तांत व वार्षिक अहवालाचे वाचन सचिव प्रा. डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी केले.

समाजशास्त्र विषयात ज्यांनी भरीव योगदान दिले आहे, अशा सर्व मान्यवरांचा म. स. प. ने सन्मान केला. या समारोपीय कार्यक्रमात म. स. प. चे सन २०२० व २०२१ अशा दोन्ही वर्षीच्या पुरस्काराने अनेकांना सन्मानित सन्मानित करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे

**२०२० चे मराठी समाजशास्त्र परिषदेचे पुरस्कार**

१( **जीवनगौरव** पुरस्कार – २०२० : अ) प्रा. **डॉ. एस. एल. गायकवाड**, औरंगाबाद. ब) प्रा. **डॉ. प्रदीप आगलावे**, नागपूर.

२( सौ. प्रतिभा कुलकर्णी **उत्कृष्ठ महिला प्राध्यापक** पुरस्कार : अ) **डॉ. सरोज आगलावे**, नागपूर.

३( डॉ. प्रदिप आगलावे **उत्कृष्ठ प्राध्यापक** / संशोधक पुरस्कार : अ) **डॉ. जगन कराडे**, कोल्हापूर.

४( **जय जोशी** क्रमिक / संदर्भ ग्रंथ पुरस्कार : अ) **डॉ. ठाकूर सुरेंद्र**, औरंगाबाद.

५( अनुराधा भोईटे **उत्कृष्ठ प्रकाशित लेख** पुरस्कार : अ) **प्रा. संजयकुमार कांबळे,** पुणे.

जय जोशी क्रमिक / संदर्भ ग्रंथ पुरस्कार प्रा. ठाकूर सुरेंद्र, औरंगाबाद यांच्या 'The Darker Side of Farmers Wives' या क्रमिक ग्रंथास देण्यात आला. तर अनुराधा भोईटे उत्कृष्ठ प्रकाशित लेख पुरस्कार प्रा. संजयकुमार कांबळे, पुणे यांच्या 'भारतीय राज्यघटना: डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक विचार आणि सामाजिक न्याय' यास देण्यात आला.

**२०२१ चे मराठी समाजशास्त्र परिषदेचे पुरस्कार विजेते.**

१( **जीवनगौरव** पुरस्कार - २०२१ : अ) प्रा. **डॉ. रमेश कांबळे,** मुंबई. ब) प्रा. **डॉ. रमेश जाधव,** कोल्हापूर.

२( सौ. प्रतिभा कुलकर्णी **उत्कृष्ठ महिला प्राध्यापक** पुरस्कार : अ) प्रा. **डॉ. अर्चना जगतकर,** कोल्हापूर.

३( प्रा. डॉ. प्रदीप आगलावे **उत्कृष्ठ प्राध्यापक** / संशोधक पुरस्कार : अ) प्रा. **डॉ. राहूल भगत,** तुमसर, जि. भंडारा. ब) प्रा. **डॉ. घनश्याम येळणे,** संचालक स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

४( **जय जोशी** क्रमिक / संदर्भ ग्रंथ पुरस्कार : अ) **डॉ. नलिनी बोरकर,** भंडारा. ब) प्रा. **साहेबराव हिवाळे,** औरंगाबाद.

५( अनुराधा भोईटे **उत्कृष्ठ प्रकाशित लेख** : अ) **डॉ. सीमा शेट्टे,** यवतमाळ.

६( डॉ. सूर्यकांत घुगरे **संशोधन ग्रंथ पुरस्कार** : अ) **डॉ. जगन कराडे,** कोल्हापूर.

जय जोशी क्रमिक / संदर्भ ग्रंथ पुरस्कार २०२१ या वर्षीचा डॉ. नलिनी बोरकर, भंडारा यांच्या 'बौध्दांच्या सामाजिक जाणीवा' आणि साहेबराव हिवाळे, औरंगाबाद यांच्या 'ग्रामविकास कार्यक्रमातील लोकसहभाग' या दोन्ही ग्रंथाना विभागून देण्यात आला. तर या वर्षीपासून संशोधनात्मक ग्रंथाला डॉ. सूर्यकांत घुगरे संशोधन ग्रंथ पुरस्कार तर यावर्षीपासून संशोधनात्मक ग्रंथाला सुरु करण्यात आला आहे. हा पुरस्कार डॉ. जगन कराडे, कोल्हापूर 'Occupational Mobility Among Scheduled Castes' यांच्या संशोधन ग्रंथास प्राप्त झाला. डॉ. सीमा शेट्टे, यवतमाळ यांच्या कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर नाथपंथी जोगी (गोसावी) जमातीचे अवलोकन : एक अभ्यास' या लेखास अनुराधा भोईटे उत्कृष्ठ प्रकाशित लेख पुरस्कार देण्यात आला. २०२०-२१ या दोन्ही वर्षाचे विविध पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे म. स. प. च्या वतीने शाल, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सर्वाचा प्रा. पी. पी. जोगदंड, प्रा. डॉ. जगन कराडे, प्राचार्य डॉ. कुलकर्णी, मा. शिल्पा पटवर्धन, म. स. प. चे अध्यक्ष, डॉ. नारायण कांबळे यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

अध्यक्षीय समारोप करताना **डॉ. नारायण कांबळे** आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, अमरावती येथील अधिवेशनात आपण माझी म. स. प. च्या अध्यक्षपदी बहुमताने निवड केली, आणि मराठी समाजशास्त्र परिषदेसाठी कार्य करण्याची संधी दिली, जानेवारी २०२० मध्ये आपण माझी अध्यक्ष म्हणून निवड केली आणि लगेच मार्च २०२० मध्ये कोरोनामुळे देशात लॉकडाऊन लागला. नोव्हेंबर, २०२० मध्ये माझ्याकडे सूत्रे आल्यानंतर आपल्या सहकार्याने व माझ्या कार्यकारणीतील सदस्याच्या मदतीने लगेच विविध कार्यक्रमाची आखणी करुन ऑनलाईन पध्दतीने परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा, व्याखानमाला प्रकाशन कार्यक्रम इत्यादींचे आयोजन केले. याला प्रतिसाद किती मिळतो याबद्दल आमच्या मनात साशंकता होती परंतू ऑनलाईनच्या माध्यमातून केलेल्या उपक्रमाला लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. आमचे मनोबल वाढले आणि हा प्रतिसाद पाहता आम्ही ह्या ऑनलाईनच्या माध्यमातून विशेष व्याख्यानासोबतच्या व्यक्तिपरिचय ग्रंथ प्रकाशन समारंभ सोहळा, परिसंवाद, व्याखानमाला, संशोधन कार्यशाळा असे कितीतरी वेगवेगळया स्वरूपाचे उपक्रम हाती घेतले. समाजशास्त्र अभ्यासकाचा त्याला भरभरून प्रतिसाद मिळत राहीला एवढेच नव्हे, तर प्रत्येक कार्यक्रम झाल्यानंतर आमच्या सदस्यांनी संपन्न झालेल्या कार्यक्रमाविषयी लिखित व मौखिक प्रतिक्रिया सुध्दा दिल्यात. हा एकूणच कार्यक्रम कसा वाटला या संबंधाने त्यांनी आम्हाला फीडबॅक दिले. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या प्रतिक्रिया आम्ही व्हाट्सअपच्या माध्यमातून त्या सबंध लोकांपर्यंत पोहोचविल्या. त्यामुळे मराठी समाजशास्त्र परिषदेला चांगल्या पध्दतीने कार्यक्रम घेता आलेत. याचा आम्हाला आनंद आहे.

२०२१ चे मराठी समाजशास्त्र परिषदेचे अधिवेशन कोरोनाविषयक निर्बंधामुळे घेता आले नाही. कोरोनाविषयक निर्बंध शिथिल झाल्यामुळे आपण २०२२ वर्षीचे अधिवेशन गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी येथे प्रा. तुळशीराम रोकडे व प्रा. शिवाजी उकरंडे यांच्या सहकार्याने आयोजित करू शकलो याचा मला विशेष आनंद आहे. याप्रसंगी संस्थेचे, प्राचार्याचे विशेष आभार व्यक्त करतो. रत्नागिरी येथील अधिवेशनात विविध परिसंवाद, व्याखानमाला, विविध संशोधन समित्यांच्या माध्यमातून शोध निबंधाचे वाचन, अशी भरगच्च वैचारिक मेजवानी आपणास प्राप्त झाली. याच अधिवेशनात दि. ११ एप्रिल २०२२ ला सायंकाळी ६.०० वाजता परिषदेच्या आमसभेत अध्यक्षपदासाठी

निवडणूक होवून त्यात अध्यक्ष म्हणून डॉ. राहूल भगत यांची तसेच नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली. नूतन अध्यक्ष डॉ. राहूल भगत व त्यांच्या कार्यकारणीचे हार्दिक अभिनंदन, परिषदेचे कार्य जोमाने पुढे नेण्यासाठी ही नूतन कार्यकारिणी अतिशय चांगले काम करेल असा मला विश्वास आहे. माझ्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात व्यक्ती परिचय ग्रंथाचे प्रकाशन, फुले-शाहू-आंबेडकर व्याखानमाला डॉ. प्रदिप आगलावे उत्कृष्ठ प्राध्यापक / संशोधक पुरस्कार, डॉ. सुर्यकांत घुगरे संशोधक पुरस्कार, इंडियन सोशिओलोजिकल सोसायटी च्या धर्तीवर १० संशोधन समित्यांचे गठन, संशोधन पत्रिकेचे नियमित व विशेषांक प्रकाशन, मराठी समाजशास्त्र परिषदेसाठी ८० नवीन सदस्यांची नोंदणी, डॉ. सूर्यकांत घुगरे यांच्याकडून ५० हजार देणगी परिषदेला प्राप्त करून देवू शकलो, या सर्व बाबींच्या पुर्ततेमुळे मी अत्यंत समाधानी आहे.

कोविड -१९ (२०२० ते २०२२( च्या कार्यकाळात आभासी पद्धतीने घेतलेल्या सर्व कार्यक्रमाचा एक लिखित दस्तेवज (या कालावधीत आयोजित केलेल्या व्याख्यानाचे संकलन( आपण या परिषदेमध्ये प्रसिद्ध केला आहे. त्याचे त्याचे उत्कृष्ट संपादन **डॉ. प्रियदर्शन भवरे** यांनी केले आहे. त्यासाठी त्यांनी मोठी मेहनत घेतली असून एक चांगला दस्तऐवज तयार झाला आहे. भविष्यात निश्चितच तो आपल्याला चांगला मार्गदर्शक ठरेल. सोबतच यावर्षीपासून संशोधन समिती तयार केल्या त्याच्या समन्वयकांनी अत्यंत जबाबदारीने आपल्या भूमिका पार पाडल्या.

मराठी समाजशास्त्र परिषद ही महाराष्ट्रातील समाजशास्त्र विषयाचे अध्ययन, अध्यापन व संशोधन करणाऱ्या अध्यापकांची राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून आज सर्वांना परिचित झाली आहे. महाराष्ट्रात महाविद्यालयीन पातळीवर समाजशास्त्र विषयाचा विस्तार आणि विकास व्हावा हा नेमका केंद्रवर्ती विचार लक्षात घेऊन महाराष्ट्रातील तत्कालीन अभ्यासकांनी एकत्र येऊन हे विचारपीठ उभे केले आहे. या संस्थेची उभारणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील डॉ. कुलकर्णी, डॉ. वि. वि. देशपांडे, डॉ. आर. बी. बिलावर इत्यादींची पुढाकारातून झाली. पुढे याचा विस्तार सबंध महाराष्ट्रात झाल्याचे चित्र पाहावयास मिळते. आजपर्यंत परिषदेने विविध स्वरूपाचे उपक्रम हाती घेतले त्याचाच एक भाग म्हणून अशा स्वरुपाचे अधिवेशन महाराष्ट्रातील विविध विभागात झाल्याचे दिसून येते. या अधिवेशनामध्ये प्रामुख्याने समकालीन प्रश्नावर व त्या त्या विभागातील समस्यांवर चर्चा घडवून आणणे व त्यावरील उपाय सुचविणे हा मुख्य होता. या अधिवेशनाच्या अनुषंगानेच एक संशोधन पत्रिका म. स. प. च्या विचारपीठावर येऊन ज्यांनी ज्यांनी व्याखाने दिली आहेत. अशा सर्व व्याख्यानांचे संकलन करून एक चांगला दस्तऐवज तयार केला आहे. ही पत्रिका या अधिवेशनात प्रकाशित केली आहे. सोबत वार्षिक संशोधन पत्रिकात ही प्रकाशित केली आहे. त्यामध्ये समाजशास्त्राच्या प्राध्यापकांनी आपले वैचारिक व संशोधनात्मक स्वरूपाचे लिखाण केले आहे. हे लिखाण आपल्या विभागातील एखाद्या समस्या अथवा प्रश्नांच्या अनुषंगाने असावी अशी एक त्यामागची भावना होती. रत्नागिरी येथे म. स. प. चे अधिवेशनात वेगवेगळया विषयावर चर्चा झाली असली तरी ती फलदायी चर्चा झाल्याचे पहावयास मिळते आहे.

या अधिवेशनात परिसंवाद, शोधनिबंध वेगवेगळया विषयावर असले तरीही त्यांच्यामध्ये एक समान सूत्र आहे. सर्व विषय व शोधनिबंधाचे विषय समाजातील, विशेषत: विकास प्रक्रियेतील अंतर्विरोधाशी संबंधित आहेत. समाजशास्त्राच्या अभ्यासकांने 'संकल्पना' आणि 'सामाजिक वास्तवता' यांत किती अंतर आहे, यावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. भारतीय राज्यघटनेच्या स्वीकृतीला आता साधारणपणे ७३ वर्ष होत आहेत. या दरम्यान लोकशाहीची वाटचाल नेमकी कशी झाली, किती लोकप्रतिनिधी विकासाच्या उपक्रमांबद्दल, अमंलबजावणीबद्दल जागरूक राहून अभ्यास करतात, प्रभावीपणे आपली बाजू सभागृहात मांडतात, मुख्य म्हणजे किती लोकप्रतिनिधी सभागृहात उपस्थित असतात? या प्रश्नांचा वेध घेतल्यास 'वास्तव' हे 'आदर्श राज्यसंस्था व लोकतंत्र' या संकल्पनेपेक्षा किती वेगळे आहे हे लक्षात येते. सिध्दांत आणि विचारधारा, विशेषत: नैतिक अधिष्ठान असलेल्या वैचारिक परंपरेचा एकत्रितपणे विचार अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासाठी निदान विकासाच्या समाजशास्त्राची संपूर्णपणे पुर्नमांडणी, पुनर्रचना होणे आवश्यक आहे असे मला वाटते. अशा स्वरूपाच्या अभ्यासाच्या अनुषंगाने समाजशास्त्राच्या अध्यापकांनी चर्चा करणे गरजेचे आहे.

प्रस्तुत अधिवेशनात या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात चर्चा घडून आली हे या अधिवेशनाचे ठळक वैशिष्ट्ये होते असे मला वाटते. मराठी समाजशास्त्र परिषदेचा आज महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. या परिषदेचे सदस्यत्व देशातील अनेक प्राध्यापकांनी स्वीकारले आहे. त्यामुळे ही परिषद आता राष्ट्रीय स्तरावर पोहोचली असली तरी त्यामागे चांगली चर्चा झाल्याचे दिसून येते याचा आम्हाला आनंद आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचे वेगळेपण काय होते तर या उपक्रमांमध्ये महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून प्राध्यापक बहुसंख्येने सहभागी झाले होते. तसेच नव्या

पिढीला जुन्या जाणकार व तज्ञ प्राध्यापकांना जवळून पाहता आले व त्याचे व जुन्या अध्यापक यातील सुसंवाद निर्माण करता आला ही सगळ्यात मोठी जमेची बाजू होती असे आम्हाला वाटते. मराठी समाजशास्त्र परिषदेचा आजीव सदस्य या नात्याने मी सतत आपणासोबत राहून परिषदेसाठी आपल्या सहकार्याने निश्चितच योगदान देण्यास कटिबध्द आहे.

२०२० ते २०२२ या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात मला मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ज्येष्ठ, समन्वयक व नवोदित सदस्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले त्यासाठी मी त्यांच्याप्रति धन्यवाद व्यक्त करतो. विशेष म्हणजे या काळातील माझ्या कार्यकारिणीतील सचिव डॉ. वेदप्रकाश मलवाडे, कोषाध्यक्ष डॉ. बळीराम पवार व माझ्या कार्यकारिणी सदस्यांचे मला विशेष सहकार्य लाभले विशेषत: कार्यकारिणीतील डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. स्निग्धा कांबळे, डॉ. श्रीराम खाडे, डॉ.संजय कोळेकर यांनी म. स. प. साठी मोठी मेहनत घेतली. यांच्याशिवाय हे सर्व कार्यक्रम मी घेऊ शकलो नसतो. तसेच जे कार्यकारीणीचे सदस्य नसतानाही ज्यांनी अप्रत्यक्षरित्या राहून अत्यंत मोलाचे कार्य केले ते **प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. डॉ. राहूल भगत** यांचा नामोल्लेख करणे माझे कर्तव्य ठरते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **प्रा. डॉ. आंबेकर व डॉ. स्निग्धा कांबळे** यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. तुळशीदास रोकडे यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने अधिवेशन समारोपाची सांगता झाली.

## रत्नागिरी येथील मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३१ व्या राष्ट्रीय अधिवेशनाची छायाचित्रे














समाजशास्त्र संशोधन पत्रिका
मराठी समाजशास्त्र परिषद

## मराठी समाजशास्त्र परिषद

(नोंदणी क्रमांक: महाराष्ट्र/२७-८३ औरंगाबाद)

---

-: कार्यालयाचा पत्ता :-

अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा, समाजशास्त्र विभाग, सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा - ४४१९१२

---

### -: कार्यकारी मंडळ :-

अध्यक्ष: **डॉ. राहुल भगत,**
प्राध्यापक व विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा.

सचिव: **डॉ. अशोक बोरकर,**
प्राध्यापक व विभाग प्रमुख, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

कोषाध्यक्ष: **डॉ. धनंजय सोनटक्के,**
प्राध्यापक व विभाग प्रमुख, प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा.

सदस्य: **डॉ. आनंद आंबेकर**, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

सदस्य: **डॉ. किरण सुरवसे**, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

सदस्य: **डॉ. अर्जुन जाधव**, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य: **डॉ. मारोती बामणे**, स्वा. रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सदस्य: **डॉ. मंगलमुर्ती धोकटे**, अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

सदस्य: **डॉ. मधुकर चाटसे**, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

सदस्य: **डॉ. हरीश पेटकर**, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

सदस्य: **डॉ. रवींद्र वाघ**, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

सदस्य: **डॉ. अमोल पाटील**, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

सदस्य: **डॉ. विठ्ठल चव्हाण**, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

सदस्य: **डॉ. प्रवीण घोडेस्वार**, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.

---

प्रकाशक: **डॉ. राहुल भगत,**
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा: समाजशास्त्र विभाग, सेठ नरसिंग दास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविध्यालय, तुमसर, जि. भंडारा-४४१९१२.